| | |
|---|---|
| 1 | जकात विभागाकडे जमा होणारी रक्कम नियमबाहयरित्या लेख्याबाहेर ठेवण्यात आल्याबाबत. |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव |
| | |

| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 10 | जकात | मनपा | 9अ | 4 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 964243182 | | | |

जकात विभागाकडे दैनंदिन जमा होणारी जकातीची रक्कम लेखा विभागाकडे जमा न होता परस्पर चलनाप्रमाणे बँकेमध्ये जमा होते. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता, 1971 क्रमांक : 32 (1) अन्वये नगरपरिषदेच्या वतीने जमा झालेले अथवा संवितरीत केलेले शासकिय अनुदानासहित सर्व पैसे हातचे काहीही राखून न ठेवता नमुना क्रमांक : 11 मधील रोकड वहीत नोंदविले पाहिजे तसेच 2 अन्वये सर्व रोकड व धनादेश रोकड वहीत नोंदणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही न करता परस्पर युनियन बँक, सांगली मुख्य शाखेत बचत खाते क्रमांक : 424202010502707 मध्ये रक्कमेचा भरणा केली जाते.

2012-2013 या आर्थिक वर्षात जकातीपोटी एकूण रक्कम रुपये **96,42,43,182/-** जमा झालेली असून, जमेच्या लेखापरीक्षणासाठी माहे मार्च, 2013 हा निवड महिना घेण्यात आला आहे. माहे मार्च, 2013 मधील जमा रक्कमांचे लेखापरीक्षण करण्यात आले आहे. सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या जकातीची रक्कम युनियन बँक, सांगली मुख्य शाखेत बचत खाते क्रमांक : 424202010502707 मध्ये जकात - सांगली मिरज कुपवाड मनपा या नावाने जमा केली आहे. खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1) जकात विभागाच्या एकत्रित रोजकिर्दनुसार दिनांक 30.3.2013 रोजी रुपये 48,20,231/- रुपये बँकेत चलनाने जमा करण्यात आलेली आहे व रुपये 4,00,00,000/- महानगरपालिकेच्या सर्वसाधारण खात्यामध्ये वर्ग करण्यात आले असुन शिल्लक रुपये 6,40,30,650/- दर्शविण्यात आलेली आहे. तसेच बँक पासबुकामधील नोंदी नुसार दिनांक 30.3.3013 रोजी रुपये 48,20,231/- जमा दाखविण्यात आलेली आहे व रुपये 4,00,00,000/- महानगरपालिकेच्या सर्वसाधारण खात्यामध्ये वर्ग करण्यात आली असुन रुपये 11,35,65,169/- बँक खात्यामध्ये शिल्लक असल्याचे दिसुन येते. यावरुन बँक पासबुक व जकात विभागाची एकत्रित रोजकिर्द यामध्ये (11,35,65,169 - 6,40,30,650) रुपये 4,95,34,519/- इतक्या

रक्कमेची तफावत असल्याची दिसुन येते. सदर तफावतीचा ताळमेळ महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 51 मधील (3) नुसार प्रत्येक महिना अखेर रोकडवहीतील नोंदलेल्या जमा व खर्चाच्या नोंदीची बँक पासबुक मधील नोंदीबरोबर तुलना करून रुपये 4,95,34,519/- चा फरक जुळवून दाखविलेला नाही.

2) जकात विभागास अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 23, दिनांक 7.5.2014 निर्गमित करण्यात आला असुन जकात विभागाने दिनांक 5.6.2014 रोजी अनुपालन सादर केलेले आहे. सादर करण्यात आलेल्या अनुपालनामधील मुद्दा क्रमांक : 1 मध्ये जकात विभागाकडील एकत्रित किर्द हि रोकडवही नसल्याने बँक पासबुकावरील रक्कम व जकातीच्या एकत्रित किर्दिवरील रक्कम या बरोबर असल्याचे नमुद केले आहे. परंतु मुद्दा क्रमांक-1 मध्ये असलेला रुपये 4,95,34,519/- च्या फरकाचा ताळमेळ घेण्यात आलेला नाही.

3) जकात विभागाकडे दैनंदिन जमा झालेली जकातीची रक्कम लेखा विभागाकडे जमा न करता चलनाप्रमाणे परस्पर युनियन बँक, सांगली मुख्य शाखेत बचत खाते क्रमांक : 424202010502707 मध्ये जमा केली आहे. परंतु त्याची नोंद लेखा विभागाकडील नमुना क्रमांक-11 मध्ये घेण्यात आलेली नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता, 1971 क्रमांक : 32(1) अन्वये नगरपरिषदेच्या वतीने जमा झालेले अथवा संवितरीत केलेले शासकिय अनुदानासहित सर्व पैसे हातचे काहीही राखून न ठेवता नमुना क्रमांक : 11 मधील रोकड वहीत नोंदले पाहिजे तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता, 1971 क्रमांक : 32(2) अन्वये सर्व रोकड व धनादेश, रोकड वहीत नोंदणे आवश्यक असता बँक पासबुकामधील नोंदी नुसार दिनांक 30.3.3013 रोजी रुपये 48,20,231/- जमा दाखविण्यात आलेली आहे व रुपये 4,00,00,000/- महानगरपालिकेच्या सर्वसाधारण खात्यामध्ये वर्ग करण्यात आली असुन रुपये 11,35,65,169/- बँक खात्यामध्ये शिल्लक असल्याचे दिसुन येते. परंतु सदर रक्कम रोकडवहीमध्ये नोंदविली नसल्याने लेख्याबाहेर राहिली असल्याचे स्पष्ट होते.

4) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता, 1971 नियम क्रमांक : 35 व नॅशनल म्युनिसिपल अकौंट मॅन्युअल चे नियम 6.42 (फॉर्म जनरल 12) अन्वये प्रत्येक देयक संकलकाने वा जमा कारकुनाने संकलीत वसुली ठराविक वेळी रोजच्या रोज मुख्य लेखा शाखेत भरणा केली पाहिजे. ती भरणा करतेवेळी त्याने सोबत जमापावती पुस्तक, चलन व त्यांचे संकलन पुस्तक आणले अथवा पाठविले पाहिजे. महानगरपालिका कार्यालयात सदर रक्कम स्विकार करणाऱ्याकडून त्यांची पोचपावती चलनावर व संकलन पुस्तकातही केली पाहिजे. परंतु जकात विभागाने दैनंदिन जकात वसुलीची रक्कम मुख्य लेखा शाखेत जमा न करता रक्कम परस्पर युनियन बँकेत जमा केली आहे. त्यामुळे महापालिकेच्या रोकडवहीमध्ये जकात विभागाने गोळा केलेल्या रक्कमांचा दररोज समावेश झाला नसलेने सदर रक्कम लेख्याबाहेर राहीली असलेचे स्पष्ट होते. या संदर्भात जकात रुपाने गोळा होणा-या सर्व रक्कमा महानगरपालिकेच्या

| |
|---|
| निधीत जमा होतील याकरिता सुसंगत कार्यपध्दत निश्चित करणे आवश्यक आहे.<br><br>**आक्षेपाधीन रक्कम :- आर्थिक वर्ष 2012-13 मध्ये जमा झालेली जकातीची रक्कम रुपये 96,42,43,182/-** |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 23 | 07/05/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DMASGDM7201 |

| 2 | युनियन बँकेने Cash Transaction Charges ची रक्कम कपात केल्याबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 10 | जकात | मनपा | 9ब | 1 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | 783533.61 | | |

| |
|---|
| जकात विभागाचे युनियन बँकेमध्ये खाते असुन 2012-2013 मध्ये झालेल्या आर्थिक व्यवहारावर बँकेने रुपये 7,83,533.61 Cash Transaction Charges पोटी कपात केली आहे. |

| |
|---|
| सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या जकातीची रक्कम युनियन बँक, सांगली मुख्य शाखेत बचत खाते क्रमांक : 424202010502707 मध्ये जकात - सांगली मिरज कुपवाड मनपा या नावाने जमा केली आहे . युनियन बँकेच्या पासबुकाची तपासणी केली असता बँकेने प्रत्येक महिन्यामध्ये 15 ते 20 वेळा Cash Transaction Charges पोटी रक्कम कपात केली आहे. 2012-2013 मध्ये खालील प्रमाणे बँकेने Cash Transaction Charges ची रक्कम रुपये 7,83,533.61 कपात केलेली आहे. |

| अ.क्र. | महिना व वर्ष | रुपये |
|---|---|---|
| 1 | एप्रिल, 2012 | 58,602.27 |
| 2 | मे, 2012 | 70,514.31 |
| 3 | जुन, 2012 | 68,933.18 |
| 4 | जुलै, 2012 | 70,361.18 |
| 5 | ऑगस्ट, 2012 | 68,408.11 |
| 6 | सप्टेंबर, 2012 | 56,390.88 |
| 7 | ऑक्टोबर, 2012 | 72,325.64 |
| 8 | नोव्हेंबर, 2012 | 63,572.36 |
| 9 | डिसेंबर, 2012 | 68,850.32 |
| 10 | जानेवारी, 2013 | 58,819.33 |
| 11 | फेब्रुवारी, 2013 | 61,263.21 |
| 12 | मार्च, 2013 | 65,492.82 |
| | **एकूण** | **7,83,533.61** |

युनियन बँकेने 2012-2013 या वर्षात रक्कम रुपये 7,83,533.61 कोणत्या प्राधिकारान्वये कपात केली आहे, याबाबत जकात विभागास अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 23, दिनांक 7.5.2014 निर्गमित करण्यात आले असुन जकात विभागाने दिनांक 5.6.2014 रोजी अनुपालन सादर केलेले आहे. सदर अनुपालनामध्ये कपातीची रक्कम बँकेकडून वसुल करणे आवश्यक असल्याचे मान्य केले आहे. परंतु रक्कम वसुल केली नसल्याने युनियन बँकेने कपात केलेली Cash Transaction Charges ची रक्कम रुपये 7,83,533.61 वसुल करण्यात यावी.

**( वसुलपात्र रक्कम रुपये 7,83,533.61 )**

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 23 | 07/05/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DMASGDM7201 |

| | |
|---|---|
| 3 | महानगरपालिकेने कर्मचारी आकृतीबंधास शासनाची मंजूरी घेतली नसलेबाबत. |

| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 02 | आस्थापना | मनपा | 9अ | 1 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 454695411 | | | |

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेने सांगली व मिरज विभागातील कर्मचारी आकृतीबंधास शासन मंजूरी घेतलेली नाही. तसेच अदयाप आकृतीबंध मंजूरीबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केलेला नसल्याने कर्मचा-यांच्या वेतनावर 2012-13 या आर्थिक वर्षात खर्च केलेली रक्कम रुपये 45,46,95,411/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

महानगरपालिकेने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 51 (1 ते 3) प्रमाणे कुपवाड विभागाचा आकृतीबंध शासनाने मान्य केला असुन सांगली, मिरज विभागाचा आकृतीबंध मान्य नसल्याचे नमुद केले आहे. महानगरपालिकेने दिलेल्या माहितीनुसार 2012-2013 या आर्थिक वर्षात एकूण 2372 कर्मचा-यांची पदे असुन त्यापैकी 426 पदे रिक्त आहेत व 1946 पदे कार्यरत आहेत. त्यापैकी कुपवाड विभागाचा 160 पदांचा आकृतीबंध मंजूर आहे. उर्वरित 2212 पदांना शासनाची मंजूरी घेतलेली नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 29, नियम, उपविधी, विनियम आणि स्थायी आदेश , कलम 457 (3) नुसार नगरपालिका अधिकारी कर्मचारी (अ) ज्या जागेवर नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये विहित असेल त्या जागेसाठी आवश्यक असलेली अर्हता आणि त्या जागेवर नेमणूक करण्याची पध्दती (ब) अन्य जागेवर नेमणूक करण्याची पध्दती ठरविण्याबाबत नियम करण्याचे अधिकार महानगरपालिकेस आहेत व सदर नियमास कलम 455 अन्वये शासनाची मंजूरी घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कर्मचारी अर्हता व त्या जागेवर नेमणूक करण्याची पध्दती यास महानगरपालिकेने शासन मंजुरी घेतली नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 51 (1 ते 3) प्रमाणे अदयाप महानगरपालिकेने आकृतीबंध मंजूरीचा प्रस्ताव शासनास सादर केलेला नाही.

2012-2013 या आर्थिक वर्षामध्ये आकृतीबंध मंजूर नसलेला एकूण 1786 इतका कर्मचारी वर्ग

कार्यरत होता व त्यांचे वेतनावर विभागनिहाय खालील प्रमाणे खर्च झालेला आहे.

| अ.क्र. | विभाग | रक्कम रुपये |
|---|---|---|
| 1. | प्रशासन | 23376716 |
| 2. | लेखापरीक्षण | 4514751 |
| 3. | नगर सचिव | 1187753 |
| 4. | जकात | 34166472 |
| 5. | मालकत्ता कर | 15209343 |
| 6. | अग्निशमन व आणीबाणी सेवा | 16823104 |
| 7. | विदयुत | 1686455 |
| 8. | स्वच्छता कर्मचारी वगळुन | 34148666 |
| 9. | साफ सफाई व सोयी | 119443192 |
| 10. | यंत्रशाळा | 2424831 |
| 11. | आयुर्वेदिक | 1343566 |
| 12. | प्रसुती गृहे | 15900504 |
| 13. | इतर दवाखाने | 21734123 |
| 14. | कुटुंब कल्याण केंद्र | 3208559 |
| 15. | नागरी आरोग्य सेवा | 9608193 |
| 16. | उद्याने | 8219148 |
| 17. | बांधकाम | 41892524 |
| 18. | नगर रचना | 3391305 |
| 19. | जलनिसा:रण | 24719216 |
| 20. | पाणी पुरवठा | 63432277 |
| 21. | शिक्षण (बालमंदिर) | 2811454 |
| 22. | ग्रंथालय | 1898084 |
| 23. | मालमत्ता | 3555175 |
| | **एकूण** | **454695411** |

2011-2012 या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणामध्ये परिच्छेद क्रमांक : 4 अन्वये शासनमान्य आकृतीबंध नसल्याने कर्मचारी वेतनाची रक्कम रुपये 4,35,89,058/- आक्षेपाधीन ठेवण्यात आलेली आहे. 2012-2013 वर्षात ही आकृतीबंध मंजुर करणेबाबत महानगरपालिकेने कोणतीही कार्यवाही केली नसल्याने कर्मचा-यांच्या वेतनावर खर्च केलेली रक्कम रुपये 45,46,95,411/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

सदर बाबत आस्थापना विभागास अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 24, दिनांक 7.5.2014 निर्गमित

| |
|---|
| करण्यात आला असुन विभागामार्फत अनुपालन सादर करण्यात आलेले नाही.<br>**( आक्षेपाधीन रक्कम रुपये 45,46,95,411/-)** |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 24 | 07/05/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DMASGDM7201 |
|---|---|

| 4 | करांची वापरलेली पुस्तके जमा करुन न घेता नवीन पुस्तके वितरीत केलेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 20 | अभिलेख | मनपा | 9ड | 1 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

अभिलेख विभागाने महानगरपालिकेतील विभागांना पूर्वी वितरीत केलेली पावती पुस्तके जमा करुन न घेता नवीन पावती पुस्तके वितरीत केली आहेत.

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या विविध करांच्या वसुलीबाबत 2012-2013 या आर्थिक वर्षाच्या पावती पुस्तकांचा लेखा पडताळणी करण्यात आला. त्यानुसार अभिलेख शाखेकडे आरंभिची पुस्तके, 2012-2013 मध्ये छपाई केलेली पुस्तके, वितरीत केलेली पुस्तके व शिल्लक पुस्तकांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | पुस्तकाचे नांव | **2012-13** आरंभिची पुस्तके | **2012-13** मध्ये छपाई केलेली पुस्तके | वितरीत केलेली पुस्तके | शिल्ल्क पुस्तके |
|---|---|---|---|---|---|
| 1 | जकात पुस्तके | 1790 | 6000 | 7080 | 710 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | मार्गस्थ (रु.100) | 230 | 100 | 232 | 98 |
| 3 | मार्गस्थ (रु.50) | 730 | 3000 | 3170 | 560 |
| 4 | घरपट्टी | 430 | -- | 320 | 110 |
| 5 | पाणीपट्टी | 584 | -- | 84 | 500 |
| 6 | सर्वसा. पुस्तके | 351 | 500 | 466 | 385 |
| 7 | MMAC-79 | 44 | 500 | 54 | 490 |
| 8 | कोंडवाडा - फी | 20 | -- | -- | 20 |
| 9 | वाचनालय | 45 | -- | 15 | 30 |
| 10 | रेकॉर्ड फी | 109 | -- | 16 | 93 |

सदर पावती पुस्तके संबंधीत विभागामार्फत अन्य विभागांनी केलेल्या मागणीनुसार वितरीत केली जातात. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971, नियम 9(4) अन्वये नवीन पुस्तक वितरण करण्यापूर्वी पूर्वीचे वापरातील पुस्तक परत अभिलेख शाखेकडे जमा करणे आवश्यक आहे. परंतु अभिलेख शाखेने संबधित विभांगाना पुर्वी दिलेली पावती पुस्तके जमा करुन न घेताच नविन पावती पुस्तके वितरीत केलेचे निर्दशनास आले आहे.

सदर बाबत अभिलेख विभागास अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 29, दिनांक 30.5.2014 अन्वये निर्गमित करण्यात आला असुन अभिलेख विभागाने जा.क्र./मनपा/प्रशवि/5/19/2014-15, दिनांक 3.6.2014 अन्वये अनुपालन सादर केलेले आहे. त्यामध्ये अभिलेख विभाग कक्षामध्ये जागा अपुरी असल्याने अ.क्र. 1 ते 5 वरील यापूर्वी वापरलेली पुस्तके जमा करुन न घेता नवीन पुस्तके दिल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे नियमानुसार कार्यवाही करण्यात आली नसलेने सादर केलेले अनुपालन मान्य करता येत नाही.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 29 | 30/05/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DMASGDM7201 |

| | |
|---|---|
| 5 | जकातीच्या चालू खातेधारकांकडून बिनव्याजी अनामत रक्कम व नुतनीकरण फी घेतली नसलेबाबत. |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव |
| | |

| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 10 | जकात | मनपा | 9ब | 04 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | 45888779 | | |

जकात विभागाने जकातीच्या चालू खातेधारकांकडून बिनव्याजी अनामत रक्कम, नवीन करारनामा व नुतनीकरण फी घेण्यात आली नसल्याने रक्कम रुपये 4,58,88,779/- वसुल करण्यात यावी.

जकात विभागाच्या जकातीसाठी चालू खातेधारकांची नस्ती, करारपत्रे यांचे लेखापरीक्षण केले असता महानगरपालिकेने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949, प्रकरण आठ मधील कलम 28 नुसार व सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेचा ठराव क्रमांक : 688, दिनांक 26.2.2003 अन्वये महानगरपालिका कार्यक्षेत्रातील व्यापा-यांना जकातीसाठी चालू खाते ठेवण्याची सवलत देण्यात आली आहे. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 30, दिनांक 30.5.2014 निर्गमित करण्यात आले असुन जकात विभागाकडून दिनांक 5.6.2014 रोजी अनुपालन सादर करण्यात आलेले आहे. जकात विभागाने दिलेल्या अनुपालनाचे अवलोकन करुन खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

1) जकात विभागाने सादर केलेल्या विवरणपत्रात एकूण 24 चालू खातेधारक असुन त्यापैकी एकूण 15 चालू खातेधारकांचे करारपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले असुन 8 चालू खातेधारकांचे करारपत्रे उपलब्ध झालेली नाहीत.

2) उपलब्ध करारपत्राचा नमुना छापील असुन त्यावर मा.आयुक्त यांची स्वाक्षरी तसेच कार्यालयीन शिक्का असा मजकुर छापला आहे. उपलब्ध करारपत्रांपैकी 8 करारपत्रावर मा.आयुक्त यांची स्वाक्षरी तसेच कार्यालयीन शिक्का मारण्यात आलेला नाही. त्यामुळे सदर करारपत्रे परिपूर्ण नाहीत.

3) महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्रमांक : 688, दिनांक 26.2.2003 अन्वये चालू खातेधारकांकडून सवलतीचा परवाना दरवर्षी योग्य त्या स्टॅम्प पेपरवर करुन नुतनीकरण फी रुपये 3,000/- आकारण्याचे नमुद आहे. परंतु नविन करारपत्र व नुतनीकरण फी वसुल न केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे 25 चालू खातेधारकांकडून नुतनीकरण फी रुपये 3,000/- प्रतीवर्ष प्रमाणे मागील 10 वर्षांची वसुल न केलेली रक्कम रुपये 7,50,000/- इतकी संबंधीतांकडून वसुलपात्र आहे.

4) उपरोक्त स्थायी समिती ठरावानुसार सोबतच्या परिशिष्ट क्रमांक : 1 मधील यादीतील चालू

| |
|---|
| खातेधारकांची तीन महिन्याच्या जकातीइतकी रक्कम रुपये 5,01,46,600/- ठेव म्हणून घेणे आवश्यक असता रुपये 91,11,346/- घेतलेली असल्याने उर्वरित रुपये 4,10,35,254/- वसुल करणे आवश्यक आहे. तसेच सदर रकमेवर वार्षिक 10% दराने व्याज रुपये 41,03,525/- असे एकूण रुपये 4,51,38,779/- संबंधीतांकडून (परिशिष्ट क्रमांक : 1) वसुल करणेत यावेत. तसेच 2011-2012 या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणामध्ये लेखा आक्षेप क्रमांक : 47 घेण्यात आला होता. परंतु त्याप्रमाणे कोणतीही वसुली न करता यावर्षी देखील चालू खातेधारकांकडून सुधारीत वसुली करण्यात आलेली नाही.<br><br>**वसुलपात्र रक्कम :- रुपये 4,58,88,779/-** |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 30 | 30/05/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DMASGDM7201 |
|---|---|

| 6 | रजा कालावधीचे वेतन वेतनवाढीच्या दिनांकापासून दिल्याने झालेल्या वेतन व भत्त्याच्या अतिप्रदानाबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 02 | आस्था | मनपा | 9ब | 1 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | 3034 | | |

| |
|---|
| महानगरपालिका कर्मचा-यांना माहे जुलै, 2012 मध्ये देण्यात आलेली नियमित वेतनवाढ चुकीची देण्यात आल्याने रुपये 3,034/- वसुली करण्यात यावी. |

| |
|---|
| आस्थापना विभागातील सेवापुस्तके, रजेचा लेखा तसेच नियमित वेतनवाढ तपासली असता |

महानगरपालिका कर्मचा-यांना दिनांक 1 जुलै, 2012 रोजी रजेवर असताना रजेच्या कालावधीचा विचार न करता नियमित 1 जुलै, 2012 पासुन नियमित वेतनवाढ देण्यात आली असुन त्याप्रमाणे त्यांना वेतन अदा केलेले आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 (रजा) नियम 1981, नियम - 70 अन्वये कर्मचारी रजेवर असल्यास त्याला दयावयाचे रजा वेतन हे रजेवर जाण्याच्या लगतपूर्वी त्याला मिळालेल्या वेतनाइतके मिळण्याचा हक्क आहे.

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेचे खालील कर्मचारी दिनांक 1 जूलै, 2012 रोजी रजेवर होते. तथापि सदर कर्मचा-यांना दिनांक 1 जूलै, 2012 रोजीची नियमित वेतनवाढ देण्यात आली असुन वेतनवाढीनूसार वेतन अदा करण्यात आलेले आहे. त्यानुसार वेतनवाढी प्रमाणे जादा प्रदान करण्यात आलेले वेतन वसुलपात्र आहे. सदर कर्मचा-यांची यादी खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | नांव व प दनाम | रजेचा कालावधी | **1.7.2011** चे वेतन | **1.7.2012** चे वेतन | जादा अदा केलेले वेतन |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री.बा.रा. आढाव, क्लिनर | 20.6.12 ते 19.7.12 (अर्जित रजा) | 7530 + 1300 | 7800 + 1300 | 291/- |
| 2 | श्री.गो.उ. कुरणे, क.लि. | 25.6.12 ते 30.8.12 (अर्जित रजा) | 13260 + 4200 | 13990 + 4200 | 1856/- |
| 3 | श्रीम.प्र.चं. डोंगरे, कुली | 25.6.12 ते 9.7.12 (अर्जित रजा) | 7000 + 1300 | 72500 + 1300 | 127/- |
| 4 | श्री.वि.मा. माळी, कुली | 29.6.12 ते 7.7.12 (अर्जित रजा) | 6080 + 1300 | 6310 + 1300 | 91/- |
| 5 | श्रीम.श.शि. पवार, कुली | 5.6.12 ते 4.7.12 (अर्जित रजा) 5.7.12 ते 13.8.12 (परिवर्तीत रजा) | 7270 + 1600 | 7540 + 1600 | 669/- |
| | **एकूण** | | | | **3034/-** |

सदर बाबत आस्थापना विभागास अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 31, दिनांक 30.5.2014 निर्गमित करण्यात आले असुन विभागाने अनुपालन सादर केलेले नाही.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 31 | 30/05/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DMASGDM7201 |

| 7 | महानगरपालिका अधिकारी / कर्मचा-यांकडून जामिन कदबे घेण्यात आले नसल्याबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 02 | आस्था | मनपा | 9ड | 1 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेने जे अधिकारी / कर्मचारी मालमत्ता, रोकड दस्तऐवज हाताळतात त्यांच्या कडून तारणपत्र घेण्यात आलेले नाही.

महानगरपालिकेतील जे कर्मचारी मालमत्ता, रोकड अथवा दस्तऐवज हाताळतात त्यांचेकडून तारणपत्रे घेणे आवश्यक आहे व महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 138 प्रमाणे प्रत्येक अधिकारी / कर्मचा-याने दिलेल्या तारणपत्राचे पुस्तक नमुना क्रमांक : 106 प्रमाणे ठेवणे आवश्यक आहे. याबाबत सदर तारणपत्राचे पुस्तकांची मागणी लेखा विभागाकडे अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 25, दिनांक 07.05.2014 अन्वये करण्यात आली होती. परंतु लेखा विभागाने तारणपत्राचे पुस्तक नमुना क्रमांक 106 लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिलेला नाही. तसेच अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालनही सादर केलेले नाही. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1) नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम क्रमांक 138 प्रमाणे प्रत्येक अधिकारी / कर्मचा-याने दिलेल्या तारणपत्राचे पुस्तक नमुना क्रमांक : 106 प्रमाणे ठेवणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे महानगरपालिकेच्या जकात,घरपट्टी,मालमत्ता, भांडार,लेखा विभागातील रोखपाल, पाणीपुरवठा, आरोग्य

| |
|---|
| विभागातील दवाखान्याकडील कर्मचारी इत्यादी मालमत्ता, रोकड व दस्तऐवज हाताळाणा-या कर्मचा-याकडून 2012-2013 या आर्थिक वर्षात महानगरपालिकेने जामीन कदबे घेण्यात आल्या बाबतचे नमुना क्रमांक 106 लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेले नाही. त्यामुळे किती कर्मचारी रोकड हाताळतात व त्यांचेकडून किती रक्कम तारण म्हणून ठेव घेणे आवश्यक आहे याबाबत खात्री करता आली नाही. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 25 | 07/05/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DMASGDM7201 |

| 8 | सेवानिवृत्त कर्मचा-यांना निवृत्तीवेतन विषयक लाभ वेळेत प्रदान केले नसल्याबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 02 | सा.प्र. | 0 | 9ड | 3 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

| |
|---|
| सेवानिवृत्त कर्मचा-याना निवृत्तीवेतन विषयक लाभ निवृत्तीनंतर त्वरीत देणे आवश्यक असताना परिशिष्ठ क्र.2 मधील कर्मचा-यांना एक ते दोन वर्ष विलंबाने सेवानिवृत्ती वेतनाचे लाभ प्रदान केलेले आहेत. सदर लाभ वेळेत प्रदान न केल्यामुळे सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांना त्यांचे हक्काचे लाभापासुन वंचित ठेवण्यात आलेले आहे. |

| |
|---|
| सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या 2012-13 या आर्थिक वर्षात सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांची सेवापुस्तके, सेवानिवृत्ती प्रकरणांची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 60, दिनांक 13.6.2014 निर्गमित करण्यात आले असुन त्याचे अनुपालन आस्थापना विभागाने सादर केलेले |

| |
|---|
| नाही. सेवानिवृत्त कर्मचा-यांची सेवानिवृत्त प्रकरणांची तपासणी करुन परिशिष्ठ क्र.2 जोडण्यात आले आहे.<br>1) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 च्या प्रकरण 10 मधील नियम क्रमांक : 118 च्या तरतुदीनुसार प्रत्येक विभाग / कार्यालय प्रमुखाने दर सहा महिन्यांनी म्हणजेच 01 जानेवारी व 01 जुलै रोजी त्या तारखेपासून पुढील 24 ते 30 महिन्यांमध्ये सेवानिवृत्त होणा-या सर्व शासकीय कर्मचा-यांची यादी तयार करुन ती संबंधीत निवृत्तीवेतन प्रकरणे अंतिम करणा-या कार्यालयाकडे दिनांक 31 जानेवारी किंवा 31 जुलै पर्यंत पोहोचतील अशा बेताने पाठविणे अत्यंत आवश्यक आहे. शिवाय नियतवयोमान सेवानिवृत्ती व्यतिरिक्त इतर कारणास्तव सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांच्या बाबतीत अशा सेवानिवृत्ती बाबत माहिती प्राप्त होताच त्यांची माहिती संबंधीत कार्यालयास / विभागास देणे आवश्यक आहे. परंतु महानगरपालिकेच्या आस्थापना विभागाने त्याप्रमाणे 01 जानेवारी व 01 जुलै रोजी त्या तारखेपासून पुढील 24 ते 30 महिन्यांमध्ये सेवानिवृत्त होणा-या सर्व शासकीय कर्मचा-यांची यादी तयार केलेली नाही.<br><br>2) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 च्या प्रकरण 10 मधील नियम क्रमांक : 120 च्या तरतुदीनुसार निवृत्तीवेतन विषयक कागदपत्रे पूर्ण करताना उपरोक्त नियमावलीच्या 121 च्या तरतुदीनुसार सेवेची पडताळणी करणे, सेवापुस्तकातील उणिवा भरुन काढणे, सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-याकडून आवश्यक माहिती विहीत नमुन्यात भरुन घेणे इत्यादी बाबींची पूर्तता करुन कार्यालय प्रमुखाने परिपूर्ण कागदपत्रे उपरोक्त नियमावलीच्या नियम क्रमांक : 122 व 123 च्या तरतुदीनुसार कर्मचा-याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपूर्वी जास्तीत जास्त सहा महिन्याच्या आत सामान्य प्रशासन विभागाकडे तपासणीसाठी पाठविणे आवश्यक असता परिशिष्ठ क्र.2 मधील कर्मचा-यांची यादी आस्थापना विभागाने पाठविली नाही.<br>3) परिणामी सेवानिवृत्ती प्रकरणांना अंतिम स्वरुप देण्यास विलंब होतो असेही लेखापरीक्षाचे वेळी निर्दशनास आलेले आहे. निवृत्तीवेतन विषयक लाभ निवृत्तीवेतनधारकांना विलंबाने प्रदान केल्यामुळे त्यांना नाहक आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. परिशिष्ठ क्रमांक : 2 मध्ये नमुद कर्मचा-यांना विलंबाने निवृत्तीवेतन विषयक लाभ प्रदान झालेले आहेत. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 60 | 13/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DMASGDM7201 |
|---|---|

| 9 | महाराष्ट्र शिक्षण उपकर व रोजगार हमी (उपकर) शासनास विलंबाने भरणा केले बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 07 | लेखा | मनपा | 9अ | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 45968797 | 0 | 0 | 0 |

महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग शासन परिपत्रक क्रमांक इडिसी-1097/प्र.क्र.205/ल-5 मंत्रालय मुंबई दिनांक 3 एप्रिल 1998 प्रमाणे ज्या आठवड्यात रक्कमा वसूल केल्या जातात अशा रकमांचा भरणा शासकिय कोषागारात पुढील आठवडा संपण्याच्या आत करावयाचा आहे. परंतु महाराष्ट्र शिक्षण उपकर व रोजगार हमी (उपकर) रु.45968797/- विलंबाने शासनास भरणा झाला आहे.

1. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या 2012-2013 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणाच्या वेळी महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) अधिनियम 1962 नुसार महानगरपालिका क्षेत्रातील जमिनी व इमारती यावर वसूल करण्यात आलेल्या शिक्षण व रोजगार हमी (उपकर) च्या रक्कमा महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग शासन परिपत्रक क्रमांक इडिसी-1097/प्र.क्र.205/ल-5 मंत्रालय मुंबई दिनांक 3 एप्रिल 1998 प्रमाणे ज्या आठवड्यात रक्कमा वसूल केल्या जातात अशा रकमांचा भरणा शासकिय कोषागारात पुढील आठवडा संपण्याच्या आत करावयाचा आहे. परंतू महानगरपालिकेने उक्त कराच्या वसुल रक्कमा पुढील प्रमाणे विलंबाने शासकीय कोषागारात भरणा केल्या आहेत.

| अ.क्र. | वसुलीचा कालावधी | रक्कम रुपये | भरणा दिनांक |
|---|---|---|---|
| 2. | 27.03.2012 ते 30.03.2012 | 3687555 | 18.07.2012 |
| 3. | 31.03.2012 | 1130987 | 30.08.2012 |
| 4. | 17.04.2012 ते 31.07.2012 | 3527698 | 30.08.2012 |
| 5. | 01.08.2012 ते 30.09.2012 | 2090289 | 16.11.2012 |

| | | | |
|---|---|---|---|
| 6. | 01.10.2012 ते 31.10.2012 | 1377669 | 16.11.2012 |
| 7. | 01.11.2012 ते 31.01.2013 | 21195127 | 09.03.2013 |
| 8. | 01.02.2013 ते 28.02.2013 | 4997446 | 29.03.2013 |
| 9. | 01.03.2013 ते 20.03.2013 | 6142574 | 29.03.2013 |
| 10. | 28.03.2013 ते 31.03.2012 | 1819452 | 09.01.2014 |
| | | 45968797 | |

उपरोक्त मुद्दा क्रमांक 1 मधील नमूद परिपत्रकानुसार महानगरपालिकेने प्रत्येक महिन्याच्या 15 तारखेस वसुल व जमा केलेल्या शिक्षण व रोजगार हमी कराची माहिती विहीत नमुन्यात जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवायची आहे. परंतु अशी माहिती पाठविणेबाबतची विवरणे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक 36 दि.07/06/2014 चे अनुपालन लेखा विभागाने दि.19/6/14 रोजी सादर केले असुन महानगरपालिकेची आर्थिक स्थिती चांगली नसल्याने उपकराची रक्कम नियमाप्रमाणे भरणा केली नसल्याचे मान्य केले आहे.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 36 | 07/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRVVM5901 |

| 10 | मालमत्ता कराच्या थकबाकीची वसुली केली नसल्याबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 11 | करनिर्धारण व संकलन | मनपा | 9ब | 02 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | 243140041 | 0 | 0 |

2012-2013 या आर्थिक वर्षात मालमत्ता कराच्या थकबाकी रक्कम रुपये 243140041/- वसुली केलेली नाही व नियामानुसार वसुलीची कार्यवाही करणेत आलेली नाही.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे 2012-2013 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणाच्या वेळी कर निर्धारण व संकलन विभागाकडील मालमत्ता कराच्या थकीत रकमांचे परिशिष्ठ क्रमांक (13) अवलोकन केले असता मार्च 2013 अखेर एकूण थकबाकी रुपये 243140041/- इतकी असलेचे दिसून येते. 2012-13 या वित्तिय वर्षामध्ये घरपट्टी विभागाची चालु मागणी रु.255232224/- व थकबाकी रु.202424281/-अशी एकुण मागणी रु.457656505/- होती. त्यापैकी दि.31/03/2013 अखेर मागील थकबाकी व चालू मागणीसह एकुण रक्कम रु.243140041/- ची वसुली झाली आहे. वसुलीची टक्केवारी फक्त 53.13% इतकीच आहे.

1)थकीत कराबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड मधील प्रकरण 8 नियम क्र.41 प्रमाणे वसुलीसाठी मिळकतधारकास नोटीस देणे आवश्यक आहे व त्याबाबतची नोंदवही नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 81 (2) प्रमाणे नमुना क्रं.51 मधील नोटीस व वॉरंट फी नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. याअनुषंगाने लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन क्रमांक 37 दि.07/06/2014 ने नोंदवहीची मागणी केली असता घरपट्टी विभागाने एकुण 65520 नोटीसा मिळकतधारकांना देण्यात आल्या आहेत मात्र याबाबतची नोंदवही ठेवण्यात आली नसल्याचे मान्य केले आहे.

2)मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसूची 'ड' प्रकरण 8 नियम 42 नुसार नोटीस दिल्यानंतर 15 दिवसाचे आत घरपट्टीची रक्कम भरली नाही तर नियम क्र.42 नुसार वसुलीच्या खर्चासह आयुक्ताने नमुना ह मध्ये काढावयाच्या अधिपत्रान्वये कसूरदाराची जंगम व स्थावर मालमत्ता आटकावणी करुन तिची विक्री करुन तो कर वसुल करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे महानगरपालिकेने किती थकबाकीधारकावर कार्यवाही केली व किती रक्कम वसुल केली याबाबतअर्धसमास ज्ञापन क्र.37 अन्वये मागणी केली असता अशाप्रकारे कोणतीही कारवाई केली नसल्याचे घरपट्टी विभागाने अनुपालनामध्ये नमूद केले आहे. या पुढे आवश्यक ती कारवाई करून थकीत रक्कम वसुल करून अनुपालन दाखवावे.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक 37 दि.07/06/2014 चे अनुपालन करनिर्धारण विभागाने दि.08/7/14 रोजी सादर केले आहे.अनुपालनामध्ये थकबाकी वसुलीची कार्यवाही सुरु असल्याचे नमुद आहे.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 37 | 07/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRVVM5901 |
|---|---|

| 11 | मालमत्ता कराच्या थकीत रक्कमेवर दरमहा 2% प्रमाणे 9 महिन्यासाठी शास्ती लावली नसलेने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 11 | करनिर्धारण व संकलन | मनपा | 9ब | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | 36436370 | 0 | 0 |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसूची ड प्रकरण 8 नियम 41 (1) नुसार मालमत्ता कराच्या थकीत रक्कम रु. 20,24,24,281/- वर दरमहा 2% प्रमाणे 9 महिन्याचे 18 टक्के प्रमाणे होणारी शास्तीची रक्कम रुपये 36436370/- वसुल केली नसल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

१. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कर संकलन विभागातील 2012-2013 या आर्थिक वर्षातील मालमत्ता कर थकबाकीची नस्ती तपासली असता आरंभीची थकबाकी रु. 20,24,24,281/- एवढी आहे. मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 अनुसूची ड प्रकरण 8 नियम क्रमांक 41(1) नुसार अधिनियम 2009 च्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी या अधिनियमान्वये ज्यासाठी बिल देण्यात आले आहे. असा कोणताही मालमत्ता कर पूर्णपणे किंवा अंशत: अदत्त राहील असे, ज्या व्यक्तीने असा कर भरलेला नाही ती व्यक्ती उक्त 2009 च्या सुधारणा अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास व दिनांकापासून, या कलमान्वये तरतूद केल्या प्रमाणे, अशा करावरील शास्ती भरण्यास जबाबदार असेल. त्याप्रमाणे उपरोक्त थकबाकीवर दरमहा 2% प्रमाणे 9 महिन्याचे 18% व्याज धरून करसंकलन विभागाच्या थकबाकीवर रुपये 3,64,36,370/- इतकी शास्ती होत असून, सदर रक्कम मालमत्ता धारक यांचेकडून वसुल करणे आवश्यक असल्याने प्रत्येक घरपट्टीधारकाची शास्तीची रक्कम परिगणीत करुन वसुलीच्या पावतीमध्ये समाविष्ठ करुन वसुली करणे आवश्यक असता मागणी देयकामध्ये शास्तीच्या रक्कमेचा समावेश केला नसल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे स्पष्ट होते. 2011-12 या

| |
|---|
| आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालामध्ये शास्तीबाबतचा परिच्छेद क्र.50 घेण्यात आलेला असतानाही 2012-13 या वर्षामध्येही शास्तीबाबत कोणतीही कार्यवाही केली नसुन त्याबाबत खुलासा केला नाही.<br>अर्धसमास ज्ञापन क्रमांक 38 दि.07/06/2014 चे अनुपालन करनिर्धारण विभागाने दि.08/07/14 रोजी दिले असुन शास्तीच्या रक्कमेची आकारणी वसुली देयकात दाखविली नसल्याचे मान्य केले आहे.<br>वसुलपात्र रक्कम रुपये 36436370/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 38 | 07/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRVVM5901 |

| 12 | कमी क्षेत्रफळ विचारात घेवून कर आकारणी केलेने झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 11 | करनिर्धारण व संकलन | मनपा | 9ब | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | 2269 | 0 | 0 |

| |
|---|
| कमी क्षेत्रफळ विचारात घेवून घरपट्टी कर आकारणी केलेने महानगरपालिकेचे रु.2269/- इतके आर्थिक नुकसान झाले आहे. |

| |
|---|
| सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कर संकलन विभागातील 2012-2013 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणाचे वेळी सांगली विभाग कर निर्धारण पत्रकांचे अवलोकन करतेवेळी शहा आलोक सुरेश, मालमत्ता क्र.142/300/3 यांनी शिवदत्त बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स सांगली यांचेकडून विस्तारित सि.स.न.8275 मिळकती वरील शिवदत्त रॉयल या इमारतीतील तळमजल्यावरील व्यापारास |

उपयुक्त दुकान गाळे खरेदी केले असून सदर खरेदीचे सहनिबंधकाकडील करारपत्र पहाता करारपत्रात सदर गाळ्याचे कारपेट क्षेत्र 23.113 चौ.मी. आहे. परंतु महापालिकेच्या करनिर्धारण विभागाने लांबी रुंदी प्रमाणे क्षेत्र 18.09 मीटर प्रमाणे विचारात घेतल्याने पुढील तपशिल प्रमाणे कमी प्रमाणात कर आकारणी केल्याचे निदर्शनास आले आहे.

| करण्यात आलेली कर आकारणी | | प्रत्यक्ष होणारी कर आकारणी |
|---|---|---|
| कारपेट क्षेत्र | 18.09 चौ.मी | 23.113 चौ.मी. |
| x दर | 44.58 | 44.58 |
| मासिक भाडेमुल्य | 806.45 | 1030.37 |
| X 12 | 9677 वा.भाडे मुल्य | 12366 |
| (-) 10% वजावट | 967 | 1237 |
| वार्षीक करपात्र भाडेमुल्य रु. | 8710 | 11129 |
| x 49 कर आकर रु. | 4268 | 5453 |

तसेच श्री. प्रकाश पांडूरंग कुंभार मागणी क्रमांक 103/106/1 यांनी शिवदत्त डेव्हलपर्स यांचेकडून पहिला मजला फ्लॅट नं.2 खरेदी केला असून सदर खरेदीचे करारपत्रक पहाता सदर फ्लॅटचे कार्पेट क्षेत्र 47.335 चौ.मी. आहे. परंतु मोजमापानुसार लांबी रुंदी क्षेत्र 33.67 चौ.मी. प्रमाणे विचारात घेतल्याने खालील प्रमाणे कमी प्रमाणात कर आकारणी झालेचे निदर्शनास आले आहे.

अ) खरेदीखता मधील क्षेत्रफळा प्रमाणे प्रत्यक्ष होणारी कर आकारणी

| | |
|---|---|
| कारपेट क्षेत्र | 47.335 |
| x दर | 15 |
| मासिक भाडे | 710.025 |
| x 12 | |
| वार्षिक भांडे मुल्य | 8523 |
| ÷ 10% | 852 |
| नि.वा.भा.मु. | 7671 |
| वार्षिक कर आकारणी रु. | 3759 |

ब) मोजमाप प्रमाणे क्षेत्राफळानुसार केलेली करआकारणी.

| | |
|---|---|
| कारपेट क्षेत्र | 33.67 |

| | |
|---|---|
| x दर | 15 |
| मासिक भाडे | 505.05 |
| x 12 | 12 |
| वार्षिक भांडे मुल्य | 6060 |
| ÷ 10% | 606 |
| नि.वा.भा.मु. | 5454 |
| वार्षिक कर आकारणी रु. | 2675 |
| फरक रक्कम रु. | 1084 |

वरीलप्रमाणे एकूण वार्षिक कर आकारणी रक्कम रुपये 1185/- (5453-4268) व रक्कम रुपये 1084/- (3759-1084) अशाप्रकारे सुधारित कर निर्धारण करून कमी प्रमाणात वसुल कलेली एकूण रक्कम रुपये 1185+1084 = 2269/- संबंधिताकडून वसुल करणे आवश्यक आहे.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक 39 दि.07/06/2014 चे अनुपालन दि.08/07/14 रोजी सादर केले आहे. दिलेले उत्तर संयुक्तिक नसल्याने फरकाची रक्कम वसुल करण्यात यावी.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 39 | 07/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRVVM5901 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 13 | घरपट्टी कराच्या दैनिक वसूल रकमा चालू खात्यात भरणा करुन सर्वसाधारण निधीत विलंबाने जमा केलेबाबत | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 11 | करनिर्धारण व संकलन | मनपा | 9ब | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 305870 | 0 | 0 | 0 |

घरपट्टीच्या दैनंदिन वसूल रक्कमा नियमा प्रमाणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण निधीत जमा न करता त्या सारस्वत बँकेच्या चालू खात्यामध्ये (खाते क्रमांक 1181) जमा केल्या जातात व सदर रक्कमा दिर्घकाळ नियमबाह्यरित्या बँकेच्या चालु खात्यावर ठेवून विलंबाने सर्वसाधारण निधीत जमा केलेल्या आहेत. सदरच्या रक्कमा बचत खात्यात गुंतविल्या नसल्याने 4% व्याज दराने रु.305870/- चे नुकसान झाले आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या 2012-2013 या वित्तीय वर्षाच्या घरपट्टी वसूली व भरण्याचे लेखापरीक्षण केले असता, घरपट्टी कराच्या दैनिक वसुल रकमा सारस्वत बँकेच्या चालू खात्यात (खाते क्रमांक 1180) भरणा करुन विलंबाने महापालिकेच्या एकत्रित निधीत भरणा केल्याचे दिसून आले. याबाबत पुढील प्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1)महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 नियम 32 (1) नुसार जमा झालेले अथवा संवितरीत केलेले अनुदानासहित सर्व रक्कमा हातचे काहीही राखून न ठेवता नमुना क्रमांक 11 सर्वसाधारण रोकडवहीत नोंदविले पाहिजे. तसेच नियम 32 (2) नुसार सर्व रोकड व धनादेशाद्वारे जमा व वसूल रोजच्या रोज रोकडवहीत नोंदवले पाहिजे अशी तरतुद आहे. परंतु घरपट्टीच्या दैनंदिन वसूल रक्कमा नियमाप्रमाणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण निधीत जमा न करता त्या सारस्वत बँकेच्या चालू खात्यामध्ये (खाते क्रमांक 1181) जमा केल्या असून सदर रक्कमा दिर्घकाळ नियमबाह्यारित्या बँक खात्यावर ठेवून विलंबाने सर्वसाधारण निधीत जमा केलेल्या आहेत. सदरच्या रक्कमा बचत खात्यात गुंतविल्या नसल्याने 4% व्याज दराने पुढील प्रमाणे महापालिकेस मिळणाऱ्या व्याज रक्कमेपासूनचे आर्थिक नुकसान झाले आहे.

| अ.क्र. | रक्कम | नियमबाह्य ठेवण्याचा कालावधी | दिवस | 4% प्रमाणे व्याजाचे नुकसान रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | 63,23,535 | 10.04.2012 ते 25.08.2012 | 137 | 94,939 |
| 2 | 99,57,852 | 27.08.2012 ते 30.10.2012 | 64 | 64,814 |
| 3 | 1,28,20,443 | 08.11.2012 ते 22.02.2013 | 104 | 1,64,117 |
| | | एकूण | | **3,05,870** |

रक्कम रुपये 3,05,870/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक 40 दि.07/06/2014 चे उत्तर दि.24/06/14 रोजी लेखा विभागाने दिले आहे. अनुपालनामध्ये सारस्वत बँकेचे चालु खाते दि.01/4/13 पासुन बंद करुन युनियन बँकेत सेव्हींग खाते सुरु केलेचे नमुद केले आहे. परंतु 12/13 या आर्थिक वर्षात सदर कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच

| |
|---|
| सारस्वत बँकेमध्ये शिल्लक असलेल्या रक्कमेबाबत लेखा विभागाने घरपट्टी, पाणीपुरवठा विभागास पत्र.क्र.मनपा/लेखावि/74/14-15 दि.31/5/14 आणि क्र.121/14-15 दि.23/6/14 ने रक्कम सत्वर वर्ग करण्याबाबत कळविले आहे. परंतु घरपट्टी विभागाने त्याप्रमाणे रक्कम वर्ग केलेली नाही. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 40 | 07/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRVVM5901 |
|---|---|

| 14 | घरपट्टी कर निर्धारण यादी / सुची मधील अनियमिततेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 11 | करनिर्धारण व संकलन | मनपा | 9ड | 07 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | 0 | 0 | 0 |

| |
|---|
| महापालिकेने प्रभाग निहाय कर निर्धारणाच्या सुच्या केल्या आहेत. तथापि सर्व प्रभागांच्या कर निर्धारणाचा गोषवारा त्या विभागाच्या कर निर्धारणाच्या सारांश पुस्तकात देणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेली नाही. मालमत्ताचे दर चार वर्षानी पुनर्विलोकन करुन नवीन आकारणी पुस्तक तयार करणे आवश्यक आहे. 2005-06 नंतर करनिर्धारण पुनर्विलोकन केलेले नाही. |

| |
|---|
| सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या 2012-2013 च्या लेखापरीक्षणाचे वेळी महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम क्रमांक 74 नुसार मालमत्तेवरील कराची मागणी निश्चित |

करण्यासाठी नमुना क्रमांक 43 नुसार कर निर्धारण पुस्तकाचे अवलोकन केले असता पुढील प्रमाणे अनियमितता आढळून आल्या.

1)लेखासंहिता 1971 नियम 75 (1) प्रमाणे महानगरपालिकेने प्रभाग निहाय कर निर्धारणाच्या सुची तयार केल्या आहेत. तथापि सर्व प्रभागांच्या कर निर्धारणाचा गोषवारा त्या विभागाच्या कर निर्धारणाच्या सारांश पुस्तकात देणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेली नाही. परिणामी सादर केलेल्या परिशिष्ठ क्रमांक (13) कराधनाची अचूक पडताळणी होऊ शकली नाही. अनुपालनामध्ये सदर पुस्तकामध्ये सदर पुस्तकामध्ये गोषवारा ठेवण्यात आला नसल्याचे मान्य केले आहे.

2)लेखा संहिता 1971 चे नियम 75 (5) प्रमाणे कर निर्धारण सुचीतील मालमत्तेच्या करपात्र मुल्य व करनिर्धारण या संबंधातील आक्षेप / हरकती नोंदविण्यासाठी आवश्यक असलेले पुस्तक नमुना क्रमांक 44 मध्ये विहीत केल्या प्रमाणे ठेवण्यात यावे. तपासणीचे परिणाम व आक्षेपांचे निराकरण यांची योग्य ती नोंद या पुस्तकात व आलेल्या अर्जावर प्राधिकृत मुल्य निर्धारण अधिका-याच्या आद्याक्षरीनिशी केली पाहिजे अशी तरतूद असता आकारणी करासबंधातील आक्षेपांची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे कर निर्धारणा संबंधातील आक्षेप हरकतीची पडताळणी करता आली नाही.

3)लेखा संहिता 1971 चे नियम 75 (6) प्रमाणे प्रत्येक महिन्याच्या अखेरीस त्या महिन्यांत ज्या इमारती / घरांना परिपूर्ती प्रमाणपत्र दिले असेल त्या प्रमाणपत्र देणा-या विभागाने अशा इमारत / घरांचे विवरणपत्र संकलन विभागास दिले पाहिजे यासाठी इमारत परवाने देणा-या, इमारत परवाने पुस्तक नमुना क्रमांक 45 मध्ये ठेवले पाहिजे व परवानगीसाठी येणारे अर्ज ज्या क्रमाने येतील त्या क्रमाने पुस्तकांत नोंदविले पाहिजेत. तथापि करनिर्धारण विभागाने नमुना क्रमांक 45 प्रमाणे इमारत परवाना पुस्तक ठेवले नाही. परिणामी 2012-2013 मध्ये एकूण किती इमारत परवाने दिले याची खात्री करता आली नाही.

4)लेखा संहिता 1971 चे नियम क्रमांक 75 (7) प्रमाणे कोणत्याही कारणाने कर मागणी मध्ये झालेला प्रत्येक बदल, नमुना क्रमांक 46 प्रमाणे ठेवलेल्या वाढ व घट दर्शविणा-या पुस्तकात प्रथम नोंदण्यात आला पाहिजे अशी तरतूद असता वाढ व घट पुस्तक (नमुना क्रमांक 46) ठेवण्यात आलेले नाही परिणामी 2012-2013 मध्ये कर मागणी मध्ये किती घट झाली व वाढ झाली याची खात्री होऊ शकली नाही.

5)मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 मधील प्रकरण 8 कराधान नियम 9 नुसार आयुक्तांनी स्थायी समितीच्या मान्यतेने तो ठरविल अशा नमुन्यात व रितीने आकारणी पुस्तक ठेवणे आवश्यक आहे. परंतु सध्या वापरात असलेला नमुना स्थायी समितीने मान्य केल्याबाबतचा ठराव लेखापरीक्षणास दाखविणेत आलेला नाही.

6)मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 मधील प्रकरण 8 कराधान नियम 19 नुसार प्रभाग आकारणी पुस्तक आयुक्तांनी अधिप्रमाणीत केलेले नाही.

7)मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 मधील प्रकरण 8 कराधान नियम 21(2) अन्वये मालमत्ताचे दर चार

| |
|---|
| वर्षानी पुनर्विलोकन करुन नवीन आकारणी पुस्तक तयार करणे आवश्यक आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या उत्तरामध्ये 2005-06 मध्ये करनिर्धारण करणेत येवून सुधारित आकारणी 2010 मध्ये केलेचे नमुद आहे तसेच 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये भांडवली पध्दतीने कर आकारणी महानगरपालिका करणार असल्याने पुनरसर्वेक्षण करुन करनिर्धारण केले नसल्याचे नमुद आहे. त्याप्रमाणे आर्थिक वर्ष 2013-14 पासून महासभेच्या मंजुरीने भांडवली पध्दतीने पुनरसर्वेक्षण करुन सुधारित करनिर्धारण केल्याचे दाखविण्यात आलेले नाही. अर्धसमास ज्ञापन क्रमांक 41 दि.07/06/2014 चे अनुपालन दि.8/7/2014 रोजी दिले आहे. अनुपालनामध्ये ई गव्हर्नन्स अंतर्गत संगणक प्रणाली स्विकारली असल्याने नियमाप्रमाणे नोंदवह्या ठेवण्यात आल्या नसल्याचे तसेच दि.06/12/2014 पासुन संगणक प्रणाली बंद झाल्याने 2014-15 या आर्थिक वर्षापासुन सर्व नोंदवह्या ठेवण्याची कार्यवाही चालु केली असल्याचे नमुद आहे. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 41 | 07/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRVVM5901 |

| 15 | कर मागणी नोंदवहीमधील उणिवा बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 11 | कर निर्धारण व संकलन | मनपा | 9ड | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | 0 | 0 | 0 |

| |
|---|
| महानगरपालिकेने प्रभाग निहाय ठेवण्यात आलेल्या मागणी पुस्तकात मालमत्ता धारक व करप्रकार निहाय |

| |
|---|
| मागील थकित रक्कम चालू वर्षाची मागणी व पुढील वर्षाची थकबाकी अशी नोंद केली आहे. परंतु वर्षातील मालमत्ता धारक व कर प्रकार निहाय वसुलीचा तपशील नमूद नाही. अथवा स्वतंत्र रित्या दैनिक वसूली नोंदवह्या ठेवलेल्या नाहीत. |

| |
|---|
| सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकचे 2012-2013 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणाचे वेळी घरपट्टी विभागाकडील कर मागणी नोंदवहीचे अवलोकन केले असता खालील प्रमाणे अनियमितता आढळून आल्या आहेत.<br>1) लेखा संहिता 1971 चे नियम क्रमांक 76 (1) नुसार निर्धारण पूर्व आणि अधिप्रमाणित झालेवर लगेच त्या वर्षासाठी नमुना क्रमांक 47 प्रमाणे मागणी पुस्तक उघडण्यात आले पाहिजे. जेथे प्रभाग असतील तेथे प्रत्येक प्रभागासाठी मागणी पुस्तक ठेऊन प्रत्येक प्रभागाच्या मागण्या, संकलन, थकबाकी इत्यादीचा गोषवारा शेवटच्या प्रभागाच्या मागणी पुस्तकात अथवा वेगळया पुस्तकात एकूण मागण्या, संकलन व थकबाकी निश्चित करण्यासाठी देण्यात यावा. अशी तरतूद आहे. महानगरपालिकेने प्रभाग निहाय ठेवण्यात आलेल्या मागणी पुस्तकात मालमत्ता धारक व करप्रकारात निहाय मागणी थकित रक्कम, चालू वर्षाची मागणी व पुढील वर्षाची थकबाकी अशी नोंद केली आहे. परंतु वर्षातील मालमत्ता धारक व कर प्रकार निहाय वसुलीचा तपशील नमूद नाही. अथवा स्वतंत्र रित्या दैनिक वसूली नोदवह्या उपलब्ध केल्या नाहीत त्यामुळे कोणत्या मालमत्तेचा कोणता व किती कर वसूल झाला याची पडताळणी करता आली नाही.<br>परिणामी सादर केलेल्या परिशिष्ठ क्र. (13) प्रमाणे 2012-13 मधील मागणीची अचूक पडताळणी होऊ शकली नाही.<br>उपरोक्त अनियमिततेची पुर्तता करून मालमत्ता धारक व कर प्रकार निहाय मागणी , वसुली व थकीत शिल्लक अचूक असलेची लेखपरीक्षणाची साधार खात्री पटवलेली नाही.<br>अर्धसमास ज्ञापन क्रमांक 42 दि.07-06-2014 चे अनुपालन घरपट्टी विभागाने दि.8-7-14 रोजी दिले आहे. महानगरपालिकेने ई गव्हर्नन्स अंतर्गत संगणक प्रणाली स्विकारली असून, त्यामुध्ये सर्व कर आकारणी, दरपत्रक, ॲसेसमेंट रजिस्टर व डिमांड रजिस्टर नोंद आहेत. परंतु संगणक प्रणाली बंद असल्याने सदर रजिस्टर दाखवता येत नसल्याचे व संगणक प्रणाली सुरु झाल्यानंतर सर्व दप्तर लेखापरीक्षणास दाखविण्यात येत असल्याचे नमुद आहे. संगणक प्रणालीमध्ये असणाऱ्या रजिस्टरची एक प्रिंट काढुन ती प्रमाणित करुन ठेवणे आवश्यक असता त्या प्रमाणे घरपट्टी विभागाने कार्यवाही केलेली नाही. |

| अर्ध समास ज्ञापन | दिनांक | लेप. वर्ष पासून | लेप. वर्षा पर्यंत | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|

| क्र | (dd/mm/yyyy) | (yyyy-yyyy+1) | (yyyy-yyyy+1) | |
|---|---|---|---|---|
| 42 | 07/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRVVM5901 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 16 | संगणकीय प्रणालीव्दारे जमा केलेल्या घरपट्टीच्या पावत्या लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्या बाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 11 | करनिर्धारण व संकलन | मनपा | 9ड | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 13955020 | 0 | 0 | 0 |

सांगली घरपट्टी कराच्या संगणकीय प्रणालीने मार्च 14 या निवड महिन्यात वसुली केलेल्या दैनिक रक्कमांच्या पावत्या लेखापरीक्षणास उपलब्ध झाल्या नसल्याने मार्च महिन्यातील जमा रक्कम रु. 13955020/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे 2012-2013 या वित्तीय वर्षात महानगरपालिका क्षेत्रात निरनिराळ्या सहा नागरी सेवा (CFC) केंद्रावर घरपट्टी कराच्या रक्कमांची संगणकीय प्रणाली मार्फत वसुली करण्यात आलेली आहे. तथापि सदर वसूलीच्या पावत्यांच्या स्थळ प्रती, तसेच दैनिक वसूलीच्या नोंदीची स्थळ प्रती अर्धसमास ज्ञापन क्रमांक 43 दि.07/06/2014 ने मागणी करुनही लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आलेल्या नाहीत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)सदरच्या पावत्यांच्या तसेच दैनिक वसुलीच्या नोंदीच्या स्थळ प्रती उपलब्ध झाल्या नसल्याने संगणकीय प्रणाली मार्फत मार्च या निवड महिन्याची वसुल केलेली रक्कम रुपये 13955020/- चे

| |
|---|
| लेखापरीक्षण करता आले नसल्याने सदर रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.<br><br>अर्धसमास ज्ञापन क्रमांक 43 दि.07/06/2014 चे अनुपालन घरपट्टी विभागाने दि.8/7/2014 रोजी दिले आहे. मालमत्ता कराची वसुली शहरामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी असणा-या नागरी सुविधा केंद्राकडुन केली जाते. व जमा झालेली रक्कम मालमत्ता विभागाकडील रोखपाल यांचेकडे जमा केली जाते व त्याची नोंद रोखपालाकडील रोजकिर्दीमध्ये केली जात असल्याचे अनुपालनामध्ये नमुद आहे. रोखपालाची रोजकिर्द लेखापरिक्षणामध्ये तपासणेत आली आहे. परंतु संगणकीय पावत्यांची स्थळ प्रत लेखापरिक्षणासाठी उपलब्ध झाल्या नसल्याने पावतीप्रमाणे वसुल केलेली रक्कम व जमा झालेली रक्कम यांचा मेळ घेता आलेला नाही. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 43 | 07/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRVVM5901 |
|---|---|

| 17 | वटणावळ न झालेल्या धनादेशावर बँकेने चार्जेस आकारणी केले बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 07 | लेखा | मनपा | 9ब | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | 5393.28 | 0 | 0 |

| |
|---|
| वटणावळ न झालेल्या धनादेशावर बँकेने चार्जेस आकारुन सदर रक्कम रुपये 5393.28/- महानगरपालिकेच्या बँक खात्यामधून वसूल केली आहे. सदर रक्कम संबंधित घरपट्टी धारकाकडून वसूल करून मनपा निधीमध्ये भरणा करावी. |

1)सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या 2012-2013 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणाचे वेळी घरपट्टी कराची धनादेशाद्वारे वसूल करण्यात आलेल्या रक्कमांचे धनादेश न वटल्याने (सारस्वत बँक खाते क्र.1180) बँकेने त्याबाबत सर्वसाधारण रक्कम रु.56.18 प्रति धनादेश इतके चार्जेस बँक खात्यातून परस्पर वसूल केले आहेत त्याचा तपशिल पुढील प्रमाणे.

| कालावधी | एकूण धनादेश | बँक चार्जेस रक्कम |
|---|---|---|
| 01.01.2012 ते 31.03.2012 | 96 | 5393.28 |

सांगली घरपट्टी विभागाने धनादेशाव्दारे घरपट्टी वसूल केली असून सदर धनादेशांची धनादेश नोंदवहीमध्ये नोंद घेवून बँकेकडे वटणावळीसाठी पाठविण्यात आले आहेत. सदरची नोंदवही व प्राप्त धनादेशाचे उदाहरणदाखल लेखापरीक्षण केले असता खालील धनादेश बँकेमध्ये न वटलेने बँकेने बँक चार्जेस आकारणी केली आहे. धनादेश नोंदवहीमध्ये सदरचे धनादेश कोणत्या मिळकतधारकाकडून प्राप्त झाले आहेत याची नोंद नाही. सबब सदरचे धनादेश कोणत्या मिळकतधारकाकडून प्राप्त झाले आहेत याची पडताळणी करुन घरपट्टीची वसुली बँक चार्जेससह करण्यात यावी.

| धनादेश क्रमांक | दिनांक | धनादेश रक्कम रु |
|---|---|---|
| 089891 | 07.03.2013 | 1356 |
| 340125 | 07.03.2013 | 1657 |
| 56754 | 09.03.2013 | 2020 |

उपरोक्त प्रमाणे न वटलेल्या धनादेशांच्या बँक चार्जेसची रक्कम रुपये 5393.28 वसूल करून अनुपालन दाखवावे.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक 44 दि.07/06/2014 चे उत्तर घरपट्टी विभागाने दि.8/7/2014 रोजी दिले आहे. अनुपालनामध्ये न वटलेल्या धनादेशापोटी आकारलेल्या दंडाची आकारणी घरपट्टीधारकाकडुन केली जात असल्याचे नमुद आहे.परंतु किती रक्कम 2012-13 या आर्थिक वर्षात वसुल केली याची माहिती लेखापरीक्षणास देण्यात आलेली नाही.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 44 | 07/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRVVM5901 |
|---|---|

| 18 | सारस्वत बँकेत रक्कम गुंतून पडलेने झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 07 | लेखा | मनपा | 9ब | 02 | 7274187.89 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 290967 | 0 | 0 | 0 |

सारस्वत बँकेचे चालू खातेवर मार्च 2013 अखेरची शिल्लक रक्कम रुपये 4593584/- व दिनांक 22.04.2013 ते 12.05.2014 पर्यंत जमा झालेली अशी मिळून एकूण रक्कम रुपये 72,74,187.89/- इतकी शिल्लक आहे. सदरची रक्कम जनरल फंडास वर्ग न केल्याने एक वर्षापेक्षा अधिक काळ विना व्याज गुंतून पडलेने सर्वसाधारणपणे 4% दराने रुपये 2,90,967/- महानगरपालिकेचे व्याजाचे नुकसान झाले आहे.

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील घरपट्टी कराच्या दैनिक वसूल झालेल्या रक्कमा सारस्वत बँकेत चालू खाते (Current A/c) क्रमांक 1180 वर जमा करण्यात येवून कालांतराने महापालिकेच्या सर्वसाधारण निधीत वर्ग करण्यात आलेल्या आहेत.

मुख्यलेखाधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक मनपा/लेखावि/462/12-13 दि.06.03.2013 अन्वये घरपट्टीच्या दैनिक वसूल होणा-या रोखीच्या व धनादेशाच्या रक्कमा महानगरपालिकेच्या सर्वसाधारण निधीत (जनरल फंड) खाते क्रमांक 424202010507192 (युनियन बँक) जमा करण्याचे कळविले आहे. त्या अनुषंगाने दि.26.03.2013 पासून कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे.

सारस्वत बँकेचे उपरोक्त नमुद खाते क्रमांक 1180 हे चालू खाते असून त्यावर व्याज रक्कम मिळत नाही. सदरचे बँक खाते 2013-14 वर्षामध्ये बंद करून त्यातील रक्कम महानगरपालिकेच्या सर्वसाधारण निधीत वर्ग केली नाही. सदरच्या खात्यामध्ये मार्च 2013 अखेर रक्कम रुपये 45,93,584.87/- होती व त्यानंतर दिनांक दि.31.03.2013 ते दि.20.05.2013 पर्यंत पूर्वीचे धनादेश वटल्याने व घरपट्टीधारकाने परस्पर जमा केल्याची रुपये 27,77,007/- अशी एकूण रक्कम रुपये 73,70,591.87/- होते. त्यातून न वटलेले चेक परतावा बँक चार्जेस इत्यादीची रक्कम रुपये 96,403.98/-

| |
|---|
| वजा जाता सदर खात्यात 07 जून, 2014 अखेर रक्कम रुपये 72,74,187.89/- शिल्लक आहे.<br><br>खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.<br><br>1)सारस्वत बँकेचे खाते हे चालू खाते असून त्यावर व्याज मिळत नाही. सदर खात्यामध्ये दिनांक 22.04.2013 ते 12.05.2014 पर्यंत वरील प्रमाणे एकूण रक्कम रुपये 72,74,187.89/- इतकी शिल्लक आहे. अशा प्रकारे सदरची रक्कम जनरल फंडास वर्ग न करता एक वर्षापेक्षा अधिक काळ नियमबाहयपणे बिनव्याजी गुंतून पडली आहे.<br><br>2)उपरोक्त रक्कम रुपये 72,74,187.89/- इतकी बचत खात्यात जमा केली नसल्याने सर्वसाधारणपणे 4% दराने रक्कम रुपये 2,90,967/- महापालिकेस व्याजापासून प्राप्त झालेले नाही. तशी कार्यवाही न केल्याने महानगरपालिकेचे रुपये 2,90,967/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.<br><br>अर्धसमास ज्ञापन क्रमांक 45 दि.07/06/2014 चे अनुपालन लेखा विभागाने दि.24/6/2014 रोजी दिले आहे. अनुपालनामध्ये सारस्वत बँकेत रु.7274187/- शिल्लक असुन रक्कम लेखा विभागाकडे जमा करणेबाबत घरपट्टी व पाणीपट्टी विभागास अनुक्रमे दि.31/5/14 व दि.23/6/14 रोजी कळविले असुन त्यांचेकडुन अद्याप रक्कम वर्ग करण्यात आली नसलेचे व त्यामुळे व्याजाचे नुकसान झाल्याचे मान्य करण्यात आले आहे.<br><br>**आक्षेपाधिन रक्कम रु.290967/-** |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 45 | 07/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRVVM5901 |
|---|---|

| 19 | रामचंद्र सुर्यवंशी ओव्हरसियर यांच्या चुकीच्या वेतन निश्चिती बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 02 | आस्थापना | मनपा | 9ड | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | 0 | 0 | 0 |

रामचंद्र सुर्यवंशी ओव्हरसियर यांची चुकीची वेतन निश्चिती करण्यात आलेने जादा वेतनवाढ देणेत आली आहे .

1)महाराष्ट्र शासन निर्णय क्र. संकिर्ण 1009/प्र.क्र.345 नवि-26 दि.10.08.2009 तसेच सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका महासभा ठराव क्र.76 दि.13.08.2009 व नगरविकास विभाग मंत्रालय यांचेकडील आदेश क्र.सामपा 3009/सा.प्र.1485/प्र.क्र.412/ नवि-22 दि.08.10.2009 अन्वये श्री. रामचंद्र सुर्यवंशी यांना दिनांक 01.01.2006 पासूनचे वेतन निश्चिती करताना सामपा यांचे कडील आदेश क्रमांक 3007/609/प्र.क्र.101/07 नवि-22 दि.19.10.2007 तसेच विभागिय चौकशी अहवाल दिनांक 12.05.2008 अन्वये सुर्यवंशी यांची एक वेतनवाढ दोन वर्षाकरिता रोखलेली आहे. परंतु वेतन निश्चिती करताना सदर बाब विचारात न घेतल्याने त्यांची चुकीची वेतन निश्चिती झालेली आहे. संबंधितांना देय व दिलेले वेतन पुढील तपशीला प्रमाणे आहे.

| दिनांक | निश्चित करावयाचे वेतन | दिनांक | निश्चित केलेले वेतन |
|---|---|---|---|
| 01.01.2006 | 16790 | 01.01.2006 | 16790 |
| 01.07.2006 | 17440 | 01.07.2006 | 17440 |
| 01.07.2007 | 18110 | 01.07.2007 | 18110 |
| 01.07.2008 | 18110 | 01.07.2008 | 18800 |
| 01.07.2009 | 18110 | 01.07.2009 | 19510 |
| 01.07.2010 | 20240 | 01.07.2010 | 20240 |

अशा प्रकारे श्री. सुर्यवंशी यांची चुकीची वेतन निश्चिती झालेचे निदर्शनास आले आहे. उपरोक्त वेतन

| |
|---|
| निश्चिती प्रमाणे अद्याप अदायगी झालेली नाही परंतु भविष्यात चुकीच्या निश्चिती प्रमाणे फरकाचे प्रदान झाल्यास जादा अदायगी होण्याची शक्यता आहे. तरी, वेतन निश्चिती सुधारित करून अनुपालन दाखवावे.<br>अर्धसमास ज्ञापन क्रमांक 46 दि.07/06/2014 चे उत्तर अप्राप्त आहे. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 46 | 07/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRVVM5901 |

| 20 | कर्मचा-यांच्या सेवा पुस्तकातील रजेचे लेखे अपूर्ण असलेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 02 | आस्थापना | मनपा | 9ड | 02 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | 0 | 0 | 0 |

| |
|---|
| महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अरजा 2488/395/सेवा-9 मंत्रालय मुंबई दिनांक 9 नोव्हेंबर, 1994 अन्वये कर्मचा-यांच्या अर्जित अर्धवेतनी रजा खाती प्रति कॅलेंडर वर्षाच्या जानेवारी व जुलै महिन्याच्या पहिल्या दिवशी 15 दिवस अर्जित व 10 दिवस अर्धवेतन रजा अशा दोन हप्त्यात जमा करावयाची आहे. परंतु महानगरपालिकेने पुढील प्रमाणे कर्मचा-यांच्या रजेच्या हिशेबाच्या नोंदी फारच विलंबाने एकत्रीत नोंदविल्या आहेत. |

| |
|---|
| सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या 2012-13 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणाचे वेळी निवडक सेवा पुस्तकांची पडताळणी केली असता पुढील प्रमाणे त्रुटी आढळून आल्या. |

1)महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अरजा 2488/395/सेवा-9 मंत्रालय मुंबई दिनांक 9 नोव्हेंबर, 1994 अन्वये कर्मचा-यांच्या अर्जित अर्धवेतनी रजा खाती प्रति कॅलेंडर वर्षाच्या जानेवारी व जुलै महिन्याच्या पहिल्या दिवशी 15 दिवस अर्जित व 10 दिवस अर्धवेतनी रजा अशा दोन हप्त्यात जमा करावयाची आहे. परंतु महानगरपालिकेने खालील कर्मचा-यांच्या रजेच्या हिशेबाच्या नोंदी फारच विलंबाने एकत्रीत नोंदविल्या आहेत.

| अ.क्र. | कर्मचा-यांचे नांव | हुद्दा | रजा कालावधी | नोंदीस विलंब झालेले वर्ष | रजेचा प्रकार अर्जित / अर्धवेतनी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | आण्णापा अप्पया शिष्टे | ऑपरेटर | 01.01.2002 ते 31.12.2012 | 10 | अर्जित |
| 2. | युनुस सिकंदर बारगिर | स्व.नि. | 01.01.2010 ते 31.12.2013 | 4 | अर्धवेतनी |
| 3. | कोळी व्ही.आर | जलयंत्र वाचक | 01.01.2011 ते 31.12.2013 | 3 | अर्जित |
| 4. | सदाशिव चव्हाण | फायरमन | 03.01.2009 ते 30.06.2012 | 3.5 | अर्जित |
| 5. | नंदा शिवाजी गावडे | लिपिक | 01.01.2011 ते 11.12.2013 | 3 | अर्जित |

2)खालील प्रमाणे कर्मचा-यांच्या रजा लेख्यात वर्षानुवर्षे नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

| अ.क्र. | कर्मचा-यांचे नाव | रजा नोंदविणेत न आलेला कालावधी | एकूण वर्ष |
|---|---|---|---|
| 1 | शशिकांत ठोमके | 01.01.2005 ते आद्याप पर्यंत | 8 वर्षे |
| 2 | चंद्रकांत नारगुडे | 01.04.2006 ते आद्याप पर्यंत | 7 वर्षे |
| 3 | अनिल चव्हाण | 01.07.2007 ते अद्याप पर्यंत | 6 वर्षे |

अर्धसमास ज्ञापन क्रमांक 32 दि.07/06/2014 चे उत्तर दि.17/06/2014 रोजी दिले असुन रजेचा लेखा अपुर्ण असल्याचे मान्य केले आहे. परंतु रजा लेखे पुर्ण करुन लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेले नाहीत.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 32 | 07/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRVVM5901 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 21 | वेतनामधुन वसुल केलेला व्यवसायकर शासनखाती विलंबाने भरणा केले बाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 07 | लेखा | मनपा | 9ड | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 394354 | 0 | 0 | 0 |

शासन अधिसूचना पीएफटी-2011/एडीएम-29/एनटीएफ दिनांक 13.07.2011 नुसार महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या मासिक वेतनातून वसुल केलेला व्यवसायकर महिन्याच्या 10 तारखेच्या आत शासन तिजोरीत भरणे आवश्यक असता, खालील प्रमाणे व्यवसायकर रुपये 394354/- विलंबाने भरणा केला आहे.

1)सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेचे 2012-2013 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणाचे वेळी कर्मचा-यांच्या वेतनातून वसुल करण्यात आलेल्या खालीलप्रमाणे व्यवसायकर रु.394354/-चे धानादेश शासन खाती विलंबाने भरणा केल्याचे निदर्शनास आले आहेत.

शासन अधिसूचना पीएफटी-2011/एडीएम-29/एनटीएफ दिनांक 13.07.2011 नुसार सदरचा व्यवसायकर महिन्याच्या 10 तारखेच्या आत शासन तिजोरीत भरणे आवश्यक असता, खालील प्रमाणे व्यवसायकर सर्वसाधारणपणे दोन महिने विलंबाने भरणा केला आहे.

| अ.क्र. | धानादेश क्रमांक | दिनांक | रक्कम रुपय | प्रत्यक्ष भरणा दिनांक |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 11. | 03366012 | 22.01.2013 | 1200 | 08.03.2013 |
| 12. | 036994 | 11.02.2013 | 8509 | 08.03.2013 |
| 13. | 036489 | 11.01.2013 | 1750 | 08.03.2013 |
| 14. | 036801 | 05.02.2013 | 355600 | 08.03.2013 |
| 15. | 036448 | 09.01.2013 | 2025 | 08.03.2013 |
| 16. | 036513 | 14.01.2013 | 875 | 08.03.2013 |
| 17. | 04448 | 03.09.2012 | 3175 | 09.11.2012 |
| 18. | 034537 | 13.09.2012 | 2675 | 09.11.2012 |
| 19. | 035745 | 22.11.2012 | 600 | 10.01.2013 |
| 20. | 035433 | 05.11.2012 | 5945 | 10.01.2013 |
| 21. | 0354744 | 12.04.2012 | 11200 | 08.06.2012 |
| 22. | 354762 | 21.04.2012 | 200 | 08.06.2012 |
| 23. | 482649 | 06.04.2012 | 600 | 08.06.2012 |
| एकूण | | | 394354 | |

अर्धसमास ज्ञापन क्रमांक 33 दि.07/06/2014 चे अनुपालन लेखा विभागाने दि.26/6/2014 रोजी दिले आहे. अनुपालनामध्ये वेळेत रक्कम भरणा करण्यात आली नसल्याचे मान्य करण्यात आले आहे.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 33 | 07/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRVVM5901 |

| 22 | महासभेची मान्यता न घेता अंदाजपत्रकीय तरतुदीमध्ये बदल केले बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | नागरी दलित वस्ती सुधार योजना | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 07 | लेखा | मनपा | 9अ | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 101 नुसार अर्थसंकल्पीय अनुदानात वाढ करणेचे अधिकार महानगरपालिकेस असताना व अर्थसंकल्पामध्ये एक कोटीची तरतुद दाखविली असताना बांधकाम खात्याने देयकामधील अंदाजपत्रकीय तरतूद या स्तंभामध्ये नियमबाह्यपणे अंदाजपत्रकीय तरतुदीमध्ये रु.80 लाख वाढ करुन तरतुद रु.1 कोटी 80 लाख दर्शविली आहे.

नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेच्या रोकडवहीची तपासणी केली असता एप्रिल 11 मध्ये अनुदान रु.13807309/- प्राप्त झालेची नोंद आहे. आर्थिक वर्ष 2010-11 व 2011-12 मधील एकुण शिल्लक अनुदान रु.14426625/- पैकी 2011-12 या र्थिक वर्षात रु.5615247/-खर्च पडले आहेत. अनुदान वर्षाचे सुरवातीस प्राप्त असुन कामाची अंदाजपत्रके मंजुर असताना तसेच टेंडर व वर्कऑर्डर दिलेनंतरही रक्कम खर्च केलेली नाही.

याबाबत नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेची रोकडवही व या योजनेमधुन खर्ची टाकणेत आलेल्या देयकांची तपासणी करुन खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)2011-12 या आर्थिक वर्षात दि.28/01/12 पासुन दलित वस्तीचे शासनाकडुन प्राप्त झालेल्या शिल्लक अनुदानापैकी रु.1 कोटी युनियन बँकेमध्ये सहा महीने मुदतीने लेखा विभागाने गुंतविलेची नोंद रोकडवहीवर पान नं.50 वर आहे. 2012-13 या आर्थिक वर्षात दि.28/04/12 राजी शासनाकडुन रु.85 लाख अनुदान प्राप्त झालेची नोंद रोकडवही पान नं. 52 वर आहे. दि.28/04/12 ला रोकडवहीमध्ये शिल्लक रक्कम रु.22498066/- दाखविली आहे. परंतु 2012-13 चे अंदाजपत्रकामध्ये पान नं 83 द्विनोंद कोड 41216 वर रु.1 कोटीची तरतुद केली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971चे

| |
|---|
| नियम क्रमांक 26 (1) नुसार अर्थसंकल्पीय अंदाज केवळ त्या वर्षात अपेक्षित असलेल्या जमा व खर्चाची असणे आवश्यक असता अंदाजपत्रकीय रक्कम लेखाशाखेने कमी दर्शविली आहे. बांधकाम खात्याने लेखापरीक्षणास सादर केलेल्या प्रमाणक क्र.312 दि.21/3/12 देयकामध्ये अर्थसंकल्पीय तरतुद रु.18000000/- दर्शविली आहे. अंदाजपत्रकीय तरतुद रु.1 कोटी असताना व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 101 नुसार अर्थसंकल्पीय अनुदानात वाढ करणेचे अधिकार महानगर पालिकेस असताना बांधकाम खात्याने नियमबाह्यपणे अंदाजपत्रकीय तरतुदीमध्ये वाढ दर्शविली आहे. तसेच सदर देयक लेखा शाखा व लेखापरीक्षा विभागाने तपासले असुन मुख्यलेखा अधिकारी व उपायुक्त यांनी देयकास मंजुरी देवुन धनादेश काढला आहे. परंतु सदर वित्तीय अनियमिततेकडे कोणीही लक्ष दिले नसलेचे स्पष्ट होते.<br><br>अर्धसमास ज्ञापन क्रमांक 21 दि.15/03/2014 चे उत्तर लेखा विभागाने दि.03/06/2014 रोजी अडीच महिने विलंबाने दिले आहे. 2011-12 या आर्थिक वर्षाच्या सुधारित अंदाजपत्रकामध्ये रु.1 काटी 50 लाखाची तरतुद केली असल्याचे उत्तरामध्ये नमुद आहे. परंतु सुधारित अंदाजपत्रकाची प्रत लेखापरीक्षणास दाखविलेली नाही. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 21 | 15/03/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |
|---|---|

| 23 | नागरी दलित वस्ती सुधार योजनेच्या कामातील अनियमिततेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | नागरी दलित वस्ती सुधार योजना | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | राज्य | 9अ | 02 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|

| |
|---|
| स्थायी समितीने नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत करावयाची आठ कामे जिल्हा निबंधक सहकारी संस्था यांचे कडून यादी मागवुन मजूर सोसायटीकडून करुन घेणेस मान्यता दिली असताना प्रशासनाने सोसायटींना कामे दिल्यानंतर तोच विषय स्थायी समितीकडे अनावश्यक पाठविला आहे व  त्यास स्थायी समिती सभा क्र.12, ठराव क्र.247 दि.16/08/2011 मंजुरी दिली आहे. स्थायी समिती ठराव क्र.175 दि.12/07/2011 रोजी मंजुर झालेला विषय प्रशासनाने स्थायी समितीकडे पुन्हा मंजुरीस अनावश्यक पाठविल्याने काम सुरु होण्यास एक महिन्याचा विलंब लागला आहे. |

| |
|---|
| महानगरपालिकेने नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत 2010-11 मध्ये एकुण 21 कामांचा व रु.133328571/-चा प्रस्ताव पत्र क्र.मनपा/माव/112 दि.08/12/2010 अन्वये जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांना पाठविला असुन त्यास जिल्हाधिकारी यांचे कडील आदेश क्र नपा/आर.आर./195/ 2011 दि.31/03/2011 ने मान्यता मिळाली आहे. जिल्हाधिकारी यांचे कडील आदेश क्र नपा/ आर.आर. /251/ 2011 दि.18/04/2011 ने रु.12500000/-अनुदान मंजुर झाले आहे. बांधकाम विभागाने दि.19/04/2011 ने रु.12499764/-ची कामे प्रस्तावित केली असुन त्यास आयुक्तांची दि.30/06/2011 रोजी मान्यता झाली आहे. स्थायी समितीकडे उपायुक्त यांचे स्वाक्षरीने दि.05/07/2011 रोजी  प्रस्तावित कामाचे विषयपत्र पाठविले असुन त्यास स्थायी समिती सभा क्र.07 ठराव क्र.175 दि.12/07/2011 ने 11 कामे रितसर जाहिर निविदा मागवुन व आठ कामे जिल्हा निबंधक सहकार यांचे कडून यादी मागवुन मजूर सोसायटीकडून करुन घेणेस मान्यता दिली आहे. त्यानुसार शहर अभियंता यांनी क्रं.मनपा/मागास समिती /216/11-12 रोजी काम वाटपासाठी जिल्हा निबंधक सहकारी यांचेकडे पत्र पाठविले असुन दि.12/08/2011 रोजीच्या जा.क्र.फेड/ काम/ 2011/330 ने मजुर सोसायट्यांना काम वाटप केले आहे. याबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.<br><br>1) स्थायी समिती सभा क्र.07 ठराव क्र.175 दि.12/07/2011 ने 11 कामे रितसर जाहिर निविदा मागवुन व आठ कामे जिल्हा निबंधक सहकार यांचे कडून यादी मागवुन मजूर सोसायटीकडून करुन घेणेस मान्यता दिली आहे. फेडरेशनने दि.12/08/2011 चे मजुर सोसायट्यांना काम वाटप केल्यानंतर बांधकाम विभागाने एकदा मंजुर झालेला विषय मजुर सोसायटींची नावे घालुन पुन्हा स्थायी समितीकडे पाठविला आहे व स्थायी समिती सभा क्र.12,ठराव क्र.247 दि.16/08/2011 संबंधीत प्रस्ताव मंजुर केला आहे. यापुर्वी स्थायी समिती ठराव क्र.175 दि.12/07/2011 रोजी मंजुर झालेला विषय प्रशासनाने स्थायी समितीकडे पुन्हा मंजुरीस अनावश्यक पाठविल्याने काम सुरु होण्यास एक महिन्याचा विलंब लागला आहे. |

| |
|---|
| अर्धसमास ज्ञापन क्रमांक 26 दि.27/05/2014 चे उत्तर नगरसचिव विभागाने दि.31/06/2014 रोजी एक महिना विलंबाने दिले आहे. उत्तरामध्ये सदर विषय बांधकाम विभागाशी संबंधित असल्याचे नमुद केले आहे. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 26 | 27/05/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |
|---|---|

| 24 | उपर्जित द्विनोंद पध्द्तीने लेखे व ताळेबंद ठेवला नसले बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 07 | लेखा | मनपा | 9अ | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

| |
|---|
| शासन निर्णय क्र. लेखास-102004/71/प्र.क्र.5/04/नवि-31 दि.6/7/2005 अन्वये 2005-06 या आर्थिक वर्षापासुन महानगरपालिकांनी उपर्जित पध्दतीवर आधारीत द्विनोंद पध्दतीने लेखे व ताळेबंद ठेवणे आवश्यक असता लेखा विभागाने त्याप्रमाणे लेखे ठेवलेले नाहीत. |

| |
|---|
| शासन निर्णय क्र. लेखास-102004/71/प्र.क्र.5/04/नवि-31 दि. 6/7/2005 अन्वये व भारताचे नियंत्रक व लेखापरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र शासनाच्या नगर विकास विभागाने तयार केलेल्या राष्ट्रीय महानगरपालिका लेखा संहितेमधील (National Municipal Accounts Manual) प्रकरण क्र.2 ते 5 मधील तरतुदीनुसार 2005-06 या आर्थिक वर्षापासुन महानगरपालिकांनी उपर्जित पध्दतीवर आधारीत |

| |
|---|
| द्विनोंद पध्दतीने लेखे व ताळेबंद ठेवणे क्रमप्राप्त आहे. त्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या 2012-13 या आर्थिक वर्षात ठेवलेल्या लेख्यांची तपासणी केली असता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.<br><br>1)आर्थिक वर्ष 2005-06 पासुन या पध्दतीने लेखे ठेवणे अपेक्षित होते तथापि महानगरपालिकेने तसे लेखे ठेवलेले नाहीत.<br><br>अर्धसमास ज्ञापन क्रमांक 27 ,दि.27/05/2014रोजी निर्गमित केला असून लेखा विभागाने त्याचे अनुपालन दि.3/06/2014 रोजी दिले आहे. उत्तरामध्ये उपर्जित पध्दतीवर आधारीत द्विनोंद पध्दतीने लेखे व ताळेबंद ठेवण्यात आले नसल्याचे मान्य केले आहे. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 27 | 27/05/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |
|---|---|

| 25 | डिपॉझीट (अनामत) नोंदवहीमधील अनियमितते बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 07 | लेखा | मनपा | 9ड | 06 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

| |
|---|
| महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 51 मधील (3) नुसार प्रत्येक महिना अखेर रोकडवहीतील नोंदलेल्या जमा व खर्चाच्या नोंदीची बँक पासबुक मधील नोंदीबरोबर बाबवार तुलना करून जर काही फरक असेल तर तो विहित नमुन्यात जुळवून दाखविणे आवश्यक आहे. परंतु शेतकरी सहकारी बँकखाते व रोकडवहीमध्ये मार्च 13 अखेर रु.2911618/- ची तफावत आहे. तसेच सिंडिकेट बँकेमधील |

गुंतवणूकवही व रोकडवही यामध्ये रु.533201/-ची तफावत आहे. सदर तफावतीचा ताळमेळ घेण्यात आलेला नाही. तसेच अनामत नोंदवही मध्ये ठेवींचा वर्गीकृत गोषवारा काढलेला नाही.

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेकडील अनामत (डिपॉझीट) नोंदवहीची वित्तीय वर्ष 2012-2013 करिता तपासणी केली असता खालील प्रमाणे उणिवा आढळुन आल्या.

1)अनामत नोंदवही महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971चे नियम 190 नुसार नमुना क्र.147 प्रमाणे ठेवण्यात आली आहे परंतु या नोंदवहीतील आवश्यक त्या सर्व रकान्यांमध्ये नोंदी घेणे आवश्यक असताना रकाना क्र. 11 ते 15 या रकान्यामध्ये अनामत परतावा रक्कम, प्रमाणक क्रमांक व दिनांक तसेच वित्तिय वर्षामध्ये एकूण परतावा केलेली रक्कम इत्यादी महत्वाच्या नोंदी घेण्यात आलेल्या नसल्याने परताव्याच्या रक्कमाची खात्री करता आली नाही.

2)2012-13 या आर्थिक वर्षात ठेकेदारांना खालील दिनांकास अनामत रक्कमेचा परतावा केल्याचे रोकड नोंदवहीमध्ये नमूद आहे. परंतु अनामत नोंदवहीमध्ये सदर अनामत रक्कम परताव्याबाबतचे प्रमाणक क्रमांक, दिनांक नमुद नाहीत. त्यामुळे रक्कम परत केली कि शिल्लक आहे याची खात्री करता येत नाही. याबाबत खालील उदाहरणे दिली आहेत.

| अ.क्र. | दिनांक | रक्कम | ठेकेदाराचे नाव |
|---|---|---|---|
| 1 | 25/3/13 | 24068 | सज्जन पाटील |
| 2 | 21/01/13 | 4585 | बी.बी.गुंजाटे |
| 3 | 15/3/13 | 4900 | प्रविण कुंडले. |
| 4 | 04/3/13 | 6115 | वरद मजुर सह.संस्था |
| 5 | 28/01/13 | 4450 | साजिद आली कुरेशी |
| 7 | 04/3/13 | 4665 | आंबेडकर मजुर सह.संस्था |

3)नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम क्र.190(1) नुसार निरनिराळया प्रकारच्या ठेवीसाठी उदा.कंत्राटदाराच्या ठेवी,खाजगी व्यक्तिसाठी केलेल्या बांधकामासाठीच्या ठेवी, व इतर संकीर्ण ठेवीसाठी वेगळी पुस्तके अथवा त्याच पुस्तकामध्ये पृष्ठांचे वेगळे गट राखुन ठेवणे आवश्यक असता सर्व प्रकारच्या ठेवी एकत्रित लिहिल्या असल्याने ठेवींचे वर्गीकरण करता येत नाही.

4)प्रमाणक क्रं. 576 दिनांक 05.03.2013 तुळजाई कन्स्ट्रक्शन यांचेकडून वार्ड क्रं.21 मिरा हौसी.सोसा. पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाची अनामत रक्कम रुपये 12,115/- देयकामधुन कपात केली आहे परंतु

त्याची नोंद अनामत नोंदवहीत घेण्यात आलेली नाही.

5)नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम क्र.190 (2) अन्वये वर्षअखेर प्रत्येक ठेवीची अदत्त शिल्लक, पुढील वर्षाच्या पुस्तकात अग्रेनीत करणे आवश्यक असता ती केली नसल्याने मागील वर्षामध्ये एकुण ठेवीची किती रक्कम शिल्लक आहे ते समजुन येत नाही. वर्षभरात मिळालेल्या व परत केलेल्या ठेवींच्या एकुण रक्कमांचा वर्गीकृत गोषवारा काढणे आवश्यक असता तो काढण्यात आलेला नसल्याने वर्षभरामध्ये एकुण किती रक्कम प्राप्त झाली व एकूण किती रक्कम आदा केलेली व शिल्लक रक्कम किती आहे याची एकत्रित माहिती समजून येत नाही.

6)अनामत रक्कमेचे बँक पासबुक व लेखा शाखेने दिलेल्या दि.31/03/13 अखेर अनामत खात्यामध्ये शिल्लक रक्कमेच्या विवरणपत्राची तपासणी केली असता दि.01/4/12 ची सुरूवातीची शिल्लक रु.61461971 + आर्थिक वर्ष 2012-13 ची जमा रु.57375675/- अशी एकुण जमा रु.118837647/- असुन 2012-13 चा खर्च रु.21961716/- वजा जाता रु.96875931/- शिल्लक राहिले आहेत. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 51 मधील (3) नुसार प्रत्येक महिना अखेर रोकडवहीतील नोंदलेल्या जमा व खर्चाच्या नोंदीची बँक पासबुक मधील नोंदीबरोबर बाबवार तुलना करून जर काही फरक असेल तर तो विहित नमुन्यात जुळवून दाखविणे आवश्यक आहे. परंतु शेतकरी सहकारी बँकखाते व रोकडवहीमध्ये मार्च 13 अखेर रु.2911618/- ची तफावत आहे. तसेच सिंडिकेट बँकेमधील गुंतवणूकवही व रोकडवही यामध्ये रु.533201/-ची तफावत आहे. सदर तफावतीचा ताळमेळ घेण्यात आलेला नाही. तसेच अनामत नोंदवही मध्ये ठेवींचा वर्गीकृत गोषवारा काढलेला नाही.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक 48 दि.10/06/2014 चे उत्तर दि. 26/06/2014 रोजी दिले आहे. अनामत नोंदवहीमधील त्रुटींची पुर्तता करुन नोंदवही अद्यावत करुन दाखविण्यात येत असलेचे नमुद आहे. परंतु त्रुटींची पुर्तता केलेली नोंदवही लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नाही.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 48 | 10/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |

| 26 | गुंतवणुक नोंदवहीमध्ये असलेल्या अनियमितता बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 07 | लेखा | मनपा | 9ड | 03 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

गुंतवणुक नोंदवहीत पान क्र.130 वर सिंकीग फंड रु. 1 कोटी युनियन बँकेमध्ये गुंतवणुक केलेची नोंद घेतली आहे. ठेवीची मुदत 13.12.2013 पर्यंत होती. मुदत संपल्यानंतर युनियन बँकेमध्ये सदर गुंतवणुक व्याजासह पुनर्रगुंतवणुक केल्याची पावती लेखापरीक्षणाच्या वेळी दाखविण्यात आली आहे.परंतु सदरची नोंद गुंतवणुक नोंदवहीत व रोकडवहीत घेण्यात आलेली नाही.

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेकडील विविध खात्यांतील रक्कम बँकामध्ये कायम ठेव स्वरुपात (Fix Deposite) गुंतवणुक केल्याचे आढळुन आले आहे. गुंतवणुक नोंदवही महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 187, नमुना क्र.142 मध्ये ठेवण्यात आली असून नोंदवहयांची तपासणी केली असता खालील अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

1)गुंतवणुक नोंदवहीमध्ये महानगरपालिकेच्या शिल्लक रक्कमा मुदतबंद ठेवीमध्ये गुंतविल्याच्या नोंदी आहेत. परंतु वसुलीचा दिनांक व लेख्यातील समायोजन, रोजकिर्दीतील जमा रक्कम या रकान्यांमध्ये आवश्यक त्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. गुंतवणुका व्याजासह पुनर्गुंतवणुक केल्यास त्याची नोंद वेळीच घेवुन रोकडवहीस गुंतवणुक रक्कम वाढ करणे आवश्यक आहे. तसेच गुंतवणुका मुदतपुर्व किंवा मुदतीनंतर रोखीकरण केल्यास त्याच्या नोंदी गुंतवणुक नोंदवहीत योग्य त्या रकान्यामध्ये घेणे आवश्यक असताना सिंकींग फंडाच्या रु.1 कोटी युनियन बँकेमध्ये व विशेष निधीच्या रु.5139130/- पुनर्गुंतवणुक युको बँकेमध्ये केल्याची नोंद गुंतवणुक नोंदवहीमध्ये घेतली नसल्याचे आढळुन आले आहे. गुंतवणुक नोंदवहयामध्ये गोषवारे काढण्यात आले नसुन सक्षम अधिकाऱ्याने स्वाक्षऱ्या केलेल्या नाहीत.

2)जनरल फंडातुन सिंकीग फंडाची रक्कम रुपये 1,00,00,000/- युनियन बँक,शाखा मिरज मध्ये दि.06/01/2013 रोजी गुंतवणुक केलेची नोंद गुंतवणुक नोंदवहीत पान क्र.130 वर घेतली आहे. ठेवीची मुदत 13.12.2013 पर्यंत होती. मुदत संपल्यानंतर युनियन बँकेमध्ये सदर गुंतवणुक व्याजासह पुनर्गुंतवणुक केल्याची पावती लेखापरीक्षणाच्या वेळी दाखविण्यात आली आहे. परंतु सदरची नोंद गुंतवणुक नोंदवहीत व रोकडवहीत घेण्यात आलेली नाही. तसेच दलित वस्ती सुधार योजनेची रक्कम रु.12,50,08/-

| |
|---|
| युनियन बँकेमध्ये दि.28/01/12रोजी पावती क्र.547676 ने 6 महिन्याच्या मुदतबंद ठेवीमध्ये गुंतविली आहे.व दि.28/07/13 अखेर रक्कम पुनर्गुंतवणुक केल्याची नोंद नोंदवहीतील पान क्र.11 वर घेतली आहे. परंतु नोंदवहीतील मुद्दलाची रक्कम, उपार्जित व्याजाची नियत तारीख देय व्याजाची रक्कम, मुख्य अधिका-याची अद्याक्षरी, वसुलीचा दिनांक व लेख्यातील समायोजन, रोजकिर्दीतील जमा रक्कम हे सर्व रकाने भरलेले नाहीत. तसेच रक्कम किती टक्के व्याजाने गुंतविली आहे. याची नोंद घेण्यात आलेली नाही.<br>3)विशेष निधीमधील गुंतवणुका युको बँकेमध्ये केल्या असुन पावती क्रमांक 320436 दिनांक 08.11.2012 ने रु.5139130/- व पावती क्रमांक 320437, दिनांक 08.11.2012 ने रु. 5139130/- ने केलेल्या गुंतवणुकांची मुदत दिनांक 07.02.2013 रोजी संपलेली आहे. परंतु रोकडवहीस सदरची गुंतवणुक पुनर्गुंतवणुक केल्याची नोंद नाही. तसेच गुंतवणुक नोंद वहीतील सर्व रकाने पुर्ण भरलेले नाहीत. गुंतवणुक पावती क्रमांक 320436, रु.5139130/- दि. 2013-2014 मध्ये रोखीकरण केली आहे परंतु त्याची नोंद गुंतवणुक नोंदवहीस घेण्यात आलेली नाही.यावरुन गुंतवणुक नोंदवह्या अपुर्ण असल्याचे दिसुन येते<br>अर्धसमास ज्ञापन क्रमांक 49 दि.10/06/2014 चे उत्तर दि.24/06/2014 रोजी दिले आहे. गुंतवणुक नोंदवहीमधील मुद्दा क्र.1 व 3 मधील आक्षेपांची पुर्तता लेखा विभागाने केली आहे. मुद्दा क्र.2 नुसार सिंकीग फंडाची रुपये 1 कोटीची मॅच्युरीटी व्हॅल्यु बँकेने TDS कपात करुन नोंद केली आहे. सदर TDS कपात न करता मॅच्युरीटी व्हॅल्यु नोंद करणेबाबत लेखा शाखेने बँकेस कळविले आहे. त्यानुसार नोंद घेवुन लेखापरीक्षणास दाखविण्यात येत असलेचे दिलेल्या उत्तरामध्ये नमुद आहे. परंतु सुधारीत नोंद लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नाही. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 49 | 10/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 27 | कर्मचा-यांना नियमबाह्यपणे दिलेल्या तसलमात रक्कमांचे समायोजन केले नसलेबाबत | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 07 | लेखा | मनपा | 9अ | 04 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | 17829782 | | |

महानगरपालिका कर्मचाऱ्यांना वेगवेगळया कामासाठी तसलमात रक्कम देण्यात आली आहे. दिनांक 31.03.2013 अखेर थकीत असमायोजीत तसलमात रक्कम रु.17829782/- इतकी आहे. सदर रक्कमेचे समायोजन झाले नसल्याने रक्कम दंड व्याजासह संबंधित अथवा जबाबदार व्यक्तीकडून वसुल करावी.

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेकडील तसलमात नोंदवहीची वित्तीय वर्ष 2012-2013 च्या लेखा परीक्षणामध्ये तपासणी केली असता खालील प्रमाणे अनियमितता आढळुन आल्या.

1)दिनांक 31.03.2013 अखेर रक्कम रुपये 1,78,29,782/- तसलमात असमायोजीत असल्याचे आढळुन आले. सदरची रक्कम 2003-2004 ते 2012-2013 या कालावधीची आहे.

2)ज्या कारणासाठी तसलमात रक्कम दिली त्याचा उद्देश सफल झाल्याबरोबर त्याचे त्वरीत समायोजन होणे आवश्यक आहे. मुंबई वित्तीय नियम 1959 चे नियम क्रमांक 142 नुसार प्रथम घेतलेल्या अग्रीमाचे समायोजन झाल्या शिवाय दुसरे अग्रीम मंजूर करून नये अशी तरतुद असताना महानगरपालिकेने खालील कर्मचाऱ्यांपैकी श्री.रमेश वाघमारे, श्री. आर.पी.जाधव, श्री.एस.ए.कोरे यांना पूर्वी दिलेली तसलमात समायोजित नसताना पून्हा तसलमात दिलेली आहे. 2003-2004 पासुनच्या मोठ्या रक्कमा अद्याप असमायोजीत आहेत.

3)अग्रीम रक्कमेचे समायोजन उद्देश सफल झाल्याबरोबर त्वरीत करणे आवश्यक असताना आर्थिक वर्ष 2003-2004 पासुनच्या काही मोठ्या रक्कमा खालील प्रमाणे असमायोजीत आहेत.

| **अ.क्र.** | **वर्ष** | **नाव** | **तपशिल** | **तसलमात रक्कम** |
|---|---|---|---|---|
| 24. | 2003-04 | रमेश वाघमारे | इंडियन ऑईल मापे कोर्ट खर्च | 40000/- |
| 25. | 2005-06 | कार्यकारी अभियंता | शासनाने पाणी उपसा रक्कम अनुदानातुन कपात केली | 4541305/- |
| 26. | 2006-07 | रमेश वाघमारे | मसुरी येथे प्रशिक्षणासाठी प्रवास खर्च | 300000/- |
| 27. | 2007-08 | ए.डी.पाटणकर | महापौर चषक फुटबॉल स्पर्धा | 600000/- |
| 28. | 2009-10 | के.सी.हळींगळे | महापौर चषक खोखो स्पर्धा | 300000/- |
| 29. | 2010-11 | यशया जॉन तालुरी | स्वच्छता अभियान पहाणी दौऱ्यासाठी | 200000/- |
| 30. | 2011-12 | आर.पी.जाधव | ए.गृह निर्माण झोपडपट्टी विकास | 200000/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | कार्यक्रम | |
| 31. | 2011-12 | प्रशासन अधिकारी प्राथ.शिक्षण मंडळ | प्रा.शि.मंडळाकडील शिक्षकांची फंडाची रक्कम आदा करणेसाठी | 5000000/- |
| 32. | 2011-12 | आर.पी.जाधव | ए.गृह निर्माण झोपडपट्टी विकास कार्यक्रम | 310600/- |
| 33. | 2012-13 | आरोग्य अधिकारी मिरज | ---- | 300000/- |
| 34. | 2012-13 | एम.बी.पाटील | रोपे खरेदी करणेसाठी | 1081400/- |
| 35. | 2012-13 | आरोग्य अधिकारी मिरज | मिरज ओढा पावसाळ्या पूर्वी स्वच्छ करणे | 420000/- |
| 36. | 2012-13 | एस.ए.कोरे | आमराई उद्यान नर्सरी करण्यासाठी | 200000/- |
| 37. | 2012-13 | एस.ए.कोरे | वृक्ष लागवडीसाठी रोपे लावणे | 953200/- |
| 38. | 2012-13 | आर.पी.जाधव | पोलीस चहापान खर्चासाठी | 150000/- |
| 39. | 2012-13 | चंद्रकांत आडके | महापौर परिषद | 150000/- |

4)2011-2012 चे लेखापरीक्षण अहवालामध्ये तसलमात असमायोजित असलेबाबतचा परिच्छेद क्रमांक 5 घेण्यात आलेला आहे. पुर्वीची तसलमात रक्कम असमायोजीत असताना त्याच व्यक्तींना दुबार तसलमात दिल्याचे दिसुन येते. तरी, आता तसलमात नोंदवही नुसार थकीत असमायोजीत तसलमात रक्कम रु.17829782/- चे समायोजन त्वरीत करून घ्यावे.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक 50 दि.10/06/2014 चे उत्तर दि. 19/06/2014 रोजी दिले आहे. त्यामध्ये तसलमात रक्कमांचे वसुलीसाठी संबंधितांना नोटीसा देण्यात आल्या आहेत व वसुलीची कार्यवाही चालु असल्याचे नमुद आहे. परंतु वसुली करणेत आली नसल्याने रु. 17829782/ वसुलपात्र ठेवण्यात येत आहेत.

वसुलपात्र रक्कम रु.17829782/

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 50 | 10/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |

| 28 | जनरल फंडाचा बँक ताळमेळ जुळत नसल्याबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 07 | लेखा | मनपा | 9अ | 05 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 23303507 | | | |

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 51 मधील (3) नुसार प्रत्येक महिना अखेर रोकडवहीतील नोंदलेल्या जमा व खर्चाच्या नोंदीची बँक पासबुक मधील नोंदीबरोबर बाबवार तुलना करून जर काही फरक असेल तर तो रोकड वहीतील तळटीपेमध्ये दाखविणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नसल्यामुळे 2012-13 या वर्षात रोकडवही व बँक खात्याच्या रक्कमेमध्ये रु.23303507/- इतकी तफावत दिसून येते.

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेचे वित्तीय वर्ष 2012-2013 चे लेखापरीक्षणामध्ये दिनांक 31.03.2013 रोजी जनरल फंड रोकडवही (नमुना नं.11) मध्ये दर्शविलेल्या बँक ताळमेळाची तपासणी केली असता खालील प्रमाणे अनियमितता आढळुन आल्या आहेत.

1)रोकडवही खर्च बाजुस दिनांक 31.03.2013 अखेर ची शिल्लक रक्कम 31,42,87,392.88/- नमुद आहे परंतु सदर रक्कम खाडाखोड करून लिहीली आहे. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 10 नुसार लेखा लेखनातील प्रत्येक दुरूस्ती व बदल तांबड्या / लाल शाईत (दुरूस्त करावयाच्या मुळ नोंदीवर एकच रेष मारून) व्यवस्थितपणे करून प्राधिकृत अधिका-याने स्वाक्षरी व दिनांकासहित साक्षीकृत करणे आवश्यक असता उपरोक्त उपरिलेखन कोणत्याही अधिका-याने साक्षांकित केलेले नाही.

2) रोकडवहीमध्ये दिनांक 31.03.2013 रोजीच्या शिल्लक रक्कम रुपये 31,42,87,392.88/- मध्ये विविध बँकामधील गुंतवणुका, बँक गॅरंटी यांचा समावेश आहे. त्यापैकी रोकडवही नुसार शेतकरी बँक शिल्लक 93,42,218.91/- दाखविली आहे. परंतु शेतकरी सहकारी बँकेच्या ठेवीच्या विवरणपत्रानुसार रक्कम रु.24369999.23/- शिल्लक आहेत. त्याचा फरक रु.15027780/-इतका आहे. शेतकरी बँकेमध्ये वेगवेगळया निधीमध्ये गुंतविलेल्या रु.336048654.08/- रक्कमांचा समावेश लेखा शाखेने रोकडवहीमध्ये

केलेला नाही. याबाबत शेतकरी बँक अवसायनात निघालेली असुन या बँकेत नियमबाह्यरित्या गुंतविलेल्या रक्कमाबाबतचा परिच्छेद क्र.10, 2011-12 या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालामध्ये घेण्यात आलेला आहे. रक्कमा परत मिळविण्याबाबत प्रशासनाकडुन कोणती कार्यवाही करण्यात आली याबाबतचा खुलासा करण्यात आलेला नाही.

3)युनियन बँकेच्या (खाते क्र.2045) रोकडवही नुसार शिल्लक रक्कम रु.21385904.90/-आहे व बँक स्टेटमेंट नुसार शिल्लक रक्कम रु.13215939.77/- आहे. याचा ताळमेळ लेखाशाखेने रोकडवहीमध्ये घेतला आहे. परंतु त्यामध्ये दर्शविण्यात आलेल्या फरक रक्कमेचे समायोजन करण्याची कार्यवाही केली नसुन दरमहा सदरच्या फरक रक्कमा तशाच पुढे नोंदवल्या आहेत. उदा. दिनांक 22.02.2011 रोजी अनामत खात्यावर वर्ग केलेली रक्कम रु.2000000/- रोकडवहीस खर्ची घातलेली नाही. व दिनांक 22.02.2011 व 23.02.2011 रोजी सुजल निर्मल खात्याकडे रु.5000000/- दुबार वर्ग ही बाब निदर्शनास आल्या बरोबर वेळीच रोकडवहीस योग्य त्या बाजूस नोंदवून व दुबार जमा रक्कम वर्ग करून घेतलेली नाही. ही कार्यवाही लेखापरीक्षण सुरू असेपर्यंत केली नाही. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 51 मधील (3) नुसार प्रत्येक महिना अखेर रोकडवहीतील नोंदलेल्या जमा व खर्चाच्या नोंदीची बँक पासबुक मधील नोंदीबरोबर बाबवार तुलना करून जर काही फरक असेल तर तो रोकड वहीतील तळटीपेमध्ये दाखविणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नसल्यामुळे बँक पासबुकमध्ये खर्च पडलेल्या परंतु रोकडवहीस खर्च बाजुस न नोंदविलेल्या रक्कमा रुपये 1170606.85/- अद्याप खर्ची घालण्यात आल्या नसल्याने रु.8170606/- चा फरक रोकडवही व बँक पासबुक मध्ये दिसुन येतो.

4)रोकडवहीमध्ये जमा बाजुस बँक गॅरंटी रक्कम रु.1606000/- शिल्लक दाखविली आहे. त्यापैकी रु.1551000/- व रु.5000/- ह्या बँक गॅरंटीची कागदपत्रे लेखा परीक्षणास दाखविली नाहीत.

5)महाराष्ट्र बँक खाते क्रमांक (5251) मध्ये रु.120995.57/- शिल्लक आहेत. परंतु रोजकिर्दीस रु.15869.57/- ची नोंद आहे. फरकाची रक्कम रुपये 105126/- चा शोध घेवुन ताळमेळ घेणे आवश्यक आहे.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक 51 दि.10/06/2014 चे उत्तर दि. 24/06/2014 रोजी दिले आहे. मुद्दा क्र.1 नुसार खाडाखोड प्रमाणित करण्यात आली आहे. मुद्दा क्र.2 चे उत्तरामध्ये बँक अवसायनात निघाली असल्याने बँक ताळमेळ घेतला नसल्याचे नमुद आहे. बँक ताळमेळ घेणे आवश्यक असल्याने सदर मुद्दा अमान्य करण्यात येत आहे. मुद्दा क्र.3 व 5 प्रमाणे दि.04/7/14 रोजी रोकडवही मध्ये ताळमेळ घेतल्याचे नमुद आहे. नियमाप्रमाणे ताळमेळ दरमहा घेणे आवश्यक असल्याने मुद्दा अमान्य करण्यात येत आहे.

| |
|---|
| मुद्दा क्रमांक 4 ची बँक गॅरंटीची कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नाहीत. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 51 | 10/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |

| 29 | मिरज घरपट्टी विभागाकडील वसुल रकमेचा भरणा लेख्यामध्ये केला नसल्याने झालेल्या कायम अपहाराबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 11 | करनिर्धारण व संकलन | मनपा | 9क | 05 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | 193726 | | |

| |
|---|
| मिरज विभागामध्ये घरपट्टी विभागाची पावतीप्रमाणे वसूल केलेली रक्कम रुपये 193726/- रोखपालाकडे जमा करणे आवश्यक असता ती जमा केली नसल्याने रु. 193726/- या रकमेचा कायमस्वरुपी अपहार झाला आहे. |

| |
|---|
| सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या मिरज घरपट्टी विभागाकडील वित्तीय वर्ष 2012-2013 च्या लेखा परीक्षणामध्ये माहे मार्च, 2013 मधील जमेची तपासणी केली असता खालील प्रमाणे घरपट्टी करांची रु.193726/- वसुल रक्कम महानगरपालिका लेख्यामध्ये जमा (भरणा) केली नसल्याचे आढळुन आले आहे.<br>1)पावती पुस्तक क्रमांक 123 श्री.अंकलगी यांना दिनांक 16.04.2012 रोजी 2012-2013 या आर्थिक वर्षासाठी घरपट्टी कर संकलनासाठी देण्यात आल्याची नोंद साठा नोंदवही मध्ये घेण्यात आलेली आहे. सदर |

पावती पुस्तकातील पावती क्रमांक 12201 ते 12206 या दिनांक 13.07.2012 ते दिनांक 25.07.2012 या कालावधीत वापरल्या आहेत. परंतु या पावत्यांद्वारा वसुल झालेली रक्कम रु. 193726/- महानगरपालिकेच्या लेख्यामध्ये न भरता त्यांचा अपहार केला आहे. पावती क्रमांक 12225 ते 12230 या पावत्या दिनांक 30.03.2012 रोजी वापरल्या असून पावती क्रमांक 12235 ही दि.31.03.2013 रोजी वापरली आहे. परंतु पावती क्रमांक 12204, 12207 ते 12224 , 12232 ते 12234 या पावत्या वापरल्या असून स्थळप्रत पावतीवर दिनांक नमुद नसल्याने करदात्याकडून कराची रक्कम कोणत्या दिनांकास वसूल केली व महानगरपालिकेमध्ये त्या रक्कमेचा भरणा कधी केला याची खात्री करता आली नाही.

2) परिशिष्ठ क्र. (10) मध्ये नमुद असलेल्या पावत्याद्वारे वसुल केलेली रक्कम रुपये 124678/- महानगरपालिका लेख्यामध्ये भरणा केलेली नाही. सदर जमा पावती पुस्तक श्री.अंकलगी यांना देण्यात आले असून ते वर्ग 4 मधील कर्मचारी आहेत. त्यांना वसुलीचे व रोख रक्कम हाताळण्याबाबत सक्षम आधिकारी यांनी दिलेल्या आदेशाची प्रत लेखापरिक्षणास देण्यात आलेली नाही. अर्धसमास ज्ञापन क्रमांक 53 दि.10/06/2014 चे अनुपालन करनिर्धारण व संकलन विभागाने दि.10/07/2014 रोजी दिले आहे. त्यामध्ये श्री.अंकलगी यांना क्र.मनपा/करवि/10/1461/2009-10 दि.20/11/2009 च्या कार्यालयीन आदेशाने कर वसुलीचे काम देण्यात आले आहे.

3)पुस्तक क्रमांक 315 मधील पावती क्र. 31485 ते 31500 या पावत्या दिनांक 25.03.2013 ते 31.03.2013 या कालावधीत श्री.अंकलगी यांनी करसंकलनासाठी वापरल्या आहेत. परंतु सदर पावत्या द्वारे परिशिष्ठ क्रमांक (10)मध्ये नमुद केलेली रक्कम रुपये 69048/- चा भरणा महानगरपालिका लेख्यामध्ये केलेला नाही.

4)नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम क्र.78(3) नुसार कर वसुली लिपिकाने नमुना क्र.50 प्रमाणे ठेवलेल्या संकलन पुस्तकांत,प्रत्येक जमा पावती वरील तपशील नोंदविला पाहिजे. या पुस्तकातील नोंदी दिलेल्या पावत्यांच्या क्रमानुसार ठेवल्या जाव्या व दिवस अखेर बेरजा घेवुन कर संकलकाने स्वाक्षरी केली पाहिजे. त्याचप्रमाणे नमुना क्र.13 प्रमाणे चलन तयार करुन कर संकलन निरीक्षकाकडे अथवा मुख्य कार्यालयाकडे संकलनाचा भरणा केला पाहिजे. परंतु अशाप्रकारे वसुली लिपिकांनी कर संकलन पुस्तक ठेवलेली नाहीत. व नियमाप्रमाणे चलनही तयार केले नाही व ते करसंकलन निरिक्षक व कर अधिक्षक यांनी तपासले नाही. तसेच चलन तपासणी बाबत कोणत्या कर्मचारी, अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आले होते या बाबतचे आदेश लेखापरिक्षणास दाखविण्यात आलेले नाहीत.

5)महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 79 अन्वये करांचा भरणा कर विभागात स्विकारण्यापूर्वी अगर रोखपालाकडे भरणा करण्यापूर्वी करनिर्धारण व करसंकलन खात्याने संकलन पुस्तकातील नोंदी मुळ पावत्यांशी ताडून पहाण्याची, पुस्तकांतील बेरजांची चाचणी करण्याची व ह्या तपासण्या करणाऱ्या अधिका-याने तपासण्या केल्याचे प्रमाणपत्र त्याच्या स्वाक्षरीने नोंदविण्याची खात्री करणे आवश्यक असता, मिरज विभागात कर संकलन कर्मचारी यांनी जमा केलेल्या रक्कमा नियमाप्रमाणे बरोबर असल्याची करसंकलन निरिक्षक व कर अधिक्षक यांनी तपासणी न करताच रक्कमा परस्पर रोखपालाकडे भरणा केल्याने संकलनाच्या नोंदीवर कर अधिक्षक यांचे नियंत्रण नसल्याचे लेखापरीक्षणास दिसून आले आहे. अर्धसमास ज्ञापन क्रमांक 53 दि.10/06/2014 चे अनुपालन करनिर्धारण व संकलन

| |
|---|
| विभागाने दि. 10/07/2014 रोजी दिले आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये चलन तपासण्याच्या आदेशाची प्रत सोबत जोडल्याचे नमुद आहे. आदेशाची पडताळणी केली असता जावक क्र.मनपा.करवि/ 10/3821/करनिर्धारण व संकलन विभागाने दि.18/12/13 ने आदेश काढला आहे. सदर आदेश अपहार झाल्यानंतर 2013-14 या आर्थिक वर्षात काढला असल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.<br>त्यामुळे वरील प्रमाणे रुपये 124678/- व रुपये 69048/- असा एकूण रक्कम रुपये 193726/- या रकमेचा कायमस्वरुपी अपहार केल्याचे दिसून येते. घरपट्टी विभाग उपायुक्त यांचे नियंत्रणाखाली आहे. या विभागाचे दैनंदिन कामकाज पाहता त्यांचे या विभागावर योग्य ते नियंत्रण नसल्याचे स्पष्ट होते. अपहार केलेल्या कर्मचा-यावर कोणती कारवाई करण्यात आली याचा अहवाल लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेला नाही. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये अपहार केलेला कर्मचारी श्री.अंकलगी यास आयुक्त आदेश क्र.मनपा/आस्थावि/ 527/13-14 दि.12/11/13 ने निलंबित केले आहे. परंतु अपहाराबाबत कोणताही गुन्हा दाखल केलेला नाही. तसेच अपहाराची रक्कम ही वसुल केलेली नाही.<br>अपहाराची रक्कम रु. 193726/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 53 | 10/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |

| 30 | घरपट्टी विभागाची पावती पुस्तक साठा नोंदवही अद्यावत नसलेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 11 | करनिर्धारण व संकलन | मनपा | 9ड | 08 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

सांगली मिरज व कुपवाड घरपट्टी विभागाने 2012-13 या आर्थिक वर्षात एकूण 320 पावती पुस्तके अभिलेखा विभागाकडून घेतली आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 चे नियम क्रमांक 09 (4) नुसार वसुली लिपिकाने पूर्ण वापरलेली पुस्तके परत केल्या शिवाय त्याला नवीन पुस्तके देवू नयेत अशी तरतुद असताना 2012-13 या आर्थिक वर्षात वापरलेली 320 पावती पुस्तके परत घेण्यात आली नाहीत.

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या मिरज घरपट्टी विभागाकडील करांची पावती पुस्तके साठा नोंदवही महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 चे नियम क्रमांक 09 नुसार नमुना क्र. 1 मध्ये ठेवण्यात आली आहे. वित्तीय वर्ष 2012-13 करिता मिरज विभागाने 105 , कुपवाड विभागाने 102 व सांगली विभागाने 113 पुस्तके अभिलेख विभागाकडून घेतल्याची नोंद साठा नोंदवहीमध्ये करण्यात आलेली आहे. पावती पुस्तक साठा नोंदवही (पावती/धनादेश पुस्तकांचा माल लेखा) चे लेखापरीक्षण केले असता खालील प्रमाणे अनियमितता आढळुन आल्या आहेत.

1)अभिलेख (रेकॉर्ड विभाग) विभागाकडून घरपट्टी करसंकलन पावती पुस्तके प्राप्त झालेचा दिनांक व वसुली लिपीकांना जमा पावती पुस्तके निर्गमीत केलेल्या दिनांकाची नोंद रकाना क्रमांक 1 मध्ये करणे आवश्यक असताना तशी नोंद केलेली नाही.

2)रकाना क्रमांक 10 मध्ये पुस्तके घेणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पदनामाची नोंद घेण्यात आलेली नाही.

3)पुस्तक क्रमांक 55,66 ते 68,70,122,126,128,129,152,160,165, 168 ,170, 202, 209, 214, 215, 217 ते 220, 223, 224, 225, 227, 229 इ. पुस्तके निर्गमीत करताना पुस्तक घेणाऱ्या व्यक्तीची सही रकाना क्रमांक 11 मध्ये घेणे आवश्यक असताना तशी सही घेण्यात आलेली नाही. त्यामुळे पुस्तके कोणत्या कर्मचा-याला देण्यात आली ते समजुन येत नाही.

4)पुस्तक निर्गमीत केल्या नंतर शिल्लक पुस्तकांचे बाबतीत लिपीक व प्राधिकृत अधिकारी यांनी अनुक्रमे रकाना क्रमांक 15 व 16 मध्ये अद्याक्षरी करणे आवश्यक असता ती केलेली नाही.

5)वापरलेली पावती पुस्तके संपल्या नंतर ती परत घेतल्याचा दिनांक , पुस्तके परत करणाऱ्या व्यक्तीची सही, लिपीक व प्राधिकृत अधिकारी यांनी अनुक्रमे रकाना क्रमांक 21,22,23 मध्ये करणे आवश्यक आसता ती केलेली नाही. वरील प्रमाणे साठा नोंदवही अपुर्ण असून त्यावर कोणत्याही प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या सह्या आढळुन आलेल्या नाहीत.

6)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 चे नियम क्रमांक 09 (4) नुसार वसुली लिपिकाने पूर्ण वापरलेली पुस्तके परत केल्या शिवाय त्याला नवीन पुस्तके देवू नयेत अशी तरतुद असताना 2012-13 या आर्थिक वर्षात वापरलेली 320 पावती पुस्तके परत घेण्यात आली नाहीत. लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 09 चे (8) नुसार पुर्णत: वापरलेली पावती पुस्तके प्राधिकृत अधिकाऱ्याने आपल्या व्यक्तीगत

| |
|---|
| ताब्यात ठेवणे आवश्यक असताना सदरची 320 पुस्तके वसुली लिपिकांच्याच ताब्यात ठेवलेली आहेत.<br>7)पुस्तक क्रमांक 338,323,318,339,331,321,337,330,336,332 ही 2012-13 या आर्थिक वर्षात अंशत: वापरली आहेत. लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 9 (7) नुसार चालु वर्षी अंशत: वापरलेली पुस्तके पुढील वर्षात वापरण्यास घेतली नसल्यास त्यातील न वापरलेल्या पावत्या त्या वर्षाअखेरीस रद्द बातल करून तसा शेरा कर अधिक्षक यांनी लिहिणे आवश्यक असता वरील क्रमांकाच्या पावती पुस्तकातील कोऱ्या पावत्या ज्या लिपिकाच्या ताब्यात आहेत त्याने Cancelled (रद्द) चा शिक्का मारून रद्द केल्या आहेत. परंतू त्या कर अधिक्षक यांनी प्रमाणित करुन रद्दबातलचा शेरा लिहिलेला नाही.<br>8)मिरज विभागातील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांची निश्‍चित केलेली कार्य व कर्तव्ये लेखापरीक्षणास दाखविली नसलेने त्यांचे अधिकार व कर्तव्य याबाबतची जबाबदारी समजून येत नाही.<br>अर्धसमास ज्ञापन क्रमांक 54 दि.10/06/2014 चे अनुपालन दि.10/07/2014 रोजी करनिर्धारण विभागाने दिले असुन वरील पावती पुस्तक साठा नोंदवही अद्यावत करण्याची व अन्य त्रुटींची पुर्तता करण्याची कार्यवाही चालु असल्याचे नमुद आहे. परंतु त्रुटींची पुर्तता करुन अहवाल लेखापरीक्षणास सादर केलेला नाही. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 54 | 10/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |
|---|---|

| 31 | घरपट्टी विभागामध्ये जमा पावती वरील दिनांकामध्ये खाडाखोड करून रक्कमा विलंबाने भरणा केल्याने झालेल्या तात्पुरत्या अपहारा बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 11 | करनिर्धारण व संकलन | मनपा | 9क | 04 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 10000 | | | |

| |
|---|
| मिरज घरपट्टी विभागामध्ये पुस्तक क्रमांक 56 मधील पावती क्रमांक 5532 अन्वये वसुली लिपिकाने मिळकतदाराकडून दि.04.05.2012 रोजी रक्कम घेवून कराची पावती केली आहे. परंतु कार्यालयीन पावतीच्या स्थळ प्रतीमध्ये दि.04.05.2012 ऐवजी दि.31.03.2013 असे दिनांकामध्ये उपरीलेखन करून 10 महिने विलंबाने रक्कम घरपट्टी विभागात भरली आहे. |

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेकडील मिरज घरपट्टी विभागाकडील वित्तीय वर्ष 2012-2013 च्या लेखापरीक्षणामध्ये माहे मार्च, 2013 या महिन्यासाठी वापरण्यात आलेल्या जमा पावती पुस्तकांची तपासणी केली असता खालील प्रमाणे पावती वरील दिनांका मध्ये खाडाखोड करून रकमेचा तात्पुरता अपहार केल्याचे आढळुन आले आहे. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक 55 दि.10/06/2014 निर्गमित केला असून त्याचे उत्तर करनिर्धारण व संकलन विभागाने दि.10/07/2014 रोजी दिले आहे. दिलेल्या अनुपालनाचे अवलोकन करून खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)पावती पुस्तक साठा नोंदवहीची तपासणी केली असता, पुस्तक क्रमांक 56 हे अभिलेख (रेकॉर्ड) विभागाकडून 2011-12 मध्ये दिनांक 16.04.2011 रोजी घेण्यात आले असून, ते 2011-12 या आर्थिक वर्षात न वापरल्याने घरपट्टी विभागाकडे शिल्लक होते. सदर पुस्तक 2012-13 या आर्थिक वर्षासाठी जमा करून पुन्हा वापरण्यास घेण्यात आलेले असून ते दिनांक 16.04.2012 रोजी श्रीमती.भोकरे यांना देण्यात आल्याची नोंद साठा नोंदवही पान क्रमांक 11 वर आहे. सदर पावती पुस्तकामधील पावती क्रमांक 5501 ते 5531 दिनांक 16.04.2012 ते 02.05.2012 या कालावधी करिता वापरल्या आहेत. त्यानंतर पावती क्रमांक 5532 ही पावती दि. 04.05.2012 रोजी केली आहे. परंतु या पावती वरील दिनांकामध्ये खाडाखोड करुन दिनांक 31.03.2013 नमुद केला आहे व त्याच दिवशी वसुल करण्यात आलेली रक्कम रुपये 10000/- चा भरणा घरपट्टी विभागाकडे केला आहे. तसेच पावती क्रमांक 5533 ह्या पावती वरील दिनांक मध्ये दिनांक 31.03.2013 अशी खाडाखोड करून सदर पावतीद्वारे वसुल रक्कम रुपये 1790/- दिनांक 31.03.2013 रोजी घरपट्टी विभागाकडे भरणा केली आहे.

2)सदर पावतीची मिळकतदाराकाकडील प्रत मागणी करून प्राप्त केली असता त्यावर रक्कम मिळाल्याची तारीख 04.05.2012 नमुद असल्याचे आढळून आले आहे. (सोबत मिळकतदाराची छायांकीत प्रत जोडणेत आली आहे.) म्हणजेच संबंधित वसुली लिपिकाने मिळकतदाराकडून दि.04.05.2012 रोजी रक्कम घेवून कार्यालयीन पावतीमध्ये दि.04.05.2012 ऐवजी दि.31.03.2013 असे उपरिलेखन करून 10 महिने विलंबाने रक्कम घरपट्टी विभागात भरल्याने रु.10000/- चा तात्पुरता अपहार केला असल्याचे स्पष्ट होते.

| |
|---|
| अर्धसमास ज्ञापन क्रमांक 55 दि.10/06/2014 चे उत्तर करनिर्धारण व संकलन विभागाने दि.10/07/2014 रोजी दिले असुन त्याचे अनुपालनामध्ये श्रीमती. भोकरे यांचेकडुन आर्थिक अनियमितता झालेचे सकृत दर्शनी स्पष्ट झाल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56 प्रमाणे आयुक्त यांनी श्रीमती. भोकरे यांना दि.21/10/13 रोजी तात्काळ निलंबित केलेचे व त्यांचे विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल केलेचे नमुद आहे. परंतु याबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविण्यात आली नाहीत.<br>3)महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 79 अन्वये करांचा भरणा कर विभागात स्विकारण्यापूर्वी अगर रोखपालाकडे भरणा करण्यापूर्वी कर खात्याने संकलन पुस्तकातील नोंदी मुळ पावत्यांशी ताडून पहाण्याची, पुस्तकांतील बेरजांची चाचणी करण्याची व ह्या तपासण्या करणाऱ्या अधिकाऱ्याने तपासण्या केल्याचे प्रमाणपत्र त्याच्या स्वाक्षरीने नोंदविण्याची खात्री करणे आवश्यक असता, मिरज विभागात कर संकलन कर्मचारी यांनी जमा केलेल्या रक्कमा नियमाप्रमाणे बरोबर आहेत याची करसंकलन निरिक्षक व कर अधिक्षक यांनी तपासणी न करताच रक्कमा परस्पर रोखपालाकडे भरणा केल्याचे लेखापरीक्षणास दिसून आले आहे.<br>4)महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 10 नुसार लेखा लेखनातील प्रत्येक दुरूस्ती व बदल तांबड्या / लाल शाईत (दुरूस्त करावयाच्या मुळ नोंदीवर एकच रेष मारून) व्यवस्थितपणे करून प्राधिकृत अधिकाऱ्याने स्वाक्षरी व दिनांकासहित साक्षांकित करणे आवश्यक असता उपरोक्त उपरिलेखन कोणत्याही अधिकाऱ्याने साक्षांकित केलेले नाही. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 55 | 10/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |
|---|---|

| 32 | मिरज घरपट्टी विभागाने कराचे दैनिक वसुलीची नोंदवही ठेवली नसलेबाबत व करसंकलन भरणा नियमानुसार केला नसलेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 11 | करनिर्धारण | मनपा | 9ड | 03 | 0 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | व संकलन | | | | |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

| |
|---|
| घरपट्टी विभागाच्या संकलनाचा भरणा स्वीकारणा-या अधिका-याने / कर्मचा-याने संकलन पुस्तकात व पावती पुस्तकातील वापरलेल्या शेवटच्या पावतीवर त्याची पोच पावती देणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. मिरज विभागाकडे नमुना क्रमांक 50 मध्ये संकलन पुस्तक ठेवलेले नाही. तसेच नमुना क्रं. 13 प्रमाणे प्रत्येक वसुली लिपिकाने चलन तयार करून त्यानुसार रोखपालाकडे भरणा केलेला नाही. त्याऐवजी संकलनाचा भरणा स्वीकारणा-या कर्मचा-याने स्वत:च्या नमुन्यात एक नोंदवही ठेवली असून त्यामध्ये त्या दिवशीच्या सर्व संकलन लिपीकांची नावे लिहुन त्यासमोर त्याने भरणा केलेली रक्कम लिहीली आहे. परंतु सदर नोंदवही विहीत नमुन्यात नसुन त्यावर कोणत्याही सक्षम प्राधिका-याने स्वाक्षरी केलेली नाही. |

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या वित्तीय वर्ष 2012-2013 चे लेखा परीक्षणामध्ये मिरज घरपट्टी विभागाचे लेखा परीक्षण केले असता घरपट्टी कराच्या दैनिक वसुलीची नोंदवही ठेवली नसल्याचे आढळुन आले आहे.

1)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 चे नियम 78 (3) प्रमाणे नमुना क्रमांक 50 मध्ये ठेवण्यात आलेल्या संकलन पुस्तकात, प्रत्येक जमा पावतीवरील तपशील वसुली लिपिकाने नोंदविला पाहिजे. या पुस्तकातील नोंदी घरपट्टी धारकास घरपट्टी वसुलीच्या दिलेल्या पावत्यांच्या क्रमांकानुसार नमुद करून व दिवस अखेर बेरजा घेवुन कर संकलकाने / वसुली लिपिकाने स्वाक्षरीकरून नमुना नंबर 13 मध्ये चलन तयार केले पाहिजे व कर संकलन निरिक्षकाकडे अथवा मुख्य कार्यालयात संकलनाचा भरणा केला पाहिजे असे असताना तशी नोंदवही कोणत्याही करसंकलकाने ठेवलेली नाही. करसंकलक / वसुली लिपिकाने दैनिक करांच्या संकलन केलेल्या रक्कमेचे चलन न करता फक्त वसुली पावती पुस्तकाच्या शेवटच्या पावती च्या पाठीमागे त्या दिवसाच्या वसुल केलेल्या कराच्या रक्कमेची बेरीज नोंदवुन रक्कम रोखपालाकडे दिली आहे.

2) संकलनाचा भरणा स्वीकारणा-या अधिका-याने / कर्मचा-याने संकलन पुस्तकात व पावती पुस्तकातील वापरलेल्या शेवटच्या पावतीवर त्याची पोच पावती दिली पाहिजे. परंतु अशी कार्यवाही झाली नसल्याचे आढळुन आले आहे. मिरज विभागाकडे संकलन पुस्तक ठेवण्यात आलेले नाही. तसेच नमुना क्रं. 13 प्रमाणे प्रत्येक वसुली लिपिकाने चलन तयार करून त्यानुसार रोखपालाकडे भरणा केलेला नाही. त्याऐवजी संकलनाचा भरणा स्वीकारणा-या कर्मचाऱ्यांने स्वत:च्या नमुन्यात एक नोंदवही ठेवली असून त्यामध्ये त्या दिवशीच्या सर्व संकलन लिपीकांची नावे लिहुन त्यासमोर त्याने भरणा केलेली रक्कम लिहीली आहे. परंतु

| |
|---|
| सदर नोंदवही विहीत नमुन्यात नसुन त्यावर कोणत्याही सक्षम प्राधिका-याने स्वाक्षरी केलेली नाही.<br>3)नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम क्र.79 नुसार कर संकलन कर विभागात स्विकारण्यापूर्वी अगर रोखपालाकडे भरणा करण्यापूर्वी करखात्याने / विभागाने संकलन पुस्तकातील नोंदी मुळ पावत्याशी ताडून पाहण्याची, पुस्तकांतील बेरजांची चाचणी करण्याची, चलनावरील आकड्यांचा मेळ घालण्याची व ह्या तपासण्या करणा-या अधिका-याचे तपासण्या केल्याचे प्रमाणपत्र त्याच्या स्वाक्षरीने नोंदविण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. परंतु मिरज विभागातील वसुली लिपिकांने जमा पावती पुस्तकांत केलेल्या दैनंदिन पावत्यांची दिवसा अखेर बेरीज केलेली नाही व करनिरीक्षकाने ती तपासलेली नाही. सदर रक्कम वसुली लिपिकाने चलन तयार न करता रोखपालाकडे जमा केली आहे. व रोखपालाने नियम क्र.36 (1) नुसार नमुना 14 अगर 15 प्रमाणे दुय्यम पुस्तक ठेवून त्यामध्ये नोंद न करता स्वत:च्या नमुन्या मधील नोंद वहीमध्ये नोंदविली आहे.<br>अर्धसमास ज्ञापन क्रमांक 56 दि.10/06/2014 चे अनुपालन करनिर्धारण व संकलन विभागाने दि.10/70/2014 रोजी दिले असुन यापुर्वी या कार्यालयामध्ये नियमानुसार जमेची वसुली केली जात नसल्याचे मान्य केले आहे व जा.क्र./करवि/10/3821 दि.18/12/13 रोजी परिपत्रकाद्वारे कर संकलन कर विभागात स्विकारण्यापूर्वी अगर रोखपालाकडे भरणा करण्यापूर्वी करखात्याने / विभागाने संकलन पुस्तकातील नोंदी मुळ पावत्याशी ताडून पाहण्याची, पुस्तकांतील बेरजांची चाचणी करण्याची, चलनावरील आकड्यांचा मेळ घालण्याची व ह्या तपासण्या करणा-या अधिका-याचे तपासण्या केल्याचे प्रमाणपत्र त्याच्या स्वाक्षरीने नोंदविण्या बाबतचे आदेश कर्मचाऱ्यांना दिल्याचे नमूद आहे. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 56 | 10/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |
|---|---|

| 33 | महावीर उद्यान भाग 1 व 2 विकसित करणे या कामातील अनियमिततेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | खासदार निधी | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | केंद्र शासन | 9ब | 08 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 1041207 | 15191 | | |

महावीर उद्यानातील फेरोक्रेट फिनिश वेगवेगळ्या आर्किटेक्चरल रचना तयार करणे या कामाचा दर दरपृथ:करणानुसार ठरविलेचे प्राकलनामध्ये नमुद आहे. सोबत विनिता नाईक या आर्किटेक्चरने केलेले दरपृथ:करण जोडले आहे. परंतु कार्यकारी अभियंता यांनी दरपृथ:करणानुसार आलेले दर मार्केट दराप्रमाणे योग्य असलेबाबत प्रमाणित केले नसल्याने याबाबीवर खर्च करण्यात आलेली रक्कम 236.01 चौ.मि. X रु.2200 प्रती चौ.मि.प्रमाणे रु.519222/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

महावीर उद्यान भाग 1 व 2 विकसित करणे या कामासाठी मा.खासदार प्रकाश जावडेकर यांचे खासदार निधीमधुन निधी मंजुर करण्यात आले आहे व त्या मंजुर रक्कमेतुन महावीर उद्यान सांगली, मिरज व कुपवाड शहर महानगरपालिकेने विकसित केले आहे.

अंदाजपत्रकीय रक्कम 1000000/-

लेखाशिर्ष :- इतर योजना 41215 मा.खासदार फंड

**प्रमाणक क्र.02 दि.10/08/12 रक्कम रु.999000/-**

प्रशासकीय मान्यता :- क्र.नियोजन /का -14(2) खास्थाविका / 4602 / 2011 जिल्हा नियोजन समिती जिल्हा नियोजन समिती जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली दि.07/12/2011

तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता यांचे कडील क्र.र.न.622 दि.04/11/11

स्थायी समिती ठराव क्रं 561 दि.24/01/12 ने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 संविदा कलम 2(2) चे परंतुकान्वये विनानिविदा काम मंजुर करणेत आले आहे..

निधी वितरण आदेश :- क्र.नियोजन / का-14(2) खास्थाविका / 1055 / 2012 जिल्हा नियोजन समिती जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली दि.11/04/2012 ने रु.1500000/- निधी प्राप्त झाला आहे.

ठेकेदाराचे नाव :- मे. ग्रीनमेक हॉर्टिटेक प्रा.लि.पुणे.

कामाचा कार्यादेश :- जा.क्र./सा/बांधवि/105/12-13/ साबांवि,मुख्यालय,दि.30/05/2012

कामाची मुदत :- 90 दिवस. काम पुर्ण दि.14/07/12

मोजमाप पुस्तिका क्र.10 पृष्ठ क्र. 26 ते 33

या कामाची नस्ती,मोजमाप पुस्तक क्र.10 व देयक तपासून अर्धसमास ज्ञापन क्रं.66 दि.27/06/12 रोजी निर्गमित केला आहे. बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.16/7/14 रोजी लेखापरीक्षणास सादर केले आहे. सदर अनुपालन तपासून खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)स्थायी समिती ठराव क्रं 561 दि.24/01/12 ने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 संविदा कलम 2(2) चे परंतुकान्वये विनानिविदा काम मंजुर केले आहे. परंतु त्याबाबतची योग्य कारणे ठरावामध्ये नमुद केली नाहीत. प्राधिकारानुसार कलम 5(2)(2) अन्वये निविदा मंजुर करताना विना निविदेचे कारण नमुद करणे आवश्यक असल्याने सदर तरतुदीचे पालन झाले नसल्याचे स्पष्ट होते.
2)बाब क्र.2 बागेसाठी माती आणने व पसरणे हे काम मोजमाप पुस्तक व देयकाप्रमाणे 612.06 घ.मी.केले असुन दरपृथ:करणाप्रमाणे या बाबीचा दर रु.313.80/- घमी व बाब क्र.8 सोलिंग करणे या कामाचा दर रु.2852.25 प्रती चौ.मि. ठरविला आहे. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67 प्रती घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. देयकासोबत ठेकेदाराने रॉयल्टी रक्कम भरलेचा कोणताही पुरावा सोबत जोडला नसतानाही बांधकाम विभागाने देयकामधुन रॉयल्टीची रक्कम कपात न करता प्रमाणक क्र.2 दि.10/08/12 ने ठेकेदारास आदा केली आहे. त्यामुळे ठेकेदारास देयकामधुन रॉयल्टीपोटी आदा केलेली 612.06 घ.मी. X रु.70.67 प्रती घनमिटर = रु.43254/- तसेच सोलिंगसाठी 80 मि.मि. जाडीचा दगड 66.890 घ.मि वापरल्याने रु.70.67 प्रती घनमिटर प्रमाणे रु.4721/- अशी एकुण रॉयल्टीची रक्कम रु.47975/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत. अर्धसमास ज्ञापन क्रं.66 चे उत्तर दि.16/7/14 रोजी दिले असुन त्यामध्ये महसुल विभागाने माती वाहतुक करण्यासाठी दिलेल्या वाहतुक परवान्याचे पास जोडलेचे नमुद आहे. परंतु ते लेखापरीक्षणास दाखविणेत आलेले नाहीत. त्यामुळे रॉयल्टी रक्कम रु.47975/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.
3)बाब क्र.5 फेरोक्रेट फिनिश वेगवेगळ्या आर्किटेक्चरल रचना तयार करणे या कामाचा दर रु. 2200/- प्रती चौ.मि. दरपृथ:करणानुसार ठरविला असलेचे प्राकलनामध्ये नमुद आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये विनिता नाईक या आर्किटेक्चरने केलेले दरपृथ:करण जोडले आहे. परंतु महानगरपालिकेच्या बांधकाम विभागातील तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार असलेल्या कार्यकारी अभियंता यांनी दरपृथ:करणानुसार आलेले दर मार्केट दराप्रमाणे योग्य असलेबाबत प्रमाणित केले नसल्याने

याबाबीवर खर्च करण्यात आलेली रक्कम 236.01 चौ.मि. X रु.2200 प्रती चौ.मि.प्रमाणे रु.519222/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

4)बाब क्र.12 जेट ग्रॅनाईट फरशी बसविणे हे काम 51.380 चौ.मि. x रु.2455.05/ चौ.मि.= रु.126140.47 केले आहे.कामाच्या परिमाणाचा दर दरपृथ:करणानुसार ठरविलेचे प्राकलनामध्ये नमुद आहे. परंतु दरपृथ:करण सोबत जोडणेत आलेले नाही. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये दरपृथ:करण जोडलेचे नमुद आहे. परंतु दरपृथ:करण सोबत जोडले नसल्याने रक्कम रुपये 126140/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

5) मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणी केली असता पॉलिश कोटा फरशी बसविणेचे काम 325.17 चौ.मि.करण्यात आलेले आहे. सदर काम प्राकलनामध्ये नमुद अंदाज 118.970 चौ.मि. पेक्षा 206 चौ.मि.ने जादा केले आहे व या जादा कामाची किंमत रु.145845/- इतकी झाली आहे. या जादा कामास सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम 227 (24) कामाच्या अतिरिक्त बाबी पार पाडणेसाठी कार्यकारी अभियंता यांना प्रत्येक अतिरिक्त बाबींसाठी रुपये 10,000/- या प्रमाणे वाढ करण्याचे अधिकार आहेत. या बाबीवर रुपये 145845/- जादा खर्च झालेने महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1972 चे नियम क्र.167 (1) नुसार सुधारीत तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण सात संविदा कलम 73 (अ) अन्वये महानगरपालिकेच्या वतीने संविदा करणेचा अधिकार आयुक्त यांना असलेने त्यांची प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. निविदा अटी/शर्ती मधील अट क्र.15 नुसार मंजुर कामामध्ये बदल किंवा वाढ करण्यास विभागप्रमुख यांच्या अगावु लेखी मंजुरीची आवश्यकता असता ती घेणेत आलेली नसलेने रु.145845/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

6)बाब क्र.14 बागेमध्ये वेगवेगळी खेळणी बसविणे या कामाचा दर रु.250000/- दरपृथ:करणानुसार ठरविला असलेचे प्राकलनामध्ये नमुद आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालना सोबत तीन कोटेशन धारकांची दरपत्रके जोडली आहेत. परंतु दरपत्रके कोणी मागविली याचा संदर्भ नमुद नाही. कोटेशन धारक खेळणी पुरविणारे अधिकृत नोंदणीधारक व्यवसायिक असलेबाबतचे कोणतेही तांत्रिक पुरावे सोबत जोडलेले नाहीत. मागविण्यात आलेल्या खेळण्यांचे विनिर्देश (specification) ठरविण्यात आलेले नाहीत. साहित्याची किंमत रु.50000/- पेक्षा जास्त असल्याने, उद्योग उर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय क्रमांक भांखसं-1093/2635/ उद्योग/6 दि.16 जुलै 1993 नुसार खेळणी खरेदीची निविदा मागविणे आवश्यक असता, त्याप्रमाणे निविदा न मागविता कोटेशन मागवुन खेळणी खरेदी केलेने स्पर्धात्मक दराचा लाभ मिळाला नसल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे स्पष्ट होत आहे.त्यामुळे खेळण्याची रक्कम रु.2.50 लाख आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

7)फेरोक्रेट फिनिश वेगवेगळ्या आर्किटेक्चरल रचना तयार करणे या कामाचा दर विनिता नाईक या

| |
|---|
| खाजगी आर्किटेक्चरनी केलेल्या दरपृथ:करणानुसार रु. 2200 प्रती चौ.मि. ठरविला असलेचे अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये नमुद आहे. दरपृथ:करणाचे अवलोकन केले असता सदर दर ठरविताना 1 टक्के विम्याची तरतुद केली असल्याने विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.प्रविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% विम्याची तरतुद विभागिय दरसुचीमध्ये केली जात नसलेने प्राकलन/पुर्वगणनपत्रक तयार करताना त्याची तरतुद करणेत यावी व ठेकेदाराने विम्याची रक्कम विमा संचालनालयाकडे भरलेचे प्रमाणपत्र दाखविलेनंतर परत करणेत यावी असे नमुद आहे. त्यामुळे प्राकलनामध्ये 1% विम्याची तरतुद केली असल्याने रु.519222/- च्या 1% प्रमाणे रु.5192/- ठेकेदाराकडुन वसुल पात्र आहे.<br>8)प्राकलनामध्ये उद्योग उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य, शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार 1% कामगार कल्याण उपकराची तरतुद केली आहे. परंतु देयकातुन उपकर वसुल केला नसलेने रु. 999000/- च्या 1% प्रमाणे रु.9990/- ठेकेदाराकडुन वसुल करण्यात यावेत.<br>**आक्षेपाधिन रक्कम:-** फेरोक्रेट फिनिश रु.519222/-+ ग्रॅनाईट फरशी बसविणे रु.126140/- + पॉलिश कोटा फरशी बसविणे रु.145845/- + खेळणी बसविणे रु.250000/- = रु.1041207/-<br>**वसुलपात्र रक्कम :-** विमा रु.5192/- + उपकर रु.9990 = रु. 15191/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 66 | 27/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 34 | आमराई उद्यानामध्ये पाण्याच्या निच-यासाठी गटर करणे व फिलिंग करणे या कामातील अनियमिततेबाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | खासदार निधी | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | केंद्र शासन | 9ब | 04 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 590378 | 9998 | | |

महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु.200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67 प्रती घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने भरणे आवश्यक आहे. रॉयल्टी भरल्याचा कोणताही अभिलेख देयकासोबत जोडला नसल्यास ठेकेदारास रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये असे अधिसूचनेमध्ये नमुद आहे. ठेकेदाराने देयकासोबत रॉयल्टी भरल्याचा कोणताही पुरावा जोडला नसतानाही मुरुम 1421.28 घ.मी. X रॉयल्टी रु.70.67 प्रती घनमिटर प्रमाणे रु.100441/- ठेकेदारास आदा केली आहे.

आमराई उद्यानामध्ये पाण्याच्या निच-यासाठी गटर करणे व फिलिंग करणे या कामासाठी मा.खासदार प्रकाश जावडेकर यांचे खासदार निधीमधुन निधी मंजुर करण्यात आले आहे व त्या मंजुर रक्कमेतुन आमराई उद्यान सांगली,मिरज व कुपवाड शहर महानगरपालिकेने विकसित केले आहे.

अंदाजपत्रकीय रक्कम रु.1000000/-
लेखाशिर्ष :- इतर योजना 41215 मा.खासदार फंड.
**प्रमाणक क्र. 01 दि.10/10/12 रक्कम रु.499935/-**
प्रशासकीय मान्यता :- क्र.नियोजन / का - 14(2) खास्थाविका / 4602 / 2011 जिल्हा नियोजन समिती जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचे पत्र दि.07/12/2011

तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता यांचे कडील क्र.र.न.622 दि.04/11/11

स्थायी समिती ठराव क्रं 561 दि.24/01/12 ने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 संविदा कलम 2(2) चे परंतुकान्वये विनानिविदा काम मंजुर केले आहे.

निधी वितरण आदेश :- क्र.नियोजन / का - 14(2) खास्थाविका / 1055 / 2012 जिल्हा नियोजन समिती जिल्हा नियोजन समिती जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली दि.11/04/2012 ने रु.1500000/- निधी प्राप्त झाला आहे.

ठेकेदाराचे नाव :- मे. ग्रीनमेक हॉर्टिटेक प्रा.लि.पुणे.

कामाचा कार्यादेश :- जा.क्र. / सा / बांधवि / 105 / 12-13 / साबांवि, मुख्यालय, दि.30/05/2012

कामाची मुदत :- 60 दिवस. काम पुर्ण दि. 20/06/12

मोजमाप पुस्तिका क्र.10 पृष्ठ क्र.   34

या कामाची नस्ती, मोजमाप पुस्तक व देयकाचे लेखापरीक्षण करुन अर्धसमास ज्ञापन क्रं.67 दि.27/6/14 रोजी निर्गमित केला असुन त्याचे अनुपालन बांधकाम विभागाने दि.16/7/14 रोजी दिले आहे. बांधकाम विभागाने दिलेल्या अनुपालनाचे अवलोकन करुन खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)स्थायी समिती ठराव क्रं 561 दि.24/01/12 ने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 संविदा कलम 2(2) चे परंतुकान्वये विनानिविदा मंजुर केले आहे. परंतु त्याबाबतची योग्य कारणे ठरावामध्ये नमुद केली नसल्याने विना निविदा काम करण्याची योग्यता तपासता आली नाही. सदर काम मुरुम आणणे व पसरण्याचे आहे. यामध्ये कोणतीही तांत्रिक बाब समाविष्ट नसल्याने निविदा काढणे आवश्यक असताना विना निविदा काम केल्याने महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ न मिळाल्याने आर्थिक नुकसान झाल्याचे स्पष्ट होते.

2)महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67 प्रती घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने भरणे आवश्यक आहे. परंतु ती भरल्याचा कोणताही अभिलेख देयकासोबत जोडला नसल्यास ठेकेदारास रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये असे स्पष्ट नमुद असतानाही व ठेकेदाराने देयकासोबत रॉयल्टी भरल्याचा कोणताही पुरावा जोडला नसतानाही  मुरुम 1421.28 घ.मी. X रॉयल्टी 70.67 / घनमिटर = रु.100441/- ठेकेदारास दिली आहे. तसेच प्राकलनामध्ये खडी आणने व पसरण्याचा दर दरपृथ:करणाने ठरविला असल्याचे नमुद आहे. परंतु दरपृथ:करण दाखविले नसल्याने रु.499935/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत. अर्धसमास ज्ञापन क्रं.67 दि.27/6/14 रोजी निर्गमित केला असुन त्याचे अनुपालन बांधकाम विभागाने दि.16/7/14 रोजी दिले आहे. त्यामध्ये महसुल विभागाने मुरुम वाहतुक करण्यासाठी दिलेल्या वाहतुक परवान्याचे पास सोबत जोडलेचे नमुद आहे. परंतु पास लेखापरीक्षणास दाखविले नसलेने रुपये 100441/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

3)प्राकलनामध्ये उद्योग उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108 / कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार 1% कामगार कल्याण उपकराची तरतुद केली आहे. परंतु देयकातुन उपकर वसुल केलेला नाही. त्यामुळे रु. 499935/- च्या 1% प्रमाणे रु.4999/- ठेकेदाराकडुन वसुल करण्यात यावेत. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या उत्तरामध्ये उपकर वसुलीची कार्यवाही करण्याचे मान्य केले आहे. परंतु उपकराची वसुली करण्यात आलेली नाही.

4)विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, यांचे पत्र क्र.प्रविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% विम्याची तरतुद विभागिय दरसुचीमध्ये केली जात नसलेने प्राकलन / पुर्वगणनपत्रक तयार करताना त्याची तरतुद करणेत यावी व ठेकेदाराने विम्याची रक्कम संचालनालयाकडे भरलेचे प्रमाणपत्र दाखविलेनंतर परत करणेत यावी असे नमुद आहे. त्याप्रमाणे प्राकलनामध्ये विम्याच्या रक्कमेची तरतुद केली नसल्याने शासनाचे विमा रक्कमेपोटी रु. 499935/- च्या 1% प्रमाणे रु.4999/-चे अर्थिक नुकसान झाले आहे.

**आक्षेपाधिन रक्कम :-** खडी आणणे व पसरणे रु. 489937/- + रॉयल्टी रु. 100441/- = रु.590378/-

| |
|---|
| **वसुलपात्र रक्कम :-** कामगार कल्याण उपकर रु.4999/- + विमा रु. 4999/- = रु.9998/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 67 | 27/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 35 | महावीर उद्यान विकसित करणे या कामातील अनियमितते बाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | खासदार निधी | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | केंद्र शासन | 9ब | 05 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 1498473 | 235152 | | |

| |
|---|
| वाळवी प्रतिबंधक कामासाठी बांधकाम विभागाचे DSR (2011-12) पान नं 134 बाब क्र. 63 चा वापरलेला दर रु.79/-चौ.मि. हा इमारतीचे बांधकामासाठी वापरणे आवश्यक आहे. परंतु हा दर मोकळया जागेमध्ये बाग विकसित करण्याच्या कामासाठी वापरला आहे तो चुकीचा आहे. त्याऐवजी DSR (2011-12) पान नं 134 बाब क्र.60 चा वाळवी प्रतिबंधक औषध वापरणेचा दर रु.39 प्रती चौ.मि. वापरणे आवश्यक असता तो न वापरल्याने रु.79-39 = रु.40/- चौ.मि. X 5504.860 चौ.मि. प्रमाणे महानगरपालिकेचे रु.220194/- चे आर्थिक नुकसान झालेने ते संबंधिताकडुन वसुल करणे आवश्यक आहे. |

| |
|---|
| महावीर उद्यान विकसित करणे या कामासाठी मा.खासदार राजीव शुक्ल यांचे खासदार निधीमधुन निधी मंजुर करण्यात आले आहे व त्या मंजुर रक्कमेतुन महावीर उद्यान सांगली, मिरज व कुपवाड शहर महानगरपालिकेने विकसित केले आहे. |

अंदाजपत्रकीय रक्कम रु. 2000000/-

**प्रमाणक क्र. 01 दि.20/10/13 रक्कम रु.1495814/-**

प्रशासकीय मान्यता :- क्र.नियोजन / का-14(2) खास्थाविका / 18072 / 2012 जिल्हा नियोजन समिती जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली दि.11/06/2012

तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता यांचे कडील क्र.र.न.37 दि.31/05/12

स्थायी समिती ठराव नं. 204 दि.17/08/12 ने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 संविदा कलम 2(2) चे परंतुकान्वये विनानिविदा काम मंजुर करण्यात आले आहे.

निधी वितरण आदेश :- क्र.नियोजन / का-14(2) खास्थाविका / 2188 / 2012 जिल्हा नियोजन समिती जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली दि.17/09/2012 ने रु.1875000/- निधी प्राप्त झाला आहे.

ठेकेदाराचे नाव : - मे.ग्रीनमेक हॉर्टिटेक प्रा.लि.पुणे.

कामाचा कार्यादेश :- जा.क्र./ सा / बांधवि / 443 / 12-13 / साबांवि, मुख्यालय, दि.15/09/2012

कामाची मुदत :- 60 दिवस. काम पुर्ण दिनांक : 26/09/2012

मोजमाप पुस्तिका क्र. 35 पृष्ठ क्र. 35 ते 36

या कामाची नस्ती, मोजमाप पुस्तक व देयकाचे लेखापरीक्षण करुन अर्धसमास ज्ञापन क्रं.70 दि.27/6/14 रोजी निर्गमित केला असुन त्याचे अनुपालन बांधकाम विभागाने दि.16/7/14 रोजी दिले आहे. बांधकाम विभागाने दिलेल्या अनुपालनाचे अवलोकन करुन खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1.प्राकलनामधील बाब क्र.2 वाळवी प्रतिबंधक उपाययोजनेसाठी 5504.860 चौ.मि. X रु.79 प्रती चौ.मि. प्रमाणे रु.435159.18/- ची तरतुद केली आहे व मोजमाप पुस्तक क्र.35 व देयकाची तपासणी केली असता रु.435158.39/- खर्च केला आहे. DSR(11/12) नुसार वाळवी प्रतिबंधक औषध क्लोरोपायरीफॉस व हिपोक्लोरवापरणे आवश्यक आहे. सदर औषध वापरल्याबाबत खरेदीच्या पावत्या व त्यावर जकात भरल्याच्या पावत्या तसेच औषध वापरण्यास योग्य असलेबाबतचा प्रयोगशाळा चाचणी अहवाल लेखापरिक्षणास दाखविलेला नाही. या कामासाठी DSR (11/12) पान नं 134 बाब क्र.63 चा वापरलेला दर हा इमारत बांधण्यासाठी वापरणे आवश्यक असता मोकळया जागेमध्ये बाग विकसित करण्याच्या कामासाठी वापरला आहे तो चुकीचा आहे. त्याऐवजी DSR (11/12) पान नं 134 बाब क्र.60 चा वाळवी प्रतिबंधक औषध वापरणेचा दर रु.39 प्रती चौ.मि. वापरणे आवश्यक असता तो न वापरल्याने रु.79-39 = रु.40/- चौ.मि. X 5504.860 चौ.मि. प्रमाणे महानगरपालिकेचे रु.220194/- चे आर्थिक नुकसान झालेने ते संबंधिताकडुन वसुल करावे. अर्धसमास ज्ञापन क्र.70 दि.27/6/14 चे उत्तर बांधकाम विभागाने

दि.16/7/14 रोजी दिले आहे. उत्तरामध्ये औषध खरेदीच्या पावत्या व औषध वापरण्यास योग्य असलेबाबतचा प्रयोगशाळा अहवाल सोबत जोडला असलेचे नमुद आहे. परंतु या अनुषंगिक कोणतीही कागदपत्रे सोबत जोडणेत आलेली नाहीत. तसेच उद्यानामध्ये बहुतांश स्थापत्य विषयक बाबींचा समावेश असल्याने वाळवी प्रतिबंधक उपायासाठी वापरलेला दर योग्य असलेचे उत्तरामध्ये नमुद आहे. परंतु कामाच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता यामध्ये स्थापत्य बाबींचा समावेश मोठया प्रमाणत दिसुन येत नसल्याने रु.220194/- चे आर्थिक नुकसान झालेने ते संबंधिताकडुन वसुल करावे.

2.खालील बाबींचा दर दरपृथ:करणाने ठरविण्यात आला आहे. सदर दरपृथ:करणासाठी महाराष्ट्र शासनाचे उद्यान विभागाच्या 11/12 या अर्थिक वर्षाची विभागीय दरसूची(DSR) वापरली आहे.

| बाब क्र. | तपशिल | चौ.मि. | दर/चौमि | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 3 | वाळु पुरविणे व पसरणे | 49.92 | 991.2 | 49480 |
| 4 | बाकडी पुरविणे | 5 नग | 37117/नग | 185587 |
| 6 | तयार लॉन पसरणे | 2400 | 424 | 1017600 |
| 7 | वाफे तयार करणे | 325 | 315 | 102406 |
| 8 | मोठी 300 झाडे लावणे | -- | 478/नग | 143400 |

महानगरपालिकेकडे उद्यान विभाग असल्याने लॉन विकसित करण्याचे व झाडे व फुलझाडे लावण्याचे काम त्यांचे कडुन करुन घेणे आवश्यक होते. परंतु सदर काम बांधकाम विभागाने केले आहे. उद्यान विभागाकडील कामाचे तांत्रिक ज्ञान या विभागाकडील कुशल अधिकारी कर्मचारी यांना असलेने झालेले काम योग्य पध्दतीने व प्राकलनाप्रमाणे झाले असलेबाबत उद्यान विभागाने प्रमाणित केलेनंतरच देयक पारित करणे आवश्यक होते. परंतु उद्यान विभागाचे काम योग्यरितीने पुर्ण झालेबाबतचे प्रमाणपत्र न घेताच कामाचे देयक आदा करणेत आले आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या उत्तरामध्ये उद्यान विभागाची मान्यता घेवुनच सक्षम एजन्सीची नेमणुक केली असल्याचे नमुद केले आहे. परंतु त्याबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नाहीत.

3.प्राकलनामध्ये कमीत कमी 2 मिटरची झाडे लावणे आवश्यक आहे. बाब क्र.8 ने लावण्यात आलेली झाडे कोणत्या जातीची, किती वयाची, कोठुन आणली याचा तपशील नस्तीमध्ये व देयकासोबत न घेताच देयक पारित केले आहे. तयार लॉन पसरणे या बाबीवर रु.1017600/- खर्च करण्यात आला आहे. सदर तयार लॉन कोणाकडून कोणत्या जातीचे खरेदी करण्यात आले त्याचा तपशील लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेला नाही. महानगरपालिकेकडे स्वतंत्र उद्यान विभाग असल्याने त्यांचेकडुन लॉन विकसित केले

| |
|---|
| नसल्याबाबतचा खुलासा केलेला नाही. तसेच ठेकेदाराने उद्यानासाठी वापरलेले साहित्य योग्य दर्जाचे असलेबाबत उद्यान विभागाने प्रमाणित करणे आवश्यक असता त्यांचेकडुन गुणवत्ता प्रमाणपत्र न घेताच देयक आदा करण्यात आले आहे.<br><br>4.प्राकलनामध्ये उद्योग उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार 1% कामगार कल्याण उपकराची तरतुद केली आहे. परंतु देयकातुन उपकर वसुल केला नसलेने रु.1495814/- च्या 1%प्रमाणे रु.14958/- ठेकेदाराकडुन वसुल करण्यात यावेत. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या उत्तरामध्ये उपकराची वसुली करण्याचे मान्य केले आहे. परंतु वसुली केलेली नसलेने रुपये 14958/- वसुलपात्र करण्यात येत आहेत.<br><br>5.विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.प्रविनी-2310/ साबावि / विमावसुली / अभि-3 दिनांक 08.09.2010 नुसार 0.50% विम्याची तरतुद विभागिय दरसुचीमध्ये केली जात नसलेने प्राकलन / पुर्वगणनपत्रक तयार करताना त्याची तरतुद करणे आवश्यक असता प्राकलनामध्ये विम्याची तरतुद केली नसलेने रु. 1495814/- च्या 0.50% प्रमाणे रु.7490/- चे विम्याचे नुकसान झाले आहे.<br><br>**वसुलपात्र रक्कम :-** वाळवी प्रतिबंधक उपाययोजनेवरील खर्च रु.220194/- + कामगार कल्याण उपकर रु.14958/- = रु. 235152/-<br>**आक्षेपाधिन रक्कम :-** रु.1260662/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 70 | 27/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |
|---|---|

| 36 | वॉर्ड क्रं.55 मधील समर्थ किराणा स्टोअर ते सिध्दार्थ परिसर रस्ते सिमेंट कॉंक्रीट करणे या कामातील अनियमिततेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 04 | सार्व.बांधकाम | राज्य शासन | 9ब | 04 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | 20876 | | |

प्राकलनामध्ये रॉयल्टी व कामगार कल्याण उपकराचा समावेश केला आहे. त्याप्रमाणे देयकामधुन रक्कम कपात करुन शासनाकडे भरणा करणे आवश्यक असता या रक्कमा कपात न करता ठेकेदारास आदा केल्याने शासनाचे रु.20876/- चे अर्थिक नुकसान झाले आहे.

वॉर्ड क्रं.55 मधील समर्थ किराणा स्टोअर ते सिध्दार्थ परिसर रस्ते सिमेंट कॉंक्रीट करणे हे काम राज्य शासनाकडुन दलित वस्ती सुधार योजनेसाठी मिळालेल्या निधीतुन केले आहे.

**प्रमाणक क्र. 321** **दि.21/03/13** **रक्कम रु.618199**

अंदाजपत्रकीय रक्कम रु.626100

प्रशासकीय मान्यता :आरआर/क्रमांक/नपा/आरआर/462 जिल्हाधिकारी कार्यालय सांगली,दि.27/7/2012

तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता यांचे कडील क्र.र.न.18 ते 31 दि.20/04/12

स्थायी समिती ठराव नं.243 दि.29/8/12 ने मंजुरी.

ठेकेदाराचे नाव :- लोकमान्य मजुर सह.सोसायटी.सांगली.

कार्यादेश :- क्र.484 दि.17/10/12. मुदत :- 90 दिवस. काम पुर्ण दि.5/1/2013.

मोजमाप पुस्तक क्र.18 पृष्ठ क्र. 44 ते 45

खालील आक्षेप घेणेत येत आहेत.

1)नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक विघयो-102000/1592/प्र.क्र.189/नवि-4 दि.5 मार्च 2002 मधील परी.7 मधील अ नुसार बांधकाम विषयक कामासाठीचे रेखांकन/नकाशे नगररचना विभागाने मंजुर केले आहेत. परंतु प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 नुसार सुसंगत असलेबाबत तसेच विकास योजनेमधील जमीन वापर व आरक्षणाबाबत सखोल छाननी करुन अहवाल देणे आवश्यक असता त्याप्रमाणे अहवाल दिलेला नाही. तसेच जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असले बाबतचा पुरावा सोबत जोडलेला नाही.

2)सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र सीए टी09/05/प्रक्र 381 इमारती-2 दिनांक 15.05.2007 नुसार निविदा फॉर्मची किंमत रु.1000/- लोकमान्य मजुर सह.सोसायटी.सांगली या ठेकेदाराकडुन वसुल करणे आवश्यक असता ती वसुल केलेली नाही.

| |
|---|
| 3)सिमेंट कॉंक्रीटचे कामासाठी खडी व वाळु 197.29 घ.मी. लागली आहे. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार ठेकेदाराने कामासाठी वापरलेल्या गौण खनिजापोटी रॉयल्टी शासनाकडे भरणे आवश्यक आहे व रॉयल्टी भरल्याच्या पुरावा देयकासोबत जोडणे आवश्यक आहे. तसा पुरावा ठेकेदाराने दिला नसतानाही रॉयल्टीची रक्कम ठेकेदारास आदा केल्याने 197.29 घ.मी. गौणखनिजाची रु.70.63 प्रती घनमिटर प्रमाणे रु.13942/- रॉयल्टीची रक्कम ठेकेदाराकडुन वसुल पात्र आहे.<br>4)प्राकलनामध्ये कामगार कल्याण उपकर 1% धरलेने देयकामधुन वसुल करणे आवश्यक होते. उद्योग उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्र. बीसीए- 2009 प्रक्र108/ कामगार 7 अ दिनांक 17 जून 2010 नुसार पुर्वगणनपत्रक रु.593414/- च्या 1%प्रमाणे रु.5934/- कामगार कल्याण उपकर वसुल पात्र आहे.<br>अर्धसमास ज्ञापन क्र.71 दि.14/07/14 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे उत्तर दि.30/07/14 रोजी दिले आहे. ज्ञापनास दिलेल्या उत्तरामध्ये ठेकेदाराकडुन रॉयल्टी व कामगार कल्याण उपकराची रक्कम वसुल करण्याचे मान्य केले आहे. परंतु रक्कम वसुल केलेली नाही.<br>वसुलपात्र रक्कम :- रॉयल्टी रु.13942/- + कामगार कल्याण उपकर रु. 5934/- + निविदा फॉर्म फी रु.1000 = रु.20876/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 71 | 14/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |

<table>
<tr><td>37</td><td colspan="5">वॉर्ड क्रं.55 मधील गटरीला पन्हाळी आरसीसी पाईप बसविणे या कामातील अनियमिततेबाबत.</td></tr>
<tr><td>योजना संकेतांक</td><td colspan="5">योजनेचे नाव</td></tr>
<tr><td></td><td colspan="5">नागरी दलित वस्ती सुधार योजना.</td></tr>
<tr><td>शाखा संकेतांक</td><td>लेखा शिर्ष</td><td>निधीचा स्त्रोत</td><td>कलम</td><td>अनियमिततांची संख्या</td><td>गुंतलेली रक्कम</td></tr>
</table>

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 04 | सार्व.बांधकाम | राज्य शासन | 9ब | 06 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 25130 | 4987 | | |

निविदा अटी/शर्ती मधील अट क्र.15 नुसार मंजुर कामामध्ये बदल किंवा वाढ करण्यास विभागप्रमुख यांच्या अगावु लेखी मंजुरीची आवश्यकता आहे. परंतु त्यांची लेखी पुर्वमंजुरी न घेताच सिमेंट कॉंक्रीटचे 6.66 घ.मी. काम जादा केलेने रु.3773.35 प्रती घ.मी. प्रमाणे रु.25130/- खर्च आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

वॉर्ड क्रं.55 मधील गटरीला पन्हाळी आरसीसी पाईप बसविणे हे काम राज्य शासनाकडुन दलित वस्ती सुधार योजनेसाठी मिळालेल्या निधीतुन केले आहे.

**प्रमाणक क्र. 297 दि.6/11/12 रक्कम रु.166170/-**

अंदाजपत्रकीय रक्कम रु.626100/-

प्रशासकीय मान्यता:-आरआर/क्रमांक/नपा/आरआर/462 जिल्हाधिकारी कार्यालय सांगली,दि.27/7/2012

तांत्रिक मान्यता:- शहर अभियंता यांचे कडील क्र.र.न.30 दि.20/04/12

स्थायी समिती ठराव नं.243 दि.29/8/12 ने मंजुरी.

ठेकेदाराचे नाव:- जयराज जालिंदर बर्गे,सुशिक्षित बेरोजगार अभियंता

कार्यादेश:-क्र.471 दि.20/9/12.

मुदत:-30 दिवस. काम पुर्ण दि.15/10/2013.

मोजमाप पुस्तक क्र.10 पृष्ठ क्र.54 ते 55

या कामाची नस्ती, मोजमाप पुस्तक व देयकाचे लेखापरीक्षण करुन अर्धसमास ज्ञापन क्रं.72 दि.14/7/14 रोजी निर्गमित केला असुन त्याचे अनुपालन बांधकाम विभागाने दि.30/7/14 रोजी दिले आहे. बांधकाम विभागाने दिलेल्या अनुपालनाचे अवलोकन करुन खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1) नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक विघयो-102000/1592/प्र.क्र.189/नवि-4 दि.5 मार्च 2002 मधील परी.7 मधील अ नुसार बांधकाम विषयक कामासाठीचे रेखांकन/नकाशे नगररचना विभागाने मंजुर केले आहेत परंतु प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 नुसार सुसंगत असलेबाबत तसेच विकास योजनेचा जमीन वापर व आरक्षणाबाबत सखोल छाननी करुन अहवाल शासन निर्णयाप्रमाणे देणे आवश्यक असता सदर जागेवर कोणतेही आरक्षण नसलेचा अहवाल नगररचना विभागाने दिलेला

नाही. जिल्हाधिकारी कार्यालय सांगली,नगरपालिका प्रशासन शाखा यांचे पत्र क्रमांक /नपा /आर आर / 462/2012 दि.27/07/2012 अन्वये देण्यात आलेल्या प्रशासकिय मान्यतेच्या आदेशामध्ये अट क्र. 3 नुसार प्रस्तावित केलेली कामे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या मालकीच्या /ताब्यात असलेल्या जमिनीवर घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असल्या बाबतचा कोणताही अनुषंगिक पुरावा सोबत जोडण्यात आलेला नाही.

2) पुर्वगणन पत्रकामधील बाब क्र.1 नुसार 12 इंची हाफ राउंड गटरचे काम 120 रनिंग मिटर व 9 इंची हाफ राउंड गटरचे काम 380 रनिंग मिटर व 1:2:4 सिमेंट कॉंक्रीटचे काम 13.600 घमी करणेचे नमुद आहे. परंतु मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणी केली असता 12 इंची हाफ राउंड गटरचे काम 44 रनिंग मिटर व 9 इंची हाफ राउंड गटरचे काम 346 रनिंग मिटर व 1:2:4 सिमेंट कॉंक्रीटचे काम 20.26 घमी केलेले आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 165 नुसार तपशीलवार अंदाज तयार करण्याअगोदर जागेच्या संबधात स्थानिक निरीक्षण करणे आवश्यक आहे. परंतु ते केले नसलेने बाबवार कामाच्या परिमाणामध्ये वाढ/घट झालेचे स्पष्ट होते.

3)1:2:4 सिमेंट कॉंक्रीटचे काम 13.600 घमी ऐवजी 20.26 घमी केलेले आहे. सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम 227 (24) कामाच्या अतिरिक्त बाबी पार पाडणे कार्यकारी अभियंता यांना प्रत्येक अतिरिक्त बाबींसाठी रुपये 10,000/- या प्रमाणे वाढ करण्याचे अधिकार आहेत. एका अतिरिक्त बाबीचा खर्च रुपये 10,000/- पेक्षा जास्त होता कामा नये. खर्च जादा झालेस सुधारीत तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे. सिमेंट कॉंक्रीटचे काम जादा झालेने 6.66 घ.मी. x रु.3773.35 प्रती घ.मी. प्रमाणे रु.25130/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या उत्तरामध्ये जागेवरील परिस्थितीनुसार कामामध्ये वाढ किंवा घट करण्याचा अधिकार शहर अभियंता यांना असल्याने त्याप्रमाणे कार्यवाही केलेचे नमुद आहे. परंतु निविदा अटी/शर्ती मधील अट क्र.15 नुसार मंजुर कामामध्ये बदल किंवा वाढ करण्यास विभागप्रमुख यांच्या अगावु लेखी मंजुरीची आवश्यकता आहे. विभागप्रमुख व आयुक्तांची लेखी पुर्वमंजुरी न घेताच काम केलेले आहे.

तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण सात संविदा कलम 73(अ) अन्वये महानगरपालिकेच्यावतीने संविदा करणेचा अधिकार आयुक्त यांना असलेने त्यांची प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असता ती घेणेत आलेली नाही.

4) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र सीए टी09/05/प्रक्र 381 इमारती-2 दिनांक 15.05.2007 नुसार फॉर्मची किंमत रु.500/- वसुल केलेली नाही.

5) सिमेंट कॉंक्रीटचे कामासाठी खडी व वाळु 40 घ.मी. लागली असलेने महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रु.70.67 प्रती घनमिटर प्रमाणे रु.2826/- रॉयल्टी वसुल पात्र आहे.

| |
|---|
| 6) प्राकलनामध्ये कामगार कल्याण उपकर 1% धरलेने देयकामधुन वसुल करणे आवश्यक होते. उद्योग उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार पुर्वगणनपत्रक रु.166170/- च्या 1% प्रमाणे रु.1661/- कामगार कल्याण उपकर वसुलपात्र आहे.<br>अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या उत्तरामध्ये ठेकेदाराकडुन रॉयल्टी व कामगार कल्याण उपकराची रक्कम वसुल करण्याचे मान्य केले आहे. परंतु रक्कम वसुल करुन लेखापरीक्षणास अनुपालन सादर केले नाही.<br>**आक्षेपाधिन रक्कम:-** रु.25130/-<br>**वसुलपात्र रक्कम:-** रॉयल्टी रु.2826/- + कामगार कल्याण उपकर रु.1661/- = रु.4987/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 72 | 14/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |
|---|---|

| 38 | जॅकवेल ते माळबंगला जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत 1219 मी.मी. व्यासाची अशुध्द पाणी दाब नलीका टाकणे या कामातील अनियमिततेबाबत | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमितताांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 06 | पाणी पुरवठा | केंद्र, राज्य व मनपा | 9ड | 05 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 3468918 | | | |

| |
|---|
| कामाची नस्ती व मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता दाबनलीका रेल्वे लाईन, राज्य महामार्गा खालुन क्रॉसिंग करणे ही बाब अंदाजपत्रकामध्ये समाविष्ठ नसल्याने अतिरीक्त करण्यात आली असून |

त्यावर रु.7331823-/ इतका खर्च करण्यात आला आहे. नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 165 नुसार **कामाचे अंतिम तपशीलवार अंदाज** तयार करण्याअगोदर जागेबाबत स्थानिक निरीक्षण करणे आवश्यक असता त्याप्रमाणे जागेचे स्थानिक निरीक्षण केले नसल्याने सदर बाब अतिरिक्त करण्यात आल्याचे दिसुन येते.

प्रशासकीय मान्यता :-No.DMA/ UIDSSMT -letters 2006 / CR-264/4 Director of municipal Administration Dt. 28/09/2006 (2nd meeting of the state level sanctioning committee)

तांत्रिक मान्यता : मुख्य अभियंता, पुणे : ताशा-3/सांगली/पापुयो/ दि.25/11/2005

महासभा ठराव क्र. 50 दि. 30/7/2006 ते UIDSSMT योजना राबविणेस मंजूरी मिळाली आहे.

महासभा ठराव क्र. 193 दि. 10/1/2011 अन्वएये योजनेमध्ये अस्तित्वातील जॅकवेल उदभव धरुन योजनेच्या तांत्रिक बदलास मान्यता दिली आहे. नवीन तांत्रिक बदलास जा.क्र. मुख्य अभियंता तांशा 3/सांगली /पापुयो/ तांत्रिक बदल /3577 दि. 22/10/2010 ने मान्यता दिली असून, त्यामधून जॅकवेल ते माळबंगला जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत 1219 मी.मी. व्यासाची अशुध्द पाणी दाब नलीका टाकणे हे काम करणेत आले आहे.

योजनेच्या तांत्रिक बदल प्रस्तावास नगर विकास विभाग नवी दिल्ली व CPHEEO यांनी दि. 14/12/2011 रोजी मान्यता देणेत आली आहे. उपरोक्त कामामध्ये 1400 मि.मि. एम.एस. पाईप ऐवजी 1219 मी.मी. एम.एस. पाईप 3.5 कि.मी. टाकणे असा तांत्रिक बदल करणेत आलेने अंदाजपत्रकीय रक्कम रुपये 6,08,57,379/- चे नवीन एस्टीमेट तयार करुन दि. 10/3/2009 चे दै. सकाळ, टाईम्स ऑफ इंडीया, पुणे आवृत्ती व दै. ललकार, सांगली आवृत्तीमध्ये निविदा प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार एकूण 3 निविदा प्राप्त झाल्या असून, सुरेंद्र इंजिनिअरींग, मुंबई यांची 35.50% जादाची निविदा र.रु. 8,24,61,748/- ची मंजूर करणेत आली आहे. सन 2008-09 चे चालू दरसूचीनुसार प्राकलन किंमत रु. 10,84,41,732/- होत असून या दरसूचीशी निविदा दराची तुलना करता रु. 23.95% कमीचा देकार आलेला आहे. 2011-12 या अर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणावेळी या कामाची निविदा प्रक्रिया व धावती देयके तपासली असुन त्याबाबतचे आक्षेप परिच्छेद क्रमांक 28 मध्ये घेण्यात आले आहेत. 2012-13 या अर्थिक वर्षात या कामाचे 1 धावते देयक खर्च पडलेले आहे.

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | मो.पु.क्र/पान क्र. |
|---|---|---|---|

04 31/08/12 3468918 01/66ते 80

सदर देयकाची व मोजमाप पुस्तकाची तपासणी केली असता या धावत्या देयकाअखेर कामावर रु.79071314/- रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 35.35 टक्के जादाने आली असल्याने या एकुण खर्चापैकी रु.58419885/- शासन निधीमधून व रु.20651429/- महानगरपालिका निधी मधून करणे आवश्यक होते. सदर कामासाठी महानगरपालिकेने स्वनिधीमधुन रु.45200000/- ची तरतुद केली आहे. त्यामधुन रु.37303134/- ची देयके खर्ची टाकण्यात आली आहेत. व त्यानंतरची देयके UIDSSMT योजनेमधुन खर्च करण्यात आली आहेत.

कामाची नस्ती, बी -1 टेंडर, मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.130 दि.16/9/2014 रोजी निर्गमित करण्यात आला होता. परंतु अर्धसमास ज्ञापनाचे पाणीपुरवठा विभागाने अनुपालन सादर केलेले नाही. या कामाबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)पाणीपुरवठा विभागाने ठेकेदारास जा.क्र.शि.न.13/19/2009-10 दि.03/8/2009 ने कार्यादेश दिला असून कामाची मुदत 12 महिने दिली आहे. काम वेळेत पुर्ण होत नसल्याने प्रशासनाने मुदत ऑगष्ट 2010 ला संपल्यानंतर 29 नोव्हे.2010 रोजी मुदतवाढीचा प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठविला आहे व स्थायी समितीने ठराव क्र.395 दि.7 /12/10 ने जाने 2011 पर्यंत ठेकेदाराच्या लेखी मागणीनुसार मुदतवाढ दिली आहे. काम अपुर्ण असल्याने ठेकेदाराने पुन्हा मुदतवाढीचा प्रस्ताव पाणीपुरवठा विभागाकडे दि.8/7/11 रोजी कामाची मुदत संपल्यानंतर 7 महिने विलंबाने पाठविला आहे व त्यामध्ये रेल्वेकडून रेल्वे लाईन खालुन पाईप घालणेसाठी परवानगी मिळाली नसल्याने कामास मुदतवाढ मागितली आहे. उपायुक्त पाणीपुरवठा विभागाचे प्रस्तावानुसार स्थायी समितीने ठराव क्र.339 दि.11/10/11 ने ठेकेदारास ऑक्टो.2011 पर्यंत मुदतवाढ दिली आहे. कामाच्या नस्तीची तपासणी केली असता याकामी मध्य रेल्वे प्र (कार्ये) पुणे दि. 12/1/2010 Ref No. PA/W/SDE MTP/DB/360 & 361 ने 1200 एमएम, एम.एस. पाईप वरील कव्हरसाठी 1700 एमएम, 22 एमएम जाडीची पाईप वापरणेस परवानगी दिली आहे व प्रत्यक्षात काम ठेकेदाराने दि. 16/5/2011 रोजी सुरु करुन दि. 22/8/2011 रोजी पूर्ण केले आहे. रेल्वेकडुन दि.12/01/2010 रोजी परवानगी मिळाल्यानंतर ठेकेदाराने काम दि. 16/5/2011 रोजी म्हणजे दिड वर्ष विलंबाने सुरु केल्याने काम पुर्ण होण्यास विलंब लागला असल्याचे स्पष्ट होते. ठेकेदाराने काम विलंबाने सुरु केलेने या विलंबाबाबत तसेच काम पुर्ण करणेबाबत पाणीपुरवठा विभागाने ठेकेदारास समज देणे आवश्यक असता त्या देण्यात आल्या नसून त्याबाबत पाणीपुरवठा विभागाने खुलासा केलेला नाही. मुदतीत काम पुर्ण करुन घेण्याची जबाबदारी पाणीपुरवठा विभागाची असल्याने व ठेकेदाराने काम वेळेत पुर्ण केले नाही तर त्यास स्विकृत निविदा अटी शर्तीमधील क्लॉज 2 नुसार निविदा किमतीच्या 1 टक्के प्रमाणे दंड आकारणी करणे आवश्यक असता त्याप्रमाणे दंड आकारणी न करता सात महिने विलंबाने

ठेकेदाराने केलेला मुदतवाढीचा अर्ज पाणीपुरवठा विभागाने मान्य केला आहे.

2)नस्ती व मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता पाईपचे रेल्वे लाईन, राज्य महामार्गा खालुन क्रॉसिंग करणे ह्या रु.7331823/- च्या अतिरीक्त बाबी करण्यात आल्या आहेत. सदर काम DPR चे वेळी अंदाजपत्रकात समाविष्ठ करुन काम सुरु होणेपुर्वी आवश्यक त्या परवानगी घेवून करणे आपेक्षित असता सदर कामाचा समावेश नंतर करणेत येऊन टेंडर न काढताच स्विकृत निविदा धारकाकडून काम करणेत आले आहे. अर्धसमास पत्रास दिलेल्या उत्तरामध्ये काम वेळेची बचत करणेसाठी तसेच कमीत कमी खर्च होणेचे दृष्टीने वेगळे टेंडर न काढता काम स्विकृत निविदा धारकाकडून काम केलेचे नमुद आहे. नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 165 नुसार कामाचे अंतिम तपशीलवार अंदाज तयार करण्याअगोदर जागेबाबत स्थानिक निरीक्षण करणे आवश्यक असता त्याप्रमाणे जागेचे निरीक्षण करुन वरील बाबींचा DPR मध्ये समावेश करुन काम न केल्याने योजना पुर्ण होण्यास विलंब लागत असल्याचे दिसुन येते.

3)या कामाचे देयक दि.13/2/12 रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडुन तयार करुन पाणीपुरवठा विभागाकडे पाठविले आहे व पाणीपुरवठा विभागाने महानगरपालिकेच्या नमुन्यामध्ये दि.21/5/12 रोजी तयार करुन लेखा विभागाकडे पाठविले असून देयकाचे प्रदान दि.31/8/12 रोजी लेखा विभागाने केले आहे. देयक आदा करण्यास पाच महिन्याचा विलंब झाला आहे.

4)सदर काम दि.31/10/11 रोजी पूर्ण झालेचे मोजमाप पुस्तिकेमध्ये तसेच देयकामध्ये नमुद आहे. परंतु काम पुर्ण झाल्याबाबतचा पुर्णत्वाचा दाखला कार्यकारी अभियंता यांनी दि.03/8/12 रोजी एक वर्ष विलंबाने दिला आहे. विलंबाबाबतचा खुलासा पाणीपुरवठा विभागाने अनुपालनामध्ये केलेला नाही.

5)निविदा अटी शर्तीनुसार ठेकेदाराबरोबर महानगरपालिकेने दि.28/7/09 रोजी मुद्रांक शुल्कावर केलेल्या करारानुसार सुरक्षा अनामत पोटी रु.1217148/- च्या स्टेट बँक ऑफ इंडिया, नौपाडा, ठाणे या बँकेची एक वर्ष मुदतीची मुदत ठेव पावती क्र.30833901415 जोडली आहे. पावतीची मुदत दि.23/07/2010 पर्यंत असल्याने व कामास दि.31/10/11 पर्यंत मुदतवाढ दिल्याने ठेवीची मुदत वाढविणे आवश्यक असता ती वाढविण्यात आलेली नाही. तसेच ठेवीची नोंद लेखा शाखेने अनामत नोंदवही मध्ये कोणत्या पृष्ठावर केली आहे याचा खुलासा केला नसल्याने अनामत लेखाशिर्षाखाली या ठेवीची नोंद होवुन रक्कम लेख्यामध्ये समाविष्ठ आहे किंवा नाही याची पडताळणी करता आलेली नाही. सुरक्षा अनामत पोटी ICICI बँकेची ठेवपावती क्रं.4300389 ने रु.304300/- मुदत दि.10/5/10 व ठेवपावती क्रं.3850875 ने रु.127786/- मुदत दि.31/7/10 ने ठेवली आहे. कामास मुदतवाढ दिल्याने ठेवपावतींची मुदत वाढविणे आवश्यक होते. परंतु ठेवपावतीची मुदत वाढविलेची कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नाहीत.

| |
|---|
| अर्धसमास ज्ञापन क्र.130 दि.16/9/14 रोजी निर्गमित केला आहे. परंतु त्याचे अनुपालन पाणी पुरवठा विभागाने सादर केलेले नाही.<br><br>आक्षेपाधिन रक्कम रु. 3468918/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 130 | 16/09/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |
|---|---|

| 39 | वैद्यकिय केंद्रासाठी ॲलोपथी औषधे, सर्जीकल साहित्य खरेदी करणे कामातील अनियमिततेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 12 | आरोग्य | मनपा | 9ड | 06 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

| |
|---|
| उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखसं-1094/2679/ उद्योग/6 दि.30 मार्च 1994 मधील परिच्छेद 1.9 तांत्रिक लिफाफा उघडलेनंतर आणि किमान तीन ग्राहय निविदा प्राप्त झालेल्या असतील तरच त्यांचे व्यापारी लिफाफे उघडणेत यावेत. तसेच परिच्छेद 1.10 नुसार अल्प प्रतिसादामुळे नियमाप्रमाणे निविदा चौकशीस दोनवेळा मुदतवाढ देणे आवश्यक असता 85 आयटम साठी 2 दरपत्रके , 162 आयटमसाठी 01 एक दरपत्रक प्राप्त झाले असता मुदत वाढ न देता ज्या पुरवठादाराने निविदा भरली आहे त्यांनाच निविदा भरलेल्या दराने काम देण्यात आले आहे. |

स्थायी समिती सभा क्र.09 ठराव क्र.136 दि.17/07/12 अन्वये औषध खरेदीची निविदा रितसर जाहिरात देवुन मागविणे व रु.5 लाखापर्यंतची औषधे तातडीने आवश्यक असल्याने मागील वर्ष 2011-12 चे मंजुर पुरवठादार श्री.व्यंकटेश्वरा डिस्ट्रिब्युटर्स यांचे कडुन खरेदी करणेस मान्यता दिली आहे.

निविदा दिनांक 04/08/12 रोजी दैनिक केसरी या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली असुन निविदा भरणेची मुदत दि.16/08/12 पर्यंत होती. निविदा दिनांक 17/08/12 रोजी उघडण्यात आल्या असुन व्यंकटेश्वरा डिस्ट्रिब्युटर्स,सांगली, विशाल एंटरप्राइझेस,कोल्हापुर, ऑस्टीन हेल्थकेअर. पुणे अशा एकुण तीन निविदा 397 आयटमसाठी प्राप्त झाल्या आहेत.

नस्तीमधील पान क्र.511 ते 543 वर निविदेमध्ये आलेल्या औषधांचे दरांचे तुलनात्मक दरपत्रक तयार केले असुन त्यानुसार 114 आयटमसाठी 3 दरपत्रके, 85 आयटमसाठी 2 दरपत्रके , 162 आयटमसाठी 01 एक दरपत्रक प्राप्त झाले आहे व 36 आयटमसाठी एकही दरपत्रक प्राप्त झालेले नाही. आयुक्त निर्णय क्र.508 दि.30/10/12 नुसार स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 ड (क) चे परंतु 7 अन्वये आयुक्त यांना रु. 25 लाखापर्यंतचे खरेदीचे अधिकार असल्याने त्या मर्यादेपर्यंत व्यंकटेश्वरा डिस्ट्रिब्युटर्स सांगली यांचेकडुन 274 आयटम, विशाल एंटरप्राइझेस, कोल्हापुर यांचेकडुन 50 आयटम, ऑस्टीन हेल्थ केअर. पुणे यांचेकडुन 37 आयटम असे एकुण 361 आयटम साहित्य खरेदी करणेचा निर्णय झाला आहे.

**प्रमाणक क्र.5313 दि.29/12/2012 रु.78424/-.**

**प्रमाणक क्र.5314 दि.29/12/2012 रु.28600/-.**

अंदाजपत्रकीय रक्कम रु. 3100000/-

निविदा रक्कम रु.3100000/-

प्रशासकीय मान्यता :- आयुक्त निर्णय क्रमांक 508 दि.30/10/12

औषध खरेदीची नस्ती,निविदा प्रक्रीया, करारपत्र तपासून अर्धसमास ज्ञापन क्र.77 दि.15/07/14 रोजी निर्गमित केला असुन आरोग्य विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले नाही. खरेदीप्रक्रीयेबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखसं-1094/2679/ उद्योग/6 दि.30 मार्च1994 मधील परिच्छेद 1.9 तांत्रिक लिफाफा उघडलेनंतर आणि किमान तीन ग्राहय निविदा प्राप्त झालेल्या असतील तरच त्यांचे व्यापारी लिफाफे उघडणेत यावेत. तसेच परिच्छेद 1.10 नुसार अल्प

प्रतिसादामुळे नियमाप्रमाणे निविदा चौकशीस दोन वेळा मुदतवाढ देणे आवश्यक असता 85 आयटमसाठी 2 दरपत्रके , 162 आयटमसाठी 01 एक दरपत्रक प्राप्त झाले असता मुदत वाढ न देता ज्या पुरवठादाराने निविदा भरली आहे त्यांनाच निविदा भरलेल्या दरानेच काम देण्यात आले आहे. व्यंकटेश्वरा डिस्ट्रिब्युटर्स सांगली यांनी एकुण 158 आयटमसाठी एकट्यानेच दर भरले आहेत. सदर आयटमसाठी तीन दर प्राप्त नसतानाही त्यांनाच कार्यादेश देण्यात आला आहे. तसेच ऑस्टीन हेल्थकेअर पुणे यांना 18 आयटम साठी दोन दरपत्रके प्राप्त असतानाही कार्यादेश देण्यात आला आहे. फेरनिविदा न काढल्याने महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळाला नसल्याचे स्पष्ट होते.

2)स्थायी समिती सभा क्र.09 ठराव क्र.136 दि.17/07/12 अन्वये रु. 5 लाखापर्यंतची औषधे तातडीने आवश्यक असल्याने मागील वर्ष 2011-12 चे मंजुर पुरवठादार श्री.व्यंकटेश्वरा डिस्ट्रिब्युटर्स यांचे कडुन 38 आयटम मागील दराने खरेदी करणेस मान्यता दिली आहे व त्याप्रमाणे पुरवठादाराने दि.30/07/2012 ते 17/12/2012 पर्यंत औषधे पुरविल्याची नोंद नस्तीमध्ये आहे. औषध खरेदी डिसेंबर 2012 पर्यंत केली असल्याने सदर औषधे तातडीने आवश्यक नसल्याचे दिसून येते. उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखसं-1093/2635/ उद्योग/6 दि.16 जुलै 1993 नुसार 50 हजाराचे वरील कामाची खरेदीची निविदा मागविली नसल्याने व महानगरपालिकेने 2011-12 या आर्थिक वर्षातील ठेकेदाराकडून मागील दराने साहित्य खरेदी केल्याने स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही.

3)वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांनी पुरवठादाराबरोबर केलेल्या रु.100 चे मुंद्राकावर करार केलेची तारीख नमुद नाही. परंतु पुरवठादाराने सुरक्षा अनामत रु.79978/- सामान्य पावती क्र.36477 दि.21/2/13 ने भरणा केलेची नोंद करारपत्रामध्ये केली आहे. यावरुन औषधे पुरविल्यानंतर पुरवठादाराबरोबर करारपत्र करण्यात आले आहे. उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखसं-1088/2512/ उद्योग/6 दि. 2 जाने.1992 मधील परिशिष्ट 12 नुसार सुरक्षा अनामत व करारपत्र या बाबी पूर्ण केल्या खेरीज पुरवठादारास अंतिम मागणी आदेश देण्यात येवु नये असे नमूद असताना महानगरपालिकेने पुरवठादारास आगोदर पुरवठा आदेश दिला आहे व त्यानंतर करारपत्र केले आहे. स्थायी समितीचा ठराव दि.17/7/12 रोजी झाल्यानंतर ठेकेदाराने दि.21/2/13 रोजी 5 महिने विलंबाने सुरक्षा अनामत भरली आहे. तसेच तातडीने खरेदी करण्यात येणाऱ्या औषधांची यादी दवाखान्याकडून मागविण्यात आलेली नाही. पुरवठादाराला तातडीने खरेदी करण्यात येणार असलेल्या औषधांचे मागणीपत्र देणे आवश्यक असता ते दिल्याचे नस्तीमध्ये दिसुन येत नाही. औषधे रितसर टेंडर काढुन खरेदी केली नसलेने महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळाला नसल्याचे स्पष्ट होते.

4)आयुक्त निर्णय क्र.508 दि.30/12/12 अन्वये श्री.व्यंकटेश्वरा डिस्ट्रिब्युटर्स यांचे कडुन मंजुर यादीनुसार 274 आयटमसाठी वार्षिक दरकरार करुन जरुरीनुसार औषध खरेदीस व खर्चास मंजुरी मिळाली आहे. वरील वार्षिक दरकरारानुसार पहिल्या टप्प्यातील 111 आयटम खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या रु.1599746/- खर्चास मान्यता झाली आहे. त्यानुसार 5 टक्केप्रमाणे सुरक्षा अनामत रु.79978/- सामान्य पावती क्र.36477 दि.21/2/13 ने भरणा केलेची नोंद 2012-13 चे खरेदीसाठी पुरवठादाराबरोबर केलेल्या करारपत्रामध्ये आहे. याच पावतीद्वारे तातडीच्या औषध खरेदीचीही सुरक्षा अनामत भरणा केली आहे. त्यामुळे सुरक्षा अनामत विलंबाने भरणा केलेचे स्पष्ट होते.

5)औषध खरेदीची निविदा दिनांक 04/08/12 रोजी दैनिक केसरी या वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द करण्यात

| |
|---|
| आली आहे व निविदेची अंदाजित किंमत रु.3100000/- नमुद केली आहे. परंतु निविदेमध्ये तसेच पुरवठादाराबरोबर करार करताना दरकरारानुसार घेण्यात येणाऱ्या औषधांचे परिमाण निश्चित केले नसल्याने प्रत्येक पुरवठादाराकडुन वर्षभर किती औषधे खरेदी करण्यात येणार आहेत याची निश्चित संख्या समजुन येत नाही.<br>6)निविदा अटी व शर्ती मधील क्र.8 नुसार औषध वापरण्यास योग्य असलेबाबतचा प्रयोगशाळेचा गुणवत्ता अहवाल प्राप्त झालेनंतरच देयक आदा करण्याची तरतुद आहे. परंतु प्रयोगशाळा गुणवत्ता अहवाल लेखापरीक्षणास दाखविण्यात आला नसल्याने औषध योग्य गुणवत्तेची असल्याची तसेच गुणवत्ता अहवाल आलेनंतरच देयक प्रशासनाने पारित केलेची खात्री करता आलेली नाही. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 77 | 15/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |

| 40 | श्वान प्रतिबंधक लस खरेदी करणे कामातील अनियमितते बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 12 | आरोग्य | मनपा | 9ब | 04 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 1223552 | 21170 | | |

| |
|---|
| उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखसं-1088/2512/ उद्योग/6 दि. 2 जाने, 1992 मधील परिच्छेद क्रं.7 नुसार खरेदीचे दरकरार 1 मे पुर्वी करणे आवश्यक असता दर करार नोव्हेंबर महिन्यामध्ये 5 महिने विलंबाने केले आहेत. दरकरार वेळेत केला नसलेने मागील वर्षाचे पुरवठादार मे.विशाल एजन्सी कडून रु. 2 लाखाची खरेदी 730 व्हायल X रु. 373/- प्रती व्हायलप्रमाणे करणेस आयुक्त निर्णय क्र.52 दि.02/07/12 ने मान्यता झाली आहे. दरकरार विहित वेळेत केले नसल्याने व |

2012-13 या वर्षात श्वानदंश लसीचा दर मागील वर्षापेक्षा रु.29/- ने कमी आला असल्याने प्रती व्हायल रु.29/- जादा दराने लस खरेदी केल्याने महानगरपालिकेचे रु.21170/- चे आर्थिक नुकसान झाले.

श्वान प्रतिबंधक लस खरेदीची निविदा रितसर जाहिरात देवुन व इ टेंडर सेलद्वारे मागविणेस आयुक्त निर्णय क्रमांक 52 दि.2/07/12 चे मान्यतेनुसार मान्यता झाली आहे.

निविदा दिनांक 07/07/12 रोजी दैनिक तरुण भारत या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली असुन निविदा भरणेची मुदत दि.17/07/12 पर्यंत होती. टेंडर अटी शर्ती नुसार तीन निविदा प्राप्त झाल्या नसल्याने वर्तमानपत्र व इ टेंडरद्वारे मुदतवाढ देण्यात आली असता प्रथम दोन उक्त आलेल्या निविदाच कायम आहेत. दिनांक 05/08/12 ते दि.16/08/12 अशी पहीली मुदतवाढ नोटीस प्रसिध्द केली असता आणखी एक निविदा दाखल झाल्याने एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. व्यंकटेश्वरा डिस्ट्रिब्युटर्स, सांगली, विशाल एंटरप्राइझेस,कोल्हापुर व ऑस्टीन हेल्थकेअर.पुणे यांचे निविदा दराचे लखोटे दि.29/08/12 रोजी उघडले असता व्यंकटेश्वरा डिस्ट्रिब्युटर्स,सांगली यांचा रु.244/- प्रती व्हायल दर सर्वात कमीचा असून मागील वर्षाचा खरेदी दर रु.273/- दरापेक्षा रु.29/- ने कमी आहे.

**प्रमाणक दाखविलेले नाहीत.**

अंदाजपत्रकीय रक्कम रु.2000000/-

लेखाशीर्ष :- 032 क इतर दवाखाने -054-बी-1699 ॲन्टीरेबीज ट्रिटमेंट लस खरेदी करणे

निविदा रक्कम रु.2000000/-

प्रशासकीय मान्यता :- आयुक्त निर्णय क्रमांक 462 दि.28/09/12

औषध खरेदीची नस्ती,निविदा प्रक्रीया, करारपत्र तपासून अर्धसमास ज्ञापन क्र.78 दि.15/07/14 रोजी निर्गमित केला असुन आरोग्य विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले नाही. खरेदीप्रक्रीयेबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखसं-1088/2512/ उद्योग/6 दि .2 जाने , 1992 मधील परिच्छेद क्रं.7 नुसार खरेदीचे दरकरार 1 मे पुर्वी करणे आवश्यक असता दर करार नोव्हेंबर महिन्यामध्ये 5 महिने विलंबाने केले आहेत. दरकरार वेळेत केला नसलेने मागील वर्षाचे पुरवठादार मे.विशाल एजन्सी कडून रु. 2 लाखाची खरेदी 730 व्हायल X रु. 373/- प्रती व्हायलप्रमाणे करणेस आयुक्त निर्णय क्र.52 दि.02/07/12 ने मान्यता झाली आहे. दरकरार विहित वेळेत केले नसल्याने व 2012-13 या वर्षात श्वानदंश लस प्रती व्हायल रु.29/-जादा दराने खरेदी करावी लागल्याने

महानगरपालिकेचे रु.21170/- चे आर्थिक नुकसान झालेने ते संबंधीतावर जबाबदारी निश्चित करुन वसुल करावे.

2) आरोग्य अधिकारी यांनी जा.क्र.मनपा/आरोवि/6/1/406/12-13 दि. 05/10/12 ने व्यंकटेश्वरा डिस्ट्रीब्युटर्स यांना रु.400 चे स्टँपपेपरवर करारपत्र करणेस व सुरक्षा अनामत रु.64575/- भरुन सदरची लस 15 दिवसाचे मुदतीत पुरविणेची वर्कऑर्डर दिली आहे व पुरवठादाराने सर्वसाधारण पावती क्र.36443 दि.18/01/13 ने रक्कम रु.64575 रोखीने भरणा केली आहे. उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखसं-1088/2512/ उद्योग/6 दि.02 जाने,1992 मधील परिशिष्ट 12 नुसार सुरक्षा अनामत व करारपत्र या बाबी पूर्ण केल्या खेरीज अंतिम मागणी आदेश देण्यात येवु नयेत असे नमुद असतानाही पुरवठादाराने दि.19/10/12 ते दि.03/11/12 या कालावधीत एकुण सहा डिलिव्हरी चलनाने 2293 व्हायलचा पुरवठा केल्याचे नस्तीमधील व्यंकटेश्वरा डिस्ट्रिब्युटर्स, सांगली यांचे इन्व्हाईस नं.171 दि.03/11/12 मध्ये नमुद आहे. करारपत्र व सुरक्षा अनामत दि.18/01/2013 अन्वये केले असून लस करारपत्र करण्याच्या आगोदर दि. 19/10/12 ते दि.03/11/12 या कालावधीत ठेकेदाराने पुरविली असल्याने करारपत्र न करताच वर्क ऑर्डर दिल्याचे स्पष्ट होते.

3)आरोग्य अधिकारी यांनी जा.क्र.मनपा/आरोवि/6/1/773/12-13 दि.04/03/13 ने व्यंकटेश्वरा डिस्ट्रीब्युटर्स यांना 3000 व्हायल पुरविण्याची वर्क ऑर्डर दिली आहे व पुरवठादाराने दि.05/03/13 ते दि.23/05/13 या कालावधीत तीन डिलिव्हरी चलनाने एकुण 883 व्हायलचा पुरवठा केल्याचे नस्तीमधील व्यंकटेश्वरा डिस्ट्रिब्युटर्स, सांगली यांचे इन्व्हाईस नं.262 दि.23/05/13 मध्ये नमुद आहे. औषधाची कंपनीकडे कमतरता असल्याने उर्वरित 2117 व्हायलचा पुरवठा मुदतीत करु शकत नसल्याचे पत्र वैद्यकीय अधिकाऱ्यांना पुरवठादाराने दि.25/03/13 रोजी दिले आहे. पुरवठादाराने शिल्लक औषधांचा पुरवठा कधी केला आहे व नियमानुसार दंडाची आकारणी किती केली याची माहिती लेखापरीक्षणास देण्यात आलेली नाही.

4)निविदेमधील अटी व शर्ती क्र.8 नुसार औषध वापरण्यास योग्य असलेबाबतचा प्रयोगशाळेचा गुणवत्ता अहवाल दिल्यानंतरच पुरवठादारास देयक आदा करण्याची तरतुद आहे. परंतु प्रयोगशाळा गुणवत्ता अहवाल लेखापरीक्षणास दाखविण्यात आला नसल्याने औषध योग्य गुणवत्तेची असल्याची तसेच गुणवत्ता अहवाल आलेनंतरच देयक प्रशासनाने पारित केलेची खात्री करता आलेली नाही. महानगरपालिकेचे 2013-14 चे सुधारित व 2014-15 या अर्थिक वर्षासाठी आयुक्त यांनी तयार केलेल्या अंदाजपत्रकामध्ये 2012-13 या आर्थिक वर्षात श्वानदंश प्रतिबंधक लसीवर एकुण रु.1244722/- खर्च झालेचे नमुद आहे.

**आक्षेपाधिन रक्कम :-** रु.1223552/-

**वसुलपात्र रक्कम :-** रु.21170/-

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 78 | 15/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |
|---|---|

| 41 | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अधिनियम 1952 नुसार निधीची रक्कम भरणा केली नसलेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 02 | सामान्य प्रशासन | मनपा | 9अ | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | 10455421 | | |

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अधिनियम 1952 मधील तरतुदी व कर्मचारी निवृत्ती वेतन योजना 1995 चा परिच्छेद 38 नुसार तसेच कर्मचारी डिपॉझिट लिंक्ड इन्श्युरन्स स्किम 1976 मधील परिच्छेद 9 (1) नुसार महानगरपालिका क्षेत्र कार्यालयामध्ये मानधनावर, ठेकापध्दतीने, रोजंदारीवर कार्यरत असलेल्या कर्मचा-याना भविष्य निर्वाह निधी योजना दि.08/1/2011 पासुन लागु करण्यात आलेली आहे. त्यानुसार जानेवारी 2011 ते एप्रिल 14 अखेर महानगरपालिकेने कर्मचा-यांचे वेतनामधुन रु.4899065/- व स्वहिस्सारु.5556356/- अशी एकुण रक्कम रु.10455421/- कपात करुन भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये भरणा केलेली नाही.

मा.आयुक्त केद्रीय कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटन, नवी दिल्ली यांचे दि.11/02/11 चे नोटीफिकेशननुसार व कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अधिनियम 1952 मधील तरतुदी व कर्मचारी निवृत्ती वेतन योजना 1995 चा परिच्छेद 38 नुसार तसेच कर्मचारी डिपॉझिट लिंक्ड इन्श्युरन्स स्किम 1976 मधील परिच्छेद 9 (1) नुसार महानगरपालिका क्षेत्र कार्यालयामध्ये मानधनावर, ठेकापध्दतीने, रोजंदारीवर कार्यरत असलेल्या कर्मचा-याना भविष्य निर्वाह निधी योजना दि.08/1/2011 पासुन लागु करण्यात आलेली आहे. या योजनेनुसार कर्मचा-याचे मासिक वेतनामधुन 12%, महानगरपालिकेच्या निधीमधुन 13.61% प्रमाणे कपात करुन महानगरपालिकेने कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये महिन्याच्या

| |
|---|
| 15 तारखेपर्यंत भरणे आवश्यक आहे. देय मुदतीमध्ये रक्कम भरण्यात आली नाही तर 37 % जादा रक्कम दंड व व्याजापोटी भरणे आवश्यक असलेचे महानगरपालिकेचे वकील ॲड. दिपक दळवी यांचे नस्ती मधील पान क्र.259 वर असलेल्या पत्रामध्ये नमुद आहे.<br><br>सदर नस्तीचे लेखापरीक्षण करुन अर्धसमास ज्ञापन क्र.79 दि.15/07/14 रोजी निर्गमित केला आहे. अस्थापना विभागाने त्याचे अनुपालन दि.23/07/14 रोजी सादर केले आहे. अनुपालनामध्ये कर्मचारी भविष्य निर्वाह निधीची रक्कम वसुलीची कार्यवाही चालु असलेबाबत नमुद आहे.परंतु वसुली केलेली नाही. या बाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहे.<br>1)नस्तीमधील पान क्र.421 वर रोजंदारीवर व मानधनावर महानगरपालिकेमध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-याची यादी व त्यांना दि.08/01/11 ते दि.31/07/12 अखेर दिलेले वेतन यांची एकत्रित माहिती दिली आहे. त्यानुसार महानगरपालिकेकडे मानधनावर 166 कर्मचारी नियुक्त असुन त्यांचे वेतनावर एकुण रु.12877911/- खर्च झाल्याचे नमुद आहे. त्यानुसार कर्मचारी हिस्सा 12 % प्रमाणे रु.1545349/- व महानगरपालिका हिस्सा 13.61 % प्रमाणे रु.1753684/- असे एकुण रु.3298033/- कपात करणे आवश्यक आहे. तसेच नस्तीमधील पान क्र.469 वर दि.01/08/12 ते 30/4/14 अखेर एकुण 670 कर्मचा-याचे वेतनातुन कर्मचारी हिस्सा 12% प्रमाणे रु.3353716/- व महानगरपालिका हिस्सा 13.61 % प्रमाणे असे रु.3803672/- प्रमाणे एकुण रु.7157388/- कपात करणे आवश्यक आहे. पान क्र.169 वर 203 व पान क्र.175 वर 46 अशी एकुण 249 कर्मचा-याची यादी दिली आहे.<br>**वसुलपात्र रक्कम :-** कर्मचारी हिस्सा :- रु. 4899065/-, महानगरपालिका हिस्सा :- रु.5556356/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 79 | 15/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |

<table>
<tr><td>42</td><td colspan="5">वॉर्ड क्रं.21 सांगली मिरा हौसिंग सोसायटी येथे पेव्हींग ब्लॉक्स, फुटपाथ करणे या कामातील अनियमिततेबाबत.</td></tr>
<tr><td>योजना संकेतांक</td><td colspan="5">योजनेचे नाव</td></tr>
<tr><td></td><td colspan="5">नागरी दलित वस्ती सुधार योजना.</td></tr>
<tr><td>शाखा संकेतांक</td><td>लेखा शिर्ष</td><td>निधीचा स्त्रोत</td><td>कलम</td><td>अनियमिततांची संख्या</td><td>गुंतलेली रक्कम</td></tr>
</table>

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 04 | सार्व.बांधकाम | मनपा | 9ब | 04 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 486927 | | | |

महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/- प्रती घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे. ठेकेदाराने रॉयल्टी भरलेचा पुरावा देयकासोबत जोडला नसताना ठेकेदारास देयकामधुन आदा केलेली रॉयल्टी रक्कम रु.28647/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

वॉर्ड क्रं.21 सांगली मिरा हौसिंग सोसायटी येथे पेव्हींग ब्लॉक व फुटपाथ करणे हे काम राज्य शासनाकडुन दलित वस्ती सुधार योजनेसाठी मिळालेल्या निधीतुन केले आहे.

**प्रमाणक क्र. 287 दि.08/06/12 रक्कम रु.486927/-**

निविदा रक्कम 486927/-

प्रशासकीय मान्यता:- आरआर/क्रमांक/नपा/आरआर/462 जिल्हाधिकारी कार्यालय सांगली, यांचे पत्र दि.18/4/2011

तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता यांचे कडील क्र.र.न.366 दि.2/12/2010

स्थायी समिती ठराव नं.175 दि.12/07/12 ने मंजुरी.

मा.आयुक्त निर्णय क्र.332 दि.7/12/2011ने मंजुरी.

जाहीर प्रकटन क्रं.1/2011/12 दि.13/08/2011 दै.सकाळ या वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द केली आहे.

निविदा दि. 13/08/2011 मुदत :- 24/08/11

एकुण :- 03 निविदा प्राप्त, निविदा उघडली:- 30/08/11

ठेकेदाराचे नाव:- श्री.तुळजाई कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मान्य केली आहे.

निविदा मंजुरी समज :- क्रमनपा/मागास समिती / 321 / 201 / दि.12/12/2011.

कार्यादेश:- मनपा/मागास समिती/379/2011/12 दि.17/2/12.

मुदत :- 40 दिवस. काम पुर्ण दि.27/03/2012.

मोजमाप पुस्तक क्र.21 पृष्ठ क्र. 3 ते 4

2010-11 या आर्थिक वर्षात दलित वस्ती अंतर्गत 21 कामांचा व रु.13332587/- रक्कमेचा प्रस्ताव महानगरपालिकेने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे दि.8/12/2010 रोजी पाठविला होता त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाने रु.12500000/-इतके अनुदान मंजुर केले आहे व या रक्कमेचा धनादेश महानगरपालिकेस

दि.19/04/11 रोजी प्राप्त झाला आहे. या रक्कमेतुन एकुण 19 कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. या प्राप्त निधीमधुन सांगली मिरा हौसिंग सोसायटी येथे पेव्हींग ब्लॉक व फुटपाथ करणे हे काम करण्यात आले आहे.

कामाची नस्ती,मोजमाप पुस्तक व देयक तपासून अर्धसमास ज्ञापन क्र. 84 दि.16/07/14 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.21/10/2014 रोजी तीन महिने विलंबाने लेखापरीक्षणास सादर केले आहे. बांधकाम विभागाने दिलेले अनुपालन तपासुन खालील आक्षेप घेणेत येत आहेत.

1) नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक विघयो-102000/1592/प्र.क्र.189/नवि-4 दि.5 मार्च 2002 मधील परी.7 मधील अ नुसार बांधकाम विषयक कामासाठीचे रेखांकन/नकाशे नगररचना विभागाने मंजुर केले आहेत परंतु प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 नुसार सुसंगत असलेबाबत तसेच विकास योजनेचा जमीन वापर व आरक्षणाबाबत सखोल छाननी करुन अहवाल शासन निर्णयाप्रमाणे देणे आवश्यक असता सदर जागेवर कोणतेही आरक्षण नसलेचा अहवाल नगररचना विभागाने दिलेला नाही. जिल्हाधिकारी कार्यालय सांगली,नगरपालिका प्रशासन शाखा यांचे पत्र क्रमांक /नपा /आर आर / 462/2012 दि.27/07/2012 अन्वये देण्यात आलेल्या प्रशासकिय मान्यतेच्या आदेशामध्ये अट क्र. 3 नुसार प्रस्तावित केलेली काम सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या मालकीच्या /ताब्यात असलेल्या जमिनीवर घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असल्याबाबतचा कोणताही अनुषंगिक पुरावा सोबत जोडण्यात आलेला नाही.

2)पुर्वगणन पत्रकामध्ये अंतर्भुत असलेल्या बाबींच्या समोर सार्वजनिक बांधकाम विभागाची कोणत्या वर्षाची विभागिय दरसुची वापरली आहे ते वर्ष व पृष्ठ क्रमांक नमुद नसलेने कोणत्या वर्षाची विभागीय दरसुची वापरली आहे ते समजुन येत नाही.

3)ठेकेदारास काम मंजुरीची समज दि.12/12/2011 ने दिली असुन कामाचा कार्यादेश दि.17/2/2012 ने दोन महिने विलंबाने दिला आहे. नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम (6)171 नुसार निविदा उघडल्याच्या दिनांकापासून एक आठवडयाच्या आत त्या निकाली काढण्यात आल्या पाहिजेत आणि कोणत्याही बाबतीत हा कालावधी एक महीन्यापेक्षा जास्त होता कामा नये. असे नमुद असताना दोन महिने विलंबाने कार्यादेश देण्यात आला आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये समज दिले नंतर अनामत भरणे,करारपत्र करणे या कामासाठी एवढा कालावधी आवश्यक असल्याचे नमुद आहे. विलंब कालावधी पाहता अनुपालनामध्ये दिलेले कारण समर्पक वाटत नाही.

4)मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणी केली असता बाब क्र.2 हार्ड मुरुम 103 घमी वापरला आहे तसेच बाब क्रं. 3 सिमेंट कॉंक्रीट 1:4:8 चे काम 65.90 घमी केलेले आहे.त्यासाठी एकुण खडी 14.33 घमी व वाळु 28.04 घ.मी. असे एकुण गौण खनिज 405.37 घमी वापरल्याची नोंद आहे. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु.200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67 प्रती घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे व रॉयल्टी

| |
|---|
| भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. देयकासोबत ठेकेदाराने रॉयल्टी रक्कम भरलेचा कोणताही पुरावा सोबत जोडला नसतानाही बांधकाम विभागाने देयकामधुन रॉयल्टीची रक्कम कपात न करता ठेकेदारास आदा केली आहे. अनुपालनामध्ये रॉयल्टी भरल्याच्या पावत्या जमा केल्याचे नमुद आहे. परंतु पावत्या दाखविल्या नसल्याने ठेकेदारास देयकामधुन आदा केलेली 405.37 घ.मी.X रु.70.67 प्रती घ.मी.प्रमाणे रु.28647/- रॉयल्टी रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.<br>**आक्षेपाधिन रक्कम :-** रु.486927/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 84 | 16/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |
|---|---|

| 43 | वॉर्ड क्रं.74 मिरज येथील कोल्हापूर चाळ इनामदार प्लॉट अंतर्गत रस्त्यांना पेव्हींग ब्लॉक्स बसविणे या कामातील अनियमिततेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | नागरी दलित वस्ती सुधार योजना. | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | मनपा | 9ब | 04 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 608079 | 6142 | | |

| |
|---|
| कामासाठी वापरण्यात आलेले पेव्हींग ब्लॉक विनिर्देशित परिमाणाचे असलेबाबतचा तसेच वापरलेल्या सिमेंट कॉंक्रीटचा प्रयोगशाळेचा गुणवत्ता चाचणी अहवाल न घेताच देयक आदा केलेने कामात वापरलेले साहित्य योग्य त्या गुणवत्तेचे वापरल्याची लेखापरीक्षणास खात्री करता येत नसल्याने पेव्हींग ब्लॉकची आदा केलेली रक्कम रु.608079/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत. |

आयुक्त यांचे कडील मनपा/मागास समिती/46/2012-13 दि.21/7/12 अन्वये नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत महानगरपालीका क्षेत्रातील अंदाजपत्रकिय रक्कम रु.8492114/-चे कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे.त्यामधुन वॉर्ड क्रं.74 मिरज येथील कोल्हापूर चाळ इनामदार प्लॉट अंतर्गत रस्त्यांना पेव्हींग ब्लॉक्स बसविणे हे काम करण्यात आलेले आहे.

**प्रमाणक क्र. 301 दि.17/12/12 रक्कम रु.614221/-**

निविदा रक्कम 627400/-

प्रशासकीय मान्यता:-आरआर/क्रमांक/नपा/आरआर/462/जिल्हाधिकारी कार्यालय सांगली,दि.27/7/2012

तांत्रिक मान्यता:-शहर अभियंता यांचे कडील क्र.र.न.28 दि.20/04/12

स्थायी समिती ठराव नं.243 दि.29/8/12 ने मंजुरी.

मा.आयुक्त निर्णय क्र.332 दि.7/12/2011ने मंजुरी.

ठेकेदाराचे नाव :- श्री.ओमसाई मजुर सोसायटी यांना अंदाजपत्रकीय दराने काम देण्यात आले आहे.

निविदा मंजुरी समज :- क्रमनपा / मागास समिती / 109 / 2012 / दि.05/10/2012

कार्यादेश :- मनपा/मागास समिती/109/2012 दि.05/10/12.

मुदत:- 90 दिवस. काम पुर्ण दि.19/11/2012.

मोजमाप पुस्तक क्र.03 पृष्ठ क्र.85 ते 87

उपरोक्त कामाची नस्ती,मोजमाप पुस्तिका क्र.3 व देयकाची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र. 85 दि.16/07/14 रोजी निर्गमित केला आहे. बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन लेखापरीक्षणास दि.9/10/14 रोजी आडीच महीने विलंबाने सादर केले आहे. सदर अर्धसमास ज्ञापनाचे अवलोकन करुन खालील आक्षेप घेणेत येत आहेत.

1)नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक विघयो-102000/1592/प्र.क्र.189/नवि-4 दि.5 मार्च 2002 मधील परी.7 मधील अ नुसार बांधकाम विषयक कामासाठीचे रेखांकन/नकाशे नगररचना विभागाने मंजुर केले आहेत परंतु प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 नुसार सुसंगत असलेबाबत तसेच विकास योजनेचा जमीन वापर व आरक्षणाबाबत सखोल छाननी करुन अहवाल शासन निर्णयाप्रमाणे देणे आवश्यक असता सदर जागेवर कोणतेही आरक्षण नसलेचा अहवाल नगररचना विभागाने दिलेला नाही. जिल्हाधिकारी कार्यालय सांगली,नगरपालिका प्रशासन शाखा यांचे पत्र क्रमांक /नपा /आर आर / 462/2012 दि.27/07/2012 अन्वये देण्यात आलेल्या प्रशासकिय मान्यतेच्या आदेशामध्ये अट क्र. 3 नुसार प्रस्तावित केलेली कामे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या मालकीच्या /ताब्यात असलेल्या जमिनीवर घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असल्या बाबतचा कोणताही अनुषंगिक पुरावा सोबत जोडण्यात आलेला नाही.

2)पुर्वगणन पत्रकामध्ये अंतर्भुत असलेल्या बाबींच्या समोर सार्वजनिक बांधकाम विभागाची कोणत्या

| |
|---|
| वर्षाची विभागिय दरसुची वापरली आहे ते वर्ष व पृष्ठ क्रमांक नमुद नसलेने समजुन येत नाही. अनुपालनामध्ये सदर कामी दरसूचीचे सॉफ्टवेअर वापरुन एस्टिमेट तयार केले असल्याने या पुढे रेट ॲनॅलिसिसची प्रत सोबत जोडणेची दक्षता घेण्यात येईल असे नमुद आहे. परंतु दरसूची दाखविलेली नसल्याने दराबाबत खात्री करता आलेली नाही.<br>3)मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणी केली असता बाब क्र.1.60 मि.मि.जाडीचे पेव्हींग ब्लॉक बसविणे तसेच बाब क्रं. 2 सिमेंट कॉंक्रीट 1:2:4 चे काम 24.18 घमी केलेले आहे. प्राकलनाप्रमाणे पेव्हींग ब्लॉकची Comprehensive strength 400 कि.ग्रॅ. प्रती चौ.मि. असणे आवश्यक आहे. पेव्हींग ब्लॉक विनिर्देशित परिमाणाचे असलेबाबतचा तसेच कामासाठी वापरलेल्या सिमेंट कॉंक्रीटचा प्रयोगशाळेचा गुणवत्ता चाचणी अहवाल न घेताच देयक आदा केलेने कामात वापरलेले साहित्य योग्य त्या गुणवत्तेचे वापरल्याची लेखापरीक्षणास खात्री करता येत नसल्याने पेव्हींग ब्लॉकची आदा केलेली रक्कम रु.614221/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.<br>4)प्राकलनामध्ये कामगार कल्याण उपकराचा समावेश केला आहे. परंतु देयकामधुन उद्योग उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य, शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकर वसुल केला नसल्याने रु. 614221/- च्या 1 टक्के प्रमाणे रु.6142/- वसुल करण्यात यावेत. अनुपालनामध्ये उपकराची रक्कम वसुल करण्याचे मान्य केले आहे. परंतु रक्कम वसुल केलेली नाही.<br>**आक्षेपाधिन रक्कम :-** पेव्हींग ब्लॉक ची रक्कम रु.608079/-<br>**वसुलपात्र रक्कम :-** कामगार कल्याण उपकर रक्कम रु.6142/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 85 | 16/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |
|---|---|

| 44 | वॉर्ड क्रं.6 कुपवाड येथील बजरंग नगर मधील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामातील अनियमिततेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | नागरी दलित वस्ती सुधार योजना. | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 04 | सार्व.बांधकाम | मनपा | 9ब | 07 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 720031 | 7273 | | |

| |
|---|
| या कामाच्या कॉन्टीजन्सी रक्कमेतुन हार्ड मुरुम 103.68 घ.मी.X रु.351.75/घ.मी.प्रमाणे रु.36469 चे काम केल्याचे मोजमाप पुस्तक व देयकामध्ये नमुद आहे. निविदा अटी/शर्ती मधील अट क्र.17 नुसार कामामध्ये बदल किंवा वाढ केलेली बाब प्राकलनामध्ये नसल्यास आयुक्त यांचे मान्यतेने दर ठरविले जातील असे नमुद असताना जादा केलेल्या कामास विभागप्रमुख व आयुक्त यांची मान्यता न घेताच नियमबाह्यपणे काम केले असल्याने रु.37460/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत. |

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेने 2010-11 या आर्थिक वर्षात दलित वस्ती अंतर्गत 21 कामांचा रु.13332587/- रक्कमेचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे दि.8/12/2010 रोजी पाठविण्यात आला होता त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाने रु.12500000/- इतके अनुदान मंजुर केले आहे व या रक्कमेचा धनादेश महानगरपालिकेस दि.19/04/11 रोजी प्राप्त झाला आहे. त्यामधुन एकुण 19 कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. व या निधीमधुन वॉर्ड क्रं.6 कुपवाड येथील बजरंग नगर मधील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे हे काम करण्यात आले आहे.

**प्रमाणक क्र. 291 दि.09/7/12 रक्कम रु.727304/-**

निविदा रक्कम रु. 786700/-

प्रशासकीय मान्यता:- आरआर/क्रमांक/नपा/आरआर/195/जिल्हाधिकारी कार्या. सांगली,यांचे पत्र दि.31/03/2011

तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता यांचे कडील क्र.र.न.357 दि.02/12/10

स्थायी समिती ठराव नं.175 दि.12/07/11ने मंजुरी.

मा.आयुक्त निर्णय क्र.330 दि.7/12/2011 ने निविदा दरास व खर्चास मंजुरी देण्यात आली आहे.

जाहिर प्रकटन क्र.3 दि.13/8/11 ने दै.सकाळ या वर्तमानपत्रामधुन निविदा मागविण्यात आल्या असुन एकुण 5 निविदा आल्या आहेत. निविदा दि.30/08/11 रोजी उघडण्यात आल्या आहेत व सर्वात कमीचे निविदाधारक श्री.एस.जी.कुकरेजा यांची 7.55 टक्के कमीची निविदा मंजुर करण्यात आली आहे.

निविदा मंजुरी समज :- क्रमनपा / मागास समिती / 319 / 2011 / दि.12/12/2011

कार्यादेश :- मनपा/मागास समिती/02/2012 दि.04/04/12.

मुदत:- 60 दिवस. काम पुर्ण दि.18/06/2012.

मोजमाप पुस्तक क्र. 01 पृष्ठ क्र.70 ते 71

उपरोक्त कामाची नस्ती,मोजमाप पुस्तिका क्र.01 व देयकाची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र. 86 दि.16/07/14 रोजी निर्गमित केला आहे. बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन लेखापरीक्षणास दि.9/10/14 रोजी आडीच महीने विलंबाने सादर केले आहे. सदर अर्धसमास ज्ञापनाचे अवलोकन करुन खालील आक्षेप घेणेत येत आहेत.

1) नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक विघयो-102000/1592/प्र.क्र.189/नवि-4 दि.5 मार्च 2002 मधील परी.7 मधील अ नुसार बांधकाम विषयक कामासाठीचे रेखांकन/नकाशे नगररचना विभागाने मंजुर केले आहेत परंतु प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 नुसार सुसंगत असलेबाबत तसेच विकास योजनेचा जमीन वापर व आरक्षणाबाबत सखोल छाननी करुन अहवाल शासन निर्णयाप्रमाणे देणे आवश्यक असता सदर जागेवर कोणतेही आरक्षण नसलेचा अहवाल नगररचना विभागाने दिलेला नाही. जिल्हाधिकारी कार्यालय सांगली,नगरपालिका प्रशासन शाखा यांचे पत्र क्रमांक /नपा /आर आर / 462/2012 दि.27/07/2012 अन्वये देण्यात आलेल्या प्रशासकिय मान्यतेच्या आदेशामध्ये अट क्र. 3 नुसार प्रस्तावित केलेली कामे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या मालकीच्या /ताब्यात असलेल्या जमिनीवर घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असल्या बाबतचा कोणताही अनुषंगिक पुरावा सोबत जोडण्यात आलेला नाही.

2)पुर्वगणन पत्रकामध्ये अंतर्भुत असलेल्या बाबींच्या समोर सार्वजनिक बांधकाम विभागाची कोणत्या वर्षाची विभागिय दरसुची वापरली आहे ते वर्ष व पृष्ठ क्रमांक नमुद नसलेने कोणत्या वर्षाची विभागीय दरसुची वापरली आहे ते समजुन येत नाही. अनुपालनामध्ये सदर कामी दरसूचीचे सॉफ्टवेअर वापरुन एस्टिमेट तयार केले असल्याने या पुढे रेट ॲनॅलिसिसची प्रत सोबत जोडणेची दक्षता घेण्यात येईल असे नमुद आहे. परंतु दरसूची दाखविलेली नसल्याने दराबाबत खात्री करता येत नाही.

3)शहर अभियंता यांनी निविदा मंजुरी समज, क्रमनपा /मागास समिती/319/2011/दि.12/12/2011 अन्वये ठेकेदारास दिली आहे. निविदा मंजुरी समज मधील अटी व शर्तीनुसार ठेकेदाराने रु.38935/- ची सुरक्षा अनामत भरुन रु.100 चे मुद्रांकावर सात दिवसाचे आत करारपत्र करुन देणे आवश्यक आहे व करारपत्र करुन न देल्यास निविदा अटी व शर्तीमधील अट क्र.40 नुसार कामगिरी रद्द करण्यात येईल असे नमुद आहे. परंतु ठेकेदाराने समज दिल्यानंतर करारपत्र दि.29/03/12 रोजी म्हणजेच 3 महिने विलंबाने केले आहे व प्रशासनाने या विलंबाबाबत ठेकेदारावर कोणतीही कार्यवाही का केली नाही याचा खुलासा अनुपालनामध्ये केला असुन निविदा कमी दराने आल्याने व महानगरपालिकेच्या आर्थिक फायद्याचे असल्याने ठेकेदारावर कारवाई केली नसल्याचे नमुद आहे. उत्तर संयुक्तिक वाटत नसल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.

4)प्राकलनामध्ये 5 टक्के कॉन्टीजन्सी रक्कम रु.37460/- चा समावेश केला आहे व काम करताना या

रक्कमेतुन हार्ड मुरुम 103.68 घ.मी.Xरु.351.75/घ.मी. प्रमाणे रु.36469 चे काम केल्याचे मोजमाप पुस्तक व देयकामध्ये नमुद आहे. निविदा अटी/शर्ती मधील अट क्र.15 नुसार मंजुर कामामध्ये बदल किंवा वाढ करण्यास विभागप्रमुख यांच्या अगावु लेखी मंजुरीची आवश्यकता आहे. तसेच अट क्र.17 नुसार बदल किंवा वाढ केलेली बाब प्राकलनामध्ये नसल्यास आयुक्त यांचे मान्यतेने दर ठरविले जातील असे नमुद असताना जादा केलेल्या कामास आयुक्त यांची व विभाग प्रमुखांची मान्यता न घेताच नियमबाह्यपणे काम केले असल्याने रु.37460/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत. अनुपालनामध्ये मंजुरी घेणे आवश्यक असल्याची बाब मान्य करण्यात आली आहे.

5)रस्त्याचे बी.बी.एम. चे काम 3143 चौ.मी. झाले असुन त्यास 0.075 घ.मी. प्रमाणे 235.72 घ.मी. खडी लागली आहे. कारपेटचे काम 3143 चौ.मी. झाले असुन 0.025 घ.मी. प्रमाणे एकुण खडी 78.57 घ.मी.लागली आहे. 40 मी.मी.खडी 66 घ.मी. व मुरुम 103.68 घ.मी. लागला आहे. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67 प्रती घन मिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. देयकासोबत ठेकेदाराने रॉयल्टी रक्कम भरलेचा कोणताही पुरावा सोबत जोडला नसतानाही बांधकाम विभागाने देयकामधुन रॉयल्टीची रक्कम कपात न करता दिलेली आहे. त्यामुळे ठेकेदारास देयकामधुन आदा केलेली 483.97 घ.मी. X रु.70.67 प्रती घ.मी. प्रमाणे रु.34202/- रॉयल्टी रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत. अर्धसमास ज्ञापन क्र. 86 दि.16/07/14 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन लेखापरीक्षणास दि.09/10/2014 रोजी अडीच महीने विलंबाने सादर केले आहे. अनुपालनामध्ये रॉयल्टीच्या पावत्या मक्तेदाराने दाखविल्या असल्याने रॉयल्टी कपात करण्यात आली नसल्याचे नमुद आहे. परंतु पावत्या लेखापरीक्षणास दाखविण्यात आल्या नसल्याने रॉयल्टी रक्कम रु.34202/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

6)प्राकलनामध्ये कामगार कल्याण उपकराचा समावेश केला आहे. उद्योग उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य, शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकर वसुल करणे आवश्यक असता सदर रक्कम देयकामधुन प्रदान करण्यात आली असल्याने, प्राकलन रक्कम रु. 727304/- च्या 1 टक्के प्रमाणे रु.7273/- ठेकेदाराकडुन वसुल करण्यात यावेत. अनुपालनामध्ये उपकर वसुल करण्याचे मान्य केले आहे. परंतु उपकर वसुल करण्यात आलेला नाही.

7)रस्त्यासाठी वापरण्यात आलेल्या वाळु, खडी व डांबर वापरण्यास योग्य असलेबाबतचा गुणवत्ता चाचणी अहवाल देयकासोबत नसतानाही देयक कोणत्या नियमाने पारित करण्यात आले याचा खुलासा बांधकाम विभागाने अनुपालनामध्ये केला असुन चाचणी अहवाल लगत केल्याचे नमुद आहे. परंतु चाचणी अहवाल दाखविण्यात आलेला नाही.

**आक्षेपाधिन रक्कम :-** रु.720031/-

**वसुलपात्र रक्कम :-** कामगार कल्याण उपकर रु.7273/-

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 86 | 16/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 45 | वॉर्ड क्रं.45 मिरज येथील रमामाता नगर झोपडपट्टी भागात पेव्हिंग ब्लॉक बसविणे या कामातील अनियमितते बाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | नागरी दलित वस्ती सुधार योजना. | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | राज्य शासन | 9ब | 10 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 1287213 | 13238 | | |

कामाचे ठिकाणी 60 मी.मी. जाडीचे पेव्हिंग ब्लॉक्स 1692 चौ.मि. क्षेत्रावर बसविल्याचे मोजमाप पुस्तिकेमध्ये नमुद असुन ते योग्य स्पेसिफिकेशन प्रमाणे व वापरण्यास योग्य असलेबाबतचा प्रयोगशाळेचा गुणवत्ता चाचणी अहवाल सोबत दिसुन आला नाही. त्यामुळे पेव्हिंग ब्लॉक्सची रक्कम रु.1062153/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेने 2010-11 या आर्थिक वर्षात दलित वस्ती अंतर्गत 21 कामांचा व रु.13332587/- रक्कमेचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे दि.8/12/2010 रोजी पाठविण्यात आला होता. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन रु.12500000/- इतके अनुदान मंजुर झाले आहे व रक्कमेचा धनादेश दि.19/04/11 रोजी प्राप्त झाला आहे. त्यामधुन एकुण 19 कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. त्यामधुन वॉर्ड क्रं.45 मिरज येथील रमामाता नगर झोपडपट्टी भागात पेव्हिंग ब्लॉक बसविणे हे काम करण्यात आलेले आहे.

**प्रमाणक क्र. 293 दि.12/9/12 रक्कम रु.1323814/-**

निविदा रक्कम रु.1325400/-

प्रशासकीय मान्यता :- आरआर /क्रमांक /नपा/आरआर /195 /जिल्हाधिकारी कार्यालय सांगली, यांचे पत्र दि.31/03/2011

तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता यांचे कडील क्र.र.न.358 दि.02/12/10

स्थायी समिती ठराव नं.175 दि.12/07/11 ने मंजुरी.

मा.आयुक्त निर्णय क्र.336 दि.9/12/2011 ने निविदा दरास व खर्चास मंजुरी देण्यात आली आहे.

जाहिर प्रकटन क्र.3 दि.13/8/11 ने निविदा मागविण्यात आल्या असुन एकुण 5 निविदा आल्या असुन तांत्रिक लखोटा उघडल्यानंतर तीन निविदा पात्र करण्यात आल्या आहेत. निविदा दि.30/08/11 रोजी उघडण्यात आल्या असुन सर्वात कमीचे निविदाधारक श्री.रमेश कांबळे यांची 0.1 टक्के कमीची निविदा मंजुर करण्यात आली आहे.

कार्यादेश :- मनपा / मागास समिती / 339 / 11-12 दि.18/12/11.

मुदत:- 60 दिवस.

काम सुरु. दि.31/12/2011. काम पुर्ण दि.01/03/2012.

मोजमाप पुस्तक क्र.13 पृष्ठ क्र.39 ते 40

उपरोक्त कामाची नस्ती,मोजमाप पुस्तिका क्र.13 व देयकाची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र. 87 दि.16/07/14 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन लेखापरीक्षणास दि.09/10/2014 रोजी सादर केले आहे. बांधकाम विभागाने दिलेल्या अनुपालनाचे अवलोकन करुन खालील आक्षेप घेणेत येत आहेत.

1) नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक विघयो-102000/1592/प्र.क्र.189/नवि-4 दि.5 मार्च 2002 मधील परी.7 मधील अ नुसार बांधकाम विषयक कामासाठीचे रेखांकन/नकाशे नगररचना विभागाने मंजुर केले आहेत परंतु प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 नुसार सुसंगत असलेबाबत तसेच विकास योजनेचा जमीन वापर व आरक्षणाबाबत सखोल छाननी करुन अहवाल शासन निर्णयाप्रमाणे देणे आवश्यक असता सदर जागेवर कोणतेही आरक्षण नसलेचा अहवाल नगररचना विभागाने दिलेला नाही. जिल्हाधिकारी कार्यालय सांगली,नगरपालिका प्रशासन शाखा यांचे पत्र क्रमांक /नपा /आर आर / 462/2012 दि.27/07/2012 अन्वये देण्यात आलेल्या प्रशासकिय मान्यतेच्या आदेशामध्ये अट क्र. 3 नुसार प्रस्तावित केलेली कामे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या मालकीच्या /ताब्यात

असलेल्या जमिनीवर घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असल्या बाबतचा कोणताही अनुषंगिक पुरावा सोबत जोडण्यात आलेला नाही.

2)पुर्वगणन पत्रकामध्ये अंतर्भुत असलेल्या बाबींच्या समोर सार्वजनिक बांधकाम विभागाची कोणत्या वर्षाची विभागिय दरसुची वापरली आहे ते वर्ष व पृष्ठ क्रमांक नमुद नसलेने कोणत्या वर्षाची विभागीय दरसुची वापरली आहे ते समजुन येत नाही. अनुपालनामध्ये सदर कामी दरसूचीचे सॉफ्टवेअर वापरुन एस्टिमेट तयार केले असल्याने या पुढे रेट ॲनॅलिसिसची प्रत सोबत जोडणेची दक्षता घेण्यात येईल असे नमुद आहे. परंतु दरसूची दाखविलेली नसल्याने दराबाबत खात्री करता येत नाही.

3)कामाच्या नस्तीचे अवलोकन केले असता पान क्र.133 दि.26/08/11 रोजी आसिफ लष्करी या ठेकेदाराने कामाचे दर नजरचुकीने भरले असल्याने माझी निविदा उघडू नये असे पत्र दिले आहे. नस्तीचे अवलोकन केले असता पृष्ठ क्र.139 दि.17/10/2011 रोजी लष्करी यांनी संबंधित कामाची निविदा पुन्हा उघडा असे पत्र दिले आहे. त्यावर आयुक्त यांनी सदर प्रकरण तपासुन सादर करावे असे आदेश दिले आहेत. उपायुक्त यांनी सिस्टिम मॅनेजर यांना चौकशी करुन अहवाल सादर करणेस सांगितले आहे. त्यानुसार सिस्टिम मॅनेजर यांनी प्रस्तुतची निविदा उघडण्याची प्रक्रिया दि.30/08/11 रोजी पुर्ण झाली आहे व दोन निविदादारांना अपात्र ठरवुन तीन पात्र निविदाधारकांचा दराचा लखोटा दि. 30/08/11 रोजी उपायुक्त, मुख्य लेखापरीक्षक ,शहर अभियंता यांच्या मान्यतेने उघडण्यात आल्याचा अहवाल दि.22/11/11 रोजी दिला आहे व उपायुक्त यांनी तांत्रिक बाबींचा विचार करता सिस्टिम मॅनेजर यांच्या अहवालाशी सहमत असलेचा अभिप्राय त्याच दिवशी दिला आहे. आयुक्त यांनी क्र.2307 दि.22/11/11 ने ठेकेदार लष्करी यांना ब्लॅक लिस्ट करणे कामी कारणे दाखवा नोटीस देणेबाबत सूचित केले आहे. याबाबत ठेकेदारावर काय कारवाई करणेत आली याचा खुलासा अनुपालनामध्ये दिला असुन ठेकेदारास नोटीस देवुन खुलासा विचारण्यात आलेचे नमूद आहे. परंतु ठेकेदारास दिलेली नोटीस व त्यावर ठेकेदाराने दिलेले उत्तर व प्रशासनाने केलेली कारवाई याबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नाहीत.

4)या सर्व कार्यवाहीमध्ये निविदा दि.30/08/11 रोजी उघडल्यानंतर कार्यादेश दि. 18/12/11 रोजी देइपर्यंत 4 महिन्याचा विलंब झाला आहे. नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम (6)171 नुसार निविदा उघडल्याच्या दिनांकापासून एक आठवडयाच्या आत त्या निकाली काढण्यात आल्या पाहिजेत आणि कोणत्याही बाबतीत हा कालावधी एक महीन्यापेक्षा जास्त होता कामा नये अशी तरतुद असताना निविदा मंजूर करुन कार्यादेश देण्यामध्ये चार महिन्याचा अनावश्यक विलंब झालेने काम पुर्ण होण्यास विलंब झाला असल्याचे स्पष्ट होते.

5)सदर कामाचा तुलनात्मक तक्ता पाहता असिफ लष्करी यांनी दि.26/08/11 ने निविदा उघडू नये असे सांगितल्याने त्यांची निविदा उघडली नसल्याचे नमुद आहे. ठेकेदाराने दिलेल्या पत्रावरुन कोणत्या नियमाने त्याची निविदा अपात्र ठरविली आहे. याचा खुलासा बांधकाम विभागाने अनुपालनामध्ये केला असुन निविदा उघडणे किंवा नाकारण्याचा आधिकार उपायुक्त यांना असल्याने त्यांनी निर्णय घेतला असल्याचे नमुद आहे. अनुपालन संयुक्तिक वाटत नाही.

6)सदर झोपडपट्टी घोषित असलेबाबतचा व जागा महानगरपालीकेच्या मालकीची असल्या बाबतचा कोणताही पुरावा नस्तीमध्ये नसल्याने काम योग्य ठिकाणी झालेबाबतची लेखापरीक्षणाची खात्री होत नाही.

अनुपालनामध्ये जागा महानगरपालिकेच्या मालकीची असल्याबाबतची खात्री केल्याचे नमुद आहे. परंतु कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नाहीत.

7)कामाचे ठिकाणी 60 मी.मी. जाडीचे पेव्हिंग ब्लॉक्स 1692 चौ.मि.क्षेत्रावर बसविल्याचे मोजमाप पुस्तिकेमध्ये नमुद आहे त्याचे 627.75 प्रती चौ.मि.प्रमाणे रु.1062153/- ठेकेदारास आदा केले आहेत. प्राकलनाप्रमाणे पेव्हिंग ब्लॉक्स 60 मि.मी. जाडीचे व 300kg/sqm strength चे असणे आवश्यक आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे 2010-11 या वर्षाचे दरसूचीमधील जनरल नोट्समध्ये मुद्दा क्र. 0.17 वर कामासाठी वापरलेल्या साहित्य वापरण्यास योग्य असलेबाबतची गुणवत्ता चाचणी प्रयोगशाळेकडुन करणे आवश्यक आहे. परंतु कामाचे मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणी केली असता पेव्हिंग ब्लॉक्स योग्य स्पेसिफिकेशन प्रमाणे व वापरण्यास योग्य असलेबाबतचा प्रयोगशाळेचा गुणवत्ता चाचणी अहवाल सोबत दिसुन आला नाही. त्यामुळे पेव्हिंग ब्लॉक्सची रक्कम रु.1062153/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

8)मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणी केली असता हार्डमुरुम 252.60 घ.मी. व 1:4:8 कॉंक्रिट साठी 78 घ.मी. खडी वापरली आहे. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु.200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67 प्रती घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. देयकासोबत ठेकेदाराने रॉयल्टी रक्कम भरलेचा कोणताही पुरावा सोबत जोडला नसतानाही बांधकाम विभागाने देयकामधुन रॉयल्टीची रक्कम कपात न करता दिलेली आहे. त्यामुळे ठेकेदारास देयकामधुन आदा केलेली 330.6 घ.मी.X रु.70.67 प्रती घ.मी. प्रमाणे रु.23363/- रॉयल्टी रक्कम वसुल करण्यात यावी. अनुपालनामध्ये ठेकेदाराच्या रॉयल्टी पावत्या पाहुन खात्री केल्याने रॉयल्टी वसुल केली नसल्याचे नमुद आहे. परंतु पावत्या लेखापरीक्षणास दाखविल्या नसल्याने रॉयल्टी रक्कम रु. 23363/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

9)नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 177 प्रमाणे कामाचे परिपूर्ती प्रमाणपत्र नमुना क्र.133 प्रमाणे सादर केले आहे. प्रमाणपत्रामध्ये दि.1/03/12 रोजी काम पूर्ण झालेची व कामाची मोजमापे दि.04/5/12 रोजी घेण्यात आलेचे नमुद आहे.नियमाप्रमाणे बांधकाम पूर्ण झालेनंतर तात्काळ मोजमापे घेणे आवश्यक असता ती दोन महिने विलंबाने घेण्यात आली आहेत. अनुपालनामध्ये काम पुर्ण झाल्यानंतर मक्तेदारा समवेत मापे घेणे आवश्यक असल्याने व मक्तेदार मापे घेण्यास हजर न राहिल्याने मोजमापे घेण्यास विलंब झाल्याचे नमुद आहे. परंतु अनुषंगिक कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविण्यात आली नसल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.

10)प्राकलनामध्ये कामगार कल्याण उपकराचा समावेश केला आहे. परंतु देयकामधुन उपकर वसुल केला नसल्याने रु.1323814/- च्या 1 टक्के प्रमाणे रु.13238/- वसुल करण्यात यावेत. अनुपालनामध्ये उपकर वसुल केला नसल्याचे मान्य केले आहे. परंतु उपकर वसुल केला नसल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.

**आक्षेपाधिन रक्कम :-** रु.1287213/-

**वसुलपात्र रक्कम :-** कामगार कल्याण उपकर रु.13238/-

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 87 | 16/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |
|---|---|

| 46 | वॉर्ड क्र.45 मिरज येथील चंदनवाडीमधील भोरे गल्ली अंतर्गत रस्त्यांना पेव्हींग ब्लॉक्स बसविणे या कामातील अनियमितते बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | मनपा | 9ड | 03 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 662963 | | | |

पेव्हींग ब्लॉक्स बसविणेचे काम प्राकलनामध्ये मंजुर केलेल्या मोजमापाप्रमाणे केलेले नाही. नगर परिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 165 नुसार कामाचे अंतिम तपशीलवार अंदाज तयार करण्याअगोदर जागेबाबत स्थानिक निरीक्षण करणे आवश्यक आहे. या कामाचे प्राकलन तयार कर ताना स्थानिक निरीक्षण केले नसलेचे स्पष्ट होते.तसेच पेव्हिंग ब्लॉक्सचा गुणवत्ता चाचणी अहवाल न घेताच देयक आदा केलेने पेव्हिंग ब्लॉक्सची रक्कम रु.662399/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आयुक्त यांचे कडील मनपा/मागास समिती/46/2012-13 दि.21/7/12 अन्वये नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत महानगरपालीका क्षेत्रातील अंदाजपत्रकिय रक्कम रु.8492114/-चे एकुण 14 कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. त्यामधुन वॉर्ड क्र.45 मिरज येथील चंदनवाडी मधील भोरे गल्ली अंतर्गत रस्त्यांना पेव्हींग ब्लॉक्स बसविणे हे काम करण्यात आलेले आहे.

प्रमाणक क्र. 313 दि. 21/03/12 रक्कम रु.618901/-

निविदा रक्कम 695900/-

प्रशासकीय मान्यता:- आरआर/क्रमांक/नपा/आरआर/462 जिल्हाधिकारी कार्या. सांगली,दि.27/7/2012

तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता यांचे कडील क्र.र.न.26 दि.20/04/12

स्थायी समिती ठराव नं.243 दि.29/8/12 ने मंजुरी.

मा.आयुक्त निर्णय क्र.332 दि.7/12/2011ने मंजुरी.

ठेकेदाराचे नाव :- श्री.तुळजा भवानी मजुर सोसायटी यांना विना निविदा अंदाजपत्रकीय दराने काम देण्यात आले आहे.

कार्यादेश:- मनपा/मागास समिती/89/2012 दि.27/09/12.

मुदत:- 60 दिवस.

काम पुर्ण दि.26/11/2012.

मोजमाप पुस्तक क्र.13 पृष्ठ क्र.01 ते 3

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1. नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक विघयो-102000/1592/प्र.क्र.189/नवि-4 दि.5 मार्च 2002 मधील परी. 7 मधील अ नुसार बांधकाम विषयक कामासाठीचे रेखांकन/नकाशे नगररचना विभागाने मंजुर केले आहेत परंतु प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 नुसार सुसंगत असलेबाबत तसेच विकास योजनेचा जमीन वापर व आरक्षणाबाबत सखोल छाननी करुन अहवाल देणे आवश्यक असता त्याप्रमाणे अहवाल दिलेला नाही. जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असल्या बाबतचा पुरावा सोबत जोडण्यात आलेला नाही.

2. पुर्वगणन पत्रकामध्ये अंतर्भुत असलेल्या बाबींच्या समोर सार्वजनिक बांधकाम विभागाची कोणत्या वर्षाची विभागिय दरसुची वापरली आहे ते वर्ष व पृष्ठ क्रमांक नमुद नसलेने कोणत्या वर्षाची विभागीय दरसुची वापरली आहे ते समजुन येत नाही.

3. प्राकलनामध्ये पेव्हिंग ब्लॉक बसविणे हे काम 80 मीटर लांब व 3 मी.रुंद या जागेत व अन्य ठिकाणी 62 मीटर लांब व 15 मी.रुंद अशा एकुण 1170 चौ.मी. जागेत करणेचे नमुद आहे. मोजमाप पुस्तकाची तपासणी केली असता काम 474 मी. X 2.46 या जागेत केल्याचे दिसुन येते. नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 165 नुसार कामाचे अंतिम तपशीलवार अंदाज तयार करण्याअगोदर जागेबाबत स्थानिक निरीक्षण करणे आवश्यक आहे. सदर कामाचे प्राकलन तयार करताना स्थानिक निरीक्षण केले नसलेचे स्पष्ट होते. तसेच प्रत्यक्षात केलेल्या कामाच्या मोजमापावरुन सदर काम अन्य

| |
|---|
| ठिकाणी केले असलेचे स्पष्ट होते. निविदा अटी/शर्ती मधील अट क्र.15 नुसार मंजुर कामामध्ये बदल किंवा वाढ करण्यास विभागप्रमुख यांच्या अगावु लेखी मंजुरीची आवश्यकता आहे. परंतु या कामामध्ये केलेल्या बदलास विभाग प्रमुखांची पुर्वमंजूरी घेणेत आली नसलेचे दिसुन येते.<br>4. कामाचे ठिकाणी 60 मी.मी. जाडीचे पेव्हिंग ब्लॉक्स 1169.80 चौ.मि.क्षेत्रावर बसविल्याचे मोजमाप पुस्तिकेमध्ये नमुद आहे व रु. 566.25 प्रती चौ.मि. प्रमाणे रु.662399/- ठेकेदारास आदा केले आहेत. प्राकलना प्रमाणे पेव्हिंग ब्लॉक्स 60 मि.मी. जाडीचे व 300kg/sqm strength चे असणे आवश्यक आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे 10/11 या वर्षाचे दरसूचीमधील जनरल नोट्समध्ये मुद्दा क्र.0.17 वर कामासाठी वापरलेल्या साहित्य वापरण्यास योग्य असलेबाबतची गुणवत्ता चाचणी प्रयोगशाळेकडुन करणे आवश्यक आहे. परंतु कामाचे मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणी केली असता पेव्हिंग ब्लॉक्स योग्य स्पेसिफिकेशन प्रमाणे व वापरण्यास योग्य असलेबाबतचा प्रयोगशाळेचा गुणवत्ता चाचणी अहवाल सोबत दिसुन आला नाही. त्यामुळे पेव्हिंग ब्लॉक्सची रक्कम रु. 662399/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.<br>अर्धसमास ज्ञापन क्र. 94 दि.24/07/14 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन लेखापरीक्षणास दि.10.09.2014 रोजी अडीच महिने विलंबाने सादर केले आहे.<br>आक्षेपाधिन रक्कम रु.662963/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 94 | 24/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |

| 47 | वॉर्ड क्रं.27 रुक्मिणी नगर मधील रस्ते डांबरी करणे या कामातील अनियमिततेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | मनपा | 9ब | 05 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 586398 | | | |

| |
|---|
| देयकासोबत  ठेकेदाराने रॉयल्टी रक्कम भरलेचा कोणताही पुरावा सोबत जोडला नसतानाही बांधकाम विभागाने देयकामधुन रॉयल्टीची रक्कम कपात न करता ठेकेदारास आदा केली आहे. त्यामुळे ठेकेदारास देयकामधुन आदा केलेली 740 घ.मी. X रु.70.67 प्रती घ.मी. प्रमाणे रु.52295/- रॉयल्टीची रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. |

2010-11 या आर्थिक वर्षात दलित वस्ती अंतर्गत 21 कामांचा व रु.13332587/- रक्कमेचा प्रस्ताव महानगरपालिकेने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे दि.8/12/2010 रोजी पाठविण्यात आला होता त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाने रु.12500000/- इतके अनुदान मंजुर झाले आहे व रक्कमेचा धनादेश दि.19/04/11रोजी प्राप्त झाला आहे. त्यामधुन एकुण 19 कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. त्यामधुन वॉर्ड क्रं.27 रुक्मिणी नगर मधील रस्ते डांबरी करणे हे काम करण्यात आलेले आहे.

**प्रमाणक क्र. 311          दि.18/03/13          रक्कम रु.586398/-**

निविदा रक्कम रुपये 588100/-

प्रशासकीय मान्यता  :-  आरआर /क्रमांक /नपा /आरआर /195 जिल्हाअधिकारी कार्यालय सांगली यांचे पत्र , दि.31/03/2011

तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता यांचे कडील क्र.र.न.355 दि.02/12/10

स्थायी समिती ठराव नं.175 दि.12/07/11ने मंजुरी.

मा.आयुक्त निर्णय क्र.339 दि.9/12/2011 ने निविदा दरास व खर्चास मंजुरी देण्यात आली आहे.

जाहिर प्रकटन क्र.1 दि.13/8/11 ने सकाळ या वर्तमानपत्रामधुन निविदा मागविण्यात आल्या असुन या कामास अल्प प्रतिसाद लाभला असल्याने प्रथम मुदतवाढ निविदा याच वर्तमानपत्रामधुन दि.8/9/11रोजी देण्यात आली. निविदा दि.19/9/11 रोजी इ टेंडर गठन समितीसमोर उघडल्यानंतर अल्प प्रतिसाद मिळालेनंतर पुन्हा दि. 28/9/11 पर्यत दुसरी मुदतवाढ निविदा दै.सकाळ मधुन दि.21/9/11रोजी देण्यात आली. त्यानंतर एकुण 4 निविदा आल्या असुन निविदा दि.07/10/11 रोजी उघडण्यात आल्या आहेत व सर्वात कमीचे निविदाधारक श्री.बी.बी.गुंजाटे यांची 0.05 टक्के कमीची निविदा मंजुर करण्यात आली आहे.

कार्यादेश :- मनपा / मागास समिती / 339 / 11-12 दि.17/10/12.

मुदत :- 45 दिवस.

काम सुरु. दि.17/10/2012. काम पुर्ण दि.01/12/2012.

मोजमाप पुस्तक क्र.09 पृष्ठ क्र. 67 ते 69

उपरोक्त कामाची नस्ती,मोजमाप पुस्तिका क्र.09 व देयकाची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र. 96 दि.24/07/2014 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने दि.13/10/2014 रोजी दिलेल्या अनुपालनाचे अवलोकन करुन खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1.नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक विघयो-102000/1592/प्र.क्र.189/नवि-4 दि.5 मार्च 2002 मधील परी.7 मधील अ नुसार बांधकाम विषयक कामासाठीचे रेखांकन/नकाशे नगररचना विभागाने मंजुर केले आहेत परंतु प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 नुसार सुसंगत असलेबाबत तसेच विकास योजनेचा जमीन वापर व आरक्षणाबाबत सखोल छाननी करुन अहवाल शासन निर्णयाप्रमाणे देणे आवश्यक असता सदर जागेवर कोणतेही आरक्षण नसलेचा अहवाल नगररचना विभागाने दिलेला नाही. जिल्हाधिकारी कार्यालय सांगली,नगरपालिका प्रशासन शाखा यांचे पत्र क्रमांक /नपा /आर आर / 462/2012 दि.27/07/2012 अन्वये देण्यात आलेल्या प्रशासकिय मान्यतेच्या आदेशामध्ये अट क्र. 3 नुसार प्रस्तावित केलेली कामे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या मालकीच्या / ताब्यात असलेल्या जमिनीवर घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असल्या बाबतचा कोणताही अनुषंगिक पुरावा सोबत जोडण्यात आलेला नाही.

2.पुर्वगणन पत्रकामध्ये अंतर्भुत असलेल्या बाबींच्या समोर सार्वजनिक बांधकाम विभागाची कोणत्या वर्षाची विभागिय दरसुची वापरली आहे ते वर्ष व पृष्ठ क्रमांक नमुद नसलेने कोणत्या वर्षाची विभागीय दरसुची वापरली आहे ते समजुन येत नाही.

3.कामाची निविदा दि.07/10/11 रोजी उघडण्यात आल्या असुन ठेकेदारास कामाचा कार्यादेश दि.17/10/12 ने एक वर्ष विलंबाने देण्यात आला आहे. नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 171(6) नुसार निविदा उघडल्याच्या दिनांकापासून एक आठवडयाच्या आत त्या निकाली काढण्यात आल्या पाहिजेत आणि कोणत्याही बाबतीत हा कालावधी एक महीन्यापेक्षा जास्त होता कामा नये. अशी तरतुद असता कार्यादेश निविदा मंजुरीनंतर एक वर्ष विलंबाने दिला आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये याकामी दोन निविदा प्राप्त झाल्याने मुदतवाढ दिल्या नंतर स्थायी समितीची मंजूरी घेवून मक्तेदारा बरोबर दि.03.09.2012 रोजी करारपत्र करून कार्यादेश दिलेचे नमुद आहे. परंतु याबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविणेत आलेली नाहीत.

4.रस्त्याच्या खडीकरणासाठी हार्डमुरुम 288 घ.मी., 60 मि.मि. खडी 198 घ.मी.,मऊ मुरुम 78 घ.मी. व 75 मि.मी. जाडीचे बी.बी.एम.चे काम 1174.51 चौ.मी.केले असुन त्यास एकुण 88 घ.मी.खडी लागली आहे. या कामास एकुण 740 घ.मी. गौणखनिज लागले आहे. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/2/2010 नुसार रक्कम रु.200/- प्रती ब्रास

| |
|---|
| किंवा रु.70.67 प्रती घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. देयकासोबत ठेकेदाराने रॉयल्टी रक्कम भरलेचा कोणताही पुरावा सोबत जोडला नसतानाही बांधकाम विभागाने देयकामधुन 740 घ.मी.X रु.70.67 प्रती घ.मी. प्रमाणे रु.52295/- रॉयल्टीची रक्कम कपात न करता ठेकेदारास आदा केली आहे. अनुपालनामध्ये ठेकेदाराने रॉयल्टी भरल्याचा पुरावा देयक तयार करताना दाखविल्यामुळे रॉयल्टी रक्कम कपात केली नसल्याचे नमुद आहे. परंतु रॉयल्टी भरल्याचा पुरावा सोबत जोडला नसल्याने ठेकेदारास देयकामधुन आदा केलेली रॉयल्टी रक्कम रु.52295/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.<br>5.नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम176 नुसार बांधकाम पूर्ण झाल्यानंतर नमुना क्रमांक 132 प्रमाणे बांधकाम पूर्ण झाल्याबाबतचे प्रतिवृत्त/अहवाल बांधकाम विभागाने सादर केले नसल्याने काम पूर्ण झाल्याची खात्री पटत नाही.<br>आक्षेपाधिन रक्कम रु.586398/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 96 | 24/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |

| 48 | सांगली येथील अंबाभवन ते त्रिमुर्ती टॉकीज ते बी.एस.एन.एल. ऑफीस पर्यंत पाणी पाईप लाईन चर दुरुस्त करणे या कामातील अनियमिततेबाबत . | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | मनपा | 9ब | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | 2300 | | |

| |
|---|
| रस्त्याचे कामासाठी एकूण खडी 575.36 घ.मी. लागली असुन महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग |

अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख (3) दि.11/02/2010 नुसार प्रति घनमिटर रु.70.67 प्रमाणे रु.40,660/- रॉयल्टी पैकी रु.38,360/- देयकातुन वसुल केली आहे. उर्वरित रॉयल्टी रुपये 2300/- देयकामधून वसुल करावी.

सांगली येथील अंबाभवन ते त्रिमुर्ती टॉकीज ते बी.एस.एन.एल. ऑफीस पर्यंत पाणी पाईप लाईन चर दुरुस्त करणे हे काम महानगर पालिकेने स्वनिधीमधुन केले आहे.

**प्रमाणक क्रमांक : 6977 दि. : 12.03.2013 रक्कम रु.: 5,08,780/-**

अंदाजपत्रकीय रक्कम रु. : 5,10,006/- (महानगरपालिका निधी), निविदा रक्कम रु. : 5,10,006/-

प्रशासकीय मान्यता : मा.महासभा ठराव क्रमांक 231 दि.20.12.2012.

तांत्रिक मान्यता : 762 दि.11.09.2012 .

ठेकेदाराचे नांव : अहिल्यादेवी मजुर सोसायटी, मिरज.

कार्यादेश क्रमांक/दिनांक: जा.क्र. फेड/काम/सन/12/13/642 दि.30.10.2012 ,1079/ दि.24.01.2013.

कामाची मुदत : 45 दिवस

काम पुर्ण दिनांक : 08.02.2013

मोजमाप पुस्तक क्रमांक : 11 पृष्ठ क्रमांक : 21 ते 22

काम मजूर सोसायटी कडून करून घेणेचा प्रस्ताव शहर अभियंता यांनी दि.10.09.2012 दिला असुन त्यास आयुक्त यांची मान्यता दि. 05.10.2012 रोजी झाली आहे. जिल्हा उपनिबंधक यांचे मजुर सोसायटीस काम वाटप केलेचे पत्र महानगरपालिकेस दि. 30.10.2012 रोजी प्राप्त झाले आहे.

उपायुक्त यांचे दिनांक 04.11.2012 चे विषयपत्रानुसार महासभा क्रमांक 09 ठराव क्रमांक 231 दिनांक 20.12.2012 ने काम करणेस मंजूरी दिली व कार्यादेश दिनांक 24.01.2013 रोजी देणेत आला आहे.

उपरोक्त कामाची नस्ती,मोजमाप पुस्तक क्र.11 व देयकाची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र. 97 दि. 24/07/14 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.12/08/14 रोजी लेखापरीक्षणास सादर केले आहे. दिलेल्या अनुपालनाचे अवलोकन करुन खालील आक्षेप घेणेत येत आहेत.

1.महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10 / 1009/ पी.के.-309 /ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रति ब्रास किंवा रु.70.67 प्रति घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे व रॉयल्टी

| |
|---|
| भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. देयकासोबत ठेकेदाराने रॉयल्टी रक्कम भरलेचा कोणताही पुरावा सोबत जोडला नसल्याने बांधकाम विभागाने देयकामधुन रॉयल्टीची रक्कम कपात केली आहे. हार्ड मुरुम - 228.27 घ.मी. + 60mm खडी - 173.51 घ.मी. + सॉफ्ट मुरुम 68.77 घ.मी + 75MM BBM चे काम 970.55 चौ.मी. केले असुन त्यासाठी 0.108 घ.मी. खडी प्रति चौ.मि. प्रमाणे एकुण खडी 104.81 घ.मी. लागली आहे. रस्त्याचे कामासाठी एकूण खडी 575.36 घ.मी. लागली असुन रु.70.67 प्रति घ.मी. प्रमाणे रु.40,660/- रॉयल्टी पैकी रु.38,360/- देयकातुन वसुल केली आहे. उर्वरित रॉयल्टी रुपये 2300/- देयकामधून वसुल करावी. अनुपालनामध्ये उर्वरित रॉयल्टी रक्कम वसुलीची कार्यवाही चालु असलेबाबत नमुद आहे. परंतु रॉयल्टी रक्कमेची वसुली केलेली नाही. <br> **वसुलपात्र रक्कम रु.2300 /-** |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 97 | 24/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 49 | सांगली ईदगाह समोरील व्हील टेक गॅरेज लगतचे रस्यावरील पाणी पाईप लाईन चर दुरुस्त करणे या कामातील अनियमिततेबाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | मनपा | 9ब | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | 5771 | | |

| |
|---|
| महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) |

दि.11/02/2010 नुसार रक्कम रु.200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67 प्रती घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने भरणा करणे आवश्यक आहे. रस्त्याचे कामासाठी एकुण 430 घ.मी. खडी लागली असुन रु.70.67 प्रती घ.मी. प्रमाणे रु.30,399/- रॉयल्टी वसुल करणे आवश्यक असता देयकामधून रु.24,682/- वसूल केली असलेने उर्वरित रु.5771 वसुल ठेकेदाराकडुन करण्यात यावी.

सांगली ईदगाह समोरील व्हील टेक गॅरेज लगतचे रस्यावरील पाणी पाईप लाईन चर दुरुस्त करणे हे काम महानगरपालिकेने स्वनिधीमधुन केले आहे.

रस्त्यावर पाण्याची पाईप लाईन टाकल्याने रस्त्यावर मोठ मोठ्या चरी खड्डे पडल्याने वाहतुकीस आडथळा निर्माण होत असून सदरचा रस्ता वाहतुकीचा असलेने वारंवार अपघात घडत असल्याने रस्ता तात्काळ करणेबाबत नगरसेवकांनी मागणी केले नुसार बांधकाम विभागाने प्रत्यक्षात पाहणी करून रु.3,96,783/- चे अंदाजपत्रक तयार केले आहे व त्यास नगर अभियंता यांनी दि.11.09.2012 रोजी तांत्रिक मान्यता दिली आहे. सदरची कामगिरी तात्काळ स्थायी समितीच्या 5 (2) (2) अन्वये मान्यतेने शक्य असलेने काम मंजुर सहकारी सोसायटीकडून करुन घेणेबाबतचा प्रस्ताव शहर अभियंता यांनी दिनांक 10.09.2012 केला आहे. त्यास आयुक्त यांची दि.18.09.2012 रोजी मान्यता झाली आहे. फेडरेशनने जा.क्र. फेड/काम/सन/2012/641 दि.30.10.2012 अन्वये काम जे.के.मजुर सह.सोसायटी वाटप केलेचे महानगरपालिकेस कळविले आहे. त्यास महासभेने ठराव क्रमांक 233 दि.20.12.2012 ने मान्यता दिली आहे व शहर अभियंता यांनी दि.14.01.2012 रोजी कार्यादेश दिलेला आहे.

**प्रमाणक क्रमांक : 6978 दि. : 12.03.2013 रक्कम: 3,95,117/-**

अंदाजपत्रकीय रक्कम : 3,96,783/- निविदा रक्कम: 3,96,783/-

प्रशासकीय मान्यता : मा.महासभा ठ.क्र.233 दि. 20.12.2012.

तांत्रिक मान्यता : 761 दि.11.09.2012.

ठेकेदाराचे नांव : जे.के. मजुर सोसायटी, मिरज.

कार्यादेश क्रमांक / दिनांक : 968 / दि. 14.01.2013.

कामाची मुदत : 30 दिवस काम पुर्ण दिनांक : 08.02.2013

मोजमाप पुस्तक क्रमांक : 11 पृष्ठ क्रमांक : 23

| |
|---|
| उपरोक्त कामाची नस्ती,मोजमाप पुस्तिका क्र.11 व देयकाची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र. 98 दि.24/07/14 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.12/08/14 रोजी लेखापरीक्षणास सादर केले आहे. बांधकाम विभागाने दिलेल्या अनुपालनाचे अवलोकन करुन खालील आक्षेप घेणेत येत आहे.<br>1. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67 प्रती घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. देयकासोबत ठेकेदाराने रॉयल्टी रक्कम भरलेचा कोणताही पुरावा सोबत जोडला नसल्याने बांधकाम विभागाने देयकामधुन पुढील प्रमाणे रॉयल्टीची रक्कम कपात केली आहे. रॉयल्टी बाब क्र.2 हार्ड मुरुम 177.90 घ.मी. + 60mm खडी 137.50 घ.मी. + सॉफ्ट मुरुम 34.21 घ.मी. + BBM 75mm चे काम 754.87 चौ.मी.झाले असुन त्यास 0.108 घ.मी./ चौ.मी.प्रमाणे 80.55 घ.मी.खडी लागली आहे. रस्त्याचे कामासाठी एकुण 430 घ.मी. खडी लागली असुन रु.70.67 प्रती घ.मी. प्रमाणे रु.30,399/- रॉयल्टी वसुल करणे आवश्यक असता देयकामधून रु.24,682/- वसूल केली असलेने उर्वरित रु.5771/- ठेकेदाराकडुन वसुल करण्यात यावेत. अनुपालनामध्ये उर्वरित रॉयल्टी वसुलीची कार्यवाही चालु असलेबाबत नमुद आहे. परंतु रॉयल्टी रक्कम रु. 5771/- वसुल करुन लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नाही.<br>**वसुलपात्र रक्कम रु.5771/-** |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 98 | 24/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |

| 50 | सांगली जिल्हा परिषद अध्यक्ष निवास ते सहयाद्रीनगर शासकीय निवासस्थानापर्यंत द+उ रस्ता डांबरी करणे या कामातील अनियमिततेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | मनपा | 9ड | 03 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 338226 | | | |

निविदेची अंदाजपत्रकीय रक्कम रु.16,59,082/-असुन निविदा 18.47 टक्के जादा दराने आली आहे. काम शासनाच्या विशेष निधीमधुन करण्यात आल्याने जादाची रक्कम रु.306432/- महानगरपालिका निधीमधुन खर्च करणे आवश्यक असता ती शासन निधीमधुन खर्च केली आहे.

सांगली जिल्हा परिषद अध्यक्ष निवास ते सहयाद्रीनगर शासकीय निवासस्थानापर्यंत द+उ रस्ता डांबरी करणे हे काम शासनाकडुन रस्ते विकासासाठी मिळालेल्या विशेष निधीमधुन करण्यात आले आहे.

**प्रमाणक क्रमांक : 7645 दि. : 30.03.2013 रक्कम : 19,68,699/-**

अंदाजपत्रकीय रक्कम : 16,59,082/-

प्रशासकीय मान्यता : मा.आयुक्त निर्णय क्र. 279 ,दि. 11.11.2011

स्थायी समिती सभा क्र.03, ठराव क्रं. 63 दि. 02.05.2012

तांत्रिक मान्यता : 390 दिनांक : 16.06.2011

निविदा दिनांक : 23.11.2011

एकूण प्राप्त निविदा : 03 निविदा उघडली दिनांक : 09.12.2011

ठेकेदाराचे नांव : बी.बी. गुंजाटे

कार्यादेश दि.17.12.2012 .

कामाची मुदत : 120 दिवस काम पुर्ण दिनांक : 10.01.2013

मोजमाप पुस्तक क्रमांक : 11 पृष्ठ क्रमांक : 76 व 77

शासन निर्णय क्रमांक जीईएन-2010/प्र.क्र.-131/नवि-16 दि.21.02.2011 (रु.56,06,359/-) व शासन निर्णय क्रमांक जीईएन-2010/प्र.क्र.-3/नवि-16 दि.30.03.2011 (रु.55,72,623/-) अन्वये 2011-2012 या आर्थिक वर्षासाठी महापालिका क्षेत्रात विकास कामासाठी शासनाकडून रस्ता अनुदानातंर्गत रक्कम रुपये 1,11,78,982/- अनुदान प्राप्त असून त्यामधील 10 कामांना मा.आयुक्त निर्णय क्रमांक 279/2011-12 दि.11/11/2011 अन्वये रितसर जाहीर निविदा मागवून कामगिरी करण्यास मान्यता झाली आहे. त्या प्रमाणे दि.23.11.2012 रोजीच्या दै.पुढारी या वर्तमानपत्रातुन जा.क्र.6/2011-12 अन्वये नोंदणीकृत मक्तेदार यांचेकडून ई निविदा पध्दतीनुसार ऑनलाईन निविदा मागविण्यात आल्या होत्या.

निविदा प्राप्त ठेकेदार:- 1) श्री.बी.बी.गुंजाटे - 20% जादा , 2) ज्योती कन्स्ट्रक्शन - 22.5% जादा 3) शिव पार्वती कन्स्ट्रक्शन - 24.75% जादा ने निविदा आल्या आहेत. सर्वात कमीची निविदा 20% जादाने आली असून नगर अभियंता कार्यालयाने भारत पेट्रोलियम लिमिटेड यांचे दि.16.01.2012 च्या डांबराच्या दरपत्रकाशी निविदेमधील डांबराच्या दराचे दरपृथ:करण केले असता निविदा 18.74%

जादाने येते म्हणजेच अंदाजपत्रकातील दरापेक्षा निविदा 1.28% जादाने आलेली आहे. उपआयुक्त यांचे समवेत दि.31.01.2012 रोजी केलेल्या वाटाघाटीनुसार 18.47% जादाने म्हणजेच एस्टीमेट दराप्रमाणे काम करणेस ठेकेदाराने मान्य केले आहे. ठेकेदारास कामाचा कार्यादेश क्रमनपा/सां/बांधावि/751/2012-13 अन्वये दि.17.12.2012 रोजी दिला आहे.

उपरोक्त कामाची नस्ती,मोजमाप पुस्तिका क्र.11 व देयकाची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र. 99 दि.24/07/14 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.12/08/14 रोजी सादर केले आहे. बांधकाम विभागाने दिलेल्या अनुपालनाचे अवलोकन करुन खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1.बांधकाम विभागाने दिलेल्या परिपत्रकाप्रमाणे 15 लाखाच्या पुढे रु.1750/- फॉर्म फी घेणेची आहे. सदर कामासाठी एकूण 3 निविदा आल्या आहेत त्याची फॉर्म फी रु.1750 x 3 प्रमाणे रु.5250/- मनपा निधीत जमा झालेच्या पावत्या दाखविण्यात आलेल्या नसलेने रु.5250/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

2.महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु.200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67 प्रती घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. देयकासोबत ठेकेदाराने रॉयल्टी रक्कम भरलेचा कोणताही पुरावा सोबत जोडला नसतानाही बांधकाम विभागाने देयकामधुन रॉयल्टीची रक्कम कपात न करता ठेकेदारास आदा केली आहे. रस्त्याचे कामासाठी 40mm, खडी 28.36 घ.मी. + 75 BBM सरफेस करणेचे काम 188.80 घ.मी. झाले असुन त्यासाठी 0.108 घ.मी.प्रमाणे एकुण खडी 20 घ.मी. लागली आहे. B.M. चे काम 161 घ.मी. झाले असुन त्यासाठी एकुण खडी 1.41 घ.मी. प्रमाणे 227.71 घ.मी. लागली आहे. 25mm जाडीचे SDBC काम 95.96 घ.मी. झाले असुन त्यासाठी एकुण खडी 1.48 घ.मी.प्रमाणे 142.02 घ.मी. लागली आहे. एकूण खडी 418.09 घ.मी.x रु.70.67 प्रती घ.मी. प्रमाणे रॉयल्टी रु.29,546/- घेणे आवश्यक होते. परंतु देयकामधुन रु.3002/- रॉयल्टी पोटी कपात केलेने उर्वरित रॉयल्टीची रक्कम रु.26,544/- ठेकेदाराकडुन वसुल करणेत यावी. अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालनामध्ये बी.एम. व सेमीडेन्स मधील खडी क्रश्ड खडी असल्याने व उत्खनन केली नसलेने त्यामधील खडीची रॉयल्टी घेतली नसल्याचे नमुद आहे. परंतु क्रश्ड खडी ही उत्खनन केलेल्या कठीण दगडापासून तयार केली जात असल्याने रॉयल्टीची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे. त्यामुळे रॉयल्टी भरल्याचा योग्य पुरावा दाखविला नसल्याने रॉयल्टीची रक्कम रु.26,544/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

3. अर्धसमास ज्ञापन क्र. 99 दि.24/07/14 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने दि.12/08/14 रोजी सादर केलेल्या अनुपालनामध्ये शासनाच्या निधीमधुन काम केल्याने त्याच निधीमधुन रक्कम खर्ची टाकल्याचे नमुद आहे. निविदेची अंदाजपत्रकीय रक्कम रु.16,59,082/- असुन निविदा 18.47 टक्के जादा दराने आली आहे. काम शासनाच्या विशेष निधीमधुन करण्यात आले आहे. व शासनाने अंदाजपत्रकीय रक्कमेप्रमाणे कामास मंजुरी दिल्याने जादाची रक्कम रु.306432/- महानगरपालिका निधीमधुन खर्च करणे आवश्यक असता शासन निधीमधुन खर्च केली आहे. या शासन निधीमधुन 10 कामांना अंदाजपत्रकीय दराने मान्यता दिल्यामुळे या निधीमधून करण्यात येत असलेल्या अन्य विकास कामांना निधी कमी पडुन ती कामे रखडणार आहेत.

| |
|---|
| **आक्षेपाधिन रक्कम :-** अंदाजपत्रकीय रक्कम रु.16,59,082/- च्या 18.47 टक्के जादाने आलेली रक्कम रु.306432/- + रॉयल्टी रक्कम रु. 26,544/- + निविदा फॉर्म रक्कम रु.5250 = रु.338226/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 99 | 24/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 51 | वॉ.क्र.54 मधील शिवाजी मंडई दुकान गाळे पूर्व बाजू समोरील फुटपाथ व चर दुरुस्त करणे या कामातील अनियमिततेबाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | मनपा | 9ड | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 12580 | | | |

| |
|---|
| महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु.200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67 प्रति घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा देयका सोबत जोडला नसल्याने रु.12580/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. |

| |
|---|
| लेखाशिर्ष : B 1819 टेलिफोन इलेक्ट्रीक, पाईपलाईन ड्रेनेज चर दुरुस्ती<br>**प्रमाणक क्रमांक : 7646 दि.: 30.03.2013 रक्कम: 4,81,385/-** |

अंदाजपत्रकीय रक्कम : 4,85,224/-  निविदा रक्कम : 4,85,224/-

प्रशासकीय मान्यता : मा.महासभा ठराव क्रमांक 299 दि. 20.12.2012.

तांत्रिक मान्यता : 629 दि. 13.09.2012

ठेकेदाराचे नांव : ओम माधावराव मजुर सह.सोसायटी, बेळंकी.

मजुर फेडरेशनकडुन जिल्हा उपनिबंधक यांचे पत्र जा.क्र. फेड/काम/सन/12/13 दि.27/11/12 ने काम मंजुर करण्यात आले आहे.

कार्यादेश क्रमांक / दिनांक : दि. 04.03.2013

कामाची मुदत : 45 दिवस  काम पुर्ण दिनांक : 23.03.2013

मोजमाप पुस्तक क्रमांक : 21  पृष्ठ क्रमांक : 9 ते 10

कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी काम मजुर सहकारी सोसायटीकडुन करुन घेण्याचा प्रशासकीय प्रस्ताव दि.13.09.2011ने केला असुन आयुक्त यांची प्रस्तावास मान्यता दि.15.10.2012 रोजी झाली आहे.

महासभा ठराव क्रमांक 299 दिनांक 20.12.2012
निविदा मंजुरी समज :- दि.18.01.2013
करारपत्र दिनांक 28.01.2013
कार्यादेश क्र.मनपा/सां/बांधावि/1211/2012-13 दि.04.03.2012.
उपरोक्त कामाची नस्ती,मोजमाप पुस्तिका क्र.21 व देयकाची तपासणी करुन खालील आक्षेप घेणेत येत आहेत.

1.महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु.200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67 प्रति घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. देयकासोबत ठेकेदाराने रॉयल्टी रक्कम भरलेचा कोणताही पुरावा सोबत जोडला नसतानाही बांधकाम विभागाने देयकामधुन रॉयल्टीची रक्कम कपात न करता ठेकेदारास आदा केली आहे. चर दुरुस्तीचे कामासाठी बाब क्र.2 हार्ड मुरुम पुरविणे 125.87 घ.मी. + बाब क्रं.4. 60mm खडी पुरविणे 34.98 घ.मी. + बाब क्र.8 मऊ मरुम पुरविणे 17.16 घ.मी. अशी एकुण खडी 178.01 घ.मी.लागली असुन रु.70.67 प्रति घ.मी. प्रमाणे रु.12580/- रॉयल्टीची रक्कम देयकामधुन कपात केली नसल्याने आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र. 100 दि.24/07/14 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.12/08/14 रोजी लेखापरीक्षणास सादर केले आहे. अनुपालनामध्ये रॉयल्टी भरल्याच्या

| |
|---|
| पावत्या सोबत जोडलेचे नमुद आहे. परंतु पावत्या सोबत नसल्याने रु.12580/-आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.<br>**आक्षेपाधिन रक्कम रु.12850/-** |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 100 | 24/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |
|---|---|

| 52 | सांगली मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय रस्त्यावरील चरी व फुटपाथ करणे या कामातील अनियमिततेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | मनपा | 9ड | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 18303 | | | |

| |
|---|
| महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67 प्रती घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा देयका सोबत जोडला नसल्याने रु.18303/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत. |

| |
|---|
| सुजल निर्माण योजने अंतर्गत नविन पाईप लाईन फुटपाथवरून टाकल्याने खुदाईमुळे फुटपाथ खराब झाल्याने व या ठिकाणी भाजी मंडई, शाळा असल्याने फुटपाथ वरुन सतत वर्दळ असल्याने सदर फुटपाथ तातडीने करणे आवश्यक असल्याने स्थायी समिती ठराव क्रं.402 दि.17.10.2006 नुसार सदरची |

कामगिरी मजूर सोसायटी मार्फत करणेचा प्रस्ताव प्रशासनाने दि.13.09.2012 रोजी तयार केला आहे. त्यास आयुक्तांची दि.25.10.2012 रोजी मान्यता झाली आहे. त्यानंतर स्थायी समिती मान्यतेसाठी शहर अभियंता यांनी सदर प्रस्ताव दि.29.11.2012 रोजी तयार केला असून उपायुक्त यांची दि.11.12.2012 रोजी मान्यता झाली आहे व महासभा क्र.09 दि.20.12.2012 , ठराव क्रमांक 301 ने सदर कामगिरी जिल्हा उपनिबंधक मजूर सोसा. सांगली यांनी शिफारस केले नुसार जय हनुमान सोसा.लि.सांगली ता.मिरज यांचेकडून करून घेणेस मान्यता झाली आहे.

प्रमाणक क्रमांक :- 7673 दि. :- 30.03.2013 रक्कम रु. :- 5,36,936/-

अंदाजपत्रकीय रक्कम रु.: 5,38,048/- महानगरपालिका निधी निविदा रक्कम रु.: 5,38,048/-

प्रशासकीय मान्यता : मा.महासभा ठराव क्रमांक 301 दि. 20.12.2012

तांत्रिक मान्यता : 778 दि. 13.09.2012

ठेकेदाराचे नांव : जय हनुमान मजुर सोसा., सांगली

कार्यादेश क्रमांक / दिनांक : दि. 04.03.2013

कामाची मुदत : 45 दिवस काम पुर्ण दिनांक : 18.03.2013

मोजमाप पुस्तक क्रमांक : 08 पृष्ठ क्रमांक : 83 ते 85

उपरोक्त कामाची नस्ती,मोजमाप पुस्तिका क्र.08 व देयकाची तपासणी करुन खालील आक्षेप घेणेत येत आहेत.

1)महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार ठेकेदाराने रॉयल्टी भरल्याच्या पुरावा देयकासोबत जोडणे आवश्यक आहे. तसा पुरावा देयकासोबत नसतानाही रॉयल्टीची रक्कम ठेकेदारास आदा केली आहे.बाब क्र.2 हार्ड मुरुम पुरविणे 166.48 + बाब क्र.4. 60mm खडी पुरविणे 81.22 घ.मी. + सॉफ्ट मुरुम पुरविणे 11.44 घ.मी. प्रमाणे एकुण गौण खनिज 259 घ.मी. वापरले असुन रु.70.67 प्रती घ.मी.प्रमाणे रु.18303/- रॉयल्टीची ठेकेदारास आदा केलेली रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

अर्धसमास ज्ञापन क्र.101 दि.24/07/14 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.12/08/14 रोजी लेखापरीक्षणास सादर केले आहे. अनुपालनामध्ये रॉयल्टी भरल्याच्या पावत्या सोबत जोडलेचे नमुद आहे. परंतु पावत्या सोबत नसल्याने रु.18303/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत

| |
|---|
| आहेत.<br><br>**आक्षेपाधिन रक्कम रु.18303/-** |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 101 | 24/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 53 | सांगली येथील अंबा भवन ते ईदगाह पर्यंत पाणी पुरवठा पाईप लाईन साठी खुदाई करण्या आलेली चर मुरुमाने दुरुस्त करणे कामातील अनियमिततेबाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | मनपा | 9ब | 03 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 30328 | 1989 | | |

| |
|---|
| महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67 प्रती घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा देयका सोबत जोडला नसल्याने रु.30328/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत. |

| |
|---|
| लेखाशिर्ष : 06) इतर योजना 001) विकास निधीतून होणारा खर्च<br>**प्रमाणक दाखविलेले नाही**<br>अंदाजपत्रकीय रक्कम रु.: 1,99,000/- निविदा रक्कम रु. : 1,99,000/- |

प्रशासकीय मान्यता : मा. स्थायी समिती ठ. क्र. 712 दि. 27.03.2012

तांत्रिक मान्यता : 861 दि. 17.02.2012

ठेकेदाराचे नांव : ओम माधवराव मजुर सह.सोसा.लि.बेळंकी

कार्यादेश दिनांक : दि. 23.04.2012

कामाची मुदत : 30 दिवस काम पुर्ण दिनांक : 20.05.2012

मोजमाप पुस्तक क्रमांक : 11 पृष्ठ क्रमांक : 61 व 62

उपरोक्त कामाची नस्ती,मोजमाप पुस्तिका क्र.11 व देयकाची तपासणी करुन खालील आक्षेप घेणेत येत आहे.

1)महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार ठेकेदाराने रॉयल्टी भरल्याच्या पुरावा देयकासोबत जोडणे आवश्यक आहे. तसा पुरावा देयकासोबत नसतानाही रॉयल्टीची रक्कम ठेकेदारास आदा केली आहे. बाब क्र.2 हार्ड मुरुम पुरविणे 429.16 घ.मी. x रु.70.67 प्रती घ.मी.प्रमाणे रु.30,328/- रॉयल्टीची रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

2)उद्योग उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्र.बीसीए-2009 प्रक्र108 /कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार पुर्वगणनपत्रकामध्ये 1% कामगार कल्याण उपकराचा समावेश केला आहे. परंतु देयकामधुन वसूल केला नसल्याचे रु.1,98,919/- च्या 1 टक्के प्रमाणे रु.1989/- वसुल करण्यात यावेत.

3)कामाची नस्ती व बांधकाम विभागाने ठेकेदारास प्रदान करावयाचे देयक तपासण्यात आले. परंतु लेखाशाखेकडुन ठेकेदारास प्रदान करण्यात आलेल्या रक्कमेचे प्रमाणक लेखापरीक्षणास दाखविलेले नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र.102 दि. 24/07/14 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.12/08/14 रोजी लेखापरीक्षणास सादर केले आहे. अनुपालनामध्ये रॉयल्टी भरल्याच्या पावत्या सोबत जोडलेचे नमुद आहे. परंतु पावत्या सोबत नसल्याने रु.30328/-आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत. तसेच कामगार कल्याण उपकर ठेकेदाराच्या अन्य देयकामधुन वसुल करणेत येत असलेचे नमुद आहे. परंतु उपकर वसुल करण्यात आला नसलेने उपकर रु.1989/- वसुलपात्र करण्यात येत आहेत.

**आक्षेपाधिन रक्कम :- रॉयल्टी रक्कम रु.30328/-**

**वसुलपात्र रक्कम :- कामगार कल्याण उपकर रु.1989/-**

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 102 | 24/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |
|---|---|

| 54 | वॉ.क्र.48 व्हीजन रेसिडंन्सी समोरील 'L' टाईप रस्ता डांबरीकरण करणे या कामातील अनियमिततेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | मनपा | 9ब | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 11448 | | | |

महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67 प्रती घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा देयका सोबत जोडला नसल्याने रु.11449/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

वॉ.क्र.48 व्हीजन रेसिडंन्सी समोरील 'L' टाईप रस्ता डांबरीकरण करणे या कामाचे जाहीर प्रकटन क्र.9/12-13 अ.क्र.202 ची निविदा दै.पुढारी दि.11.08.2012 रोजी प्रसिध्द करण्यात आले असुन निविदा भरावयाचा अंतिम दिनांक 05.09.2012 आहे. एकूण 3 निविदा प्राप्त झाल्या असुन निविदा दि. 09.09. 2012 रोजी उघडण्यात आल्या आहेत.1) शितल शेवाळे 5.75% जादा , 2) अे.अे.पाटील 9.9% जादा 3) एस.एस.हिंगे 12% जादा ने आल्या आहेत. श्री.शितल शेवाळे यांनी शहर अभियंता यांचे बरोबर दि.17.12.2012 रोजी झालेल्या वाटाघाटीनुसार अंदाजपत्रकीय दराने काम करणेस तयार असलेचे पत्र दिले आहे. आयुक्तांची ठेकेदाराकडून काम करुन घेणेस मंजुरी दि.15.01.2013 रोजी झाली आहे. त्यानंतर शहर अभियंता यांनी कामाचे करारपत्र करणेस दि.28.02.2013 रोजी मंजुरी दिली आहे.

लेखाशिर्ष : 41820 महानगरपालिका निधी

प्रमाणक क्रमांक : 7627 दि. : 30.03.2013 रक्कम: 6,98,462/-

अंदाजपत्रकीय रक्कम : रु.7,00,000/-

प्रशासकीय मान्यता : मा. आयुक्त निर्णय क्र.265 दि. 08.06.2012

तांत्रिक मान्यता : 283 दि. 13.07.2012

निविदा दिनांक : 11.08.2012 मुदत : 45 दिवस

एकूण प्राप्त निविदा : 03 निविदा उघडली दिनांक : 09.10.2012

ठेकेदाराचे नांव : शितल व. शेवाळे

कामाची मुदत : 45 दिवस काम पुर्ण दिनांक : 18.03.2013

मोजमाप पुस्तक क्रमांक : 08 पृष्ठ क्रमांक : 80 ते 81

उपरोक्त कामाची नस्ती,मोजमाप पुस्तक क्र.08 व देयकाची तपासणी करुन खालील आक्षेप घेणेत येत आहेत.

1)महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख (3) दि.11/02/2010 नुसार ठेकेदाराने रॉयल्टी भरल्याच्या पुरावा देयकासोबत जोडणे आवश्यक आहे. बाब क्र.2 75mm BBM करणे 1505 चौ.मी. साठी 0.108 घ.मी. प्रती चौ.मी. प्रमाणे एकुण खडी 162.54 घ.मी. लागली असल्याने रु.70.67 प्रती घ.मी.प्रमाणे रु.11,448.54/- रॉयल्टीची रक्कम होते. रॉयल्टी भरल्याचा पुरावा दिला नसतानाही रॉयल्टीची रक्कम ठेकेदारास आदा केलेने रक्कम रु. 11,448.54/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र.103 दि. 24/07/14 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.12/08/14 रोजी लेखापरीक्षणास सादर केले आहे. अनुपालनामध्ये रॉयल्टी भरल्याच्या पावत्या सोबत जोडलेचे नमुद आहे. परंतु पावत्या सोबत नसल्याने रु.11448/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

**आक्षेपाधिन रक्कम:- रॉयल्टी रक्कम रु.11448/-**

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 103 | 24/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |
|---|---|

| 55 | वॉ.क्र.54 मधील सांगली बापट बाल शाळा ते आशिर्वाद बिल्डींग समोरील पूर्व बाजूच्या रस्त्यास फुटपाथ करणे याकामातील अनियमिततेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | मनपा | 9ड | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 11340 | | | |

महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार ठेकेदाराने रॉयल्टी भरल्याचा पुरावा देयकासोबत जोडणे आवश्यक आहे. तसा पुरावा देयकासोबत नसतानाही हार्ड मुरुम 120.35 + 60 mm मेटल 28.60 + सॉफ्ट मुरुम 11.52 = 160.48 घ.मी. x रु.70.67 प्रती घ.मी. = रु.11,340.41/- देयकातून ठेकेदारास दिली असल्याने रॉयल्टीची रक्कम रु.11340/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

वॉ.क्र.54 मधील सांगली बापट बाल शाळा ते आशिर्वाद बिल्डींग समोरील पूर्व बाजूच्या रस्त्यास फुटपाथ करणे हे काम लेखाशिर्ष : B-1819 टेलिफोन, ड्रेनेज चर दुरुस्ती महानगरपालिका निधीमधून करणेत आले आहे.

**प्रमाणक क्रमांक : 7674 दि. : 30.03.2013 रक्कम रु : 5,19,583/-**

अंदाजपत्रकीय रक्कम रुपये: 5,16,852/-

प्रशासकीय मान्यता : मा. महासभा ठराव क्रमांक 300 दि. 20.12.2012

तांत्रिक मान्यता : 777 दि. 13.09.2012

| |
|---|
| ठेकेदाराचे नांव : विश्वनाथ मजुर सहकारी सोसायटी, मिरज.<br><br>जिल्हा उपनिबंधक यांनी मजुर फेडरेशन मार्फत जा.क्र. फेड/काम/सन/2012/1055/ दि.27.11.2012 ने कामाचे वाटप करण्यात आले.<br><br>कार्यादेश क्रमांक / दिनांक : दि. 04.03.2013<br><br>कामाची मुदत : 45 दिवस काम पुर्ण दिनांक : 18.03.2013<br><br>मोजमाप पुस्तक क्रमांक : 08 पृष्ठ क्रमांक : 82 व 83<br><br>उपरोक्त कामाची नस्ती,मोजमाप पुस्तक क्र.08 व देयकाची तपासणी करुन खालील आक्षेप घेणेत येत आहेत.<br><br>1)महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार ठेकेदाराने रॉयल्टी भरल्याच्या पुरावा देयकासोबत जोडणे आवश्यक आहे. तसा पुरावा देयकासोबत नसतानाही हार्ड मुरुम 120.35 + 60 mm मेटल 28.60 + सॉफ्ट मुरुम 11.52 =160.48 घ.मी. x रु.70.67 प्रती घ.मी. = रु.11,340.41/- देयकातून ठेकेदारास दिली असल्याने रॉयल्टीची रक्कम रु.11340/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.<br><br>अर्धसमास ज्ञापन क्र.104 दि. 24/07/14 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.12/08/14 रोजी लेखापरीक्षणास सादर केले आहे. अनुपालनामध्ये रॉयल्टी भरल्याच्या पावत्या सोबत जोडलेचे नमुद आहे. परंतु पावत्या सोबत नसल्याने रु.11340/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.<br><br>**आक्षेपाधिन रक्कम :- रॉयल्टी रक्कम रु.11340/-** |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 104 | 24/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |

| | |
|---|---|
| 56 | वॉ.क्र. 59 सांगली गणेशनगर स्विमिंग टँक सर्कल रोडला फुटपाथ करणे या कामातील |

| | |
|---|---|
| | अनियमिततेबाबत. |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव |
| | नागरी दलित वस्ती सुधार योजना. |

| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 04 | सार्व.बांधकाम | मनपा | 9ड | 02 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 99043 | | | |

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम क्र.165 प्रमाणे कामाचे अंतिम तपशीलवार अंदाज तयार करण्याअगोदर जागेबाबत स्थानिक निरीक्षण करणे आवश्यक आहे. कामाच्या जागेचे निरीक्षण अंदाजपत्रक तयार करण्यापूर्वी केले नसलेने कामास एक वर्षापेक्षा जास्त विलंब लागला आहे.

वॉर्ड क्रमांक 59 सांगली गणेशनगर स्विमिंग टँक सर्कल रोडला फुटपाथ करणे या कामाचे जाहीर प्रकटन क्र.1/201-12 ने दै.पुढारी या वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आले असून, दि.26.08.2011 रोजी इ टेंडर समिती समोर उघडण्यात आल्या आहेत. एकूण 3 निविदा प्राप्त असून श्री. सज्जन जयवंत पाटील यांची सर्वात कमीची 0.21 टक्के दराची निविदा मान्य करण्यात आली आहे. 2011-12 या आर्थिक वर्षात दोन धावती देयके देण्यात आली असून तिसरे व अंतिम बील रक्कम रुपये 99,043/- चे 2012-13 या आर्थिक वर्षात देण्यात आले आहे.

नस्तीचे आवलोकन केले असता नगर अभियंता यांनी कामाची वर्क ऑर्डर दि.31.12.2011 रोजी दिली आहे व दि. 04.01.2012 चे पत्रामध्ये सदर ठिकाणी अतिक्रमण असलेने व ड्रेनेज लाईन टाकणेचे काम सुरु असल्याने पुढील निर्णय होई पर्यंत कामगिरी दि. 05.01.2012 पासून तात्पुरती स्थगिती ठेवली आहे. त्यानंतर दि.13.01.2013 चे पत्रान्वये अतिक्रमण काढलेने व ड्रेनेज लाईन टाकणेचे काम पूर्ण झालेने काम तात्काळ पूर्ण करणेचे आदेश ठेकेदारास दिलेले आहेत.

प्रमाणक क्रमांक : 314 दि. : 30.03.2013 रक्कम रु. : 99,043/-

अंदाजपत्रकीय रक्कम रु. : 2,29,000/-
प्रशासकीय मान्यता : मा. आयुक्त निर्णय क्र. 333/2011-12 दि. 07.12.2011 ,
स्थायी समिती ठराव क्र. 175 , ठराव क्र.52 दि.22.07.2011

| |
|---|
| तांत्रिक मान्यता : 363 दि. 02.12.2010<br>निविदा दिनांक : 12.07.2011<br>एकूण प्राप्त निविदा : 03 निविदा उघडली दिनांक : 30.08.2011<br>ठेकेदाराचे नांव : सज्जन पाटील<br>कार्यादेश क्रमांक / दिनांक : 4489 दि. 28.12.2011<br>कामाची मुदत : 60 दिवस काम पुर्ण दिनांक : 28.02.2013<br>मोजमाप पुस्तक क्रमांक : 30 पृष्ठ क्रमांक : 7<br>उपरोक्त कामाची नस्ती,मोजमाप पुस्तक क्र.30 व देयकाची तपासणी करुन खालील आक्षेप घेणेत येत आहेत.<br>1)महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम क्र.165 प्रमाणे कामाचे अंतिम तपशीलवार अंदाज तयार करण्याअगोदर जागेबाबत स्थानिक निरीक्षण करणे आवश्यक आहे. कामाच्या जागेचे निरीक्षण अंदाज तयार करण्यापूर्वी केले नसलेने कामास एक वर्षापेक्षा जास्त विलंब लागला आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये जलनिस्सा:रण विभागाने ड्रेनेज पाईपलाईन टाकण्याचे काम चालु केल्याने काम चालु करण्यास विलंब लागला असल्याचे नमुद आहे. यावरुन महानगरपालिकेच्या बांधकाम व पाणीपुरवठा विभागामध्ये योग्य समन्वय नसल्याचे दिसून येते.<br>2)लेखापरीक्षणास मोजमाप पुस्तिका दाखविण्यात आली नसल्याने कामाची बाबवार परिमाणे तपासता आलेली नाहीत. अर्धसमास ज्ञापन क्र.105 दि. 24/07/14 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि. 18/10/14 रोजी तीन महिने विलंबाने लेखापरीक्षणास सादर केले आहे. अनुपालनामध्ये मोजमाप पुस्तक दाखविण्यात येईल असे नमुद केले आहे. परंतु मोजमाप पुस्तक लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेले नाही.<br>**आक्षेपाधिन रक्कम रु.99043/-** |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 105 | 24/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |

| | |
|---|---|
| 57 | वॉ.क्र. 6 कुपवाड सुर्यप्रभा हौसी.सोसा. मधील श्री.वाघामारे घर ते माने घर पु + प रस्ता करणे या कामातील अनियमिततेबाबत. |

| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | नागरी दलित वस्ती सुधार योजना. | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | मनपा | 9ड | 02 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 211770 | | | |

रस्त्याचे कामास हार्ड मुरुम पुरविणे एकुण परिमाण 522 घ.मी.साठी रु. 393.70/- प्रति घ.मी.दर दरपृथ:करणाने ठरविला आहे. परंतु दरपृथ:करण दाखविले नसलेने हार्ड मुरुमाची आदा केलेली रक्कम रु.2,05,511/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

वॉर्ड क्रमांक 6 कुपवाड सुर्यप्रभा हौसीग सोसायटी मधील श्री.वाघामारे घर ते माने घर पुर्व- पश्चिम रस्ता करणे हे काम शासनाकडुन नागरी दलित वस्ती सुधार योजनेसाठी मिळालेल्या निधीतुन केले आहे.

प्रमाणक क्रमांक . 299 दि. 09.11.2012 रक्कम रु. 2,11,777/-

अंदाजपत्रकीय रक्कम : 2,16,600/-

प्रशासकीय मान्यता:- आरआर/क्रमांक/नपा/आरआर/462 जिल्हाधिकारी कार्या. सांगली, दि.27/7/2012.

तांत्रिक मान्यता:-शहर अभियंता यांचे कडील क्र.र.न.28 दि.20/04/12.

स्थायी समिती ठराव नं.243 दि.29/8/12 ने मंजुरी.

मा.आयुक्त निर्णय क्र.332 दि.7/12/2011ने मंजुरी.

ठेकेदाराचे नांव : व्यास विजय गोरे

कार्यादेश क्रमांक / दिनांक : दि. 28.09.2012

कामाची मुदत : 30 दिवस काम पुर्ण दिनांक : 10.10.2012

मोजमाप पुस्तक क्रमांक : 1 पृष्ठ क्रमांक : 12-13

उपरोक्त कामाची नस्ती,मोजमाप पुस्तक क्र.01 व देयकाची तपासणी करुन खालील आक्षेप घेणेत येत आहेत.

1)महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु.200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67 प्रती घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे.

| |
|---|
| देयकासोबत ठेकेदाराने रॉयल्टी रक्कम भरलेचा कोणताही पुरावा सोबत जोडला नसतानाही बांधकाम विभागाने देयकामधुन रॉयल्टीची रक्कम कपात न करता दिलेली आहे. त्यामुळे ठेकेदारास देयकामधुन बाब क्र.01 हार्ड मुरुम पुरविणे साठी 522 घ.मी. x रु.70.67 प्रती घ.मी. प्रमाणे आदा केलेली रु.36,889/- रॉयल्टी रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.<br>2)हार्ड मुरुम पुरविणे या बाबीचे एकुण परिमाण 522 घ.मी.साठी रु. 393.70/- प्रति घ.मी.दर दरपृथ:करणाने ठरविला आहे. परंतु दरपृथ:करण दाखविले नसलेने रु.2,05,511/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.<br>अर्धसमास ज्ञापन क्र.106 दि. 24/07/14 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.9/10/2014 रोजी अडीच महिने विलंबाने दिले आहे. रॉयल्टीच्या पावत्या दाखविण्यात आलेचे नमुद आहे. परंतु पावत्या दाखविण्यात आलेल्या नाहीत. तसेच दरपृथ:करण सोबत जोडण्याची दक्षता घेण्याचे नमुद केले आहे. परंतु दरपृथ:करण दाखविण्यात आलेले नाही. त्यामुळे अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.<br>**आक्षेपाधिन रक्कम :-** रॉयल्टी रक्कम रु. 36,889/- + हार्ड मुरुमाची दरपृथ:करणाने ठरविलेली रक्कम रु. 2,05,511/- = रु.242400/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 106 | 24/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 58 | वॉर्ड क्रं.65 मिरज येथील शिकलगार गल्ली रस्त्यांना पेव्हींग ब्लॉक्स बसविणे या कामातील अनियमितते बाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | नागरी दलित वस्ती सुधार योजना. | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | राज्य शासन | 9ब | 05 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 153007 | 2673 | | |

| |
|---|
| सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम 150 प्रमाणे स्विकृत निविदेची किंमत मंजूर अंदाजपत्रकाच्या 10 % ने कमी असेल तर मुळ अंदाजपत्रक रद्द करुन घट अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. ठेकेदाराची 37.21 टक्के सर्वात कमी दराची निविदा मान्य करणेत आलेली आहे. परंतु नियमाप्रमाणे घट अंदाजपत्रक तयार करुन सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आलेली नाही. |

वॉर्ड क्रं.65 मिरज येथील शिकलगार गल्ली रस्त्यांना पेव्हींग ब्लॉक्स बसविणे हे काम राज्य शासनाकडुन दलित वस्ती सुधार योजनेसाठी मिळालेल्या निधीतुन केले आहे.

**प्रमाणक क्र. 315 दि. 30/03/13 रक्कम रु.168840/-**

निविदा रक्कम 269300/-

प्रशासकीय मान्यता:-आरआर/क्रमांक/नपा/आरआर/462 जिल्हाधिकारी कार्यालय सांगली,दि.27/7/2012

तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता यांचे कडील क्र.र.न.24 दि.20/04/12

स्थायी समिती ठराव नं.243 दि.29/8/12 ने मंजुरी.

जाहीर प्रकटन क्रं.2/2012/13 दि.08/09/2012 दै.पुढारी या वर्तमानपत्रामध्ये निविदा प्रसिध्द करण्यात आली.

निविदा दि.08/09/2012. मुदत :- 18/09/12

एकुण :- प्राप्त 8 निविदा, निविदा उघडली दि.12/10/12

ठेकेदाराचे नाव :- श्री.जी.व्ही.पाटील, सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांची 37.21% सर्वात कमी दराची निविदा मान्य करणेत आलेली आहे.

कार्यादेश :- मनपा/मागास समिती/163/2012/13.471दि.29/12/12.

मुदत :- 30 दिवस.

काम पुर्ण दि.28/01/2012.

मोजमाप पुस्तक क्र.12 पृष्ठ क्र.5 ते 6

उपरोक्त कामाची नस्ती,मोजमाप पुस्तक क्र.12 व देयकाची तपासणी करुन खालील आक्षेप घेणेत येत आहेत.

1) नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक विघयो-102000/1592/प्र.क्र.189/नवि-4 दि.5 मार्च 2002 मधील परी.7 मधील अ नुसार बांधकाम विषयक कामासाठीचे रेखांकन/नकाशे नगररचना विभागाने मंजुर

केले आहेत परंतु प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 नुसार सुसंगत असलेबाबत तसेच विकास योजनेचा जमीन वापर व आरक्षणाबाबत सखोल छाननी करुन अहवाल शासन निर्णयाप्रमाणे देणे आवश्यक असता सदर जागेवर कोणतेही आरक्षण नसलेचा अहवाल नगररचना विभागाने दिलेला नाही. जिल्हाधिकारी कार्यालय सांगली,नगरपालिका प्रशासन शाखा यांचे पत्र क्रमांक /नपा /आर आर / 462/2012 दि.27/07/2012 अन्वये देण्यात आलेल्या प्रशासकिय मान्यतेच्या आदेशामध्ये अट क्र. 3 नुसार प्रस्तावित केलेली कामे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या मालकीच्या /ताब्यात असलेल्या जमिनीवर घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असल्या बाबतचा कोणताही अनुषंगिक पुरावा सोबत जोडण्यात आलेला नाही.

2)पुर्वगणन पत्रकामध्ये अंतर्भुत असलेल्या बाबींच्या समोर सार्वजनिक बांधकाम विभागाची कोणत्या वर्षाची विभागिय दरसुची वापरली आहे ते वर्ष व पृष्ठ क्रमांक नमुद नसलेने कोणत्या वर्षाची विभागीय दरसुची वापरली आहे ते समजुन येत नाही. अनुपालनामध्ये दरसूचीचे सॉफ्टवेअर वापरुन एस्टिमेट तयार केले असल्याने या पुढे रेट ॲनॅलिसिसची प्रत सोबत जोडणेची दक्षता घेण्यात येईल असे नमुद आहे. परंतु दरसूची दाखविलेली नसल्याने दराबाबत खात्री करता येत नाही.

3)ठेकेदाराची 37.21% सर्वात कमी दराची निविदा मान्य करणेत आलेली आहे. परंतु सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम 150 प्रमाणे स्विकृत निविदेची किंमत मंजूर अंदाजपत्रकाच्या 10% ने कमी असेल तर मुळ अंदाजपत्रक रद्द करुन घट अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे घट अंदाजपत्रक तयार करुन सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आलेली नाही. दिलेल्या अनुपालनामध्ये घट अंदाजपत्रक तयार करण्यात आली नसल्याचे मान्य करणेत आले आहे.

4)मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणी केली असता बाब क्र.1 हार्ड मुरुम 36 घ.मी. वापरला आहे तसेच बाब क्रं. 2 सिमेंट कॉंक्रीट 1:4:8 चे काम 23.97 घ.मी. केलेले आहे. त्यासाठी एकुण खडी 23.97 घ.मी. व वाळु 10 घ.मी. असे एकुण गौण खनिज 69.97 घ.मी. वापरल्याची नोंद आहे परंतु महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार ठेकेदाराने रॉयल्टी भरल्याच्या पुरावा देयकासोबत जोडणे आवश्यक आहे. तसा पुरावा देयकासोबत नसतानाही रॉयल्टीची रक्कम ठेकेदारास आदा केल्याने रु.70.67 प्रती घनमिटर प्रमाणे रु.4944/- वसुल करण्यात यावेत. दिलेल्या अनुपालनामध्ये रॉयल्टी पावत्या पाहुन तपासणी केल्याने रॉयल्टी वसूल केली नसल्याचे नमुद आहे. परंतु लेखापरीक्षणास पावत्या दाखविल्या नसल्याने रॉयल्टी रक्कम रु.4944/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

5)नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 177 प्रमाणे नमुना क्र.133 प्रमाणे काम पुर्ण केलेचे प्रमाणपत्र देयका सोबत जोडले आहे. त्यामध्ये काम पुर्ण दि. 28/01/13 रोजी झालेचे नमुद असुन

| |
|---|
| कामाची मोजमापे दि.25/03/13 रोजी घेतल्याचे शहर अभियंता यांनी प्रमाणित केले आहे. काम पुर्ण झाल्यानंतर मोजमापे घेण्यास विलंब का झाला याचा खुलासा बांधकाम विभागाने अनुपालनामध्ये केला असुन अंतिम मोजमापे ठेकेदारासमोर घेणे आवश्यक आहे परंतु ठेकेदार विलंबाने मापे घेण्यास हजर झाल्याने मोजमापे घेण्यास विलंब झाल्याचे नमुद आहे. परंतु विलंबा बाबतची अनुषंगिक कागदपत्रे सोबत जोडली नसल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.<br>6)प्राकलनामध्ये कामगार कल्याण उपकर 1% धरलेने देयकामधुन वसुल करणे आवश्यक होते. उद्योग उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/ कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार पुर्वगणनपत्रक रु.267300/-च्या 1% प्रमाणे रु.2673/- वसुल करणेत आलेला नाही. अर्धसमास ज्ञापन क्र.73 दि.14/07/14 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.09/10/14 रोजी अडीच महिने विलंबाने सादर केले आहे. अनुपालनामध्ये कामगार कल्याण उपकर वसुल करण्याचे मान्य केले आहे. परंतु उपकर वसुल केलेला नाही.<br>7)कामाच्या ठिकाणी 60 मी.मी. जाडीचे पेव्हिंग ब्लॉक्स 261.48 चौ.मी. क्षेत्रावर बसवलेचे मोजमाप पुस्तकामध्ये नमूद आहे व 566.25 चौ.मी. प्रमाणे रु.1,48,063/- ठेकेदारास आदा केले आहेत. परंतू पेव्हिंग ब्लॉक्स योग्य स्पेसिफिकेशन प्रमाणे असलेबाबत व वापरणेस योग्य असलेबाबतचा प्रयोग शाळेचा गुणवत्ता चाचणी अहवाल न घेताच देयक अदा केलेने रु.1,48,063/- आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये प्रयोगशाळा गुणवत्ता अहवाल घेतला नसल्याचे मान्य केले असल्याने रु.148063/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.<br>**आक्षेपाधिन रक्कम:-पेव्हिंग ब्लॉक्सची रक्कम रु.1,48,063/- + रॉयल्टी रक्कम रु.4944/-= रु.153007/-**<br>**वसुलपात्र रक्कम :- कामगार कल्याण उपकर रु.2673/-** |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 95 | 24/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |

| | |
|---|---|
| 59 | इंदिरा घरकुल मिरज स.न.138/ब येथे 682 घरकुलाचे पायाभुत सुविधासह |

| | |
|---|---|
| | बांधकाम करणे या कामातील अनियमिततेबाबत. |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव |
| | |

| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 04 | सार्व.बांधकाम | केंद्र,राज्य व मनपा | 9ब | 17 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 19141706 | 9287184 | | |

महासभेने 2012-13 च्या जिल्हा दरसूचीनुसार 682 घरकुलांना मान्यता दिली आहे. 2012-13 च्या जिल्हा दरसूचीनुसार प्रती घरकुल रु. 281510/- व मुलभुत पायाभुत सुविधेसाठी प्रती घरकुल रु.118151/- प्रमाणे काम मंजुर केले आहे. शासनाकडुन प्रती घरकुल 1 लाख अनुदान मिळणार असल्याने उर्वरित रक्कम रु.299661 प्रती घरकुलप्रमाणे 682 घरकुल x रु.299661/- = रु.204368802/- ची तरतुद महानगरपालिकेने स्वनिधीमधुन करणे आवश्यक असताना 2012-13 च्या अंदाजपत्रकामध्ये तरतुद करण्यात आलेली नाही. तसेच 2012-13 या आर्थिक वर्षात ठेकेदारास रु. 20058450/- आदा केले असुन सर्व देयके शासन निधीमधुन खर्ची टाकण्यात आली आहेत. सदर वित्तिय अनियमिततेमुळे महानगरपालिकेच्या दायित्वामध्ये वाढ होवुन योजनेची प्रगती रेंगाळली असल्याचे स्पष्ट होते.

एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत टप्पा क्र. 2 मध्ये 3798 घरकुल बांधणे कामी दि.26 फेब्रु. 2009 रोजी केंद्रिय मान्यता समितीने रु.93.88 कोटी रक्कमेच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे. या प्रकल्पामध्ये मनपा मालकीच्या 5 व शासन मालकीच्या दोन अशा 7 झोपडपट्टीच्या जागेवरील 3798 झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव आहे. या प्रकल्पाच्या प्रस्तावामध्ये एकुण 3798 लाभार्थींची यादी केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार केली आहे. या एकुण 3798 घरकुलापैकी 2105 झोपडीधारकांना आहे त्याच जागेवर घरकुले दिली जाणार असुन 1693 झोपडीधारकांना त्यांचे लगतच्या प्रस्तावित घरकुलांच्या जागेमध्ये स्थलांतरीत केले जाणार आहे. या कामासाठी यापुर्वी दि.7/4/2010 रोजी 9.63% जादा दराची निविदा मे.स्ट्रेसक्रीट इंडिया लि.यांचे नावे मंजुर करण्यात आली होती. तथापी लाभार्थ्यांनी बैठ्या घरांची मागणी केल्याने तसेच त्यांनी कोर्टाकडुन स्थगिती आदेश आणल्याने दिड वर्षाचा कालावधी संपल्यानंतरही काम चालु करण्यात आले नव्हते. असे टिपणी मध्ये

नमुद आहे. याच जागेशेजारील रिकाम्या जागेवर बांधकाम करण्याबाबत ठेकेदारास कळविले असता त्यांनी जादा दराची मागणी केली. त्यामुळे दि.09/11/11 रोजी आयुक्त यांच्या मान्यतेने निविदा रद्द करण्यात आली.

एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे पत्र जा.क्र./मु.अ.र./ उपमुअ.2/जेएनयुआरएम सेल//09 दि.2/3/2009 चे पत्रातील दिलेल्या अधिकारानुसार आयुक्त यांना अंदाजपत्रकिय दरानुसार काम थेट पध्दतीने देवु शकतात असे नमुद आहे. त्यानुसार यापुर्वी संजय नगर झोपडपट्टी येथील बांधकाम करण्याचे काम मे.ए.इ.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.ठाणे यांचे कडुन 2010-11 चे जिल्हा दरसुचीवर तयार करण्यात आलेल्या घरकुलांचे दर रु.172500/- व मुलभुत सोयीसाठी रु.81000/-प्रती निविदा मंजुर करण्यात आली आहे. त्याकामाची वर्क ऑर्डर दि.14/09/11 रोजी देण्यात आली आहे. सदर एजन्सी बरोबर विषयांकीत काम त्याच दराने करणे बाबत प्रशासनाने चर्चा करुन तसे पत्र देणेस सांगितले नुसार कंपनीने रु.210000/- प्रती घरकुल व मुलभुत सोयी सुविधेसाठी रु.95000/- प्रती घरकुल इतका दर दिला आहे. शहर अभियंता यांनी 2011-12 चे दरसुचीबरोबर दरपृथ:करण केले आहे व त्यामध्ये फ्लोअर राइझ 3.5% व सिमेंट व्हॅट मधील फरक 8.5% धरुन प्रती घरकुल रु.202586/- इतकी किंमत आली आहे. त्यानुसार स्थायी समिती सभा क्र.22,ठराव क्र.458 दि.13/12/2011 नुसार निविदेस मान्यता दिली आहे. निविदा मंजुरी समज बांधकाम विभागाने दि.22/12/2011 रोजी दिली आहे व कामाची वर्क ऑर्डर दि.29/12/2011 रोजी दिली असुन कामाची मुदत 12 महिने आहे.

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम | एम.बी. |
|---|---|---|---|
| 05 | 21/07/12 | 3452625 | 09 |
| 06 | 29/08/12 | 5240550 | 09 |
| 07 | 29/08/12 | 4394250 | 09 |
| 16 | 14/01/13 | 3013200 | 09 |
| 17 | 26/02/13 | 3954825 | 09 |
| | एकुण | 20058450/- | |

या कामाची नस्ती,बी-1 टेंडर मोजमाप पुस्तक तपासुन अर्धसमास ज्ञापन क्र.68, दि.27/06/14 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.13/10/2014 रोजी तीन महिने विलंबाने सादर केले आहे. बांधकाम विभागाने दिलेले अनुपालन तपासुन खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)एकुण 622 घरकुलाचे पायाभुत सुविधासह बांधकाम करणेच्या कामाची रु.178825000/- निविदा 2011-12 या वर्षाच्या अंदाजपत्रकीय दराने मंजुर करण्यात आली आहे. कार्यादेश दिल्यानंतर सदरच्या झोपडीधारकांनी बैठ्या घरांची मागणी करुन झोपड्या काढण्यास विरोध केल्यामुळे बांधकामास सुरवात करता आलेली नाही. त्यामुळे सदर झोपडीलगत पाण्याच्या टाकी लगतची जागा उपलब्ध झाल्याने सदर ठिकाणी सुधारीत बांधकाम परवाना क्र.म 98 दि.14/2/12 ने नगर रचना विभागाकडुन बांधकाम परवानगी घेवुन मक्तेदार यांना दि.29/11/12 रोजी 186 घरकुलांची बांधकामे सुरु करणेबाबत कळविले आहे. परंतु बांधकाम परवानगी दिल्यानंतर कार्यादेश देण्यास 9 महिने इतका विलंब झाला आहे. त्याबाबत खुलासा बांधकाम विभागाने अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालनामध्ये केला आहे. सदर जागेमधुन पिण्याच्या पाण्याच्या लाइन व एल टी विद्युत वाहिनी जात असल्याने कार्यादेश देण्यास विलंब झाल्याचे नमुद आहे. परंतु सदर पाईप लाइन व विद्युत वाहिनी कधी काढण्यात आल्या याबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नाहीत. नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 165 नुसार **कामाचे अंतिम तपशीलवार अंदाज** तयार करण्याअगोदर जागेबाबत स्थानिक निरीक्षण करणे आवश्यक आहे. जागेची पाहणी करुन तपशीलवार अंदाज तयार केला नसल्याने कामाचा कार्यादेश देण्यास विलंब लागला असल्याचे स्पष्ट होते.

2)योजनेच्या सुरवातीला मे.स्ट्रेसक्रीट इंडिया लि. यांचे नावे दिलेली वर्क ऑर्डर जागा ताब्यात नसताना दिल्याने रद्द करण्यात आली असतानाही पुन्हा सदर कामाची वर्कऑर्डर अन्य ठेकेदारास जागा ताब्यात नसताना देण्यात आली आहे.

3)मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (क) अन्वये आयुक्तास, महानगरपालिकेच्या मंजुरीने, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्ट्याने देता येईल, विकता येईल, भाड्याने देता येईल किंवा अन्यथा अभिहस्तांतरित करता येईल अशी तरतुद असताना नवीन जागा ताब्यात घेतल्यानंतर नवीन जागेवर घरकुल बांधण्यास महासभेची मान्यता घेण्यात आल्याचा ठराव लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेला नाही. अनुपालनामध्ये केंद्रिय मान्यता समितीची मान्यता घेण्यात आल्याने महासभेची मान्यता घेण्यात आली नसल्याचे नमुद आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार महासभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.

4)संजयनगर झोपडपट्टीचे काम ठेकेदारास दि. 14/09/11 रोजी दिले आहे.त्याच ठेकेदारास इंदिरा नगर झोपडपट्टीचे काम दि.29/12/11 रोजी थेट पध्दतीने दिले आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे पत्र जा.क्र./मु.अ.र./ उपमुअ.2/जेएनयुआरएम सेल/09 दि.2/3/2009 चे पत्रातील दिलेल्या अधिकारानुसार काम थेट पध्दतीने देण्या अगोदर पारदर्शक पध्दतीचा वापर करणे आवश्यक असलेचे नमुद आहे. ए.इ.इन्फ्रा प्रोजेक्टच्या कागदपत्रांची छाननी केली असता म्हाडाचे व सार्वजनिक बांधकाम विभागाचे नोंदणी प्रमाणपत्र नाही. सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.सीएटी 2006/प्र.क्र.141/इमारती 2

दि.6/2/2007 नुसार वर्ग 1अ ठेकेदारास काम करण्याची मर्यादा नाही. तसेच ब वर्ग रु.25 कोटी व क वर्ग रु.15 कोटी आहे.नोंदणी प्रमाणपत्र नसल्याने ठेकेदाराची वित्तिय स्थिती, बांधकाम विभागात यापुर्वी किती रक्कमेची कोणती कामे करण्यात आली याबाबतची माहीती समजुन येत नाही. या कंपनीचा अनुभव दाखला पाहता त्यांनी बांधकाम विभागाची कामे न करता पाणीपुरवठा विभागाची कामे केलेचे दिसुन येते. अनुपालनामध्ये यापुर्वी सदर ठेकेदारास संजयनगर येथील घरकुलाचे काम देण्यात आल्याने हे काम दिल्याचे नमुद आहे. यावरुन विहीत अहर्तता प्राप्त नसलेल्या कंत्राटदारास घरकुल बांधणीचे काम दिल्याचे दिसुन येते.

5)झोपडपट्टयांचे सर्वेक्षण करुन लाभार्थी निश्‍चित केले आहेत. योजना राबविताना लाभार्थ्याचे संमती अर्ज घेणे आवश्यक आहे. तसेच गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय क्रमांक, जनेयो-2006/प्र.क्र.46/गृनिधो-2,दि.25/06/2007 मधील अट क्र.12(2) नुसार अंशदान घेणे आवश्यक आहे. सदर अंशदान लाभार्थ्याचे स्वतंत्र बँक खाते उघडुन त्यामध्ये जमा करणे आवश्यक आहे. केंद्रिय मान्यता समितीने या प्रकल्पाला No.N-11028/1/2009/IHSDP/JNURM-Vol.XV ,GOI ने दि. 31 मार्च 2009 रोजी मान्यता दिली असुन प्रती घरकुल लाभार्थी हिस्सा रु.10000/- ठरविला आहे. या ठिकाणी एकुण 837 घरकुलांची कामे प्रस्तावित असल्याने 837X रु.10000/- प्रमाणे एकुण रु.8370000/- अंशदान खात्यावर जमा होणे आवश्यक आहे. अनुपालनामध्ये लाभार्थी हिस्सा घेतला नसल्याचे मान्य केले आहे. परंतु लाभार्थी हिस्सा वसुल केला नसल्याने रु. 8370000/- वसुलपात्र करण्यात येत आहेत.

6)प्रकल्पास केंद्रीय मान्यता समितीची मंजुरी दि.26 फेब्रुवारी 2009 रोजी मिळाली आहे. स्थायी समिती सभा क्र.23 ठराव क्र.589 दि.18/02/2010 नुसार मे.स्ट्रेसक्रिट इंडिया लि.मुंबई यांना प्रति घरकुल रु.133184/- व पायाभुत सुविधा रु.77940/- ने मंजुर करण्यात आले होते. परंतु जागा ताब्यात मिळाली नसल्याने ठेकेदाराने काम करण्यास नकार दिल्याने निविदा थेट पध्दतीने ए.इ.इन्फ्रा प्रोजेक्ट यांना वाटाघाटी करुन प्रती घरकुल रु.202586/- व मुलभुत पायाभुत सुविधेसाठी प्रती घरकुल रु.85000/- प्रमाणे काम मंजुर केले आहे. जागा ताब्यात नसताना प्रकल्प राबविलेने रु.76462/- प्रति घरकुलप्रमाणे एकुण 622 घरकुलासाठी रु.47559364/- जादा खर्च होणार आहे.

7)म्हाडाचे जा.क्र.मु.अ. / उमुअ- जेएनयु आरएम / 778 / 10 / दि.10/11/10 अन्वये केंद्र शासनाने प्रती घरकुल किंमत रु.100000/- निश्‍चित केली आहे. याकरीता केंद्रशासनाचे अनुदान 80 टक्के म्हणजे रु.80000/- असुन राज्य शासनाचे आरक्षित गटासाठी 10 टक्के व सर्वसाधारण गटासाठी 8 टक्के अनुदान देय आहे. त्यानुसार रु.187586/- प्रती घरकुल इतका अतिरिक्त खर्च येणार आहे. उर्वरित रु.187586/ प्रती घरकुल X 622 घरकुले प्रमाणे रु.116678492/- तरतुद महानगरपालिका निधीतुन करणे आवश्यक आहे. कामाची मुदत 12 महिने असलेने 2011-12 व 2012-13 या वर्षात महानगरपालिका निधीची तरतुद कोणत्या लेखाशिर्षाखाली करण्यात आली आहे व किती तरतुद केली आहे याचा खुलासा बांधकाम विभागाने अनुपालनामध्ये केला असुन महानगरपालिकेने 2011-12 या आर्थिक वर्षात लेखाशिर्ष 41137 वर रु.1 कोटी 80 लाख व 2012-13 या वर्षात रु.3 कोटीची तरतुद केली असल्याची बाब नमुद आहे. परंतु महानगरपालिकेने स्थायी समितीस सादर केलेल्या 2014-15 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकामधील प्रत्यक्ष खर्चाचे नक्की आकडे तपासले असता भांडवली खर्च - ब व्दिनोंद कोड 41219A लेखाशीर्ष-एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम मनपा फंडातुन होणारा खर्च या मधुन कोणताही खर्च

करण्यात आलेला नाही.

8)नस्तीमधील पान क्र.टी.42 वर झोपड्यांचे निष्कासन दि.17/01/13 रोजी करण्यात येवुन झोपडीधारकांचे तात्पुरते पुनर्वसन आंबेडकर आवास योजने अंतर्गत बांधलेल्या मिरज म्हैशाळ रोडवरील 216 व लोकमान्य कॉलनीच्या पुर्वेस बांधलेल्या 40 घरकुलामध्ये करण्यात आलेचे नमुद आहे. सदर घरे कधी बांधण्यात आली आहेत व त्या योजनेच्या मुळ लाभार्थ्यांना का देण्यात आली नाहीत याचा खुलासा बांधकाम विभागाने अनुपालनामध्ये केलेला नाही.

9)या पुर्वी ठेकेदाराबरोबर दि.19 जानेवारी 2010 रोजी झालेल्या commen set of deviation मध्ये मुद्दा क्रं.7 नुसार मोबिलायझेशन ॲडव्हान्स देता येणार नाही असे नमुद असतानाही ठेकेदारास रु.28 लाखाचा मोबिलायझेशन ॲडव्हान्स दिला आहे. कामाचे गती राखण्यासाठी ॲडव्हान्स दिल्याचे अनुपालनामध्ये नमुद आहे. परंतु निविदा अटी शर्तीमध्ये ठेकेदारास ॲडव्हान्स देण्याची तरतुद नसतानाही महानगरपालिकेने ठेकेदारास ॲडव्हान्स दिला आहे.

10)नस्ती मधील पान क्र.351 वरील उपायुक्त यांचे दि.15/3/13 चे विषयपत्रानुसार जागा महानगरपालिकेने वेळेत ठेकेदारास मोकळी करुन दिली नसल्याने 2012-13 चे जिल्हा दरसूची प्रमाणे दरवाढ देणे, 10 टक्के इंटरेस्ट फ्री मोबिलाइझेशन ॲडव्हान्स देणे. सळीवर सेक्युअर्ड ॲडव्हान्स देणे या गोष्टी मान्य केल्या आहेत व सदर विषयपत्र महासभेकडे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 35 (अ) व प्रकरण दोन महासभेचे कामकाजमधील खंड 1 (के) अन्वये ऐन वेळचा विषय म्हणुन मान्यतेसाठी सादर केले आहे. व मा.महासभा क्र.12, ठराव क्र.459 दि.20/03/2013 रोजी महासभेने मान्यता दिली आहे. इतका महत्वाचा धोरणात्मक विषय तातडीने ठेवण्याचे प्रयोजन स्पष्ट केलेले नाही. अनुपालनामध्ये काम पुर्ण होणेसाठी व आर्थिक धोरणात्मक बाब असल्याने महासभेची तातडीने मंजुरी घेतल्याचे नमुद आहे. दिलेले उत्तर संयुक्तिक वाटत नाही.

11)उपरोक्त महासभा ठरावामध्ये प्रगतीतील 155 घरकुले व जागेवरील झोपडपट्टीचे तात्पुरते स्थलांतर झाल्याने मोकळ्या जागेवरील जी+3 स्वरुपातील प्रस्तावीत 682 घरकुले असे एकत्रित 837 घरकुलांच्या कामांना मान्यता दिली आहे. व 682 घरकुलांना 2012-13 च्या जिल्हा दरसूचीनुसार मान्यता दिलेचे नमुद आहे. 2012-13 च्या जिल्हा दरसूचीनुसार प्रती घरकुल रु. 281510/- व मुलभुत पायाभुत सुविधेसाठी प्रती घरकुल रु.118151/- प्रमाणे काम मंजुर केले आहे. तसेच ठरावाच्या पुढील परिच्छेदामध्ये 155 घरकुलांचे बांधकाम 2011-12 चे जिल्हा दरसूचीनुसार मंजुर केलेचे नमुद असुन बांधकामाचे परिमाणातील सळी व सिमेंट या बाबीवर देखील मक्तेदार यांना 2012-13 चे दरसूचीनुसार फरक देण्याचे मान्य केले आहे. जागा ताब्यात नसताना प्रकल्प राबविल्याने कामास विलंब लागत असल्याने कामाच्या किंमतीमध्ये वाढ होवुन महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत असल्याचे स्पष्ट होत आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये मक्तेदारास दि.29/11/12 रोजी कार्यादेश दिल्यानंतर घरकुल बांधकामाची जागा ताब्यात देण्यास कामाची 12 महिन्याची मुदत संपल्यानंतर एक वर्षापेक्षा जास्त कालावधी लागल्याने मक्तेदारास वाढीव दर द्यावे लागल्याचे नमुद आहे. जागा ताब्यात नसताना योजना राबविल्याने महानगरपालिकेवर वाढीव खर्चाचा बोजा पडत आसल्याचे स्पष्ट होते.

12) डी.पी.आर. मध्ये इंदिरा नगर झोपडपट्टीसाठी 622 लाभार्थी निश्चित केले आहेत. व त्याप्रमाणे ठेकेदारास कार्यादेश देण्यात आला आहे. परंतु त्या ठिकाणाचे लगतची महानगरपालिकेच्या मालकीची

रिकामी जागा उपलब्ध असल्याने त्या ठिकाणी पुन्हा 155 घरे बांधण्याचा प्रस्ताव मंजुर करण्यात आला आहे. परंतु लगतच्या नविन जागेत कोणत्या लाभार्थ्यांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. त्यांची संमती घेण्यात आली असल्यास त्याबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नाहीत. अर्धसमास ज्ञपनाचे अनुपालनामध्ये इंदिरा नगर झोपडपट्टीमधील लाभार्थ्यांनी बैठया घरांची मागणी करुन योजनेस न्यायालयामधुन स्थगिती आदेश आणल्याने काम सुरु करता आलेले नाही त्यामुळे लगतच्या रिकाम्या जागेमध्ये बांधकाम सुरु केले असुन या घरकुलामध्ये मालगांव वेस व दिंडी वेस मधील मंजुर डी.पी.आर.मधील लाभार्थ्यांचे पुनर्वसन करण्यात येणार असल्याचे नमुद आहे. यावरुन लाभार्थ्यांची संमती न घेता व अंशदान न घेता काम चालु केल्याने योजनेमध्ये अडचणी निर्माण झाल्याचे स्पष्ट होत आहे.

13)जागा ताब्यात नसताना ठेकेदारस कार्यादेश देणे, लाभार्थ्यांची संमती न घेताच प्रकल्प राबविलेने झोपडपट्टीधारकांनी योजनेस विरोध करुन कोर्ट केस केल्याने प्रकल्प राबविण्यास विलंब झाल्याचे स्पष्ट होते.

14)2012-13 च्या जिल्हा दरसूचीनुसार 682 घरकुलांना मान्यता दिली आहे. 2012-13 च्या जिल्हा दरसूचीनुसार प्रती घरकुल रु. 281510/- व मुलभुत पायाभुत सुविधेसाठी प्रती घरकुल रु.118151/- प्रमाणे काम मंजुर केले आहे. शासनाकडुन प्रती घरकुल 1 लाख अनुदान मिळणार असल्याने उर्वरित रक्कम रु.299661 प्रती घरकुलप्रमाणे 682 घरकुल x रु.299661/- = रु.204368802/- ची तरतुद महानगरपालिकेने स्वनीधीमधुन करणे आवश्यक असताना 2012-13 मध्ये कोणतीही तरतुद करण्यात आलेली नाही.

15)उद्योग उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्र .बीसीए 2009-प्रक्र/108/ कामगार 7अ दिनांक 17 जून 2010 ,नुसार प्राकलनामध्ये दरपृथःकरण करुन 1 टक्के कामगार कल्याण उपकराचा समावेश केला आहे. परंतु देयकामधुन उपकर कपात केलेला नाही. 12/13 या आर्थिक वर्षात रु.20058450/- ची देयके ठेकेदारास दिलेली असलेने 1 टक्के प्रमाणे उपकर रु.2,00,584/- ठेकेदाराकडुन वसुल करणे आवश्यक आहे. अनुपालनामध्ये ठेकेदारास रनिंग बिल क्र.1 ते 11 ने रु.59695475/- व रनिंग बील क्र.21 ने रु.11920592/- असे एकुण रु.71616007/- दिले आहेत.परंतु त्यावर 1 टक्के प्रमाणे उपकर रु.716160/- वसुल केलेला नसल्याने तो ठेकेदाराकडुन वसुल करण्यात यावा.

16)विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र 2-फ/साबावि/सहविमा/2305-प्रविनी.दिनांक 1 नुसार 12.09.2005% विम्याची तरतुद प्राकलनामध्ये केली आहे. परंतु विमा कपात देयकामधुन केलेली नाही. 2012-13 या आर्थिक वर्षात रु.20058450/- ची देयके ठेकेदारास दिलेली असलेने 1 टक्के प्रमाणे विमा रु.2,00,584/- ठेकेदाराकडुन वसुल करणे आवश्यक आहे. अनुपालनामध्ये ओरियंट इन्शुरन्स कंपनी यांचे पॉलिसी नं.112202/44/2012/29 दि.14/2/12 अन्वये विमा भरला असल्याचे नमुद आहे. परंतु विमा भरल्याची कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नाहीत.

17)2012-13 या आर्थिक वर्षात रु.20058450/- ची देयके ठेकेदारास दिलेली असुन सर्व देयके शासन निधीमधुन खर्ची टाकण्यात आलेली आहेत. शासनाकडुन 3798 घरकुलासाठी पहिल्या हप्त्यापोटी एकुण रु.30 कोटी अनुदान प्राप्त झाले आहे. परंतु 2012-13 अखेर फक्त 1395 घरकुलांचे बांधकाम चालु आहे. व ठेकेदाराची सर्व देयके शासन निधीमधुन खर्ची टाकण्यात आलेली आहेत. महानगरपालिका निधीमधुन रक्कम खर्ची टाकण्यात आली नसल्याने महानगरपालिकेच्या दायित्वामध्ये वाढ होवुन योजना पुर्णत्वाकडे

| |
|---|
| नेण्यामध्ये अडचण निर्माण झाली आहे.<br><br>**वसुलपात्र रक्कम :-** लाभार्थी हिस्सा रु.8370000 + उपकर रु.716160 + विमा रु.200584 = रु. 9286744/-<br>**आक्षेपाधिन रक्कम :- रु.**19142146/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 68 | 27/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 60 | संजयनगर झोपडपट्टी (मिरज) स.नं. 964 अ येथे 438 घरकुले बांधणे कामातील अनियमितते बाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम. | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | केंद्र,राज्य व मनपा | 9ब | 06 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 37674970 | 322731 | | |

| |
|---|
| केंद्रशासनाने घरकुलाची किंमत रु. 1 लाख निश्चित केली असून  रु 1 लाख प्रती घरकुल अनुदान देणार आहे .  ठेकेदाराने रु.253500 प्रती घरकुल या रकमेस देकार दिलेला आहे. त्यामुळे उर्वरित रक्कम रु.153500 प्रती घरकुल X 438 घरकुलास लागणारी रक्कम रु.67233000/- ची तरतुद महानगरपालिका निधीमधुन करुन खर्च करणे आवश्यक आहे. आर्थिक वर्ष 2012-13 मध्ये ठेकेदारास रु.27860475/- ची देयके आदा केली आहेत. महानगरपालिका निधी व  शासन निधीमधून स्वतंत्र देयके तयार करुन रक्कम आदा करणे आवश्यक असता रु.27860475/-  खर्च शासन निधीमधून केल्याने उर्वरित घरकुलासाठी निधी |

कमी पडून निधी अभावी योजना रेंगाळणार असल्याचे स्पष्ट होते. देयकामधुन कामगार कल्याण उपकर, विमा व ठेकेदारास दिलेल्या ॲडव्हान्स वरील व्याजाची रक्कम अशी एकुण रक्कम रु.1347365/- ठेकेदाराकडुन वसुल केलेची छायांकीत चलन प्रती दाखविलेल्या नसल्याने रु.1347365/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत टप्पा क्र. 2 मध्ये 3798 घरकुल बांधणे कामी दि.26 फेब्रु. 2009 रोजी कैंद्रिय मान्यता समितीने रु.93.88 कोटी रक्कमेच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे. या प्रकल्पामध्ये मनपा मालकीच्या 5 व शासन मालकीच्या दोन अशा 7 झोपडपट्टीच्या जागेवरील 3798 झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव आहे. या प्रकल्पाच्या प्रस्तावामध्ये एकुण 3798 लाभार्थींची यादी केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार केली आहे. या एकुण 3798 घरकुलापैकी 2105 झोपडीधारकांना आहे त्याच जागेवर घरकुले दिली जाणार असुन 1693 झोपडीधारकांना त्यांचे लगतच्या प्रस्तावित घरकुलांच्या जागेमध्ये स्थलांतरीत केले जाणार आहे.

सदर प्रकल्पाचे निविदा नस्ती व धावती देयके क्र.1 ते 4 एकुण खर्च रु.1,36,36,128 /- चे लेखापरीक्षण 2011-12 या आर्थिक वर्षात केले आहे व याबाबतचे आक्षेप परीच्छेद क्र.93 वर नोंदविण्यात आले आहेत.

प्रशासकीय मान्यता :- कैंद्रीय मान्यता समितीची मंजुरी दि. 26 फेब्रु, 2009 दि.02.03.2009 चे पत्रान्वये मान्यता मिळाली आहे.

स्थायी समिती सभा क्र.14 ठराव क्र.285, दि.30.08.2011 अन्वये काम मंजुर करणेत आले आहे.

तांत्रिक मान्यता:- शहर अभियंता यांनी जा.क्र.543 दि.29.08.2011 ने सुधारित मान्यता दिली आहे.

ठेकेदाराचे नाव :- ए.ई.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि., ठाणे

अंदाजपत्रकीय रक्कम रुपये 12,44,00,000/-

| प्र.क्र | दिनांक | रक्कम | M. B. क्र.9,पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 01 | 21/05/12 | 5561400/- | 05 |
| 02 | 06/07/12 | 3903675/- | 06 |
| 04 | 21/07/12 | 6149625/- | 08 |

| | | | |
|---|---|---|---|
| 08 | 28/09/12 | 6417000/- | 12 |
| 10 | 02/11/12 | 5828775/- | 16 L |

कामाची नस्ती, बी-1 निविदा व मोजमाप पुस्तिकेची तपासणी करुन या बाबत अर्धसमास ज्ञापन क्र.69 निर्गमित करण्यात आला होता. बांधकाम विभागाने अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनाचे अवलोकन करुन खालील आक्षेप घेण्यात येत आहेत .

1)ठेकेदारास कामाची वर्क ऑर्डर दि.14/9/2011 रोजी दिली आहे व मुदत 12 महिने देणेत आली आहे. परंतु ज्या ठिकाणी घरकुल बांधवयाची आहेत त्या जागेवरील झोपडपट्टीधारकांनी झोपड्या काढणेस विरोध केल्याने जागा ताब्यात घेण्यास विलंब लागला आहे. तसेच दक्षिण बाजूस 124 क्लस्टर इमारतीचे बांधकामास साइड मार्जिन उपलब्ध नसल्याने इमारतीचे बांधकामास पुन्हा सुधारित परवानगी दि.14/2/2012 रोजी दिली आहे. त्यामुळे कामाची जागा मोकळी करुन ताब्यात न घेता, जागेची पाहणी न करता व तांत्रिक नकाशे मंजूर न करताच महानगरपालिकेने कार्यादेश दिल्याने काम चालू होण्यास विलंब लागला असल्याचे स्पष्ट होते. काम सुरू होण्यास विलंब लागल्याने काम पूर्ण करण्याची मुदत दि. 30 जून 2013 पर्यंत वाढविण्यात आली आहे. आर्थिक वर्ष 2012 -13 अखेर रु.64465705/- खर्च करण्यात आले आहेत. कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु.12,44,00,000/- असुन कामाची मुदत दि.30 जून 2013 पर्यंत आहे. परंतु मार्च 2013 अखेर एकुण 50 टक्केच काम पूर्ण झाल्याने व उर्वरित तीन महिन्यामध्ये काम पूर्ण झालेले नसल्याने शासनाचे रु. 64465705/- गुंतुन पडल्याचे दिसुन येते.

2)ठेकेदाराला एकूण रु.1,10,00,000/- मोबीलायझेशन ॲडव्हान्स आयुक्त यांचे दि.21/10/2011 व 17/11/2011 चे मान्यतेने देणेत आलेला आहे. ठेकेदाराबरोबर दि.19 जानेवारी 2010 रोजी झालेल्या Commen set of deviation मध्ये मुद्दा क्रं.7 नुसार ॲडव्हान्स देता येणार नाही असे नमुद असतानाही ॲडव्हान्स दिला आहे. महाराष्ट्र पब्लीक अकाऊंट कोड नियम 10.1.21 नुसार ठेकेदाराला ॲडव्हान्स देता येणार नाही असे नमुद असताना नियमबाह्यरित्या ॲडव्हान्स देणेत आलेला असलेने मोबीलायझेशन ॲडव्हान्स राष्ट्रीयकृत बँकेच्या ठेवीच्या प्रचलित 10% व्याजासहीत रु 1,21,00,000/- संबंधिताकडून वसुल करणेचा आक्षेप 2011-12 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणामध्ये परिच्छेद क्र.93 वर घेण्यात आला होता. परंतु त्याप्रमाणे व्याजाची रक्कम 2012-13 मध्ये ठेकेदारास देण्यात आलेल्या देयकामधुन वसुल केलेली नाही. 2012-13 या वर्षात एकुण मोबिलायझेशन ॲडव्हान्स रु.3227316 देयकामधुन कपात केला आहे. परंतु व्याजाची रक्कम वसुल केली नसल्याने 10 टक्केप्रमाणे रु. 322731/- वसुलपात्र आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये घरकुलाची कामे विहित मुदतीत पुर्ण करण्यासाठी

ठेकेदाराकडुन बँक गॅरेंटी घेवुन मोबिलायझेशन ॲडव्हान्स दिला आहे व सदर रक्कमेवर व्याज कपात करण्याचे नमुद नसल्याने व्याजाची रक्कम कपात केली नसल्याचे नमुद आहे. निविदा शर्तीमध्ये तसेच commen set of deviation मध्ये ॲडव्हान्स देता येणार नसल्याचे नमुद असताना मोबिलायझेशन ॲडव्हान्स दिला असल्याने 10 टक्के व्याजाची रक्कम रु.322731/- ठेकेदाराकडुन वसुल पात्र आहे.

3)म्हाडाचे जा.क्र.मु.अ./उमुअ- जेएनयु आरएम /778/ 10/ दि.10/11/10 अन्वये केंद्र शासनाने प्रती घरकुल किंमत रु.100000/- निश्चित केली आहे. याकरीता केंद्रशासनाचे अनुदान 80 टक्के म्हणजे रु.80000/- असुन राज्य शासनाचे आरक्षित गटासाठी 10 टक्के व सर्वसाधारण गटासाठी 8 टक्के अनुदान देय आहे. टेंडर रु.1,72,500/- वर मान्य करणेत आले असलेने उर्वरित रक्कमेची तरतुद मनपा निधीतुन करुन त्याप्रमाणे दोन्ही निधीची स्वतंत्र देयके तयार करुन आदा करणे आवश्यक असता 2012-13 मध्ये रु.37997701/- ची देयके शासननिधी मधुन खर्च टाकणेत आली आहेत. अर्धसमास ज्ञापन क्र.69 ,दि.27/6/14 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.13/10/2014 रोजी तीन महिने विलंबाने लेखापरीक्षणास सादर केले आहे. अर्धसमास पत्रास दिलेल्या अनुपालनामध्ये निविदा रक्कमेपेक्षा जादाची रक्कम महानगरपालिका निधीमधुन खर्च करणेचा आक्षेप मान्य करण्यात आला आहे.

4)म्हाडाचे जा.क्र.मु.अ./उमुअ- जेएनयु आरएम /778/ 10/ दि.10/11/10 अन्वये केंद्र शासन प्रती घरकुल रु.100000/- अनुदान देणार आहे. कामाच्या बांधकामाचा ठेका ठेकेदारास थेट पध्दतीने रु.172500/ प्रती घरकुल व परिसरातील मुलभुत सोयी सुविधासाठी रु.81000/ प्रती घरकुल प्रमाणे एकुण रु.253500/- प्रती घरकुल या दराने ठेकेदारास देण्यात आला आहे. त्यामुळे रु.253500 - रु.100000 = रु.153500 प्रती घरकुल X 438 घरकुलास लागणारी रक्कम रु.67233000/- ची तरतुद 2012-13 चे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये करुन खर्च करणे आवश्यक असता फक्त तीन कोटीची तरतुद अंदाजपत्रकामध्ये करण्यात आलेली आहे. अर्धसमास पत्रास दिलेल्या अनुपालनामध्ये 2012-13 या वित्तिय वर्षाचे मंजुर अंदाजपत्रक 41137 वर महानगरपालिका फंडामध्ये रु. 3 कोटीची तरतुद करण्यात आल्याचे नमुद आहे. परंतु महानगरपालिकेने स्थायी समितीस सादर केलेल्या 2014-15 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकामधील प्रत्यक्ष खर्चाचे नक्की आकडे तपासले असता भांडवली खर्च - ब व्दिनोंद कोड 41219A लेखाशीर्ष- एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम मनपा फंडातुन होणारा खर्च या मधुन तरतुद करुनही खर्च करण्यात आलेला नाही.

5)उदयोग व ऊर्जा विभाग शासन निर्णय बीसीए- 2009/सी आर 108/ कामगार 7 अ दि.17/6/2010 नुसार 1% कामगार कल्याण उपकराची वसूल केला नसलेने रु. 37997701 /- x 1% प्रमाणे रु. 379977/- वसूल करण्यात यावा. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये नियमानुसार उपकर वसुल करण्याचे मान्य केले आहे. धावते देयक क्र.1 ते 15 एकुण रक्कम रु.64465705/- या रक्कमेवर 1 टक्के

| |
|---|
| प्रमाणे होणारा उपकर रु.644657/- पैकी रु.325000/- मुलभुत सोयीसुविधांचे धावते देयक क्र.5 मधुन वसुलात आणलेला असुन छायांकीत प्रत लगत केल्याचे उत्तरामध्ये नमुद आहे. परंतु छायांकीत प्रत सोबत जोडण्यात आलेली नाही. त्यामुळे उपकराची रक्कम रु. 644657/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.<br><br>6)विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्रं. प्रविनि 2310/ साबांवि / विमा वसूली / अभि - दि.08/09/10 नुसार 1% प्रमाणे विमा कपात करणे आवश्यक असता केला नसलेने रु. 37997701/- x 1% प्रमाणे रु. 379977/- वसूल करणे आवश्यक आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये ओरीयंटल इन्शुरन्स कंपनी यांचे पॉलिसी नं - 112202 /44/ 2012 /29 दि.14/2/2012 अन्वये विमा रक्कम भरली आहे. त्याची छायांकीत प्रत सोबत जोडली असल्याचे नमुद आहे. परंतु छायांकीत प्रत सोबत जोडली नसल्याने विमा रक्कम रु. 379977/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.<br><br>**आक्षेपाधिन रक्कम :-** रु. 37674970/-<br><br>**वसुलपात्र रक्कम :-** मोबिलायझेशन ॲडव्हान्स रु.3227316 वर 10 टक्केप्रमाणे व्याजाची रक्कम रु.322731/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 69 | 27/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |
|---|---|

| 61 | वेतन बँडच्या अंतिम टप्प्यावर पोहचलेल्या कर्मचाऱ्यांची वेतन निश्चीती चुकीची केले बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 02 | सामान्य प्रशासन | मनपा | 9ब | 03 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

महाराष्ट्र वित्त विभाग 6 वा वेतन आयोग अधिसुचना दि.22.04.2009 मधील नियम क्र.10 मध्ये नमुद असले प्रमाणे सुधारित वेतन बँडमध्ये कमाल टप्प्यावर एक वर्ष वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यास लगतचा उच्च वेतन बँड मंजुर करण्यात यावा व हा वेतन बँड मंजुर करताना त्याला एक वेतनवाढीचा फायदा देणे आवश्यक आहे.  असे असताना अशा प्रकारे वेतनबँड च्या कमाल टप्प्यावर पोहचलेल्या कर्मचाऱ्यांना कमाल टप्प्यावर एक वर्ष वेतन घेतलेल्या दिवशी लगतचा वेतन बँड मंजुर केला आहे व त्याच दिवशी आणखी एक वेतनवाढ देवुन ग्रेड वेतन रु. 1600 वरुन रु.1800 केले असल्याने वेतन व भत्याचे अतिप्रदान झाले आहे.

1)सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकाच्या अधिकारी / कर्मचारी यांना सप्टेंबर 2009 पासुन 6 व्या वेतन आयोगा नुसार वेतन दिलेले आहे. कर्मचा-यांची वेतन निश्चीती दि. 01.01.2006 पासुन पुर्वलक्षी प्रभावाने केली असून दि. 01.01.2006 ते 31.08.2009 या कालावधीचा वेतन भत्याचा फरक दिलेला नाही. त्यामुळे दि. 01/09/2009 पासुन जादा आदा झालेल्या वेतन व भत्त्याची परीगणना करुन अतिप्रदान रक्कम वसुल करण्यात यावी.

2)महानगरपालिका कर्मचाऱ्यांपैकी कांही निवडक कर्मचाऱ्यांची सेवापुस्तकामधील 6 व्या वेतन आयोगानुसारची वेतन निश्चीती तपासली असता वर्ग 4 मधील कर्मचाऱ्यांना 4440-7440 या वेतन बँड मध्ये अंतीम टप्प्यावर पोहचल्यावर लगतचा वेतन बँड 5200-20200 मंजूर केला आहे. परंतु त्याच दिवशी जुन्या वेतन व ग्रेड वेतनानुसार एक अतिरिक्त वेतनवाढ देवुन ग्रेड वेतनही रु.1600/- वरुन वाढवुन रु.1800/- केले आहे.

3)महाराष्ट्र वित्त विभाग 6 वा वेतन आयोग अधिसुचना दि.22.04.2009 मधील नियम क्र.10 मध्ये नमुद असले प्रमाणे सुधारित वेतन बँडमध्ये कमाल टप्प्यावर एक वर्ष वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यास लगतचा उच्च वेतन बँड मंजुर करण्यात यावा व हा वेतन बँड मंजुर करताना त्याला एक वेतनवाढीचा फायदा देण्यात यावा. असे असताना अशा प्रकारे वेतनबँड च्या कमाल टप्प्यावर पोहचलेल्या कर्मचाऱ्यांना कमाल टप्प्यावर एक वर्ष वेतन घेतलेल्या दिवशी लगतचा वेतन बँड मंजुर केला आहे व त्याच दिवशी आणखी एक वेतनवाढ देवुन ग्रेड वेतन रु.1600 वरुन रु.1800 केले असल्याने वेतन व भत्त्याचे अतिप्रदान झाले आहे.

उदाहरणा दाखल अशा काही कर्मचाऱ्यांची यादी (परिशिष्ठ क्र. 5) सोबत जोडली आहे.
अर्धसमास ज्ञापन क्र.88 दि.18/07/14 चे अनुपालन सादर केलेले नाही.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 88 | 18/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 62 | स्थायी अग्रीमामधील अनियमिततेबाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 07 | लेखा | मनपा | 9ब | 03 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 140 (2) नुसार प्रत्येक अग्रिम धारकाने ते प्रथमत: मिळाल्यानंतर व त्यानंतर प्रत्येक वर्षी एक एप्रिल रोजी,पुढील प्रमाणे पोचपावतीवर स्वाक्षरी केली पाहिजे :- माझ्या ताब्यात असलेले अग्रिमधन रुपये -------- जे माझ्याकडुन देणे असून,ज्याचा हिशेब देण्यास मी जबाबदार आहे, त्याची मी पोच देत आहे. परंतु अशा पोचपावत्या संबंधितांनी लेखा विभागास दिलेल्या नाहीत.त्यामुळे कोणत्या अधिका-याकडे किती रक्कम शिल्लक आहे ते समजुन येत नाही.

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेचे वित्तीय वर्ष 2012-13 चे लेखापरीक्षणामध्ये 28 अधिकाऱ्यांना तातडीच्या प्रसंगी आकस्मिक व किरकोळ खर्च भागविणेसाठी रु.7,45,700/- चे स्थायी आग्रिम (कायम तसलमात) दिल्याचे स्थायी अग्रीम नोंदवहीचे लेखापरीक्षण केले असता आढळुन आले आहे. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.89 दि.18/07/14 रोजी निर्गमित केला असून लेखा विभागाने त्याचे अनुपालन दि.22/07/2014 रोजी दिले आहे. लेखा विभागाने दिलेल्या अनुपालनाचे अवलोकन करुन खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 140 नुसार ज्या अधिकाऱ्यांना कर्तव्य पालनात किरकोळ खर्च / आकस्मिक खर्च करणे भाग पडते व ज्यांचे प्रदान मनपाच्या लेख्यातुन पैसे काढुन

| |
|---|
| करण्यापुर्वी करणे आवश्यक असते अशा अधिकाऱ्यांना महिन्याच्या संभाव्य जरुरीच्या अधारे नियत रक्कमेचे स्थायी अग्रिमधन देण्यात येणे आवश्यक आहे. परंतु स्थायी अग्रीम नोंदवहीमध्ये नमुद केलेल्या अधिकाऱ्यांना देण्यात आलेले स्थायी अग्रिम संभाव्य जरुरीच्या आधारे दिले नसल्याचे स्पष्ट होते.<br>2)महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 140 (2) नुसार प्रत्येक अग्रिम धारकाने ते प्रथमत: मिळाल्यानंतर व त्यानंतर प्रत्येक वर्षी एक एप्रिल रोजी, पुढील प्रमाणे पोचपावतीवर स्वाक्षरी केली पाहिजे :- माझ्या ताब्यात आसलेले अग्रिमधन रुपये -------- जे माझ्याकडुन देणे असून,ज्याचा हिशेब देण्यास मी जबाबदार आहे, त्याची मी पोच देत आहे. परंतु अशा पोचपावत्या संबंधितांनी लेखा विभागास दिलेल्या नाहीत. त्यामुळे कोणत्या अधिका-याकडे रक्कम शिल्लक आहे ते समजून येत नाही.तसेच एक एप्रिल रोजी पोचपावती न घेता त्यांना पुन्हा अग्रीम दिले आहे. अनुपालनामध्ये पोचपावतीचे दाखले घेतले नसल्याचे मान्य केले आहे.<br>3)महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 141 नुसार जेव्हा अग्रिमधनाची रक्कम कमी कमी होत जाईल तेव्हा व कितीही हाती शिल्लक असेल, त्यावेळी अग्रिमधनाची प्रतिपुर्ती/ भरपाई, नमुना क्र.107 प्रमाणे असलेल्या भरपाई देयकाद्वारे, निरनिराळ्या लेखाशीर्षाखालील नावे असलेल्या लेखाशीर्षाखाली बाबी एकत्रित करुन, योग्य त्या पावतीसह आधारभूत उपप्रमाणक जोडून केली पाहिजे. असे देयक अग्रिमधनास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्याने, अचुकतेचे प्रमाण म्हणुन योग्य तऱ्हेने स्वाक्षरी करुन सक्षम प्राधिकाऱ्याकडे मंजुरीसाठी पाठविले पाहीजे. अर्धसमास ज्ञापनास लेखा विभागाने दिलेल्या अनुपालनामध्ये संबंधित विभागातील अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीने टिपणी मंजुर केली जात असल्याने त्याबाबतची कागदपत्रे त्या विभागाकडुन घेणे उचित होईल असे नमुद आहे. परंतु संबंधित विभागांनी या बाबतची कागदपत्रे दाखविलेली नसल्याने आर्थिक वर्ष 2012 -13 मध्ये झालेल्या अग्रीमधन भरपाई रक्कमेचे लेखापरीक्षण करता आले नाही. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 89 | 18/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |
|---|---|

| 63 | वसंतदादा शेतकरी सहकारी बँकेत अडकुन पडलेल्या रकमांबाबत. |
|---|---|

| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 07 | लेखा | मनपा | 9अ | 04 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | 336048654 | | |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 92 (1) चे परंतुक अन्वये मान्य सहकारी बँकेत ठेवावयाची रक्कम कोणत्याही मान्य सहकारी बँकेच्या बाबतीत राज्य शासनाकडून सामान्यत: किंवा विशेषत: विनिर्दिष्ट करण्यात येईल. अशा रक्कमेपेक्षा अधिक असता कामा नये असे नमूद आहे. त्याप्रमाणे वसंतदादा सहकारी बँकेत ठेवावयाच्या रक्कमेबाबत महानगरपालिकेने शासनाकडून निर्देश न घेताच वसंतदादा सहकारी बँकेत महानगरपालिकेच्या निधीची गुंतवणुक केल्याने रु.33.61 कोटीच्या ठेवी अडकुन पड्रुन आर्थिक नुकसान झाल्याचे दिसुन येते.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेचे वित्तीय वर्ष 2012-13 चे लेखापरीक्षणामध्ये महानगरपालिकेची विविध निधीची सुमारे 33.61 कोटी रक्कम वसंतदादा शेतकरी सहकारी बँकेत सेव्हींग खात्यावर व मुदत ठेवीच्या रुपात अडकुन पडल्याचे दिसुन येते. वसंतदादा शेतकरी सहकारी बँकेने दि.03.04.2013 रोजी दिलेल्या पत्रानुसार बँकेकडे दि.07.01.2009 अखेर (बँक आवसायनात निघाल्याची दिनांक) व्याजासहित रु.33,60,48,654/- ठेवीच्या स्वरुपात असल्याची माहिती मागील लेखा परीक्षणास दिली होती. याबाबतचा परीच्छेद क्र.10, 2011-12 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणात घेण्यात आला होता. खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)वसंतदादा शेतकरी सहकारी बँकेमध्ये खाते उघडण्यासाठी व रक्कमा मुदत ठेवी मध्ये गुंतवण्यासाठी घेतलेल्या मंजूरीची कागदपत्रे मागील लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नसून या लेखापरीक्षणासही दाखविण्यात आलेली नाहीत.

2)सदर बँकेतील रक्कम व्याजासहित वसुल होण्यासाठी केलेल्या कार्यवाहीची कागदपत्रे लेखा परीक्षणास सादर करणेत आलेली नाहीत.

3)मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 92 (1) चे परंतुक अन्वये मान्य सहकारी बँकेत ठेवावयाची रक्कम कोणत्याही मान्य सहकारी बँकेच्या बाबतीत राज्य शासनाकडून सामान्यत: किंवा विशेषत: विनिर्दिष्ट करण्यात येईल. अशा रक्कमेपेक्षा अधिक असता कामा नये असे नमूद आहे. त्याप्रमाणे वसंतदादा सहकारी बँकेत ठेवावयाच्या रक्कमेबाबत महानगरपालिकेने शासनाकडून निर्देश न घेताच वसंतदादा सहकारी बँकेत महानगरपालिकेच्या निधीची गुंतवणुक केल्याने रु.33.61 कोटीच्या ठेवी

| |
|---|
| अडकुन पडुन आर्थिक नुकसान झाल्याचे दिसुन येते.<br>4)मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे नियम 92(3) नुसार ठेवीमुळे किंवा गुंतवणुक मुळे काही नुकसान झाल्यास ते न.पा. निधीच्या खाती खर्ची टाकणे आवश्यक असता त्याप्रमाणे वसंतदादा सहकारी बँकेमध्ये आडकून पडलेली रक्कम रु.33.61 कोटी रक्कमेची तरतुद अंदाजपत्रकामध्ये करुन महानगरपालिका निधीच्या खाती खर्ची टाकण्यात आलेली नाही.<br>अर्धसमास ज्ञापन क्र.90 दि.18/07/14 रोजी निर्गमित केला असुन लेखा विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले नाही.<br>**वसुलपात्र रक्कम रु. 336048654/-** |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 90 | 18/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 64 | महापौर उपभोक्ता विशेष पाणी बिल सवलत योजना राबविल्याने झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 06 | पाणी पुरवठा | मनपा | 9अ | 08 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 29869543 | | | |

| |
|---|
| महासभेने वेगवेगळया ठरावान्वये 2003-04 ते 2012-13 या आर्थिक वर्षातील पाणीपुरवठा थकबाकीवरील विलंब शुल्क माफ केले आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 128(अ)(1) नुसार मालमत्ता करामध्ये पाणी पट्टीचा समावेश आहे. महानगरपालिकेने राज्य शासनाची मंजूरी घेवुन थकबाकी वरील व्याज माफीची योजना राबविली नसल्याने व्याज विलंब शुल्क माफी पोटी रुपये |

**29869543**/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेने वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये महापौर उपभोक्ता विशेष पाणी बिल सवलत योजना सुरु ठेवली असल्याचे आढळुन आले आहे. सदर पाणी बिल योजनेबाबत वित्तीय वर्ष 2011-12 चे लेखापरीक्षण अहवालामध्ये परीच्छेद क्र.29 वर आक्षेप नोंदविला आहे.

महापौर योजनेचा लाभ घेतलेल्या ग्राहकांची वसुल रक्कम व व्याज विलंब माफ रक्कम खालील प्रमाणे

| अ.क्र. | वित्तिय वर्ष | वसुल रक्कम रुपये | व्याज विलंब माफ रुपये | व्याज विलंब माफ ग्राहकांची संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | 2003-2004 | 6778708 | 1889129 | 2702 |
| 2 | 2004-2005 | 6514054 | 1438854 | 2279 |
| 3 | 2005-2006 | 7184810 | 1552099 | 2770 |
| 4 | 2006-2007 | 10119806 | 2118417 | 2354 |
| 5 | 2008-2009 | 14665346 | 2731138 | 4264 |
| 6 | 2009-2010 | 16883271 | 4626522 | 4223 |
| 7 | 2010-2011 | 18596305 | 7511687 | 5140 |
| 8 | 2011-2012 | 7659528 | 3726683 | 2485 |
| 9 | 2012-2013 | 7833309 | 4035172 | 2524 |
| | **एकुण** | **104229897** | **29869543** | **32133** |

महासभा क्र. 8 ठराव क्र. 185 दि. 20/12/10 विषय क्र. 1 ज अन्वये व महासभा क्र. 8 ठराव क्र. 172 ऐनवेळचा विषय दि. 19/11/2011 नुसार माहे 31 मार्च 2012 पर्यत विशेष पाणी बिल सवलत योजनेची मुदत वाढविली आहे. पुन्हा महासभा क्र. 11 ठराव क्र. 234 विषय क्र. 10 दि. 20/3/2012 ने या योजनेस दि.30/4/12 अन्वये मुदतवाढ दिली आहे. प्रशासनाने 2003-04 ते 2011-12 या आर्थिक वर्षातील थकीत पाणीपुरवठा देयकावरील विलंब शुल्क माफ केल्याने महानगरपालिकेचे रु.2,78,23,732/- चे आर्थिक नुकसान झाल्याने सदर योजनेस मुदतवाढ देवू नये असे महासभेच्या निदर्शनास आणले असतानाही महासभेने दि. 30/4/2012 पर्यत या योजनेस मुदतवाढ दिली आहे.

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)नळ कनेक्शनधारकाने पाणी पट्टी वेळेत भरली नाही तर विलंब शुल्क मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कोणत्या तरतुदी अन्वये माफ करण्यात आले आहे? याबाबतचा खुलासा

पाणीपुरवठा विभागाने केला नसल्याने नियमबाह्यरित्या विलंब शुल्क माफ केलेचे स्पष्ट होते.

2)सदर योजनेमध्ये 2003-04 पासुनच्या थकीत पाणीपट्टीवरील विलंब शुल्क माफ केले आहे.या योजनेस दिर्घकाळ मुदतवाढ दिली असल्याने नागरिकांची वेळेत पाणी देयके न भरणेची मानसिकता निर्माण झाली आहे. व थकबाकीचे प्रमाण वाढले आहे. तसेच वेळेत देयके भरणाऱ्या नागरिकांच्यावर अन्याय झाला आहे.

3)पाणी पुरवठा विभागाकडून नागरिकांना दैनंदिन पाणी पुरवठा होत असल्याने योजनेचा खर्च भागविणेसाठी मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. परंतु वसूली नियमित होत नसल्याने आर्थिक नियोजन कोलमडले असल्याचे दिसून येते. पाणीपुरवठा विभागाच्या 12-13 या अर्थिक वर्षाच्या जमा बाजुस अंदाजपत्रकामध्ये मिटरने पाणीपुरवठा करणे या लेखाशिर्षांतर्गत रु.22 कोटी ची जमा अंदाजित केली आहे. परंतु प्रत्यक्षात रु.15 कोटी 13 लाख इतकेच उत्पन्न प्राप्त झाले आहे. जमेची एकुण टक्केवारी 68.77 टक्के इतकीच आहे. यु.आय.डी.एस.एस.एम.टी. व सुजल निर्मल योजनेच्या मनपा हिश्शापोटी कर्ज अनुक्रमे रु. 10 कोटी व 4 कोटी काढणेचे प्रस्तावित केले आहे. प्रत्यक्षात कर्ज काढलेले नाही तसेच महानगरपालिकेचे जमेचे मुख्य स्त्रोत असलेल्या मिटरने पाणीपुरवठा करणे या लेखाशिर्षांतर्गत अपेक्षित जमा झाली नसल्याचे दिसुन येते. यावरुन शासन निधीतुन चालु असलेल्या वरील योजनासाठी महानगरपालिकेने स्वनिधीची रक्कम उभी केली नसल्याने निधी अभावी या योजनांची प्रगती रेंगाळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4)सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे 2014-15 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक स्थायी समिती सभा क्र.15, ठराव क्र.87 दि.28/2/14 ने मंजुर केले आहे. सदर अंदाजपत्रकामध्ये पाणीपुरवठा व मलजलाची विल्हेवाट या विभागाची 2012-13 मधील जमा रु.192590968/- व खर्च रु.121472579/- झाला असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 95 (अ) अन्वये जादा झालेला खर्च रु.68137676/- चे अर्थसहाय्य महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नामधुन केले आहे. पाणीपुरवठा विभागाचे उत्पन्न कमी व खर्च जास्त असतानाही महासभेने विलंब शुल्क माफीची योजना राबविल्याने पाणीपुरवठा विभागाच्या तोट्यामध्ये वाढ झालेचे दिसुन येते.

5)महानगरपालिकेस सुजल निर्मल योजना, UIDSSMT या योजनेसाठी केंद्र व राज्य शासनाकडून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला आहे. या निधीमधुन पाणीपुरवठ्याची विविध ठिकाणी विकास कामे सुरु आहेत. त्यासाठी महानगरपालिकेच्या वाट्याचा स्वनिधी वापरणेची अट नमुद आहे. अशा प्रकारे विलंब शुल्कामध्ये सवलत दिल्याने योजना पूर्ण करण्यासाठी आर्थिक निधी कमी पडू लागला आहे. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्र. नापाक-2008/ प्र.क्र. 1/ पापु-22 दि. 22/10/2008 मधील 9 नुसार पाणी पट्टीची आकारणी व वसूली 100% करणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही न करता विलंब

शुल्क माफ केले आहे.

6)मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 152 (1) अ नुसार जी व्यक्ती महानगरपालिकेने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार मालमत्ता कराच्या थकबाकीची रक्कम प्रदान करील अशा पात्र व्यक्तीस राज्य शासन मान्य करील अशी सुट देता येईल. अधिनियम 1949 चे कलम 134(3) अन्वये मिटरने पाणी पट्टी देणेची व ती जर देय तारखेस भरली नाही तर पाणी पट्टीची थकबाकी असलेप्रमाणे वसूल करणेची तरतुद आहे. अधिनियम 1949 चे कलम 128(अ)(1) नुसार मालमत्ता करामध्ये पाणी पट्टीचा समावेश आहे. त्यामुळे महानगरपालिकेने राज्य शासनाची मंजूरी न घेताच योजना राबविल्याने महानगरपालिकेचे व्याज विलंब शुल्क माफ पोटी रुपये **29869543**/- चे आर्थिक नुकसान झाले आहे. ते संबंधिताकडून वसूल करणेत यावे.

7)मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 10 नियम 12(1) (अ) नुसार पाणी पट्टीचा कोणताही हप्ता किंवा पाण्याबद्दल किंवा मिटरच्या भाड्या बद्दल किंवा नियम 3, 9 किंवा 17 च्या तरतुदीन्वये किंवा तरतुदींच्या आधारे केलेल्या कोणत्याही कामाच्या खर्चा बद्दल देय असलेल्या कोणत्याही रक्कमेचा कोणताही हप्ता, अशा पट्टी बद्दल किंवा रक्कमे बद्दल मागणीची नोटीस योग्य रितीने बजावण्यात आल्या नंतर एक महिन्याच्या आत देण्यात कसुर करणेत आली तर खाजगी पाणी पुरवठा आयुक्तांनी तोडून टाकण्यात यावा असे नमुद आहे. या प्रमाणे पाणी पुरवठा बंद करण्याची कारवाई न करता नियमबाह्यरित्या विलंब शुल्क माफ केले आहे.

8)मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 219 नुसार नियम , उपविधी, विनियम आणि स्थायी आदेश हे प्रकरण समाविष्ठ करणेत आले आहेत. कलम 453 नुसार वेळोवेळी सुधारण्यात आलेल्या (अनुसुची ड) मधील नियम हे या अधिनियमाचा भाग आहे. असे समजणेत येईल व कलम 454 नुसार अनुसूचीत फेरफार करणे किंवा तीत भर घालणेचा अधिकार महानगरपालिकेस आहे. कलम 457 अन्वये महानगरपालिकेस (7) नुसार नगरपालिका कर (अ) नगरपालिका कराची आकारणी व वसूली बाबत नियम करणेचा अधिकार आहे. परंतु सदर नियम करण्यास राज्य शासनाची मंजूरी घेणे आवश्यक आहे. त्यानुसार विलंब शुल्क माफ करणेस राज्य शासनाची मंजूरी घेणेत आलेली नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र.92 दि.18/7/2014 रोजी निर्गमित केला असुन पाणीपुरवठा विभागाने त्याचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर केलेले नाही.

**आक्षेपाधिन रक्कम रु. 29869543/-**

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 92 | 18/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |
|---|---|

| 65 | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पिण्याच्या पाण्याचा कोटा वाढवुन न घेतल्याने झालेले आर्थिक नुकसानी बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 06 | पाणी पुरवठा | मनपा | 9ब | 03 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 4818457 | | | |

महानगरपालिकेने 2012-13 या आर्थिक वर्षात MIDC सांगली यांना त्यांचे SND/1072 व SND/1073 या कनेक्शन वरुन कोट्यापेक्षा जादा पिण्याचे पाणी वापरल्याने रु.930678/- आदा केले आहेत. महानगरपालिकेने पिण्याच्या पाण्याचा कोटा वाढवुन घेण्यासाठी MIDC सांगली बरोबर पत्रव्यवहार करणे आवश्यक असता तो केलेला नाही. तसेच या भागात महानगरपालिकेने पाणीपुरवठा योजना राबवुन पिण्याच्या पाण्याच्या सोय करणे आवश्यक असता ती न केल्याने MIDC ला रु. 3887779/- आदा करावे लागले आहेत.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रामधील काही भागात महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागास पाणी पुरवठा करणे शक्य नाही त्या भागात महानगरपालिका महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचेकडून पाणी घेवुन नागरिकांना नळाव्दारे पुरविते त्यासाठी महामंडळ रु.7.50/- प्रती घ.मी. असा दर आकारते तर मंजूर कोट्यापेक्षा जास्त पाणी घेतल्यास त्यास रु.11.25/- प्रती घ.मी. दराने आकारणी करते. अशा मंजूर कोट्यापेक्षा जादा पाण्यासाठी सन 2011-12 मध्ये रु.7,45,614/- चे नुकसान महानगरपालिकेला झाल्या बद्दल वित्तीय वर्ष 2011-12 च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये परीच्छेद क्र.33

| |
|---|
| वर आक्षेप घेण्यात आला आहे.<br>खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.<br>1)पाणीपुरवठा विभागाने अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये महानगरपालिकेस जादा पाण्याची आवश्यकता असल्याने SND/1072 या जोडणीचा कोटा सध्याचा मंजुर 100 घ.मी. ऐवजी 200 घ.मी.वाढविण्यासाठी क्र.मनपा/पापुवि/मि/ताशा/256/2010 पाणीपुरवठा विभाग मिरज दि.20/3/2010 चे पत्राने MIDC कडे मागणी केलेली आहे व MIDC ने जाक्र/उअ-1/सां/950/2010 उपअभियंता यांचे कार्यालय सांगली यांनी दि. 05/07/10 चे पत्रान्वये महामंडळास पाण्याची आवश्यकता असल्याने कोटा वाढविणे शक्य नसल्याचे कळविले आहे. परंतु 2010 नंतर पाणीपुरवठा विभागाने पाण्याचा कोटा वाढवुन घेण्यासाठी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार MIDC कडे केलेला नाही.<br>2)2012-13 या आर्थिक वर्षात महानगरपालिकेने SND/1072 व SND/1073 या कनेक्शन वरुन कोट्यापेक्षा जादा पाणी वापरलेने MIDC सांगलीस रु.930678/- आदा केले आहेत. महानगरपालिकेने MIDC बरोबर कोटा वाढवुन घेण्यासाठी पत्रव्यवहार केला नसल्याने महानगरपालिकेस पिण्याच्या पाण्यासाठी जादा पैसे आदा करावे लागल्याचे दिसुन येते.<br>3)2012-13 या आर्थिक वर्षात महानगरपालिकेने MIDC सांगली यांना पिण्याच्या पाण्यासाठी दिलेल्या देयकांची तपासणी केली असता रु.3887779/- आदा केलेचे दिसुन येते. महानगरपालिकेस केंद्र व राज्यशासनाकडुन UIDSSMT, सुजल निर्माण योजना, नगरोत्थान योजनेमधुन पाणीपुरवठ्याच्या कामासाठी निधी मिळाला आहे. या योजना मधुन ज्या भागांना महानगरपालिका पाणी पोहचवु शकत नाही त्या भागामध्ये प्राधान्याने कामे घेवुन ती कामे पुर्ण करणे आवश्यक असता त्या प्रमाणे कामे केली नसल्याने महानगरपालिकेस MIDC सांगलीकडुन पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागत आहे व त्याचे रु.3887779/- आदा केले आहेत.<br>अर्धसमास ज्ञापन क्र.93 दि.18/7/2014 रोजी निर्गमित केला असुन पाणीपुरवठा विभागाने त्याचे अनुपालन दि.04/8/2014 रोजी लेखापरीक्षणास सादर केले आहे.<br>**आक्षेपाधिन रक्कम रु. 4818457/-** |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 93 | 18/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |

| | |
|---|---|
| 66 | वसंतदादा शेतकरी सहकारी बँकेतील गुंतवणुकीस जबाबदार असणारे अधिकारी व कर्मचारी यांचे वर कारवाई केली नसल्या बाबत. |

| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 07 | लेखा | मनपा | 9ड | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेने वसंतदादा शेतकरी सहकारी बँकेमध्ये नियमबाह्यरित्या रु. 33.61 कोटी एवढ्या मोठ्या रक्कमेची गुंतवणूक केली होती. उच्च न्यायालयाचे दि.14.06.2011 च्या आदेशाप्रमाणे ठेवी संदर्भात संबंधित अधिकारी व जबाबदार कर्मचारी यांचेवर आवश्यक कारवाई करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्याप्रमाणे केलेल्या कारवाईची कागदपत्रे लेखापरीक्षणास सादर केलेली नाहीत.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेने वसंतदादा शेतकरी सहकारी बँक या बँकेमध्ये नियमबाह्यरित्या रु. 33.61 कोटी एवढ्या मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली होती. परंतु 2007-2008 या वर्षामध्ये सदरची बँक अवसायनात गेल्यामुळे महानगरपालिकेची सदरची रक्कम अडकुन पडली आहे.

40. याबाबत वित्तीय वर्ष 2011-12 चे लेखापरीक्षण अहवालामध्ये परिच्छेद क्र.33 मध्ये आक्षेप नोंदविल्याप्रमाणे उच्च न्यायालयाचे दि.14.06.2011 च्या आदेशाप्रमाणे ठेवी संदर्भात संबंधित अधिकारी व जबाबदार कर्मचारी यांचेवर आवश्यक कारवाई करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्याप्रमाणे केलेल्या कारवाईची कागदपत्रे लेखापरीक्षणास सादर केलेली नाहीत.

अर्धसमास ज्ञापन क्र .107 दि.28/07/2014 रोजी निर्गमित केला असुन लेखा विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले नाही.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 107 | 28/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |
|---|---|

| 67 | नियमबाह्यरित्या रक्कमा लेख्याबाहेर ठेवल्या बाबत. |
|---|---|

| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 07 | लेखा | मनपा | 9अ | 04 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
| --- | --- | --- | --- |
| 118628729 | 1186287 | | |

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता ,1971 मधील नियम क्रं. 32 (1) अन्वये नगरपरिषदेच्या वतीने जमा झालेले अथवा संवितरीत केलेले शासकिय अनुदानासहित सर्व पैसे हातचे काहीही राखून न ठेवता नमुना क्रं.11 मधील रोकड वहीत नोंदविणे आवश्यक आहे. परंतु सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेचे घरपट्टी, पाणी पुरवठा व जकात विभाग त्यांचे कडील करांची दैनिक जमा रक्कम दररोज लेखा विभागामध्ये जमा न करता परस्पर बँकेत जमा करीत असलेने सदर रक्कम लेख्याबाहेर रहात असलेचे स्पष्ट होते. तसेच मार्च 13 ची रक्कम रु.118628729/- नमुना क्र.11 मधील रोकडवहीमध्ये नोंदविली नसल्याने लेख्याबाहेर राहिलेचे स्पष्ट होते.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेचे लेखापरीक्षणामध्ये लेखा विभागाचे लेखापरीक्षण केले असता, विविध निधीच्या रोकडवह्या व त्यांचे बँक खातेचे लेखापरीक्षण करण्यात आले. परंतु घरपट्टी, पाणी पुरवठा व जकात विभागाकडील करांची दैनिक जमा रक्कम दररोज लेखा विभागामध्ये जमा होत नसल्याचे आढळुन आले. तसेच सदर बँक खातेची रोकडवही नसल्याचे आढळुन आले. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | बँकखातेक्रमांक | तपशील | बँकेचेनाव | 31.3.13 अखेर शिल्लक |
| --- | --- | --- | --- | --- |
| 1 | 470002010509946 | जनरल फंड | युनियन बँक | 1000.69 |
| 2 | 470002010509943 | विकास निधी | युनियन बँक | 1260.42 |
| 3 | 470002010509947 | अनामत | युनियन बँक | 1093.97 |
| 4 | 424202010502707 | जकात | युनियन बँक | 11,35,60,398.81 |
| 5 | 1180 | घरपट्टी | सारस्वत बँक | 45,93,584.87 |
| 6 | 1181 | पाणीपट्टी | सारस्वत बँक | 4,71,433.15 |

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)सदर खात्यांचे लेखे लेखा विभागात ठेवण्यात आलेले नाहीत. जकात,घरपट्टी व पाणी पट्टीवसुलीच्या

रक्कमा संबंधित विभाग बँकेमध्ये परस्पर भरणा करतात. परंतु सदर जमा रक्कमांचा तपशील लेखा विभागाकडील रोकडवहीमध्ये दैनंदिन नोंदविला जात नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता, 1971 मधील नियम क्रं. 32 (1) अन्वये नगरपरिषदेच्या वतीने जमा झालेले अथवा संवितरीत केलेले शासकिय अनुदानासहित सर्व पैसे हातचे काहीही राखून न ठेवता नमुना क्रं.11 मधील रोकडवहीत नोंदले पाहिजे तसेच नियम क्र. 2 अन्वये सर्व रोकड व धनादेश, रोकडवहीत नोंदविणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही न करता परस्पर सारस्वत बँकेमध्ये वरील विभागाकडून पैशाचा भरणा केला जातो. तसेच लेखा विभागाला आवश्यकता भासेल तेंव्हा रक्कम जनरलफंडाच्या बँक खात्यामध्ये वर्ग करुन त्यानंतर रोकडवहीला नोंदविली जाते. यावरुन सदर खात्यावर लेखा विभागाचे व मुख्य लेखाअधिकारी यांचे नियंत्रण नसल्याचे दिसुन येते.

2)नगरपरिषद लेखासंहीता 1971 चे नियम क्रं.35 व नॅशनल म्युनिसिपल अकौंट मॅन्युअल चे नियम 6.42(फॉर्म जनरल 12) अन्वये प्रत्येक देयक संकलकाने वा जमा कारकुनाने संकलीत वसुली ठराविक वेळी रोजच्या रोज भरणा केली पाहिजे. ती भरणा करतेवेळी त्याने सोबत जमापावती पुस्तक, चलन व त्यांचे संकलन पुस्तक आणले अथवा पाठविले पाहिजे. महानगरपालिका कार्यालयात सदर रक्कम स्विकार करणाऱ्याकडून त्यांची पोचपावती चलनावर व संकलन पुस्तकातही केली पाहिजे. नगरपरिषद लेखासंहीता 1971 चे नियम क्रं.36 (2) प्रमाणे जर जमावसुली निरीक्षकाने अथवा हे काम विशेषत: सोपविण्यात आलेल्या इतर अधिकाऱ्याने स्वीकारली असेल तर त्याने नमुना क्र.16 प्रमाणे ठेवलेल्या त्याच्या संकलन पुस्तकात त्याची नोंद ठेवली पाहिजे. सदर पुस्तक रोजच्या रोज पुरे करुन,लेखापाल वा रोखपाल यांच्याकडे पैसे भरणासोबत व चलनासहित, सर्वसाधारण रोकडवहीतील लेखेमध्ये अंतर्भाव करण्यासाठी सादर केले पाहिजेत. परंतु उपरोक्त नियमाप्रमाणे कार्यवाही न करता जकात,पाणीपुरवठा व घरपट्टी विभागांकडून त्यांचेकडील दैनंदिन जमा रक्कम परस्पर सारस्वत बँकेत भरणा केली जात असलेने महानगरपालिकेच्या रोकडवहीमध्ये वरील विभागांनी गोळा केलेल्या रक्कमांचा दररोज समावेश होत नसलेने सदर रक्कम लेख्याबाहेर रहात असलेचे स्पष्ट होते.

3)सदर बँक खात्याची रोकडवही संबधित विभागांनी ठेवली नसल्याने बँक खात्यातील शिल्लक व रोकडवही मधील शिल्लक रक्कमेचा मेळ घेता येत नाही. मार्च 13 अखेर वरील बँक खात्यामध्ये रु.118628729/- इतकी रक्कम शिल्लक आहे. सदर रक्कम नियोजन करुन एक वर्ष मुदतीने बँक खात्यामध्ये मुदत ठेवीमध्ये गुंतवणुक न केल्याने महानगरपालिकेचे 10 टक्के व्याजाने रु.1186287/- एवढ्या रक्कमेचे आर्थिक नुकसान झाले आहे. रोकडवही नसल्याने घरपट्टी विभाग, पाणी पुरवठा विभाग व जकात विभागाकडून वसुल केलेल्या करांचा संपुर्ण भरणा बँक खात्यामध्ये वेळीच केला किंवा नाही याची पडताळणी लेखापरीक्षणास करता आली नाही.

4)घरपट्टी, जकात व पाणी पुरवठा विभागांनी वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये करांच्या वसुलीची माहिती रोकडवही अभावी योग्य असल्याची खात्री करता येत नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र.108 दि.28/07/2014 चे अनुपालन लेखा विभागाने सादर केलेले नाही.

**आक्षेपाधिन रक्कम रु. 118628729/-**

**वसुलपात्र रक्कम रु. 1186287/-**

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 108 | 28/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |

| 68 | अनामत नोंदवहीतील बँक ताळमेळ जुळत नसल्या बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 07 | लेखा | मनपा | 9ब | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 2911618 | | | |

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेकडील अनामत नोंदवहीची वित्तीय वर्ष 2012-13 करिता तपासणी केली असता मार्च 2013 अखेर रोकडवही व बँक पासबुकमध्ये रु.29,11,618/- इतक्या रक्कमेची तफावत आढळुन आली आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिके कडील अनामत नोंदवहीची वित्तीयवर्ष 2012-13 करिता तपासणी केली असता मार्च 2013 अखेर रोकड वहीत बँक ताळमेळ नोंदविला आहे. त्यामध्ये खालील प्रमाणे उणिवा आढळुन आल्या आहेत.

41. रोकडवही नुसार मार्च अखेर शिल्लक रु.9,68,75,932.59/- आहे. यामध्ये शेतकरी बँक, युनियन बँक (सांगलीवमिरज), बँक ऑफ महाराष्ट्र, बँक ऑफ इंडिया, सिंडीकेट बँक, युको बँक इ. बँकेमधील सेव्हींग खात्यातील शिल्लक व मुदत ठेवीच्या स्वरुपातील गुंतवणुक रक्कम यांचा समावेश आहे.

सदर बँक खात्याचे पासबुक नुसार मार्च अखेरची शिल्लक रक्कम व रोकड वहीनुसार बँकेतील सेव्हींग खात्यावरील शिल्लक रक्कम याचा ताळमेळ घेण्यात आला आहे. सदर ताळमेळची तपासणी

केली असता खालील प्रमाणे उणिवा आढळुन आल्या आहेत.

**अ)**वसंतदादा शेतकरी सह. बँक

| | | |
|---|---|---|
| मार्च 2013 रोजीची रोखवही नुसार शिल्लक | रु. | 637056/- |
| जमेस येणेचे धनादेश | रु. | 10160/- |
| खर्ची पडावयाचे धनादेश | रु. | 6376/- |
| जमेस यावयाची चलने | रु. | 31340/- |
| | | ---------------------------------- |
| एकूण | रु. | 6,84,932/- |
| बँक पासबुक नुसार शिल्लक (सन 2008) ची | | रु.35,96,550/- |
| | | ----------------------------------- |
| फरक | | रु.29,11,618/- |

सदर फरक रक्कमेचा ताळमेळ घेतला नाही. नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 51 (3) नुसार ताळमेळ घेणे आवश्यक असता तो घेण्यात आलेला नाही. अनुपालनामध्ये ताळमेळ घेतला असल्याचे नमुद आहे. परंतु ताळमेळ घेतलेची कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नाहीत.

**ब)** शेतकरी बँक, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र इ. बँकाच्या ताळमेळामध्ये जमेस येणेचे धनादेश, न वटलेले धनादेश, जमेस येणेची चलन रक्कम, व्याज बँक पासबुकमध्ये जमा आहे. परंतु रोख वहीत जमा नाही. सदर बाबत योग्यती कार्यवाही करुन रोकडवहीस आवश्यक त्या जमा खर्चाच्या नोंदी केंव्हा घेण्यात आल्या याची माहिती लेखापरीक्षणास सादर केलेली नाही. अनुपालनास दिलेले उत्तर संयुक्तिक नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र.109 दि.28/07/2014 निर्गमित केला असुन लेखा विभागाने त्याचे अनुपालन दि.18/10/2014 रोजी दोन महिने विलंबाने सादर केले आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु. 29,11,618/-

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 109 | 28/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |

| | |
|---|---|
| 69 | लेखा शाखेकडील विविध निधींच्या बँक ताळमेळा मधील त्रुटीबाबत. |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 07 | लेखा | मनपा | 9ब | 04 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 11288753 | | | |

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेकडील लेखा विभागात असलेल्या प्रशमन शुल्क, विकास आकार, सुवर्ण जयंती रोजगार योजना निधींच्या रोकड पुस्तक व बँक पासबुक शिल्लक यांचा ताळमेळ घेतला असता रु. 11288753/- चा ताळमेळ घेतला नसल्याचे दिसुन आले.

लेखा विभागात असलेल्या विविध निधींच्या रोकड पुस्तकामध्ये बँक पासबुक शिल्लक रकमेशी ताळमेळ घेण्यात आला आहे. मार्च 2013 अखेर नोंदविण्यात आलेल्या बँक ताळमेळची तपासणी केली असता खालील निधीच्या ताळमेळामध्ये उणिवा आढळुन आल्या आहेत.

1)प्रशमन शुल्क

रोकड वहीनुसार शिल्लक रु.65,59691.41/-

बँक पासबुक नुसार शिल्लक रु.1,35,46,681.10/-

-----------------------------

फरक रु.69,86,950.69/-

जमेस येणेची चलने रु.69,86,950.69/-

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता,1971 क्रं. 32 (1) अन्वये नगरपरिषदेच्या वतीने जमा झालेले अथवा संवितरीत केलेले शासकिय अनुदानासहित सर्व पैसे हातचे काहीही राखून न ठेवता नमुना क्रं.11 मधील रोकड वहीत नोंदले पाहिजे तसेच 2 अन्वये सर्व रोकड व धनादेश रोकड वहीत नोंदणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे जमा रक्कमेची नोंद वेळीच रोकडवहीस घेणे आवश्यक असताना रु.69,86,950.69/- ची चलने आली नाहीत म्हणून रक्कम रोकडवहीस जमा घेतली नसल्याचे दिसुन आले आहे.

2) विकास आकार

| | |
|---|---|
| रोकडवही नुसार शिल्लक | रु.92,96,624.40/- |
| बँक पासबुक नुसार शिल्लक | रु.1,28,10,440.90/- |
| | ------------------------------ |
| फरक | रु.35,13,816.50/- |
| जमेस येणेची चलने | रु.35,13,816.50/- |

रु.35,13,816.50/- एवढ्या मोठ्या रकमेची चलने आली नाहीत म्हणून ती रोकडवहीस जमा केली नाहीत असा शेरा रोकडवहीमध्ये घेण्यात आला आहे.

3)गणेश तलाव अनुदान गुंतवणुक रक्कम रु.3063576/- व अल्पसंख्याक निधी अनुदान गुंतवणुक रक्कम रु.3263418/- या रक्कमांचा समावेश रोकडवहीच्या प्रत्येक दिवशीचे सुरवातीची शिल्लक व अखेर शिल्लक यामध्ये करणे आवश्यक असता सदर गुंतवणुकीच्या रकमेचा समावेश केला नसल्याचे आढळुन आले आहे. रोकडवहीतील शिल्लक ही सर्व बँक खात्यातील शिल्लक व गुंतवणुकीसह असणे आवश्यक असताना गुंतवणुक रक्कम स्वतंत्र ठेवण्यात आली आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये सदर गुंतवणुक दि.01/04/2014 पासुन रोकडवहीस घेतल्याचे नमुद आहे. परंतु रक्कम मार्च 13 मध्ये रोकडवहीस घेतली नसल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.

4)सुवर्ण जयंती रोजगार योजना

| | |
|---|---|
| पासबुक नुसार शिल्लक | रु.3,16,94,346.45/- |
| रोकडवही नुसार शिल्लक | रु.3,09,06,359.85/- |
| | -------------------------------------- |
| फरक | रु.7,87,987/- |

न वटलेल्या धनादेशाची एकूण रक्कम रु.7,87,987/-

सदर न वटलेल्या धनादेशा पैकी धनादेश क्रमांक 56939 दि.22.03.2011 रु.10,000/- व धनादेश

क्रमांक 68920 दि.02.01.2012 रु.525/- या मुदतबाह्य धनादेशाचा समावेश आहे. परंतु सदर मुदतबाह्य धनादेश वेळीच रद्द करुन रोकडवहीस सदर रक्कम जमा होणे आवश्यक असताना तशी कार्यवाही अद्याप झाली नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र.110 दि.28/07/2010 रोजी निर्गमित केला असुन लेखा विभागाने त्याचे अनुपालन दि.20/10/2014 रोजी दोन महिने विलंबाने सादर केले आहे. अनुपालनामध्ये प्रशमन शुल्क व विकास आकाराची चलने संबंधीत विभागाकडुन प्राप्त न झाल्याने रोकडवहीस नोंदविण्यात आली नसल्याचे नमुद आहे. नियमानुसार दररोज प्राप्त झालेले सर्व पैसे रोकडवहीस नोंदविणे आवश्यक असल्याने व त्याप्रमाणे कार्यवाही होत नसल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.

**आक्षेपाधिन रक्कम रु. 11288753/-**

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 110 | 28/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |
|---|---|

| 70 | औषधांची अनावश्यक खरेदी केले बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 12 | आरोग्य | मनपा | 9ड | 04 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | 1300 | | |

दि. 2 जाने, 1992 च्या शासन निर्णयामधील परिच्छेद 8.3 (ई) नुसार वर्षभर आवश्यतेनुसार वस्तु खरेदी करणेसाठी दरवर्षी संख्या करारापेक्षा दर करार करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे आरोग्य विभागाने निविदा

मागवुन नियमाप्रमाणे ठेकेदाराबरोबर दर करार केला आहे. साठा नोंदवहीची तपासणी केली असता काही औषधे 2011-12 या वित्तिय वर्षामध्ये अनावश्यक रित्या खरेदी केली असुन ती 2012-13 या वर्षामध्ये ही शिल्लक असल्याचे साठा नोंदवहीची तपासणी केली असता निदर्शनास आले आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडील औषध भांडार विभागाच्या औषध खरेदी साठा नोंदवहीची तपासणी केली असता खालील प्रमाणे उणिवा आढळुन आल्या.

1)आरोग्य विभागाची औषध खरेदी ही वार्षिक दर करारानुसार करण्यात येते. वित्तीय वर्ष 2012-13 ची वार्षिक दर करार प्रक्रिया उशिराने राबविल्याने नवीन पुरवठादार निश्चीत होणेस विलंब लागणार असल्याने स्थायी समिती ठराव क्रमांक 136 दि.17.07.2012 अन्वये 2012-13 साठी वार्षिक एजन्सी नियुक्त होई पर्यंत रु.5,00,000/- पर्यंतची औषध खरेदी 2011-12 चे मंजूर पुरवठा धारकाकडून मागील वर्षाच्या मंजूर दराने करण्यास मान्यता देण्यात आली आहे. उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखसं - 1088/2512/ उद्योग/6 दि.2 जानेवारी 1992 मधील परिच्छेद 10.8 नुसार वस्तु खरेदीच्या दरकराराचा कालावधी 1 जुलै ते 30 जूनपर्यंत ठरविण्यात आल्याने निविदेची कार्यवाही 30 जून पुर्वी करुन एकाच वेळी वस्तु खरेदीची जाहिरात देणे आवश्यक असता, आरोग्य विभागाने खरेदीची प्रक्रीया जुलै महिन्यानंतर सुरु केली आहे व दरकरार नोव्हेंबर मध्ये केला आहे. खरेदी प्रक्रीयेच्या विलंबाबाबत खुलासा करणेत आलेला नाही.

2)दि. 2 जाने.1992 च्या शासन निर्णयामधील परिच्छेद 8.3 (ई) नुसार वर्षभर आवश्यतेनुसार वस्तु खरेदी करणेसाठी दरवर्षी संख्या करारापेक्षा दर करार करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे आरोग्य विभागाने निविदा मागवुन नियमाप्रमाणे ठेकेदाराबरोबर दर करार केला आहे. साठा नोंदवहीची तपासणी केली असता खालील प्रमाणे काही औषधे 2011-12 मध्ये अनावश्यकरित्या खरेदी केल्याचे साठा नोंदवहीची तपासणी केली असता निदर्शनास आले आहे.

3)2012-13 या वर्षामध्ये मागणीप्रमाणे औषधाचा वापर करुन ही खालील औषधे मार्च 13 मध्ये शिल्लक राहील्याचे दिसुन आले आहे.वरीलप्रमाणे जादा खरेदी केल्याचे दिसून येते. सदर जादा खरेदी केलेली औषधे मुदतबाह्य होण्या पूर्वी वापरली किंवा कसे याची खात्री लेखापरीक्षणास पटवण्यात आलेली नाही. वार्षिक दरकरार असताना अनावश्यकरित्या औषध खरेदी करण्यात आली आहे.

| अ.क्र. | औषधाचेनाव | खरेदी दिनांक | परिमाण | खरेदीदिनांकाचीआरंभीशिल्लक | एकुण | 16/2/12 ते 31/3/12 पर्यंतचा वापर | 1/4/12 ची शिल्लक | 2012-13 मधीलवापर | 2012-13 अखेर शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | डायक्लो सोडीयम 50mg | 16.2.12 | 100000 गोळ्या | 38600 गोळ्या | 138600 गोळ्या | 14000 गोळ्या | 124600 गोळ्या | 81800 गोळ्या | 42800 गोळ्या |
| 2 | डायक्लो सोडीयम 100mg | 16.2.12 | 50000 गोळ्या | 9000 गोळ्या | 59000 गोळ्या | 1000 गोळ्या | 58000 गोळ्या | 12700 गोळ्या | 45300 गोळ्या |
| 3 | स्टेथस्कोप | - | - | - | - | - | 25 | 4 | 21 |
| 4 | कॉटन मास्क | - | - | - | - | - | 642 | 200 | 442 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | बी.पी.ॲपरेट्स | - | - | - | - | - | 20 | 10 | 10 |
| 6 | E.E.Drops Ciplox | - | - | - | - | - | 215 | 135 | 80 |
| 7 | Gel Persol | - | - | - | - | - | 200 | 120 | 80 |
| 8 | Oil Terpentile | - | - | - | - | - | 10x400ml | 3x400ml | 7x400ml |
| 9 | लोशन सॅव्हलॉन | - | - | - | - | - | 251x1lt | 143x1lt | 108x1lt |

4)प्रमाणक क्रमांक 1795 दि.18.07.2012 अन्वये रक्कम रुपये 164900/- व्यंकटेश्वरा डिस्ट्रीब्युटरर्स, सांगली यांना त्यांचे बिल क्र.11 दि.16.03.2012 अन्वये दि.16.02.2012 रोजी पुरविल्याने (डिलीव्हरी चलन क्रमांक 267) औषधाची रक्कम आदा करण्यात आली. सदर बिलामधील औषधांची औषधसाठा नोंदवहीस घेण्यात आलेल्या जमेची तपासणी केली असता, सोप्रामायसीन क्रिम 100 gm हे औषध बिलामध्ये 200 ट्युब पुरविल्याचे नमुद आहे. परंतु औषधसाठा नोंदवही क्रमांक 2, पृष्ठ क्रमांक 122 वर सदरचे औषध 180 ट्युब जमा दाखविले आहे. त्यामुळे 20 ट्युबची रक्कम रुपये 1300/- (20 ट्युब x 65/-) पुरवठादारास जादा आदा झाली आहे. सदरची रक्कम वसुल पुरवठादाराकडून वसुल करण्यात यावी.
अर्धसमास ज्ञापन क्र.111 दि.28/07/2014 चे अनुपालन आरोग्य विभागाने सादर केलेले नाही.

**वसुलपात्र रक्कम रु.1300/-**

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 111 | 28/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |
|---|---|

| 71 | मागणी नसताना औषधांचे दवाखान्यांना मोठ्या प्रमाणात वाटप केले बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 12 | आरोग्य | मनपा | 9ड | 04 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडील औषध भांडाराच्या औषध साठा नोंदवहीची तपासणी केली असता कांही औषधे विभागिय दवाखान्यांना मोठया प्रमाणात वाटप केलेली आहेत. सदर औषधे विभागिय दवाखान्यांनी विहित वेळेत वापरली किंवा नाही याची माहीती लेखापरीक्षणास सादर केलेली नाही.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडील औषध भांडाराच्या औषध साठा नोंदवहीची तपासणी केली असता खालील प्रमाणे उणिवा आढळुन आल्या आहेत.

1)वार्षिक दर करारानुसार मंजुर पुरवठाधारकाकडून खरेदी केलेली औषधे , औषध साठा नोंदवहीस जमा घेण्यात आली आहेत. परंतु आरोग्य विभागाने पुरवठा दारास दिलेले पुरवठा आदेश लेखापरीक्षणास दिले नसल्याने औषधांचा पुरवठा विहित मुदतीत झाल्याची खात्री लेखापरीक्षणास करता आलेली नाही.

2)औषधे महानगरपालिकेच्या विविध आरोग्य दवाखान्यास , प्रसुतीगृह यांना त्यांचे मागणीप्रमाणे पुरविले जतात. परंतु तपासणीमध्ये काही औषधे एकदम जादा प्रमाणात वाटप केल्याचे दिसुन आले उदा.

| अ.क्र. | साठानोंदवहीक्र./पृ.क्र. | औषधाचेनाव | परिमाण | दिनांक | कोणासदिले. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 3/8 | सॅनिटरीपॅडपॅकेट | 480x10 | 21.8.12 | प्रसुतीगृहमिरज |
| 2 | 3/8 | ---"--- | 720x10 | 21.8.12 | ---"--- |
| 3 | 3/59 | ब्लडप्रिकलोगबॅनसेट | 45000 | 20.11.12 | राष्ट्रीयकिटकजन्यनियंत्रणकार्यक्रम |
| 4 | 3/65 | ग्लासस्लाईट | 490 पॅक (1x50) | 20.11.12 | ---"--- |
| 5 | 1/195 | कफसिरप | 104 कॅन (1x4.5 lt) | 11.9.12 | मिरज OPD |
| 6 | | लि.मेडीक्लोअर | 3000 बॉटल (1x100ml) | 12.7.12 | मिरज |
| 7 | | ---"--- | ---"--- | 11.9.12 | मिरज OPD |
| 8 | 1/195 | कफसिरप | 320 कॅन (1x4.5 lt.) | 5.5.12 | ---"--- |
| 9 | | युरोसॅक | 50 नग | 30.1.13 | प्रसुतीगृहमिरज |
| 10 | | ARV Vail | 1000 नग | 7.11.12 | मिरज OPD |

तरी, वरील बाबत संबंधितांची मागणी किती होती व जादा प्रमाणात पुरवठा का करण्यात आला.? तसेच सदर जादा पुरवलेल्या औषधाची मुदतबाह्य दिनांक काय होती व सदर औषधाचा वापर विहित मुदतीत (मुदतबाह्य दिनांका पुर्वी) झाला किंवा कसे याची माहिती लेखापरीक्षणास सादर केलेली नाही.

3)औषध भांडार विभागाने (Expiry Date Registar) मुदतबाह्य औषधांची नोंदवही ठेवलेली नाही. पुरवठा झालेल्या औषधांचा बॅच क्रमांक, औषध साठा नोंदवहीत नोंदविला असून स्वतंत्र मुदतबाह्य औषध नोंदवही (Expiry Date Registar) ठेवली नसल्याने प्रत्येक बॅचमधील औषधांचा विनियोग मुदतबाह्य दिनांका पुर्वी करण्यात आला किंवा नाही याची माहीती समजुन येत नाही.

4)महानगरपालिकेचे वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांनी सदर औषध साठा नोंदवहीनुसार शिल्लक

| |
|---|
| औषधांची प्रत्यक्ष तपासणी (अचानक) केल्याचे प्रमाणपत्र औषध साठा नोंदवहीस आढळुन आले नाही. अर्धसमास ज्ञापन क्र.112 दि.28/07/2014 चे अनुपालन आरोग्य विभागाने सादर केलेले नाही. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 112 | 28/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |
|---|---|

| 72 | घरपट्टी विभाग (मिरज) करसंकलन रक्कम बँकेमध्ये भरणा न केल्याने झालेल्या कायम अपहाराबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 11 | करनिर्धारण व संकलन | मनपा | 9क | 10 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | 1517790 | | |

| |
|---|
| मिरज घरपट्टी विभागाकडे 2012-13 या आर्थिक वर्षात एकुण 16 चलनाची रक्कम रु. 1517790/- चा बँकेत भरणा न करता या रक्कमेचा अपहार केला आहे. मुख्य लेखाअधिकारी यांचे पत्र जा.क्र./ मनपा/लेखावि/317 दि.9/12/13 अन्वये या रक्कमांची पडताळणी होवुन अपहाराची रक्कम रु.1517790/- निश्चित करण्यात आली आहे. परंतु या अपहारास जबाबदार असणा-या कर्मचा-यावर केलेली कारवाई व अपहाराच्या रक्कमेची जबाबदारी कोणावर निश्चित केली आहे व किती रक्कम वसुल करण्यात आली आहे याचा अहवाल लेखापरिक्षणास देण्यात आलेला नाही. |

| |
|---|
| सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका मिरज घरपट्टी विभागाच्या जमेच्या लेखापरीक्षणासाठी मार्च 13 या महिन्याची निवड करण्यात आली आहे. या महिन्यामध्ये आढळुन आलेल्या |

रु.10000/- च्या तात्पुरत्या रक्कमेच्या अपहाराबाबत  अर्धसमास ज्ञापन क्रमांक 55 दि.10/06/2014 रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

मिरज घरपट्टी विभागाकडील नस्तींचे लेखापरिक्षणामध्ये प्रभारी करनिरिक्षक यांचे पत्र क्र.मनप/करवि/मि/2013-14 दि.11/12/13 चे अवलोकन केले असता, या कार्यालयाकडील कर विभागाच्या कु. सालेहबेगम म. जलील भोकरे, क.लिपिक यांनी मिळकत कराची रक्कम सारस्वत को-ऑप बँक लि. मिरज या बँकेमध्ये खाते क्र.1180 वर जमा केली नसलेने रु.1517790/- चा अपहार झालेचे नमुद केले आहे. मुख्य लेखाअधिकारी यांचे पत्र जा.क्र./मनपा/लेखावि/317 दि.9/12/13 अन्वये या रक्कमांची पडताळणी होवुन अपहाराची रक्कम रु.1517790/- निश्चित करण्यात आली  आहे. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.128, दि.15/9/2014 रोजी निर्गमित केला आहे. परंतु घरपट्टी विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले नाही.

संबंधित महिला लिपिक कर्मचा-याने 2012-13 या आर्थिक वर्षात एकुण 16 चलनांची रक्कम रु.1517790/- बँकेमध्ये जमा न करता परस्पर अपहार केलेचे पत्रामध्ये नमुद आहे.

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)मिरज विभागामध्ये जमा कारकुनांनी वसुल केलेली घरपट्टीची दैनंदिन जमा रक्कम एकत्रित करुन त्याची नोंद रोकडवहीमध्ये केलेनंतर चलन तयार करण्याची व ते बँकेमध्ये भरण्याची जबाबदारी कोणावर सोपविण्यात आली होती? त्याबाबत सक्षम प्राधिका-याच्या आदेशाची प्रत लेखापरिक्षणास देण्यात आलेली नाही.

2)मिरज विभागामध्ये लेखापालाचे एक पद असुन त्या पदाची नेमुन दिलेली कार्य व कर्तव्य लेखापरिक्षणास देण्यात आलेली नाही. तसेच दैनंदिन जमेची रक्कम लेखापाल यांनी बँकेमध्ये जमा करणे आवश्यक असता सदर रक्कम भोकरे, क.लिपिक या बँकेमध्ये कोणाच्या आदेशाने भरणा करीत होत्या याचा   खुलासा करणेत आलेला नाही.

3)श्रीमती भोकरे क.लिपिक यांना नेमुन दिलेली कार्य व कर्तव्य व चलनाप्रमाणे रक्कम बँकेत जमा करणे बाबत त्यांना देण्यात आलेल्या आदेशाची प्रत लेखापरिक्षणास सादर केलेली नाही.

4)नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 78 (3) अन्वये करसंकलन लिपिकाने नमूना क्र. 13 प्रमाणे चलन तयार करुन करसंकलन निरीक्षकाकडे अथवा मुख्य कार्यालयास,लेखाशाखेकडे संकलनाचा भरणा केला पाहिजे.  तसेच चलनामध्ये करनिरीक्षकाने फक्त प्रत्येक कराची एकूण जमा वसुली व एकूण संकलनाची बेरीज दर्शविली पाहिजे. परंतु संबंधीत विभागाने चलनाप्रमाणे जमा झालेली रक्कम लेखा विभागा  कडे न भरता परस्पर बँकेमध्ये जमा केली आहे. तसेच त्याचे चलन लेखा विभागास देणे आवश्यक असता ते देण्यात आलेले नाही.

5)नगरपालिका लेखासंहीता 1971 चे नियम क्रं.35 व नॅशनल म्युनिसिपल अकौंट मॅन्युअल चे नियम 6.42 (फॉर्म जनरल 12) अन्वये प्रत्येक देयक संकलकाने वा जमा कारकुनाने संकलीत वसुली ठराविक वेळी रोजच्या रोज भरणा केली पाहिजे. ती भरणा करतेवेळी त्याने सोबत जमापावती पुस्तक, चलन व त्यांचे संकलन पुस्तक आणले अथवा पाठविले पाहिजे. नगरपरिषद कार्यालयात सदर रक्कम स्विकार करणा-याकडून त्याची पोचपावती चलनावर व संकलन पुस्तकातही केली पाहिजे. उपरोक्त नियमाप्रमाणे कार्यवाही न करता रक्कम परस्पर सारस्वत बँकेत भरणा केली जात असलेने महापालिकेच्या

रोकडवहीमध्ये करनिर्धारण विभागाने गोळा केलेल्या रक्कमांचा दैनंदिन समावेश होत नसलेने या रक्कमा लेख्याबाहेर राहत असलेचे स्पष्ट होते.

6)नगरपरिषद लेखासंहीता 1971 चे नियम क्रं.36 (2) प्रमाणे जर जमावसुली, निरीक्षकाने अथवा हे काम विशेषत: सोपविण्यात आलेल्या इतर अधिका-याने स्वीकारली असेल तर त्याने नमुना क्र.16 प्रमाणे ठेवलेल्या त्याच्या संकलन पुस्तकात त्याची नोंद ठेवली पाहिजे. सदर पुस्तक रोजच्या रोज पुरे करुन, लेखापाल वा रोखपाल यांच्याकडे पैसे भरणा सोबत व चलना सहित , सर्वसाधारण रोकडवहीतील लेख्यामध्ये अंतर्भाव करण्यासाठी सादर केले पाहिजेत. परंतु या नियमा प्रमाणे चलने व पैसे लेखा विभागाकडे देण्यात आलेले नाहीत.

7)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता, 1971चे नियम क्रं. 32 (1) अन्वये नगरपरिषदेच्या वतीने जमा झालेले अथवा संवितरीत केलेले शासकिय अनुदानासहित सर्व पैसे हातचे काहीही राखून न ठेवता नमुना क्रं.11 मधील रोकड वहीत नोंदले पाहिजे तसेच (2) अन्वये सर्व रोकड व धनादेश रोकड वहीत नोंदणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही न करता परस्पर सारस्वत बॅंकेमध्ये करनिर्धारण विभागाकडून पैशाचा भरणा केला आहे.

8)महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 51 मधील (3) नुसार तसेच **राष्ट्रीय लेखासंहिता नियमावली 2005 मधील परिच्छेद** 30.5 ते 30.8 मधील कार्यपध्दतीनुसार रोखवही, बॅंक पासबुक व बॅंक विवरणपत्रानुसार दरमहा ताळमेळ घेणे आवश्यक आहे. प्रत्येक महिना अखेर रोकडवहीतील नोंदलेल्या जमा व खर्चाच्या नोंदीची बॅंक पासबुक मधील नोंदीबरोबर बाबवार तुलना करून जर काही फरक असेल तर तो तळ टीपेमध्ये दाखविणे आवश्यक आहे. करनिर्धारण विभाग वसुलीची रक्कम परस्पर बॅंकेमध्ये भरणा करीत असल्याने बॅंकेच्या शिल्लकेबरोबर दरमहा रोखवहीमध्ये ताळमेळ नोंदविणे आवश्यक असता तो नोंदविण्यात आलेला नाही.

9)महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम क्र. 55 नुसार जेव्हा नगरपालिकेच्या/ महानगरपालिकेच्या पैशाचे वा मुल्यवान वस्तू/मालाचे अपहरण व अफरातफर, पैशाची व वस्तूमालाची निष्काळजीपणामुळे वा इतर कारणांनी झालेली हानी/तोटा आढळून येईल तेव्हा वस्तूस्थितीचा अहवाल मुख्यलेखापरीक्षक, नगरप्रशासन संचालक, यांना कळविणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे अहवाल पाठविलेची प्रत लेखापरीक्षणास देण्यात आलेली नाही.

10)मुख्य लेखाअधिकारी यांचे जा.क्र./मनपा/लेखावि/317 दि.9/12/13 अन्वये रक्कमांची पडताळणी होवुन निश्चित केलेली अपहाराची रक्कम रु.1517790/- वसुल करणेबाबत व अपहारास जबाबदार कर्मचा-यावर काय कार्यवाही करणेत आली याचा अहवाल लेखापरीक्षणास देण्यात आलेला नाही.

**अपहाराची वसुलपात्र रक्कम रु. 1517790/-**

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 128 | 15/09/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |
|---|---|

| 73 | झोपडपट्टीधारकांना ओळखपत्र वितरीत केल्याबाबतचे दप्तर उपलब्ध केले नसलेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 28 | नागरी समु.विकास प्रकल्प विभाग | मनपा | 9ब | 03 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | 1139400 | | |

गृहनिर्माण विभाग शासन निर्णय क्र.गवसू-1220/प्र.क्र.364 (2) झोपसू-1 दि.3/5/2003 अन्वये मुद्दा क्र.6(ब) नुसार सुधारणा करुन पात्र झोपडपट्टीवासीयांना ओळखपत्र योजनेअंतर्गत ओळखपत्र देताना निवासी वापरातील झोपड्यांची दि.31/12/02 पासुन 6(क) अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्राव्यतिरीक्त अन्य महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रातील वसुल करावयाच्या एकत्रित शुल्काचा दर परीच्छेद 6(ब)(5) मध्ये नमुद केल्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रासाठीच्या दराच्या 25 टक्के एवढा राहिल असे शासन आदेशात नमुद आहे. **IHSDP** योजने अंतर्गत एकुण 3798 झोपडपट्टी धारकांना घरकूल बांधुन देण्याचे काम महानगरपालिका केंद्रशासन व राज्य शासन यांनी दिलेल्या अनुदानामधून करत असल्याने 3798 झोपडपट्टी धारक X रु.300 X 10 वर्ष एकुण रक्कम रु.1139400/- वसुल करणे आवश्यक आहे. या विभागाचे दप्तर लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेले नाही.

1)गृहनिर्माण विभाग शासन निर्णय क्र.गवसू 1220/प्र.क्र.204(1) झोपसू-1.दि.11/7/2001 अन्वये 6 (क) नुसार बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राव्यतिरिक्त अन्य महानगरपालिका व नगरपालिका व नगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टीसाठी सेवाशुल्क इत्यादिंचा दर अनुक्रमे 50 टक्के व 25 टक्के राहील असे आदेश होते.

तथापि सदर शासन निर्णयास सूधारणा करुन गृहनिर्माण विभाग शासन निर्णय क्र. गवसू 1220/प्र.क्र.364 (2)/झोपसू-1 दि.3/5/2001 अन्वये 6 (ब) नुसार सूधारणा करुन पात्र झोपडपट्टीवासियांना ओळखपत्र योजनेअंतर्गत ओळखपत्र देताना निवासी वापरातील झोपड्यांची दि.31/12/2002 पर्यंतच्या नुकसान भरपाई/ **<u>एकत्रित शुल्काची थकबाकी माफ करण्यात आलेली आहे</u>**. तसेच 6 (क) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राव्यतिरिक्त अन्य महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रातील वसूल करावयाच्या एकत्रित शुल्काचा दर परिच्छेद 6 (ब) 5 मध्ये नमुद केल्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रासाठीच्या दराच्या 25 टक्के एवढा राहील असे शासन आदेश आहेत. याबाबत विभागाने सदर शासन निर्णयानुसार काय कार्यवाही केली याबाबतची माहिती लेखापरीक्षणास देण्यात आलेली नाही.

2)गृहनिर्माण विभाग शासन निर्णय क्र.गवसू-1220/प्र.क्र.364 (2) झोपसू-1 दि.3/5/2003 अन्वये मुद्दा क्र.6(ब) नुसार सुधारणा करुन पात्र झोपडपट्टीवासीयांना ओळखपत्र योजनेअंतर्गत ओळखपत्र देताना निवासी वापरातील झोपड्यांची दि.31/12/02 पर्यंतच्या नुकसान भरपाई/एकत्रित शुल्काची थकबाकी माफ करण्यात आली आहे. तसेच 6(क) अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्राव्यतिरीक्त अन्य महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रातील वसुल करावयाच्या एकत्रित शुल्काचा दर परीच्छेद 6(ब) (5) मध्ये नमुद केल्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रासाठीच्या दराच्या 25 टक्के एवढा राहिल असे शासन आदेशात नमुद आहे. अर्धसमास ज्ञापन क्र.129, दि.15/9/2014 ने खालील नमुन्यात झोपडपट्टी धारकांची माहिती मागविण्यात आली होती. परंतु माहिती देण्यात आलेली नाही.

| अ.क्र | झोपडपट्टी प्रभागाचे नाव व प्रभाग क्र. | 1/1/95 पर्यंत अस्तित्वात असलेल्या व सर्वेक्षणानुसार पात्र झोपडपट्टीधारक एकूण संख्या | प्रत्यक्षात ओळखपत्र दिलेल्या झोपडपट्टीधारकांची संख्या | ओळखपत्र अद्याप वितरीत न केलेल्या झोपडपट्टीधारकांची संख्या |
|---|---|---|---|---|
| अ. | निवासी | | | |
| ब. | सांस्कृतिक, सामाजिक,धार्मिक व शैक्षणिक | | | -- |
| क. | संयुक्त | | | -- |
| ड. | अनिवासी | | | -- |
| एकूण | | | | |

| |
|---|
| 3)एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरकुल योजनेच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता या प्रकल्पाच्या प्रस्तावामध्ये एकुण 3798 लाभार्थींची यादी केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार केली असुन सदर घरकुले बांधण्यासाठी महानगरपालिकेस शासनाकडुन मान्यता मिळाली आहे. त्यामुळे या झोपडपट्टीधारकाकडुन रु.300 या वार्षिक दराने 10 वर्षाची (3798 झोपडपट्टी धारक X रु.300 X 10 वर्ष) एकुण रक्कम रु.1139400/- वसुली केली नसल्याने सदर वसुली करुन लेखापरीक्षणास अनुपालन सादर करावे. या व्यतिरिक्त अन्य पात्र झोपडपट्टीधारकांकडुन वरील प्रमाणे रक्कम वसुल करुन लेखापरीक्षणास अनुपालन सादर करावे.<br><br>4)अर्धसमास ज्ञापन क्र.129, दि.15/9/2014 रोजी निर्गमित केला आहे. परंतु झोपडपट्टी विभागाने त्याचे अनुपालन व दप्तर लेखापरीक्षणास सादर केलेले नाही.<br><br>**वसुलपात्र रक्कम रु. 1139400/-** |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 129 | 15/09/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |
|---|---|

| 74 | वर्ग 4 च्या कर्मचा-यांना आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ देताना चुकीचे ग्रेड वेतन मंजूर केले बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 02 | सामान्य प्रशासन | मनपा | 9अ | 02 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

| |
|---|
| शासन निर्णय दि.01/04/2010 अन्वये 24 वर्ष सेवा पुर्ण झाल्यामुळे सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ मंजूर केला आहे. तो लाभ देताना त्यांना ग्रेड वेतन रु.1800 मंजूर करण्याऐवजी रु.1900 मंजुर केल्याने वेतन व भत्त्याची जादा आदायगी होत आहे. त्यामुळे सदर कर्मचा-यांची 6 व्या वेतन आयोगाची पुन्हा फेरवेतन निश्चिती करुन जादा दिलेल्या वेतनाची परिगणना करुन रक्कम वसुल करण्यात यावी. |

| |
|---|
| सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आस्थापना विभागाचे लेखापरीक्षणा मध्ये वर्ग 4 च्या कर्मचा-यांना शासन निर्णय दि.01.04.2010 नुसार सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा लाभ आदेश क्र. 901 दि.19.03.2013 व क्र. 187 दि. 30.09.2013 अन्वये मंजूर झाला आहे.<br>1)सदर आदेशातील कर्मचारी यांना 6 वा वेतन आयोग वेतन निश्चितीमध्ये, (परिशिष्ठ क्र. 6) मधील 59 कर्मचा-यांना 4440-7440 हा क-1 पे बँडच्या अंतीम टप्प्यावर म्हणजे रु.7440/- वर पोहचल्यावर लगतचा पे बँड PB-1 5200-20400 हा मंजूर केला आहे. परंतु सदरचा पे बँड मंजूर केलेनंतर ग्रेड पे 1300 ऐवजी 1600 मंजुर करुन त्याप्रमाणे वेतन आदा केले आहे. या चुकीचे ग्रेड वेतनाबाबत स्वतंत्र अर्धसमास पत्र क्र.88 दि.18/7/14 रोजी देण्यात आला आहे. सदर कर्मचा-यांना शासन निर्णय दि.01/04/2010 अन्वये 24 वर्ष सेवा पुर्ण झाल्यामुळे सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ मंजूर केला आहे. तो लाभ देताना त्यांना ग्रेड वेतन रु.1800 मंजूर करण्याऐवजी रु.1900 मंजुर केल्याने वेतन व भत्त्याची जादा आदायगी होत आहे. त्यामुळे सदर कर्मचा-यांची 6 व्या वेतन आयोगाची पुन्हा फेरवेतन निश्चिती करुन जादा दिलेल्या वेतनाची परिगणना करुन रक्कम वसुल करण्यात यावी.<br>2)सदर आदेशाची अंमलबजावणी 2013-14 या वित्तीय वर्षात झाली असल्याने अतिप्रदान रक्कम परिगणित करून वसुलात आणावी. आयुक्त यांचे आदेश क्र. 901 दि.19.03.2013 व आयुक्त यांचे आदेश क्र. 187 दि. 30.09.2013 अन्वये मंजूर केलेल्या दुसऱ्या लाभा नुसारच्या वेतन निश्चितीची नोंद सेवा पुस्तकात केली नसल्याचे आढळुन आले आहे. तरी सदर कर्मचा-यांची 6 वा वेतन आयोग व सेवा अंतर्गत प्रगती योजना दुसरा लाभ इ. ची वेतन निश्चिती सुधारित करून जादा रक्कम वसुलात आणावी व सेवापुस्तके अद्यावत करून त्या प्रमाणे वेतन देण्यात यावे. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 135 | 19/09/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |
|---|---|

| 75 | घरपट्टी विभागाने गुंठेवारी क्षेत्रातील अवैध बांधकामावरील शास्तीची आकारणी केली नसल्या बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 11 | करनिर्धारण व संकलन | मनपा | 9अ | 06 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | 45903 | | |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 267 अ नुसार अवैध इमारतीवर शास्ती बसविणे आवश्यक आहे. अशा बांधकामावर जोपर्यंत ते बांधकाम अवैध म्हणून राहिल तो पर्यंत दरवर्षी अशा इमारतीवर बसविण्या योग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुपटी इतकी शास्ती आकारणे आवश्यक आहे. परंतु महानगरपालिकेने महासभा ठराव क्र. 78 दि. 19.11.2008 अन्वये गुंठेवारी क्षेत्र वगळुन या कायद्याची अंमलबजावणी करावी असा अधिनियमाच्या विसंगत ठराव संमत केला असुन प्रशासनाने त्याची अंमलबजावणी केली असल्यामुळे शास्तीच्या रक्कमे अभावी महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. कुपवाड शहरामधील 312 या विभागाच्या 54 मालमत्ताधारकांच्या करनिर्धारण प्रकरणामध्ये परिशिष्ठ क्र.8 मध्ये नमूद केल्याप्रमाणे रु.45903/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या कुपवाड शहराच्या घरपट्टी विभागाच्या मार्च 2013 या निवड महिन्यातील जमा बाजुचे व नविन मालमत्तांच्या करनिर्धारण नस्तींचे लेखापरीक्षण करण्यात आले आहे. कुपवाड विभागाकडे घरपट्टीचे 301 ते 313 असे एकुण 13 विभाग असुन त्या पैकी फक्त 312 या विभागाने गुंठेवारी क्षेत्रामध्ये करनिर्धारण केलेल्या मालमत्तांच्या नस्ती सादर केल्या आहेत. उर्वरित विभागांनी सदर माहिती लेखा परीक्षणास सादर केली नाही.
खालील अनियमितता आढळुन आल्या आहेत.

1)मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 267 अ नुसार अवैध इमारतीवर शास्ती बसविणेबाबत तरतुद करण्यात आली आहे व अशा बांधकामावर जोपर्यंत ते बांधकाम अवैध म्हणून राहिल तो पर्यंत दरवर्षी अशा इमारतीवर बसविण्यात योग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुपटी इतकी शास्ती आकारणे आवश्यक आहे. परंतु महानगरपालिकेने महासभा ठराव क्र. 78 दि. 19.11.2008 अन्वये गुंठेवारी क्षेत्र वगळुन सदर कायद्याची अंमलबजावणी करावी असा ठराव संमत केला आहे. सदर अधिनियमाशी विसंगत आहे.

2)मुंबई महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 267 (अ) नुसार शासनाने दि.04.01.2008 पासुन अवैध / बिगर परवाना बांधकामावर शास्ती लावण्याबाबत सुधारणा केली असताना त्यानंतर महानगरपालिकेने याबाबत शासनाचे सहमतीशिवाय आदेश काढण्यात आले आहेत. त्यामुळे सदरची कार्यवाही अधिनियमाशी विसंगत असल्याचे दिसुन येते.

3)मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 451(1) अन्वये सदर ठराव महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या विरुद्ध आसल्याने आयुक्तांनी राज्यशासनाकडे विखंडित करण्यासाठी पाठविणे आवश्यक असता तो न पाठविता महासभा ठराव क्र. 78 दि. 19.11.2008 अन्वये गुंठेवारी क्षेत्र वगळुन सदर कायद्याची अंमलबजावणी करणेच्या ठरावाची अंमलबजावणी केल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

4)वरील प्रमाणे अधिनियमाशी विसंगत ठराव केल्यामुळे व प्रशासनाने  या ठरावाची अंमलबजावणी केल्यामुळे सोबत जोडलेल्या परिशिष्ठ क्र.(08) मध्ये नमुद केलेप्रमाणे शास्तीची रक्कम रु.45903/- आकारणी केली नसल्याने मनपाचे आर्थिक नुकसान झाले आहे.

5)कुपवाड विभागाकडे घरपट्टीचे 301 ते 313 असे एकुण 13 विभाग असुन त्या पैकी फक्त 312 या विभागाने गुंठेवारी क्षेत्रामध्ये करनिर्धारण केलेल्या  मालमत्तांच्या नस्ती सादर केल्या आहेत. उर्वरित विभागाची माहिती लेखापरीक्षणास सादर केली नाही. तसेच या अहवालासोबत जोडलेल्या परिशिष्ठ (08) मधील 54 मालमत्तांना कलम 267 (अ) नुसार दुप्पट शास्ती व नियमित कर आकारणी करणे आवश्यक असताना फक्त नियमित  दराने कर आकरणी केली असल्याने व दुप्पट दराने शास्तीची आकारणी केली नसल्याने महानगरपालिकेचे रु.45903/- चे नुकसान दरवर्षी होत आहे.

6)परिशिष्ठ क्र. 8 मधील नमुद उदाहरणे 2012-13 या वित्तिय वर्षातील विभाग क्र.312 मधील आहेत. तरी, सर्व विभागाकडील अशा प्रकरणांचा शोध घेवून महानगरपालिकेने त्यांचेकडुन नियमानुसार कर आकारणी करुन रक्कम वसुलात आणून लेखापरीक्षणास अनुपालन सादर करावे.

अर्धसमास ज्ञापन क्र.136 दि.19/9/2014 रोजी निर्गमित केला असुन घरपट्टी विभागाने त्याचे अनुपालन दि.27/10/2014 रोजी लेखापरीक्षणास सादर केलेले आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये महासभा ठराव क्र. 78 दि. 19.11.2008 अन्वये गुंठेवारी क्षेत्र वगळुन सदर कायद्याची

| |
|---|
| अंमलबजावणी करणेच्या ठराव झाल्याने शास्तीची रक्कम वसूल केलेली नाही असे नमूद आहे. परंतु अधिनियमातील कलम 267 (अ) नुसार दुप्पट शास्ती व नियमित कर आकारणी करणे आवश्यक असल्याने शास्तीची रक्कम रु.45903/-मालमत्ताधारकाकडून वसूल करण्यात यावी.<br>वसुलपात्र रक्कम रु.11548/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 136 | 19/09/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |

| 76 | दै.वृत्तपत्र, साप्ताहिके, पाक्षिक व मासिक इ. ची रद्दी विक्री केली नसल्या बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 02 | सामान्य प्रशासन | मनपा | 9ड | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

| |
|---|
| वित्तीय वर्ष 2011-12 या वर्षात खरेदी करण्यात आलेल्या वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके इ. रद्दी ची विक्री मार्च, 2013 मध्ये प्रक्रिया राबवुन दि.10.04.2013 रोजी करुन रक्कम रु.7575/- जमा झाले आहेत. परंतु वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये खरेदी करण्यात आलेल्या दै. वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके इ. ची रद्दी विक्री करण्यात आलेली नाही. |

| |
|---|
| सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेकडील वि.स.खांडेकर वाचनालयाचे वित्तीय वर्ष 2012-13 चे लेखापरीक्षणामध्ये वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये खरेदी करण्यात आलेल्या दैनंदिन वृत्तपत्रे , |

| |
|---|
| साप्ताहिके, पाक्षिके, मासिके इ. ची रद्दी विक्री लेखापरीक्षण कालावधी पर्यंत केली नसल्याचे आढळुन आले. यानुसार अर्धसमास ज्ञापन क्र.137 दि.19/9/2014 रोजी निर्गमित केला असुन ग्रंथपाल यांनी त्याचे अनुपालन दि.20/9/2014 रोजी सादर केले आहे. 2012-13 या आर्थिक वर्षाच्या रद्दीची विक्री करण्यात आली नसल्याचे मान्य केले आहे. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.<br>1)वित्तीय वर्ष 2011-12 मध्ये खरेदी करण्यात आलेल्या वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके इ. रद्दी ची विक्री मार्च 2013 मध्ये प्रक्रिया राबवुन दि.10.04.2013 रोजी रक्कम रु.7575/- जमा झाली आहे. परंतु वित्तीय वर्ष 2012-13 मधील खरेदी करण्यात आलेल्या दै. वृत्रपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके इ. ची रद्दी विक्री करण्यात आलेली नाही. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 137 | 19/09/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 77 | मोबाईल बिलाच्या रोमिंग चार्जेस ची रक्कम वसुल करणेबाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 20 | भांडार | मनपा | 9ब | 02 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | 212549 | | |

| |
|---|
| स्वीडन दौ-यावर गेलेल्या पदाधिकारी व आधिकारी यांचे आंतरदेशीय रोमींग चार्जेस रु.212549/- कंपनीस आदा करणेबाबत आयुक्त यांनी मान्यता दिली आहे. स्थायी समिती ठराव क्र.551 दि.26/12/2002 प्रमाणे महानगरपालिकेच्या कामकाजाच्या सोयीसाठी पदाधिकारी व अधिकारी यांना भ्रमणध्वनी बिला - संबंधीची मर्यादा दरमहा रु.2500/- ठरविण्यात आली आहे. स्थायी समितीचा भ्रमणध्वनी बिलासंबंधीचा |

धोरणात्मक ठराव झाला असल्याने वरील अधिकारी व पदाधिका-यानी मर्यादेपेक्षा जादा वापर केलेले बील महानगरपालिका निधी मधुन खर्च करण्यास स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक असता ती न घेता आयुक्त यांच्या मान्यतेने देयके आदा केली आहेत.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेने आपल्या कर्मचारी, अधिकारी व पदाधिकारी यांना idea कंपनीची मोबाईल ग्रुप कॉलींग सेवा पुरविली आहे. सदर सेवेमध्ये मोबाईल व idea कंपनीचे रु.149/- प्रती महिना भाडे असलेले सिमकार्ड महानगरपालिकेने पुरविले आहे. या मध्ये 300 मिनिट Outgoing व Inter calling group free ही सुविधा दिलेली आहे. तसेच 9 महिने सलग बील भरल्यानंतर उर्वरीत 3 महिने रेंट फ्री सेवा पुरविली जात असुन महाराष्ट्र, मुंबई, गोवा या राज्यांमध्ये रोमिंग फ्री अशी सुविधा आहे. वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये idea कंपनीला रु.1242972/- बील आदा केले असून, त्यापैकी रु.118098/- ज्यांचे कडुन मर्यादेपेक्षा जास्त वापर झाला आहे त्यांचे कडुन वसुल केले आहेत. सदर बिलाची तपासणी केली असता त्यामध्ये दि.09.03.2012 ते 08.03.2013 या कालावधीत कंपनीस रु.216174.85/- रोमींग चार्जेस आदा केले आहेत. त्यापैकी दि.14.11.2012 ते दि.16.12.2012 या कालावधीत स्वीडन दौ-याचे 5 अधिकारी / पदाधिकारी, श्री.नितिन सावगावे (माजी महापौर) रु.25637/-, ओमप्रकाश दिवटे (उपायुक्त) रु.27881/-, सुनिल नाईक (सहा.आयुक्त) रु.61389/-, डॉ.राम हंकारे (आरोग्य अधिकारी) रु.97642/-. यांचे रु.212549/- बील महानगरपालिकेने आदा करण्यास आयुक्त यांचे निर्णय क्रमांक 14 दि. 22/04/2013 अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यात आली आहे.

याबाबतची नस्ती,देयके तपासून अर्धसमास ज्ञापन क्र.138 दि.19/9/2014 रोजी निर्गमित केला असुन प्रशासकीय अधिकारी यांनी त्याचे अनुपालन दि.23/09/2014 रोजी लेखापरीक्षणास सादर केले आहे. सदर अनुपालनाचे अवलोकन करून खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)महानगरपालिका क्षेत्रामध्ये व महाराष्ट्र राज्यात रोमींग लागत नसल्याने ज्या अधिकारी, कर्मचारी व पदाधिकारी यांनी सदरचे भ्रमणध्वनी महानगरपालिका क्षेत्राबाहेर जाऊन (रोमिंग एरियामध्ये) वापरले आहेत असे रोमींग चार्जेस स्थायी समिती ठराव क्र.551 दि.26/12/2002 नुसार देय नसुन ते संबंधिताकडून वसुल करणे आवश्यक आहे. अशी वित्तीय वर्ष 2012-13 मधील रु.15107.85/- वसुलपात्र आहेत.

2)स्वीडन दौरा आंतरदेशीय रोमींग चार्जेस रु.212549/- कंपनीस आदा करणेबाबत आयुक्त यांना रु.25 लाखापर्यंत असलेल्या आर्थिक मर्यादेनुसार मा. आयुक्त निर्णय क्र.14 दि.22/4/2013 ने सदर खर्चास कार्योत्तर मान्यता दिली आहे. स्थायी समिती ठराव क्र.551 दि.26/12/2002 प्रमाणे महानगरपालिकेच्या कामकाजाच्या सोयीसाठी महापौर व आयुक्त यांचे व्यतिरिक्त अन्य पदाधिकारी व अधिकारी यांना

| |
|---|
| भ्रमणध्वनी बिलासंबंधीची मर्यादा दरमहा रु.2500/- ठरविण्यात आली आहे. स्थायी समितीचा भ्रमणध्वनी बिलासंबंधीचा धोरणात्मक ठराव झाला असल्याने वरील अधिकारी पदाधिका-यांनी सदर मर्यादेपेक्षा जादा भ्रमणध्वनीचा वापर केलेले बील महानगरपालिका निधी मधुन खर्च करण्यास स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतु सदर जादा आदा मोबाईल वापरास स्थायीची मान्यता घेतली नसल्याने रक्कम रु.212549/- संबंधिताकडून वसुल करण्यात यावी.<br>वसूलपात्र रक्कम रु.212549/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 138 | 19/09/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |
|---|---|

| 78 | भांडार विभागाकडील साहित्य खरेदीमधील अनियमिततेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 20 | भांडार | मनपा | 9ड | 05 | 541407 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

| |
|---|
| उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखसं-1088/2512/ उद्योग/ 6 दि. 2 जानेवारी 1992 मधील परिच्छेद 8.3 (ई) नुसार वर्षभराच्या आवश्यकतेनुसार वस्तु खरेदी करणेसाठी दरवर्षी संख्याकरारापेक्षा दर करार करुन साहित्य खरेदी न करता साहित्याची खरेदी एकाच वेळी केली आहे. साठा नोंदवहीची तपासणी केली असता खालील साहित्याचा वापर 2012-13 या अर्थिक वर्षात झाला नसल्याने अनावश्यक खरेदीमुळे महानगरपालिकेची रक्कम रु. 541407/- गुंतुन पडली आहे. |

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेस कार्यालयीन कामकाजासाठी लागणारे स्टेशनरी साहित्य भांडार विभागाकडुन खरेदी केली जाते. भांडार साहित्य खरेदी नस्तीची तपासणी केली असता भांडार विभागाने निविदा मागवुन साहित्य खरेदीची टिपणी दि.02/8/12 रोजी सादर केली आहे व त्यास आयुक्त यांनी दि.13/8/12 अन्वये मान्यता दिली आहे. निविदा मागणीची जाहीर प्रसिध्दी दै.जनप्रवास या वर्तमानपत्रात दि.1/9/12 रोजी केली असुन निविदा दि.28/09/12 रोजी उघडण्यात आल्या आहेत. एकुण 3 निविदा प्राप्त असुन तांत्रिक तपशीलाचा लखोटा उघडला असता यश डिस्ट्रीब्युटर्स, सांगली यांची कागदपत्रे अपुरी असलेने त्यांना अपात्र ठरविले आहे. निविदेस प्रतिसाद मिळाला नसलेने पहिली मुदतवाढ दि.29/09/12 ते 09/10/12 व दुसरी मुदतवाढ दि.13/10/12 ते दि.18/10/12 रोजी दै.जनप्रवास मध्ये दिली आहे. परंतु त्यास ही प्रतिसाद न लाभल्याने दोन निविदा उघडण्यास आयुक्त यांनी दि.09/11/12 रोजी मान्यता झाली आहे. त्यामध्ये कमी दराची निविदा नॅशनल ट्रेडिंग कार्पोरेशन यांची मान्य केली आहे. सदर पुरवठादाराचे अ.क्र.1 ते 88 पैकी 31 वस्तुंचे दर ऐस्टीमेट प्रमाणे व 57 आयटमचे दर एस्टीमेटपेक्षा जास्त आहेत. ठेकेदाराबरोबर करारपत्र दि.28/12/12 रोजी करण्यात आले असुन साहित्य मागणीचा पुरवठा आदेश दि.07/01/13 रोजी देण्यात आला आहे.

लेखाशिर्ष :- 001 साप्र 031 लेखन साहित्य रु.1300000/-

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम रु. |
|---|---|---|
| 7213 | 21/03/13 | 191990/- |
| 7212 | 21/03/13 | 189405/- |
| 7214 | 21/03/13 | 278040/- |
| 7215 | 21/03/13 | 226535/- |

पुरवठादाराचे नाव :- नॅशनल ट्रेडींग कार्पोरेशन,सांगली.

वार्षिक साठा व वाटप नोंदवही, महानगरपालिकेच्या विविध विभागाकडुन साहित्य मागणी केलेली मागणीपत्रके व प्रमाणके यांची तपासणी करून अर्धसमास ज्ञापन क्र.138 दि.19/9/2014 रोजी निर्गमित केला असुन प्रशासकीय अधिकारी यांनी त्याचे अनुपालन दि.23/09/2014 रोजी लेखापरीक्षणास सादर केले आहे. दिलेल्या अनुपालनाचे अवलोकन करून खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)शासन व इतर संस्थाकडून उत्पादित वस्तूंचे दर ठरविण्यासंबंधीची कार्यवाही उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखसं-1088/2512/ उद्योग/6 दि.2 जाने.1992 मधील परिच्छेद 7 नुसार दर ठरविताना बाजार भाव तसेच उत्पादन खर्च याचा सारासार विचार करन ठरविणे आवश्यक आहे. तसेच या सर्व संस्थांनी वस्तु बाबतचे दर मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेमार्फत दरवर्षी 1 मे पूर्वी निश्चित करणे आवश्यक आहे. तसेच परिच्छेद 10.8 नुसार दरकराराचा कालावधी 1 जुलै ते 30 जून पर्यंत ठरविणे

आवश्यक आहे. परंतु भांडार विभागाने खरेदी प्रक्रिया दि.02/8/12 रोजी सुरु करुन साहित्य खरेदी 01/01/13 मध्ये केली आहे.सदर साहित्याची खरेदी आर्थिक वर्ष संपण्याच्या अगोदर केल्याने त्या साहित्याचा वापर 2012-13 या वित्तिय वर्षामध्ये झालेला नाही. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये निविदा प्रक्रिया उशिराने राबविल्याने खरेदी विलंबाने झालेची बाब भांडार विभागाने मान्य केली आहे.

2)उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखसं-1088/2512/ उद्योग/ 6 दि. 2 जानेवारी 1992 मधील परिच्छेद 8.3 (ई) नुसार वर्षभराच्या आवश्यकतेनुसार वस्तु खरेदी करणेसाठी दरवर्षी संख्याकरारापेक्षा दर करार करुन साहित्य खरेदी न करता साहित्याची खरेदी एकाच वेळी केली आहे. साठा नोंदवहीची तपासणी केली असता खालील साहित्याचा वापर 2012-13 या आर्थिक वर्षात झाला नसल्याने अनावश्यक खरेदीमुळे महानगरपालिकेची रक्कम रु.541407/- गुंतुन पडली आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये जुन 2013 मध्ये महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणुक असलेमुळे सदर साहित्य खरेदी करण्यात आले असुन ते संपल्यानंतरच 2013-14 या वर्षाचे साहित्य खरेदी केले असल्याचे नमुद आहे. परंतु वर्षभराच्या आवश्यकतेनुसार साहित्य खरेदी केली नसल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.

| तपशील | शिल्लक 1/04/12 | खरेदी 20/2/13 | शिल्लक 31/3/13 | दर/रिम | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| झेरॉक्स कागद/ रिम | 1216 | 800 | 1154 | 213 | 245802 |
| कोरे कागद/ दस्त | 1825 | 500 | 1650 | 21 | 34650 |
| स्टँप पॅड शाई | 341 | 100 | 401 | 45 | 18045 |
| डिंक बॉटल150ml | 752 | 200 | 679 | 45 | 30555 |
| खाकी फाईल/नग | 9991 | 4000 | 7009 | 16.5 | 115648 |
| कुलुप मोठे/नग | 143 | 75 | 151 | 550 | 83050 |
| काचेचे ग्लास/नग | 181 | 60 | 155 | 41.60 | 6458 |
| चहाचे कप/नग | 296 | 300 | 242 | 55 | 13310 |
| | | | | एकुण | 541407/- |

3)भांडार विभागाने पुरवठादारास पुरवठा आदेश दि.07/01/13 रोजी दिला असुन पुरवठादाराने डिलिव्हरी चलन क्र.172 ते 174 ने दि.09/01/13 ,चलन क्र.175 ते 176 ने दि.14/01/13,चलन क्र.186 ने दि.18/01/13, चलन क्र.208 ने दि.21/01/13 या दिनांकास साहित्याचा पुरवठा केला आहे. डिलिव्हरी चलनावर साहित्य पुरवठा आदेशामधील नमुद संख्येप्रमाणे सुस्थितीत मिळाल्या बाबतची स्वाक्षरी भांडार

| |
|---|
| अधिक्षकाने केली नसल्याने साहित्य सुस्थितीत मिळालेबाबतची खात्री होत नाही.<br><br>4) साठा नोंदवहीची तपासणी केली असता साठा नोंदवही नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम क्र.145(1) नुसार नमुना क्र.116 प्रमाणे ठेवण्यात आली आहे. नोंदवहीमधील स्तंभ क्र. 2 मध्ये प्रारंभिक शिल्लक लिहिलेली नाही. स्तंभ क्र.09 मध्ये पुरवठा केल्यानंतर शिल्लक राहिलेल्या साहित्याचे परिमाण लिहिणे आवश्यक असता तो स्तंभ निरंक ठेवल्याने शिल्लक साहित्य किती प्रमाणात राहिले याबाबतची खात्री होत नाही.<br><br>5)नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम क्र.156 प्रमाणे संग्रह पुस्तकात, जंगम मालमत्तेचे पुस्तक व स्थावर मालमत्तेचे पुस्तक यांत नोंदलेली सर्व स्थावर व जंगम मालमत्ता याची वार्षिक पडताळणी करुन तसे प्रमाणपत्र पडताळणी करणा-या अधिका-याने देणे आवश्यक असता तसे प्रमाणपत्र 2012-13 या आर्थिक वर्षात प्रशासकीय अधिकारी यांनी दिलेचे लेखापरिक्षणास आढळुन आलेले नाही.<br>अनुपालनामध्ये पडताळणी केली नसल्याची बाब मान्य करण्यात आली आहे.<br><br>**आक्षेपाधिन रक्कम रु. 541407/-** |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 139 | 19/09/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |
|---|---|

| 79 | बांधकाम परवाना देताना विकास शुल्क, उपकर,दंडात्मक शुल्क इ.ची कमी आकारणी केले बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 09 | नगररचना | मनपा | 9ब | 03 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | 20256 | | |

सुमन तुकाराम सकपाळ सि.स.नं.136/1A मिरज व सुनिल बाबुराव कांभेजे गुरूवार पेठ तेली गल्ली मिरज यांना वाणिज्य वापरासाठी बांधकाम परवानगी देण्यात आली आहे. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवन संरक्षक अधिनियम 2006(2007 चा महा 3) व आयुक्त यांचे कक्षात झालेल्या दि.11/05/10 च्या बैठकीचे इतिवृत्ता नुसार 15 मिटरपेक्षा कमी उंची पर्यंत असलेल्या रहिवाशी व वाणिज्य वापराचे क्षेत्रासाठी रु. 10000/- आग सुरक्षा निधी बांधकाम विभागाच्या विकास शुल्कासमवेत नगर रचना विभागाकडे भरणा करणे आवश्यक आहे. त्या प्रमाणे आग सुरक्षा निधी वसुल केला नसलेने रु.20000/- वसुलपात्र करण्यात येत आहेत.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका यांचेकडील नगररचना विभाग मिरज येथील मार्च 2013 मध्ये परवाना दिलेल्या नस्तीची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.152 दि.26/09/2014 रोजी निर्गमित केला असुन नगररचना विभागाने त्याचे अनुपालन दि.18/10/2014 रोजी सादर केले आहे. खालील प्रकरणामध्ये विकास शुल्क, उपकर, दंडात्मक शुल्क इ.ची कमी आकारणी केल्याने वसुली कमी झाली आहे.

1)मनोहर महादेव गुरव 867/1ब/1 मिरज यांना जा.क्र.म.83/973/2013 दि.21.03.2013 अन्वये बांधकाम परवाना दिला आहे. रहिवास वापर विकास शुल्क 56.40 चौ.मी.चे x रु.40 प्रमाणे रु.2256/- वसुल केले आहेत व परवाना पुर्व बांधकामाचे रु.2000/- वसुल केले आहेत. तथापि महासभा ठराव क्र.127 दि.20.10.2010 चे मान्य दंडात्मक शुल्क आकारणी परिशिष्ठ मधील अ.क्र.4 बांधकाम परवाना मंजूर होणे पुर्वीचे बांधकाम सुरु करणे बाबत या बाबींसाठी बांधकामासाठी विकास खर्चाच्या दुप्पट दराने आकारणी करणे म्हणजे सदर प्रकरणी 2256x2=4512/- दंडात्मक आकारणी करणे आवश्यक असताना त्याऐवजी रु.4256/- वसुल केल्याने रु.256/- ची कमी वसूली झाली आहे.

2)सुमन तुकाराम सकपाळ सि.स.नं.136/1A मिरज यांना जा.क्र.162/556/212 दि.26.03.2013 अन्वये सुधारित बांधकाम परवाना दिला त्यांचे वापर क्षेत्रापैकी 129.18 Sq.Mt. वणिज्य वापर असतानाही आग सुरक्षा निधी वसुल केला नाही. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवन संरक्षक अधिनियम 2006(2007 चा महा 3) व आयुक्त यांचे कक्षात झालेल्या दि.11/05/10 च्या बैठकीचे इतिवृत्ता नुसार 15 मिटरपेक्षा कमी उंची पर्यंत असलेल्या रहिवाशी व वाणिज्य वापराचे क्षेत्रासाठी रु. 10000/- आग सुरक्षा निधी बांधकाम विभागाच्या विकास शुल्कासमवेत नगर रचना विभागाकडे भरणा करणे आवश्यक आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये आग सुरक्षा निधी वसुल करण्याचे मान्य केले आहे.

| |
|---|
| 3)सुनिल बाबुराव कांभेजे गुरूवार पेठ तेली गल्ली मिरज जा.क्र.452/975/2013 दि.26.03.2013 अन्वये बांधकाम परवाना दिला त्यांचे एकूण बांधकाम क्षेत्रापैकी 13.72 Sq.Mt. क्षेत्राचा वापर वाणिज्य असल्याने त्यांचे कडून आग सुरक्षा निधी वसुल करणे आवश्यक असताना तो आकारणी केली नाही. त्यामुळे रु.10,000/- वसुलपात्र आहेत. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये आग सुरक्षा निधी वसुल करण्याचे मान्य केले आहे.<br>**वसुलपात्र रक्कम :-** रु.20256/- (दंडात्मक शुल्क आकारणी रक्कम रु. 256/- + आग सुरक्षा निधी रक्कम रु.20000/-) |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 152 | 26/09/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 80 | बांधकाम परवाना देताना विकास शुल्क, उपकर,हार्डशिप प्रिमियम शुल्क इ.ची कमी आकारणी केले बाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 09 | नगररचना | मनपा | 9ब | 06 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | 13745 | | |

| |
|---|
| केशव रामचंद्र कुलकर्णी सि.स.नं.8794 यांनी केलेल्या बांधकामापैकी पार्किंग क्षेत्र एकुण 32.93 चौ.मी. क्षेत्रास उपकर आकारणी केलेली नाही. त्यामुळे 32.93 चौ.मी.x 10200/100 x 15 टक्के प्रमाणे रु.504/- वसुल करण्यात यावेत. तसेच बांधकाम परवाना मार्च 2013 मध्ये दिला असताना उपकर ची आकारणी 2012 चे रेडीरेकनर दर रु.9500/- प्रमाणे आकारली आहे. परंतु 2013 चे दर 10200/- प्रमाणे आकारणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे रु.4025/- ची कमी आकारणी केली आहे. |

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका यांचेकडील **नगररचना विभाग सांगली** येथील मार्च 2013 मध्ये परवाना दिलेल्या नस्तीची तपासणी केली असता खालील प्रमाणे विकास शुल्क, उपकर, हार्डशिप प्रिमियम शुल्क इ.ची कमी आकारणी केल्याने वसुली कमी झाली आहे.

1)श्री.आण्णासाहेब उपाध्ये, विकसनकार सि.स.नं. 217/2A प्लॉट नं. 13,16,18,5006/B सांगली यांना जा.क्र.598/ दि.05.03.2013 अन्वये बांधकाम परवाना दिला आहे. सदर इमारतीस असणा-या एक आड एक टेरेसचे 41.28 चौ.मी. क्षेत्रास हार्डशिप प्रिमियम शुल्क आकारणी रु. 500/- प्रती चौ.मी. प्रमाणे करून रु.20640/- वसुल केले आहेत. परंतु महासभा ठराव क्र.127 दि.20.10.2010 चे सोबतचे परिशिष्ठ मधील बाब अ.क्र.11 प्रमाणे रु.600/- प्रती चौ.मी. प्रमाणे आकारणी करून रु.24768/- वसुल करणे आवश्यक असल्याने कमी आकारणी रु.4128/- संबंधिताकडून वसूल करणे आवश्यक आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये कमी आकारणी रक्कम रु.4128/- वसुल करण्याचे मान्य केले आहे.

2) महासभा ठराव क्र.127 दि.20.10.2010 खालीलप्रमाणे हार्डशिप प्रिमियम शुल्कचे दर ठरविले आहेत. बंदिस्त बाल्कनी वाणिज्य रु.1000/ चौ.मी. ,बंदिस्त बाल्कनी निवासी रु.700/ चौ.मी.,बंदिस्त जीना व पॅसेज रु.500/ चौ.मी. प्रमाणे ठरविले आहेत व त्याच प्रमाणे 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये हार्डशिप प्रिमियमची रक्कम वसूल करण्यात आली आहे. परंतु सदर प्रिमियमचे दर खुपच कमी आहेत.

उदा.दिपक व्होरा व इतर सि.स.नं.1044 कॉलेज कॉर्नर सांगली यांना प्रथम बांधकाम परवाना क्र. 368 दि. 20.12.2010 अन्वये देण्यात आला आहे. त्यानंतर सुधारित बांधकाम परवाना क्र.589 दि. 02.03.2013 अन्वये देण्यात आला आहे. सदर इमारत विकसनकर्त्याने विक्रीसाठी बांधली असल्याचे नकाशावरुन व दिलेल्या बांधकाम परवान्यावरुन दिसुन येते. यामध्ये एकुण एक दुकानगाळा व पाच फ्लॅटचे बांधकाम केलेले आहे. विकसनकर्त्याने खालील प्रमाणे हार्डशिप प्रिमियम शुल्क भरले आहे.

बंदिस्त बाल्कनी वाणिज्य 19.34चौ.मी.Xरु.1000/ चौ.मी. रु.193409

बंदिस्त बाल्कनी निवासी 143.60चौ.मी.Xरु.700/ चौ.मी. रु.100520

बंदिस्त जीना व पॅसेज 150.00चौ.मी.Xरु.500/ चौ.मी. रु.7500

नोंदणी व मुद्रांक विभागाने 2013 या वर्षासाठी सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रासाठी निश्चित केलेल्या वार्षिक मुल्य दर तक्त्यानुसार (रेडी रेकनरनुसार) या भागातील फ्लॅटचा दर रु.14400/- चौ.मी.आहे. त्यामुळे महानगरपालिकेने आकारलेले दर खुपच कमी असलेने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. सदर हार्डशिप प्रिमीयमचे दर बाजारदराशी सुसंगत करणे आवश्यक आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये हार्डशिप प्रिमियम शुल्क वाढविण्याची कार्यवाही नजिकच्या काळात करण्यात येत असल्याचे नमुद आहे. परंतु महानगरपालिकेच्या आर्थिक हित लक्षात घेवुन यापुर्वीच कार्यवाही करणे आवश्यक होते.

3)इंदुमती प्रविणचंद पारिख व इतर तीन सि.स.नं. 526 सांगली यांना जा.क्र. 259 दि.6.3.2013 वाढीव बांधकाम परवाना दिला आहे. सदर परवाना हा निवासी व वाणिज्य इमारतीचे वाढीव बांधकामास सुधारित परवानगी देण्यात आली व पुर्वीचा बांधकाम परवाना क्र.248 दि.20.12.2006 हा रद्द करण्यात आला आहे.

हार्डशिप प्रिमियम शुल्क क्षेत्रामधील जिना, पॅसेज, पैकी वाणिज्य वापर क्षेत्रास महासभा ठराव क्र.127 दि.20.10.2010 च्या परिशिष्ठामधील अ.क्र.10 नुसार बाल्कनी व लगतची भिंत काढुन बाल्कनी बंदिस्त केल्यास रु.700 प्रमाणे प्रती चौ.मी. हार्डशिप प्रिमियम आकारुन बांधकाम नियमित करणेचा ठराव करण्यात आला आहे. त्याप्रमाणे एकुण बंदिस्त बाल्कनी क्षेत्र 108.54 चौ.मी. X रु.700/ चौ.मी. प्रमाणे रु.75918/-, जीना व पॅसेज 331.18/- चौ.मी. X रु.500/ चौ.मी. प्रमाणे रु.165590/- विकसनकर्त्याकडुन वसुल केलेले आहेत. सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची बांधकाम विकास नियमावली नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.टिपीएस- 2001/25 58/ प्र.क्र.78/2002/नवि-13 दि.2003 अन्वये मंजूर करण्यात आली असून त्यामधील नियम 15.4.1 चा iii) नुसार बाल्कनी व लगतची भिंत काढुन बाल्कनी बंदिस्त केल्यास त्यावर प्रिमियम आकारुन बांधकाम नियमित करण्याचा अधिकार महानगरपालिका आयुक्तांना दिला आहे. तसेच 15.4.2 नुसार जीना 1.2 मीटरपेक्षा रुंद ठेवल्यास हार्डशिप प्रिमियम आकारुन बांधकामास मान्यता देण्याचे अधिकार आयुक्तांना देण्यात आलेले आहेत. प्रिमियमचे दर ठरविण्याचा अधिकार आयुक्तांना असताना महानगरपालिका ठरावाने दर ठरविण्यात आले आहेत. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये सदर बाब धोरणात्मक असल्याने महासभेस देण्यात आलेचे नमुद आहे.

4)श्रीमती अनुराधा खापरे सि.स.नं.384/2/8 प्लॉट नं.3 धामणी रोड, विश्रामबाग सांगली यांना जा.क्र.582 दि.28.02.2013 अन्वये बांधकाम परवाना दिला. सदर इमारतीचे हार्डशिप प्रिमियम शुल्क क्षेत्रापैकी बंदिस्त कपाट चे क्षेत्र 37.56 चौ.मी. यास रु.600/- प्रती चौ.मी. दराने रु.22536/- आकरणी केली आहे. परंतु सदर जागा ही दाट वस्ती व्यतीरिक्त असल्याने महासभा ठराव क्र.127 दि.20.10.2010 चे सोबतचे परिशिष्ठा मधील अ.क्र.10 प्रमाणे दर वस्ती बाहेरील क्षेत्रासाठी निवासी वापरासाठी रु.700/- प्रती चौ.मी. प्रमाणे रु.26292/- ची आकारणी करणे आवश्यक होते. तरी, कमी आकारणी केलेली रक्कम रु.3756/- वसुलपात्र आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये कपाटाऐवजी बंदिस्त कपाट असा उल्लेख झाला आहे. आक्षेपात नमुद केलेले दर बंदिस्त बाल्कनीसाठी असल्याने ते कपाटासाठी लावता येणार नसल्याचे नमुद आहे. दिलेले उत्तर संयुक्तिक नसल्याने रु.3756/- वसुल करण्यात यावेत.

5)केशव रामचंद्र कुलकर्णी सि.स.नं.8794 यांनी केलेल्या बांधकामापैकी पार्किंग क्षेत्र एकुण 32.93 चौ.मी. क्षेत्रास उपकर आकारणी केलेली नाही. त्यामुळे 32.93 चौ.मी.x 10200/100 x 15 टक्के प्रमाणे रु.504/- वसुल करण्यात यावेत. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये सन 2012 चे बाजारमुल्य तक्तेमधील दर रु.9500/ चौ.मी.असल्याने त्यानुसार रु.469/- वसुल करण्याचे मान्य केले आहे. तसेच बांधकाम परवाना मार्च 2013 मध्ये दिला असताना उपकर ची आकारणी 2012 चे दर रु.9500/- प्रमाणे आकारले आहे. परंतु 2013 चे दर 10200/- प्रमाणे आकारणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे रु.4025/- ची कमी आकारणी केली आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये सदर प्रकरणाची प्राथमिक छाननी दि.31/3/2012 रोजी केली असल्याने त्याप्रमाणे उपकर आकारणी केल्याचे नमुद आहे. ज्यावेळी बांधकाम परवानगी दिली जाईल त्याच वेळचा उपकर दर घेणे आवश्यक असल्याने रु. 4025/- वसुल करण्यात यावेत. (575.01 चौ.मी. x रु.9500/100 = रु.54626/- वजा 575.01 चौ.मी. 10200/100= रु.58651/-) श्री.कुलकर्णी यांचे हार्डशिप प्रिमियम शुल्कासहित एकूण बांधकाम क्षेत्र 571.01 चौ.मी. पेक्षा जादा असल्याने मा.आयुक्त यांची मान्यता आवश्यक असताना सहाय्यक संचालक नगररचना यांचे

| |
|---|
| मान्यतेने परवाना दिला आहे.<br><br>6)रमेश ट्रेडिंग कंपनी सि.स.नं.13898/ प्लॉट नं.42 यांचे वाढीव बांधकाम क्षेत्र यांचे वाढीव क्षेत्र 104.92 चौ.मी. क्षेत्रामध्ये 102 प्रती चौ.मी. दराप्रमाणे रु.10702/- वसुल केले आहेत. परंतु दंडात्मक विकास शुल्क 18.00 चौ.मी. क्षेत्राची उपकर आकारणी रु.1836/- केलेली नाही. त्यामुळे रक्कम रु.1836/- वसुलपात्र आहेत. अनुपालनामध्ये उपकराची रक्कम वसुल करण्याचे मान्य केले आहे.<br>अर्धसमास ज्ञापन क्र.152 दि.26/09/2014 रोजी निर्गमित केला असुन नगररचना विभागाने त्याचे अनुपालन दि.18/10/2014 रोजी सादर केले आहे.<br>**वसुलपात्र रक्कम :-** मुद्दा क्र.1 नुसार कमी आकारण्यात आलेली हार्डशिप प्रिमियम शुल्क रु. रु.4128/- + मुद्दा क्र.4 बंदिस्त बाल्कनीची कमी आकारण्यात आलेली हार्डशिप प्रिमियम शुल्क रु. रु.3756/- + मुद्दा क्रं.5 उपकर रक्कम रु.4024 + मुद्दा क्रं.6 वाढीव बांधकाम विकास शुल्क रु.1836/- = रु.13745/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 153 | 26/09/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |

| 81 | बांधकाम परवाना मंजूरी/प्रारंभ प्रमाणपत्रा मधील अटींची पुर्तता होत नसल्याबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 09 | नगररचना | मनपा | 9ड | 03 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

| |
|---|
| बांधकाम परवाना अटी व शर्ती मधील अट क्रमांक 4 नुसार मंजूर नकाशाप्रमाणे जागेवर आखणी झाल्यावर पुढील कामास महानगरपालिकेची संमती घेणे आवश्यक आहे. तसेच अट क्रमांक 5 प्रमाणे |

| |
|---|
| जोत्यापर्यंत काम झाल्यावर ते बरोबर असल्याबाबत महानगरपालिकेकडून प्रमाणित करून घेणे आवश्यक आहे. परंतु मार्च 13 मधील 132 बांधकाम परवाना प्रकरणांची तपासणी केली असता जोत्या पर्यंत झालेले काम प्रमाणित करण्यात आलेचे दिसुन आलेले नाही. त्यामुळे जागेवर नियमानुसार बांधकाम करण्यात आल्याची खात्री करता आलेली नाही. |

| |
|---|
| सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या नगररचना विभाग सांगली व मिरज यांचेकडील मार्च, 2013 मध्ये देण्यात आलेल्या एकूण 132 बांधकाम परवाना नस्तीची तपासणी केली असता, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 253/254 व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 44/69 अन्वये बांधकाम करण्यासाठी, बांधकाम परवाना मिळण्यासाठी केलेल्या अर्जास अनुसरून परवाना प्रमाणपत्रामध्ये नमुद केलेल्या अटी व शर्तीचे अधिन राहून कलम 45 नुसार बांधकाम परवाना देण्यात आला आहे. सदर नस्तींची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.154 दि.26/09/2014 रोजी निर्गमित केला आहे. नगररचना विभागाने त्याचे अनुपालन दि.18/10/2014 रोजी सादर केले असून सदर अनुपालनाचे अवलोकन करुन खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.<br><br>1)बांधकाम परवाना अटी व शर्ती मधील अट क्रमांक 4 नुसार मंजूर नकाशा प्रमाणे जागेवर आखणी झाल्यावर पुढील कामास महानगरपालिकेची संमती घेणे आवश्यक आहे. तसेच अट क्रमांक 5 प्रमाणे जोत्यापर्यंत काम झाल्यावर ते बरोबर असल्याबाबत महानगरपालिकेकडून प्रमाणित करून घेणे आवश्यक आहे. परंतु मार्च 13 मधील 132 बांधकाम परवाना प्रकरणांची तपासणी केली असता जोत्या पर्यंत झालेले काम प्रमाणित करण्यात आलेचे दिसुन आलेले नाही.<br>2)मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 चे कलम 263 अन्वये इमारत बांधकाम पुर्ण झाल्यानंतर 1 महिन्याचे आत भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्ज केला पाहिजे. परंतु असे 2012-13 मध्ये बांधकाम पूर्ण झालेल्या भोगवटाधारकांचा एकही अर्ज नस्तीमध्ये आढळून आला नाही.<br>3)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 चे नियम 75 नुसार नगररचना विभागाने प्रत्येक महिन्याचे अखेरीस त्या महिन्यात ज्या इमारती घरांना बांधकाम परवाना व भोगवटा प्रमाणपत्र दिले आहे त्याची एक प्रत संबंधित कर निर्धारण विभागाकडे पाठविणे आवश्यक आहे त्या प्रमाणे सांगली विभागाने कार्यवाही केली आहे. परंतु नगररचना विभाग मिरज मार्फत अशी कार्यवाही होत नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे मिरज विभागामध्ये करण्यात आलेल्या नविन बांधकामांची माहिती घरपट्टी विभागास समजुन येत नाही व त्यामुळे नविन बांधकामावर घरपट्टीची आकारणी झालेली नाही. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 154 | 26/09/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |
|---|---|

| 82 | कामगार कल्याण उपकर धनाकर्षाने जमा न करता रोखीने जमा केलेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 09 | नगररचना | मनपा | 9अ | 05 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 60646148 | 606461 | | |

शासन निर्णय क्र.बीसीए 2009/प्र.क्र.108/कामगार 7-अ मुंबई दि.17/06/2010 नुसार कामगार कल्याण मंडळाने उपकराची रक्कम बँक ऑफ इंडिया मध्ये मार्गदर्शक तत्व क्र.4 नुसार मंडळाच्या नावे असणारे धनाकर्षाने खातेवर जमा करणेचे निर्देश दिले आहेत. परंतु नगर रचना विभागाने, महानगरपालिका क्षेत्रामध्ये बांधकाम करणाऱ्या व्यक्तिकडुन कामगार कल्याण उपकराची रक्कम रोखीने स्विकारुन बँक ऑफ इंडियाच्या खात्यामध्ये न भरता महानगरपालिकेच्या जनरल फंडामध्ये जमा केली आहे. व उपकराची रक्कम मार्च 2013 मध्ये जनरल फंडातुन बँक ऑफ इंडियाचे खात्या मध्ये एक ते दोन वर्ष विलंबाने भरणा केली आहे.

सांगली-मिरज-कुपवाड शहर महानगरपालिकेच्या नगर रचना विभागाकडुन कामगार कल्याण उपकर गोळा केला जातो. वित्तीय वर्ष 2012-2013 मध्ये वसुल केलेल्या कामगार कल्याण उपकराची नोंदवही व कामगार कल्याण मंडळाकडे जमा केलेल्या रक्कमांच्या प्रमाणकांची तपासणी केली व अर्धसमास ज्ञापन क्र.161 दि.04/10/2014 रोजी निर्गमित केला असुन नगररचना विभागाने त्याचे अनुपालन दि.18/10/2014 रोजी सादर केले आहे. त्यावर लेखापरीक्षणाचे खालील प्रमाणे अभिप्राय आहेत

1. उपकर वसुली धनाकर्षा ऐवजी रोखीने केली असुन सदर वसुल उपकराची रक्कम वेळोवेळी मंडळाचे खात्यामध्ये भरणा न करता एक ते दोन वर्ष विलंबाने भरणा केल्याचे आढळुन आले आहे.

2. शासन निर्णय क्र.बीसीए 2009/प्र.क्र.108/कामगार 7-अ मुंबई दि.17/06/2010 नुसार कामगार

कल्याण मंडळाने उपकराची रक्कम जमा करण्यासाठी बँक ऑफ इंडिया मध्ये खाते क्र.004220110000153 उघडण्यात आले आहे व शासन निर्णयामधील मार्गदर्शक तत्वे क्र.4 नुसार उपकराची रक्कम मंडळाच्या नावे असणारे धनाकर्षाने सदर खातेवर जमा करणेचे निर्देश दिले आहेत. परंतु नगर रचना विभागाने, महानगरपालिका क्षेत्रामध्ये बांधकाम करणाऱ्या व्यक्तिकडुन कामगार कल्याण उपकराची रक्कम रोखीने स्विकारुन बँक ऑफ इंडियाच्या खात्यामध्ये न भरता महानगरपालिकेच्या जनरल फंडामध्ये जमा केली आहे. व उपकराची रक्कम मार्च 2013 मध्ये जनरल फंडातुन बँक ऑफ इंडियाचे खात्यामध्ये एक ते दोन वर्ष विलंबाने खालील प्रमाणे जमा केली आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम रुपये | विभाग |
|---|---|---|---|---|
| 1 | 7272 | 22/03/2013 | 5740613/- | सांगली |
| 2 | 7647 | 30/03/2013 | 10497543/- | सांगली |
| 3 | 7648 | 30/03/2013 | 13475067/- | सांगली |
| | | **एकूण** | **29713223/-** | |

3.शासन निर्णयामधील मार्गदर्शक तत्वे क्र. 6 नुसार जेथे बांधकामाकरिता स्थानिक संस्थेची मंजूरी आवश्यक आहे तेथे अशा मंजूरीकरिता प्राप्त झालेल्या प्रत्येक अर्जासोबत मंडळाच्या नावे उपकरासंबंधीचा धनाकर्ष स्थानिक संस्थेस सादर करणे आवश्यक आहे. परंतु धनाकर्षाने रक्कम न घेता रोखीने घेण्यात आली आहे.

4)मार्गदर्शक तत्व क्र.6 नुसार उपकराची जमा रक्कम (धनाकर्ष) मंडळाकडे 30 दिवसाचे आत जमा करणे आवश्यक आहे. परंतु महानगरपालिकेने जुन 2011 ते फेब्रुवारी 2013 या कालावधीत जमा झालेली उपकराची रक्कम मार्च 2013 मध्ये मंडळाचे बँक खात्यावर जमा केली आहे.

5)मार्गदर्शक तत्व क्र.8 नुसार रक्कम / धनाकर्ष विहित नमुन्यातील चलनाव्दारे बँक खातेवर जमा करून त्याची माहिती पुढील महिन्याच्या 10 तारखे पुर्वी उपकरापोटी जमा करण्यात आलेल्या रकमेचा तपशील दर्शविलेल्या मासिक तक्त्यात जोडपत्र 3 मध्ये उपकर भरणा करणाऱ्याने कल्याण मंडळाकडे सादर करावयाची आहे. परंतु जमेची मासिक माहीती मंडळाकडे महानगरपालिकेने सादर केलेली नाही.

6)जोडपत्र 5 मध्ये वार्षिक विवरणपत्र कल्याण मंडळास सादर करणे आवश्यक आहे. परंतु असे विवरणपत्र सादर केलेले नाही. असे विवरणपत्र सादर केलेनंतर मंडळाकडून उपकर गोळा करणाऱ्या संबंधित प्राधिकरणास म्हणजे महानगरपालिकेस उपकर गोळा केलेबाबत जमा रकमेच्या 1% पेक्षा अधिक नाही

| |
|---|
| अशा रक्कमेचा परतावा करणेत येईल असे नमुद आहे. परंतु महानगरपालिकेने उपकर गोळा केलेची मासिक , वार्षिक विवरणपत्र मंडळास सादर न केल्याने 2012-13 या आर्थिक वर्षात जमा झालेली रक्कम रु.60646148/- च्या 1 टक्के प्रमाणे रु.606461/ रक्कमेचा परतावा महानगरपालिकेस मिळालेला नाही.<br><br>अनुपालनामध्ये उपकराची रक्कम धनाकर्षाने न घेता रोखीने घेतल्याचे मान्य केले आहे. तसेच नगररचना विभागाकडुन दैनंदिन जमा होणारी रक्कम महानगरपालिकेच्या लेखा विभागाकडे दररोज चलनाने जमा केली जाते व रक्कम शासनाकडे भरणा करण्याची जबाबदारी लेखा विभागाची असल्याचे नमुद केले आहे.यावरून महानगरपालिकेने शासन निर्णयाप्रमाणे उपकाराची रक्कम शासनाकडे जमा करण्याची कार्यवाही वरीलप्रमाणे चुकीच्या पद्धतीने राबविल्यामुळे उपकाराची रक्कम शासनाच्या कामगार कल्याण मंडळाकडे एक ते दोन वर्ष विलंबाने जमा केली आहे व गोळा केलेल्या उपकर रकमेची मासिक व वार्षिक विवरणपत्रे शासनाच्या कामगार कल्याण मंडळाकडे सदर न केल्याने 1% रकमेचा परतावा मिळू शकला नाही त्यामुळे महानगरपालिकेचे 2012-13 या वित्तीय वर्षामध्ये रु.606461/- चे नुकसान झाले आहे . |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 161 | 04/10/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |
|---|---|

| 83 | भविष्य निर्वाह निधी खाते स्वयंपूर्ण नसलेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 07 | लेखा | मनपा | 9ड | 03 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

भविष्य निर्वाह निधी रोकडवही व बँक पासबुक नुसार मार्च 13 अखेरची शिल्लक रु.133783477/- असुन HCL कंपनीने तयार केलेल्या बृहतपत्रकाच्या PDF File नुसार मार्च 2013 ची शिल्लक रु.175572714/- इतकी असल्याने रु.4,17,89,236.94/- ने भविष्य निर्वाह निधी खाते कमीने असल्याने निधी स्वयंपुर्ण नसल्याचे दिसुन येते. बृहतपत्रकाच्या 2012-13 या आर्थिक वर्षातील चाचणी लेखापरीक्षणात परीशिष्ठामधील 20 सेवानिवृत्त कर्मचा-यांना त्यांच्या वर्गणीचे अंतिम प्रदान 2007-08 ते 2008-09 या आर्थिक वर्षामध्ये केले आहे. परंतु त्यांची नावे बृहतपत्रकावरुन कमी केलेली नाहीत. तसेच त्यांची शिल्लक रक्कम व व्याजाची रक्कम रु.3381774/- च्या नोंदी नोंदवहीमध्ये घेतल्याने बृहतपत्रकातील एकुण रक्कम वाढल्याचे दिसुन येते. रोकडवहीतील शिल्लक रकमेमध्ये शेतकरी बँकेतील गुंतवणुक रु.6,40,98,506/- चा समावेश असुन बँक अवसायानामध्ये निघाली असल्याने सदर रक्कम अडकुन पडलेली आहे. उपरोक्त रक्कम परत मिळविण्यासाठी महानगरपालिकेने कोणतेही प्रयत्न केलेचे दिसुन येत नाही.

सांगली-मिरज-कुपवाड शहर महानगरपालिकेकडील कर्मचा-यांचे सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी खात्याच्या 2012-2013 या आर्थिक वर्षाच्या रोकडवही , बृहतपत्रक, बँक पासबुक, गुंतवणुक पावत्या व गुंतवणुक नोंदवहीचे लेखापरीक्षण केले असता भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये खालीलप्रमाणे स्वयंपुर्ण नसल्याचे दिसुन येते.

| | |
|---|---|
| 1) भविष्य निर्वाह निधी रोकडवही,बँक पासबुक नुसार मार्च 2013 अखेरची शिल्लक | रु. 13,37,83,477.06/- |
| 2) HCL कंपनीचे PDF File नुसार असलेल्या बृहतपत्रका नुसार मार्च 2013 ची शिल्लक | रु. 17,55,72,714/- |
| | ------------------------------- |
| फरक रु. (-) | रु. 4,17,89,236.94/- |

मनपा कडील सदर भविष्यनिर्वाह निधी रक्कम रु.4,17,89,236.94/- एवढ्या रक्कमेने कमी असल्याचे दिसून येते. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.162 दि.04/10/2014 रोजी निर्गमित केला असुन लेखा विभागाने त्याचे अनुपालन दि.18/10/2014 रोजी सादर केले आहेत. लेखा विभागाने दिलेले अनुपालन तपासून खालील प्रमाणे आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)रोकडवही नुसार शिल्लक रक्कम रुपये 13,37,83,477.06/- पैकी रु.78,73,838.68/- एवढी मोठी रक्कम सेव्हींग खातेवर शिल्लक असल्याचे आढळून आले आहे. सदर रक्कम दिर्घ मुदतीने एक वर्षासाठी राष्ट्रीयकृत बँकेमध्ये गुंतविली नसल्याने रु.78,73,838.68/- रक्कमेवर 9 टक्के व सेव्हिंग खात्यावर 4 टक्केप्रमाणे मिळालेला व्याजाची रक्कम वजा जाता 5 टक्केप्रमाणे व्याजदराप्रमाणे रु.393691/- चे आर्थिक नुकसान झाले आहे. 2012-13 या आर्थिक वर्षात कर्मचा-यांना भविष्य निर्वाह निधीवर 8.6

टक्केप्रमाणे व्याजाची आकारणी केली असल्याने व सेव्हिंग खात्यावर 4 टक्के दराने व्याज मिळाले असल्याने, 8.6 टक्के - 4 टक्के = 4.6 टक्के X रु.78,73,838.68/- प्रमाणे रु.362197/- एवढे व्याज जादा द्यावे लागले आहे. त्यामुळे सदर रक्कम दिर्घ मुदतीने 8.6 टक्केपेक्षा जादा दराने राष्ट्रीयकृत बँकेमध्ये **Autorenewal facility** सह गुंतवणुक करून व्याजाचा फायदा मिळविला नाही.

2)रोकडवहीतील शिल्लक रकमेमध्ये शेतकरी बँकेतील गुंतवणुक रु.6,40,98,506/- चा समावेश आहे. परंतु बँक अवसायानामध्ये गेल्याने सदर रक्कम अडकुन पडलेली आहे. अनुपालनामध्ये रक्कम मिळविण्यासाठी न्यायालयीन प्रक्रीया चालु असल्याचे नमुद आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 92 (3)  नुसार ठेवीमुळे किंवा गुंतवणूकीमुळे कांही नुकसान झाल्यास ते महानगरपालिकेच्या निधीच्या खाती खर्ची टाकणे आवश्यक असता त्या प्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही.

3)2012-13 या वर्षाचे बृहतपत्रक नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्र.134 (3) नुसार नमुना क्र.99 मध्ये ठेवण्यात आले आहे. बृहतपत्रकासाठी संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आली असुन त्याची संगणकीय प्रिंट काढण्यात आली आहे. तसेच भविष्य निर्वाह खाते नोंदवही नमुना क्र.98 मध्ये संगणकीय सॉफ्ट कॉपीच्या स्वरुपात ठेवण्यात आली आहे. बृहतपत्रकाच्या संगणकीय प्रतीची तपासणी केली असता परीशिष्ठ क्र. (09) मध्ये नमुद केलेले भविष्य निर्वाह निधीचे वर्गणीदार आर्थिक वर्ष 2007-08 ते 2008-09 मध्ये सेवानिवृत्त झाले असुन त्यांच्या निर्वाह निधीच्या रक्कमेचे अंतिम प्रदान ज्या त्या वर्षात करण्यात आलेले आहे. परंतु त्यांची नावे व भविष्य निर्वाह निधीची शिल्लक रक्कम बृहतपत्रकावरुन कमी करण्यात आलेली नाही. त्यामुळे त्यांचे नावे असलेल्या शिल्लक रक्कमा व्याजासहीत बृहतपत्रकावर दरवर्षी ओढल्यामुळे नोंदवहीतील रक्कम वाढलेली दिसुन येते. बृहतपत्रकाच्या चाचणी लेखापरीक्षणात परीशिष्ठामधील 20 कर्मचा-यांना त्यांच्या वर्गणीचे अंतिम प्रदान यापुर्वीच्या वर्षामध्ये केले आहे. परंतु त्यांची नावे बृहतपत्रकावरुन कमी केलेली नाहीत. तसेच त्यांची शिल्लक रक्कम व व्याजाची रक्कम रु.3381774/- च्या नोंदी नोंदवहीमध्ये घेतल्याने बृहतपत्रकातील एकुण रक्कम वाढल्याचे दिसुन येते. लेखा विभागाने बृहतपत्रकाची पुन्हा पडताळणी करून अंतिम प्रदान केलेल्या वर्गणीदारांची नावे त्यांचे शिल्लक वर्गणी व व्याजासहित कमी करण्यात यावी. बृहतपत्रक नोंदवहीमध्ये अंतिम प्रदान रक्कमाची नोंद नियमित घेवुन नोंदवही अद्यावत करण्यात यावी. बृहतपत्रक नोंदवही अद्यावत करुन त्याचा ताळमेळ रोकडवहीशी घेण्यात यावा व त्याचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे. तसेच चालु खात्यावर अपेक्षीत रक्कम ठेवुन उर्वरित रक्कम वेळीच राष्ट्रीयकृत बँकेत गुंतवणुक/ पुनर्गुंतवणुक करावी व निधी स्वयंपुर्ण होण्याचे दृष्टीने प्रयत्न करावेत.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 162 | 04/10/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |
|---|---|

| 84 | मिरज विभागातील मालमत्तांवरील करनिर्धारण व कर संकलनामधील त्रुटी बाबत | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 11 | करनिर्धारण व संकलन | मनपा | 9ब | 07 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | 7531780 | | |

घरपट्टी विभाग,मिरज कडील करनिर्धारणाच्या 638 प्रकरणांपैकी 617 प्रकरणी बांधकाम नियमावली नुसार परवानगी घेण्यात आल्याचे परवाना पत्र नस्ती मध्ये आढळून आले नाही. अशा बांधकामावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 267-अ नुसार अवैध इमारतींवर नियमित मालमत्ता करा व्यतिरिक्त दुप्पट दराने शास्ती लावणे आवश्यक असता ती न लावल्याने रु.37,65,890 च्या दुप्पट म्हणजे रु.75,31,780/- इतक्या महसूली उत्पन्नाचे एका वर्षामध्ये आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते. गुंठेवारी क्षेत्रामधील अवैध बांधकामावर शास्तीची रक्कम आकारु नये असा अधिनियमाच्या तरतुदीशी विसंगत ठराव महानगरपालिकेने केला असुन त्याची अंमलबजावणी प्रशासनाने केली आहे.

सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेच्या, मिरज विभागातील 2012-13 या वर्षीच्या मालमत्ता कर निर्धारण व कर संकलन विभागाचे, लेखापरीक्षणा करिता उपलब्ध करण्यात आलेल्या लेख्यांचे लेखापरक्षण केले असता, मिरज घरपट्टी विभागाची मालमत्ता कर निर्धारण व कर संकलनाकरीता 201 ते 228 अशी एकूण 28 भागांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. कर निर्धारण व कर संकलन बाबतच्या लेख्यांची स्थिती खालील प्रमाणे दिसून आली.

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसूची ‘ड’ प्रकरण-8 नियम-17 नुसार मालमत्ता धारकांकडून मालमत्तेच्या करपात्र मुल्य व करनिर्धारण बाबत तक्रार/ आक्षेप /हरकत नोंदविण्यासाठी नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार ठेवण्यात आलेली नोंदवही लेखापरीक्षाणा करिता उपलब्ध

करण्यात आलेली नाही. (महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971, नमुना-44). अर्धसमास ज्ञापन क्र.65 दि.25/6/2014 चे अनुपालन घरपट्टी विभागाने दि.10/07/2014 रोजी दिले आहे. त्यामध्ये आक्षेप नोंदविण्याची अंमलबजावणी संगणक प्रणालीवर करण्यात येते व दि.16/12/2014 पासुन संगणक प्रणाली बंद असल्याने अ‍ॅसेसमेंट नोंदवहीमध्ये हरकतीच्या नोंदी आर्थिक वर्ष 2014-15 पासुन करण्यात येत असल्याचे नमुद आहे. नियमाप्रमाणे हरकतीची नोंदवही ठेवणे आवश्यक असता ती ठेवण्यात आली नसल्याचे दिलेल्या अनुपालनावरुन दिसुन येते.

2) महापालिका क्षेत्रामध्ये अस्तित्वातील मालमत्ता मध्ये वाढ किंवा घट याबाबत नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार ठेवण्यात आलेली नोंदवही लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध करण्यात आलेली नाही. (महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971, नमुना-46).दिलेल्या अनुपालनामध्ये सदर नोंदी संगणक प्रणालीमध्ये असुन संगणक प्रणाली बंद असल्याने दाखविण्यात आल्या नसल्याचे नमुद आहे. संगणकावरील नोंदीची एक प्रिंट (हार्ड कॉपी) ठेवणे आवश्यक असता ती ठेवण्यात आली नसल्याने मालमत्तामधील वाढ किंवा घटीनुसार मालमत्ता कराची आकारणी व वसूली झालेली तपासणी करता आलेली नाही.

3) मालमत्तांमध्ये वाढ किंवा घट याबाबत नोंदवही ठेवण्यात आली नसल्यामुळे कर निर्धारण कर संकलन कर्मचा-यांकडून उपलब्ध करण्यात आलेल्या माहिती नुसार, परिशिष्ठ क्र.(12) मध्ये एकूण 639 नवीन मालमत्तांवर कर निर्धारण करून कर संकलन करण्यात आल्याची माहिती उपलब्ध करून देण्यात आली. (भाग निहाय तपशील खालील प्रमाणे)

| **अ.क्र** | **भाग क्र.** | **मालमत्ता संख्या** | **कर रक्कम** | **अ.क्र** | **भाग क्र.** | **मालमत्ता संख्या** | **कर रक्कम** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 202 | 17 | 31,475 | 12 | 213 | 01 | 1,14,210 |
| 2 | 203 | 134 | 1,99,585 | 13 | 214 | 10 | 27,487 |
| 3 | 204 | 67 | 9,37,733 | 14 | 220 | 06 | 37,424 |
| 4 | 205 | 23 | 56,717 | 15 | 223 | 04 | 12,402 |
| 5 | 206 | 65 | 6,18,235 | 16 | 224 | 03 | 15,105 |
| 6 | 207 | 49 | 1,19,270 | 17 | 225 | 10 | 74,279 |
| 7 | 208 | 85 | 1,06,382 | 18 | 226 | 10 | 38,175 |
| 8 | 209 | 59 | 1,47,012 | 19 | 227 | 03 | 9,488 |
| 9 | 210 | 64 | 7,80,946 | 20 | 228 | 13 | 4,23,490 |
| 10 | 211 | 07 | 16,180 | 21 | 275 | 01 | 167 |
| 11 | 212 | 08 | 29,097 | | **एकूण** | **639** | **37,95,034** |

4) कर निर्धारणा बाबत 2001 मध्ये निर्धारित केलेल्या दरांनुसार कर आकारणी करण्यात येत असल्याचे दिसून आले. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949, अनुसूची-ड, प्रकरण 8, नियम 7-अ (3) नुसार

भांडवली मुल्य दर पाच वर्षांनी सुधारणा करण्याबाबत तरतूद आहे. परंतु 2001 पासून पुढील 12 वर्षामध्ये भांडवली मुल्यामध्ये सुधारणा करण्यात येऊन महापालिका मालमत्ता करामध्ये कोणतीही सुधारणा करण्यात आल्याचे दिसून येत नाही. घरपट्टी विभागाने दिलेल्या अनुपालनामध्ये 2001 मध्ये निर्धारित केलेल्या दरानुसारची कर आकारणी 2009-10 पासून सुरु करण्यात आली असल्याचे नमुद केले आहे. यावरुन 12 वर्षामध्ये कर निर्धारणाचे दर सुधारित न करता जुन्याच दराने कर वसुली करण्यात येत असल्याचे स्पष्ट होते.

5) वरील प्रकरणांची पडताळणी केली असता 639 प्रकरणांपैकी 617 प्रकरणी बांधकाम नियमावली नुसार परवानगी घेण्यात आल्याचे परवाना पत्र नस्ती मध्ये आढळून आले नाही. सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका विकास नियंत्रण नियमावली नियम - 6.7.1 नुसार बांधकामाला बांधकाम पूर्व परवानगी घेऊन, नियम-7.6 नुसार बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देऊन, नियम-7.7 नुसार वास्तव्य करण्याबाबतची परवानगी घेण्यात आल्याशिवाय बांधकाम अधिकृत होत नाही. अशी परवानगी घेण्यात आली नसल्यास सदर बांधकाम अवैध/अनधिकृत ठरते. त्यामुळे अशा बांधकामावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949, कलम 267-अ नुसार अवैध इमारतींवर नियमित मालमत्ता कराव्यतिरिक्त दुप्पट दराने शास्ती लावण्याबाबत तरतूद आहे. उपलब्ध माहितीनुसार मिरज विभागातील 29 भागांमधील 2012-2013 मधील 639 नविन मालमत्तांपैकी भाग क्र. 214 मधील 8 मालमत्तांना व भाग क्र. 228 मधील 8 मालमत्तांना वरीलप्रमाणे परवानगी घेण्यात आलेली आहे. तसेच उर्वरित 623 मालमत्तांना परवानगी घेण्यात आल्याचे प्रारंभ प्रमाणपत्र व भोगवटा प्रमाणपत्र नस्ती मध्ये आढळून आले नाही. त्यापैकी 6 मालमत्तांना दुप्पट दराने शास्ती आकारण्यात आली आहे. त्यामुळे उर्वरित 617 मालमत्तांवर नियमित कराव्यतिरिक्त दुप्पट दराने शास्ती आकारण्यात आली नसल्याने रु.37,65,890 X 2 = रु.75,31,780 महसूली उत्पन्नाचे एका वर्षामध्ये नुकसान झाल्याचे दिसून येते.

6) महापालिका ठराव क्र.6, दिनांक 19/11/2008 अन्वये गुंठेवारी विभाग वगळून अधिनियमातील सुधारित तरतुदीनुसार अंमलबजावणी करणेत यावी व त्यास ही सभा मान्यता देत असून, गुंठेवारी क्षेत्राविषयी सविस्तर अहवाल तयार करून गुंठेवारी समिती मार्फत सदर तरतुदीची अंमलबजावणी करावी अगर कसे याबाबत गुंठेवारी समितीच्या शिफारशीने मान्यतेसाठी अहवाल सादर करणेत यावा असे आदेशित करण्यात आले आहे. या बाबत अद्‌याप निर्णय झालेला नाही. त्यामुळे प्रती वर्षी अवैध/बिगर परवाना बांधकामांवरील शास्तीची रक्कम वसूल करण्यात आलेली नाही. शासनाने अधिसूचना काढून दिनांक 04 जानेवारी, 2008 पासून अवैध/बिगर परवाना बांधकामांवर शास्ती लावण्याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 267 (अ) नुसार सुधारणा केली असल्याने याबाबत त्यांनतर महानगरपालिकेने विसंगत आदेश काढणे उचित नाही. त्यामुळे याबाबत घरपट्टी विभागाने दिलेला खुलासा संयुक्तिक वाटत नाही. महानगरपालिकेने केलेली कार्यवाही शासन आदेशासी विसंगत असल्याचे दिसून येते.

7) महापालिका कर्मचा-यांकडून सर्व्हे मध्ये आढळलेल्या मालमत्तांच्या मालमत्ताकर आकारणी बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949, अनुसूची “ड” प्रकरण 8, नियम 20 व 21 नुसार

| |
|---|
| मालमत्ताधारकांना नोटीसीव्दारे उक्त कायद्यातील नियम 16 ला अधीन राहून त्याबाबत सबळ कारणासह लेखी अर्ज देऊन 15 दिवसात हरकत देण्याचे कळविले जाते. परंतु परिशिष्ठ क्रं.12 मध्ये दिलेल्या यादीमधील मालमत्ताधारक कोणत्या कालावधीपासून सदर जागेवर वास्तव्य करीत आहे. याचा खात्रीलायक पुरावा उपलब्ध करण्यात आलेला नाही. त्यामुळे सबळ पुराव्या अभावी मालमत्ताकर आकारणी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे.<br>**वसुलपात्र रक्कम रु.7531780/-** |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 65 | 25/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATBDMM5701 |

| 85 | घनकचरा व्यवस्थापनांतर्गत विनानिविदा घेतलेल्या कंटेनर खरेदीमधील अनियमिततेबाबत. |
|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव |
| | 13 वा वित्त आयोग |

| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 12 | आरोग्य | केंद्र शासन | 9ब | 09 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 2964600 | 2159400 | | |

| |
|---|
| शासन निर्णय दिनांक 2 जानेवारी, 1992 मधील परिच्छेद- 5 नुसार महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळा मार्फत खरेदी करावयाच्या 15 वस्तूंची यादी परीशिष्ठ “तीन” मध्ये दिलेली आहे. परंतु महानगरपालिकेने खरेदी केलेल्या खालील साहित्याचा या यादीमध्ये समावेश नाही. काम विनानिविदा दिल्याने स्पर्धात्मक दराचा लाभ न मिळाल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच कोल्हापुर महानगरपालिकेने निविदेने घेतलेल्या कंटेनरच्या दराशी विनानिविदा खरेदी केलेल्या कंटेनरच्या |

दराची तुलना केली असता रुपये 35,400/- प्रती नग एवढ्या जादा दराने एकुण 61 नग खरेदी करण्यात आलेले आहेत. निविदाबाह्य पद्धती अवलंबिल्यामुळे अवाजवी दराने खरेदी करून महापालिकेचे रु.2159400/- नुकसान करण्यात आल्याचे दिसून येते.

13 व्या वित्त आयोगाच्या मंजूर निधीतून, सांगली-मिरज कुपवाड मनपा मधील आरोग्य विभागास घनकचरा व्यवस्थापनांतर्गत साहित्य खरेदीसाठी उपलब्ध करण्यात आलेल्या निधीतून केलेल्या रु.9456000/- खरेदीच्या खर्चाचे लेखापरीक्षण नस्ती व प्रमाणकावरुन करण्यात आले. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

प्रमाणक क्र. 8, दिनांक 8/10/2012, रुपये- 79,76,000/-

प्रमाणक क्र. 40, दिनांक 30/03/2013 रुपये-14,80,000/

**योजना :** 13 वित्त आयोग

**विभाग :** आरोग्य विभाग

**कामाचे नाव :** घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत साहित्य खरेदी

**महासभा ठराव :** क्र. 256, दिनांक 19/03/2011 व ठराव क्र. 39, दिनांक 19/05/2011

**स्थायी समिती ठराव :** क्र. 82, दिनांक 29/05/2012 ने मंजुरी

**प्रशासकीय मंजुरी :** मनपा आयुक्त जा.क्र. मनपा/ 722/ 2011-12, दिनांक 31/03/2012

**पुरवठादाराचे नाव :** महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, सांगली

**कामाचा करारनामा :**

पुरवठा आदेश क्र. मनपा/आरोवि/ 6 /201/2012-13, दिनांक 09/07/2012. (कामाचे आदेशानुसार कामाची मुदत चेसीस व ट्रॅक्टर ताब्यात मिळाल्यापासून 60 दिवस आहे.)

**पुरवठा तपशील :-**

| अनु.क्र | साहित्याचा तपशील | एकूण नग | दर प्रती नग | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | डंपर प्लेसर | 2 नग | 7,40,000 | 14,80,000 |
| 2. | कॉम्पॅक्टर | 1 नग | 28,00,000 | 28,00,000 |
| 3. | ओपन नाला डिसिल्टिंग मशीन (नाला मॅन) | 1 नग | 14,50,000 | 14,50,000 |
| 4. | कंटेनर | 61 नग | 84,000 | 51,24,000 |
| 5. | लोखंडी ढकल गाड्या | 79 नग | 12,000 | 9,48,000 |
| 6. | ट्रॅक्टर ट्रॉली | 2 नग | 2,27,000 | 4,54,000 |
| **एकूण रुपये** | | | | **1,22,56,000** |

**साहित्याचा पुरवठा :** महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ सांगली यांचे बिजक क्र. PI-99, दिनांक 3/10/2012 अन्वये 1)ओपन नाला डिसिल्टिंग मशीन (नाला मॅन)-1 नग, रुपये- 14,50,000/- 2)

कंटेनर- 61 नग, रुपये- 51,24,000/- 3) लोखंडी ढकल गाडया- 79 नग, रुपये- 9,48,000 4) ट्रॅक्टर ट्रॉली- 2 नग, रुपये 4,54,000/- एकूण रुपये 79,76,000/ पुरवठा करण्यात आला आहे.

सदर घनकचरा व्यवस्थापन साहित्य खरेदी प्रकरणाबाबत लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध करण्यात आलेली पत्रव्यवहार नस्ती, महापालिका ठराव, स्थायी समिती ठराव इत्यादीची पडताळणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.74 दि.14/7/2014 रोजी निर्गमित केला आहे व आरोग्य विभागाने त्याचे अनुपालन दि.27/10/2012 रोजी तीन महिने विलंबाने सादर केले आहे. दिलेल्या अनुपालनाचे अवलोकन करुन खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

**1)मुद्रांक शुल्क** : पुरवठा आदेश क्र.201, दिनांक 9/07/2012 नुसार रुपये 1,22,56,000/- रकमेचे साहित्य पुरवठा करण्याचे आदेश आहेत. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 च्या अनुच्छेद 63 प्रमाणे कार्यकंत्राट करताना पहिल्या रु.10 लाख रकमेवर रु.100/- व त्या पुढील रकमेवर प्रत्येक एक लाखाकरिता रु. 100/- प्रमाणे रुपये -11,300/- च्या मुद्रांक शुल्क पेपरवर करार करणे आवश्यक आहे. परंतु सदर प्रकरणी रुपये-1000/- च्या मुद्रांक शुल्क पेपरवर करारनामा करण्यात आला आहे. म्हणजेच रुपये - 10,300/- रकमेचे शासनाच्या मुद्रांक शुल्काचे नुकसान झालेले आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये मुद्रांक शुल्क वसुल करण्याचे मान्य केले आहे.

**2)पुरवठा केलेल्या साहित्याचे प्रदान :** प्रमाणक क्र. 8, दिनांक 8/10/2012 अन्वये पुरवठा केलेल्या साहित्याचे रुपये-79,76,000/ चे प्रदान ठेकेदारास करण्यात आले आहे. प्रमाणकातून आयकर, विक्रीकर, सुरक्षा ठेव कपात करण्यात आलेली नाही.

**3)निविदा न मागविता खरेदी :** सदर घन कचरा व्यवस्थापन साहित्य व यंत्र सामग्रीची निविदा प्रक्रियेचा अवलंब न करता महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाकडून थेट खरेदी करण्यात आलेली आहे. याबाबत दिनांक 28/08/2012 चे विषय पत्र, स्थायी समिती ठराव क्र. 82, दिनांक 29/5/2012, आयुक्तांची प्रशासकीय मंजुरी आदेश क्र. 722, दिनांक 31/03/2012, पुरवठा आदेश क्र. 201, दिनांक 9/07/2012 व पत्रव्यवहार नस्तीची पडताळणी केली असता निविदा प्रक्रीयेचा अवलंब न करता घनकचर व्यवस्थापन साहित्य व यंत्रसामग्री महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाकडून थेट खरेदी करण्यात आलेली आहे. सदर कामाच्या नस्तीमधील उपायुक्त(समिकू)यांचे विषयपत्र दिनांक 24/05/2012 अन्वये नगर सचिवांना लिहिलेल्या स्थायी समितीच्या मंजुरीच्या प्रस्तावामध्ये महाराष्ट्र शासन अंगीकृत एम.एस.एस.आय.डी.सी. यांचेकडून शासन मान्य दरकारान्वये खरेदी करणेस व येणा-या खर्चास मा. आयुक्त यांनी दि. 23/05/2012 रोजीच्या प्रशासकीय आदेशाने मंजुरी दिली असून सदरचा विषय मा. स्थायी समितीच्या आगामी बैठकीपुढे सादर करण्याबाबत प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यानुसार स्थायी समिती ठराव क्र. 82, दिनांक 29/05/2012 अन्वये स्थायी समितीने, प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास सहमती दर्शविली असून सदर साहित्य महाराष्ट्र शासन मान्य दरकरार अन्वये खरेदी करणेस व यासाठी येणा-या खर्चास मान्यता दिली आहे. त्यानुसार वैद्यकीय आरोग्य अधिकारी (सामिकु), यांचे वर्क ऑर्डर क्र. मनपा/आरोवि/ 6/1/201/2012-13, दिनांक 09/07/2012. नुसार साहित्य पुरवठा करण्याचे आदेश दिले आहेत. यावरून निविदा मागवून पुरवठादार निश्चित करण्यात आल्याचे दिसून येत नाही. महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भाखस.1088/(2512)/ उद्योग-6, दिनांक 2 जानेवारी,1992 नुसार खरेदीबाबत अवलंब करावयाच्या पद्धतीबाबत सविस्तर आदेश निर्गमित करण्यात

आले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाने शासनाबरोबर दरकरार केल्याची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये महाराष्ट्र लघुउद्योग व विकास महामंडळ, सांगली यांनी महानगरपालिकेस दि.20/04/2007 रोजी पत्र क्र.सांजिक/विस/07-08/29 ने पाठविलेल्या पत्रांनुसार महामंडळाकडुन साहित्य खरेदी केलेचे नमुद आहे. परंतु उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखसं-1093/2635/ उद्योग/6 दि.16 जुलै 1993 नुसार 50 हजाराचे वरील कामाची खरेदीची निविदा मागविणे आवश्यक असता, त्यानुसार महानगरपालिकेने निविदा न मागविता थेट खरेदी महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाकडून केली आहे. तसेच सदर दर बाजारभावाशी सुसंगत असल्याची खात्री केलेली नाही.

4)स्थायी समितीला सादर करण्यात आलेल्या प्रस्तावामध्ये महाराष्ट्र शासन मान्य दरकरार अन्वये खरेदी करणेबाबत मंजुरी प्रस्तावित करण्यात आली आहे. परंतु महाराष्ट्र शासन मान्य दर कराराची प्रत लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध करण्यात आलेली नाही. शासन व इतर संस्थाकडून उत्पादित वस्तूंचे दर ठरविण्यासंबंधीची कार्यवाही उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भांखसं-1088/2512/ उद्योग/6 दि.2 जाने.1992 मध्ये दिली आहे.त्यामधील परिच्छेद 7 नुसार दर ठरविताना बाजार भाव तसेच उत्पादन खर्च याचा सारासार विचार करण्यात यावा. या सर्व संस्थांनी वस्तुबाबतचे दर मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेमार्फत दरवर्षी 1 मे पूर्वी निश्चित करुन ते सर्व विभागांना कळवायचे आहेत. त्याप्रमाणे महानगरपालिकेने बाजारभाव व उत्पादन खर्च याचा सारासार विचार करुन दरपृथ:करणाने दर ठरविणे आवश्यक होते. उक्त शासन निर्णय दिनांक 2 जानेवारी, 1992 मधील परिच्छेद- 5 नुसार महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळा मार्फत खरेदी करावयाच्या 15 वस्तूंची यादी परीशिष्ठ “तीन” मध्ये दिलेली आहे. परन्तु त्या यादीमध्ये महानगरपालिकेने खरेदी केलेल्या उपरोक्त साहित्याचा समावेश दिसून येत नाही. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये महामंडळाने महानगरपालिकेस पाठविलेल्या पत्रामध्ये सदर महामंडळ त्यांचे कडे नोंदणी असलेल्या लघुउद्योजकामध्ये अंतर्गत निविदा प्रक्रीया पुर्ण करीत असल्याने शासकीय कार्यालय त्यांना लागणा-या वस्तुंची या महामंडळाकडुन थेट खरेदी करीत असल्यामुळे सदर कामगिरीसाठी मनपास MSSIDC कडुन प्राप्त झालेले दर स्पर्धात्मक दर्जाचे असल्याने त्यांचेकडुन साहित्य खरेदी केल्याचे नमुद आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेले उत्तर संयुक्तिक नाही.शासनमान्य दरकराराने खरेदी केलेली नाही.

5)सदर साहित्य खरेदी करण्याबाबत उपरोक्त उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दिनांक 2 जानेवारी,1992 च्या परिच्छेद 12 मध्ये विकसनशील भागातील सामुहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत पात्र ठरणा-या उद्योजकांना खरेदी प्राधान्य देण्याबाबत आदेश आहेत. सविस्तर निविदा प्रक्रिया अवलंबण्यात आली नसल्याने निविदेला जास्तीत जास्त लघुउद्योजकाकडून प्रतिसाद मिळालेला नसल्याने स्पर्धात्मक दर प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे महापालिकेस सदर खरेदी प्रक्रियेमध्ये स्पर्धात्मक दराचा फायदा झालेला नाही. निविदा प्रक्रिया अवलंबण्यात आली नसल्यामुळे शासन आदेशाचे व धोरणाची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

6)सदर साहित्याचे पुरवठा आदेशामध्ये किंवा पुरवठादाराचे पुरवठा दरपत्रक, पुरवठा चलन किंवा पुरवठा बीजक यांपैकी कोणत्याही ठिकाणी पुरवठा केलेल्या साहित्या बाबतचा सविस्तर तपशील/ स्पेसिफिकेशन (उदा. वस्तुची क्षमता, वस्तू तयार करण्याकरीता वापरावयाचे/ वापरण्यात आलेले मटेरियल) याचा उल्लेख

करण्यात आलेला नाही. त्यामुळे वस्तुची किंमत वाजवी असल्याची व मागणीप्रमाणे साहित्याचा पुरवठा झाल्याची पडताळणी करता आली नाही. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनाबरोबर शासकीय आय.टी.आय सांगली यांनी प्रमाणित केलेली कंटेनरच्या स्पेसिफिकेशनची झेरॉक्स प्रत जोडण्यात आली आहे. परंतु सदर झेरॉक्स प्रत प्रमाणित करण्यात आलेली नाही. तसेच ड्राईंगवर सक्षम प्राधिका-याची स्वाक्षरी व दिनांक नमुद नाही.

7)सदर पुरवठा आदेशामध्ये प्रती कंटेनर रुपये - 84000/- दराने खरेदी करण्यात आल्याचे दिसून येते. याबाबत पुरवठा आदेश, किंवा पुरवठादाराचे पुरवठा चलन किंवा बीजक यामध्ये वर नमूद केल्यानुसार स्पेसिफिकेशनचा उल्लेख नमूद करण्यात आलेला नाही. सदर कंटेनरचा दर स्पेसिफिकेशन अभावी वाजवी असल्याची व मागणीप्रमाणे पुरवठा झाल्याची खात्री करता येत नाही. तथापि सदर कंटेनरच्या पुरवठ्याबाबत, सांगली जिल्ह्याच्या लगतच्या जिल्हयातील कोल्हापूर महानगरपालिकेमध्ये खरेदी करण्यात आलेल्या कंटेनरच्या दराशी तुलना करता फार मोठी तफावत दिसून येते. कोल्हापूर महानगरपालिकेमध्ये अशाच प्रकारच्या कंटेनरकरिता खुल्या निविदा मागवून खरेदी करण्यात आलेल्या कंटेनरची किंमत प्रती कंटेनर रुपये 37800/- आहे. कंटेनरचे स्पेसिफिकेशन 3.5 घनमीटर क्षमता व 3 एमएम जाडीचा एम.एस पत्रा असे आहे. सांगली महानगरपालिकेने खरेदी केलेल्या कंटेनरचे स्पेसिफिकेशनबाबत उल्लेख नाही. परंतु नस्तीमधील ड्रॉइंग नुसार तसेच सांगली शासकीय तंत्रनिकेतनने दिलेल्या गुणवत्ता चाचणी तपासणी प्रमाणपत्रानुसार कंटेनरची क्षमता 4.5 घनमीटर व 3 एमएम जाडीचा एम.एस पत्रा असे असून कंटेनरची किंमत मात्र प्रती कंटेनर रुपये- 84000/- आहे. दोन्ही ठिकाणच्या बनविण्यात आलेल्या कंटेनरच्या मटेरियल मध्ये साधर्म्य आहे. मात्र कंटेनरच्या क्षमतेमध्ये 1 घ.मी. फरक आहे. सदर दोन्ही ठिकाणच्या दरांची तुलना करता कोल्हापूर महानगरपालिकेमध्ये खुल्या निविदा मागवून 3.5 घनमीटर क्षमतेचे कंटेनर रुपये- 37,800/ दराने खरेदी कलेले आहेत. म्हणजेच त्याचा दर प्रती घनमीटर रु. 10,800/- होतो. त्यानुसार सांगली मनपा मध्ये खरेदी करण्यात आलेल्या 4.5 घनमीटर क्षमतेच्या कंटेनरची किंमत रुपये- 48,600/- प्रती कंटेनर होते. त्याऐवजी सांगली महानगरपालिकेमध्ये प्रती कंटेनर रु.84,000/- ने म्हणजेच सर्वसाधारणपणे रुपये-35,400/- प्रती नग एवढ्या जादा दराने एकुण 61 नग खरेदी करण्यात आलेली आहे. विनानिविदा खरेदी पद्धती अवलंबिल्यामुळे अवाजवी दराने खरेदी करून महानगरपालिकेचे रु.2159400/- नुकसान करण्यात आल्याचे दिसून येते. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये 2008-09 या आर्थिक वर्षामध्ये निविदा मागविल्या असता रु. रु.84375/- प्रती कंटेनर या दराने निविदा प्राप्त झाल्या होत्या. सदर खरेदी त्यापेक्षा कमी दराने रु.84000/- केली असल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले नसल्याचे नमुद केले आहे. परंतु 2012-13 या आर्थिक वर्षात निविदा मागवुन दर निश्चित केले नसल्याने आरोग्य विभागाने दिलेले अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.

8)शासन निर्णय दिनांक 2 जानेवारी, 1992 मधील परिशिष्ट आठ परिच्छेद - 8.4 मध्ये शासन परिपत्रक, दि.14 ऑक्टोबर 1986 अन्वये भारतीय मानक संस्थेने चिन्हांकित केलेल्या वस्तु खरेदी करण्या विषयी आदेश दिले आहेत. चिन्हांकित नसलेल्या वस्तुची खरेदी लघुउद्योजकाकडून करण्यापूर्वी संबंधित विभागाने उद्योग संचालनालयातील भांडार खरेदी संघटनेकडून मानके ठरविली नसलेबाबतचे लेखी आदेश घेणे आवश्यक आहे. सदर साहित्य अचिन्हांकीत असल्याने नियमाप्रमाणे भांडार खरेदी संघटनेकडून मानके ठरविली नसलेबाबतचे लेखी आदेश घेणे आवश्यक असता ते न घेताच खरेदीची कार्यवाही करणेत

| |
|---|
| आलेली आहे.<br>9)शासन निर्णय दिनांक 2 जानेवारी, 1992 मधील परिशिष्ट आठ परिच्छेद - 8.4 मध्ये चिन्हांकित नसलेल्या वस्तुची खरेदी करताना मालाच्या दर्जाविषयी तपासणी संचालक, स्मॉल इंडस्ट्रीज सर्व्हीस इन्स्टिट्युट,कुर्ला-अंधेरी रोड, साकीनाका, मुंबई यांचे कडुन करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे साहित्य योग्य स्पेसिफिकेशनचे असलेबाबतचा तांत्रिक गुणवत्तेचा प्रयोगशाळा अहवाल न घेताच देयक आदा केले आहे.<br>**आक्षेपाधिन रक्कम :- रु. 2964600/-**<br>**वसुलपात्र रक्कम :- रु. 2159400/-** |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 74 | 14/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATBDMM5701 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 86 | आरोग्य विभागाकडून घनकचरा व्यवस्थानांतर्गत घेतलेल्या साहित्य खरेदी मधील गंभीर अनियमिततेबाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | 13 वा वित्त आयोग. | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 12 | आरोग्य | केंद्र शासन | 9ब | 09 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 3576000 | 1424000 | | |

| |
|---|
| आरोग्य विभागाने कंटेनर,घंटागाड्या,लोखंडी ढकलगाड्या हे साहित्य विनानिविदा महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळा मार्फत खरेदी केले आहे. शासन निर्णय दिनांक 2 जानेवारी, 1992 मधील परिच्छेद- 5 ,परीशिष्ठ “तीन” मध्ये महामंडळा मार्फत खरेदी करावयाच्या 15 वस्तूंच्या दिलेल्या यादीमध्ये उपरोक्त |

साहित्याचा समावेश नाही. काम विनानिविदा दिल्याने स्पर्धात्मक दराचा लाभ न मिळाल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच कोल्हापुर महानगरपालिकेने निविदा काढुन खरेदी केलेल्या कंटेनरच्या दराशी विनानिविदा खरेदी केलेल्या कंटेनरच्या दराची तुलना केली असता रुपये- 35,400/- प्रती नग एवढ्या जादा दराने एकुण 40 नग खरेदी करण्यात आलेली आहे. नियमबाह्य पद्धती अवलंबिल्यामुळे अवाजवी दराने खरेदी करून महापालिकेचे रु. 1424000/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.

13 व्या वित्त आयोगाच्या मंजूर निधीतून, सांगली-मिरज कुपवाड मनपा मधील आरोग्य विभागास घनकचरा व्यवस्थापनांतर्गत साहित्य खरेदीसाठी उपलब्ध करण्यात आलेल्या निधीतून प्रमाणक क्र. 9, दिनांक 6/11/2012 अन्वये केलेल्या रुपये- 50,00,000/- खर्चाचे लेखापरीक्षण करण्यात आले. त्याचा तपशील खालीलप्रमाणे...

**योजना :** 13 वित्त आयोग

**विभाग :** आरोग्य विभाग

**कामाचे नाव :** घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत साहित्य खरेदी

**महासभा ठराव :** क्र. 52, दिनांक 12/06/2012 ने मंजुरी

**स्थायी समिती ठराव :** क्र. 241 दिनांक 30/08/2012 ने मंजुरी

**प्रशासकीय मंजुरी** : मनपा आयुक्त

**पुरवठादाराचे नाव :** महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, सांगली

**कामाचा करारनामा :** रुपये-1000/- च्या मुद्रांकावर करण्यात आलेला आहे.

**पुरवठा आदेश :** 1) क्र. मनपा/आरोवि/ 6 /1/319/2012-13, दिनांक 01/09/2012.
(कामाचे आदेशानुसार कामाची मुदत 50 दिवस व 60 दिवस आहे.) एकाच क्रमांकाचे दोन स्वतंत्र आदेश देण्यात आले आहेत १) 6 कप्प्याच्या घंटा गाड्या-49 नग व लोखंडी ढकल गाड्या-55 नग २) कंटेनर्स-40 नग

**पुरवठा तपशील :-**

| अनु.क्र | साहित्याचा तपशील | एकूण नग | दर प्रती नग रुपये | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1. | कंटेनर | 40 नग | 84,000 | 33,60,000 |
| 2. | 6 कप्प्याच्या घंटागाड्या | 49 नग | 20,000 | 9,80,000 |
| 3. | लोखंडी ढकल गाड्या | 55 नग | 12,000 | 6,60,000 |
| एकूण रुपये | | | | 50,00,000 |

**साहित्याचा पुरवठा :** महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ सांगली यांचे चलन क्र.205 व 939

दिनांक 20/10/2012 अन्वये वरील साहित्याचा पुरवठा करण्यात आला आहे.

सदर घन कचरा व्यवस्थापन साहित्य खरेदी प्रकरणाबाबत लेखापरीक्षाणाकरिता उपलब्ध करण्यात आलेली पत्रव्यवहार नस्ती, महापालिका ठराव, स्थायी समिती ठराव, प्रमाणक इत्यादीची पडताळणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.75 दि.14/7/2014 रोजी निर्गमित केला आहे. आरोग्य विभागाने त्याचे अनुपालन दि.27/10/2014 रोजी तीन महिने विलंबाने सादर केले असून आलेल्या अनुपालनाचे अवलोकन करून खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

**1)कामाचा करारनामा** : पुरवठा आदेश क्र. मनपा/आरोवि/ 6 /1/319/2012-13, दिनांक 01/09/2012. नुसार पुरवठादाराने रुपये 50 लक्ष किमतीचे साहित्य पुरवठा करावयाचा आहे. त्यानुसार पुरवठादाराबरोबर मुंबई मुद्रांक अधिनियम 1958, अनुच्छेद 63 प्रमाणे कार्य करारात नमूद केलेली रक्कम रु. 10 लाखापेक्षा अधिक नसेल तेव्हा रु. 100/- व रु. 10 लाखापेक्षा जास्त रकमेवर पहिल्या 10 लाखावर रु.100/- व त्यापुढील प्रत्येक 1 लाखावर 100 रुपये जास्तीत जास्त रुपये 5 लाख मुद्रांक शुल्क घेणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर प्रकरणी रुपये-4100/- रकमेच्या मुद्रांक पेपरवर करारनामा करण्याऐवजी रु.1000/- च्या मुद्रांक पेपरवर केला असल्याने रु.3100/- ची वसुली करण्यात यावी. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये मुद्रांक शुल्काची रक्कम ठेकेदाराकडुन वसुल करण्याचे मान्य केले आहे.

**2)निविदा न मागविता खरेदी** : सदर कामाच्या नस्तीमधील उपायुक्त(सांमिकु)यांचे पत्र जा.क्र. मनपा/आरोवि/6/1/303/2012-13, दिनांक 28/08/2012 अन्वये नगर सचिवांना लिहिलेल्या स्थायी समितीच्या मंजुरीच्या प्रस्तावामध्ये महाराष्ट्र शासन अंगीकृत एम.एस.एस.आय.डी.सी. यांचेकडून 6 कप्प्याच्या घंटागाड्या, कंटेनर्स व लोखंडी ढकलगाड्या त्यांना यापूर्वी दिलेल्या पुरवठा आदेशाच्या दराप्रमाणे आणि महाराष्ट्र शासन अंगीकृत शासनमान्य दरकरारान्वये खरेदी करणेस व येणा-या खर्चास मा. आयुक्तसो यांनी दि. 28/08/2012 रोजीच्या प्रशासकीय आदेशाने मंजुरी दिली असून सदरचा विषय मा. स्थायी समितीच्या आगामी बैठकीपुढे सादर करण्याबाबत प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यानुसार स्थायी समिती ठराव क्र. 241, दिनांक 29/08/2012 अन्वये स्थायी समितीने, प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास सहमती दर्शविली असून सदर साहित्य महाराष्ट्र शासन मान्य दरकरार अन्वये खरेदी करणेस व यासाठी येणा-या खर्चास मान्यता दिली आहे. त्यानुसार वैद्यकीय आरोग्य अधिकारी (सांमिकु), यांचे वर्क ऑर्डर क्र. मनपा/आरोवि/ 6 /1/319/2012-13, दिनांक 01/09/2012. नुसार साहित्य पुरवठा करण्याचे आदेश दिले आहेत. यावरून निविदा मागवून पुरवठादार निश्चित करण्यात आल्याचे दिसून येत नाही. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये महाराष्ट्र लघुउद्योग व विकास महामंडळ यांनी दि.20/04/2007 रोजीचे पत्र क्र.सांजिक/विस/07-08/29 ने महानगरपालिकेस पाठविलेल्या पत्रांनुसार महामंडळाकडुन साहित्य खरेदी केलेचे नमुद आहे. त्यानुसार महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाने शासनाबरोबर दरकरार केल्याची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही. तसेच महानगरपालिकेने सदर दर बाजारभावाशी सुसंगत असल्याची खात्री केलेली नाही.

**3) पुरवठा केलेल्या साहित्याचे प्रदान :** प्रमाणक क्र. 9, दिनांक 6/11/2012 अन्वये साहित्य पुरवठा केल्याने रुपये-50,00,000/- (रु. पन्नास लक्ष) चे प्रदान ठेकेदारास करण्यात आले आहे. प्रमाणकातून आयकर, विक्रीकर, सुरक्षा ठेव कपात करण्यात आलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भाखस.1088/(2512)/ उद्योग-6, दिनांक 2 जानेवारी,1992 नुसार खरेदीबाबत अवलंब करावयाच्या पध्दतीबाबत सविस्तर आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाने शासनाबरोबर दरकरार केल्याची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही. स्थायी समितीला सादर करण्यात आलेल्या प्रस्तावामध्ये महाराष्ट्र शासन शासनमान्य दरकरार अन्वये खरेदी करणेबाबत मंजुरी प्रस्तावित करण्यात आली आहे. परंतु महाराष्ट्र शासनमान्य दरकराराची प्रत लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध करण्यात आलेली नाही. उक्त शासन निर्णय दिनांक 2 जानेवारी, 1992 मधील परिच्छेद- 5 नुसार महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळा मार्फत खरेदी करावयाच्या वस्तूंची यादी परीशिष्ठ "तीन" नुसार 15 वस्तूंची यादी दिलेली आहे. त्यामध्ये उपरोक्त बाबींचा समावेश नसल्याने चुकीच्या पध्दतीने महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ सांगली यांचेकडुन विनानिविदा साहित्य खरेदी करण्यात आलेचे दिसुन येते.

5) सदर साहित्य खरेदी करण्याबाबत उपरोक्त उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दिनांक 2 जानेवारी,1992 च्या परिच्छेद 12 विकसनशील भागातील सामुहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत पात्र ठरणा-या उद्योजकांना खरेदी प्राधान्य देण्याबाबत आदेश आहेत. सविस्तर निविदा प्रक्रिया अवलंबण्यात आली नसल्याने निविदेला जास्तीत जास्त लघुउद्योजगाकडून प्रतिसाद मिळून स्पर्धात्मक दर प्राप्त झाले नसल्याने महापालिकेस सदर खरेदी प्रक्रियेमध्ये अधिक फायदा झाला नसल्याचे दिसुन आले आहे. निविदा प्रक्रिया अवलंबण्यात आली नसल्यामुळे शासन आदेशाचे व धोरणाची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

6) सदर साहित्य पुरवठा आदेशामध्ये किंवा पुरवठादाराचे पुरवठा दरपत्रक, पुरवठा चलन किंवा पुरवठा बीजक यांपैकी कोणत्याही ठिकाणी पुरवठा करावयाच्या साहित्या बाबतचा तपशील/ स्पेसिफिकेशनचा (उदा. वस्तुची क्षमता, वस्तू तयार करण्याकरीता वापरावयाचे/ वापरण्यात आलेले मटेरियल,) उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे पुरवठा आदेशानुसार वस्तुंचा पुरवठा झाल्याची व वस्तूची किंमत वाजवी असल्याची पडताळणी करता आली नाही. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनाबरोबर शासकीय आय.टी.आय सांगली यांनी प्रमाणित केलेली कंटेनरच्या स्पेसिफिकेशनची प्रत जोडण्यात आली आहे. परंतु सदर झेरॉक्स प्रमाणित करण्यात आलेली नाही. तसेच ड्रॉईंगवर सक्षम प्राधिका-याची स्वाक्षरी व दिनांक नमुद नाही.

7) सदर पुरवठा आदेशामध्ये प्रती कंटेनर रुपये- 84000/- दराने खरेदी करण्यात आल्याचे दिसून येते. याबाबत पुरवठा आदेश, किंवा पुरवठादाराचे पुरवठा चलन किंवा बीजक यामध्ये वर नमूद केल्यानुसार स्पेसिफिकेशनचा उल्लेख करण्यात आलेला नाही. सदर कंटेनरचा दर स्पेसिफिकेशन अभावी वाजवी असल्याची खात्री करता येत नाही. तथापि सदर कंटेनरच्या पुरवठ्याबाबत, सांगली जिल्हयाच्या लगतच्या जिल्यातील कोल्हापूर महानगरपालिकेमध्ये खरेदी करण्यात आलेल्या कंटेनरच्या दराशी तुलना करता फार मोठी तफावत दिसून येते. कोल्हापूर महानगरपालिकेमध्ये अशाच प्रकारच्या कंटेनरकरिता खुल्या निविदा मागवून खरेदी करण्यात आलेल्या कंटेनरची किंमत प्रती कंटेनर रुपये 37800/- आहे. कंटेनरचे स्पेसिफिकेशन 3.5 घनमीटर क्षमता व 3 एमएम जाडीचा एम.एस पत्रा असे आहे. सांगली महानगरपालिकेने खरेदी केलेल्या कंटेनरचे स्पेसिफिकेशनबाबत उल्लेख नाही परंतु नस्तीमधील ड्रॉइंग नुसार कंटेनरची क्षमता 4.5 घनमीटर व 3 एमएम जाडीचा एम.एस पत्रा असे असून कंटेनरची किंमत

मात्र प्रती कंटेनर रुपये- 84000/- आहे. दोन्ही ठिकाणी बनविण्यात आलेल्या कंटेनरच्या मटेरियल मध्ये साधर्म्य आहे. मात्र कंटेनरच्या क्षमतेमध्ये 1 घनमीटर फरक आहे. सदर दोन्ही ठिकाणच्या दरांची तुलना करता कोल्हापूर महानगरपालिकेमध्ये खुल्या निविदा मागवून 3.5 घनमिटर क्षमतेचे कंटेनर रुपये- 37,800/- दराने खरेदी केलेले आहेत म्हणजेच त्याचा दर प्रती घनमीटर रु.10,800/- होतो. त्यानुसार महानगरपालिकेमध्ये खरेदी करण्यात आलेल्या 4.5 घनमीटर क्षमतेच्या कंटेनरची किंमत रुपये- 48,600/- प्रती कंटेनर होते. त्याऐवजी सांगली महानगरपालिकेमध्ये प्रती कंटेनर रु.84,000/- ने म्हणजेच सर्वसाधारणपणे रुपये 35,400/- प्रती नग एवढ्या जादा दराने खरेदी करण्यात आलेली आहे. विनानिविदा खरेदी पध्दती अवलंबिल्यामुळे अवाजवी दराने खरेदी करून महानगरपालिकेचे रु.35600 प्रती कंटेनर X 40 कंटेनर = रु.1424000/- चे नुकसान झाल्याचे दिसुन येते. 6 कप्प्याच्या घंटागाड्या 49 नग रु.20,000 प्रती नग प्रमाणे व लोखंडी ढकलगाड्या 55 नग रु.12,000 प्रती नग प्रमाणे विनानिविदा खरेदी करण्यात आल्या आहेत.

8) शासन निर्णय, दिनांक 2 जानेवारी 1992 मधील परिशिष्ट आठ परिच्छेद-8.4 मध्ये शासन परिपत्रक,दि. 14 ऑक्टोबर 1986 अन्वये भारतीय मानक संस्थेने चिन्हांकित केलेल्या वस्तु खरेदी करण्याविषयी आदेश दिले आहेत. चिन्हांकित नसलेल्या वस्तुची खरेदी लघुउद्योजकाकडून करण्यापूर्वी संबंधित विभागाने उद्योग संचालनालयातील भांडार खरेदी संघटनेकडून मानके ठरविली नसलेबाबतचे लेखी आदेश घेणे आवश्यक आहे. सदर साहित्य अचिन्हांकीत असल्याने नियमाप्रमाणे भांडार खरेदी संघटनेकडून मानके ठरविली नसलेबाबत लेखी आदेश घेणे आवश्यक असता ते न घेताच खरेदी करणेत आलेली आहे.

9) चिन्हांकित नसलेल्या वस्तुची खरेदी करताना मालाच्या दर्जाविषयी तपासणी संचालक,स्मॉल इंडस्ट्रीज सर्व्हीस इन्स्टिट्युट, कुर्ला-अंधेरी रोड, साकीनाका, मुंबई यांचेकडुन करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे साहित्य योग्य स्पेसिफिकेशनचे असलेबाबतचा तांत्रिक गुणवत्तेचा प्रयोगशाळा अहवाल न घेताच देयके पारित करण्यात आली असून त्याबाबत आरोग्य विभागाने खुलासा केलेला नाही. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये आलेले साहित्य स्पेसिफिकेशन नुसार असल्याची खात्री कार्यशाळा अभियंता यंत्रशाळा,सांगली मिरज महानगरपालिका यांनी केली असल्याचे नमुद आहे. परंतु वरील प्रयोगशाळेकडुन साहित्याची गुणवत्ता तपासणी केली नसल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.

**आक्षेपाधिन रक्कम :-** रु. 3576000/-

**वसुलपात्र रक्कम :-** जादा दराने कंटेनर खरेदी केलेची रक्कम रु.35600 प्रती कंटेनर X 40 कंटेनर = रु.1424000/-

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 75 | 14/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATBDMM5701 |
|---|---|

| 87 | घनकचरा व्यवस्थापनांतर्गत घेतलेल्या सफाई साहित्य खरेदीमधील अनियमिततेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | 13 वा वित्त आयोग. | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 12 | आरोग्य | केंद्र शासन | 9ब | 07 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 1100800 | | | |

स्थायी समिती ठराव क्र.82 दिनांक 29/05/2012 नुसार दिनावधी लागणार असल्याने व खरेदी तातडीची असल्याचे कारण नमुद करुन निविदा न मागविता साहित्य ,खरेदी करण्यास मंजूरी दिली आहे. वैद्यकीय अधिकारी यांनी दिनांक 1/9/2012 रोजी म्हणजे मंजूरी पासून तीन महिने विलंबाने पुरवठा आदेश दिले आहेत. पुरवठादाराने दि. 23/11/2012 अन्वये 3 महिने विलंबाने साहित्य पुरविले आहे. त्यामुळे साहित्य खरेदीची तातडीची आवश्यकता नसतानाही विशिष्ठ ठेकेदारास आर्थिक लाभ देण्यासाठी निविदा प्रक्रिया न राबविता विनानिविदा साहित्य खरेदी केल्याने महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ झाला नसल्याचे स्पष्ट होते.

13 व्या वित्त आयोगाच्या मंजूर निधीतून, सांगली-मिरज कुपवाड मनपा मधील आरोग्य विभागास घनकचरा व्यवस्थानांतर्गत साहित्य खरेदीसाठी उपलब्ध करण्यात आलेल्या निधीतून प्रमाणक क्र. 12, दिनांक 04/01/2013, रुपये- 10,00,000/- खर्चाचे लेखापरीक्षण करण्यात आले. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

**योजना :** 13 वित्त आयोग

**विभाग :** आरोग्य विभाग

**कामाचे नाव :** घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत साहित्य खरेदी

**महासभा ठराव :** क्र.232, दिनांक 02/03/2012

**स्थायी समिती ठराव :** क्र. 82 दिनांक 29/05/2012 ने मंजुरी

**प्रशासकीय मंजुरी :** मनपा आयुक्त

**पुरवठादाराचे नाव :** प्रेसाईस कट इंजिनिअरर्स, पुणे
**कामाचा करारनामा :** रुपये-200/- च्या मुद्रांक पेपरवर करण्यात आलेला आहे.
**पुरवठा आदेश :** 1) क्र. मनपा/आरोवि/ 6 /1/331/2012-13, दिनांक 01/09/2012.
(कामाचे आदेशानुसार कामाची मुदत 30 दिवस आहे.)
**पुरवठा तपशील :-**

| अनु.क्र | साहित्याचा तपशील | एकूण नग | दर प्रती नग रु. | एकूण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| 1. | लाँग हँडल ब्रूम | 288 | 350 | 1,00,800 |
| 2. | रबरी हँडग्लोज | 1000 | 315 | 3,15,000 |
| 3. | गम बूट | 1000 | 685 | 6,85,000 |
| **एकूण रुपये** | | | | **11,00,800** |

**साहित्याचा पुरवठा :** प्रेसाईस इंजिनिअरर्स, पुणे यांचे चलन क्र.07 दिनांक 23/11/2012 अन्वये वरील साहित्याचा पुरवठा करण्यात आला आहे.
**पुरवठा केलेल्या साहित्याचे प्रदान :** प्रमाणक क्र. 12, दिनांक 04/01/2013 अन्वये रुपये-10,00,000/- (रु. दहा लक्ष) करण्यात आले आहे.

सदर घन कचरा व्यवस्थापन साहित्य खरेदी प्रकरणाबाबत लेखापारीक्षाणाकरिता उपलब्ध करण्यात आलेली पत्रव्यवाहर नस्ती, महापालिका ठराव, स्थायी समिती ठराव, प्रमाणक इत्यादीची पडताळणी करून अर्धसमास ज्ञापन क्र.76, दि.14/7/2014 रोजी निर्गमित केला आहे. आरोग्य विभागाने त्याचे अनुपालन दि.27/10/2014 रोजी तीन महिने विलंबाने सादर केले असून दिलेल्या अनुपालनाचे अवलोकन करुन खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

**1)कामाचा करारनामा** : पुरवठा आदेश क्र.मनपा/आरोवि/6/1/331/2012-13 , दिनांक 01/09/2012 नुसार पुरवठादाराने रुपये 1100800 /- किंमतीचे साहित्य पुरवठा करावयाचे आहे. त्यानुसार पुरवठादाराबरोबर मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 च्या अनुच्छेद 63 प्रमाणे कार्यकंत्राट करताना पहिल्या रु.10 लाख रकमेवर रु.100/- व त्या पुढील रकमेवर प्रत्येक एक लाखाकरिता रु. 100/- प्रमाणे रुपये -300/- च्या मुद्रांक पेपरवर करार करणे आवश्यक आहे. परंतु सदर प्रकरणी रुपये-200/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करण्यात आला आहे. म्हणजेच रुपये-100/- रकमेचे शासनाच्या मुद्रांक शुल्काचे नुकसान झालेले आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये मुद्रांक शुल्क वसुल करण्याचे मान्य केले आहे.

2) निविदा न मागविता खरेदी :- सदर कामाच्या नस्तीमधील उपायुक्त(सांमिकृ)यांचे विषयपत्र दि.24/05/2012 अन्वये नगरसचिवाकडे स्थायी समितीच्या मंजुरीसाठी पाठविलेल्या प्रस्तावामध्ये उपरोक्त खरेदी ई टेंडर निविदाव्दारे खरेदी करण्याबाबत प्रस्तावित करण्यात आले आहे. परंतु स्थायी समिती ठराव क्र.82 दि.29/5/2012 नुसार इ टेंडरींग खरेदीसाठी प्रस्तावित साहित्य लाँग हँडल ब्रुम,रबरी

हँडग्लोव्हज,गमबूट खरेदीसाठी निविदा कार्यवाहीसाठी दिनावधी लागणार असल्याने व कर्मचा-यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने व दैनंदिन स्वच्छतेच्या कामाच्या दृष्टीने सदरचे साहित्य तातडीने घेणे आवश्यक असल्याने सदर साहित्याची खरेदी तातडीची बाब म्हणून या साहित्याचे अनुभवी पुरवठादार मे. प्रेसाईस कट इंजिनिअरर्स, पुणे यांचेकडून अंदाजपत्रकिय दराने विनानिविदा खरेदी करण्याबाबत मंजुरी देण्यात आली. त्यानुसार वैदयकीय आरोग्य अधिकारी (सांमिकु), यांचे वर्क ऑर्डर क्र. मनपा/आरोवि/ 6 /1/331/2012-13, दिनांक 01/09/2012. नुसार साहित्य पुरवठा करण्याचे आदेश तीन महिने विलंबाने ठेकेदारास दिले आहेत. यावरुन साहित्य खरेदीची तातडीची गरज नसताना तातडीच्या कारणास्तव विनानिविदा खरेदीस मंजूरी देवून विनानिविदा खरेदी केली आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील अनुसूची ड, प्रकरण 5 संविदा (2)(2) नुसार विना निविदा साहित्य मागविणे या तरतुदीचा गैरवापर केला आहे.

3) उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भांखसं-1088/2512/ उद्योग/6 दि.2 जाने.1992 मध्ये दिली आहे. त्यामधील परिच्छेद 7 नुसार दर ठरविताना बाजार भावाचा सारासार विचार करणे आवश्यक आहे. त्यानुसार बाजारामधुन खरेदी करावयाच्या वस्तुंची दरपत्रके विहित स्पेसिफिकेशन नुसार मागवुन दर निश्चित करुन निविदा मागविणे आवश्यक असता विनानिविदा नियमबाह्य खरेदी करणेत आली आहे. महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भाखस.1088/(2512)/ उद्योग-6, दिनांक 2 जानेवारी,1992 नुसार खरेदीबाबत अवलंब करावयाच्या पद्धतीबाबत सविस्तर आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. परंतु त्यानुसार कार्यवाही करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

4) स्थायी समिती ठराव दिनांक 29/05/2012 नुसार विनानिविदा खरेदीस मंजुरी दिल्यानंतर, वैद्यकीय अधिकारी यांनी दिनांक 1/9/2012 रोजी तीन महिने विलंबाने मे. प्रेसाईस कट इंजिनिअरर्स, पुणे यांना पुरवठा आदेश देवून त्यांनी चलन क्र. 7 दिनांक 23/11/2012 अन्वये साहित्य पुरविले आहे. त्यामुळे साहित्य खरेदीची तातडीची आवश्यकता नसतानाही विशिष्ठ ठेकेदारास आर्थिक लाभ देण्यासाठी निविदा प्रक्रिया न राबविता साहित्य खरेदी केल्याचे स्पष्ट होते. महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामागार विभाग, शासन निर्णय क्र. भाखस. 1088/ (2512)/ उद्योग-6, दिनांक 2 जानेवारी, 1992 नुसार सविस्तर निविदा प्रक्रियेचा अवलंब करून खरेदी करणे सहज शक्य असता विनानिविदा साहित्य खरेदी करण्यात आली आहे.

5) ठेकेदारास पुरवठा आदेश दि.01/9/12 रोजी दिला असुन साहित्य पुरविण्याची मुदत 30 दिवसाची दिली आहे. ठेकेदाराने साहित्य दि.23/11/12 रोजी म्हणजेच एकुण 54 दिवस विलंबाने पुरविले आहे. परंतु विलंबाबाबत नियमाप्रमाणे दंड आकारणे आवश्यक असता देयकामधुन दंड आकारण्यात आला नसल्याने दंडाच्या रक्कमेची परिगणना करुन वसुली करण्यात यावी. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये ठेकेदारास कार्यादेश दिल्यानंतर ठेकेदाराने साहित्याची अनुपलब्धता असल्याने तीन महिन्याची मुदतवाढ मागितल्याने त्यास मुदतवाढ देण्यात आल्याचे नमुद आहे. स्थायी समितीने साहित्याची खरेदी तातडीने करणे आवश्यक असल्याने विना विविदा साहित्य खरेदीचा आदेश दिला असताना ठेकेदारास नियमबाहयरित्या मुदतवाढ दिली आहे. यावरुन ठेकेदार तातडीने साहित्य पुरविण्यास सक्षम नसल्याचे दिसुन येते.

6) मे. प्रेसाईस कट इंजिनिअरर्स, पुणे, यांना खरेदी केलेले साहित्य पुरविण्याचा अनुभव असल्याची व

| |
|---|
| त्यांनी अन्य ठिकाणी तशाप्रकारे साहित्य पुरविल्या विषयीची प्रमाणपत्रे न घेताच साहित्य खरेदी करण्यात आली आहे. मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1948 नुसार संस्थेच्या नोंदणीचा दाखला नस्तीमध्ये नसल्याने धंद्याचे स्वरूप, धंद्याचे ठिकाणाचा पत्ता समजून येत नाही. पुरवठादार सदर साहित्याचे अधिकृत विक्रेते असल्याची कागदपत्रे नस्तीमध्ये नाहीत. त्यामुळे मे. प्रेसाईस कट इंजिनिअरर्स, पुणे, हे पुरवठा केलेल्या साहित्याचे अधिकृत विक्रेते असल्याची कोणतीही छाननी न करता त्यांच्याकडून विनानिविदा साहित्य खरेदी केल्याचे स्पष्ट होते.<br>7) ठेकेदाराकडुन साहित्य खरेदी केल्यानंतर साहित्याची नोंद स्टॉक बुकमध्ये केलेची नोंदवही व साहित्याचे वाटप सफाई कर्मचा-यांना कधी करण्यात आले याबाबतची वापर नोंदवही लेखापरीक्षणास दाखविण्यात आली नसल्याने खरेदी केलेले साहित्य वापरण्यात आले आहे किंवा नाही याची पडताळणी लेखापरीक्षणामध्ये करता आलेली नाही. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये स्टॉक बुक तपासुन घेण्याची कार्यवाही करीत असल्याचे नमुद आहे. परंतु स्टॉक बुक लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेले नाही.<br>**आक्षेपाधिन रक्कम :-** रु. 1100800/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 76 | 14/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATBDMM5701 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 88 | सुजल निर्मल योजनेंतर्गत अस्तित्वातील पाणीपुरवठा योजनेचे बळकटीकरण या कामामधुन झालेल्या **अतिप्रदाना** बाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | सुजल निर्मल योजना | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 06 | पाणी पुरवठा | राज्य शासन | 9ब | 04 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 4246586 | 15216 | | |

पाणीपुरवठा विभागाने सुजल निर्मल योजनेंतर्गत अस्तित्वातील पाणीपुरवठा योजनेचे बळकटीकरण करणे या कामाची मोजमाप पुस्तिकेमध्ये चुकीची मोजमापे लिहिल्याने ठेकेदारास रु. 15216/- चे अतिप्रदान झाले आहे.

सुजल निर्मल योजनेंतर्गत अस्तित्वातील पाणीपुरवठा योजनेचे बळकटीकरण करणे, बल्क मिटर बसविणे व योजना 24/7 अंतर्गत चालविणे कामाचे कंत्राटदार मे. तत्व ग्लोबल वॉटर टेक्नॉलॉजी, चेन्नई यांना देण्यात आले आहे. त्यांना प्रदान करण्यात आलेल्या साहव्या धावत्या देयकाचे (6 th Running bill) लेखापरीक्षण केले असता त्यामध्ये रुपये-15,216.31/- अतिप्रदान झाल्याचे दिसून येते.

**कामाचे नाव** : सुजल निर्मल योजनेंतर्गत अस्तित्वातील पाणीपुरवठा योजनेचे बळकटीकरण करणे बल्क मिटर बसविणे व योजना 24/7 प्रणाली अंतर्गत चालविणे.

**प्रशासकीय मंजुरी** : स्थायी समिती ठराव क्र.126, दिनांक 12/07/2010 अन्वये प्रशासकीय मान्यता आहे.

**अंदाजपत्रक रक्कम रुपये** - 8,32,06,000/-

**निविदा मंजुरी** : निविदा मंजुरी स्थायी समिती ठराव क्र.357 दिनांक 23/11/2010

**कंत्राटदार** : मे. तत्व ग्लोबल वॉटर टेक्नॉलॉजी, चेन्नई

**कामाची किंमत** रुपये :- अंदाजपत्रकीय किमतीच्या 13.50 टक्के जादा दराने रु. 9,44,38,810/-

**कामाची मुदत** : कामाची सुरवात 23/12/2010 पासून 12 महिने पावसाळ्यासहीत.

**कामाचे आदेश** : मनपा/पापुवि/सां/614/10-11, दिनांक 23/12/2010 (कामाची स्वीकृत निविदा क्र. बी-1/काअ/4/ 2010-11)

**प्रदानाचा तपशील** : वित्तीय वर्ष 2012-13, सहावे धावते देयक (6 th Running bill) प्रमाणक क्र. 01, दिनांक 22/05/2012 रुपये- 62,61,802/- मधून 20,00,000/- (वीस लाख) राखून ठेऊन रुपये-42,61,802/- प्रदान करण्यात आले आहे.

**मोजमाप पुस्तक** क्र. 21, पृ.क्र. 47 ते 61

सदर कामाचे 6 वे धावते देयक, मोजमाप पुस्तक क्र. 21 मधील पृ. क्र. 47 ते 61 वरिल नोंदी तपासणी केली असता लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1)देयकाचा नमुना : देयक नगरपालिका लेखा संहिता 1971, नियम 174(1) आणि 175 नमुना-131 मध्ये तयार करण्याऐवजी सदर लेखासंहितेच्या नियम 42(1) नमुना- 22 मध्ये तयार करण्यात आले आहे. देयक विहित नमुन्यात तयार करण्यात आलेले नाही तसेच मागील देयकातील परिमाण व रक्कम

चालु देयकात घेण्यात आली नाही. त्यामुळे मागील देयकापर्यंत प्रदान करण्यात आलेल्या परिमाणाची व रक्कमेची पडताळणी करता आली नाही.

2)प्रमाणक क्र.1 दिनांक 22/05/2012 रुपये- 62,61,802/- मधून खालीलप्रमाणे अतिप्रदान झाल्याचे दिसून आले.

**मोजमाप पुस्तक क्र. 21 पृष्ठ क्र. 49 :-**

बाब क्र. 4 - Excavation for foundation in soft rock etc. Complite (0 to 1.5) या बाबीची एकूण बेरीज 54.62 घन मीटर ऐवजी 56.62 लिहिण्यात आली आहे. त्यामुळे सदर बाबीच्या (56.62 - 54.62 = 2) 2 घ.मी. परिमाणाची रुपये-344.41 प्रती घन मीटर प्रमाणे (2 X 344.41=688.82) रक्कम रुपये- **688.82 अतिप्रदान** झाल्याचे दिसून येते.

**मोजमाप पुस्तक क्र. 21 पृष्ठ क्र. 50 :-**

बाब क्र. 1- Excavation for foundation/ pipe या बाबीचे परिमाण 0.15 x 1.30 x 1.1 = 0.21 घ.मी. ऐवजी 0.72 घ.मी. लिहिण्यात आलेले आहे. म्हणजेच (0.72 - 0.21=0.51) 0.51 घ.मी. परिमाण जादा लिहाण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर 0.51 घ.मी. परिमाणाची रुपये 105.55 प्रती घ.मी. प्रमाणे (0.51x105.55=53.83) रक्कम **रुपये 53.83 अतिप्रदान** झाल्याचे दिसून येते.

**मोजमाप पुस्तक क्र. 21 पृष्ठ क्र. 50 :-**

**बाब क्र. 4** : Excavation for foundation in soft rock etc. Complite(250x 250x 150 tee) या बाबीचे परिमाण 0.26 x 0.85 x 0.2=0.04 ऐवजी 28.98 लिहिण्यात आले आहे. म्हणजेच 28.94 घ.मी. (28.98 - 0.4 = 28.94) परिमाण जादा लिहिण्यात आले आहे. त्यामुळे सदर जादा परिमाणाची रुपये 341.41 प्रती घन मीटर प्रमाणे (28.94 x 341.41=988.40) **रक्कम रुपये 988.40 अतिप्रदान** झाल्याचे दिसून येते.

**मोजमाप पुस्तक क्र. 21 पृ.क्र. 51**

**बाब क्र. 1 :** Excavation for foundation/ pipe DMA-1 150 mm dia pipe या बाबीचे परिमाण 0.38x 0.75 x 0. 85=0.24 ऐवजी 0.50 लिहिण्यात आले आहे. म्हणजेच (0.50 - 0.24=0.26) 0.26 घ.मी. परिमाणाची रु.105.55 प्रती घ.मी. प्रमाणे (0.26 x 105.55=27.43)रक्कम **रुपये-27.43 एवढे अतिप्रदान** झाल्याचे दिसून येते.

**मोजमाप पुस्तक क्र. 21 पृ. क्र. 51**

**बाब क्र. 3 :** Excavation for foundation in hard murum या बाबीची एकूण परिमाणाची बेरीज 0.9+0.5+0.03+0.05+6.08+0.03+0.68+0.03+17.85+0.05+26.33= 52.08)52.08 होते. त्याऐवजी 72.08 घ.मी. लिहिण्यात आले आहे. म्हणजेच (72.58-52.08=20.00)20 घ.मी. परिमाण जादा

लिहिण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर जादा परिमाणाची रुपये-139.95 प्रती घ.मी. प्रमाणे (20x139.95=2799) **रक्कम रुपये-2799/- अतिप्रदान** झाल्याचे दिसून येते.

**<u>मोजमाप पुस्तक क्र. 21 पृ. क्र. 51</u>**

**बाब क्र. 1.** Excavation for foundation/ pipe DMA-1 200 dia. Pipe याबाबीचे परिमाण 29.00 x 0.85x0.85 =20.95 घ.मी. ऐवढे होते. परंतु त्याऐवजी 120.95 घ.मी. लिहिण्यात आले आहे. म्हणजे 100 घ.मी. जादा परिमाण लिहण्यात आलेले आहे. तसेच एकूण बेरीज 239.21 घ.मी. ऐवजी 239.90 घ.मी. म्हणजे 0.69 घ.मी. अशी एकूण 100.69 घ.मी. परिमाण चुकीचे लिहण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर बाबीचा दर 105.55 प्रती घ.मी. प्रमाणे (100.69x105.55=10,627.83) **रुपये 10,627.83 अतिप्रदान** झाल्याचे दिसून येते.

**<u>मोजमाप पुस्तक क्र. 21 पृ. क्र. 58</u>**

**बाब क्र. 26:** Replacement of G.I./ PVC pipe line याबाबीच्या एकूण परिमाणाची बेरीज (55.20+872.10+1009.30+731.00+664.00=3331.6) 3331.60 घ.मी. ऐवजी 3332.35 घ.मी. लिहिण्यात आलेली आहे. म्हणजेच 0.75 मिटर परिमाण जादा लिहिण्यात आले आहे. सदर बाबीचा दर रुपये 137.00 असून त्याच्या 30% प्रदान केले आहे. ते रुपये 31.00 होते (0.75x41=31.00) म्हणजेच **रुपये 31.00 अतिप्रदान** झाल्याचे दिसून येते.

**<u>मोजमाप पुस्तक क्र. 21 पृ. क्र. 58</u>**

**बाब क्र. 39 : Refilling the trench with available excavated stuff** या बाबीचे परिमाण 22946.92 मधून वजा परिमाण पृ.क्र. 21/56 वरील 813.18 घ.मी. परिमाण वजा करण्याऐवजी 813.54 घ.मी. म्हणजे 0.36 घ.मी. परिमाण जादा वजा करण्यात येऊन प्रदान करण्यात आलेले आहे. त्याची किमत **रुपये 20.68 अतिप्रदान** झाल्याचे दिसून येते.

**<u>मोजमाप पुस्तक क्र. 21 पृ. क्र. 53-54</u>**

**बाब क्र. 1 :** Excavation for foundation/ pipe याबाबीचे परिमाण 0.19x0.75x1.20=0.17 ऐवजी 0.18 म्हणजे 0.01 ने जादा परिमाण लिहिण्यात आलेले आहे. पृ.क्र.53-54 वर एकूण 16 ठिकाणी अशाप्रकारे जादा परिमाण लिहिण्यात आलेले आहे. म्हणजेच 0.16 घ.मी. परिमाण जादा लिहिण्यात आलेले आहे. सदर बाबीचा दर रुपये-105.55 प्रमाणे 16.89 वर कंत्राटदाराने देऊ केलेले 13.50 % जादाचा दर विचारात घेता रुपये 20.00 होतात. अशाच प्रकारे दशांशामध्ये 0.50 पेक्षा कमी येणारे अपूर्णांक सोडून देणे व 0.50 किंवा त्यापेक्षा वरील अपूर्णांक पुढील पूर्णांकात मिळविण्याची पद्धती आहे. परंतु सदर देयक पडताळणी मध्ये याबाबत दुर्लक्ष करण्यात आलेले दिसून आले आहे. वरीलप्रमाणे 9 प्रकरणी मोजमापे चुकीची लिहील्यामुळे रुपये 15,216.31/- **अतिप्रदान झाले आहे.**

| |
|---|
| 3)महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिशिष्ठ -24 मधील नियम क्र.13 नुसार, मोजमाप पुस्तकात नोंदविण्यात आलेली मोजमापे, देयक तयार केल्यानंतर मोजमाप पुस्तकात लाल शाईने तिरकी रेषा मारणे आवश्यक आहे. तसेच नियम 15 नुसार देयक मंजूर केल्यानंतर मोजमाप पुस्तकात दुसरी रेषा मारणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. मोजमाप पुस्तकात, प्रदान केल्यानंतर प्रदानाचा प्रमाणक क्र. दिनांक, धनादेश क्र. लिहिण्यात आलेला नाही. त्यामुळे देयकाचे दुबार प्रदान होण्याची शक्यता असते. परंतु त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.<br><br>4)कामाच्या आदेशानुसार कामाची मुदत 23/12/2010 पासून 12 महिने पावसाळ्यासहीत आहे. त्यामुळे कामाची मुदत दिनांक 22/12/2011 पर्यंतच आहे. सदर कामाची मोजमापे लिहिण्यात आल्याचा दिनांक नमूद नाही त्यामुळे देयक पारित केल्याचा दिनांक विचारात घेता सदर काम मुदतीत पूर्ण करण्यात आलेले नाही. त्यामुळे निविदा अट बी-1 क्लॉज-2 नुसार दंडनीय कार्यवाही करण्यात आलेली दिसून येत नाही. पाणीपुरवठा विभागाने दिलेल्या अनुपालनामध्ये आयुक्त मंजुरी आदेशानुसार दि.31/12/12 पर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याचे नमुद आहे. परंतु आयुक्त मंजुरी आदेश दाखविण्यात आला नाही.<br><br>अर्धसमास ज्ञापन क्र.117 दि.12/8/2014 रोजी निर्गमित केला असुन पाणीपुरवठा विभागाने त्याचे अनुपालन दि.26/9/2014 सादर केले आहे. अनुपालनामध्ये मोजमाप पुस्तकामध्ये चुकीची अंकगिणतीय परीगणना झाल्याने जादा दिलेल्या रक्कमेची वसुली पुढील देयकामधुन करण्यात येणार असल्याचे नमुद आहे.परंतु वसुली करुन लेखापरीक्षणास अनुपालन सादर केलेले नाही.<br>आक्षेपाधिन रक्कम :- रु. 4246586/-<br>वसुलपात्र रक्कम :- बाब क्र.1 ते बाब क्र. 9 ची जादा दिलेली रक्कम रु. 15216/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 117 | 12/08/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATBDMM5701 |

| | |
|---|---|
| 89 | सांगली वॉर्ड क्र.29 नेहरूनगर भागासाठी समृध्दीनगर क्लासिक पार्क हेडक्वॉटर समोर पाईपलाईन टाकणे या कामात झालेल्या अतिप्रदानाबाबत. |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव |

| | 13 वा वित्त आयोग . | | | | |
|---|---|---|---|---|---|
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 06 | पाणी पुरवठा | केंद्र शासन | 9ब | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 311157 | 17199 | | |

कामाच्या मोजमाप पुस्तकामधील बाब क्र. 1. मुरुम,मातीमध्ये खुदाई करणे इ. या कामाचे परिमाण 30 मी. X 0.70 मी. X 0.65 मी. =13.65 घन मीटर झाले आहे परंतु मोजमाप पुस्तकामध्ये त्याऐवजी 136.50 घ.मी. लिहिण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर कामामध्ये 122.85 घ.मी. कामाची जादा नोंद दाखविण्यात आली आहे. सदर 122.85 घ.मी. जादा कामाची रक्कम रुपये 140/- प्रती घ.मी. प्रमाणे **रुपये 17,199/-** झालेले **अतिप्रदान** ठेकेदाराकडुन वसुल करण्यात यावे.

13 वा वित्त आयोग मंजूर निधीतून पाणीपुरवठा विभागाकरिता उपलब्ध करण्यात आलेल्या रुपये 50 लक्ष रकमेतून करण्यात आलेल्या या कामाची लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध करणेत आलेली नस्ती, कामाचे देयक/रोख प्रमाणक क्र. 46, दिनांक 12/03/2013, रु.कामाची मोजमापे नोंदविण्यात आलेले मोजमाप पुस्तक क्र. 22 इत्यादी पडताळणी करण्यात आले त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

प्रशासकीय मंजुरी : आयुक्त आदेश क्र. मनपा/जामाशि/सां/804/12-13, दिनांक 12/12/2012.

अंदाजपत्रक : १) 6 कि.ग्रॅ. पाईप व स्पेशल पुरवठा रुपये- 1,62,553/-

२) लेबर (वॉल्व्हस् स्पेशल्स खोदकाम इत्यादी) रु. 168326/-

तांत्रिक मंजुरी : कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभाग मंजुरी बाब क्र. 32/2012-13, दिनांक 14/09/2012 अन्वये रुपये- 330879/- (म.जि.प्रा. पुणे विभाग दर अनुसूची 2011-12)

निविदा : वार्षिक दर करार. स्थायी समिती ठराव क्र. 51, दिनांक 02/05/2012 अन्वये मंजुरी

कामाचे आदेश : १) पाईप पुरवठा : मे.श्री. निवास इंडस्ट्रीज, सांगली. पुरवठा आदेश क्र.मनपा/ पापुवि/ सां/282/ 12-13, दिनांक 12/12/2012 (पुरवठा कालावधी आदेशाच्या दिनांका पासून १५ दिवस)

२) लेबर ( वॉल्व्ह स्पेशल्स खोदकाम इत्यादी) : मे. श्री. सुनील मानकापुरे.

कामाचे आदेश क्र.मनपा/पापुवि/सां/327/12-13, दिनांक 02/1/2013 (कामाचा कालावधी आदेशाच्या दिनांकापासून 60 दिवस )

कामाचे प्रदान १) पाईप पुरवठा : मे.श्री. निवास इंडस्ट्रीज यांना प्रमाणक क्र. 34, दिनांक 12/03/2013 रुपये-162553/- (वजाती: का.क.उक. रु. 1626, आयकर रु. 3251. (कामाचे मोजमाप : M.B.NO. 15/123, दिनांक 26/12/2012)

२) लेबर : (वॉल्व्हस् स्पेशल्स खोदकाम इत्यादी) : मे. श्री. सुनील मानकापुरे. यांना प्रमाणक क्र.46, दिनांक 30/03/2013, रुपये- 165803/- (वजाती : अनामत रु. 4145, का.क.उक. रु.1658, आयकर रु.1658, विमा रु.1658, व्हॅट रु. 2873) कामाची मोजमाप M.B.NO.22/80, दिनांक 28/02/2013

लेखा शीर्ष : 41256 - 13 वा वित्त विभाग

सदर कामाचे प्रमाणक क्र. 46, दिनांक 30/03/2013 व कामाची मोजपापे नोंदविण्यात आलेले मोजमाप पुस्तक क्र. 22 पृ.क्र. 80-82 चे लेखापरीक्षण करून अर्धसमास ज्ञापन क्र.118, दि.12/8/2014 रोजी निर्गमित केला असुन पाणीपुरवठा विभागाने त्याचे अनुपालन दि.16/10/2014 रोजी सादर केले आहे. दिलेले अनुपालन तपासून खालील अभिप्राय घेण्यात येत आहेत.

1.सदर कामाची लेबर सेक्शन कामाची मोजमापे मोजमाप पुस्तकात क्र.22, पृ. क्र. 80-82 वर नोंदविण्यात आलेली आहेत. त्यामधील बाब क्र. 1- मुरुम,मातीमध्ये खुदाई करणे इ. या कामाचे परिमाण 30मी. X 0.70मी. X 0.65 मी. =13.65 घन मीटर ऐवजी 136.50 घ.मी. लिहिण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर कामामध्ये (136.50 - 13.65 = 122.85) 122.85 घ.मी. कामाची जादा नोंद दाखविण्यात आली आहे. तसेच 122.85 घ.मी. जादा कामाची रक्कम रुपये 140/- प्रती घ.मी. प्रमाणे (122.85 x 140 =17199) **रुपये 17,199/- अतिप्रदान** झालेले आहे.

**आक्षेपाधिन रक्कम :-** रु. **311157/-**

**वसुलपात्र रक्कम :-** रु. **17,199/-**

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 118 | 12/08/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATBDMM5701 |
|---|---|

| 90 | सांगली वॉर्ड क्र.68, विठ्ठल नगर गल्ली नं. 6,7, हनुमाननगर गल्ली नं. 5 आणि आंबेडकर वाचनालय समोर पाईपलाईन टाकणे या कामाचे देयकातून झालेल्या अतिप्रदानाबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | 13 वा वित्त आयोग. | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 06 | पाणी पुरवठा | केंद्र शासन | 9ब | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 264330 | 2380 | | |

कामाच्या मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता बाब क्र.1-पाईपसाठी चर खुदाई करणे या बाबीचे परिमाण 70 घन मीटर ऐवजी 78.75 घ.मी. लिहिण्यात आलेले आहे. सदर 8.75 घ.मी. जादा कामाची रक्कम रुपये 140/- प्रती घ.मी. प्रमाणे **रुपये 1225/-** तसेच सदर कामाच्या परिमाणाची एकूण बेरीज 429.58 घ.मी. येते. परंतु मोजमाप पुस्तकात एकूण बेरीज 437.58 घ.मी. लिहिण्यात आलेली आहे. सदर 8.25 घ.मी. जादा कामाची रक्कम रुपये 140/- प्रती घ.मी. प्रमाणे **रुपये 1155/-** येते. त्यामुळे सदर बाबीमध्ये (1225 + 1155 = 2380) रक्कम **रुपये 2380/- अतिप्रदान** झाल्याचे दिसून येते.

13 वा वित्त आयोग मंजूर निधीतून पाणीपुरवठा विभागाकरिता उपलब्ध करण्यात आलेल्या रुपये 50 लक्ष रकमेतून करण्यात आलेल्या या कामाची लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध करणेत आलेली नस्ती, कामाचे देयक/रोख प्रमाणक क्र. 51, दिनांक 12/03/2013, कामाची मोजमापे नोंदविण्यात आलेले मोजमाप पुस्तक क्र.22 इत्यादी पडताळणी करण्यात आले त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

**प्रशासकीय मंजुरी** : आयुक्त आदेश क्र. मनपा/जामाशि/सां/804/12-13, दिनांक 12/12/2012

**अंदाजपत्रक** : १) ६ कि.ग्रॅ. पाईप व स्पेशल्स पुरवठा रुपये- 134098/-

२) लेबर (वॉल्व्हस्, स्पेशल्स खोदकाम इत्यादी) रु.132952/-

**तांत्रिक मंजुरी :** कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभाग मंजुरी बाब क्र. 36/2012-13, दिनांक 14/09/2012 अन्वये रुपये- 267050/- (म.जि.प्रा. पुणे विभाग दर अनुसूची 2011-12)

**निविदा :** वार्षिक दर करार. स्थायी समिती ठराव क्र. 51, दिनांक 02/05/2012 अन्वये मंजुरी

**कामाचे आदेश :** 1) पाईप पुरवठा : मे.श्री. निवास इंडस्ट्रीज, सांगली. पुरवठा आदेश क्र.मनपा/ पापुवि/ सां/ 288/12-13, दिनांक 02/12/2012 (पुरवठा आदेशाच्या दिनांका पासून 15 दिवस)

2) लेबर (स्पेशल्स खोदकाम इत्यादी) : मे.श्री.सुनील मानकापुरे.कामाचे आदेश क्र.मनपा/ पापुवि /सां/ 327/12-13, दिनांक 02/01/2013 (कामाचा कालावधी आदेशाच्या दिनांकापासून 60 दिवस )

**कामाचे प्रदान** 1) पाईप पुरवठा : मे.श्रीनिवास इंडस्ट्रीज यांना प्रमाणक क्र.29, दिनांक 12/03/2013 रुपये 134098/- (वजाती- कामगार कल्याण उपकर 1% रु. 1341/- व आयकर रु. 2682/-) (कामाचे मोजमाप : M.B.NO. 15/127-R, दिनांक 27/12/2012)

2) लेबर (वॉल्व्हस स्पेशल्स खोदकाम इत्यादी) : मे. श्री. सुनील मानकापुरे. यांना प्रमाणक क्र. 51, दिनांक 30/03/2013, रुपये- 132612/- (वजाती : अनामत रु. 3315, का.क.उक. रु.1326, आयकर रु.1326, विमा रु.1326, व्हॅट रु. 2259) कामाची मोजमापे : M.B.NO. 22/63,दि.16/01/2013

**लेखा शीर्ष : 41256 - 13 वा वित्त विभाग**

सदर कामाचे प्रमाणक क्र. 51, दिनांक 30/03/2013 व कामाची मोजमापे नोंदविण्यात आलेले मोजमाप पुस्तक क्र. 22 पृ.क्र. 63-64 चे लेखापरीक्षण करून अर्धसमास ज्ञापन क्र.119, दि.12/8/2014 रोजी निर्गमित केला असुन पाणीपुरवठा विभागाने त्याचे अनुपालन दि.16/10/2014 रोजी सादर केले आहे. सदर अनुपालन तपासून खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1. सदर कामाची लेबर सेक्शन कामाची मोजमापे, मोजमाप पुस्तकात क्र.22, पृ. क्र. 63-64 वर नोंदविण्यात आलेली आहेत. त्यामधील बाब क्र.1-पाईपसाठी चर खुदाई करणे. या कामाचे परिमाण 125 मी. X 0.70 मी. X 0.80 = 70 घन मीटर ऐवजी 78.75 घ.मी. लिहिण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर कामामध्ये (78.75 - 70 = 8.75) 8.75 घ.मी. कामाची नोंद जादा दाखविण्यात आल्याचे दिसून येते. सदर 8.75 घ.मी. जादा कामाची रक्कम रुपये 140/- प्रती घ.मी. प्रमाणे (8.75 X 140 =1225) **रुपये 1225/- अतिप्रदान** झालेचे दिसून येते. त्याचप्रमाणे सदर कामाच्या परिमाणाची एकूण बेरीज 429.58 घ.मी. येते परंतु मोजमाप पुस्तकात एकूण बेरीज 437.58 घ.मी. लिहिण्यात आलेली आहे. म्हणजेच (437.58 - 429.58 = 8.25) 8.25 घ.मी. जादा दाखविण्यात आली आहे. सदर 8.25 घ.मी. जादा कामाची रक्कम रुपये 140/- प्रती घ.मी. प्रमाणे (8.25 X 140 = 1155) **रुपये 1155/- अतिप्रदान** झाल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर बाबीमध्ये (1225 + 1155 = 2380) रक्कम **रुपये 2380/- अतिप्रदान** झाल्याचे दिसून येते. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये रु.2380/- चे अतिप्रदान झाल्याचे मान्य केले आहे. परंतु रक्कम वसुल केलेली नाही.

| |
|---|
| आक्षेपाधिन रक्कम :- रु. **264330/-**<br><br>वसुलपात्र रक्कम :- रु. **2380/-** |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 119 | 12/08/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATBDMM5701 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 91 | सुजल निर्मल योजनेंतर्गत अस्तित्वातील पाणीपुरवठा योजनेचे बळकटीकरण करणे कामाच्या प्रमाणक क्र.9 , मध्ये अतिप्रदान झाल्याबाबत | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | सुजल निर्मल अभियान योजना | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 06 | पाणी पुरवठा | राज्य शासन | 9ब | 07 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 1025751 | 6149 | | |

| |
|---|
| अस्तित्वातील पाणीपुरवठा योजनेचे बळकटीकरण करणे या कामाचे मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणी केली असता सातवे धावते देयकामध्ये रुपये 5207.55 + 941.70 = 6149.25 चे अतिप्रदान व रुपये 83390 +3961872.40 + 6,21,225 = 10,25,751.40 च्या मोजमापांबाबत सविस्तर नोंदी मोजमाप पुस्तकामध्ये आढळून येत नसल्याने त्यांच्या प्रदानाबाबत खात्री करता येत नाही. |

| |
|---|
| सुजल निर्मल योजनेंतर्गत अस्तित्वातील पाणीपुरवठा योजनेचे बळकटीकरण करणे, बल्क मिटर बसविणे व योजना 24/7 अंतर्गत चालविणे कामाचे कंत्राटदार मे. तत्व ग्लोबल वॉटर टेक्नॉलॉजी, चेन्नई यांना देण्यात आले आहे. |

**कामाचे नाव :** सुजल निर्मल योजनेंतर्गत अस्तित्वातील पाणीपुरवठा योजनेचे बळकटीकरण करणे बल्क मिटर बसविणे व योजना 24/7 प्रणाली अंतर्गत चालविणे.

**प्रशासकीय मंजुरी :** स्थायी समिती ठराव क्र.126, दिनांक 12/07/2010 अन्वये प्रशासकीय मान्यता आहे.

**अंदाजपत्रक रक्कम** रुपये- 8,32,06,000/-

**निविदा मंजुरी :** निविदा मंजुरी स्थायी समिती ठराव क्र.357 दिनांक 23/11/2010

**कंत्राटदार :** मे. तत्व ग्लोबल वॉटर टेक्नॉलॉजी, चेन्नई

**कामाची किमत** रुपये- अंदाजपत्रक पत्रक किमतीच्या 13.50 टक्के जादा दराने रु. 9,44,38,810/-

**कामाची मुदत :** कामाची सुरवात 23/12/2010 पासून 12 महिने पावसाळ्यासहीत.

**कामाचे आदेश :** मनपा/पापुवि/सां/614/10-11, दिनांक 23/12/2010 (कामाची स्वीकृत निविदा क्र. बी-1/काअ/4/ 2010-11)

**प्रदानाचा तपशील :** वित्तीय वर्ष 2012-13, सातवे, धावते देयक (7th Running bill)

प्रमाणक क्र. 09 दिनांक 10/09/2012 रुपये- 35,58,476/-

कामाची नस्ती ,मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.133 दि.16/09/2014 निर्गमित करण्यात आला असून पाणीपुरवठा विभागाने त्याचे अनुपालन दि.16/10/2014 रोजी लेखापरीक्षणास सादर केले आहे. दिलेले अनुपालन तपासून खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)बाब क्र. 12 : डी आय स्पेशल्स टी.पी. 200 एमएम 3 x 26 = 78 नग ऐवजी 138 नग लिहिण्यात आलेले आहेत. एकूण वजन 13.79 ऐवजी 14.39 म्हणजे 0.60 कि. ग्रॅ. जादा लिहिण्यात आले आहे. त्यामळे **रुपये 5207.55 अतिप्रदान** करण्यात आलेले आहे (0.60 x 7646.91(दर) = 4588.15 + 619.40(13.50% जादा) = 5207.55) (मोजमाप पुस्तक क्र. 21 पृ. क्र. 77) .अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये जादा अदायगी रक्कम वसुल करण्याचे मान्य केले आहे. परंतु रक्कम वसुल करण्यात आलेली नाही.

2)बाब क्र. 35 : डिस्पोजल ऑफ सरप्लस एक्सॅव्हेटेड स्टफ- परिमाण (6.76 + 5.24 + 9.26 + 26.19 = 47.45) 47.45 घ.मी. ऐवजी 50.45 घ.मी. तसेच 47.45 + 9.79 + 113.20 =170.44 घ.मि. ऐवजी 173.52 घ.मि. म्हणजेच 3.08 घ.मी. परिमाण जादा लिहिण्यात आले आहे. त्यामळे 3.08 x 269.37(दर)+ 13.50%(जादा) = **941.70 रुपये अतिप्रदान** करण्यात आलेले आहे. (मोजमाप पुस्तक क्र. 21 पृ. क्र. 80) . अनुपालनामध्ये जादा प्रदान रक्कम वसुल करण्याचे मान्य केले आहे. परंतु रक्कम वसुल करण्यात आलेली नाही.

3)बाब क्र. 6(d) प्रोव्हायडिंग डी आय पाईप 300 मी.मी. व्यास मोजमाप पुस्तकातील 21/82 वरील गोषावाऱ्यात (आज पर्यंत 678, पूर्वी अदा केलेली 587, आता अदा करावयाची 90.07 अशी नोंद आहे. परंतु अदा करावयाच्या परिमाणाची 90.07 घ.मी. ची नोंद मोजमाप पुस्तकात आढळून येत नाही. कारण त्याचा गोषवाऱ्यामध्ये पृष्ठ क्रमांक लिहिण्यात आलेला नाही. त्यामुळे सदर बाबीचा दर 925.82 (3086.08 च्या 30 %) प्रमाणे 90.07 x 925.82 = 83,390/- रुपये जादा प्रदान संभवते. (मोजमाप

पुस्तक क्र. 21 पृ. क्र. 82)

4)बाब क्र. 6 प्रोव्हायडिंग डी आय पाईप @ 50% मोजमाप पुस्तक क्र. 21 पृ. क्र. 26 (गोषवारा) वर आज पर्यंत 6158, पूर्वी अदा केलेली “निरंक”, आता अदा करावयाची “निरंक” रुपये 39,61,872.40 अशी नोंद आहे. मात्र पूर्वी अदा केलेला मोजमाप पुस्तकाचा संदर्भ लिहण्यात आलेला नाही. त्यामुळे सदर नोंदीबाबत खुलासा होत नाही.

5)बाब क्र. 6 प्रोव्हायडिंग डी आय पाईप 150 एमएम @ 30% आज पर्यंत 1361.47, पूर्वी अदा केलेली 1067.97, आता अदा करावयाची 293.50 अशी नोंद मोजमाप पुस्तकातील गोषवाऱ्यात आहे. परंतु तपशीलवार मोजमापांचा पृष्ठ क्र. लिहिण्यात आलेला नाही त्यामुळे सदर नोंदीची लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. (मोजमाप पुस्तक क्र. 21 पृ. क्र. 82) रक्कम रुपये 62,21,225/-
(1361.47 x 1520.98/ 456.29(30%) = 621225/-

वरीलप्रमाणे सातवे धावते देयकामध्ये रुपये 5207.55 + 941.70 = 6149.25 अतिप्रदान व रुपये 83390 +3961872.40 + 6,21,225 = 10,25,751.40 च्या मोजमापांबाबत मोजमाप पुस्तकामध्ये सविस्तर नोंदी आढळून येत नसल्याने त्यांच्या प्रदानाबाबत खात्री करता येत नाही.

6)देयकाचा नमुना : देयक नगरपालिका लेखा संहिता 1971, नियम 174(1) आणि 175 नमुना-131 मध्ये तयार करण्याऐवजी सदर लेखासंहितेच्या नियम 42(1) नमुना-22 मध्ये तयार करण्यात आले आहे. देयक विहित नियमानुसारच्या नमुन्यात तयार करण्यात आलेले नसल्यामुळे मागील देयकापर्यंत प्रदान करण्यात आलेल्या परिमाणाची(quantity) रक्कमेची पडताळणी करणे अवघड होते. तसेच मागील देयकातील परिमाण(quantity) व रक्कम चालु देयकात घेण्यात आली नाही तर तेवढ्या परिमाणाच्या रकमेचे अतिप्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

7)महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिशिष्ठ -24 मधील नियम क्र.13 नुसार, मोजमाप पुस्तकात नोंदविण्यात आलेली मोजमापे देयक तयार केल्यानंतर मोजमाप पुस्तकात लाल शाईने तिरकी रेषा मारणे आवश्यक आहे. तसेच नियम 15 नुसार देयक मंजूर केल्यानंतर मोजमाप पुस्तकात दुसरी रेषा मारणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे दुबार प्रदान होण्याची शक्यता आहे मोजमाप पुस्तकात, प्रदान केल्यानंतर प्रदानाचा प्रमाणक क्र. दिनांक, धनादेश क्रमांक लिहिण्यात आलेला नाही. त्यामुळे दुबार प्रदान होण्याची शक्यता असते. परंतु त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

आक्षेपाधिन रक्कम रु.1025751/-

| |
|---|
| वसूलपात्र रक्कम :- रु.5201.55/- + रू.941.70 = रु. 6149.25 /- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 133 | 16/09/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATBDMM5701 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 92 | सुजल निर्मल अभियानांतर्गत अस्तित्वातिल वितरण व्यवस्था बळकटीकरण करणे बल्क मीटर बसविणे व योजना 24/7 प्रणाली अंतर्गत चालविणे (पॅकेज क्र.2.1 व 2.3) | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | सुजल निर्मल अभियान योजना | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 06 | पाणी पुरवठा | राज्य शासन | 9ब | 11 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 13404995 | | | |

कामाची निविदा काढण्यापूर्वी सविस्तर निविदा (DTP) वर्किंग एस्टिमेट तयार करून त्याला प्रशासकीय मंजुरी/ तांत्रिक मंजुरी न घेता निविदा मागवुन काम केलेले आहे. प्रस्तुत कामातील निविदा बी-3 देखभाल दुरुस्ती 24/7 प्रणाली अंतर्गत रुपये 1,34,04,995/- कामाचा समावेश डीपीआर मध्ये नाही. तसेच या कामाला प्रशासकीय, तांत्रिक मंजुरी घेण्यात आलेली नाही. 10 वे चालु देयका अखेरपर्यंत रुपये 6,36,46,687/- एवढे प्रदान झालेले असून अद्याप अंदाजे रुपये 1,55,77,454/- चे काम शिल्लक आहे. रकमेच्या गुणोत्तरा नुसार अंदाजे 20 % काम शिल्लक असल्याने आतापर्यंत खर्ची पडलेली रक्कम रुपये 6,36,46,687/- निष्फळ गुंतून राहिलेली आहे.

महाराष्ट्र शासन ,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र. सुनिअ- 2010/ प्र.क्र.460/ पापु-22, दिनांक 23 नोव्हेंबर, 2010 अन्वये महाराष्ट्र सुजल निर्मल अभियानांतर्गत सांगली मिरज आणि

कुपवाड शहर महानगरपालिकेच्या 24/7 पाणीपुरवठा योजनेच्या रुपये 29.85 कोटी ढोबळ किंमतीच्या भाग-अ मधील 13 कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सदर दिनांक 23 नोव्हेंबर, 2010 च्या शासन निर्णयातील आशयानुसार, महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचे 50 वर्ष पूर्ण होण्याच्या निमित्ताने नागरी पाणीपुरवठा, मलनिःसारण, शौचालय बांधकाम व घनकचरा व्यवस्थापन संदर्भात पर्याप्त, गुणवत्तापूर्ण सेवा, किफायतशीर सेवा शुल्कात उपलब्ध करून देणे व विविध तांत्रिक, आर्थिक व व्यवस्थापकीय सुधारणा करण्याचे उध्दिष्ट निर्धारित करून ते साध्य करण्यासाठी महाराष्ट्र सुजल निर्मल अभियान राबविण्याचा महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र. नापापु 2008/ प्र.क्र.1/ पापु 22, दिनांक 22 ऑक्टोबर, 2008 अन्वये शासनाने निर्णय घेतला असल्याने सदर शासन निर्णयातील परिशिष्ट-1 मधील विहित सुधारणात्मक उपाययोजना स्वीकारणे व त्या पूर्ण करणे तसेच वाढीव अनुदान प्राप्त करण्यासाठी सर्वसाधारण सभेचा ठराव करून राज्य शासनाशी करार करावयाचा आहे. त्यानुसार आयुक्त, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांनी शहरामध्ये पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी पाणीपुरवठा योजनेचा रुपये 49.20 कोटी किंमतीचा प्रस्ताव भाग-अ व भाग-ब मध्ये शासनास सादर केला असून दिनांक 22 ऑक्टोबर, 2008 अन्वये शासन निर्णयातील परिशिष्ट-1 मधील विहित सुधारणात्मक उपाययोजना स्वीकारणे व त्या पूर्ण करणेबाबत शासनाबरोबर करार केला केला असुन, राज्यस्तरीय सनियंत्रण व समन्वय समितीने सदर प्रस्तावास मंजुरी दिलेली असल्याने सदर बाबींचा विचार करून महाराष्ट्र सुजल निर्मल अभियानांतर्गत सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या 24/7 पाणीपुरवठा योजनेच्या रुपये 29.85 कोटी ढोबळ किंमतीच्या भाग-अ मधील 13 कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

अस्तित्वातील वितरण व्यवस्था बळकटीकरण करणे, बल्क मीटर बसविणे व योजना 24/7 प्रणाली अंतर्गत चालविणे या कामाच्या अंदाजित रक्कम रुपये 8,32,05,995/- किंमतीच्या कामाचे लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध करण्यात आलेले निविदा विषयक नस्ती, कागदपत्रांची पडताळणी केली त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रात सुजल निर्मल अभियान राबविण्याबाबत सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेने महासभा ठराव क्र. 102, दिनांक 18 डिसेंबर, 2008 अन्वये ठराव मंजूर करून आयुक्तांना यासंदर्भात महाराष्ट्र शासनाबरोबर करार करण्याबाबत अनुमती देण्यात आली आहे.

सुजल निर्मल अभियान योजनेंतर्गत करावयाच्या कामांकरिता 6 पॅकेज मध्ये एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट व्दारे इच्छुक कंत्राटदारांकडून शॉर्टलिस्ट बनविण्याकरिता निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याकरिता दैनिक इंडियन एक्सप्रेस व दैनिक पुढारी या वर्तमान पत्रांमध्ये दिनांक 27/03/2010 रोजी जाहिरात देण्यात आली होती. दिनांक 27/04/2010 पर्यंत इच्छुक कंत्राटदारानी आपला एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट कळवावयाचा होता. त्यानुसार कंत्राटदारानी आपला एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट कळविल्यानंतर शॉर्टलिस्ट बनविण्यात आली. मूळ प्रस्तावानुसार 6 पॅकेज मध्ये निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतु

शॉर्टलिस्टिंग, गुणवत्ता, तांत्रिक क्षमता विचारात घेऊन 6 पॅकेजच्या कामांचे 3 गट तयार करण्यात आले. सदर कामाच्या 1) मे. व्हीओलिया वॉटर इंडिया लि. न्यु दिल्ली 2) मे. कॅसकल एन व्ही इंडिया मुंबई 3) मे. एस एन जी तत्व ग्लोबल चेन्नई 4) मे. प्रतिभा सॅलकॉन मुंबई या चार पात्र ठेकेदारांना लेटर ऑफ इन्व्हिटेशन क्र. 259/10-11 दिनांक 2/08/2010 अन्वये निविदा फॉर्म (Bid-doघनमीटरent) विकत घेण्याबाबत कळविण्यात आले. निविदा फॉर्म (Bid-doघनमीटरent) वितरण दिनांक 2/08/2010 ते 16/08/2010, प्री-बीड मिटिंग 11/08/2010, निविदा फॉर्म सादर दिनांक 23/08/2010 (दुपारी 4 वाजे पर्यंत), निविदा उघडणे दिनांक 24/08/2010 (दुपारी 12 वाजता) होता. सदर कामामध्ये पुढीलप्रमाणे कामांचा समावेश करण्यात आलेला होता. 1) अस्तित्वातील पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेचे बळकटीकरण रु. 603.91 लक्ष 2) बल्क मीटर बसविणे रु. 94.10 लक्ष 3) दुरुस्ती व परिरक्षण 24/7 प्रणाली अंतर्गत करणे एकूण कामाची किमत रुपये 832.06 लक्ष. निविदा सूचनेनुसार दिनांक 11/08/2010 रोजी प्री-बीड मिटिंग मध्ये निविदादारानी उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर चर्चा झाली त्यामध्ये प्रामुख्याने निविदा सादर करण्याचा कालावधी वाढवून देण्याबाबत सूचना करण्यात आली. त्यामध्ये मे. व्हीओलिया वॉटर इंडिया लि. न्यु दिल्ली यांनी आणखी 8 आठवडे मुदत वाढविण्याची सूचना केली त्यानुसार 4 आठवडे मुदतवाढ दिनांक 24/09/2010 पर्यंत देण्यात आली. मुदतवाढ दिनांकापर्यंत फक्त 1 (एक) निविदादारने मे. एस एन जी तत्व ग्लोबल चेन्नई यांनी निविदा सादर केली.

प्रस्तुत कामासाठी प्राप्त झालेली मे. एस एन जी तत्व ग्लोबल चेन्नई यांची एकच निविदा प्राप्त झाल्याने सदर निविदा उघडण्यात आली असता ती निविदा कामाच्या किमतीच्या 14 टक्के जादा दराने असल्याने निविदादाराबरोबर वाटाघाटी करून 0.05 टक्के कमी करून शिफारस करण्यात आली.

प्रस्तुत कामाचे अंदाजपत्रक नोव्हेंबर 2009 च्या दरसुचीवर आधारित असून राज्य व केंद्र शासनाच्या सुधारित धोरणानुसार व्हॅट कर, कामगार कल्याण निधी, रॉयल्टी, एक्ससाईज ड्यूटी या बाबींचा विचार करता चालू दरसूचीनुसार 9.58 टक्के जादा होत असल्याचा अभिप्राय देऊन स्थायी समिती ठराव क्र. 357, दिनांक 23/11/2010 अन्वये मंजुरी देण्यात आली आहे.

कामाचे आदेश क्र. मनपा/ पापुवि/ सां/ 614/ 10-11, दिनांक 23/12/2010 अन्वये देण्यात आले आहेत. पुरवठा आदेशामध्ये कामाची मुदत 12 महिने दिनांक 23/12/2010 पासून सुरु झाल्याचे नमुद आहे. परंतु कामाचा करारनामा दिनांक 15/12/10 रोजी करण्यात आलेला असून करारामध्ये “ आमचा आणि अन्य एका ठेकेदाराचा वाटाघाटीनंतर कमीचा म्हणजे एस्टिमेट पेक्षा 13.50 टक्के जादा असा उल्लेख आहे. कामाची मुदत कार्यादेश मिळाल्यापासून 18 महिने आहे. कामाच्या मुदतीबाबत विसंगती दिसुन येते. याबाबत पाणीपुरवठा विभागाने खुलासा केलेला नाही.

प्रस्तुत कामाची लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करण्यात आलेली पत्रव्यवहार नस्ती, निविदा दस्तऐवज तपासणी करून अर्धसमास ज्ञापन क्र.134 दि.16/09/2014 रोजी निर्गमित केला असुन पाणीपुरवठा विभागाने त्याचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर केलेले नाही. सदर कामामध्ये खालीलप्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

1)महाराष्ट्र शासन ,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र. सुनिअ- 2010/ प्र.क्र.460/ पापु-22, दिनांक 23 नोव्हेंबर, 2010 अन्वेय प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या शासन निर्णयामध्ये पाणीपुरवठा योजनेचा रुपये 49.20 कोटी किंमतीचा प्रस्ताव भाग-अ व भाग-ब मध्ये सादर केला आहे असा उल्लेख आहे. परंतु लेखापरीक्षणाकरिता महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत 21 कामांचा रुपये 54.00 कोटी किंमतीचा सविस्तर प्रकल्प आराखडा (DPR) उपलब्ध करण्यात आला आहे. प्रस्तुत कामाचा रुपये 49.20 कोटी किंमतीचा प्रस्ताव लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आलेला नाही.

2)तांत्रिक मंजुरी : सदर डीपीआर मधील कामांना तांत्रिक मंजुरी घेण्यात आल्याचे तांत्रिक मंजुरीचे आदेश लेखापरीक्षणा करिता उपलब्ध करण्यात आलेले नाहीत.

3) महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत 21 कामांचा रुपये 54.00 कोटी किंमतीचा सविस्तर प्रकल्प आराखडा (DPR) ,सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाला सादर करण्यात आलेला प्रस्ताव लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आलेला नाही.

4)प्रस्तुत कामाच्या निविदेनुसार कामाची विभागणी 3 भागांमध्ये करण्यात आलेली आहे.

1) निविदा बी-1 रुपये 6,03,91,000/- अस्तित्वातील कामाचे बळकटीकरण करणे

२) निविदा बी-2 रुपये 94,10,000/- बल्क मीटर बसविणे

3) निविदा बी-3 रुपये 1,34,04,995/- देखभाल दुरुस्ती 24/7 प्रणाली अंतर्गत चालविणे (या कामाचा समावेश डीपीआर मध्ये करण्यात आलेला नाही)

एकूण --------------- 8,32,05,995/-

अ) सदर कामाची निविदा काढण्यापूर्वी सविस्तर निविदा (DTP) वर्किंग एस्टिमेट तयार करून त्याला प्रशासकीय मंजुरी/ तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक होते. परंतु प्रस्तुत कामाकरिता मंजुरी न घेता निविदा मागविण्यात येऊन काम करण्यात आलेले आहे.

ब) प्रस्तुत कामातील निविदा **बी-3 देखभाल दुरुस्ती** 24/7 प्रणाली अंतर्गत रुपये 1,34,04,995/- कामाचा समावेश डीपीआर मध्ये नाही किंवा सदर कामाला प्रशासकीय, तांत्रिक मंजुरी घेण्यात आलेली नाही.

वरील बाबींची पुर्तता करण्यात आली नसल्यामुळे प्रस्तुत कामावरील खर्च रु.13404995/- अक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

5)निविदेमधील खालील कामांचा समावेश डीपीआर मध्ये नाही.

1) बाब बी-1 - 48 : CI / DI पाईप दुरस्ती इत्यादी रुपये 120000/-

2) बाब बी-1 - 50 : डिटेक्टिंग अंडरग्राउंड सर्व्हीसेस रुपये 1,66,239/-

3) बाब बी-1 - 51 : टेक्नीकल सर्व्हीसेस रुपये 15,00,000/-

4) बाब बी-2 - 06 : आय.एस.आय (ISI) प्रमाणित एम.एस स्पेशल्स रुपये 98722/-

5) बाब बी-2 - 13 : 100 एमएम ते 250 एमएम व्यासाचे इलेक्ट्रो मॅग्नेटिक फ्लो मीटर रुपये 18,42,047/-

(171547+184391+368781+875674+241654 = 1842047)

6) बाब बी-2 - 14 : अल्ट्रा सोनिक फ्लो मीटर रुपये 3,52,573/- प्रती मीटर प्रमाणे 3 नग मीटर करिता डीपीआर मध्ये मंजुरी आहे. परंतु निविदेमध्ये 6 नग मीटर दाखविण्यात आले आहेत. म्हणजे मंजुरीपेक्षा 3 नग मीटर रुपये 10,57,719/- निविदेमध्ये जादा दाखविले आहेत.

डीपीआर मध्ये समावेश नसलेल्या वरील बाबींबाबत सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद 132 नुसार **प्रशासकीय मान्यता व** परिच्छेद 135 नुसार तांत्रिक मंजुरी घेतली नसताना निविदेमध्ये समावेश केला आहे.

6) वर्किंग एस्टिमेट : प्रस्तुत कामाची निविदा मागाविण्यापुर्वी सविस्तर वर्किंग एस्टिमेट तयार करण्यात येऊन त्याला प्रशासकीय, तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक होते परंतु तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

7) करारनामा : प्रस्तुत कामाबाबत कंत्राटदाराबरोबरच्या करारामध्ये आमचा आणि अन्य एका ठेकेदाराचा वाटाघाटीनंतर कमीचा म्हणजे एस्टिमेट पेक्षा 13.50 टक्के जादा दराचा असा उल्लेख आहे. तसेच निविदेमध्ये व कामाच्या आदेशामध्ये कामाची मुदत 12 महिने आहे. परंतु करारपत्रात कामाची मुदत ऑर्डर मिळाल्यापासून 18 महिने नमूद करण्यात आली आहे. सदर विसंगती बाबत खुलासा होत नाही.

8) निविदेनुसार/ कामाच्या आदेशानुसार कामाची मुदत दिनांक 23/12/2010 पासून 12 महिने म्हणजे 22/12/2010 रोजी समाप्त होते. परंतु सदर कालावधीत काम पूर्ण झालेले नाही. लेखापरीक्षण कालावधी माहे मार्च 2013 पर्यंत काम पूर्ण झालेले नाही. त्यामुळे सदर निविदादार कामाला विलंब झाल्यामुळे निवदा अट बी-2 नुसार 1% दरापर्यंत दंडनीय रकमेस पात्र आहेत. तथापि त्यानुसार दंडनिय कारवाई केलेली नाही.

9)निविदा क्लॉज 6 नुसार कामाच्या मुदतवाढी बाबत कंत्राटदाराने मुदत संपण्यापूर्वी 30 दिवस अगोदर मुदतवाढी बाबत लिखित स्वरूपात अर्ज करणे आवश्यक आहे परंतु सदर प्रकरणी मुदतवाढी बाबत कंत्राटदाराकडून निवेदन करण्यात आलेले नाही. त्यामुळे मुदतवाढीबाबतचा तपशिल उपलब्ध नस्तीमध्ये आढळून आलेला नाही.

10)मंजूर निविदे नुसार प्रस्तुत कामाच्या अंदाजपत्रकीय रुपये 8,32,06,000/- च्या 13.50 टक्के जादा

| |
|---|
| दराने म्हणजेच रुपये 9,44,38,810/- रकमेला काम देण्यात आलेले आहे. त्यापैकी दुरुस्ती व परिरक्षणाची रक्कम रुपये 1,52,14,669/- (1,34,04,995+1809674 = 15214669) रक्कम वजा जाता रुपये 7,92,24,141/- (94438810-15214669 = 79224141) चे काम होणे आवश्यक होते. परंतु लेखापरीक्षण कालावधी मार्च 2013 पर्यंत 10 वे चालु देयक ($10^{th}$ R.A. Bill) अदा करण्यात आलेले आहे. 10 वे चालु देयका अखेरपर्यंत रुपये 6,36,46,687/- एवढे प्रदान झालेले असून अद्याप अंदाजे रुपये 1,55,77,454/- चे काम शिल्लक आहे. त्यामुळे रकमेच्या गुणोत्तरा नुसार अंदाजे 20 % काम शिल्लक आहे. त्यामुळे 10 वे चालु ($10^{th}$ R.A. Bill) देयकाअखेरपर्यंत खर्ची पडलेली रक्कम रुपये 6,36,46,687/- विनाकारण निष्फळ गुंतून राहिलेली आहे.<br><br>11)प्रस्तुत कामाचा कालावधी दिनांक 22/12/2011 ला संपलेला असून त्यापुढे सुमारे 16 महिने पर्यंत सुद्धा काम पूर्ण झालेले नाही. त्यामुळे प्रस्तुत कामावर वरीलप्रमाणे रुपये 7,92,24,141/-पैकी रुपये 6,36,46,687/- म्हणजे 80% खर्च करून ही कामाचा उद्देश साध्य झालेला नसून सदर कामाच्या अंमलबजावणीमध्ये योग्य नियोजनाचा अभाव असल्याचे दिसून येते.<br><br>आक्षेपाधिन रक्कम रु. 13404995/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 134 | 16/09/2010 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATBDMM5701 |
|---|---|

| 93 | 10 द.ल.लि. क्षमतेचे अपारंपारिक मिरज जलशुध्दीकरण केंद्र बांधणे कामातील अनियमिततांबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | सुजल निर्मल अभियान योजना | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 06 | पाणी पुरवठा | राज्य शासन | 9ब | 05 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 14355818 | 43506 | | |

10 द.ल.लि. क्षमतेचे अपारंपारिक मिरज जलशुध्दीकरण केंद्र बांधणे या कामाची निविदा मागविणे मागविण्याची प्रक्रिया सर्वसाधारणपणे दि. 27/03/2010 रोजी सुरु करण्यात आली. मूळ निविदेनुसार प्राप्त दर अवाजवी वाटल्याने निविदा प्रक्रिया रद्द करून नवीन निविदा प्रक्रिया करण्यात येऊन वाटाघाटीने कामाचे आदेश दि. 09/03/2012 ला देण्यात आले आहेत. सदर प्रक्रिया करणे कामी 2 वर्षाचा कालावधी लागलेला आहे. योग्य नियोजन करुन त्वरीत निर्णय न घेतल्याने कामाची किंमत रुपये 1 कोटी 70 लाखा वरून 1 कोटी 98 लाख 31 हजार पाचशे एवढी वाढल्याने महानगरपालिकेवर रु.2831500/- इतका अर्थिक भार वाढला आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका पाणीपुरवठा विभाग सांगली, मिरज विभागातील सुजल निर्मल अभियानांतर्गत 10 द.ल.लि. क्षमतेचे अपारंपारिक मिरज जलशुध्दीकरण केंद्र बांधणे कामाचे लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध करण्यात आलेली कामाची नस्ती, कागदपत्र, दस्तऐवज, प्रदान प्रमाणके, मोजमाप पुस्तक इत्यादीचे लेखापरीक्षण केले त्याबाबतच तपशील खालीलप्रमाणे आहे .

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेने महाराष्ट्र शासनाला सुजल निर्मल योजनेंतर्गत 49.20 कोटी रुपयांचा सविस्तर प्रकल्प आराखडा सादर केला आहे. सदर प्रस्तावाला महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग निर्णय क्र.सुनिअ-2010/ प्र.क्र. 460/ पापु-22 दिनांक 23 नोव्हेंबर, 2010 अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे. सदर प्रकल्प आराखड्यात रुपये 4 कोटी किंमतीच्या मिरज येथील जलशुध्दीकरण केंद्राचे नूतनीकरण तसेच विस्तारीकरण करणे कामाचा समावेश करण्यात आलेला आहे. शासनाला प्रस्ताव सादर केल्यानंतर त्याला मंजुरी मिळण्याच्या दरम्यान सुजल निर्मल कामांचे 6 पॅकेज करून एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट व्दारे इच्छुक ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात आल्या. त्याकरिता दिनांक 27/03/2010 च्या दैनिक पुढारी व इंडियन एक्सप्रेस या वृत्तपत्रांत जाहिरात देण्यात आली होती. निविदा सूचनेस प्रतिसाद दिलेल्या ठेकेदारांच्या निविदांची छाननी करून पात्र ठेकेदार ठरविण्यात आले. तथापि योजनेचे सल्लागार मे. डी.आर.ए. कन्सल्टंट, नागपूर यांचेशी पॅकेज एकत्रित करून पॅकेजची संख्या कमी करणे व कामाचे स्वरूप, तांत्रिक बाबी त्यासाठी लागणाऱ्या तांत्रिक क्षमता असलेले ठेकेदार यांचा अभ्यास करून 6 पॅकेजचे 3 गट करण्यात आले. त्यास स्थायी समिती ठराव क्र. 126, दिनांक 12/07/2010 अन्वये मंजुरी देण्यात आली आहे.

प्रस्तुत काम गट क्र. 3 अंतर्गत अस्तित्वातील मिरज जलशुध्दीकरण केंद्राची क्षमता सध्याच्या 19.20 द.ल.लि. वरून 28 द.ल.लि. वाढविणे, सिव्हिल मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल कामांमध्ये सुधारणा करणे तसेच जलशुध्दीकरण केंद्र पाच वर्षासाठी देखभाल दुरुस्तीसह चालविणे या रुपये चार कोटी किंमतीच्या कामाचा समावेश करण्यात आला असून गट 3 करता एकूण पाच ठेकेदार पात्र ठरविण्यात आले.

मे. व्हिओलिया वॉटर इंडिया लि. दिल्ली. 2) मे. कॅस्कल एन व्ही युनायटेड किंग्डम. 3) मे. लक्ष्मी इंजिनिअरिंग सर्व्हीसेस प्रा. लि. कोल्हापूर 4) मे. मिश्रा असोसिएटस्. 5) मे. एस एम सी इंफ्रा. लि. ठाणे. निविदा सूचना प्रसिद्धीनुसार 29/04/2011 रोजी उपायुक्त यांचे सोबतच्या प्री-बीड मिटींगमध्ये ठेकेदारांकडून निविदा सादर करण्याचा कालावधी अपुरा असल्याने मुदतवाढ मागणी करण्यात आली. त्यानुसार निविदा सादर करण्याचा दिनांक 19/05/2011 वरून दिनांक 6/06/2011 पर्यंत वाढविण्यात आली. त्यानंतर मे. मे. व्हिओलिया वॉटर इंडिया लि. दिल्ली. यांनी दिनांक 19/05/2011 च्या फॅक्सव्दारे 4 जुलै, 2011 पर्यंत मुदतवाढीची मागणी कळविले. परंतु मुदत वाढ देण्यात आली नाही. मुदत वाढ दिनांक 07/06/2011 पर्यंत एकही निविदादाराने निविदा सादर केली नाही. त्यामुळे दिनांक 19/05/2011, 7/06/2011, 15/06/2011 दिनांक 24/06/2011 व 6/07/2011 पर्यंत मुदतवाढ वाढविण्यात आली निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांक 6/07/2011 पर्यंत फक्त दोन निविदादारांनी निविदा सादर केल्या. तपशील खालीलप्रमाणे.

मे. एस.एम.सी. इंफ्रा. लि. ठाणे. : एकूण रुपये 10,47,60,700/- व मे. लक्ष्मी इंजिनिअरिंग सर्व्हीसेस प्रा. लि. कोल्हापूर एकूण रुपये 15,49,50,000/-

सदर निविदादारांनी देऊ केलेले दर वाजवी नसल्याने, 10 द.ल.लि. क्षमतेचे नविन अपारंपारिक जलशुध्दीकरण केंद्र बांधणे व चालू जलशुध्दीकरण केंद्राची कामे चालू दरसूचीनुसार चार कोटी रुपयात होऊ शकतात त्यासाठी सदर निविदा प्रक्रिया रद्द करून खुल्या ई-निविदा मागविणे योग्य होईल असा प्रस्ताव कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभाग यांनी स्थायी समितीला सादर केल्यानुसार स्थायी समिती ठराव क्रमांक 289, दिनांक 30/08/2011 अन्वये प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे.

प्रस्तुत 4 कोटी रुपये प्रकल्प आराखडा कामांमध्ये 10 द.ल.लि. क्षमतेचे नविन अपारंपरिक जलशुध्दीकरण केंद्र बांधणे या कामाची दरसूची 2010-11 नुसार अंदाजपत्रकीय किंमत रुपये 1,70,00,000/- विचारात घेऊन त्यानुसार निविदा मागविण्यात आल्या आहेत. निविदा सूचना पत्र क्र. मनपा/ पापुवि/ मि/731/ 2011, दिनांक 14/09/2011 नुसार दैनिक पुढारी या एकमेव वृत्तपत्रात जाहिरात देऊन ई-निविदा मागविण्यात आल्या आहेत.

**निविदा प्रसिद्धी दिनांक :** 14/09/2011

**निविदा फॉर्म विक्री कालावधी :** निविदा सूचना प्रसिद्धीच्या दिनांक पासून 28/10/2011 दुपारी 4.00 वाजेपर्यंत

**निविदा सादर करण्याचा दिनांक :** दिनांक 29/09/2011 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत जाहीर निविदा सूचनेस प्रतिसाद म्हणून चार निविदा दारांनी निविदा फॉर्म विकत घेतले त्यापैकी तीन निविदादारांनी निविदा सादर केल्या. 1) मे. एस व्ही जाधव रुपये 2,05,88,700/ 2) पी.टी. माळी रुपये 2,13,16,700/- व मे. लक्ष्मी सिव्हिल इंजिनिअरिंग सर्विसेस कोल्हापूर रुपये 2,17,60,000/- निविदा ई-निविदा पद्धतीने सादर केल्या आहेत. ई-निविदा E-Tendering Form of Comercial Evaluation प्रपत्रानुसार सर्वात कमी दर

देऊ करणारे मे. एस.व्ही.जाधव रुपये 2,05,88,700/- यांना पत्र क्र. मनपा/ मि/तांशा/ 890/2011, दिनांक 18/11/2011 अन्वये वाटाघाटी करिता बोलाविण्यात आले. वाटाघाटी दिनांक 18/11/2011 रोजी दुपारी 4 वाजता करण्यात आल्या. वाटाघाटीवेळी निविदादार एस.व्ही.जाधव यांनी निविदा दरांबाबत दरसूची 2011-12 वर आधारित कामाची किंमत रुपये 2 कोटी होते. त्यामुळे सदर किंमतीच्या 1.85 टक्के जादा दराने काम करण्याबाबत संमती दर्शविली. त्यानुसार स्थायी समिती ठराव क्र. 488 दिनांक 27.12.2011 अन्वये मंजुरी देण्यात आल्याने श्री. एस.व्ही.जाधव, मिरज यांनी प्रस्तुत कामाची अनामत रक्कम व महानगरपालिकेबरोबर करारनामा करण्यात आल्यानंतर दिनांक 9/03/2012 च्या आदेशानुसार कामाचे आदेश देण्यात आले आहेत.

ई.ओ.आय व्दारे मागविण्यात आलेल्या मूळ निविदेमध्ये मिरज येथील अस्तित्वातील मिरज जलशुध्दीकरण केंद्राची क्षमता 19.20 द.ल.ली. वरून 28 द.ल.लि. वाढविणे, सिव्हिल, मेकॅनिकल, व इलेक्ट्रिकल इत्यादी कामांमध्ये सुधारणा करणे तसेच जलशुध्दीकरण केंद्र पाच वर्षासाठी चालविणे या कामांचा समावेश आहे. त्यानुसार ई ओ आय (Expression Of Interest) व्दारे निवड करण्यात आलेले निविदादार मे. एस एम सी इंफ्रा. लि. ठाणे यांनी एकूण रुपये 10,47,60,700/- चा सर्वात कमी किमतीचा देकार दिलेला आहे. सदर निविदादाराने देऊ केलेला देकार वाजवी वाटत नसल्यामुळे कामाची विभागणी करून 1) 10 द.ल.ली. क्षमतेचे नवीन जलशुध्दीकरण केंद्र बांधणे निविदा किंमत रुपये 1,70,00,000/- व 2) अस्तित्वातील जलशुध्दीकरण केंद्राची दुरुस्ती 2.30 कोटी अशी कामांची विभागणी करून निविदा मागविण्यात आल्या आहेत.

**कामाचे नाव :** सुजल निर्मल अभियानांतर्गत 10 द.ल.लि. क्षमतेचे अपारंपारिक मिरज जलशुध्दीकरण केंद्र बांधणे.

**स्थायी समिती मंजुरी :** स्थायी समिती ठराव क्र. 126, दिनांक 12/05/2010 अन्वये स्थायी समिती ठराव क्र. 488 दिनांक 27/12/2011 अन्वये मंजुरी देण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सुजल निर्मल अभियानांतर्गत मिरज येथे 10 द.ल.ली. क्षमतेचे अपारंपरिक जलशुध्दीकरण केंद्र तयार करून चालू जलशुध्दीकरण केंद्राची दुरुस्ती करणे कामी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन 2010-11 च्या दरसुचीवर आधारित अंदाजित रक्कम रुपये 1,70,00,000/- वर दरसूचीतील नियम 8 नुसार मनपा क्षेत्रातील 5% रक्कम वाढीव गृहीत धरून अंदाजपत्रकीय रक्कम रुपये 1,78,50,000/- ची तुलना करता आलेल्या निविदांमध्ये सर्वात कमी दराचे निविदा धारक मे. शशांक व्ही. जाधव मिरज यांचा निविदा दर 15.34 टक्के जादा दराबाबत वाटाघाटी करून मूळ निविदा किमतीवर 11.10 टक्के जास्त व चालू दरसुची 2011-12 च्या अंदाजपत्रकीय रक्कम रुपये 1,98,31,500/- वर मे. शशांक व्ही. जाधव मिरज यांचे निविदेस मंजुरी दिलेली आहे.

**कामाचे आदेश :** मनपा/ पापुवि/ मि/ तांशा/ 159/ 2012, दिनांक 9/03/2012 अन्वये अंदाजपत्रकीय रकमेच्या 16.65 टक्के जादा दराने मंजूर करण्यात आले आहे. परंतु 2011-12 या आर्थिक वर्षाचे दरसूचीप्रमाणे निविदा रक्कम रु.1,98,31,500/- होत असल्याने त्या किंमतीवर निविदा मंजुर करणेत

आली आहे.

**कामाचा कालावधी :** कामाचे आदेश मिळाल्यापासून 12 महिने.

सदर कामाचे अनुषंगाने लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध करण्यात आलेली पत्रव्यवहार नस्तीचे लेखापरीक्षण करून अर्धसमास ज्ञापन क्र.155 दि.01/10/2014 रोजी निर्गमित केला असुन पाणीपुरवठा विभागाने त्याचे अनुपालन दि.13/10/2014 रोजी सादर केले आहे. दिलेल्या अनुपालनाचे अवलोकन करुन खालीलप्रमाणे लेखापरीक्षण अभिप्राय देण्यात येत आहे.

**लेखापरीक्षण अभिप्राय** :-

1)सदर कामाची किंमत अंदाजे रुपये 2.00 कोटी असल्याने त्याची प्रसिद्धी सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन यांचा शासन निर्णय क्र. जाहिरात 2009/प्र.क्र. 137/ का-34 दि. 31/8/2009 नुसार रक्कम रु. 55 लाखापेक्षा जास्त रक्कमेचे काम असल्याने विभागातील “अ” वर्ग दैनिंक एक व त्या विभागातील “ब” वर्ग व ज्या जिल्हयाचे काम आहे त्या जिल्हयातील क वर्ग दैनिंकात जाहिरात देणे आवश्यक होते. परंतु सदर कामाची प्रसिद्धी दैनिक पुढारी या एकमेव मराठी दैनिक वृत पत्रात प्रसिद्धी देण्यात आली आहे. निविदा प्रसिद्धी स्थानिक स्तरापर्यंतच मर्यादित राहिल्यामुळे निविदेस फक्त स्थानिक स्तरावरील मर्यादित कंत्राटदारांकडून प्रतिसाद मिळालेला आहे. कामाचे स्वरूप व कामाची किंमत विचारात घेऊन निविदा प्रसिद्धी अधिक व्यापक करण्यात आली असती तर निविदेस अधिक प्रतिसाद मिळाला असता. परंतु अधिक व्यापक प्रसिद्धीच्या अभावामुळे निविदेस मिळालेला प्रतिसाद सर्वसाधारण स्वरूपाचा असल्याचे दिसून येते.

2)प्रस्तुत काम 10 द.ल.ली. क्षमतेचे जलशुध्दीकरण कैंद्र कामाची निविदा रुपये 1,70,00,000/- वाटाघाटीअंती रुपये 1,98,31,500/- ला मंजूर करून मे. एस.व्ही. जाधव यांना क्रमांक मनपा/ पापुवि/मि/ तांशा/ 159/ 2012, दिनांक 09/03/2012 अन्वये कामाचे आदेश देण्यात आले आहेत. म्हणजेच प्रस्तुत काम निविदा किमतीपेक्षा रुपये 28,31,500/- जादा रकमेला देण्यात आले असून ती निविदा रकमेपेक्षा 16.66 टक्के जादा दराने मंजूर करण्यात आल्याचे दिसून येते. जादा दराची निविदा मंजुरीबाबत वरीलप्रमाणे अंदाजित रक्कम रुपये 1,70,00,000/- वर दरसूचीतील नियम 8 नुसार मनपा क्षेत्रातील 5% रक्कम वाढीव गृहीत धरून अंदाजपत्रकीय रक्कम रुपये 1,78,50,000/- ची तुलना करता आलेल्या निविदांमध्ये सर्वात कमी दराचे निविदा धारक मे. शशांक व्ही. जाधव मिरज यांचा निविदा दर 15.34 टक्के जादा दराबाबत वाटाघाटी करून मूळ निविदा किमतीवर 11.10 टक्के जास्त व चालू दरसुची 2011-12 च्या अंदाजपत्रकीय रक्कम रुपये 1,98,31,500/- वर असा अभिप्राय नोंदविण्यात आला आहे. याबाबत खालील बाबींचा खुलासा करण्यात आलेला नाही.

अ) प्रस्तुत कामाचे अंदाजपत्रक तयार करताना दरसुचीतील नियम 8 नुसार मनपा क्षेत्रातील कामांकरिता 5% रक्कम वाढवून निविदा किंमत रुपये 1,78,50,000/- निश्चीत करून त्या किमतीला निविदा मागविण्याऐवजी निविदेतील किंमत कमी दाखवून वाटाघाटी वेळी 5% जादा रकमेचा विचार

करण्याचे प्रयोजन स्पष्ट होत नाही.

ब) निविदा किंमतीमध्ये सदर 5% जादा महानगरपालिका क्षेत्रांकरीता रकमेचा अंतर्भाव करण्यात आलेला नाही. याबाबत निविदादारांना निविदा सुचनेमध्ये किंवा निविदा फॉर्म मध्ये सूचित करण्यात आलेले नाही. कामाचे अंदाजपत्रक तयार करताना सर्वंकष बाबींचा विचार करून निविदा किंमत निश्चीत करण्यात आली असती तर त्यानुसार निविदादारांना निविदा किंमतीचा योग्य देकार देता आला असता. परंतु सदर निविदेमधील कामाच्या किंमतीबाबत निविदादारांना अनभिज्ञ ठेवण्यात आल्याने निविदेची योग्य किंमत आलेली नाही. त्यामुळे सदर निविदा प्रक्रिया निविदा प्रक्रियेच्या नियमांनुसार करण्यात आलेली नाही.

3)प्रस्तुत कामाची मूळ निविदा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे सन 2009-10 च्या दरसुचीवर आधारित तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकानुसार निविदा मागविण्याची प्रक्रिया सर्वसाधारणपणे दिनांक 27/03/2010 रोजी सुरु करण्यात आलेली आहे. मूळ निविदेनुसार प्राप्त दर अवाजवी वाटल्याने सदर निविदा प्रक्रिया रद्द करून निवीन निविदा प्रक्रिया करण्यात येऊन वाटाघाटी करून कामाचे आदेश दिनांक 09/03/2012 ला देण्यात आले आहेत. म्हणजेच सदर प्रक्रिया करणे कामी 2(दोन) वर्ष कालावधी लागलेला दिसून येतो. नस्ती मधील उपलब्ध माहिती नुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दरसूचीमध्ये सर्वसाधारणपणे प्रती वर्षी 15 (पंधरा) टक्के वाढ होते असे नमूद करणेत आले आहे. त्यानुसार सदर निविदेच्या कामाचे अंदाजपत्रकातील दर सुद्धा सर्वसाधारणपणे 15(पंधरा) टक्क्यांनी वाढीव आहेत. निविदा प्रक्रियेस अंतिम निर्णय होईपर्यंत 2 (दोन) वर्ष कालावधी लागल्याने मूळ निविदा किमतीमध्ये सर्वसाधारणपणे 30 (तीस) टक्के वाढ झालेली आहे. त्यामुळे निविदा प्राक्रीये बाबत निर्णय घेतान 2 वर्ष कालावधी लागल्याने कामाच्या किंमतीत सर्वसाधारणपणे 30 टक्के वाढ झालेली आहे. म्हणजेच निविदा प्रक्रिया प्रकरणी त्वरीत निर्णय घेण्यात आले असते तर प्रस्तुत कामामध्ये 30 टक्के बचत झाली असती. परंतु निविदा प्रक्रिया प्रकरणी त्वरित निर्णया अभावी 30 टक्के एवढे नुकसान झालेले आहे. त्यामुळे कामाची किंमत रुपये 1,70,00,000/- (एक कोटी, सत्तर लक्ष) वरून 1,98,31,500/- (एक कोटी, आठ्यानव लक्ष, एकतीस हजार, पाचशे) एवढी झालेली आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये योग्य नियोजन करुन निर्णय घेण्यास विलंब लागल्याने योजनेच्या खर्चात वाढ झाल्याची बाब पाणीपुरवठा विभागाने मान्य केली आहे.

4)सदर कामाची मुदत कामाचे आदेश दिल्यापासून 12 महिने आहे. कामाचे आदेश क्र. मनपा/ पापुवि/ मि/तांशा/ 159/2012, दिनांक 09/03/2012 अन्वये देण्यात आले आहेत. त्यानुसार काम दिनांक 8/03/2013 अखेर पूर्ण करणे आवश्यक होते. परंतु 2012-13 अखेरपर्यंत सहा धावती देयके प्रदान करण्यात आलेली असून सहाव्या धावते देयका अखेरपर्यंत **एकूण रुपये 1,43,99,324/- खर्च** झालेले आहेत. वाटाघाटी अंती कामाची निश्चीत करण्यात आलेली किंमत रुपये 1,98,31,500/- आहे. त्यामुळे काम पूर्ण करण्याच्या मुदतीत रकमेच्या गुणोत्तरानुसार 72.60 टक्के काम झालेले असून 27.40 टक्के काम करणे शिल्लक आहे. तसेच लेखापरीक्षण महिना सप्टेंबर 2014 अखेरपर्यंतही काम पूर्ण झाल्याचा तपशील उपलब्ध नाही. सदर कामावर निविदा किमतीच्या 72.60 टक्के रक्कम खर्च करण्यात आलेला आहे, परंतु काम पूर्ण झालेले नसल्यामुळे कामाचा उद्देश साध्य झालेला नाही. निविदा अटी नुसार

कंत्राटदाराने कामाच्या नियोजनाचा बार-चार्ट द्यावयाचा आहे. व त्यानुसार काम करावयाचे आहे परंतु सदर बारचार्ट पत्रव्यवहार नस्ती मध्ये उपलब्ध नाही. कामाच्या बार-चार्ट नुसार कंत्राटदारास काम करणे बंधनकारक आहे. परंतु काम पूर्ण झालेले नसल्यामुळे सदर कामावर खर्च करण्याचा उद्देश साध्य झालेला नाही. प्रस्तुत काम बार-चार्ट नुसार करून घेण्याच्या अमलबजावणीमध्ये योग्य नियोजनाचा अभाव असल्याचे दिसून येते. त्यामुळे शासनाचा निधी विनाकारण गुंतून राहिलेला आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये ऑगष्ट 2013 मध्ये जलशुध्दीकरण केंद्राचे काम पुर्ण होवुन चाचणी घेण्यात आली आहे. परंतु वाढीव पाणीपुरवठा करण्यासाठी उंच टाक्यासाठी पंपिग मशीनरी बसविणे व वाढीव उपसा करण्याची सोय करणे ही कामे अपुर्ण असल्याने चाचणी घेवुन पंपीग जलशुध्दीकरण केंद्र बंद असल्याचे नमुद केले आहे. या वरुन योग्य नियोजना अभावी शासनाचा निधी नाहक गुंतुन पडल्याचे सिध्द होते.

5)2012-13 या आर्थिक वर्षामध्ये कामाचे प्रदान कंत्राटदार एस.व्ही.जाधव यांना धावती देयके क्रमांक 1 ते सहा अन्वये एकूण रुपये 1,43,99,324/- करण्यात आलेले आहे. देयकांतून व्हॅट 2 टक्के, आयकर 2.5 टक्के, कामगार कल्याण उपकर 1 टक्के व सुरक्षा रक्कम 2.5 टक्के कपात करण्यात आलेली आहे परंतु कंत्राटदाराने रॉयल्टी भरणा केल्याबाबतच्या पृष्टयर्थ कार्यवाही करण्यात आल्याचे दिसून आले नाही. तसेच किती खनिज साहित्य वापरले याबाबतचा तपशील देयकासोबत जोडण्यात आलेला नाही. त्यामुळे खनिज साहित्य वापरापोटी निश्चीत किती रक्कम भरणा करणे बाकी आहे याबाबतच तपशील उपलब्ध नाही. अनुपालनामध्ये आज अखेर केलेल्या एकुण कामाचा व त्यावरील रॉयल्टीचा गोषवारा दिला आहे. त्यानुसार सिमेंट कॉंक्रीट M-150:- 76.80घ.मी., सिमेंट कॉंक्रीट M-300 :- 475.06 घ.मी., विट बांधकाम 40.34 घ.मी.,प्लास्टर 22.40 घ.मी., आय.पी.एस फ्लोरींग 1.03 घ.मी. प्रमाणे एकुण 615.63 घ.मी. झाले असुन रु.70.67 प्रती घ.मी.प्रमाणे रु.43507/- ठेकेदाराचे अंतिम देयकामधुन कपात करण्याचे मान्य केले आहे. परंतु रॉयल्टीची रक्कम कपात करुन अनुपालन सादर केलेले नाही.

**आक्षेपाधिन रक्कम रु. 14355818/-**
**वसुलपात्र रक्कम रु. 43506/-**

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 155 | 01/10/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATBDMM5701 |

| | |
|---|---|
| 94 | मनपा शाळेसाठी नवीन स्कूल बस खरेदी मधील अनियमितते बाबत. |

| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 14 | वाहन विभाग | मनपा | 9ड | 02 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

नगरविकास विभाग पत्र क्र.जीईएन-1093/2365 प्र.क्र.126/93/नवी-14 दि.20.10.1993 अन्वये स्पर्धात्मक दर प्राप्त होण्यासाठी रु.5 लाख ते 1 कोटी अंदाजपत्रकीय रक्कमेच्या खर्चाच्या निविदा या **अ)** राज्य स्तरीय दैनिक **, ब)** 20,000 प्रती खप असलेले जिल्हा स्तरीय दैनिक यामध्ये निविदा प्रसिध्दीस देणे आवश्यक आहे. उक्त स्कूल बस खरेदीसाठी निविदा "दै.केसरी" या एकाच वर्तमान पत्रात प्रसिध्दीस दिल्याने दस्पर्धात्मक दराचा लाभ न मिळाल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

महानगरपालिका अधिनस्त वाहन कार्यशाळा विभागाकडे एकूण 111 विविध प्रकारची वाहने आहेत. त्यापैकी मनपा शाळेसाठी वापरात असलेल्या 33 आसनी स्कूलबसचा वापर 16 वर्षा पेक्षा जास्त झालेला असल्याने शासन निर्णय वित्त विभाग क्र. डीएमपी / 1080 / सीआर. 504 / जीईएन-5 दि.29.05.1984 नुसार मा.आयुक्त मनपा यांना प्राप्त अधिकारा नुसार जुनी बस निकामी ठरवून त्या ऐवजी 36 आसन व्यवस्था असलेली स्कूल बस खरेदी करण्यात आली आहे.

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम |
|---|---|---|
| 7589 | 30/3/2013 | 1486056/- |

1) अंदाजपत्रकीय रक्कम रुपये : 15,20,000/- निविदा रक्कम रुपये : 15,00,000/-

2) प्रशासकीय मान्यता : मा.आयुक्त निर्णय दिनांक 11.03.2013 नुसार निविदा दराने बस खरेदीस मान्यता देण्यात आली आहे.

3) स्थायी समिती ठराव : ठराव क्रमांक 93 दि.13.05.2013

4) तांत्रिक मान्यता : दि.11.03.2013

5) पुरवठादाराचे नांव: मे. पंडीत ॲटोमोटीव्ह लि.सांगली

6) निविदा प्रसिध्दी : क्र.1/2012-13 दि.02.01.2013

मुदतवाढ दुसरी प्रसिध्दी दै.केसरी दि.31.01.2013

मुदतवाढ तिसरी प्रसिध्दी दि.14.02.2013

सदर बस खरेदीची नस्ती व प्रमाणक तपासुन अर्धसमास ज्ञापन क्र.80 दि.15/07/2014 निर्गमित केला असुन वाहन विभागाने त्याचे अनुपालन दि.21/7/14 रोजी सादर केले आहे. वाहन विभागाने दिलेले अनुपालन तपासुन खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

1) उक्त स्कूलबस खरेदीसाठी निविदा "दै.केसरी" या एकाच वर्तमानपत्रात प्रसिध्दीस दिल्याचे दिसून आले आहे. नगरविकास विभाग पत्र क्र.जीईएन-1093/2365 प्र.क्र.126/93/नवी-14 दि.20.10.1993 अन्वये स्पर्धात्मक दर प्राप्तहोण्यासाठी रु.5 लाख ते 1 कोटी अंदाजपत्रकीय रक्कमेच्या खर्चाच्या निविदा या **अ)** राज्य स्तरीय दैनिक**, ब)** 20,000 प्रती खप असलेले जिल्हा स्तरीय दैनिक यामध्ये निविदा प्रसिध्दीस देणे आवश्यक आहे. एकाच दैनिकामध्ये निविदा जाहिरात प्रसिध्द केली आहे. प्रथम निविदेस प्रतिसाद लाभला नसल्याने दोन वेळा मुदतवाढ दैनिक केसरी या दैनिकातच दिली असल्याने निविदेस आवश्यक तेवढी प्रसिध्दी मिळाली नसल्याचे स्पष्ट होते. तसेच एकाच पुरवठादाराने निविदा सादर केल्याने महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ न मिळाल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान संभवत आहे.

2) एकच प्राप्त झालेली निविदाकार मे.पंडीत ॲटोमोटीव्ह लि. सांगली यांना मा.आयुक्त यांनी स्कूलबस पुरवठ्याचे तोंडी आदेश दिल्याचे नस्तीमध्ये नमुद आहे. (कार्यादेश नस्तीमध्ये आढळून आलेला नाही.) नस्तीमध्ये कार्यादेश उपलब्ध नसल्याने सदर पुरवठा निविदेत विहित केल्याप्रमाणे 30 दिवसात झाला याची खातरजमा करता आलेली नाही.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 80 | 15/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSVSM6002 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 95 | पेट्रोल-डिझेल वाहनांच्या दुरूस्तीवर वित्तीय मर्यादेपेक्षा जास्त खर्च केलेबाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 14 | वाहन विभाग | मनपा | 9अ | 04 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 483574 | | | |

वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-1008/प्र.क्र.-13/200 विनिएम दिनांक 05.01.2009 अन्वये डिझेल वाहनावर प्रति वर्ष रु.50 हजार व पेट्रोल वाहनावर प्रति वर्ष 40 हजार खर्च करणे आवश्यक असताना खाली नमूद केलेल्या वाहनावर वित्तीय मर्यादेपेक्षा रु.641602/- इतका जास्त खर्च झाल्याचे निदर्शनास आले आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिकेच्या कार्यशाळा विभागाकडे एकूण 111 विविध प्रकारची वाहने असून त्यापैकी 74 वाहने सांगली प्रभाग 1 व 2 कडे तसेच 37 वाहने प्रभाग 3 व 4 मिरज व कुपवाड विभागाकडे कार्यरत आहेत. 2012-13 मधील वाहन दुरूस्तीचे लेखापरीक्षण, कामाच्या नस्ती, वाहन दुरुस्तीचे उपयोगात आणल्या (नविन वापरल्या) स्पेअर पार्टस् नोंदीचे रजिस्टरची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.81 दि.15/07/2014 रोजी निर्गमित केला आहे. अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालन वाहन विभागाने दि.23/7/14 रोजी सादर केले असुन दिलेल्या अनुपालनाचे अवलोकन करुन खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

1) वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-1008/प्र.क्र.-13/200 विनिएम दिनांक 05.01.2009 अन्वये डिझेल वाहनावर प्रति वर्ष रु.50 हजार व पेट्रोल वाहनावर प्रति वर्ष 40 हजार खर्च करणे आवश्यक असताना खाली नमूद केलेल्या वाहनावर वित्तीय मर्यादेपेक्षा जास्त खर्च झाल्याचे निदर्शनास आले आहे.

| अ.क्र. | वाहनक्रमांक | इंधनप्रकार | केलेलाखर्च | जास्तीचाखर्च |
|---|---|---|---|---|
| 1 | MH 10 E 1214 | डिझेल | 1,08,289/- | 68,289/- |
| 2 | MH 10 NP 1007 कॉम्पॅक्टर | डिझेल | 97,050/- | 47,085/- |
| 3 | रोडरोलर नं.2 | डिझेल | 80,395/- | 30,395/- |
| 4 | MH 10 P 1012 कॉम्पॅक्टर | डिझेल | 64496 | 14496 |
| 5 | MH 10 P 1017 कॉम्पॅक्टर | डिझेल | 203870 | 253870 |
| 6 | MH 10 P 19 वॉटर टँकर | डिझेल | 69509 | 19509 |
| 7 | MH 10 C 7121 बॅक हो लोडर मशीन | डिझेल | 99,930/- | 49,930/- |
| | | **एकूण** | 7,23,539/- | 4,83,574/- |

2) उपरोक्त वाहने दुरूस्तीचा प्रती वाहन खर्च हा रु.50,000/- पेक्षा जास्त आहे व वाहनांची दुरुस्ती स्पेअर पार्ट सहित असल्याने वाहनांचे वार्षिक दुरूस्ती व स्पेअर पार्ट खरेदी करणेसाठी उद्योग उर्जा व कामगार विभाग शा-भांखसं.क्र.नि.1088/2512/ उद्योग/6 दि.2 जाने ,1992 मधील परिच्छेद 8.3 (ई) नुसार वर्षभर आवश्यकते नुसार वस्तु खरेदी करणेसाठी दर वर्षी संख्या करारापेक्षा दरकरार करणे आवश्यक असता सदर वाहने दरपत्रके मागवून दुरूस्ती केलेली आहे.

3) महानगरपालिकेकडे असलेल्या अन्य कॉम्पॅक्टरच्या हैड्रॉलिक ऑइल व इंजिन ऑइल या बाबीवर सरासरी 25 हजार खर्च झाला आहे. परंतु MH 10 NP 1007 या कॉम्पॅक्टरच्या हैड्रॉलिक ऑइल व इंजिन ऑइल या बाबीवर 2012-13 या आर्थिक वर्षात रक्कम रुपये 65140/- खर्च झाला आहे. जादा खर्चाबाबतचे स्पष्टीकरण वाहन विभागाने दिले नसल्याने खर्च रक्कम रुपये 65140/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

4) रोडरोलर न.2 वर 2012-13 या आर्थिक वर्षात रक्कम रुपये 180325/- खर्च झालेला आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या उत्तरामध्ये लेखापरीक्षणामध्ये नमुद केलेला खर्च चुकीचा दाखविला असुन फेर रिपेअर रजिस्टर क्र.14 ची तपासणी करुन सदर खर्चाबाबत खात्री करणे आवश्यक असलेचे नमुद आहे. परंतु फेर रिपेअर रजिस्टर क्र.14 लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेले नसल्याने रक्कम रुपये 180325/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**आक्षेपाधिन रक्कम :- खर्च रु. 641602/-**

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 81 | 15/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSVSM6002 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 96 | कार्यशाळा विभागाचे लेखापरीक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या अनियमितताबाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 14 | वाहन विभाग | मनपा | 9ड | 07 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 7262761 | | | |

दुरूस्ती , स्पेअर पार्ट खरेदी इ. 2012-13 मधील कार्यशाळा विभागाचा वाहन खरेदी, दुरूस्ती ,सुटे भाग खरेदी खर्चाची रु.36,17,586/- ची एकूण 149 प्रमाणके - तपासली असता, प्रमाणकावर "रक्कम प्रदानार्थ मंजूरी" (Pass for Payment) नमुद केलेले नाही. तसेच सुट्टे भाग खरेदी कोणत्या नोंदवहीत कोणत्या पृष्ठावर नोंद घेतली याची नोंद नाही. सबब माल प्राप्त झाल्याची / केलेल्या खर्चाची खात्री होत नाही. आरोग्य विभागाकडील कचरा गाड्यांची लॉगबुक लेखापरीक्षणास सादर केली नसल्याने कचरा गाड्यांच्या वाहन इंधनावर 2012-13 मध्ये प्रभाग समिती क्र.3 रु.1705590/-, प्रभाग समिती क्र.4 रु.1939585/- ,आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वाहन विभागाकडील लॉगबुक, इंधन वापर नमुना क्र.27 , जंगम मालमत्ता नोंदवही, घसारा निधीची लेखापरीक्षण करुन अर्धसमास ज्ञापन क्र.83 दि.15/7/14 रोजी निर्गमित केला असुन वाहन विभागाने त्याचे अनुपालन दि.24/7/14 रोजी सादर केले आहे. वाहन विभागाने दिलेल्या अनुपालनाचे अवलोकन करुन खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

**1) लॉगबुक :** नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रं.153 नुसार नमुना क्र.126 प्रमाणे इंधनाचा लेखा ठेवला असुन नमुना क्र.127 प्रमाणे मोटार वाहन लेखापुस्तक ठेवणे आवश्यक आहे व त्यासाठी कार्यालयीन वेळेनंतर वाहन गॅरेजला जमा करणे आवश्यक आहे. परंतु वाहने गॅरेजला जमा केली जात नाहीत. रकाना क्र.12 मध्ये प्रवास करणा-या अधिका-याने स्वाक्षरी केली आहे. परंतु रकाना क्र.11 मध्ये प्रवासाचा हेतु लिहिला नसल्याने गाडीचा वापर कोणत्या कारणासाठी करण्यात आला याचा अर्थबोध लेखापरिक्षणास होत नाही. कनिष्ठ अभियंता **(तांत्रीक)** यांनी वाहनामध्ये एकूण इंधन भरणा व प्रती कि.मी. सरासरी मासिक आढावा तपासला आहे. परंतु दैनंदिन वापराच्या नोंदी तपासल्या नाहीत. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये वाहनाच्या दैनंदिन वापराच्या नोंदी कोणी तपासणे आवश्यक आहे याचे अनुपालन सादर केलेले नाही.

**2) वाहनतळ** : नगरपरिषद लेखासंहिता 1971चे नियम क्रं.153 नुसार नियंत्रण अधिका-यास, इंधन वापरावर होणा-या खर्चाचे परिनिरिक्षण करता यावे म्हणुन नमुना क्र.127 प्रमाणे मोटार वाहन लेखापुस्तक ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार मोटार वाहनांचे लेखा नमुना क्र.127 प्रमाणे ठेवला आहे. नमुन्यामधील रकाना क्र.2 प्रमाणे मोटार गॅरेजमधुन निघाल्याची वेळ व रकाना क्र.3 नुसार मोटार गॅरेजमध्ये परतण्याच्या वेळेची नोंद करणे आवश्यक आहे. परंतु सदर नोंदी घेण्यात आलेल्या नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे महानगरपालिकेची वाहने दररोज कार्यशाळेमध्ये जमा केली जात असल्याची खात्री करता आलेली नाही. सदर वाहने कोठे जमा केली जातात व प्रवास करणारे अधिकारी वाहने गॅरेजमध्ये नियमाने जमा करत नाहीत तसेच वाहने जमा होत नसलेबाबतची माहिती कनिष्ठ अभियंता यांत्रिकी यांनी वरीष्ठ अधिकाऱ्यांना देणे आवश्यक असता ती का दिली नाही याचा खुलासा करण्यात आलेला नाही. वाहने कार्यालयीन वेळेनंतर गॅरेजमध्ये जमा होत नसल्याने कार्यालयीन वेळेनंतर व सुट्टीचे दिवशी वाहनांचा वापर खाजगी कामासाठी होत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. वाहने दुरुस्तीसाठीच कार्यशाळेमध्ये येत असल्याने वाहनांच्या दैनंदिन देखभालीवर कार्यशाळेचे नियंत्रण राहत नसल्याने वाहनांच्या देखभाल दुरुस्तीवर जादा खर्च होत असलेचे दिसुन येते. वाहनांचे ड्रायव्हर कार्यशाळेच्या नियंत्रणाखाली नसल्याने व एखादा अधिकारी रजेवर असल्यास त्याची माहिती कार्यशाळेस समजत नसल्याने त्या गाडीचा ड्रायव्हर कोठे व काय काम करतो याची माहिती कार्यशाळेस समजत नसल्याने ड्रायव्हरांचे दैनंदिन कामकाजावर कार्यशाळेचे प्रभावी नियंत्रण राहत नसल्याचे दिसुन येते. तसेच ड्रायव्हरांचे दैनंदिन हजेरीबाबतची माहिती कार्यशाळेकडे नसल्याने त्यांच्या हजेरीबाबतची माहिती लेखापरीक्षणास मिळाली नाही. वाहनांचे कार्यालयीन वेळेनंतरचे वापरावर कोणाचेही नियंत्रण नसल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान (दुरूस्ती /खाजगी वापर) संभवत आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये गॅरेजची जागा कमी अपुरी असल्याने कार्यालयाच्या जागेमध्ये पार्क केली जात असल्याचे नमुद आहे. परंतु याबाबतचे सक्षम प्राधिका-यांनी

काढलेले आदेश लेखापरीक्षणास दाखविलेले नाहीत. महानगरपालिकेची वाहने कार्यालयीन कामासाठीच वापरणेबाबतचे आदेश आयुक्तांनी काढलेचे नमुद आहे. परंतु आदेश लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेले नाहीत.

नमुना क्र.127 मधील रकाना क्र.6 नुसार मैल अंतर आरंभ व रकाना क्र.7 नुसार नोंदणीकृत प्रवासाचा शेवट व रकाना क्र.8 नुसार धावलेल्या मैल/किलोमिटरची संख्या लिहिणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे आधिकाऱ्यांच्या गाड्यांचे लॉगबुक वाहनचालक यांनी लिहिले आहे. परंतु सदर रकाने सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणित केले नसल्याने वाहनांच्या फिरती विषयी साशंकता निर्माण होत आहे.

आरोग्य विभागाकडील कचरा गाड्यांची लॉगबुक लेखापरीक्षणास सादर केली नसल्याने कचरा गाड्यांच्या वाहन इंधनावर 2012-13 मध्ये प्रभाग समिती क्र.3 रु.1705590/-, प्रभाग समिती क्र.4 रु.1939585/-,आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. प्रभाग समिती क्र.1 च्या कॉम्पॅक्टरच्या लॉगबुकची तपासणी केली असता लॉगबुकमध्ये वाहनाने कोठुन कचरा गोळा केला त्याच्या नोंदी आहेत परंतु अंतराच्या नोंदी नाहीत. महानगरपालिकेच्या आरोग्य निरिक्षक व कनिष्ठ अभियंता (यंत्र) यांनी कचरा जमा होणा-या कचरा कुंडींची जागा निश्चित करुन वाहनचालकांना रुट निश्चित करुन देणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक रुटचे अंतर सर्व्हे करुन त्याप्रमाणे कि.मी. निश्चित करुन अंतर प्रमाणित करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेचा सांगली कचरा डेपो शहरापासुन 6 कि.मी.अंतरावर आहे. गाडीच्या लॉगबुकमध्ये डेपामध्ये कचरा उतरल्याच्या नोंदी आहेत परंतु कचरा डेपोवर कचरा टाकल्याबाबत डेपोवर असणा-या मुकादमाची लॉगबुकमध्ये प्रत्येक ट्रीपच्या वेळी स्वाक्षरी घेतली नसल्यामुळे कचरा डेपोवर कचरा वाहनाच्या एकूण किती फे-या, किती वाजता झाल्या ते समजुन येत नाही.

**3) वाहनचालक** : महानगरपालिकेमध्ये मानधनावर एकूण 60 वाहनचालक आहेत. सदर वाहनचालक महानगरपालिकेच्या अन्य विभागांना देण्यात आले आहेत. वाहनांचे चालक कार्यशाळेच्या नियंत्रणाखाली नसल्याने व एखादा अधिकारी रजेवर असल्यास त्याची माहिती कार्यशाळेस समजत नाही. त्यामुळे त्या गाडीचा ड्रायव्हर कोठे व काय काम करतो ते कार्यशाळेस समजत नसल्याने त्या वाहनचालकाचा वापर कार्यशाळेस करता येत नाही. त्यामुळे सदर वाहनचालक विनावापर रहात असल्याचे दिसून येते.

**4) वाहने खरेदी** : दुरूस्ती , स्पेअर पार्ट खरेदी इ. 2012-13 मधील कार्यशाळा विभागाचा वाहन खरेदी, दुरूस्ती,सुटे भाग खरेदी खर्चाची रु. 36,17,586/- ची एकूण 149 प्रमाणके - तपासली असता, प्रमाणकावर "रक्कम प्रदानार्थ मंजूरी" (Pass for Payment) नमुद केलेले नाही. तसेच सुट्टे भाग खरेदी कोणत्या नोंदवहीत कोणत्या पृष्ठावर नोंद घेतली याची नोंद नाही. सबब माल प्राप्त झाल्याची / केलेल्या खर्चाची खात्री होत नाही. प्रमाणके रद्द केलेली नसल्याने पुन्हा वापरात येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

| |
|---|
| अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये सदर बाब लेखा विभागाशी संबंधित असल्याचे नमुद आहे. लेखाविभागाने अनुपालन सादर केलेले नाही.<br><br>5) वाहने दुरुस्ती नंतर निकामी झालेले सुटे भाग कार्यशाळेत जमा केले बाबतची नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. सदर नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त झालेली नाही. त्यामुळे जुने निकामी सुटे भाग जमा झाल्याची खात्री करता आलेली नाही. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये लिलावाचे वेळी स्क्रॅप रजिस्टरला नोंदी घेतल्याचे नमुद आहे. परंतु स्क्रॅप रजिस्टर लेखापरीक्षणास दाखविण्यात आले नाही.<br><br>**6) जंगम मालमत्ता नोंदवही** : जंगम मालमत्ता नोंदवही महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम क्र.144 नुसार नमुना क्र.114 मध्ये ठेवली आहे. सदर नोंदवहीत वाहनांच्या नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. परंतु त्यातील स्तंभ क्र.7 मालमत्ता वापरात आहे का अथवा आवश्यक असल्यास इतर तपशील, स्तंभ क्र.8 प्राधिकृत आधिका-याची स्वाक्षरी, स्तंभ क्र.9 मालमत्तेच्या अंतिम विल्हेवाटीचा दिनांक, हे रकाने पूर्ण पणे भरलेले नाहीत त्यामुळे किती वाहने चालु स्थितीमध्ये आहेत याची खात्री करता आलेली नाही.<br><br>**7)घसारा निधी :-** कार्यशाळेत असलेल्या वाहनावर प्रत्येक वर्षी सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावली, नियम क्रं. 415 नुसार दर साल 15% घसारा निधीची तरतुद करणे आवश्यक आहे .घसारा निधी नोंदवही कार्यशाळेत उपलब्ध न झाल्यामुळे त्याचे लेखापरीक्षण करता आलेले नाही. तसेच प्रत्यक्ष किती घसारा निधी जमा झालेला आहे याची खात्री करता आलेली नाही. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये दरवर्षी कार्यशाळेकडून अंदाजपत्रकामध्ये घसारा निधी दाखविला जातो असे नमुद आहे. परंतु त्याबाबतची माहिती लेखापरीक्षणास दाखविण्यात आली नाही. लेखाविभागाकडील घसारा निधीच्या रोकडवहीनुसार मार्च 13 अखेर रु.10478486/- शिल्लक आहेत. सदर घसारा निधीपैकी रु.10395487/- वसंतदादा शेतकरी सहकारी बँकेमध्ये मुदतबंद ठेवी मध्ये गुंतविली असून सदर बँक अवसायनात निघाली असल्याने गुंतविलेली रक्कम आडकुन पडली आहे. 2012-13 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये महानगरपालिकेने घसारा निधीची तरतूद केलेली नाही.<br><br>**आक्षेपाधिन रक्कम :-** कचरा गाड्यांच्या वाहन इंधनावर 2012-13 मध्ये प्रभाग समिती क्र.3 रु.1705590/-, प्रभाग समिती क्र.4 रु.1939585/- व वाहन खरेदी, दुरूस्ती ,सुटे भाग खरेदी खर्चाची रु.36,17,586/- ची एकूण 149 प्रमाणके असा एकुण **खर्च रु.7262761/- आक्षेपाधिन** ठेवण्यात येत आहे. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 83 | 15/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSVSM6002 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 97 | सिंधी मार्केट येथील दुकान गाळ्यांचे सुधारीत दराने भाडे वसुली केली नसल्याने झालेल्या नुकसानीबाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 13 | मालमत्ता | मनपा | 9ब | 03 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | 91322 | | |

महासभा ठराव क्र.94 दि.18/12/2008 नुसार सिंधी मार्केटचे भाडे प्रत्येक वर्षी 10% भाडेवाढ न करता महासभेने मनपाच्या गाळे, दुकाने व खोकी यांना प्रत्येक तीन वर्षानी सरसकट 20% भाडेवाढ करण्याचे धोरण निश्चित केले असल्याने सिंधी मार्केटच्या भाडयामध्ये मालमत्ता विभागाने 20% भाडेवाढ वेळीच न केल्यामुळे मनपाचे रक्कम रुपये 91322/- (28538 + 62784) चे आर्थिक नुकसान झाले आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या मालमत्ता विभाग अधिनस्त सिंधी मार्केट, सि.स.नं.746/1 ते 746/50 मधील एकुण 51 दुकान गाळे तत्कालीन सांगली नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 45 दि.29/07/1996 अन्वये दिलेली मुदत दि.31/03/2003 रोजी संपली त्यानंतर महासभा ठराव क्रमांक 54 दिनांक 20/07/2002 अन्वये दि.01/04/2003 पासुन सदर गाळे 9 वर्षाच्या मुदत वाढीने त्यांच्या पूर्वीच्या भाड्यात 10% भाडेवाढ करून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 79 अन्वये मान्यता देण्यात आली होती. तथापी सदर दुकान गाळेधारकांनी नविन घरपट्टी, इतर टॅक्सेस व कमी उत्पन्न यामुळे वाढीव भाडे भरणे अशक्य असल्याचे नमुद करुन दि.25/07/2003 अन्वये विनंती अर्ज केले होते. तसेच, मा.महापौर यांची प्रत्यक्षात भेट घेऊन भाडे कमी करण्याबाबत विनंती केली होती. त्यानुसार महासभा ठराव क्रमांक 93 दि.16/08/2007 अन्वये सिंधी मार्केट गाळे क्र.1 व 2 चे वार्षीक भाडे रु.2226/- व गाळा क्र.3 ते 51 चे वार्षीक भाडे रु.2500/- आकारण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे आजतागायत वरील दराप्रमाणे भाडे वसुली केली जात आहे.

महासभा ठराव क्र.94 दि.18/12/2008 नुसार प्रत्येक वर्षी 10% भाडेवाढ न करता महासभेने मनपाच्या गाळे, दुकाने व खोकी यांना प्रत्येक तीन वर्षानी सरसकट 20% भाडे वाढ करण्याचे धोरण निश्चित केले असून मनपा क्षेत्रातील ज्या जागा, गाळे भाड्याने दिलेल्या आहेत त्यांची भाडे वसुली थकीत असल्यास दर सहा-सहा महिन्याची नोटीस देऊन भाडे वसुलीसाठी प्रशासनाने कार्यप्रणाली अवलंबिणेचे महासभेचे आदेश आहेत.

सिंधी मार्केटमधील गाळ्यांच्या भाडे वसूलीबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1)सिंधी मार्केट गाळ्यांच्या भाड्याबाबत महासभा ठराव क्र.54 दि.20/7/2002 अन्वये दिलेली मुदत मुदत दि.31/03/2012 रोजी संपलेली असल्याने महासभा ठराव क्र.94 दि.18/12/2008 अन्वये मालमत्ता विभागाने संबंधित गाळेधारकांचे भाडे दि.01/04/2012 पासुन अनुक्रमे गाळा क्र.1 व 2 साठी 2226 x 20% = 445 + 2226 = 2671/- व गाळा क्र.3 ते 41 साठी रु.2500 x 20% = 500 + 2500 = 3000/- रु. दि.01/04/2012 पासून वसुल करणे आवश्यक होते. तथापि विभागाकडून जुन्याच दराने म्हंणजेच रु.2226/- व 2500/- या दराने भाडे वसुली केली जात असल्याने मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| गाळा क्र. | दि.1.4.09 ते 31.3.12 या कालावधी साठी 20% भाडे वाढीने येणारे भाडे व | दि.1.4.09 ते 31.3.12 या कालावधीत वसुल केलेले भाडे व सेवाकर | प्रत्यक्ष फरक | एकूण फरकाची रक्कम |
|---|---|---|---|---|

| | सेवाकर | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | भाडे | सेवाकर | भाडे | सेवाकर | भाडे | सेवाकर | |
| 1 व 2 | 2671 | 330 | 2226 | 275 | 445 | 55 | 500x 2 गाळे = 1000/- |
| 3 ते 51 | 3000 | 371 | 2500 | 309 | 500 | 62 | 562x49 गाळे = 27538/- |
| | | | | | | पूर्ण सिंधी मार्केट 51 गाळे | **28538/-** |

| गाळा क्र. | दि.1.4.12 ते 31.3.13 या कालावधीसाठी 20% भाडे वाढीने येणारे भाडे व सेवाकर | | दि.1.4.12 ते 31.3.13 या कालावधीत वसुल केलेले भाडे व सेवाकर | | प्रत्यक्ष फरक | | एकूण फरकाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | भाडे | सेवाकर | भाडे | सेवाकर | भाडे | सेवाकर | |
| 1 व 2 | 3205 | 396 | 2226 | 275 | 989 | 121 | 1110 x 2 गाळे = 2220/- |
| 3 ते 51 | 3600 | 445 | 2500 | 309 | 1100 | 136 | 1236x49 गाळे = 60564/- |
| | | | | | | एकूण | **62784/-** |

मालमत्ता विभागाने 20% भाडेवाढ वेळीच न केल्यामुळे मनपाचे रक्कम रुपये 91322/- (28538 + 62784) चे आर्थिक नुकसान झाले आहे.

**2)** सिंधी मार्केटचे एकूण 51 गाळ्यांचे कराराची मुदत दि.31/03/2012 रोजी संपुष्टात आली आहे. ती मुदत संपल्यानंतर कराराचे नुतनीकरण करण्यात आलेले नाही. तसेच करारनाम्यातील अट क्रमांक 12 नुसार सदर गाळे विभागाने ताब्यात घेणे आवश्यक असताना ते ताब्यात घेतलेले नाहीत.

**3)** खाली नमुद 7 गाळा भाडेधारकांचे करारनामे व भाडे भरणा पावत्या, मालमत्ता क्रमांक नोंद यामधील नावात तफावत आढळते. मनपाने गाळे हस्तांतरीत केलेले असल्यास त्याचा ठराव, नविन करारनामा व इतर दस्तऐवज लेखापरीक्षणास तपशीलवार खुलासा करून सादर केलेले नाही.

| अ.क्र. | गाळा क्र. | करारनाम्याप्रमाणे भाडेकरुंचे नाव | पावती क्र. व दिनांक / मालमत्ता क्रमांक | भाडेवसुली पावतीवरील नाव |
|---|---|---|---|---|
| 1 | 11 | हजारीमल सो. धनवाणी | मा.क्र.3570 | शोभाराज प. धनवाणी |
| 2 | 14 | कतुमल प. नरसिंधाणी | पा.क्र.37400 दि.19.12.13 | हरीश स. सिंधी |
| 3 | 41 | टाकणदास भिवाचंद | पा.क्र.37308 दि.30.3.13 | रणजीनकांत सा.कटारिया |
| 4 | 42 | हिरदोमल गुरुमल | पा.क.37307 दि.30.3.13 | अजित मोहनराव सुर्यवंशी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5 | 46 | एमहसनहफी ज | पा.क्र.37397 दि.18.12.13 | सौ.अफसाना जैनुद्दिन मणेर |
| 6 | 48 | अब्बास बा. बोजगर | मा.क्र.3604 | पु.सा.कटारीया |
| 7 | 49 | संझामल सि.अहुजा | पा.क्र.37307 दि.30.3.12 | अजित मो.सुर्यवंशी |

अर्धसमास ज्ञापन क्र. 120, दि.25/08/14 चे अनुपालन मालमत्ता विभागाने लेखापरीक्षणास सादर केलेले नाही.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 120 | 25/08/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSVSM6002 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 98 | दिनानाथ मंगेशकर नाट्यगृह सांगली या नाट्यगृहाचे भाडे कमी दराने वसुल केले बाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 13 | मालमत्ता | मनपा | 9ब | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | 15125 | | |

दिनानाथ मंगेशकर नाट्यगृह सांगली हे भाड्याने देण्यात आले आहे. आरक्षण नोंदवही व मालमत्ता व्यवस्थापक यांनी दिलेल्या दरपत्रकानुसार पावत्यांची जमा बाजु तपासली असता भाडे कमी आकारल्यामुळे

महानगरपालिकेचे रु.15125/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाचे 2012-13 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण केले असता, दिनानाथ मंगेशकर नाट्यगृह मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (क) अन्वये असलेल्या अधिकारानुसार भाड्याने दिले जाते. मालमत्ता व्यवस्थापक यांनी दिलेल्या दरपत्रकानुसार नाट्यगृह सकाळ, दुपार व सायंकाळ या तीन समान सत्रात खालील प्रमाणे भाड्याने दिले जाते.

1) प्रथम सत्रासाठी रु. 2000/- भाडे + 250/- सेवाकर

2) व्दितीय सत्रासाठी रु.2250/- भाडे + 280/- सेवाकर

3) तृतिय सत्रासाठी रु.2500/- भाडे + 310/- सेवाकर

तसेच शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीचे दिवशी खालील प्रमाणे भाडे आकारणी केली जाते.

1) प्रथम सत्रासाठी रु. 2250/- भाडे + 280/- सेवाकर

2) व्दितीय सत्रासाठी रु.2500/- भाडे + 310/- सेवाकर

3) तृतिय सत्रासाठी रु.3000/- भाडे + 321/- सेवाकर

1. 2012-13 मध्ये नाट्यगृह भाडे आकारणी करण्याबाबत कोणतेही स्थायी आदेश, ठराव इ. लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. तथापी मालमत्ता विभागाच्या "नाट्यगृह आरक्षण" नोंदवहीनुसार उपरोक्त दराने नाट्यगृह भाड्याने दिल्याचे दिसून आले असून, खालील तक्त्यात नमुद केलेल्या पावत्या व्दारे कमी आकारणी केल्याने मनपाचे रक्कम रुपये 15125/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.

| अ.क्र. | पावतीक्रमांक | दिनांक | नाव | सत्र | वसुलकेलेलेभाडेर.रु. | प्रत्यक्षभाडेर.रु. | फरकर.रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1852 | 3.4.12 | जायंट ग्रुप | III | 1250 | 2500 | 1250 |
| 2 | 1889 | 16.6.12 | अक्षय एज्युकेशन सोसायटी | II | 1250 | 2500 | 1250 |
| 3 | 1883 | 15.7.12 | श्री.महाजन | I व II | 3000 | 4750 | 1150 |
| 4 | 1886 | 20.7.12 | सांगली कुपवाड सिटी सॅलरी ऑनर्स सोसा. | II | 1125 | 2250 | 1125 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 1893 | 17.8.12 | शिवलीक सोसा. | II | 1125 | 2250 | 1125 |
| 6 | 18037 | 2.11.12 | अमित शिंदे | I | 2000 | 2250 | 250 |
| 7 | 18051 | 28.12.12 | माडके गृहउद्योग | I | 1750 | 2250 | 500 |
| 8 | 18064 | 21.1.13 | श्री.वरद | II | 1000 | 2250 | 1250 |
| 9 | 18066 | 31.1.13 | श्री.नितीन सातपुते | I | 2250 | 4750 | 2500 |
| 10 | 18068 | 5.2.13 | प्रताप गरुड | I | 1125 | 2250 | 1125 |
| 11 | 18070 | 7.2.13 | श्रीमती.पाटील | I व II | 2125 | 4250 | 2125 |
| 12 | 18083 | 26.3.13 | शिक्षण अधिकारी (प्राथ.) सांगली | III | 2125 | 4250 | 2125 |
| | | | | | एकूण | | 15125 |

उपरोक्त व्यक्तिकडुन कमी भाडे आकारणी केल्याबाबतचा खुलासा करणेत आलेला नाही. तसेच या संदर्भात सक्षम प्राधिकारी यांचे आदेश, ठराव इ. असल्यास ते लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून दिले नसल्याने संबंधिताकडून उपरोक्त रक्कमेची वसुली करून ते मनपा खाती जमा करणे आवश्यक आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र. 121 दि.25/08/14 चे अनुपालन मालमत्ता विभागाने लेखापरीक्षणास सादर केलेले नाही.

**वसुलपात्र रक्कम :-** रु.15125/-

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 121 | 25/08/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSVSM6002 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 99 | परिवहन कार्यालय (RTO) सांगलीकडून सुधारीत दराने भाडे वसुली न केल्याबाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 13 | मालमत्ता | मनपा | 9ब | 02 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | 606480 | | |

प्रादेशिक परिवहन कार्यालयाने इंडस्ट्रीयल इस्टेट मधील पाणी टाकी आवारात असलेली स्टाफ क्वार्टर्स व त्यालगतचे पत्राशेड असलेली जागा भाड्याने घेतली आहे. त्यांचेकडुन सुधारित दराने भाडे वसुलात येत नसल्यामुळे मनपाचे रु.606480/- इतके आर्थिक नुकसान झाले आहे.

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाचे 2012-13 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करताना असे निदर्शनास आले आहे की, तत्कालीन सांगली नगरपालिका इंडस्ट्रीयल इस्टेट मधील पाणी टाकी आवारात असलेली स्टाफक्वार्टर्स व त्यालगतचे पत्राशेड असलेली जागा ही 1973 पासून परिवहन कार्यालयास (RTO) भाडेतत्वावर देण्यात आलेली आहे. सदर जागा वेळोवेळी मुख्याधिकारी सांगली नगरपालिका यांनी मुदतवाढीने संबंधीत कार्यालयास दिली आहे.

तत्कालीन सांगली नगरपालीकेचे इमारत भाडे हे कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग मिरज यांचेकडून प्रमाणीत केले जात होते. त्यानुसार सदर जागेचे भाडे रु. 405/- प्रती महिना निश्चित केले गेले आहे. याबाबत नगराध्यक्ष सांगली नगरपालिका यांचा ठराव क्र.295 दि.28/01/1992 नुसार दिनांक 31.03.1986 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली असून भाडे रु.405/- दरमहा ठरविण्यात आलेले होते. दिनांक 01.04.1986 पासून तत्काली नगरपालिकेने रु.2210/- दराने भाडे आकारणी करून मुदतवाढ दिली आहे. तथापी, परिवहन कार्यालयाने भाडेवाढीस कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम मिरज यांची मान्यता नाही त्यामुळे भाडेवाढ मान्य नसल्याचे परिवहन कार्यालयाने मनपास कळविले आहे.

1) सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका ही सन 1998 पासून अस्तित्वात आल्यानंतर सदर मालमत्ता ही महानगरपालिकेच्या अधिनस्त असल्याने सुधारित दराने भाडे देयके (मागणीपत्र) देण्यात आलेली आहेत. मात्र परिवहन कार्यालयाकडून अद्याप सुधारित दराने मनपास भाडे अदा केले जात नाही. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

दिनांक 01.04.1986 पूर्वीचा भाडेदर रु.405/- दरमहा.

दिनांक 01.04.1986 नंतरचा भाडेदर रु.2210/- दरमहा.

दिनांक 01.04.1986 ते 31.03.2014 पर्यंत 405 दराने वसुल भाडे रु.405 X 12 महिने = 4860 X 28 वर्षे = 136080/-

सुधारित भाडे 2210 X 12 महिने X 28 वर्षे = 742560/-

फरक = 742560 - 136080 = रु.606480/-

| |
|---|
| 2)प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून सुधारित दराने भाडे वसुलात येत नसल्यामुळे मनपाचे रु.606480/- इतके आर्थिक नुकसान होत असल्याने मालमत्ता विभागाने परिवहन कार्यालयास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 81 ब (1) (अ) (एक) नुसार महानगरपालिकेच्या जागांचा भोगवटा करणा-या व्यक्तीने त्याच्याकडून कायदेशीररित्या येणे असलेले भाडे किंवा कर दोन महिन्याच्या अधिकच्या मुदतीत दिलेली नसल्यास मुंबई प्रांतिक महानगरलिका अधिनियम 1949 चे कलम 81 ब (2) अन्वये काढून टाकण्याबाबत नोटीस देणे आवश्यक असता ती देण्यात आलेली नाही. तसेच भाड्याचा फरक रु. 606480/- वसूल केलेला नाही.<br>अर्धसमास ज्ञापन क्र.122 दि.25/08/14 चे अनुपालन मालमत्ता विभागाने लेखापरीक्षणास सादर केलेले नाही.<br>वसुलपात्र रक्कम रुपये 606480/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 122 | 25/08/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSVSM6002 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 100 | लक्ष्मी मार्केट मिरज येथील सेतू कार्यालयास भाड्याने दिलेल्या गाळ्याचे भाडे वसूल केले नसले बाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 13 | मालमत्ता | मनपा | 9ब | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | 176967 | | |

| |
|---|
| तहसीलदार मिरज यांचे पत्र क्र.एमएजी/कावि/109 दि.24/06/2009 नुसार शासकीय दराप्रमाणे मनपास भाडे देण्यास तयार असल्याचे पत्र संबंधित कार्यालयाकडून मनपास देण्यात आलेले असतानाही विभागाने भाडे |

करारनामा न करता सदर जागा तहसीलदार मिरज यांचेकडे हस्तांतरीत केली आहे. तसेच 2012-13 या आर्थिक वर्षाअखेर तहसिलदार कार्यालयाने भाडे भरले नसल्यामुळे महानगरपालिकेचे रु.176967/- थकीत राहिले आहेत.

1)सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेचे 2012-13 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण केले असता असे निदर्शनास आले आहे की मालमत्ता विभागाचे अधिनस्त असलेल्या लक्ष्मी मार्केट मिरज मधील पहिल्या माळ्यावरील 63.46 चौ.मी. हॉल व 7.98 चौ.मी. क्षेत्र असलेला गाळा तहसीलदार कार्यालय मिरज यांना सेतू कार्यालयासाठी दिनांक 02.07.2009 पासून रु.3500/- दरमहा प्रमाणे भाडे तत्वावर देण्यात आलेला आहे. सदर नस्तीचे लेखापरीक्षण केले असता महानगरपालिकेचे तहसिलदार कार्यालयाचे रु.176967/- भाडे थकीत आहे.

| अ. क्र. | आर्थिक वर्ष | कालवधी महिने | दरमहा भाडे दर रुपये | एकूण मागणी रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | 2009-10<br>(02.7.09 ते 31.3.10) | 9 | 3500/- | 31500/- |
| 2 | 2010-11 | 12 | 3500/- | 42000/- |
| 3 | 2011-12 | 12 | 3500/- | 42000/- |
| 4 | 2012-13 | 12 | 3500/- | 42000/- |
| | | | एकूण भाडे | 157500/- |
| | | | सेवाकर | 19467/- |
| | | | एकूण | 176967/- |

तहसीलदार मिरज यांचे पत्र क्र.एमएजी/कावि/109 दि.24/06/2009 नुसार शासकीय दराप्रमाणे मनपास भाडे देण्यास तयार असल्याचे पत्र संबंधित कार्यालयाकडून मनपास देण्यात आलेले असतानाही विभागाने भाडे करारनामा न करता सदर जागा तहसीलदार मिरज यांचेकडे हस्तांतरीत केली आहे. तसेच 2012-13 या आर्थिक वर्षाअखेर तहसिलदार कार्यालयाने भाडे भरले नसल्यामुळे महानगरपालिकेचे रु.176967/- इतके भाडे थकीत आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 81 ब (1) (अ) (एक) नुसार महानगरपालिकेच्या जागांचा भोगवटा करणा-या व्यक्तीने त्याच्याकडून कायदेशीररित्या येणे असलेले भाडे किंवा कर दोन महिन्याच्या अधिकच्या मुदतीत दिलेली नसल्यास मुंबई प्रांतिक महानगरलिका अधिनियम 1949 चे कलम 81 ब (2) अन्वये काढून टाकण्याबाबत नोटीस देणे आवश्यक असता ती देण्यात आलेली नाही. तसेच भाडे रक्कम रु.176967/- वसूल केलेला नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र.123 दि. 25/8/14 चे अनुपालन मालमत्ता विभागाने लेखापरीक्षणास सादर

| |
|---|
| केलेले नाही.<br><br>**वसुलपात्र रक्कम:- रुपये 176967/-** |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 123 | 25/08/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSVSM6002 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 101 | मालमत्ता विभागाने भाडे मागणी देयके वेळीच वितरीत न केल्याने झालेले आर्थिक नुकसानी बाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 13 | मालमत्ता | मनपा | 9ब | 03 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | 4236633 | | |

| |
|---|
| महासभा ठराव क्र.94 दि.18/12/2008 नुसार महानगरपालिकेच्या ज्या जागा, गाळे भाडयाने दिल्या आहेत व ज्यांचे भाडे थकीत आहे. ती थकबाकी वसुलात आणणेसाठी एप्रिल ते सप्टेंबर व ऑक्टोबर ते मार्च या सहा सहा महीन्याची बीले देवून भाडे वसुलीसाठी प्रशासनाने कार्यप्रणाली अवलंबिण्यात यावी असे महासभेने आदेश दिले असतानाही प्रशासनाने देयके एप्रिल ऐवजी ऑक्टो.12 मध्ये दिल्याने रु.70610556/- या मागणी रक्कमेवर 3 महिन्याचे दरमहा 2 टक्केप्रमाणे 6 टक्के व्याजाची रक्कम रु.4236633/- चे आर्थिक नुकसान झाले आहे. |

| |
|---|
| सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या अधिनस्त मालमत्ता विभागाचे 2012-13 या वित्तीय वर्षाचे |

लेखापरीक्षण केले असता असे निदर्शनास आले आहे की, मालमत्ता विभागाने त्यांच्या विविध मालमत्ता उदा.व्यापारी गाळे, खोकी, इमारती व मोकळ्या जागा विविध संस्था, नागरिक यांना भाड्याने दिलेल्या आहेत. सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाची 2012-13 या वित्तीय वर्षाची गाळेधारकांना दिलेली मागणी देयके तपासली असता मागणी देयके महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम क्र.77, नमुना क्र.48 अन्वये माहे सप्टेंबर 2012 मध्ये तयार करून ती माहे ऑक्टोबर मध्ये वितरीत केली आहेत. त्यामध्ये संबंधित भाडे गाळेधारकांनी देयकाची रक्कम बिल मिळाल्या पासून 15 दिवसात जमा करणे बाबत सूचना देयकावर देण्यात आलेल्या आहेत.

1)मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 8 कराधान नियम, कर गोळा करणे मधील नियम 30 नुसार मालमत्ता करापैकी प्रत्येक कर हा प्रत्येक वर्षी 1 एप्रिल व 1 ऑक्टोबर रोजी याप्रमाणे सहामाही हप्त्याप्रमाणे अगावु देणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे इस्टेट विभागाने गाळेधारकांना 2012-13 या आर्थिक वर्षातील गाळेभाड्याची मागणी बिले एप्रिल महिन्यात देणे आवश्यक असता ती विलंबाने माहे ऑक्टोबर 2012 मध्ये वितरीत केली आहेत.

2)मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 8 कराधान नियम, कर गोळा करणे मधील नियम 39 नुसार कोणताही मालमत्ता कर किंवा वाहने,नावा व जनावरे यावरील कर किंवा ज्या कराच्या बाबतीत तो मालमत्ता कर वसुल करण्यासाठी तरतुद केलेल्या रितीने वसूल करता येईल, असे या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार जाहीर करण्यात आले असेल असा कोणताही कर किंवा अशा कोणत्याही कराचा कोणताही हप्ता देय होईल तेंव्हा, आयुक्ताने फारसा विलंब न करता, उक्त कर भरण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीस, तीने देय असलेल्या रकमेचे बिल देण्याची व्यवस्था केली पाहीजे. असे असतानाही 2012-13 या आर्थिक वर्षाची मागणी देयके गाळेधारकांना एप्रिल ऐवजी माहे ऑक्टोबर 2012 मध्ये विलंबाने पाठविली असल्याने माहे एप्रिल 2013 ते ऑक्टो. 2013 या सहा महिन्याच्या कालावधीत महानगरपालिकेस प्राप्त होणारा महसूल व त्यावर प्राप्त होणारे व्याजास मुकावे लागल्याचे दिसून आले आहे. याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

2012-13 या वित्तीय वर्षातील चालू मागणी 13716391/-
2012-13 या वित्तीय वर्षातील थकबाकी मागणी 56894165/-

--------------------------------------

एकूण रु. 70610556/-

--------------------------------------

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसूची ड प्रकरण 8 नियम क्र. 41 (1) नुसार पहिल्या सहामाही कराची रक्कम, बील दिल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत भरावयाची आहे आणि बीलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे दुस-या सहामाही कराची रक्कम प्रत्येक वर्षाच्या 31 डिसेंबरपूर्वी

| |
|---|
| भरावयाची आहे आणि जर रक्कम भरावयास पात्र असणा-या व्यक्तीने उपरोक्तप्रमाणे आवश्यक असल्याप्रमाणे कराची रक्कम भरली नाही तर, अशी अदत्त कराची रक्कम किंवा त्या रकमेचा भाग याव्यतिरिक्त, त्याने ज्या दिनांकापर्यंत असा कर भरावयाचा होता, त्या शेवटच्या दिनांकानंतर प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी अशा कराच्या दोन टक्के इतकी रक्कम, शास्ती म्हणून भरण्यास तो जबाबदार असेल आणि बिलाची पूर्ण रक्कम येईपर्यंत अशी शास्ती भरण्यास जबाबदार असण्याचे चालू राहिल आणि प्रत्येक वर्षाच्या अधिनियम 2009 च्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी या अधिनियमान्वये ज्यासाठी बिल देण्यात आले आहे. असा कोणताही मालमत्ता कर पूर्णपणे किंवा अंशतः अदत्त राहीला असेल, ज्या व्यक्तीने असा कर भरलेला नाही ती व्यक्ती उक्त 2009 च्या सूधारणा अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास व दिनांकापासून, या कलमान्वये तरतूद केल्या प्रमाणे, अशा करावरील शास्ती भरण्यास जबाबदार असेल. मालमत्ता विभागाने गाळेधारकांना मागणी देयके एप्रिल ऐवजी ऑक्टोबरमध्ये दिली असल्याने 3 महिन्याचे दरमहा 2 टक्केप्रमाणे रु.70610556/- या रक्कमेवर 6 टक्के व्याजाची रक्कम रु.4236633/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.<br>3)महासभा ठराव क्र.94 दि.18/12/2008 नुसार महानगरपालिकेच्या ज्या जागा, गाळे भाडयाने दिल्या आहेत व ज्यांचे भाडे थकीत आहे. ती थकबाकी वसुलात आणणेसाठी एप्रिल व ऑक्टोबरमध्ये सहा महीन्याची बीले देवून भाडे वसुलीसाठी प्रशासनाने कार्यप्रणाली अवलंबिण्यात यावी असे महासभेने आदेश दिले असतानाही प्रशासनाने गाळेधारकांना ऑक्टोबर 2012 मध्ये मागणी बीले वितरीत केली आहेत.<br><br>अर्धसमास ज्ञापन क्र.140, दि.19/9/14 रोजी निर्गमित केला असून मालमत्ता विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले नाही.<br>**वसुलपात्र रक्कम रुपये 4236633/-** |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 140 | 19/09/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSVSM6002 |
|---|---|

| 102 | मिरज विभागाकडील मालमत्तेच्या थकीत भाडे वसुलीसाठी नियमानुसार कार्यवाही होत नसल्या बाबत. |
|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव |
| | |

| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 13 | मालमत्ता | मनपा | 9ब | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | 23395607 | | |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील प्रकरण 8 अ चे कलम 81 ब प्रमाणे (1) अ (एक) अन्वये भाडे किंवा कर हे दोन महिने पेक्षा जास्त कालावधी पर्यंत थकीत असतील अशा सर्व भाडेधारकांना नोटीस देणे आवश्यक आहे. तसेच उपरोक्त (1) अन्वये दिलेल्या आदेशाचे पालन करण्याचे नाकारील त्यास सदर जागेतुन काढून टाकून मालमत्ता महानगरपालिकेच्या ताब्यात घेणे आवश्यक होते. परंतु मिरज विभागाकडील मालमत्ता कराचे रु.2,33,95,607/- थकीत असताना थकीत भाडेधारकांचे विरुध्द वरील नियमाप्रमाणे कारवाई केलेली नाही.

1. मिरज विभागातील मालमत्ता विभागाचे वित्तीय वर्ष 2012-13 या कालावधीचे लेखापरीक्षण केले असता खाली नमुद केलेल्याप्रमाणे 2012-13 अखेर विविध मालमत्तांचे भाडे थकीत असल्याचे दिसून आले आहे. थकबाकी वसुलीसाठी विभागाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण 8 अ चे कलम 81 ब (1) अ (एक) अन्वये भाडे किंवा कर हे दोन महिने पेक्षा जास्त कालावधी पर्यंत थकीत असतील अशा सर्व भाडेधारकांना नोटीस देणे आवश्यक होते. तसेच कोणतीही व्यक्ती कलम 81 ब (3) नुसार पोटकलम (1) अन्वये दिलेल्या आदेशाचे पालन करण्याचे नाकारील त्यास सदर जागेतुन काढून टाकून मालमत्ता मनपाच्या ताब्यात घेणे आवश्यक होते. तथापि मालमत्ता विभागाने याबाबत कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे मनपास मोठ्या प्रमाणावर मिळणा-या हक्काच्या उत्पन्नापासून वंचीत रहावे लागल्याचे दिसून येते. सदर मालमत्तांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | मालमत्तेचा तपशील | 2012-13 अखेर थकीत भाडे व सेवाकर यांची एकूण रक्कम रु. |
|---|---|---|
| 1 | गणेश मार्केट :- दुकाने, हॉकर दुकाने, पुजा स्टॉल | 625380/- |
| 2 | धोबी कट्टा | 23498/- |
| 3 | लक्ष्मी मार्केट :- दुकाने, भाजी पाला स्टॉल आणि नवीन स्टॉल, आतील बाजू दुकाने, पुर्व कमान दुकाने, पश्चिम कमान दुकाने, दक्षिण कमान दुकाने, उत्तर कमान दुकाने, पहिला मजला. | 2423084/- |

| | | |
|---|---|---|
| 4 | प्रकाश शॅापिंग सेंटर पहिला मजला | 221798/- |
| 5 | कै.बापूसाहेब जामदार व्यापारी संकुलन अ व ब बाजु दुकाने | 404734/- |
| 6 | महासाधु आण्णाबुवा महाराज शॉपिंग सेंटर अ , ब व क बाजु पहिला मजला | 2755170/- |
| 7 | हजरत खॉजा शमना मिरा शॉपिंग सेंटर स्टेशन रोड दुकाने, पहिला मजला, आंबेडकर रोड दुकाने, आंबेडकर रोड पहिला मजला व दुसरा मजला. | 2096349/- |
| 8 | बालबंधर्व नाट्यगृह समोरील दुकाने | 46276/- |
| 9 | शिवाजी पॅव्हेलियन जवळील दुकाने | 49454/- |
| 10 | किसान मार्केट जवळील दुकाने | 137789/- |
| 11 | जुने मार्केट दुकाने | 136323/- |
| 12 | म.न.पा.दवाखाना केबीन दुकाने | 31854/- |
| 13 | प्राथमिक शिक्षण मंडळ | 4028087/- |
| 14 | खुली जागा भाडे | 5060322/- |
| 15 | मनपा खोके | 1144886/- |
| 16 | खासगी खोके | 4110603/- |
| | एकूण | 2,33,95,607/- |

अर्धसमास ज्ञापन क्र.141, दि.19/9/14 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील 81-ब(2) नुसार थकबाकी वसुलीसाठी गाळेधारकांना नोटीसा दिल्याबाबत व मालमत्ता महानगरपालिकेने ताब्यात घेतल्याबाबतची माहिती लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेली नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र.141, दि.19/9/14 चे अनुपालन मालमत्ता विभागाने सादर केलेले नाही.

**वसुलपात्र रक्कम रु. 2,33,95,607/-**

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 141 | 19/09/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSVSM6002 |

| 103 | थकीत भाडे वसूली बाबतचे दप्तर लेखापरीक्षणास सादर केले नसलेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 13 | मालमत्ता | मनपा | 9अ | 02 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | 52656392 | | |

मिरज विभागाकडील मालमत्ता नोंदवहीची तपासणी केली असता महानगरपालिकेच्या गाळयांच्या थकबाकीदारांचे दप्तर लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेले नाही. सदर मालमत्ताधारकांकडे 2012-13 या आर्थिक वर्षाअखेर एकुण थकबाकी रु.52656392/- असल्याचे दिसुन येते.

42. मिरज विभागातील मालमत्ता विभागाचे वित्तीय वर्ष 2012-13 चे मालमत्ता नोंदवहीचे लेखापरीक्षण केले असता खाली नमूद केलेल्या मनपाच्या मालमत्तेचे भाडे 2012-13 या आर्थिक वर्षा अखेर थकीत असल्याचे दिसून आले आहे. थकबाकी वसूलीसाठी मालमत्ता विभागाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण 8 अ, कलम 81 (ब) , प्रमाणे (1) अ (एक) नुसार मालमत्तेचे भाडे अथवा कर हे दोन महिनेपेक्षा जास्त कालावधीपर्यंत थकीत असल्यास अशा सर्व थकबाकीदारांना भाडे जमा करणेबाबत नोटीस देणे आवश्यक होते. तसेच उपरोक्त अधिनियमातील पोट कलम 3 अन्वये जी व्यक्ती उपरोक्त पोटकलम 1 अन्वये दिलेला आदेशाचे पालन करणार नाही अथवा पालन करण्यास नकार देईल त्यांचेकडून सदरची मालमत्ता काढून मनपाच्या ताब्यात घेणे आवश्यक असताना मालमत्ता विभागाने काहीही कार्यवाही केल्याचे लेखापरीक्षणास दिसून आले नाही. सदर मालमत्ता विभागाने ताब्यात न घेतल्याने / भाडे वसुली वेळीच न केल्यामुळे मनपाचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे. मालमत्ता विभागाने महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 110 नुसार मालमत्तांच्या भाड्याचे मागणी पुस्तक नमुना क्रमांक 81 प्रमाणे ठेवलेले असुन सदर मागाणी पुस्तकाचे लेखापरीक्षण केले असता थकबाकीधारकांचे नाव व शिल्लक थकबाकीचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | मिळकत गाळा क्र. | थकबाकीदाराचे नाव | सन 2012-13 अखेर थकबाकी व सेवाकर | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | कामगार सोसा.मीरज | 48896+8062 | 56958/- |
| 2 | 14 व 15 | विलास विठ्ठल शिंदे | 235836+14952 | 250780/- |
| 3 | 5 | आबासाहेब शिंदे म्हैसाळकर ज्ञान | 305417+9169 | 314586/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रबोधिनी मिरज | | |
| 4 | 7 | आर.के. मेडीकल सेंटर मिरज | 80963+3003 | 83966/- |
| 5 | 2 | दत्त नागरी पतसंस्था मिरज | 31108+6834 | 37938/- |
| 6 | 1 | ब्राह्मणपूरी सि.स.नं.1778 | 335040+27607 | 362647/- |
| 7 | 2 | गुरुवारपेठ सि.स.नं.3330 | 774720+63847 | 838567/- |
| 8 | 3 | कनवाडकर हॉल सि.स.नं.7902 | 559200+46080 | 605280/- |
| 9 | 4 | कनवाडकर हॉल सि.स.नं.7903 | 432960+35674 | 468634/- |
| 10 | 5 | उदगांव वेस सि.स.नं.7320 | 120960+9967 | 130927/- |
| 11 | 6 | ब्राह्मणपुरी सि.स.नं.1857 | 716160+59014 | 775174/- |
| 12 | 7 | कनवाडकर हॉल सि.स.नं.2084 | 782400+64468 | 846868/- |
| | | एकूण | 4423648+348677 | 4772345/- |

43. मालमत्ता विभागाकडील मालमत्ता नोंदवहीची तपासणी केली असता खाली नमुद केलेल्या संस्था/व्यक्ती यांनी मनपाची जागा सोडून गेल्यामुळे (अ.क्र.1 ते 4) तसेच भाडेवाढीबाबत वाद निर्माण झाल्यामुळे (अ.क्र.5 व 6) झालेले नुकसान / आर्थिक हानी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मिळकत गाळा अगर खुली जागा | थकबाकीदार संस्थेचे नाव | सन 2012-13 अखेर थकबाकी व सेवाकर | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | 3 | प्राथमिक शिक्षण संस्था मिरज | 598560+00 | 598560/- |
| 2 | | नव महाराष्ट्र एज्युकेशन सोसा.मिरज | 99345+3003 | 102358/- |
| 3 | 8 | नव महाराष्ट्र एज्युकेशन सोसा.मिरज | 408073+12205 | 420278/- |
| 4 | 1 | सचिव आझाद शिक्षण संस्था,मिरज | 1808520+74303 | 1882823/- |
| 5 | 1 | सिध्दीविनायक गणपती कॅन्सर हॉस्पीटल | 44601731+91430 | 44693161/- |
| 6 | 1 | महाराष्ट्र शासन दुकाने व संस्था निरिक्षक यांचे कार्यालय | 177289+9588 | 186877/- |
| | | एकूण | 47693218+190829 | 47884047/- |

उपरोक्त मालमत्तेच्या नस्ती लेखापरीक्षणासाठी अर्धसमास ज्ञापन क्र.142, दि.19/09/14 ने मागणी करुनही उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. तथापि मालमत्ता मागणी नोंदवही नमुना महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नमुना 81 नियम 110 (1) नुसार 2012-13 या आर्थिक वर्षाअखेर थकीत असलेल्या रक्कमा वसूलीसाठी मालमत्ता विभागाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील आवश्यक त्या पुराव्यासह लेखापरीक्षणास सादर केलेला नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र.142, दि.19/09/14 चे अनुपालन मालमत्ता विभागाने सादर केलेले नाही.

**वसुलपात्र रक्कम रु. 52656392/-**

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 142 | 19/09/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSVSM6002 |

| 104 | वॉ.क्र.53 मध्ये सौर पथ दिवे पुरविणे व बसविणे या कामातील अनियमिततेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 05 | सार्व.बांधकाम विद्युत | मनपा | 9ड | 03 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 492000 | | | |

निविदेतील अटीनुसार 11 वॅटचे पथदिवे खरेदी बाबतचा प्रस्ताव आयुक्त यांनी मान्य केला होता. परंतु अंदाजपत्रक 2011-12 च्या DSR नुसार 18 वॅट सोलर पथदिवे यासाठीचा दर प्रती पॅनल रु.20500/- याप्रमाणे करुन सौरदिवे खरेदी केली आहे. निविदा अटी नुसार सुरक्षा अनामत पोटी निविदा किमतीच्या 5% रक्कम रु.24,600/- रोखीने महानगरपालिकेच्या खाती जमा न करता ठेकेदाराने रु.12300/- ,पावती क्रमांक 40727 ने दि.23.01.2013 अन्वये भरणा केली असून उर्वरित अनामत रक्कम देयकामधून कपात करुन घेतली आहे. निविदा अटीनुसार सुरक्षा अनामतीची पुर्ण रक्कम ठेकेदाराकडुन भरुन न घेताच ठेकेदारासोबत करारपत्र करुन त्याला कार्यादेश देण्यात आला आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.53 अंतर्गत ठिकठिकाणी 11 वॅट क्षमतेचे सौर पथ दिवे पुरवठा करणे व बसविणे बाबत महाऊर्जा 2011-12 च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक तयार करणेत आले असुन सदर एकुण 24 नग सौर दिवे पुरविणे व बसविणे या कामास रु.492000/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर नस्तीची तपासणी केली असता तसेच निविदेतील अटीनुसार 11 वॅटचे पथ दिवे

खरेदी बाबतचा प्रस्ताव आयुक्त यांनी मान्य केला होता. परंतु अंदाजपत्रक 2011-12 च्या DSR नुसार 18 वॅट सोलर पथदिवे यासाठीचा दर प्रती पॅनल रु.20500/- प्रमाणे केले आहे. त्यानुसार सदर कामगिरी करणेबाबत दै.सत्यदूत या वृत्तपत्रामध्ये जाहिर निविदा कामगिरी बाबत रितसर ई निविदा मागविण्यात आल्या होत्या. मुदतीत तीन निविदा प्राप्त झाल्या असुन निविदा समितीसमोर दि.07/11/12 रोजी उघडण्यात आल्या आहेत. सर्वात कमीची निविदा मे.तारा एजन्सी यांची 9.90 टक्के जादाची मान्य करण्यात आली आहे. सदर ठेकेदाराबरोबर दराबाबत वाटाघाटी केल्या असता ठेकेदाराने अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास मान्यता दिली आहे.

निविदा सूचना :- 2/2011-12

अंदाजपत्रकिय रक्कम रुपये :- 5,00,000/-

निविदा रक्कम रुपये :- 4,92,000/-

लेखाशिर्ष:-12/13 अर्थसंकल्पीय व्दिनोंद कोड 051)3)इतर योजना 41846)वॉर्ड क्र.53 मध्ये विविध ठिकाणी सौर दिवे लावणे.

प्रमाणक क्र.3798 दि.26.03.2013 रु.492000/-

तांत्रिक मान्यता :- क्र.16 दि.13.07.2012

प्रशासकीय मान्यता :- आयुक्त यांचा मंजुरी आदेश क्र.816/12-13, दि.16.01.2013

पुरवठादाराचे नांव :- मे तारा एजन्सी.

कार्यादेश दि. 06.02.2013

कामाची मुदत :- 30 दिवस

उपरोक्त नस्तीचे लेखापरीक्षण करून अर्धसमास ज्ञापन क्र.163 दि.04/10/2014 रोजी निर्गमित केला असुन विद्युत विभागाने त्याचे अनुपालन दि.22/10/2014 रोजी सादर केले आहे. सदर अनुपालन तपासून खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण पुणे यांचे जा.क्र.PAD-001/2003-4 4572 दि.25.08.2003 अन्वये श्री.सुर्यज्योती सोलर इक्युपमेंट प्रा.लि., अदित्य सोलर शॉपी यांना सदर कामासाठी मान्यता देण्यात आली आहे. तथापी पुरवठादाराने टेंडर भरताना मे. तारा एजन्सी यांच्या नावे निविदा भरली असून मे. तारा एजन्सीस महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण पुणे यांची मान्यता नसताना ती मान्य करण्यात आली आहे.

| |
|---|
| अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालना मध्ये सदर कामी सौरज्योती सोलर इक्विपमेंट प्रा.लि. यांनी मे.तारा एजन्सी यांना सदर कामगिरी करणेबाबत आधिकारपत्र दिलेने त्यांचे नावे निविदेस मान्यता दिलेचे नमुद आहे. परंतु सौरज्योती सोलर इक्विपमेंट प्रा.लि. यांना इतर एजन्सीसना प्राधिकृत करण्याचा अधिकार असलेचे अधिकारपत्र दाखविण्यात आले नसल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.<br><br>2)सदर नस्तीची तपासणी केली असता तसेच निविदेतील अटीनुसार 11 वॅटचे पथ दिवे खरेदी बाबतचा प्रस्ताव आयुक्त यांनी मान्य केला होता. परंतु अंदाजपत्रक 2011-12 च्या DSR नुसार 18 वॅट सोलर पथदिवे यासाठीचा दर प्रती पॅनल रु.20500/- प्रमाणे केले आहे. 11 वॅटचे सौर पथदिवे बसविण्याचे मान्य केले असता 11 Watt च्या पथ दिव्यांचे अंदाजपत्रक तयार करुन त्याप्रमाणे निविदा प्रसिध्द करणे आवश्यक असता 18 Watt प्रमाणे निविदा काढण्यात आल्या आहेत. प्रस्तावाप्रमाणे 11 वॅट सौर दिव्यांची खरेदी करणे आवश्यक असता 18 वॅट सौर दिव्यांची खरेदी केल्याने अनावश्यक खरेदी केल्याचे दिसुन येते. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये सदर कामासाठी तयार केलेल्या अंदाजपत्रकामध्ये नजरचुकीने 11 वॅट सोलर पथ दिव्याऐवजी 18 वॅट सोलर पथदिवे पुरविणे व बसविणे असे झाले आहे. सदर रु.20500/- हा दर 11 वॅट सोलर पथदिव्यांचा असुन याबाबत महाऊर्जा,पुणे यांची सन 2011-12 ची दरसूचीची छायांकीत प्रत या सोबत जोडल्याचे नमुद आहे. परंतु दरसूची दाखविली नसल्याने रुपये 4,92,000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.<br><br>3)निविदा अटी नुसार सुरक्षा अनामत पोटी निविदा किमतीच्या 5% रक्कम रु.24,600/- रोखीने महानगरपालिकेच्या खाती जमा करणे आवश्यक असताना ठेकेदाराने रु.12300/- ,पावती क्रमांक 40727 ने दि.23.01.2013 अन्वये भरणा केल्याचे दिसून येते. तसेच उर्वरित रक्कम देयकामधून वजाती केली आहे. निविदा अटीनुसार सुरक्षा अनामतीची पुर्ण रक्कम ठेकेदाराकडुन भरुन न घेताच ठेकेदारासोबत करारपत्र करुन त्याला कार्यादेश देण्यात आला आहे.<br><br>**आक्षेपाधिन रक्कम रु.492000/-** |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 163 | 04/10/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSVSM6002 |
|---|---|

| 105 | महानगरपालिका हद्दीत ट्रॅफीक सिग्नल करीता एल.ई.डी. लॅम्पहेड बसविणे व तत्सम |
|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दुरुस्ती. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 05 | सार्व.बांधकाम विद्युत | मनपा | 9ब | 03 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 1165346 | | | |

विद्युत विभागाने ट्रॅफीक सिग्नल करीता बसविण्यात आलेल्या एल.ई.डी. दिव्यांची संख्या महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्र.147 प्रमाणे नमुना क्र.119 मध्ये नोंदविणे आवश्यक असता ती नोंदविण्यात आलेली नाही.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या विद्युत विभागाच्या ट्रॅफीक सिग्नल करीता एल.ई.डी. लॅम्पहेड बसविणे या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता दिलेल्या मंजूरी बाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये 1) विश्रामबाग चौक -70 एल.ई.डी. दिवे , 2)सिव्हील हॉस्पिटल चौक -56 एल.ई.डी. दिवे , 3) कलेक्टर बंगला चौक - 30 एल.ई.डी. दिवे व मिरज येथील महात्मागांधी चौक -40 एल.ई.डी. दिवे ट्रॅफीक सिग्नल करीता एल.ई.डी.. लॅम्पहेड बसविणे व तत्सम दुरुस्ती करीता रितसर ई निविदा क्रमांक :- 6/2011-12 दै.केसरी या वर्तमान पत्रामध्ये दि.30/11/2011 रोजी प्रसिध्द करण्यात आली व दै.केसरी या वर्तमान पत्रामध्ये शुध्दीपत्रक देवुन निविदेची मुदत दिनांक 29/12/2011 पर्यंत वाढविण्यात आली असुन ई निविदा मागविण्यात आल्या होत्या. मुदतीत एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या असुन निविदा समिती समोर दिनांक 21/1/2012 रोजी उघडण्यात आल्या आहेत. तीन निविदाकारापैकी मे.न्युक्ली ऑनिक्स, पुणे यांची प्राप्त निविदा प्रसिद्धी दरापेक्षा 33.5 % एवढी कमी दराची असल्याने स्थायी समिती ने सभा क्र.02 ठराव क्र.39 दिनांक 24/4/2012 ने मान्य करण्यात आली आहे. उपरोक्त कामाच्या नस्तीचे व मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता पृष्ठ क्र.1164 ते 1166 वर कामाची नोंद असुन काम सुरु दि.03/12/12 रोजी झाले असुन काम दि. 02/01/2013 रोजी पुर्ण झाले आहे.

लेखाशिर्ष :- ट्रॅफिक सिग्नल बसविणे सोलर उर्जा

अंदाजपत्रकीय रक्कम रु.1752400/-

प्रमाणक क्रमांक :- 7612 दि. 30.03.2012 रक्कम रुपये 11,65,346/-

व्दिनोंद क्र.बी-1112

तांत्रिक मान्यता :- क्र.41/2011-12 दि.29.07.2011

प्रशासकीय मान्यता :- 282/2011-12 दि.11.11.2011

पुरवठादार :- मे. न्युक्ली ऑनिक्स पुणे, (33.5% कमी दराने)

लेखापरीक्षण केले असता खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1. विद्युत विभागाने ठेकेदाराला करार पत्र करणे व सुरक्षा अनामत भरणेची समज दि.01/6/2012 रोजी दिली असुन निविदा अट क्र.8 नुसार ठेकेदाराने सुरक्षा अनामत निविदा रकमेच्या 5 % म्हणजेच रु.87620/- रोखीने भरणा करून करारपत्र करणे आवश्यक होते परंतु ठेकेदाराने निविदा रकमेतून 33.5% कमी दराने निविदा स्विकारल्याने निविदा रक्कम रु. 1752400/- मधून रु. 587054/- वजा करून येणारी रक्कम रु.1165346/- वर 5 % सुरक्षा अनामत रु. 87620/- ऐवजी कमी रक्कम रु. 29200/- पावती क्र. 14984 दिनांक 5/06/2012 अन्वये भरणा केली असून विदयुत विभागाने त्यांना काम करण्याची मान्यता दिली आहे. वास्तविक पूर्ण अनामत रक्कम रु. 87620/- भरणा केल्याशिवाय करारपत्र स्वीकारणे अयोग्य आहे.

अर्धसमास पत्र क्र.64 दिनांक 4/10/2014 चे अनुपालन विभागाने दिनांक 22/10/2014 रोजी सादर केले असून त्यानुसार करारपत्रात सुरक्षा अनामत रु.58400/- ऐवजी नजरचुकीने रु. 87620/- समाविष्ट केल्याचे नमूद केले आहे. सदर खुलासा अमान्य करण्यात येत आहे.

2. ठेकेदाराने महानगरपालिकेबरोबर केलेल्या करारपत्रामध्ये कामाची मुदत 90 दिवस नमुद आहे. करारपत्रावर महानगरपालिकेचे सील स्थायी समितीच्या दोन सदस्यांच्या उपस्थितीत लावले असुन त्यावर नगरसचिव विभागाचा जावक क्र.130 दि.13/7/12 नमुद आहे. परंतु विद्युत विभागाने ठेकेदारास कामाचा कार्यादेश दि.19/10/2013 रोजी तीन महिने विलंबाने दिलेला आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये ठेकेदाराबरोबर वारंवार संपर्क साधला असता मक्तेदाराकडुन करारपत्रावर स्वाक्षरी होणेस विलंब झाला असल्याने कार्यादेश देण्यास विलंब झाला असल्याचे नमुद आहे. वास्तविक स्वाक्षरीत

| |
|---|
| करारनामा मुदतीत करून देणे मक्तेदाराची जबाबदारी असून तो त्यांनी उशिराने सादर केल्याने कामाचे आदेश उशिरा दिले हे  अनुपालन संयुक्तिक नसल्याने ते अमान्य करण्यात येत आहे.<br><br>3.  विद्युत विभागाने बसविण्यात आलेल्या दिव्यांची संख्या महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्र.147 प्रमाणे नमुना क्र.119 मध्ये नोंदविणे आवश्यक आहे. नमुना नोंदवही क्र.119 लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नसल्याने दिव्यांची नोंद नोंदवहीस नोंदविल्याचे लेखापरीक्षणात तपासता आलेले नाही. मक्तेदाराला बिलाची रक्कम अदा करताना प्रमाणक क्र.7612 दिनांक 30/03/2013 वर प्रत्येक ठिकाणी बसविलेल्या LED दिव्यांची संख्या नमूद केलेली असून त्यानुसार प्रदान केले आहे. विभागाने सादर केलेल्या दिनांक 22/10/2014 अनुपालनामध्ये दिव्यांची नोंद नमुना क्र.119 मध्ये केली नसल्याचे मान्य केले आहे.<br><br>अर्धसमास ज्ञापन क्र.164 दि.04/10/2014 रोजी निर्गमित केला असुन विद्युत विभागाने त्याचे अनुपालन दि.22/10/2014 रोजी सादर केलेले असले तरी उपरोक्त  खुलासा समाधानकारक नसल्यामुळे तो मान्य करता येत नाही.<br><br>आक्षेपाधिन रक्कम रु. 1165346/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 164 | 04/10/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSVSM6002 |

| 106 | मासिक विद्युत देयकांच्या रक्कमा आदा करताना सवलत कालावधीचा फायदा न घेतल्याने झालेले नुकसानी बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 05 | सार्व.बांधकाम विद्युत | मनपा | 9ब | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 48317 | | | |

विद्युत विभागाने मार्च, 2013 या महिन्यात वीज देयकांची रु.4831690/- एवढी रक्कम अंतीम तारखेला (दि.28.03.2013) वीज वितरण कंपनीस आदा केलेली आहे. सदर देयकांचे प्रदान 8 दिवस आगोदर म्हणजेच दि.20.03.2013 पर्यंत एक टक्का सवलतीच्या कालावधीत केल्यास रु.4783373/- एवढीच रक्कम भरणा करावयाची होती. विद्युत विभागाने सवलतीच्या कालावधीचा फायदा न घेतल्यामुळे रु.48317/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.

सांगल-मिरज-कुपवाड शहर महानगरपालिकेच्या विद्युत विभागातर्फे मनपाच्या प्रभाग क्र.1,2,3 व 4 ची माहे मार्च 2013 मधील महावितरण वीज वितरण कंपनीस आदा केलेल्या रु.48,31,690/- च्या वीज देयकांचे लेखापरीक्षण केले असता असे निदर्शनास आले आहे की, विद्युत विभागाने वीज वितरण केलेल्या वीज देयकांच्या रक्कमा भरणा करताना कंपनीने दिलेल्या सवलत कालावधीचा फायदा घेतलेला नाही. याबाबत खालील प्रमाणे उदाहरणा दाखल देण्यात आले आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र.व दिनांक | प्रभाग क्र. | देयके तयार झालेचा कालावधी | रक्कम भरणा करणेची अंतीम दि. व र.रु. | सवलत कालावधी दि. व र.रु. | फरक रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 7023 / 13.03.2013 | PC-6 | 11.03.2013 | 25.03.2013 रु.558960/- | 18.03.2013 रु.553550/- | 5410/- |
| 2 | 7114 / 18.03.2013 | PC-1 | 13.03.2013 | 28.03.2013 रु.379930/- | 19.03.2013 रु.376700/- | 3230 |
| 3 | 7115 18.03.2013 | PC-5 | 14.03.2013 | 28.03.2013 रु.185080/- | 20.03.2013 रु.183180/- | 1900 |
| | | | | | **एकूण रु.** | **10540/** |

उपरोक्त देयक,वीज वितरण कंपनीने दिलेल्या देयकांची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.165

दि.04/10/2014 रोजी निर्गमित केला असुन विद्युत विभागाने त्याचे अनुपालन दि.22/10/2014 रोजी सादर केले आहे. विद्युत विभागाने दिलेल्या अनुपालनाचे अवलोकन करुन खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)महानगरपालिकेच्या विद्युत विभागाने मार्च, 2013 या महिन्यात वीज देयकांच्या आकारा पोटी रु.4831690/- एवढी रक्कम अंतीम तारखेला (दि.28.03.2013) ला वीज वितरण कंपनीस आदा केलेली आहे. सदर देयकांचे प्रदान 8 दिवस आगोदर म्हणजेच दि.20.03.2013 पर्यंत सवलतीच्या कालावधीत भरणा केल्यास रु.4783373/- एवढीच रक्कम भरणा करावयाची होती. विद्युत विभागाने सवलतीच्या कालावधीचा फायदा न घेतल्यामुळे खालीलप्रमाणे रु.48317/-ची महानगरपालिकेची आर्थिक हानी झाली आहे.

अंतीम तारखेस वीज आकारापोटी भरणा रु.4831690/-
सवलतीच्या कालावधीत देयके आदा केल्यास रु.4783373/-
--------------------------------
भरावी लागणारी रक्कम फरक (सरासरी 1%) रु.48317/-

विद्युत विभागाकडुन देय दिनांकाच्या आठ दिवस आगोदर देयक तयार करुन लेखा विभागाकडे धनादेश काढण्यासाठी पाठविले जाते. परंतु लेखा विभागाकडुन धनादेश काढण्यास विलंब होत असल्याने सवलतीचा फायदा मिळत नसल्याचे विद्युत विभागाने दि. दि.22/10/2014 रोजी दिलेल्या अनुपालनामध्ये नमुद आहे. यापुढे लेखा विभागाने सवलतीचा फायदा घेण्यासाठी वेळेत धनादेश काढण्याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 165 | 04/10/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSVSM6002 |
|---|---|

| 107 | मालमत्ता विभागाच्या नस्ती, नोंदवह्या व इतर कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध करून न दिल्याबाबत. |
|---|---|

| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 13 | मालमत्ता | मनपा | 9ड | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

मालमत्ता विभागाने वित्तीय वर्ष 2012-13 चे 28 इमारती / मालमत्तांचे लेखे, नस्ती, नोंदवह्या व त्या अनुषंगाने आवश्यक असलेली कागदपत्रे मागणी करुनही लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात आलेली नाहीत. त्यामुळे या मालमत्तांची भाड्याची वार्षिक मागणी, भरणा करणेत आलेल्या व थकीत असलेल्या भाड्याच्या रक्कमा याबाबतची लेखापरीक्षणास खात्री करता आलेली नाही.

1)सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या अधिनस्त असलेल्या मालमत्ता विभागाने महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 155 प्रमाणे स्थावर मालमत्तेचे पुस्तक नमुना क्रमांक 128 प्रमाणे ठेवले असुन त्यामध्ये नगरपालिकेच्या असलेल्या मालमत्तांचा समावेश आहे. वित्तीय वर्ष 2012-13 चे लेखापरीक्षणामध्ये मालमत्ता पुस्तकाची तपासणी करुन खालील नमूद 28 इमारती / मालमत्तांचे लेखे, नस्ती, नोंदवह्या व त्या अनुषंगाने आवश्यक असलेली कागदपत्रे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करण्यासाठी अर्धसमास ज्ञापन क्र.170 दि.14/10/2014 रोजी निर्गमित केला असुन मालमत्ता विभागाकडून त्याचे अनुपालन तसेच दप्तरही लेखापरीक्षणास सादर केलेले नाही. त्यामुळे या मालमत्तांची भाड्याची वार्षिक मागणी, मालमत्ताधारकाकडुन भरणा करणेत आलेल्या व त्यांच्याकडे थकीत असलेल्या भाड्याच्या रक्कमा याबाबतची लेखापरीक्षणास खात्री करता आलेली नाही.

| अ.क्र. | मालमत्ता / इमारतींचे नावं | गाळे संख्या | खुली जागा Sq.Mt. |
|---|---|---|---|
| 1 | मक्तेबाब इतर इमारती | 12 | |
| 2 | शिराळकर दवाखाना | 11 | |
| 3 | बाल क्रिडा उद्यान | 5 | |
| 4 | धान्यबाजार पत्रा शेड | 32 | |
| 5 | रेवणी रोड पत्रा शेड | 15 | |
| 6 | जयश्री चित्र मंदिर पत्रा शेड | 17 | |

| | | | |
|---|---|---|---|
| 7 | मटण मार्केट पत्रा शेड | 17 | |
| 8 | बीफ मार्केट | 15 | |
| 9 | बापट बाल मंदिर | 10 | |
| 10 | पेठ भाग भाजी मंडई | 64 | |
| 11 | किसान मार्केट | 14 | |
| 12 | शिवाजी पॅव्हेलीयन | 2 | |
| 13 | बरलगंधर्व नाट्य मंदिर | 4 | |
| 14 | हजरत खॉजा शॅपिंग सेंटर | 35 | |
| 15 | दवाखाना केबीन | 15 | |
| 16 | जुने मार्केट | 14 | |
| 17 | आण्णा बुवा शॉपिंग सेंटर अ व ब बाजू | 53 | |
| 18 | हरिपूर रोड जागा क्र.12 | | खुली जागा |
| 19 | TV सेंटर इमारत | | |
| 20 | वसंतदादा पाटील इन्स्टीट्युट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च सेंटर | | |
| 21 | जिमखाना पूर्वेकडील सि.स.नं.501 | | |
| 22 | स्लॉटर हाऊस ----- जिमखाना | | |
| 23 | शिवाजी नगर --- जिवन विद्यालय सि.स.नं.369 पैकी 60x90 चौ.मी. | | |
| 24 | सि.स.नं.447 पैकी सांगली शिक्षण संस्था | | |
| 25 | सि.स.नं.1626/2 एकर 8381.45 चौ.मी. | | |
| 26 | अर्बन पब्लीक हेल्थ सेंटर | | |
| 27 | बालाजी नगर सदगुरु निर्माण संस्था | | |
| 28 | परांजपे पार्क प्लॉट ओनर्स असोशिएशन सि.स.नं.1502/12 ची 1875 चौ.मी. | | |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 170 | 14/10/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSVSM6002 |
|---|---|

| 108 | 2008-09 या आर्थिक वर्षात केलल्या कामांची देयके 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये विलंबाने ठेकेदारास प्रदान केल्याबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | मनपा | 9ब | 05 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 1742319 | | | |

बांधकाम विभागाने 2008-09 या वर्षात केलेल्या कामांची देयके 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये चार वर्ष विलंबाने ठेकेदारांना आदा केली आहेत. संक्षिप्त देयकाच्या संगणकीय प्रतीवर कंत्राटदार,शाखा अभियंता,नगर अभियंता यांची स्वाक्षरी नाही. देयके मुळ प्रती ऐवजी झेरॉक्स प्रतीवर आदा करण्यात आली आहेत. लेखा विभागाने एका देयकाची रक्कम दोन प्रमाणकामध्ये विभागुन झेरॉक्स प्रतीवर आदा केली आहेत.

**विषय क्र.01)** सांगली येथील म्हामुलकर घर ते आयवळे घरापर्यंत दक्षिण उत्तर रस्ता मुरुम खडी व डांबरी करणे.

या कामाचे संक्षिप्त देयक बांधकाम विभागाने संगणकीय प्रतीमध्ये तयार केले असुन त्याचेवर बील क्र.126/12-13 दि. 26/06/12 व लेखाशिर्ष :- सन 2008/09 मधील सोनिया गांधी दौरा यामधील रस्त्याची प्रलंबित देयके असे नमुद आहे. मोजमाप पुस्तकाप्रमाणे महानगरपालिका अभियंता यांनी तयार केलेल्या हस्तलिखीत देयकावर अंदाजपत्रकामधील खाते या रकान्यामध्ये इतर योजना शासनाचे विशेष अर्थसहाय्य या लेखाशिर्षाची नोंद आहे.

अंदाजपत्रकीय रक्कम रु.1008500/-

लेखाशिर्ष :- सन 2008/09 मधील सोनिया गांधी दौरा यामधील रस्त्याची प्रलंबित देयके.

व्दिनोंद बी 41625.

प्रमाणक क्र . 6274 दि.14/02/13 रु.499999/-

प्रमाणक क्र.7241 दि.22/03/13 रु.314809/-

ठेकेदाराचे नाव :- मे.एस.एफ.चौगुले.

प्रशासकीय मंजुरी :- आयुक्त निर्णय क्र. 407 दि.12/3/08 .

स्थायी समिती ठराव क्र.702 दि.31/03/08

मोजमाप पु. क्र.26 पान न.01 ते 2

कामाची नस्ती, मोजमाप पुस्तक व देयके यांचे लेखापरीक्षण करून अर्धसमास ज्ञापन क्र.150 दि.25/09/2014 रोजी निर्गमित केला आहे. बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.21/10/2014 रोजी सादर केले आहे. सदर अनुपालन तपासून खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 174 नुसार या कामाचे देयक नमुना क्र.131 मध्ये तयार केले आहे. परंतु देयक मुळ प्रतीत नसुन प्रतिलिपीच्या (झेरॉक्स) आधारे देयक प्रदान करण्यात आले आहे. अशा प्रकारे देयक प्रदान करण्यापूर्वी महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 42 (4) मधील तरतुदीनुसार मूळ देयकाचे प्रदान केले नाही असे लेखा शाखेने प्रमाणित करणे आवश्यक असता ते केलेले नाही. तसेच नगरपालिका लेखासंहिता 1971 च्या नियम क्रमांक 42 (1) नुसार विभागप्रमुखाने अचूकता व खरेपणाचे प्रमाण म्हणुन देयकावर स्वाक्षरी केली पाहिजे. तसेच लेखापालाने देयकासाठीची अर्थसंकल्पिय तरतुद, देयकाची अचुकता व सक्षम प्राधिका-याची योग्य मंजुरी याबाबतची तपासणी करुन सर्व बाबींच्या पुर्ततेची खात्री केल्यानंतर देयकाचे प्रदान करणे आवश्यक होते. परंतु सदर देयकावर देयक तयार करणाऱ्या अधिकाऱ्याची स्वाक्षरी, अभियंत्याची स्वाक्षरी, कंत्राटदाराची स्वाक्षरी, प्रदान करणारा अधिकारी यांची स्वाक्षरी घेणेत आलेली नसताना देयक प्रदान करण्यात आले आहे . संक्षिप्त संगणकीय देयक मुळ प्रतीमध्ये (Original) नसून शहर अभियंता यांच्या स्वाक्षरीचे झेरॉक्स प्रतीमध्ये आहे. बांधकाम विभागाच्या अन्य देयकांची तपासणी केली असता संक्षिप्त देयकाच्या संगणकीय प्रतीवर कंत्राटदार,शाखा अभियंता,नगर अभियंता यांच्या स्वाक्षरी आहेत. परंतु या देयकावर कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याच्या स्वाक्षरी नाहीत.

2)बांधकाम खात्याने देयक रु.814808/- चे सादर केले असुन मुख्यलेखाधिकारी व उपायुक्त यांनी अनामत 5 टक्के प्रमाणे रु.40330/, व्हॅट 2 टक्के प्रमाणे रु.16300/-, इन्कमटॅक्स 2.5 टक्केप्रमाणे रु.20371/- वजा जाता रु.737807/- आदा करण्यास मान्यता दिली आहे. लेखा विभागाने एकुण रु.814808/- पैकी ठेकेदारास रु.499999/- मात्र आदा करावी व उर्वरित रक्कम रु.314809/- मात्र नंतर आदा करावी असा दाखला देयकावर लिहुन प्रमाणक क्र.6274 दि.14/02/2013 ने रु.499999/- आदा केले आहेत

3) प्रमाणक क्र.7241 दि.22/3/2013 ने उर्वरित रक्कम रु.314809/- ठेकेदारास त्याच झेरॉक्स देयकावर शेरा मारुन आदा केली आहे. लेखा विभागाने एका देयकाची रक्कम दोन प्रमाणकामध्ये विभागुन आदा केली आहे. अशा प्रकारे एकाच देयकाची रक्कम दोन प्रमाणकांनी विभागुन देण्याची तरतुद लेखासंहितेमध्ये नसतानाही देयकांचे प्रदान करण्यात आले आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये काम 2008-09 मध्ये करण्यात आले असुन त्यावेळी देयकावर सर्व अधिकारी यांच्या सह्या घेण्यात आल्याचे नमुद आहे. परंतु स्वाक्षरी असल्याचे मूळ देयक लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेले नाही. तसेच झेरॉक्स प्रतीवर देयक आदा केल्याबाबत समर्पक खुलासा केला नसल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.

4)देयकाची तपासणी केली असता आयुक्त निर्णय क्र.407 दि.12/3/08 व स्थायी समिती ठराव क्र.702 दि.31/03/08 अन्वये काम मंजुर असुन ठेकेदारास कामाचा कार्यादेश दि.15/4/08 रोजी दिला आहे व काम दि.23/09/08 रोजी झाले असल्याचे मोजमाप पुस्तिका क्र.26 मध्ये दि.23/09/08 रोजी नोंदविले आहे. परंतु सदर देयक बांधकाम विभागाने दि.26/6/12 रोजी चार वर्ष विलंबाने तयार केले असुन लेखा विभागाने दि.14/02/2013 व दि.22/3/2013 ने ठेकेदारास आदा केले आहे. नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रं. 44 (1) नुसार वेतन व भत्ते व इतर देय मागण्या जर देय झाल्यापासून एक वर्षाच्या आत नगरपरिषदेला सादर केल्या नाहीत तर परिषदेच्या मंजुरीविना त्याचे प्रदान करता येणार नाही असे नमुद आहे. परंतु सदर एक वर्षावरील प्रलंबित देयकाचे प्रदान महानगरपालिकेची मान्यता न घेता केले आहे.

अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये 2008-09 पासुन सदर कामांच्या अनुदानासाठी सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे वारंवार पाठपुरावा करुनही निधी प्राप्त झालेला नसल्याने 2012-13 या वर्षात प्रलंबित देयकासाठी तरतुद करुन देयके आदा करण्यात आली असल्याचे नमुद आहे. या कामाची प्रशासकीय मंजुरी सामाजिक न्याय विभागाचे विशेष अनुदान या शासन अनुदानामधून देण्यात आली आहे. परंतु सदर प्रशासकीय मंजूरी शासनाकडून अनुदान प्राप्त झालेले नसताना देण्यात आली आहे. शासनाकडुन अनुदान मिळाल्यानंतरच सदर लेखाशीर्षा खालील कामे करणे आवश्यक होते. तसेच शासनाकडुन निधी प्राप्त झाला नसल्याने स्वनिधीमध्ये तरतुद करुन देयके पारित करणे आवश्यक असता

त्याप्रमाणे कार्यवाही न करताच तीन वर्षांनी स्वनिधीमध्ये तरतूद करून देयके आदा केली आहेत.

5)नगरपालिका लेखासंहीता 1971 चे परिशिष्ट एक (नियम 2 (अ)(एक)पहा),भाग अ,सर्वसाधारण वित्तीय तत्वे मधील 1 नुसार दरवर्षीचे अर्थसंकल्पीय अनुदानामध्ये मागील दायीत्वासह सर्व खर्चाचा अंतर्भाव करणे आवश्यक असल्याने सदर प्रलंबित देयकाच्या रक्कमेचा अंतर्भाव 2009-10 च्या अर्थसंकल्पीय अनुदानामध्ये करुन त्याप्रमाणे प्रलंबित देयकांचे प्रदान प्राधान्याने करणे आवश्यक असता देयके चार विलंबाने प्रदान करण्यात आली आहेत. तसेच सदर देयके मागील चार वर्षात मंजूर केली नसलेबाबत लेखापरीक्षणाची योग्य कागदपत्राचे अधारे खात्री पटविण्यात आलेली नाहीत. अर्धसमास ज्ञापन क्र.150 दि.25/09/2014 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.21/10/2014 रोजी सादर केले आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये अनुदान प्राप्त न झाल्याने व ठेकेदारांनी वारंवार तगादा लावल्याने 2012-13 च्या अंदाजपत्रकामध्ये या कामांच्या देयकासाठी तरतुद करुन देयके आदा केलेचे नमुद आहे. परंतु देयके यापुर्वी आदा केली नसलेबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नाहीत.

6)देयकाची तपासणी केली असता नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 176 नुसार जेव्हा बांधकाम पूर्ण करण्यात येईल तेंव्हा शहर अभियंता यांनी नमुना क्र.132 प्रमाणे बांधकाम पूर्ण झालेचे प्रतिवृत्त / अहवाल सादर करणे आवश्यक आहे. या प्रतिवृत्तामध्ये दिलेल्या नमुन्यामध्ये अंदाजपत्रकातील बाब निहाय तरतुद,प्रत्यक्ष झालेले काम व यामधील फरक आणि असा फरक पडल्याची कारणासह स्पष्टीकरण सादर करणे आवश्यक आहे. तथापि अशाप्रकारचे विहित नमुन्यामधील प्रतिवृत्त सादर करण्यात आलेले नाही. प्रतिवृत्त सादर केलेले नसल्यामुळे बाबनिहाय कोणत्या बाबीचे परिमाणामध्ये बदल झाला व त्याअधारे झालेला कमी जास्त खर्च तपासता आला नाही. तसेच एखाद्या बाबीचे परिमाण कमी अथवा जास्त होण्याची कारणे संयुक्तिक असल्याची पडताळणी करता आली नाही. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये धावती देयके तयार करण्यात आल्याने बांधकाम पूर्ण झालेचे प्रतिवृत्त तयार करण्यात आले नसल्याचे नमुद आहे. परंतु मोजमाप पुस्तकामध्ये काम दि.23/9/2008 रोजी पुर्ण झाल्याचे नमुद असून काम पुर्ण झाल्यानंतरच देयके तयार करण्यात आली असल्याने बांधकाम विभागाने दिलेले अनुपालन संयुक्तिक वाटत नाही.

अशाच पध्दतीने खालील देयक आदा करण्यात आले आहे.

विषय क्र. 02 : सोनिया गांधी दौऱ्या निमित्त रेल्वे गेट ते माधवनगर रोड जकात नाक्यापर्यंत रस्ता करणे.

अंदाजपत्रक क्र.525(अे)11/3/08 , लेखाशिर्ष-41625

अंदाजपत्रकीय रक्कम रु.952000/-

प्रशासकीय मान्यता :- आयुक्त निर्णय 437 दि.28/3/08 ने 67(3)(क) नुसार मान्यता
मा.स्थायी समिती ठ.क्र.15 दि.16/04/08 ने कार्योत्तर मान्यता देण्यात आली आहे.
प्रमाणक क्र.7646 दि.30/03/13 रु.927511/-
ठेकेदाराचे नाव :- मे.गैबान कन्स्ट्रक्शन,जयसिंगपूर
काम सुरु :- दि.10/7/08
मोजमाप पुस्तक क्र.3, पृष्ठ क्र. 29 ते 31.

1)बांधकाम विभागाने कामाचे देयक, नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 174 नुसार नमुना क्र.131 मध्ये तयार केले असुन देयक सादर करतानाचे लेखाशीर्ष :- इतर योजना 004) शासनाचे विशेष अर्थसहाय्य असे नमुद आहे. तसेच त्यावर देयक प्रदानार्थ सादर केल्याचा दिनांक :-18/3/08 असा आहे. परंतु सदर देयक सक्षम प्राधिकारी यांनी मंजुर केलेले नाही. या कामाचे देयक पुन्हा बांधकाम विभागाने, नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 42(1) नुसार नमुना क्र.22 मध्ये बील क्र. 603 ने दि.16/3/13 ने तयार केले असुन त्यावर लेखाशिर्ष सन 2008/09 मधील सोनिया गांधी दौरा यामधील रस्त्याची प्रलंबित देयके असे नमुद आहे व देयक प्रमाणक क्र.7646 दि.30/3/13 ने मंजुर केले आहे. या कामाची 2008 या आर्थिक वर्षातील प्रशासकीय मंजुरी **इतर योजना 004) शासनाचे विशेष अर्थसहाय्य या शासन अनुदानामधून** देण्यात आली होती. परंतु सदर प्रशासकीय मंजूरी शासनाकडून अनुदान प्राप्त झालेले नसताना देण्यात आली आहे. शासनाकडुन अनुदान मिळाल्यानंतरच सदर लेखाशीर्षा खालील कामे करणे आवश्यक होते. तसेच शासनाकडुन निधी प्राप्त झाला नसल्याने स्वनिधीमध्ये तरतुद करुन देयके पारित करणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही न करताच तीन वर्षांनी स्वनिधीमध्ये तरतूद करून देयके आदा केली आहेत. नगरपरिषद लेखासंहीता 1971 चे नियम क्रं. 44 (1) नुसार वेतन व भत्ते व इतर देय मागण्या जर देय झाल्यापासून एक वर्षाच्या आत नगरपरिषदेला सादर केल्या नाहीत तर परिषदेच्या मंजुरीविना त्याचे प्रदान करता येणार नाही असे नमूद असल्याने महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची मंजुरी घेवूनच देयके आदा करणे आवश्यक असता अशी मंजुरी न घेताच देयाकाचे प्रदान करण्यात आले आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये तात्कालीन शहर अभियंता यांची बदली झाल्याने देयकावर स्वाक्षरी घेण्यात आली नसल्याचे नमुद आहे.

**आक्षेपाधिन रक्कम :-** विषय क्र.1 ची रक्कम रु. 814808/- + विषय क्र.2 ची रक्कम रु.927511 = रक्कम रु.1742319/-

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 150 | 25/09/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 109 | 2008-09 मध्ये केलेल्या कामांच्या देयकांचे प्रदान 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये केले बाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | राज्य शासन | 9ब | 05 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 1366000 | | | |

बांधकाम विभागाने 2008-09 या वर्षात शासन अनुदान प्राप्त झाले नसतानाही ठेकेदाराकडून शासन अनुदान या लेखाशिर्षाखाली कामे करून घेतली आहेत. परंतु शासनाकडून या कामांना निधी प्राप्त झाला नसल्याने या कामांची देयके 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये स्वनिधीमध्ये तरतूद करून ठेकेदारांना आदा केली आहेत. नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रं. 44 (1) नुसार वेतन व भत्ते व इतर देय मागण्या जर देय झाल्यापासून एक वर्षाच्या आत नगरपरिषदेला सादर केल्या नाहीत तर परिषदेच्या मंजुरीविना त्याचे प्रदान करता येणार नाही असे नमुद आहे. परंतु सदर एक वर्षावरील प्रलंबित देयकाचे प्रदान महानगरपालिकेची मान्यता न घेता केलेले आहे.

**विषय क्र. 1 सांगली येथील बायपास ते स्क्रॅप दुकान दक्षिण उत्तर रस्ता मुरुम खडी व डांबरी करणे हे** काम 2008-09 या आर्थिक वर्षामध्ये करण्यात आली आहे. मा.राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षा सोनिया

गांधी सांगली येथील जुना बुधगाव रोड परिसरात सामाजीक न्याय भवनाच्या उद्‌घाटना प्रसंगी उपस्थितीत राहणार असल्याने व अतिमहत्वाच्या व्यक्तीचा दौरा असल्याने कामगिरी तात्काळ सुरु करणेत आली व यास मा.स्थायी समिती ठराव क्र.693 दि.31/03/2008 अन्वये कार्योत्तर मान्यता घेणेत आली आहे. या कामाचे देयक बांधकाम विभागाने, नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 174 नुसार नमुना क्र.131 मध्ये बील क्र.603 ने दि.16/3/13 ने तयार केले असुन त्यावर लेखाशिर्ष सन 2008/09 मधील सोनिया गांधी दौरा यामधील रस्त्याची प्रलंबित देयके असे नमुद आहे व देयक प्रमाणक क्र.7646 दि.30/3/13 ने मंजुर केले आहे.

अंदाजपत्रकीय रक्कम रु.866000/-

| | | |
|---|---|---|
| प्रमाणक क्र . 6275 | दि.14/02/13 | रु.500000/- |
| प्रमाणक क्र.7239 | दि.22/03/13 | रु.366000/- |

लेखाशिर्ष :- सन 2008/09 मधील सोनिया गांधी दौरा यामधील रस्त्याची प्रलंबित देयके.

ठेकेदाराचे नाव :- केदार कन्स्ट्रक्शन,सांगली.

आयुक्त निर्णय क्र.407 दि.12/3/08

स्थायी समिती ठराव क्र.702 दि.31/03/08

व्दिनोंद बी 41625

मोजमाप पुस्तक क्र. 26 पृष्ठ क्र. 4 ते 6

कामाची नस्ती, मोजमाप पुस्तक व देयके यांचे लेखापरीक्षण करून अर्धसमास ज्ञापन क्र.151 दि.25/09/2014 रोजी निर्गमित केला आहे. बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.21/10/2014 रोजी सादर केले आहे. सदर अनुपालन तपासून खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)या कामाच्या देयकाची तपासणी केली असता बांधकाम विभागाने कामाचे देयक, नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 174 नुसार नमुना क्र.131 मध्ये तयार केले असुन देयक सादर करतानाचे लेखाशीर्ष :- इतर योजना 004) शासनाचे विशेष अर्थसहाय्य असे नमुद आहे. देयकामध्ये काम सुरु व काम पूर्ण केल्याची तारीख नमूद नाही. कामाची पहाणी करुन मापे घेतल्याचा व मोजमाप पुस्तकावर बील रेकॉर्ड केल्याचा दिनांक नमूद नाही. त्यामुळे काम कधी सुरु केले व कधी पूर्ण केले तसेच ते लेखा शाखेकडे कधी पाठविण्यात आले ते समजून येत नाही. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये काम

तातडीचे असल्याने काम झाल्यानंतर स्थायी समितीची कार्योत्तर मान्यता घेतल्याचे नमुद आहे. काम सुरु व काम पुर्ण केल्याची तारीख नोंद करणे आवश्यक असल्याने दिलेले अनुपालन संयुक्तिक वाटत नाही.

2)2008-09 या आर्थिक वर्षात केलेल्या कामाचे देयक लेखाशीर्ष बदलुन 2012-13 या आर्थिक वर्षात मंजूर केले आहे. नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रं. 44 (1) नुसार वेतन व भत्ते व इतर देय मागण्या जर देय झाल्यापासून एक वर्षाच्या आत नगरपरिषदेला सादर केल्या नाहीत तर परिषदेच्या मंजुरीविना त्याचे प्रदान करता येणार नाही असे नमुद आहे. परंतु सदर एक वर्षावरील प्रलंबित देयकाचे प्रदान महानगरपालिकेची मान्यता न घेता केले आहे. तसेच सदर देयके आर्थिक वर्ष 2008-09 ते 2011-12 या आर्थिक वर्षात वर्षात मंजूर केली नसलेबाबत लेखापरीक्षणाची योग्य कागदपत्राचे अधारे खात्री पटविण्यात आलेली  नाही. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये सदर काम 2008-09 या आर्थिक वर्षात करण्यात आले असुन देयकावर 004) शासनाचे विशेष अर्थसहाय्य असे लेखाशीर्ष नमुद करण्यात आले होते. परंतु शासनाकडुन निधी प्राप्त न झाल्याने देयकावर मनपा निधीमधुन 066) मुरुम खडी व डांबरी रस्ते करणे या लेखाशीर्षाचा उल्लेख करण्यात आला आहे. परंतु निधीच्या कमतरतेमुळे 2012-13 वर्षाचे अर्थसंकल्पामध्ये 49625) सोनिया गांधी दौऱ्यामधील रस्त्यांची प्रलंबित देयके या लेखाशीर्षामध्ये तरतुद करुन देयके आदा करण्यात आली असल्याचे नमुद आहे. नगरपालिका लेखासंहीता 1971 चे परिशिष्ट एक (नियम 2 (अ) (एक)पहा), भाग अ,सर्वसाधारण वित्तीय तत्वे मधील 1 नुसार दरवर्षीचे अर्थसंकल्पीय अनुदानामध्ये मागील दायीत्वासह सर्व खर्चाचा अंतर्भाव करणे आवश्यक असल्याने सदर प्रलंबित देयकाच्या रक्कमेचा अंतर्भाव 2009-10 च्या अर्थसंकल्पीय अनुदानामध्ये करुन त्याप्रमाणे प्रलंबित देयकांचे प्रदान प्राधान्याने करणे आवश्यक असता देयके चार विलंबाने प्रदान करण्यात आली आहेत.  शासन निधी प्राप्त झाल्यानंतरच काम करणे आवश्यक होते. तसेच शासन निधी प्राप्त झाला नसल्यास त्याच वर्षामध्ये स्वनिधीमध्ये तरतुद करुन देयके आदा करणे आवश्यक असता त्याप्रमाणे बांधकाम विभागाने कार्यवाही न करता देयके चार वर्ष प्रलंबित ठेवली असल्याचे दिसुन येते.

अशाच प्रकारे खालील कामामध्ये त्रुटी आढळुन आल्या आहेत.

**विषय क्र.02 : सांगली येथील बायपास ते संभजीनगर व जुना बुधवार रोड लगतचे जुने रस्ते डांबरी करणे व पॅचवर्क करणे या कामातील अनियमिततेबाबत.**

अंदाजपत्रकीय रक्कम रु.2221000/-

लेखाशिर्ष :- सन 2008/09 मधील सोनिया गांधी दौरा यामधील रस्त्याची प्रलंबित देयके.

व्दिनोंद बी. 41625

प्रशासकीय मान्यता :- आयुक्त निर्णय क्र.416 दि.15/3/08.

स्थायी समिती ठराव क्र.693 दि.31/03/08.

ठेकेदाराचे नाव :- समर्थ कन्स्ट्रक्शन.

मोजमाप पु. क्र.2 पृष्ठ क्र. 81 ते 89

प्रमाणक क्र . 7250 दि.22/03/13 रु.500000/-.

1)देयकाची तपासणी केली असता बांधकाम विभागाने कामाचे देयक, नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 174 नुसार नमुना क्र.131 मध्ये तयार केले असुन देयक सादर करतानाचे लेखाशीर्ष:-इतर योजना 004) शासनाचे विशेष अर्थसहाय्य असे नमुद आहे. देयकामध्ये काम सुरु व काम पूर्ण केल्याची तारीख नमूद नाही. कामाची पहाणी करुन मापे घेतल्याचा दि.23/09/08 असून मोजमाप पुस्तकावर बील रेकॉर्ड केल्याचा दि.23/09/08 आहे. देयकाच्या शेवटच्या पानावर लेखाशीर्ष शासनाचे विशेष अर्थसहाय्य सामाजिक न्याय विभागाकडून प्राप्त निधी खर्च हे खोडुन पुन्हा 066 मुरुम निधीतून मुरूम खडी डांबरी रस्ते करणे हे नमूद केले आहे. त्यामुळे देयक कोणत्या निधीमधुन खर्ची घालण्यात आले आहे ते समजून येत नाही.

2)देयकावर बांधकाम विभागामधुन देयक पाठविल्याचा जावक क्र.253/09/10 दि.05/08/09 नमुद आहे. पुन्हा सदर क्रमांक खोडून त्यावर जावक क्र.123/12-13 दि.26/6/12 असा नमुद केला आहे. या कामाचे देयक बांधकाम विभागाने पुन्हा नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 174 नुसार नमुना क्र.131 मध्ये बील क्र.123/12-13 दि.26/6/12 ने रु.2221000/- चे तयार केले असुन त्यावर लेखाशिर्ष सन 2008/09 मधील सोनिया गांधी दौरा यामधील रस्त्याची प्रलंबित देयके असे नमुद आहे. नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रं. 44 (1) नुसार वेतन व भत्ते व इतर देय मागण्या जर देय झाल्यापासून एक वर्षाच्या आत नगरपरिषदेला सादर केल्या नाहीत तर परिषदेच्या मंजुरीविना त्याचे प्रदान करता येणार नाही असे नमूद आहे. परंतु आर्थिक वर्ष 2008-09 मधील प्रलंबित देयक 2012 -13 या आर्थिक वर्षामध्ये महानगरपालिकेची मान्यता न घेता प्रदान केले आहे. लेखा विभागाने देयकावर सदर बीलातील एकुण रक्कम रु. 2221000/- पैकी रु.500000/- पार्टीस आदा करावेत व उर्वरित रक्कम रु.1721000/- मात्र नंतर आदा करावेत असा शेरा मुख्य लेखाधिकारी यांनी लिहून प्रमाणक क्र. 7250 दि. 22/3/13 ने रु.500000/- ठेकेदारास आदा केले आहेत. देयकाप्रमाणे लेखाविभागाने ठेकेदारास पुर्ण रक्कम दिलेली नाही. शासन निधी प्राप्त झाल्यानंतरच काम करणे आवश्यक होते. तसेच शासन निधी प्राप्त झाला

| |
|---|
| नसल्यास त्याच वर्षामध्ये स्वनिधीमध्ये तरतुद करुन देयके आदा करणे आवश्यक असता त्याप्रमाणे बांधकाम विभागाने कार्यवाही न करता देयके चार वर्ष प्रलंबित ठेवली असल्याचे दिसुन येते.<br><br>3)2008-09 या आर्थिक वर्षात केलेल्या कामाचे देयक लेखाशीर्ष बदलुन 2012-13 या आर्थिक वर्षात मंजूर केले आहे. नगरपालिका लेखासंहीता 1971 चे परिशिष्ट एक (नियम 2 (अ)(एक)पहा),भाग अ,सर्वसाधारण वित्तीय तत्वे मधील 1 नुसार दरवर्षीचे अर्थसंकल्पीय अनुदानामध्ये मागील दायीत्वासह सर्व खर्चाचा अंतर्भाव करणे आवश्यक असल्याने सदर प्रलंबित देयकाच्या रक्कमेचा अंतर्भाव 2009-10 च्या अर्थसंकल्पीय अनुदानामध्ये करुन त्याप्रमाणे प्रलंबित देयकांचे प्रदान प्राधान्याने करणे आवश्यक असता देयके चार विलंबाने प्रदान करण्यात आली आहेत. तसेच काम करण्यात आलेल्या आर्थिक वर्षात देयक मंजूर करण्यात आलेले नाही व सदर देयके मागील चार वर्षात मंजूर केली नसलेबाबत लेखापरीक्षणाची योग्य कागदपत्राचे अधारे खात्री पटविण्यात आलेली नाही.<br><br>आक्षेपाधिन रक्कम :- विषय क्र.1 ची रक्कम रु. 866000/- + विषय क्र. 2 ची रक्कम रु.50000 = रक्कम रु. 1366000/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 151 | 25/09/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |
|---|---|

| 110 | 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये शासनाकडून प्राप्त झालेल्या 5.49 कोटी अनुदानामधुन करणेत आलेल्या कामांमधील अनियमितते बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | शासनाचे विशेष अर्थसहाय्य | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सर्व.बांधकाम | राज्य शासन | 9ब | 09 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 722897 | 2907 | | |

बांधकाम विभागाकडुन नगरसचिव विभागाकडे कामाचे करारपत्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड प्रकरण 5 नियम 1 संविदा करण्याची पध्दत (2) अन्वये महानगरपालिकेची सामान्य मुद्रा स्थायी समितीच्या दोन सदस्यांचे उपस्थित व स्वाक्षरीसाठी घेण्यासाठी पाठविलेनंतर त्यावर स्वाक्षरी होण्यासाठी तीन महिने प्रलंबित राहिल्याने काम सुरु व पुर्ण होण्यास विलंब लागला आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी 2010-11 या आर्थिक वर्षासाठी सहसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.जीईएन/ 2010/प्रक्र68/नवि 16, दि.8/6/11 व शासन निर्णय क्र.पुनर्वि-2011/प्र.क्र.44/ नवि-4,दि.31/3/11 अन्वये 5.49 कोटी अनुदान मंजुर झाले असुन ते 2011-12 या आर्थिक वर्षामध्ये वितरीत केले आहे. या रक्कमेतुन 102 कामांचे प्रस्ताव मा.विभागीय आयुक्त पुणे यांचेकडील त्रिसदस्य समितीकडे मान्यतेसाठी पाठविणेसाठी स्थायी समिती ठराव क्र.181/11-12 दि.12/07/11 अन्वये मान्यता घेवुन जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव सांगली यांचेकडे महानगरपालिके मार्फत पत्र क्र.मनपा/सा/बांधा/226/2011-12 दि.25/7/11 रोजी पाठविण्यात आला. त्यास विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष जिल्हास्तरीय समिती, पुणे यांचे कडील पत्र क्रमांक निशा / कार्या 02 / मनपा / विनि / प्रशामा / को / 228 /11, दि.06/8/11 अन्वये तसेच जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा स्तरीय समिती सांगली यांचे आदेश क्र.नपा/मुलभुत/ आर.आर/622/2011, दि.8/8/2011 अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे.

**विषय क्र.01 : वॉर्ड क्र.38 मधील शनी मारुती मंदीर ते यादवाडे दुकान पर्यंतचा पूर्व पश्चिम रस्ता डांबरीकरण करणे या कामातील अनियमिततेबाबत.**

प्रमाणक क्रमांक :- 09 दि. :- 21/06/12 रक्कम :- 498652/-

**लेखाशिर्ष :- इतर योजना 4120 शासनाचे विशेष अर्थसहाय्य**

अंदाजपत्रकीय रक्कम : 498974/-

प्रशासकीय मान्यता : 1.सहसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.जीईएन /2010/प्रक्र68/नवि 16,दि.8/6/11

2.आयुक्त सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांचेकडील पत्र क्र.226/2011-12 दि.25/7/12

3.क्र.नपा / मुलभुत / आर.आर. / 622 / 2011 जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली नगरपालिका प्रशासन शाखा दि.08/8/2011

स्थायी समिती सभा ठराव क्रमांक 241 दि.12/08/11

तांत्रिक मान्यता : शहर अभियंता कार्या,329 दि. 16.06.2011

जाहिर प्रकटन :- क्र.3/11-12 मधील अ.क्र.56 ची निविदा दि.13/8/11 रोजी दै.पुढारी या दैनिकामध्ये प्रसिध्द करण्यात आली असून निविदा दि. 26/8/11 रोजी उघडण्यात आली. या कामास अल्प प्रतिसाद मिळाल्याने दि.16/9/11 रोजी पहिली मुदतवाढ देण्यात आली होती. निविदा दि.31/10/11 रोजी निविदा समिती समोर उघडण्यात आली. त्यामध्ये एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या असुन सर्वात कमी दराची निविदा श्री.बी.बी.गुंजाटे (0.05% कमी) यांची मान्य करण्यात आली आहे.

ठेकेदाराचे नांव :बी.बी.गुंजाटे,

कार्यादेश क्रमांक / दिनांक : क्रमनपा/सा/बांधावि/679/2011-12 दि. 16.03.2012. काम सुरु:- 16/03/12

कामाची मुदत : 45 दिवस काम पुर्ण दिनांक : 10.04.2012

मोजमाप पुस्तक क्रमांक : 5 पृष्ठ क्रमांक : 55 ते 56

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1. निविदा दि.31/10/11 रोजी उघडण्यात आल्यानंतर आयुक्त निर्णय क्र.296/2011-12 दि.22/11/11 नुसार श्री. बी.बी.गुंजाटे यांची सर्वात कमी दराची निविदा मंजुर करण्यात आली आहे. बांधकाम विभागाने ठेकेदारास निविदा मंजूरीची समज दि.28/11/2011 रोजी दिली आहे. ठेकेदाराने सुरक्षा अनामत पावती क्र.4242 दि.7/01/12 ने निविदा मंजूरीची समज दिल्यानंतर एक महिना विलंबाने भरली आहे. त्यानंतर ठेकेदाराने रु.100 च्या मुद्रांकावर करारपत्र केले असुन बांधकाम विभागाने करार पत्र दि.09/1/12 रोजी नगर सचिव विभागाकडे पाठविलेची नोंद बांधकाम विभागाकडे असलेल्या नोंदवहीमध्ये दिसून येते. अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालनामध्ये सुरक्षा अनामत रक्कम ठेकेदाराने विलंबाने भरणा केल्याचे मान्य

केले आहे.

2. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड प्रकरण 5 नियम 1 संविदा करण्याची पध्दत (2) अन्वये महानगरपालिकेची सामान्य मुद्रा महानगरपालिका सचिवाच्या अभिरक्षेत असली पाहिजे व आणि ती ज्या संविदेवर किंवा अन्य लेखावर लावणे आवश्यक आहे अशा प्रत्येक संविदेवर आणि लेखावर स्थायी समितीचे कोणतेही दोन सदस्य, नगरपालिका सचिव आणि आयुक्ताने प्राधिकृत केलेला असेल असा महानगरपालिका उपायुक्त दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला कोणताही अधिकारी, यांच्यामधील कोणत्याही दोन व्यक्तिंच्या उपस्थितीत लावली पाहिजे आणि अशा प्रत्येक संविदेवर व लेखावर आपल्या उपस्थितीत मुद्रा लावण्यात आली आहे याचे दर्शक म्हणून स्थायीच्या उक्त दोन व्यक्तिंनी सह्या केल्या पाहिजेत. प्रस्तुत करारपत्रावर महानगरपालिकेची सामान्य मुद्रा दोन स्थायी समिती सदस्यांच्या उपस्थितीमध्ये लावण्यात आली आहे. करारपत्रावर सदस्यांच्या सहीच्या जवळ नगर सचिव विभागाचा क्र. 827 दि.07/03/12 नमूद केला आहे. नगरसचिव विभागाकडे सदर करारपत्र स्थायी समिती सदस्यांच्या स्वाक्षरी साठी 3 महिने प्रलंबित राहिल्याने ठेकेदारास कामाचा कार्यादेश दि.16/03/12 रोजी चार महिने विलंबाने दिला आहे. नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 171 (6) नुसार निविदा उघडल्याच्या दिनांकापासून एक आठवडयाच्या आत त्या निकाली काढण्यात आल्या पाहिजेत आणि कोणत्याही बाबतीत हा कालावधी एक महीन्यापेक्षा जास्त होता कामा नये. असे नमुद असताना कार्यादेश देण्यास चार महिन्याचा विलंब झाला आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये विलंब झाल्याचे मान्य केले आहे. परंतु विलंबाची कारणे नमुद केलेली नाहीत.

3. नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 176 नुसार जेव्हा बांधकाम पूर्ण करण्यात येईल तेंव्हा नगरपरिषद अभियंता यांनी नमुना क्र.132 प्रमाणे बांधकाम पूर्ण झालेचे प्रतिवृत्त/अहवाल सादर केला पाहिजे. जेव्हा अंदाजापेक्षा अधिक रक्कम खर्च झाली असेल तेंव्हा परीमाण दर व केलेल्या बांधकामावरचा खर्च तसेच त्यासंबंधातील अंदाज यांची तुलना करुन सर्व तफावतीबाबत त्याने स्पष्टीकरण केले पाहिजे. परंतु कामाच्या परिपूर्तीचा अहवाल सोबत जोडलेला नाही.

4. कामाचे प्राकलन, मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणी केली असता, बाब क्र.3, 75 मि.मी. बी.बी.एम. करणे हे काम 200 चौ.मी. करणेचे नमुद केले आहे व त्याचा दर रु.198.85/- प्रती चौ.मी. असुन एकुण रु.39770/- चे काम अंदाजित केले आहे. परंतु देयकाची तपासणी केली असता सदर काम करण्यात आलेले नाही. तसेच बाब क्र.4 providing and laying bituminous macadam with 40-80 tonnes per hour hot mix plant,परिमाण 31.250 cubic meter दर 5400/ cubic meter प्रमाणे रु.168750/- अंदाजपत्रकीय तरतुद केली आहे. परंतु देयकाची तपासणी केली असता बाब क्र.2 चे काम करण्यात आलेले नाही व बाब क्र.4 चे काम 39.87 चौ.मी. करण्यात आले आहे. सदर काम अंदाजपत्रकीय

परिमाणापेक्षा 8.62 घ.मी.X रु.5400/- प्रती घ.मी. प्रमाणे रु.46548/- चे जादा करण्यात आले आहे. निविदा अटी/शर्ती मधील अट क्र.15 नुसार मंजुर कामामध्ये बदल किंवा वाढ करण्यास विभागप्रमुख यांच्या अगावु लेखी मंजुरीची आवश्यकता आहे. विभागप्रमुख व आयुक्तांची लेखी पुर्वमंजुरी न घेताच काम केलेले आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये जागेवरील परिस्थीतीनुसार कामामध्ये बदल करण्याचा अधिकार शहर अभियंता यांना असल्याने वेगळी मान्यता घेतलेली नसल्याचे नमुद आहे. परंतु नियमाप्रमाणे लेखी मान्यता घेणे आवश्यक असल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.

5. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,जिल्हास्तरीय समिती सांगली यांचे आदेश क्र.नपा/मुलभुत/ आर.आर/622/ 2011,दि.8/8/2011च्या प्रशासकीय मान्यतेच्या पत्रामधील अट क्र.23 नुसार या निधीच्या विनियोजना बाबतच्या प्रमाणपत्रासोबत नगरविकास विभागाच्या शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2008/ 1338/प्र.क्र.171/नवि16 दि.2/3/2009 नुसार सर्व विकास कामांची त्रयस्थ संस्थेकडुन तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे तांत्रिक लेखापरीक्षण करुन न घेताच देयक अदा केले आहे. अनुपालनामध्ये महानगरपालिकेकडुन त्रयस्थ संस्थेची नेमणुक केली नसल्याने तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेतले नसल्याचे नमुद आहे. परंतु शासन निर्णयाप्रमाणे त्रयस्थ संस्थेची तांत्रिक लेखापरीक्षण करण्याकरिता नेमणुक करणे आवश्यक असल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु.46548/-

**विषय क्रमांक 02 : मिरज वॉर्ड क्र.**39 **शिवनेरी चौक ते शाळा क्र.**1 **एरंडोली गेट रस्ता डांबरीकरण करणे.**

प्रमाणक क्रमांक : 12 दि. :28/06/12 रक्कम :679256/-

**लेखाशिर्ष :- इतर योजना 4120 शासनाचे विशेष अर्थसहाय्य**

अंदाजपत्रकीय रक्कम : रु.679597/-

प्रशासकीय मान्यता : 1.सहसचिव,नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.जीईएन/ 2010/प्रक्र68/नवि 16,दि.8/6/11

2.आयुक्त सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांचेकडील पत्र क्र.226/2011-12 दि.25/7/12

3.क्र.नपा / मुलभुत / आर.आर. / 622 / 2011 जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली नगरपालिका

प्रशासन शाखा यांचे प्रशासकीय मान्यतेचे पत्र दि.08/8/2011

स्थायी समिती सभा ठराव क्रमांक 241 दि.12/08/11

तांत्रिक मान्यता : शहर अभियंता कार्या,331 दि. 16.06.2011

जाहिर प्रकटन :- क्र.3/11-12 मधील अ.क्र.56 ची निविदा दि.13/8/11 रोजी दै.पुढारी या दैनिकामध्ये प्रसिध्द करण्यात आली असून सदरची निविदा दि. 26/8/11 रोजी उघडण्यात आली. या कामास अल्प प्रतिसाद मिळाल्याने दि.16/9/11 रोजी पहिली मुदतवाढ देण्यात आली होती. सदरची निविदा दि.31/10/11 रोजी निविदा समिती समोर उघडण्यात आली. त्यामध्ये एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या असुन सर्वात कमी दराची निविदा श्री.बी.बी.गुंजाटे (0.05 टक्के कमी) यांची मान्य करण्यात आली आहे.

ठेकेदाराचे नांव :बी.बी.गुंजाटे,

कार्यादेश क्रमांक / दिनांक : क्रमनपा/सा/बांधावि/5/2011-12 दि. 10.04.2012.

काम सुरु :-10/04/12

कामाची मुदत : 45 दिवस काम पुर्ण दिनांक : 15.05.2012

मोजमाप पुस्तक क्रमांक : 5 पृष्ठ क्रमांक : 56 ते 57

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

6. निविदा दि.31/10/11 रोजी उघडण्यात आल्यानंतर आयुक्त निर्णय क्र.286/2011-12 दि.21/11/11 नुसार श्री. बी.बी.गुंजाटे यांची सर्वात कमी दराची निविदा(0.05 टक्के कमी) मंजुर करण्यात आली आहे. परंतु बांधकाम विभागाने ठेकेदारास कार्यादेश दि.10/04/12 रोजी चार महिने विलंबाने दिला आहे. ठेकेदाराने करारपत्रासाठी रु.100 चा मुद्रांक दि.12/12/11 रोजी घेतला असुन सुरक्षा अनामत पावती क्र.4243 ने दि.07/1/12 रोजी भरली आहे. व करारपत्र नगरसचिव विभागाकडे दि.09/1/12 रोजी पाठविलेचे बांधकाम विभागाकडील करारपत्र नोंदवही वरुन दिसुन येते. करारपत्रावर ठेकेदार व शहर अभियंता यांची स्वाक्षरी आहे. परंतु दिनांक लिहिलेला नाही. प्रस्तुत करारपत्रावर महानगरपालिकेची सामान्य मुद्रा दोन स्थायी समिती सदस्यांच्या उपस्थितीमध्ये लावण्यात आली आहे. व करारपत्रावर नगरसचिव विभागाचा जावक क्र. 829-7/3/12 नमुद आहे. उपायुक्त यांनी करारपत्रावर दि.24/3/12 ने

स्वाक्षरी केली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड प्रकरण 5 नियम 1 संविदा करण्याची पध्दत (2) अन्वये महानगरपालिकेची सामान्य मुद्रा महानगरपालिका सचिवाच्या अभिरक्षेत असली पाहिजे आणि ती ज्या संविदेवर किंवा अन्य लेखावर लावणे आवश्यक आहे अशा प्रत्येक संविदेवर आणि लेखावर स्थायी समितीचे कोणतेही दोन सदस्य, नगरपालिका सचीव आणि आयुक्ताने प्राधिकृत केलेला असेल असा महानगरपालिका उपायुक्त दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला कोणताही अधिकारी, यांच्यामधील कोणत्याही दोन व्यक्तिंच्या उपस्थितीत लावली पाहिजे आणि अशा प्रत्येक संविदेवर व लेखावर आपल्या उपस्थितीत मुद्रा लावण्यात आली आहे याचे दर्शक म्हणून स्थायीच्या उक्त दोन व्यक्तिंनी सह्या केल्या पाहिजेत. करारपत्राचे अवलोकन केले असता स्थायी सदस्यांनी दि.07/3/12 रोजी स्वाक्षरी केली आहे. उपायुक्त यांनी त्यानंतर दि.24/3/12 रोजी स्वाक्षरी केली आहे. एकाच वेळी सह्या करणे आवश्यक असता त्या करण्यात आलेल्या नाहीत. तसेच या सर्व प्रक्रीयेमध्ये कामाचा कार्यादेश देण्यास 4 महिन्याचा विलंब झालेने काम पूर्ण होण्यास विलंब लागला आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये नगरसचिव विभागाकडुन नस्ती विलंबाने प्राप्त झाल्याने कार्यादेश देण्यास विलंब झाल्याचे नमुद आहे. परंतु नगरसचिव विभागाकडुन सिल लावण्यास विलंब झालेबाबतची कारणे नमुद केली नसल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.

7. नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 176 नुसार जेव्हा बांधकाम पूर्ण करण्यात येईल तेंव्हा नगरपरिषद अभियंता यांनी नमुना क्र.132 प्रमाणे बांधकाम पूर्ण झालेचे प्रतिवृत्त/अहवाल सादर केला पाहिजे. जेव्हा अंदाजापेक्षा अधिक रक्कम खर्च झाली असेल तेंव्हा परीमाण दर व केलेल्या बांधकामावरचा खर्च व तसेच त्यासंबंधातील अंदाज यांची तुलना करुन सर्व तफावतीबाबत त्याने स्पष्टीकरण केले पाहिजे. परंतु कामाच्या परिपूर्तीचा अहवाल सोबत जोडलेला नाही. अनुपालनामध्ये प्रतिवृत्त अहवाल घेतला नसल्याची बाब मान्य करण्यात आली आहे. व येथुन पुढे अहवाल घेण्याची दक्षता घेण्यात येत असल्याचे नमुद केले आहे.

8. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हास्तरीय समिती सांगली यांचे आदेश क्र.नपा/मुलभुत/आर.आर/622/ 2011,दि.8/8/2011च्या प्रशासकीय मान्यतेच्या पत्रामधील अट क्र.23 नुसार या निधीच्या विनियोजना बाबतच्या प्रमाणपत्रासोबत नगरविकास विभागाच्या शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2008/1338/ प्र.क्र.171/नवी-16 दि.2/3/2009 नुसार सर्व विकास कामांची त्रयस्थ संस्थेकडुन तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे तांत्रिक लेखापरीक्षण का करुन घेतले नाही या बाबतचा खुलासा अनुपालनामध्ये केला आहे. महानगरपालिकेने त्रयस्थ संस्थेची नेमणुक केली नसल्याने तांत्रिक लेखापरीक्षण करण्यात आले नसल्याचे नमुद आहे. परंतु शासन निर्णयाप्रमाणे त्रयस्थ संस्थेची तांत्रिक लेखापरीक्षण करण्याकरिता नेमणुक करणे आवश्यक असल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत

| |
|---|
| आहे.<br><br>9. उद्योग उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकराचा समावेश विभागिय दरसुचीमध्ये केला जात नसल्याने प्राकलन तयार करताना दरपृथ:करण करुन कामगार कल्याण उपकराचा समावेश करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे प्राकलनामध्ये उपकराचा समावेश केला आहे.देयक रु.679455/- चे आदा केल्याने 1 टक्केप्रमाणे रु.6794/- देयकामधुन कपात करण्याऐवजी रु.3887/- कपात केल्याने रु.2907/- ठेकेदाराकडून वसूल करण्यात यावेत. अनुपालनामध्ये उपकराची रक्कम वसुल करण्याचे मान्य केले आहे.<br><br>**आक्षेपाधिन रक्कम :-** रु.676349/-<br>**वसुलपात्र रक्कम :-** कामगार कल्याण उपकर रु.2907/-<br>अर्धसमास ज्ञापन क्र.156 दि. 04/10/2014 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.18/10/2014 सादर केले आहे. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 156 | 04/10/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 111 | मिरज शहर शास्त्री चौक जवळील पाटील समाज स्मशानभूमीस कंपौंड भिंत बांधणे या कामातील अनियमिततेबाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | शासनाचे विशेष अर्थसहाय्य. | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | राज्य शासन | 9ब | 04 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 572319 | 5781 | | |

बांधकाम विभागाकडुन नगरसचिव विभागाकडे कामाचे करारपत्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड प्रकरण 5 नियम 1 संविदा करण्याची पध्दत (2) अन्वये महानगरपालिकेची सामान्य मुद्रा स्थायी समितीच्या दोन सदस्यांचे उपस्थित व स्वाक्षरीसाठी घेण्यासाठी पाठविलेनंतर त्यावर स्वाक्षरी होण्यासाठी दोन महिने प्रलंबित राहिल्याने काम सुरु व पुर्ण होण्यास  विलंब लागला आहे.

उपरोक्त विषयांकित कामी शहर अभियंता यांचे टिपणीचे अवलोकन करणेत आले. त्यानुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये विकास कामासाठी 2011-12 चे अर्थसंकल्पात नावांनिशी मंजूर केलेल्या व मा.स्थायी समिती ठराव क्र.242/11-12, दि.12/08/2011 अन्वये मिळालेल्या मान्यतेनुसार रु.3,63,51,642/- मात्रची 42 कामे तसेच  2011-12 सालाकरिता सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी शासनाकडून उपलब्ध झालेल्या विशेष अनुदान रु.5.49 कोटी निधीतुन शासकीय मंजुरी मिळालेल्या कामापैकी मा.स्थायी समिती ठराव क्र.24/11-12, दि.12/08/2011 अन्वये मिळालेल्या मान्यतेनुसार रु.3,65,23,138/- मात्रची 53 कामे मिळून बांधकाम विभागाकडील एकूण 92 कामांचे जाहिर प्रकटन क्र.3/11.12 दि.13/08/2011 च्या दै.पुढारी वृत्तपत्रामध्ये तसेच ई-टेंडर सेल मार्फत जाहिर निविदा प्रसिध्द करून ई-निविदा पध्दतीनुसार ऑन लाईन निविदा दि.25/08/2011 रोजी दुपारी 5.54 वाजेपर्यंत ई-टेंडर सेल मार्फत मागविण्यात आलेल्या होत्या. निविदा फॉर्म विक्री दि.24/08/2011 रोजी 5.00 वाजेपर्यंत होती. ई-टेंडर सेलव्दारे सदर निविदा उघडणेची वेळ दि.26/08/2011 रोजी दु.12.00 वा. होती. सबब निविदा कमिटीच्या मान्यतेनुसार दि.29/08/2011 व दि.30/08/2011  रोजी ई-टेंडर सेलव्दारे निविदा कमिटी समोर उघडणेत आल्या. या कामासाठी एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या असुन सर्वात कमी दराची निविदा मे.एम.बी.चिकली(0.07टक्के कमी) यांची मान्य करण्यात आली आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी 2010-11 या आर्थिक वर्षासाठी सहसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.जीईएन/2010/प्रक्र68/नवि16, दि.08/06/2011 व शासन निर्णय क्र.पुनर्वि-2011/प्र.क्र.44 /नवि-4, दि.31/03/2011 अन्वये 5.49 कोटी अनुदान मंजुर झाले असुन ते 2011-12 या आर्थिक वर्षामध्ये वितरीत केले आहे. या रक्कमेतुन 102 कामांचा प्रस्ताव मा.विभागीय आयुक्त पुणे यांचेकडील त्रिसदस्य समितीकडे मान्यतेसाठी पाठविणेसाठी स्थायी समिती ठराव क्र.181/11-12 दि.12/07/2011 अन्वये मान्यता घेवुन जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव सांगली यांचेकडे महानगरपालिके मार्फत पत्र क्र.मनपा/सा/बांधा/226/2011-12 दि.25/7/2011 रोजी पाठविण्यात आला. त्यास विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष जिल्हास्तरीय समिती, पुणे यांचे कडील पत्र क्र.निशा / कार्या 02 / मनपा / विनि / प्रशामा / को /228 /11, दि.06/08/2011 अन्वये तसेच जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हास्तरीय समिती सांगली यांचे आदेश क्र.नपा /मुलभुत / आर.आर/622/ 2011, दि.8/8/2011अन्वये प्रशासकीय मान्यता

दिली आहे.

प्रमाणक क्रमांक : 24 दि. : 13/08/12 रक्कम : रु.578100/-

**लेखाशिर्ष :- इतर योजना 4120 शासनाचे विशेष अर्थसहाय्य**

अंदाजपत्रकीय रक्कम :रु. 579135/-

प्रशासकीय मान्यता : 1.सहसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.जीईएन/2010/प्रक्र68/नवि 16,दि.8/6/11

2.आयुक्त सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांचेकडील पत्र क्र.226/2011-12 दि.25/7/12

3.क्र.नपा/मुलभुत/आरआर/622/2011 जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली नगरपालिका प्रशासन शाखा यांचे प्रशासकीय मान्यतेचे पत्र ,दि.08/8/2011

स्थायी समिती सभा ठराव क्रमांक 241 दि.12/08/11

तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता कार्या,390-17 दि. 16.06.2011

ठेकेदाराचे नांव :- मे.एम.बी.चिकली(0.07टक्के कमी)

कार्यादेश क्रमांक/दिनांक :- क्रमनपा/सा/बांधावि/518/2011-12 दि.06.01.2012.

काम सुरु :-10/04/12

कामाची मुदत : 90 दिवस काम पुर्ण दिनांक : 04.04.2012

मोजमाप पुस्तक क्रमांक : 5 पृष्ठ क्रमांक : 22 ते 25

कामाची नस्ती, मोजमाप पुस्तक व देयकाचे लेखापरीक्षण करून अर्धसमास ज्ञापन क्र.157 दि. 04/10/2014 रोजी निर्गमित केला आहे. बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.18/10/2014 रोजी सादर केले आहे. अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालन तपासून खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)आयुक्त निर्णय क्र.214/2011-12 दि.30/09/11 नुसार मे.एम.बी.चिकली(0.07टक्के कमी) यांची सर्वात कमी दराची निविदा मंजुर करण्यात आली आहे. बांधकाम विभागाने ठेकेदारास निविदा मंजुरीची समज दि.17/10/11 रोजी दिली आहे व ठेकेदाराने रु.100 च्या मुद्रांकावर केलेल्या करारपत्रावर ठेकेदार व शहर अभियंता यांची स्वाक्षरी आहे. प्रस्तुत करारपत्रावर महानगरपालिकेची सामान्य मुद्रा दोन स्थायी समिती

सदस्यांच्या उपस्थितीमध्ये लावण्यात आली आहे. व त्याचेवर 462-14/12/11 असा क्रमांक नमुद आहे. परंतु सदर क्रमांक कोणत्या कार्यालयाचा आहे. तो आवक क्र. आहे कि जावक क्र. आहे याचा अर्थबोध होत नाही. उपायुक्त यांनी करारपत्रावर दि.31/12/2011 ने स्वाक्षरी केली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड प्रकरण 5 नियम 1 संविदा करण्याची पध्दत (2) अन्वये महानगरपालिकेची सामान्य मुद्रा महानगरपालिका सचिवाच्या अभिरक्षेत असली पाहिजे व आणि ती ज्या संविदेवर किंवा अन्य लेखावर लावणे आवश्यक आहे अशा प्रत्येक संविदेवर आणि लेखावर स्थायी समितीचे कोणतेही दोन सदस्य, नगरपालिका सचिव आणि आयुक्ताने प्राधिकृत केलेला असेल असा महानगरपालिका उपायुक्त दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला कोणताही अधिकारी, यांच्यामधील कोणत्याही दोन व्यक्तिंच्या उपस्थितीत लावली पाहिजे आणि अशा प्रत्येक संविदेवर व लेखावर आपल्या उपस्थितीत मुद्रा लावण्यात आली आहे याचे दर्शक म्हणून स्थायीच्या उक्त दोन व्यक्तिंनी सह्या केल्या पाहिजेत. करारपत्राचे अवलोकन केले असता स्थायी सदस्यांनी दि.14/12/2011 रोजी स्वाक्षरी केली आहे. उपायुक्त यांनी त्यानंतर दि.31/12/2011 रोजी स्वाक्षरी केली आहे. एकाच वेळी मुद्रा सर्वांच्या उपस्थित लावणे आवश्यक असता त्या लावण्यात आलेल्या नाहीत. ठेकेदारास समज देणे दि.17/10/2011 व करार करणे दि.31/12/2011 या प्रक्रीयेमध्ये 2 महिन्याचा दिनावधी गेल्याने काम सुरु करण्यास विलंब झाला आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये करारपत्रावर स्वाक्षरी होण्यास विलंब लागला असल्याची बाब मान्य करण्यात आली आहे. परंतु विलंबाबाबत समर्पक खुलासा करण्यात आलेला नाही.

2)नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 176 नुसार जेव्हा बांधकाम पूर्ण करण्यात येईल तेंव्हा नगरपरिषद अभियंता यांनी नमुना क्र.132 प्रमाणे बांधकाम पूर्ण झालेचे प्रतिवृत्त/अहवाल सादर केला पाहिजे. परंतु कामाच्या परिपूर्तीचा अहवाल सोबत जोडलेला नाही. अनुपालनामध्ये येथुन पुढे प्रतिवृत्त सादर करण्याची दक्षता घेण्याचे मान्य केले आहे.

3)जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हास्तरीय समिती सांगली यांचे आदेश क्र.नपा/मुलभुत/ आर.आर/622/ 2011,दि.08/08/2011 च्या प्रशासकीय मान्यतेच्या पत्रामधील अट क्र.23 नुसार या निधीच्या विनियोजनाबाबतच्या प्रमाणपत्रासोबत नगरविकास विभागाच्या शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2008/1338/प्र.क्र.171/नवि16 दि.02/03/2009 नुसार सर्व विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडुन तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे तांत्रिक लेखापरीक्षण करुन न घेताच देयक अदा केले आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये महानगरपालिकेने त्रयस्थ संस्थेची नेमणुक केली नसल्याने तांत्रिक लेखापरीक्षण करण्यात आले नसल्याचे नमुद आहे. परंतु शासन निर्णयाप्रमाणे त्रयस्थ संस्थेची तांत्रिक लेखापरीक्षण करण्याकरिता नेमणुक करणे आवश्यक असल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.

| |
|---|
| 4)उद्योग उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/ कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकराचा समावेश विभागिय दरसुचीमध्ये केला जात नसल्याने प्राकलन तयार करताना दरपृथ:करण करुन कामगार कल्याण उपकराचा समावेश करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे प्राकलनामध्ये उपकराचा समावेश केला आहे. देयक रु.578100/- चे आदा केले आहे. परंतु 1 टक्केप्रमाणे उपकर रु.5781/- देयकामधुन कपात केला नाही. त्यामुळे सदर रक्कम रु.5781/- ठेकेदाराकडून वसूल करण्यात यावी. अनुपालनामध्ये उपकराची रक्कम वसुल करण्याचे मान्य केले आहे.<br><br>**आक्षेपाधिन रक्कम रु. 572319/-**<br>**वसुलपात्र रक्कम :- कामगार कल्याण उपकर रु.5781/** |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 157 | 04/10/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 112 | वॉर्ड क्र.64, शाळा नं.16 इनामदार घरापर्यंतच्या रस्त्याची सुधारणा करणे या कामातील अनियमिततेबाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | शासनाचे विशेष अर्थसहाय्य | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | राज्य शासन | 9ड | 02 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 562009 | | | |

नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 174 नुसार कंत्राटदारास प्रदान करावयाचे देयक नमुना क्र.131 मध्ये तयार करणे आवश्यक असता , नियम 42 (1) नुसार वस्तुमालाचा पुरवठा केलेनंतर आदा करावयाच्या नमुना क्र.22 मध्ये संक्षिप्त देयक तयार करुन प्रदान केले आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी 2010-11 या आर्थिक वर्षासाठी सहसचिव,नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.जीईएन/2010/प्रक्र68/नवि16, दि.08/06/2011 व शासन निर्णय क्र.पुनर्वि-2011/प्र.क्र.44/नवि-4, दि.31/03/2011 अन्वये 5.49 कोटी अनुदान मंजुर झाले असुन ते 2011-12 या आर्थिक वर्षामध्ये वितरीत केले आहे. या रक्कमेतुन 102 कामांचे प्रस्ताव मा.विभागीय आयुक्त पुणे यांचेकडील त्रिसदस्य समितीकडे मान्यतेसाठी पाठविणेसाठी स्थायी समिती ठराव क्र.181/11-12 दि.12/07/11 अन्वये मान्यता घेवुन जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव सांगली यांचेकडे महानगरपालिकेमार्फत पत्र क्र.मनपा/ सा/ बांधा/226/2011-12 दि.25/7/11 रोजी पाठविण्यात आला. त्यास विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष जिल्हास्तरीय समिती, पुणे यांचे कडील पत्र क्र.निशा/कार्या 02/मनपा/विनि/प्रशामा /को/228/11, दि.06/08/2011 अन्वये तसेच जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हास्तरीय समिती सांगली यांचे आदेश क्र.नपा/मुलभुत/आर.आर/622/2011,दि.8/8/11 अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे.

**प्रमाणक क्रमांक :25 दि. : 28/08/12 रक्कम :562009/-**

**लेखाशिर्ष :- इतर योजना 4120 शासनाचे विशेष अर्थसहाय्य**

अंदाजपत्रकीय रक्कम : रु.563815/-

प्रशासकीय मान्यता : 1.सहसचिव,नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.जीईएन/ 2010/प्र.क्र.68/नवि 16,दि.8/6/11

2.आयुक्त सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांचेकडील पत्र क्र.226/2011-12 दि.25/7/12

3.क्र.नपा/मुलभुत/आरआर/622/2011 जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली नगरपालिका प्रशासन शाखा यांचे प्रशासकीय मान्यतेचे पत्र दि.08/8/2011

स्थायी समिती सभा क्रमांक 28 ठराव क्रमांक 566 दि.24/01/12.

तांत्रिक मान्यता : 390 दि. 16.06.2011

ठेकेदाराचे नांव : श्री.ए.ए.भोकरे ,सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग,शासन निर्णय क्र.सीएटी 01/05/प्र.क्र.26/इमारती 2,दि.31 मार्च 2005 व स्थायी समिती ठराव क्र.446/06/07, दि.14/11/2006 अन्वये 33 टक्के कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना मंजुर करण्याचा ठराव झालेला आहे. तसेच महानगरपालिकेस प्राप्त शासन अनुदान रु.5.89 कोटीमधील रु.17861966/- निधीची 45 कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना देण्याचा ठराव, स्थायी समिती ठराव क्रमांक 292 दि.30/08/2011 रोजी झाला आहे. त्यानुसार हे काम मंजुर करण्यात आले आहे.

कार्यादेश क्रमांक / दिनांक : क्रमनपा/सा/बांधावि/625/2011-12 दि. 15.02.2012.

काम सुरु दि. :- 15/02/2012

कामाची मुदत : 45 दिवस काम पुर्ण दिनांक : 30.03.2012

मोजमाप पुस्तक क्रमांक : 20 पृष्ठ क्रमांक : 40

कामाची नस्ती, मोजमाप पुस्तक व देयकाचे लेखापरीक्षण करून अर्धसमास ज्ञापन क्र.158 दि. 04/10/2014 रोजी निर्गमित केला आहे. बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.18/10/2014 रोजी सादर केले आहे. अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालन तपासून खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1) नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 174 नुसार कंत्राटदारास त्यांनी केलेल्या कामाची देयके नमुना क्र.131 प्रमाणे तयार करुन त्यात केलेल्या कामाचा संपूर्ण तपशील देण्यात यावा,जेणे करुन त्यातील बाबी ओळखुन ,अंदाजाबरोबर तुलना करून,पडताळणी करणे सोयीचे होईल. परंतु नियम 42 (1),नमुना क्र.22 मध्ये संक्षिप्त देयक तयार केले आहे. सदर नमुना वस्तुमालाचा पुरवठा केलेनंतर आदा करावयाच्या देयकासंबधी आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये देयक नागरी सुविधा केंद्र यांचेकडुन देण्यात आलेल्या नमुन्याप्रमाणे तयार करणेत आल्याचे नमुद आहे. सदर नमुना वस्तुमालाचा पुरवठा केलेनंतर आदा करावयाच्या देयकासंबधी असल्याने देयक नमुना क्र.131 मध्ये तयार करणे आवश्यक आहे.

2)नगरविकास विभागाच्या शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2008/1338/प्र.क्र.171/नवि16 दि.2/3/09 नुसार सर्व विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडुन तांत्रिक लेखापरीक्षण करून घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे तांत्रिक लेखापरीक्षण करुन न घेताच देयक अदा केले आहे. अनुपालनामध्ये महानगरपालिकेने त्रयस्थ संस्थेची नेमणुक केली नसल्याने तांत्रिक लेखापरीक्षण करण्यात आले नसल्याचे नमुद आहे. परंतु शासन निर्णयाप्रमाणे त्रयस्थ संस्थेची तांत्रिक लेखापरीक्षण करण्याकरिता नेमणुक करणे आवश्यक असल्याने दिलेले अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.

| **आक्षेपाधिन रक्कम रु. 562009/-** |
| --- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
| --- | --- | --- | --- | --- |
| 158 | 04/10/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |
| --- | --- |

| 113 | वॉर्ड क्र.63, फुटाणे बोळ,हारगे बोळ व कुडचे बोळ रस्त्याची सुधारणा करणे या कामातील अनियमिततेबाबत. | | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमितताांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | राज्य शासन | 9ब | 04 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
| --- | --- | --- | --- |
| 436458 | 4734 | | |

उद्योग उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकर रु.4411/- देयकामधुन वसूल करणे आवश्यक आहे. देयकामधुन कामगार कल्याण उपकर रु.1490/- वसूल केला आहे. उर्वरित रक्कम रु.2921/- ठेकेदाराकडून वसूल केली नाही.

प्रमाणक क्रमांक :- 27 दिनांक :- 28/08/12 रक्कम :- 441192/-

**लेखाशिर्ष :- इतर योजना4120 शासनाचे विशेष अर्थसहाय्य**

अंदाजपत्रकीय रक्कम : रू. 442574/-

प्रशासकीय मान्यता : 1.सहसचिव,नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.जीईएन/ 2010/प्रक्र68/नवि 16,दि.8/6/11

2.आयुक्त सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांचेकडील पत्र क्र.226/2011-12 दि.25/7/12

3.क्र.नपा/मुलभुत/आरआर/622/2011 जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली नगरपालिका प्रशासन शाखा दि. 08 / 8/ 2011 नुसार प्रशासकीय मान्यतेचा आदेश.

स्थायी समिती सभा क्रमांक 28, ठराव क्रमांक 566, दि.24/01/12.

तांत्रिक मान्यता : 390 दि. 16.06.2011

ठेकेदाराचे नांव : श्री.ए.ए.भोकरे ,सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.सीएटी 01/05/ प्र.क्र.26/इमारती 2,दि.31 मार्च 2005 व स्थायी समिती ठराव क्र.446/06/07,दि.14/11/2006 अन्वये 33 टक्के कामे मंजुर करण्याचा ठराव झालेला आहे.तसेच महानगरपालिकेस प्राप्त शासन अनुदान रु.5.89 कोटीमधील रु.17861966/- निधीची 45 कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना देण्याचा ठराव, स्थायी समिती ठराव क्रमांक 292 दि.30/08/11 रोजी झाला आहे. त्यानुसार हे काम करण्यात आले आहे.

कार्यादेश क्रमांक / दिनांक : क्रमनपा/सा/बांधावि/600/2011-12 दि. 10.02.2012.

काम सुरु:-10/02/12

कामाची मुदत : 45 दिवस काम पुर्ण दिनांक : 23.03.2012

मोजमाप पुस्तक क्रमांक : 20 पृष्ठ क्रमांक : 41

कामाची नस्ती, मोजमाप पुस्तक व देयकाचे लेखापरीक्षण करून अर्ध. ज्ञापन क्र.159 दि. 04/10/2014 रोजी निर्गमित केला आहे. बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.18/10/2014 रोजी सादर केले आहे. अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालन तपासून खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 174 नुसार कंत्राटदाराने केलेल्या कामाचे प्रदान करावयाचे देयक नमुना क्र.131 मध्ये तयार करणे आवश्यक असता, नियम 42 (1) ,नमुना क्र.22 मध्ये संक्षिप्त देयक तयार केले आहे. सदर नमुना वस्तुमालाचा पुरवठा केलेनंतर आदा करावयाच्या देयकासंबधी असल्याने देयके नमुना क्र.131 मध्ये तयार करणे आवश्यक आहे.

| |
|---|
| 2)प्राकलन,मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणी केली असता बाब क्र.2 ने 25.65 घ.मी. हार्ड मुरुम पुरविला आहे. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. देयकासोबत ठेकेदाराने रॉयल्टी रक्कम भरलेचा कोणताही पुरावा सोबत जोडला नसतानाही बांधकाम विभागाने देयकामधुन रॉयल्टीची रक्कम कपात न करता ठेकेदारास आदा केली आहे. त्यामुळे रु.70.67 प्रती घ.मी प्रमाणे 25.65 घ.मी. हार्ड मुरुमाची रॉयल्टी रक्कम रु.1813/- ठेकेदाराकडून वसूल करणे आवश्यक आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये रॉयल्टी रक्कम वसुल करण्याचे मान्य केले आहे. परंतु रक्कम वसुल करण्यात आलेली नाही.<br><br>3)देयकामधुन कामगार कल्याण उपकर रु.1490/- वसूल केला आहे. उद्योग उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकर वसूल केलेली नाही. सदर रक्कम रु. 2921/- ठेकेदाराकडून वसूल करावी. अनुपालनामध्ये रक्कम वसुल करण्याचे मान्य केले आहे.<br><br>4)नगरविकास विभागाच्या शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2008/1338/प्र.क्र.171/नवि16 दि.2/3/2009 नुसार सर्व विकास कामाचे त्रयस्थ संस्थेकडुन तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे तांत्रिक लेखापरीक्षण करुन न घेताच देयक अदा केले आहे. अनुपालनामध्ये महानगरपालिकेने त्रयस्थ संस्थेची नेमणुक केली नसल्याने तांत्रिक लेखापरीक्षण करण्यात आले नसल्याचे नमुद आहे. परंतु शासन निर्णयाप्रमाणे त्रयस्थ संस्थेची तांत्रिक लेखापरीक्षण करण्याकरिता नेमणुक करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नसल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.<br><br>आक्षेपाधिन रक्कम रु. 436458/-<br><br>वसुलपात्र रक्कम :- रॉयल्टी रु. 1813/-+ कामगार कल्याण उपकर रु. 2921/- =रु. 4734/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 159 | 04/10/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |
|---|---|

| 114 | मिरज वॉर्ड क्र.41 टाकळी रोड गोदड मळा दक्षिण उत्तर रस्ता बी.बी.एम करणे व दर्गा परिसर विकसित करणे या कामातील अनियमिततेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | शासनाचे विशेष अर्थसहाय्य. | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | राज्य शासन | 9ब | 02 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 295479 | 4070 | | |

महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे.व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. ठेकेदाराने रॉयल्टी भरल्याचा पुरावा सोबत जोडला नसल्याने ठेकेदारास देयका मधुन आदा केलेली 57.60 घ.मी.X रु.70.67 प्रती घ.मी. प्रमाणे रु.4070/- रॉयल्टी रक्कम वसूलपात्र आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी 10/11 या आर्थिक वर्षासाठी सहसचिव, नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.जीईएन/2010/प्रक्र68/नवि 16,दि.8/6/11 व शासन निर्णय क्र.पुनर्वि-2011/प्र.क्र.44/नवि-4,दि.31/3/11 अन्वये 5.49 कोटी अनुदान मंजुर झाले असुन ते 11/12 या आर्थिक वर्षामध्ये वितरीत केले आहे. या रक्कमेतुन 102 कामांचे प्रस्ताव मा.विभागीय आयुक्त पुणे यांचेकडील त्रिसदस्य समितीकडे मान्यतेसाठी पाठविणेसाठी स्थायी समिती ठराव क्र.181/11-12 दि.12/07/11 अन्वये मान्यता घेवुन जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव सांगली यांचेकडे महानगरपालिके मार्फत पत्र क्र.मनपा/सा/बांधा/226/2011-12 दि.25/7/11 रोजी पाठविण्यात आला. त्यास विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष जिल्हास्तरीय समिती,पुणे यांचे कडील पत्र क्र.निशा/कार्या 02/मनपा /विनि /प्रशामा /को / 228/11, दि.06/8/11 अन्वये

तसेच जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,जिल्हास्तरीय समिती सांगली यांचे आदेश क्र.नपा/मुलभुत/आर.आर/622/2011, दि.8/8/2011 अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे.

**प्रमाणक क्रमांक :- 04 दि. 06/07/2012 रक्कम :- 299549/-**

लेखाशिर्ष :- इतर योजना 4120 शासनाचे विशेष अर्थसहाय्य

अंदाजपत्रकीय रक्कम : रु.300000/-

प्रशासकीय मान्यता :- 1.सहसचिव,नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.जीईएन/ 2010/प्रक्र68/नवि 16,दि.8/6/11

2.आयुक्त सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांचेकडील पत्र क्र.226/2011-12 दि.25/7/12

3.क्र.नपा/मुलभुत/आरआर/622/2011 जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली नगरपालिका प्रशासन शाखा यांचे प्रशाकीय मान्यतेचा आदेश दि.08/8/2011

स्थायी समिती सभा क्रमांक 14 ठराव क्रमांक 292 दि.30/08/11

तांत्रिक मान्यता : 341 दि. 16.06.2011

ठेकेदाराचे नांव : भाऊसाहेब भोसले ,सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग,शासन निर्णय क्र.सीएटी 01/05/प्र.क्र.26/इमारती 2, दि.31 मार्च, 2005 व स्थायी समिती ठराव क्र.446/06/07,दि.14/11/2006 अन्वये 33 टक्के कामे मंजुर करण्याचा ठराव झालेला आहे.त्यानुसार सदर काम मंजुर करण्यात आले आहे.

कार्यादेश क्रमांक / दिनांक : क्रमनपा/सा/बांधावि/507/2011-12 दि. 06.01.2012.

काम सुरु :- 06/01/2012

कामाची मुदत : 30 दिवस काम पुर्ण दिनांक : 05.02.2012

मोजमाप पुस्तक क्रमांक : 05 पृष्ठ क्रमांक : 14 ते 16

कार्यालयीन टिपणी दि.10/08/11 मध्ये प्रस्तावामधील 102 कामापैकी तात्काळ करावयाची कामे जाहिर निविदा प्रक्रियेने विलंब लागणार असल्याने रु.5 लाख पर्यंतच्या रक्कमेची 45 कामे महानगरपालिकेकडील नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांचे कडुन करुन घेण्यास व त्याप्रमाणे स्थायी समितीची मान्यता घेणेची शिफारस करण्यात आली आहे व त्यास स्थायी समिती सभा क्रमांक 14 ठराव क्रमांक 292 दि.30/08/11 ने कामांना ठेकेदाराच्या नावनिहाय यादीस मान्यता झाली आहे.

कामाची नस्ती, मोजमाप पुस्तक व देयकाचे लेखापरीक्षण करून अर्धसमास ज्ञापन क्र.160 दि. 04/10/2014 रोजी निर्गमित केला आहे. बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.04/10/2014 रोजी सादर

| |
|---|
| केले आहे. अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालन तपासून खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.<br><br>1)कामाचे प्राकलन, मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणी केली असता कठीण मुरुम 57.60 घ.मी. वापरला आहे. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु.200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67 प्रती घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे. व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. त्यामुळे ठेकेदाराने रॉयल्टी भरल्याचा पुरावा जोडला नसतानही देयका मधुन आदा केलेली 57.60 घ.मी. X रु.70.67 प्रती घ.मी. प्रमाणे रु.4070/- रॉयल्टी रक्कम ठेकेदाराकडुन वसुल करणे आवश्यक आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये रॉयल्टी रक्कम रु.4070/- वसुल करण्याचे मान्य केले आहे.<br><br>2)नगरविकास विभागाच्या शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2008/1338/प्र.क्र.171/नवि16 दि.02/03/2009 नुसार सर्व विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडुन तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे तांत्रिक लेखापरीक्षण करुन न घेताच देयक अदा केले आहे. अनुपालनामध्ये महानगरपालिकेकडुन त्रयस्थ संस्थेची नेमणुक केली नसल्याने तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेतले नसल्याचे नमुद आहे. परंतु शासन निर्णयाप्रमाणे त्रयस्थ संस्थेची तांत्रिक लेखापरीक्षण करण्याकरिता नेमणुक करणे आवश्यक असल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.<br>**आक्षेपाधिन रक्कम :- रु. 295479/-**<br>**वसुलपात्र रक्कम :- रॉयल्टी रु. 4070/-** |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 160 | 04/10/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |
|---|---|

| 115 | सांगली येथील जवाहर चौक अंतर्गत रस्ते सुधारणा करणे या कामातील अनियमितते बाबत. |
|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव |
| | |

| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 04 | सार्व.बांधकाम | मनपा | 9ड | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

सदर काम आर्थिक वर्ष 09/10 मध्ये केले असल्याने ते त्या वर्षात खर्ची टाकणे आवश्यक असता 2012-2013 या आर्थिक वर्षात खर्ची टाकण्यात आले आहे.

अंदाजपत्रकीय रक्कम रु.1487283/-, क्र.244 दि.21/11/2008

अंदाजपत्रकामधील खाते :- 03) इतर योजना, 248) जवाहर चौक विकसित करणे.

प्रमाणक क्र.7628 दि.30/03/13 रु.1487025/-

लेखाशीर्ष :- 2011-12 मध्ये लेखाशिर्ष व तरतुद असलेल्या परंतु 2012-13 या वर्षात लेखाशिर्ष नसलेली तसेच तरतुद शुन्य असलेली आदा करावयाची देयके.

स्थायी समिती ठराव क्र.304/08/09 दि.18/02/2009 ने कामास मान्यता देण्यात आली आहे.

मक्तेदारास कार्यादेश दिलेचा दि.27/2/2009

कामाची मुदत :- 90 दिवस.

काम सुरु दि. 27/2/2009

दि.01/5/09 ते दि. दि.31/5/09 अखेर काम बंद.

काम पूर्ण दि.23/06/09

कामाची पहाणी करुन मापे घेतल्याचा दि.03/08/09

मोजमाप पुस्तक क्र.05 पृष्ठ क्र.48 ते 50.

कामाची नस्ती, मोजमाप पुस्तक व देयकाचे लेखापरीक्षण करून अर्धसमास ज्ञापन क्र.166 दि. 10/10/2014 रोजी निर्गमित केला आहे. बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.28/10/2014 रोजी सादर केले आहे. अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालन तपासून खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)प्रमाणकाची तपासणी केली असता बांधकाम विभागाने कामाचे देयक, नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे

| |
|---|
| नियम क्रमांक 174 नुसार नमुना क्र.131 मध्ये झेरॉक्स प्रतीमध्ये असुन देयक सादर करतानाचे लेखाशीर्ष :- 03) इतर योजना, 248) जवाहर चौक विकसित करणे असे नमुद आहे. सदर देयक लेखाशाखेकडे कधी पाठविले तो दिनांक देयकावर नमुद नाही. या कामाचे देयक बांधकाम विभागाने, नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 42 (1) नुसार नमुना क्र.22 मध्ये बील क्र.151 ने दि.12/7/12 ने पुन्हा तयार केले असुन त्यावर लेखाशिर्ष :- 2011-12 मध्ये लेखाशिर्ष व तरतुद असलेल्या परंतु 2012-13 या वर्षात लेखाशिर्ष नसलेली तसेच तरतुद शुन्य असलेली आदा करावयाची देयके असे नमुद करून लेखा शाखेस पाठविले आहे. काम आर्थिक वर्ष 2009-10 मध्ये केले असल्याने ते त्या वर्षात खर्ची टाकणे आवश्यक असता 2012-13 या आर्थिक वर्षात प्रमाणक क्र.7628,दि.30/03/2013 ने रु.1487025/- खर्ची टाकण्यात आले आहे. तसेच सदर देयक 2008-09 ते 2011-12 या आर्थिक वर्षात खर्ची टाकले नसलेबाबत लेखापरीक्षणाची योग्य कागदपत्राचे अधारे खात्री पटविण्यात आली नाही. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये त्या वर्षी अनुदान नसलेने देयक खर्ची टाकले नसल्याचे नमुद आहे. वित्तीय वर्ष 2010-11 व 2011-12 मध्ये प्रलंबित देयकाची तरतुद करून खर्च टाकणे आवश्यक असता त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 166 | 10/10/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |
|---|---|

| 116 | वॉर्ड क्र.12 बालाजी नगरमधील अंतर्गत रस्ते सुधारणा करणे या कामातील अनियमिततेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | मनपा | 9ड | 06 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|

सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम 227 (24) कामाच्या अतिरिक्त बाबी पार पाडणे कार्यकारी अभियंता यांना प्रत्येक अतिरिक्त बाबींसाठी रुपये 10,000/- या प्रमाणे वाढ करण्याचे अधिकार आहेत. तसेच निविदा अटी/शर्ती मधील अट क्र.15 नुसार मंजुर कामामध्ये बदल किंवा वाढ करण्यास विभागप्रमुख यांच्या अगावु लेखी मंजुरीची आवश्यकता आहे. विभागप्रमुख व आयुक्तांची लेखी पुर्वमंजुरी न घेताच जादाचे काम करणेत आले आहे.

सांगली,मिरज आणि कुपवाड महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाकडील बालाजी नगरमधील अंतर्गत रस्ते सुधारणा करणे या कामास स्थायी समिती ठराव क्र.242 दि.12/08/2011 ने प्रशासकीय मंजूरी घेण्यात आली आहे. जाहिर निविदा सुचना क्र.3/11-12 दै.पुढारी मध्ये दि.13/08/2011 रोजी प्रसिध्द करण्यात आली. सदरची निविदा दि.26/08/2011 रोजी निविदा कमिटी समोर उघडण्यात आली. कामास अल्प प्रतिसाद मिळाल्यामुळे दि.16/09/2011 रोजी पहिली मुदतवाढ देण्यात आली होती. निविदा दि.31/10/2011 रोजी उघडण्यात आली असुन त्यामध्ये एकुण 6 निविदाधारकांनी भाग घेतला होता. निविदाधारका मधील ठेकेदार शरद आकाराम रुपनवर यांच्या शेकडा 22.16 टक्के कमी दराचे निविदेस आयुक्त निर्णय क्र. 302 /2011-12 दि. 22/11/2011 ने मान्यता दिली आहे.

व्दिनोंद 4154 ,लेखाशिर्ष :-11/12 मध्ये लेखाशिर्ष व तरतुद असलेली परंतु 12/13 वर्षात लेखाशिर्ष नसलेली व तरतुद शुन्य असलेली आदा करावयाची देयके.

अंदाजपत्रक क्र.286 दि.16/6/11

अंदाजपत्रकीय रक्कम रु.1000000/-

अंदाजपत्रकीय लेखाशिर्ष :-005), 051) 3) इतर योजना व्दिनोंद क्र.41424 बालाजीनगर मधील अंतर्गत रस्ते डांबरी करणे.

तांत्रिक मंजुरी:- शहर अभियंता कार्यालय क्र.286 दि.16/06/2011

काम सुरु:- दि.13/03/2012 पुर्ण दि.10/05/2012

कामाची मुदत :- 60 दिवस.

कामाची पहाणी करुन मापे घेतल्याचा दि.23/07/2012

मोजमाप पुस्तक क्र. पृष्ठ क्र.15 ते 16.

प्रमाणक क्र. 5947 दि.24/01/13 रु.200000/-

प्रमाणक क्र. ----- दि. --------- रु.300000/-

प्रमाणक क्र. 7231 दि.22/03/12 रु.268548/-

कार्यादेश :- क्र.मनपा/सा/बांधावि/678/2011-12 सार्वजनिक बांधकाम मुख्यालय दि.13/03/2009.

कामाची नस्ती, मोजमाप पुस्तक व देयकाचे लेखापरीक्षण करून अर्ध. ज्ञापन क्र.167 दि. 10/10/2014 रोजी निर्गमित केला आहे. बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.21/10/2014 रोजी सादर केले आहे. अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालन तपासून खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)ठेकेदारास बांधकाम विभागाने निविदा मंजुरीची समज दि.28/11/11 ने दिले नंतर ठेकेदाराने पावती क्र. 3423 ने सुरक्षा अनामत रु.10000/- दि.09/12/11 रोजी भरणा केली आहे व त्यानंतर ठेकेदाराने रु.100 च्या मुद्रांकावर कामाचे करारपत्र केले असुन त्यावर स्थायी समिती सदस्यांची दि.15/2/12 रोजी स्वाक्षरी झालेनंतर ठेकेदारास दि.13/3/12 रोजी कार्यादेश देण्यात आला आहे. या सर्व प्रक्रीयेमध्ये दिनावधी गेल्याने काम सुरू करण्यास 3 महिन्याचा विलंब झाला आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये नगरसचिव विभागाकडे मुळ नस्ती पाठविलेनंतर त्याचेवर सील होण्यास विलंब लागल्यामुळे काम सुरु होण्यास विलंब लागल्याचे मान्य केले आहे.

2)कामाचा कार्यादेश दि. 13/3/12 रोजी दिला असल्याने, 2011-12 च्या अंदाजपत्रकाप्रमाणे सदर काम 2011-12 या आर्थिक वर्षामध्ये सुरु होवुन पुर्ण न झालेने त्या वर्षाची अंदाजपत्रकीय रक्कम व्यपगत झाली असल्याने कामाचे देयक 2012-13 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकामधील 2011-12 मध्ये लेखाशिर्ष व तरतुद असलेली परंतु 2012-13 वर्षात लेखाशिर्ष नसलेली व तरतुद शुन्य असलेली आदा करावयाची देयके या लेखाशिर्षामधुन खर्ची टाकण्यात आले आहे. अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे कामाचे नियोजन करुन काम त्या आर्थिक वर्षात पुर्ण करणे आवश्यक असता कामाचा कार्यादेश आर्थिक वर्ष 2012-13 संपण्याच्या आगोदर दि.13/03/2012 रोजी दिल्याने काम त्या आर्थिक वर्षामध्ये पुर्ण झाले नसल्याचे दिसून येते. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये सदर रस्त्यावर अतिक्रमण असल्याने अतिक्रमण काढुन काम करण्यास विलंब लागल्याचे नमुद आहे. नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 165 नुसार कामाचे अंतिम तपशीलवार अंदाज तयार करण्याअगोदर जागेबाबत स्थानिक निरीक्षण न करता काम केलेने कामास विलंब झाला असल्याचे स्पष्ट होते.

3)निविदा शेकडा 22.16 टक्के कमी दराने आल्याने सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम 150 प्रमाणे स्विकृत निविदेची किंमत मंजूर अंदाजपत्रकाच्या 10 % ने कमी असेल तर मुळ अंदाजपत्रक रद्द

करुन घट अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असता घट अंदाजपत्रक तयार करुन सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आलेली नाही. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये घट अंदाजपत्रक तयार करुन सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेवुन काम केले असता पुढील सर्व कामामध्ये मक्तेदार जादा दराने निविदा भरण्याची शक्यता असल्याने व मनपाचे आर्थिक नुकसान होणार असल्याने घट अंदाजपत्रक तयार करण्यात आले नसल्याचे नमुद आहे. अनुपालन संयुक्तिक वाटत नसल्याने अमान्य करण्यात येत आहे.

4)निविदा नस्तीमध्ये कामाचे दरपृथ:करण जोडण्यात आले असुन दरपृथ:करणामध्ये 1 टक्के कामगार कल्याण उपकराचा समावेश करण्यात आला आहे. देयकाची तपासणी केली असता देयकामधुन उपकर कपात न करता प्रदान केले असल्याने रु.768548/- च्या 1 टक्के प्रमाणे रु.7685/- चे झालेल्या अतिप्रदानाची ठेकेदाराकडून वसुली करण्यात यावी. अनुपालनामध्ये उपकराची रक्कम ठेकेदाराकडुन कपात करण्याचे मान्य केले आहे.

5)प्राकलन व प्रत्यक्षात करण्यात आलेले काम यामध्ये खालील प्रमाणे तफावत आढळते.

| बाब क्र. | कामाचा तपशिल | प्राकलनाप्रमाणे परिमाण | प्रत्यक्ष केलेले काम | प्राकलन रक्कम रु. | प्रत्यक्ष रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 75mm BBM | 2150 घमी | 3840 | 427527 | 763707 |
| 2 | sealcoat | 2558 चौमी | 3840 | 145720 | 218723 |

सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम 227A नुसार कामाच्या अतिरिक्त बाबी पार पाडणे कार्यकारी अभियंता यांना प्रत्येक अतिरिक्त बाबींसाठी रुपये 10,000/- या प्रमाणे वाढ करण्याचे अधिकार आहेत. तसेच 227A 2(a) नुसार आतिरिक्त बाब जर मंजूर प्राकलनामध्ये अंतर्भुत असेल तर त्याला दिलेल्या मंजूरीच्या अधिकारानुसार ते काम त्यांना जादा करुन घेता येते. तसेच निविदा अटी/शर्ती मधील अट क्र.15 नुसार मंजुर कामामध्ये बदल किंवा वाढ करण्यास विभागप्रमुख यांच्या अगावु लेखी मंजुरीची आवश्यकता आहे. विभागप्रमुख व आयुक्तांची लेखी पुर्वमंजुरी न घेताच जादाचे काम करणेत आले आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये जादा काम अंदाजपत्रकीय रक्कमेच्या मर्यादेत केले असल्याने मान्यता घेण्यात आली नसल्याचे नमुद आहे. दिलेले अनुपालन संयुक्तिक नसल्याने अमान्य करण्यात येत आहे.

6)बांधकाम खात्याने बील क्र.203/22/8/12 ने रु.768548/- चे देयक लेखा विभागाकडे सादर केले असुन मुख्यलेखाधिकारी व उपायुक्त यांची देयक आदा करण्यास मान्यता झाली आहे. लेखा विभागाने, प्रमाणक क्र.5947 दि.14/02/2013 ने रु.200000/- आदा केले आहेत व या प्रमाणकाची झेरॉक्स काढून त्यावर

| |
|---|
| प्रमाणक क्र.7231, दि.22/03/2013 ने रक्कम रु.268548/- आदा केली आहे. तसेच त्याच झेरॉक्स प्रतीवर उर्वरित रु.300000/- आदा केले आहेत. परंतु त्यावर प्रमाणक क्र. व दिनांक नमुद नाही. लेखा विभागाने एका देयकाची रक्कम तीन प्रमाणकामध्ये विभागुन टप्प्या टप्प्याने ठेकेदारास आदा केली आहे. अशा पध्दतीने देयकाचे प्रदान केल्या बाबतचा खुलासा लेखा विभागाने केलेला नाही.<br><br>**आक्षेपाधिन रक्कम रु.760863/-**<br>**वसुलपात्र रक्कम :- कामगार कल्याण उपकर रु. 7685/-** |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 167 | 10/10/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |
|---|---|

| 117 | HCL कंपनीस केलेल्या कामाची देयके कराराप्रमाणे आदा केली नसल्याबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 24 | संगणक | मनपा | 9ड | 04 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 5868153 | | | |

| |
|---|
| HCL बरोबर केलेल्या करारपत्रातील अट क्रं.17 (a) नुसार नागरी सुविधा केंद्रामध्ये जमा झालेले पैसे दररोज मनपाच्या बँक खात्यामध्ये जमा करणे आवश्यक आहे. HCL कंपनीने दररोज बँक खात्यामध्ये पैसे जमा केले नाहीतर तो कराराचा भंग मानण्यात येईल. तसेच मनपाने HCL कंपनीच्या हिश्यापोटीची रक्कम प्रत्येक आठवड्याचे दुसऱ्या दिवशी कंपनीचे बँक खातेमध्ये भरणे आवश्यक आहे. मनपाने रक्कम भरली नाही तर मनपाचे वतीने कराराचा भंग होत आहे असे नमुद केले आहे. तसेच करार अटी / शर्ती 21 मधील 21.1 (c) प्रमाणे मनपाने सलग तीन महिने देय तारखेच्या तीन दिवस विलंबाने पैसे आदा |

केले तर तो कराराचा भंग ठरेल असे नमुद आहे. त्याप्रमाणे मनपाने कंपनीचे हिश्याची रक्कम आदा करणे आवश्यक आहे. मनपाचे वतीने करारानुसार कंपनीस रक्कम आदा केले नसलेने कंपनीने काम बंद करणे बाबत नोटीस दिलेली आहे. तरी सुध्दा महानगरपालिकेने रक्कम अदा केली नसलेचे दिसून येते.

व्दिनोंद 41234 , लेखाशिर्ष :- 005 इतर योजना 051) 3) ई गव्हर्नन्स प्रकल्प

अंदाजपत्रकीय रक्कम रु.20000000/-

महासभा क्रं. 09 ठराव क्रं.149 विषय क्रं.12 दि.21/2/2009 ते HCL कंपनीस 10 वर्ष कालावधीसाठी E-Governance अंतर्गत संगणकीकरण योजना राबविणे व नागरी सुविधा केंद्र स्थापन करुन त्या मार्फत संगणकीकृत सेवा देणेचे कामास महासभेने मान्यता दिली आहे. सदर कामाचे करारपत्र दि.30/08/2010 रोजी झालेले असून कामाचा कार्यादेश दि.02/03/2009 रोजी दिला आहे. E-Governance प्रकल्प निविदा प्रक्रियेबाबत स्थानिक निधी लेखापरीक्षण विभागाने केलेल्या विशेष लेखा परीक्षण अहवाल सन 2006-07 ते 2009-10 मध्ये परिच्छेद क्रमांक 27 वर सविस्तर आक्षेप नोंदविणेत आलेला आहे. तसेच स्थानिक निधी लेखापरीक्षण विभागाने (मनपा) 2011-12 या आर्थिक वर्षात केलेल्या लेखापरीक्षणामध्ये परिच्छेद क्र.120 घेण्यात आला आहे. सदर करार दि.2 एप्रिल 2009 रोजी झाला असुन त्यामधील अट क्र.17 **(a) HCL** will deposit all collection of a day to **SMKCMC** Bank Account A/c. no............................ where **SMKMC** has given instruction to Bank to transfer **HCL's** share to **HCL's** Bank Account in every second day of week. Before this, **HCL** should certify the transaction & payable amount from System Manager and Chief Auditor of **SMKMC**. In case of **HCL** fails to deposit such collection to **SMKMC's** Bank Account it will be treated as breach of contract from **HCL's** side. In case **SMKMC** takes step to hinder transfer of **HCL's** share automatically then it will be treated as breach of contract from **SMKMC** side.

अट क्र.21 Default ,21.1 **(a) SMKMC** fails to perform on time any of their obligations (except obligation to make payment on due date) under this Agreement for a consecutive period of three months; , **(c) SMKMC** fails to in its obligation to make payment up to three days beyond due date for a consecutive period of three months.

या कामाचे करारपत्र, नस्ती व HCL कंपनीस 2012 -13 या आर्थिक वर्षात त्यांनी केलेल्या कामापोटी

आदा केलेली देयके यांचे लेखापरीक्षण करुन अर्धसमास ज्ञापन क्र.168 दि.10/10/2014 रोजी निर्गमित केला असुन संगणक विभागाने त्याचे अनुपालन दि.05/11/2014 रोजी सादर केले आहे. संगणक विभागाने दिलेले अनुपालन अवलोकनी येवून खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)अट क्र.17 अन्वये HCL कंपनी त्यांचे नागरी सुविधा केंद्रामध्ये जमा झालेली दैनंदिन रक्कम महानगरपालिकेकडे वेळेत भरणा करीत असल्याचे नस्तीवरुन दिसुन येते. परंतु महानगरपालिकेने HCL कंपनीस देय असणारी रक्कम त्यांना वेळेत आदा केली नसल्याचे नस्तीमधील टिपणीवरुन दिसुन येते. त्यामुळे महानगरपालिकेकडुन कराराचा भंग होत असल्याचे स्पष्ट होते. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये कंपनी व मनपा यांचेमध्ये झालेल्या mutual understanding नुसार प्रत्येक महिन्यास एक देयक सादर करुन ते तपासल्यानंतर रक्कम आदा करण्याचे ठरविण्यात आल्याचे नमुद आहे. परंतु ठरावाची प्रत सादर केलेली नसल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.

2)HCL कंपनीने त्यांनी केलेल्या कामाचे पैसे महानगरपालिकेकडुन वेळेत मिळत नसल्याने महानगरपालिकेस दि.25/10/12 (नस्ती पृष्ठ क्र.56) रोजी कायदेशीर पाठविलेल्या नोटीशीमध्ये करारातील अट क्र. 17(a) प्रमाणे कंपनीस केलेल्या कामाचे देयक मिळत नसल्याने महानगरपालिकेने थकीत रक्कम 18 टक्के व्याजासहीत देण्याची मागणी केली आहे. अशाच प्रकारे कंपनीने दि.04/12/12 (नस्ती पृष्ठ क्र.60), दि.29/01/13 (नस्ती पृष्ठ क्र.67), रोजी कायदेशीर नोटीस पाठविली आहे. व कामाचा मोबदला वेळेत दिला नाही तर काम बंद करण्याबाबत सुचीत केले आहे. महानगरपालिकेने या नोटीसांना दि.23 नोव्हें.2012 (नस्ती पृष्ठ क्र.59) रोजी उत्तर पाठविले आहे व त्यामध्ये टप्प्या टप्प्याने थकीत रक्कम द्यावयाचे मान्य केले आहे.तसेच दि.21 डिसें.12 चे पत्राने (नस्ती पृष्ठ क्र.65) रु.25 लाख देण्याचे मान्य करुन दि.31/12/12 चे सिस्टीम मॅनेजर यांचे पत्राने (नस्ती पृष्ठ क्र.65) युनायटेड बँक ऑफ इंडियाचे धनादेश क्र.036221,ने दि.29/12/12 रु.25 लाख कंपनीस देण्यात आले आहेत. कंपनीने पुन्हा दि.10 जाने.2013 रोजी (नस्ती पृष्ठ क्र.118) रु.18833239/- थकीत रक्कमेसाठी महानगरपालिकेस कायदेशीर नोटीस पाठविली आहे. महानगरपालिकेने पत्र क्र.No/cd/01/30/ 2012, Dt.11/03/13 ने या थकीत रक्कमेपोटी रु.5868153 युनायटेड बँक ऑफ इंडियाचे धनादेश क्र.037326 दि.06/03/13 रु.2860730/- व धनादेश क्र.037460 दि.06/03/13 रु.2860730/- ने कंपनीस आदा केले आहेत. कंपनीने दि.15/3/2013 ने फेब्रु.13 अखेरच्या थकीत देयक रक्कम रु.21753450/- ची मागणी केली आहे. परंतु महानगरपालिकेने करारानुसार देय रक्कम कंपनीस दिली नसल्याचे दिसुन येते. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये महानगरपालिकेची आर्थिक स्थिती चांगली नसल्याने देयक आदा करण्यात आली नसल्याचे नमुद आहे. कराराप्रमाणे देयकाची रक्कम देणे आवश्यक असल्याने अनुपालन अमान्य करण्यात

| |
|---|
| येत आहे.<br><br>3)करारपत्रातील अट क्र.22 (b) नुसार change in law मुळे जर एखाद्या पार्टीचे नुकसान होणार असेल तर संबंधित पार्टीने दुसऱ्या पार्टीस लेखी नोटीस देणे आवश्यक आहे व अटीमध्ये बदल केलेस होणाऱ्या कायदेशीर, व्यापारी व आर्थिक परीणामांची माहिती नोटीशीमध्ये देणे आवश्यक आहे. व त्यानंतर दोन्ही पार्टीनी अटी व करारपत्रामधील बदलाबाबत चर्चा करणे आवश्यक आहे. कंपनीने महानगरपालिकेस थकीत रक्कमेबाबत नोटीस दिले नंतर रक्कम का देण्यात येत नाही या बाबतची कोणतीही माहिती कंपनीस दिलेली नाही व अटी व शर्तीमध्ये बदल करणेबाबतचा कोणताही प्रस्ताव कंपनीपुढे ठेवला नसल्याचे दिसुन येते.<br><br>4)कंपनीने थकीत देयके न दिल्याबाबत कायदेशीर नोटीस दिली असल्याने व त्यांनी काम बंद केलेस त्यांना द्याव्या लागणाऱ्या नुकसान भरपाई रक्कमेची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. तसेच महानगरपालिकेस होणाऱ्या संभाव्य नुकसानीची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. तसेच कंपनीने काम बंद केले नंतर पर्यायी कोणती व्यवस्था करणेचे योजण्यात आले आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये सदर आक्षेप वरीष्ठांचे निदर्शनास टिपणी व्दारे आणुन त्यांचे मान्यते नंतर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लेखापरीक्षणास देण्याचे मान्य केले आहे. अनुपालन संयुक्तिक नसल्याने अमान्य करण्यात येत आहे. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 168 | 10/10/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |
|---|---|

| 118 | वेतन बँडच्या अंतिम टप्प्यावर पोहचलेल्या कर्मचा-यांची वेतन निश्चीती चुकीची केले बाबत. |
|---|---|

| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 02 | सामान्य प्रशासन | मनपा | 9ब | 03 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

महाराष्ट्र वित्त विभाग 6 वा वेतन आयोग अधिसुचना दि.22.04.2009 मधील नियम क्र.10 मध्ये नमुद असले प्रमाणे सुधारित वेतन बँडमध्ये कमाल टप्प्यावर एक वर्ष वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यास लगतचा उच्च वेतन बँड मंजुर करण्यात यावा व हा वेतन बँड मंजुर करताना त्याला एक वेतनवाढीचा फायदा देणे आवश्यक आहे. असे असताना अशा प्रकारे वेतनबँड च्या कमाल टप्प्यावर पोहचलेल्या कर्मचा-यांना कमाल टप्प्यावर एक वर्ष वेतन घेतलेल्या दिवशी लगतचा वेतन बँड मंजुर केला आहे व त्याच दिवशी आणखी एक वेतनवाढ देवुन ग्रेड वेतन रु. 1600 वरुन रु.1800 केले असल्याने वेतन व भत्याचे अतिप्रदान झाले आहे.

1)सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकाच्या अधिकारी / कर्मचारी यांना सप्टेंबर 2009 पासुन 6 व्या वेतन आयोगानुसार वेतन दिलेले आहे. कर्मचा-यांची वेतन निश्चीती दि. 01.01.2006 पासुन पुर्वलक्षी प्रभावाने केली असून दि. 01.01.2006 ते 31.08.2009 या कालावधीचा वेतन भत्याचा फरक दिलेला नाही. त्यामुळे दि. 01/09/2009 पासुन जादा आदा झालेल्या वेतन व भत्त्याची परीगणना करुन अतिप्रदान रक्कम वसुल करण्यात यावी.

2)महानगरपालिका कर्मचा-यांपैकी कांही निवडक कर्मचा-यांची सेवापुस्तकामधील 6 व्या वेतन आयोगानुसारची वेतन निश्चीती तपासली असता वर्ग 4 मधील कर्मचा-यांना 4440-7440 या वेतन बँड मध्ये अंतीम टप्प्यावर पोहचल्यावर लगतचा वेतन बँड 5200-20200 मंजूर केला आहे. परंतु त्याच दिवशी जुन्या वेतन व ग्रेड वेतनानुसार एक अतिरिक्त वेतनवाढ देवुन ग्रेड वेतनही रु.1600/- वरुन वाढवुन रु.1800/- केले आहे.

3)महाराष्ट्र वित्त विभाग 6 वा वेतन आयोग अधिसुचना दि.22.04.2009 मधील नियम क्र.10 मध्ये नमुद असले प्रमाणे सुधारित वेतन बँडमध्ये कमाल टप्प्यावर एक वर्ष वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यास लगतचा उच्च वेतन बँड मंजुर करण्यात यावा व हा वेतन बँड मंजुर करताना त्याला एक वेतनवाढीचा फायदा देण्यात यावा. असे असताना अशा प्रकारे वेतनबँड च्या कमाल टप्प्यावर पोहचलेल्या कर्मचा-यांना कमाल टप्प्यावर एक वर्ष वेतन घेतलेल्या दिवशी लगतचा वेतन बँड मंजुर केला आहे व त्याच दिवशी आणखी एक वेतनवाढ देवुन ग्रेड वेतन रु.1600 वरुन रु.1800 केले असल्याने वेतन व भत्त्याचे अतिप्रदान झाले

| |
|---|
| आहे.<br>उदाहरणादाखल अशा काही कर्मचा-यांची यादी परिशिष्ठ क्रमांक (05) मध्ये दिली आहे. अर्धसमास ज्ञापन क्र.88 दि.18/07/14 चे अनुपालन सादर केलेले नाही. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 88 | 18/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |
|---|---|

| 119 | पाणीपुरवठा योजने अंतर्गत अस्तित्वातील उंच जलकुंभ, संप व पंप हाऊस यांची दुरुस्ती करणे या कामातील अनियमिततेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | UIDSSMT योजना | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 06 | पाणी पुरवठा | केंद्र,राज्य व स्वनिधी | 9ब | 13 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 11027512 | 433150 | | |

| |
|---|
| कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. 33500189/- इतकी असुन 9 टक्के जादा दराने निविदा मंजुर करताना ऑगस्ट 2011 व मे 2012 या कालावधीत वाढीव RBI indices व इतर देय बाबी धरुन पाणीपुरवठा विभागाने केलेल्या दरपृथ:करणाने कामाची किंमत रु.36191142/- इतकी होत आहे. काम जादा दराने न देता अंदाज पत्रकीय दराने देवुन RBI indices प्रमाणे दर दिला नसल्याने बाजार भावाप्रमाणे किंमतीत झालेल्या चढ उताराचा फायदा महानगरपालिकेस झालेला नाही. |

| |
|---|
| केंद्रशासन पुरस्कृत लहान व मध्यम शहरांचा पायाभुत विकास कार्यक्रमांतर्गत 79.02 कोटी किमतीच्या |

विषयांकीत योजनेला माहे सप्टे.2006 मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.या मंजुर योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडुन रु.35.40 कोटी (रु.14.78 कोटी +20.62 कोटी) इतका निधी प्रत्यक्षात प्राप्त झाला आहे.यापैकी महानगरपालिकेने रु.14.78 कोटी इतका निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग केला आहे.या रक्कमेतुन पुर्ण ठेव तत्वावर अधारित मंजुर योजनेतील कुपवाड झोनसाठीच्या गट क्र.1 मधील कामे प्रगतीपथावर असुन माहे डिसे.2010 अखेर पुर्ण होणार आहे. तसेच महानगरपालिकेने अन्य कामासाठी दोन पॅकेज तयार केली असुन त्याची किंमत रु.60.56 कोटी इतकी होत आहे.यामध्ये उंच टाक्या बांधणे,गुरुत्वनलिका व वितरण व्यवस्थेसाठी पाईप लाईन पुरविणे,त्यासाठी खुदाई करणे,जोडणे,चाचणी देणे,पंपीग मशिनरी पुरविणे व बसविणे व चाचणी देणे व माळबंगला येथे 70 दललि क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र बांधणे या कामाचा समावेश आहे.महानगरपालिकेस दि.01/08/12 ने रु.35 कोटी 56 लाख शासनाकडुन प्राप्त झाले आहेत. UIDSSMT अंतर्गत या कामाच्या मंजुरीसाठी ठोक स्वरुपात रु.295.73 लक्ष ची तरतुद करण्यात आली होती.या योजनेस तांत्रिक मान्यता देत असताना मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सदरचे काम हाती घेण्यापुर्वी कामाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन त्यास मंजुरी घेणेबाबत अट घातली आहे. त्यास अनुसरुन मुख्य अभियंता,म.जि.प्रा.यांचे पत्र क्र.6 दि.06/1/11 रोजी तांत्रिक मान्यता दिली आहे.

महाराष्ट्र शासन,क्र:- UID-2012/सं.क्र.193/नवि-33 नगरविकास विभाग,मुंबई दि.15/03/12 रोजी मुंबई येथे UIDSSMT योजने अंतर्गत राज्यस्तरीय मंजुरी समितीच्या झालेल्या चौदाव्या बैठकीचे इतिवृत्तामध्ये केंद्र शासनाने No.Q12045/15/2/UIDSSMT/08-CPHEEO,Govt of India,Ministry of Urban Development यांचे दि.8/12/2011 चे पत्रान्वये योजनेस सुधारित अंदाजपत्रकीय मान्यता दिली आहे.त्यानुसार योजनेची सुधारित appraised cost रु.14597.05 लाख या रक्कमेला मान्यता दिली आहे.व योजनेची मुळ किंमत रु.7902 लाख व सुधारित किंमत रु.14597.05 लाख या मधील फरक रु.6695 लाख या रक्कमेची तरतुद राज्यशासन व महानगरपालिका यांनी स्वनिधीमधुन करण्याची असलेबाबत नमुद आहे.

कामाचा कार्यादेश ठेकेदारास दि.11/9/12 रोजी देण्यात आला असुन कामाची मुदत 6 महिने देण्यात आली आहे.

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम | मोज.पु.व पृ.क्र. |
|---|---|---|---|
| 09 | 09/11/2012 | 1475524/- | 6/ 10 ते 24 |
| 10 | 30/11/2012 | 1200000/- | 6/ 10 ते 24 |
| 11 | 01/01/2013 | 4273591/- | 6/ 26 ते 49 |
| 14 | 12/02/2013 | 4511547/- | 6/ 49 ते 69 |

सांगली,मिरज आणि कुपवाड महानगरपालिका,पाणीपुरवठा योजनेतुन 1950 ते 1990 दरम्यान बांधण्यात आलेल्या उंच टाक्या,संप व पंप हाऊस इत्यादी 22 उंच टाक्या व 3 संप पंप हाऊस दुरुस्ती करण्याची कार्यवाही UIDSSMT अंतर्गत तांत्रिक सल्लागार श्री.बी.एन.पारीख सांगली यांचेकडुन अंदाजपत्रके 11-12 चे दरसूची प्रमाणे तयार करुन त्यास मा.स्थायी समिती ठराव क्र.42 दि.2/04/12 अन्वये दिलेल्या मान्यतेने रु.33500189/- मात्र अंदाजपत्रकीय रक्कमेच्या कामगिरीसाठी ई टेंडर पध्दतीने निविदा प्रक्रिया राबविण्यात आली.निविदा दै.केसरी व दै.पुढारी या वर्तमानपत्रातुन दि.09/5/12 रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.निविदापूर्वक बैठक दि.09/5/12 रोजी जाहिर प्रसिध्दीकरण करण्यात आले आहे.निविदापुर्वक बैठक दि.18/5/12 रोजी घेण्यात येवुन त्यात उपस्थित मुद्द्याबाबत खुलासा दि.22/5/12 रोजी करण्यात आला आहे.निविदेस एकुण तीन निविदाधारकांनी प्रतिसाद दिला असुन श्री.पी.टी.माळी,सांगली 23.40 टक्के जादाने,श्री.शशांक जाधव,मिरज 25 टक्के जादाने,मे.आकार इन्फ्रा,मुंबई 29.99 टक्के जादाप्रमाणे या सर्व निविदा अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा जादा दराने आल्या आहेत.सर्वात कमीचे निविदाधारक श्री.पी.टी.माळी,सांगली यांना आयुक्तसो यांचे दालनात दि.11/6/12 रोजी चर्चेस बोलवुन दराबाबत स्पष्टीकरण देण्याबाबतचे आदेश देण्यात आले.त्यास अनुसरुन मक्तेदार यांनी दि.16/6/12 रोजी स्पष्टीकरण सादर केले आहे.दि.1/8/12 रोजी आयुक्त यांचे दालनात ठेकेदाराबरोबर झालेल्या वाटाघाटीमध्ये ठेकेदाराने अंदाजपत्रकीय रक्कम रु. 33500189/- वर 9 टक्के जादा दराने काम करण्यास मान्यता दिली असून, त्यामधून पाणीपुरवठा योजने अंतर्गत अस्तित्वातील उंच जलकुंभ, संप व पंप हाऊस यांची दुरुस्ती करणे हे काम करणेत आले आहे.

स्थायी समिती सभा क्र.12 ठराव क्र.202 दि.17/8/12 ने उपायुक्त (पाणीपुरवठा मिरज) यांचे विषयपत्रानुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9 टक्के जादाने कामगिरी करुन घेण्यास व खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

योजनेच्या खर्चाबाबत खालील आक्षेप देण्यात येत आहेत.

1. कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. 33500189/- इतकी असुन 9 टक्के जादा दराने निविदा मंजुर करताना ऑगस्ट 2011 व मे 2012 या कालावधीत वाढीव RBI indices व इतर देय बाबी धरुन पाणीपुरवठा विभागाने केलेल्या दरपृथ्थ:करणाने कामाची किंमत रु.36191142/- इतकी होत आहे. कामाचा कार्यादेश दि.11/9/12 रोजी देण्यात आला असुन कामाची मुदत 6 महिने देण्यात आली आहे.त्यामुळे काम जादा दराने न देता अंदाज पत्रकीय दराने देवुन RBI indices प्रमाणे

दर दिला नसल्याने बाजार भावाप्रमाणे किंमतीत होत असलेल्या चढ ऊताराचा फायदा महानगरपालिकेस झालेला नाही.अर्धसमास ज्ञापन क्र.132 दि.16/9/14 चे अनुपालन पाणीपुरवठा विभागाने दि.29/9/14 रोजी सादर केले आहे.अनुपालनामध्ये दुरुस्तीचे काम असल्याने निविदा रक्कमेपेक्षा 9 टक्के जादा दराने दिल्याचे नमुद आहे.उत्तर संयुक्तिक नसल्याने 9 टक्के जादाची रक्कम रु.3015017/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

2. निविदा खंड 1 व 2 मध्ये देण्यात आलेल्या अटी शर्ती मधील अट क्र.31 नुसार कामास दिलेल्या मुदतीच्याप्रमाणे कामाची प्रगती होणे आवश्यक आहे.कामाची मुदत 6 महिने देण्यात आली आहे.परंतु काम मुदतीत करण्यासाठी कामाचा बार चार्ट ठेकेदाराकडुन घेणे आवश्यक असता तो का घेण्यात आला नाही याचा खुलासा पाणीपुरवठा विभागाने केला असुन अनुपालनामध्ये बार चार्ट घेणे आवश्यक असल्याचे मान्य केले आहे व यापुढे ठेकेदाराकडून बार चार्ट घेणेची दक्षता घेणेत येईल असे नमुद आहे.परंतु बार चार्ट घेतलेला नाही.

3. मोजमाप पुस्तक क्र.6 पृष्ठ क्र.12 व 13 वर काळीखण ऊंच टाकी कंपाउंड वॉल बांधणे बाब क्र.5 PCC M 150 चे काम 6.39 घ.मी.झालेचे नमुद आहे.परंतु गोषवारा व देयकामध्ये 9.86 घ.मी. काम झाल्याची नोंद आहे. त्यामुळे ठेकेदारास 9.86 - 6.39 =3.47 घ.मी.चे रु.4469.15/घ.मी.X 3.47 घ.मी.प्रमाणे रु.15507.95/- चे अतिप्रदान झाले आहे.अनुपालनामध्ये अतिप्रदान झाल्याचे मान्य केले आहे.परंतु ठेकेदाराकडुन जादा रक्कम वसुल केली नसल्याने रु.15508/- वसुलपात्र करण्यात येत आहेत.

4. मोजमाप पुस्तक क्र.6 पृष्ठ क्र.16 वर कंपाउंड वॉल बांधणे बाब क्र.6 फ्लाय ॲश विट बांधकाम करणे हे काम 61.83 घ.मी.इतके झाले असुन रु.4237.80/घ.मी.प्रमाणे रु.262023.17 आदा करण्यात आले आहेत.नस्तीमधील पृष्ठ क्र.39 वरील दरपृथ्थ:करणामध्ये हा दर रु.4035.99/ घ.मी.इतका नमुद असलेने ठेकेदारास रु.249545.26 आदा करणे आवश्यक आहे.त्यामुळे रु.12477.91 चे अतिप्रदान झालेने ते वसुल करण्यात यावे.अनुपालनामध्ये सा.बां.विभागाच्या दरसूचीप्रमाणे 5 टक्के जादा दर महानगर पालिकाक्षेत्रासाठी अनुज्ञय असल्याने दिल्याचे नमुद आहे.परंतु दरपृथ्थ:करणामध्ये या दराचा समावेश केला नसल्याने जादा दिलेल्या रक्कमेची वसुली करणे आवश्यक असल्याने रु.12478/- वसुलपात्र करण्यात येत आहेत.

5. काळीखण उंच टाकी बांधणे या ठीकाणी बाब क्र.1 ने Double flanged sluice valve 500mm diam. रु.87418/-,300 mm diam. रु.29039.29 X 2नग प्रमाणे रु.58078/- ,जलभवन उंच

| | |
|---|---|
| | टाकी बांधणे या ठिकाणी 450 mm Double flanged sluice valve रु.67432.96/- X 2 नग प्रमाणे रु.134865.92/-,बाब क्र.28 मिरज उंच पाण्याच्या टाकीस 250 mm Double flanged sluice valve पुरविणे रु.23043.90/- X 2 नग प्रमाणे रु.46087.80/- घेण्यात आलेले आहेत.तसेच दरपृथ्थ:करणामध्ये जकात 4 टक्केप्रमाणे धरली असल्याने जकात भरल्याच्या पावत्या दाखविण्यात आलेल्या नाहीत. अनुपालनामध्ये जकातीची रक्कम पुढील देयकामधुन वसुल करण्याचे मान्य केले आहे. परंतु रक्कम वसुल केलेली नसल्याने रु.326449.72/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत. |
| 6. | कामाचे ठिकाणी अ.क्र.17,20,31 ने बांधकामासाठी एकुण दगड 136.15 घ.मी. वापरला असल्याने रु.70.67 प्रती घ.मी.प्रमाणे रु.9621/- रॉयल्टी वसुल करणे आवश्यक असता ती वसुल करण्यात आलेली नाही. अनुपालनामध्ये रॉयल्टीची रक्कम वसुल करण्याचे मान्य केले असल्याने रु.9621 /- वसुलपात्र करण्यात येत आहेत. |
| 7. | नस्तीमधील महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांचे जा.क्र.मु.अ. (पुणे)/तांशा 3 /सांगलीपापुयो/तांत्रिक बदल/(320)/68/2011 दि.06/1/11 ने मुख्य अभियंता यांनी योजनेच्या तांत्रिक बदलास कांही अटींच्या अधिन राहून मान्यता दिली आहे.त्यामधील अट क्र.4 नुसार टाक्यांच्या दुरुस्तीची कामे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाकडुन तपासुन घेवुन त्यांच्या सल्ल्यानुसार सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन त्यानुसारच कामे हाती घ्यावीत असे नमुद आहे. परंतु पाणीपुरवठा विभागाने खाजगी तांत्रिक सल्लागाराकडुन अंदाजपत्रक करुन घेतले आहे.अनुपालनामध्ये शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे दर जास्त असल्याने खाजगी तांत्रिक सल्लागाराकडुन अंदाजपत्रक करुन घेतलेचे नमुद आहे.परंतु शासकीय महाविद्यालयाचे दर खाजगी तांत्रिक सल्लागाराचे दर यांचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडला नसल्याने अनुपालन अमान्य करणेत येत आहे. |
| 8. | धावते देयक क्र.2 ची तपासणी केली असता मोजमाप पुस्तक क्र.6 पृष्ठ क्र.21 व 31 वर तसेच देयकामधील बाब क्र.6 ,अ.क्र. 3, 5, 20,25,32,37,38,46 ने कंपाउंड वॉल साठी फ्लाय ॲश विट बांध काम करणे हे काम 222.12 घ.मी.इतके झाले असुन रु.4237.80 / घ.मी.प्रमाणे रु.941300.10/- आदा करण्यात आले आहेत . नस्तीमधील पृष्ठ क्र.39 वरील दरपृथ्थ:करणामध्ये हा दर रु.4035.99/ घ.मी.इतका नमुद असलेने ठेकेदारास रु.896474 आदा करणे आवश्यक आहे.त्यामुळे रु.44826.84/- चे अतिप्रदान झालेने ते वसुल करण्यात यावे. अनुपालनामध्ये सा.बां.विभागाच्या दरसूचीप्रमाणे 5 टक्के जादा दर महानगर पालिकाक्षेत्रासाठी अनुज्ञय असल्याने दिल्याचे नमुद आहे.परंतु दरपृथ्थ:करणामध्ये या दराचा समावेश केला नसल्याने जादा दिलेल्या |

रक्कमेची वसुली करणे आवश्यक असल्याने रु. 44826.84 /- वसुलपात्र करण्यात येत आहेत.

9. मोजमाप पुस्तक क्र.6 पृष्ठ क्र.45 वर जलभवन येथे उंच टाकी बांधणे बाब क्र.2 टाकीचा जीना दुरुस्त करणे या कामाचा दर दरपृथ्थ:करणाने रु.20450/- ठरविला आहे.त्यामध्ये scaffolding चा दर रु.11500/- नमुद आहे.सदर दर कशाचे आधारे ठरविण्यात आला याची कागदपत्रे नस्तीमध्ये दिसुन आलेली नसल्याने देयकामधुन अ.क्र.6 ने 5.18 घ.मी. X रु.20450/- प्रमाणे आदा केलेली रक्कम रु.105931/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत. अनुपालनामध्ये सा.बां.विभागाच्या दरसूचीप्रमाणे केलेल्या दरपृथ्थ:करणानुसार दर घेतला असल्याचे नमुद आहे.परंतु लेखापरीक्षणास दरपृथ्थ:करण दाखविले नसल्याने रु. 105931/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

10. कामाचे ठिकाणी धावते देयक क्र. 2 मधील अ.क्र.4,18,23,30,37 ने बांधकामा साठी एकुण दगड 144.14 घ.मी.वापरला असल्याचे नमुद आहे.सदर गौणखनिजाची रु.70.67 प्रती घ.मी.प्रमाणे रु.10186/- रॉयल्टी वसुल करणे आवश्यक असता ती वसुल करण्यात आलेली नाही. अनुपालनामध्ये रॉयल्टीची रक्कम वसुल करण्याचे मान्य केले आहे.परंतु रक्कम वसुल केली नसल्याने रु.9621 /- वसुलपात्र करण्यात येत आहेत.

11. माळबंगला उंच टाकीची दुरुस्ती करणे या कामाअंतर्गत बाब क्र.4 ने RCC कामासाठी लोखंडी सळी 3.71 मेट्रीक टन वापरलेचे मोजमाप पुस्तक 6 पृष्ठ क्र.29 वर नमुद असुन रु.56983.50/ मे.टन प्रमाणे रु.319066.08/- ठेकेदारास आदा केले आहेत. बी-1 टेंडरमधील शेड्युल बी ,सब वर्क क्रमांक 15 मधील बाब क्र.9 प्रमाणे सदर कामासाठी 0.13 मे.टन सळी आवश्यक असल्याचे नमुद आहे.कामाचे बी.1 टेंडर अटी शर्ती मधील Clause no.38 नुसार प्राकलनामधील एखादी बाब 25 टक्के किंवा रु.5000 जी रक्कम कमी असेल त्या मर्यादेपेक्षा जास्त होत असल्यास कार्यकारी अभियंता यांनी काम करणेबाबत ठेकेदारास लेखी आदेश देणे आवश्यक आहे.तसेच टेंडरमधील नमुद अंदाजापेक्षा जादा झालेल्या कामाची कार्योत्तर मंजुरी महानगरपालिकेच्या सक्षम प्राधिका-याची घेतल्यानंतरच देयक देणे आवश्यक आहे. परंतु सदर कामाचे देयक सक्षम प्राधिका-याची मंजुरी न घेताच देण्यात आलेने रु. 319066.08/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.अनुपालनामध्ये माळबंगला उंच टाकी व संप व पंप हाउस दुरुस्त करणे ही भिन्न प्रकारची कामे असल्याने वापरलेल्या सळीचे प्रमाण योग्य असल्याचे नमुद आहे.परंतु त्याबाबतची कागदपत्रे दाखविण्यात आलेली नसल्याने रु. 319066.08/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

12. धावते देयक क्र.2 पाणीपुरवठा विभागाने तयार केले असुन लेखा विभागाने प्रमाणक क्र.11 दि.1 जाने.2013 ने रु.3999999/- ठेकेदारास आदा केली आहे.प्रमाणका बरोबर ठेकेदाराने वापरलेल्या

| |
|---|
| सळी व सिमेंटचे Consumption statement सोबत जोडले आहे.त्यानुसार PCC M150 चे काम 53.84 घ.मी.झाले आहे.त्यासाठी 42.44 घ.मी. खडी व वाळु वापरली आहे.विट बांधकाम 108.72 घ.मी.झाले असुन त्यासाठी 22.17 घ.मी. खडी व वाळु वापरली आहे.दगडी बांधकाम 205.43 घ.मी.झाले असुन त्यासाठी 74.16 घ.मी. खडी व वाळु वापरली आहे.एकुण गौण खनिज 138.77 घ.मी.वापरले आहे. प्रमाणक क्र.14 दि.12/2/2013 ने सिमेंट वापर पत्रकाप्रमाणे एकुण गौण खनिज 207.23 घ.मी.वापरले आहे. गौणखनीजाची रु.70.67/घ.मी.प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसूल विभागाकडे भरल्याच्या पावत्या देयकाबरोबर सादर केला नसल्याने रु.14646/- वसूल करणेत यावेत.पाणीपुरवठा विभागाने दिलेल्या अनुपालनामध्ये रॉयल्टीची रक्कम वसुल करण्याचे मान्य केले आहे.परंतु रक्कम वसुल केली नसल्याने रु.14646/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत. |
| 13. कामाची एकुण किंमत रु.36515206/- असुन मार्च 2013 अखेर रु.11460689/- चे काम झालेले आहे. झालेल्या कामाची एकुण टक्केवारी 31.33 टक्के इतकीच आहे.त्यामुळे दिलेल्या मुदतीत काम झाले नसल्याचे स्पष्ट होते. |
| अर्धसमास ज्ञापन क्र.132 दि.16/9/14 चे अनुपालन पाणीपुरवठा विभागाने दि.29/9/14 रोजी सादर केले आहे. |
| आक्षेपाधिन रक्कम :- रु.11353988/- |
| वसुलपात्र रक्कम :- रु.106701/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 132 | 16/09/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |
|---|---|

| 120 | जकात विभागाकडील जकात नाक्याची दररोजची जमा रक्कम कॅशिअरकडे विहीत वेळेत जमा न केल्याने झालेल्या तात्पुरत्या अपहारा बाबत. |
|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव |
| | |

| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 10 | जकात | मनपा | 9क | 06 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

जकात विभागाकडील परिशिष्ठ क्र.7 मधील नमुद जकात नाके त्यांचेकडे सकाळी 8 ते रात्री 12 वाजेपर्यंत जमा झालेली रक्कम दुसऱ्या दिवशी प्रचलित नियमानुसार मुख्य जकात कार्यालयातील कॅशियर प्रत्येक नाक्यावर सकाळी 9 वाजेपर्यत जावून, चलनाप्रमाणे जमा झालेली रक्कम आपलेकडे जमा करुन घेतो. परंतु परिशिष्ठ क्र.7 मधील जकात नाके त्यांचे कडील जमा रक्कम मुख्य कार्यालयातील नाकेवर येणा-या कॅशियरकडे जमा न करता, त्या रक्कमेचा भरणा सकाळी 11 वाजता परस्पर मुख्य जकात कार्यालयाकडे करीत असलेचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे मुख्य जकात कार्यालयाच्या कॅशियरकडे दररोज जमा होत नसलेल्या रक्कमेचा तात्पुरता अपहार होत असलेचे निदर्शनास आलेले आहे. परिशिष्ठामध्ये नमुद जकात नाक्यांच्या दि.01/03/13 ते 12/03/13 या 12 दिवसांची सकाळी 9 वाजेपर्यंत जमा न झालेल्या रक्कमेची गणना केली असता ती रु.3943777/- इतकी होत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिकेच्या 2012-13 या आर्थिक वर्षाच्या मार्च 2013 मधील दि.01/03/13 ते दि.12/03/13 या कालावधीत जकात नाक्याकडे जमा झालेल्या रक्कमेचे लेखापरीक्षण पावती पुस्तके, किर्द व जमेच्या चलनावरुन करण्यात आले असून त्याबाबतचा अर्धसमास ज्ञापन क्र.143 दि.19/9/2014 रोजी निर्गमित करण्यात आला आहे. जकात विभागाने दि.24/9/2014 रोजी सादर केलेल्या अनुपालनाचे अवलोकन करुन खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)अर्धसमास ज्ञापन क्र. 143 ने जकात नियमावली व जकातीच्या दरपत्रकाच्या सूचीची मागणी करण्यात आली होती. त्याप्रमाणे जकात विभागाने जकातीच्या दरपत्रकाची सुची लेखापरीक्षणास दिली आहे. परंतु जकात गोळा करण्याविषयीच्या नियमांची नियमावली लेखापरीक्षणास देण्यात आलेली नसल्याने जकात गोळा करण्याची कार्यपध्दती लेखापरीक्षणास समजुन आली नाही. अनुपालनामध्ये प्रचलित जकात गोळा करण्याची पध्दत मागील 30-40 वर्षापासुन आहे. तसेच त्या बाबतची स्वतंत्र जकात नियमावली नसल्याचे मान्य केले आहे.

2) जकात नाक्याकडील दि.01/03/13 ते दि.12/03/13 या कालावधीत वापरलेल्या जमा पावती पुस्तकांची तपासणी केली असता जकात विभागाच्या प्रचलीत पध्दतीनुसार, जकात नाक्यावर रात्री 12 ते

त्या दिवसाची रात्र व दुस-या दिवसाची सकाळ अशी दिड दिवसाची जमा झालेली जकातीची रक्कम मुख्य जकात कार्यालयातील कॅशियर प्रत्येक नाक्यावर सकाळी 9 वाजेपर्यत जावून, चलनाप्रमाणे जमा झालेली रक्कम आपलेकडे जमा करुन घेतो. तसेच प्रत्येक जकात नाक्याच्या चलनाच्या मागे त्या जकात नाक्यावर जमा झालेल्या रक्कमेचा तपशील नोटा निहाय लिहुन ती रक्कम सदर कॅशिअरकडुन मुख्य कार्यालयात जमा केली असुन तेथे सर्व जकात नाक्यांच्या जमा रक्कमांचे एक चलन तयार करुन ती रक्कम जकात अधिक्षकांच्या स्वाक्षरीने बँकेमध्ये जमा केली आहे. परंतु परिशिष्ठ क्र.7 मध्ये नमुद केलेल्या जकात नाक्याकडील जमापावती पुस्तकांची व चलनांची तपासणी केली असता अन्य जकात नाक्यांच्या चलनाप्रमाणे त्यांच्याकडील चलनामागे नोटांच्या तपशिलाप्रमाणे मुख्य कार्यालयाच्या कॅशिअरने नाणेवारी लिहिलेली नाही. त्यामुळे परिशिष्ठ क्र.7 मधील नमुद जकात नाके त्यांचेकडे जमा झालेली सर्व रक्कम कॅशियरकडे जमा न करता ती आपलेकडे ठेवुन नंतर ती रक्कम 11 वाजले नंतर जकातीच्या मुख्य कार्यालयाकडे भरणा करीत असलेचे निदर्शनास आले आहे. जकात विभागाच्या प्रचलीत नियमाप्रमाणे अन्य नाक्यांची सर्व जमा रक्कम कॅशियरकडे जमा होत असताना परिशिष्ट क्र.7 मध्ये नमुद नाक्यांची सर्व रक्कम जमा केली जात नसल्याचा खुलासा जकात विभागाने केलेला नाही. तसेच उपरोक्त जकात नाक्यांना ती रक्कम आपलेकडे ठेवणेबाबत तसेच ती रक्कम परस्पर जमा करणेबाबत संबंधितांना सक्षम प्राधिका-यांनी लेखी आदेश दिले असल्यास ते लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेले नाहीत. जकातनाक्यावर जमा होणारी सर्व रक्कम या नाक्यावरील कर्मचाऱ्यांनी जकात नाक्यावर दररोज येवून रक्कम स्विकारणा-या कॅशियरकडे जमा केली नसलेने जकात अधिक्षकांनी त्यांचेवर कोणतीही कारवाई केलेली नाही. तसेच सदर वित्तीय अनियमिततेचा अहवाल वरीष्ठाकडे सादर केलेला नाही. ही अत्यंत गंभीर बाब आहे.

3)जकात विभागाच्या प्रचलीत पध्दतीनुसार जकात नाकी 0 ते 08, 8 ते 16 व 16 ते 24 या तीन पाळीत कार्यरत असतात. या जकात नाक्यावर सकाळी 08 ते रात्री 12 वाजेपर्यंत जमा झालेली जकातीची रक्कम मुख्य जकात कार्यालयातील कॅशियर प्रत्येक नाक्यावर दुसऱ्या दिवशी सकाळी 9 वाजेपर्यत जावून, जकात नाक्याचे चलनाप्रमाणे जमा झालेली रक्कम आपलेकडे जमा करुन घेतो, तसेच प्रत्येक जकात नाक्याच्या चलनाच्या मागे त्या जकात नाक्यावर जमा झालेल्या रक्कमेचा तपशील नोटा निहाय लिहुन ती रक्कम सदर कॅशिअरकडुन मुख्य कार्यालयात जमा केली जाते व तेथे सर्व जकात नाक्यांच्या जमा रक्कमांचे एक चलन तयार करुन ती रक्कम जकात अधिक्षकांच्या स्वाक्षरीने बँकेमध्ये जमा केली जाते. परंतु परिशिष्ठ क्र.07 मधील नमुद केलेल्या जकात नाक्याकडील जमा पावती पुस्तकांची व चलनांची तपासणी केली असता अन्य जकात नाक्यांच्या चलनाप्रमाणे त्यांचे मागे नोटांच्या तपशिला प्रमाणे मुख्य जकात कार्यालयाच्या कॅशिअरने नाणेवारी लिहिलेली नाही. त्यामुळे सदर जकात नाके त्यांचेकडे जमा

झालेली सर्व रक्कम कॅशियरकडे जमा न करता परिशिष्ट क्र.7 मध्ये नमुद केलेली रक्कम आपलेकडे शिल्लक ठेवुन नंतर ती रक्कम 11 वाजले नंतर जकातीच्या मुख्य कार्यालयाकडे भरणा करीत असलेचे निदर्शनास आले आहे. जकात विभागाच्या प्रचलीत नियमा प्रमाणे अन्य नाक्यांची सर्व जमा रक्कम कॅशियरकडे जमा केली जात असताना परिशिष्ट क्र.7 मधील नमुद नाक्यांची रक्कम जमा केली जात नसलेबाबतचा खुलासा जकात विभागाने अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये केलेला नाही. तसेच उपरोक्त जकात नाक्यांना ती रक्कम आपलेकडे ठेवणेबाबत तसेच ती रक्कम परस्पर जमा करणेबाबत संबंधितांना सक्षम प्राधिका-यांनी लेखी आदेश दिले असल्यास ते लेखापरीक्षणास देण्यात यावेत अशी मागणी अर्धसमास ज्ञापनाद्वारे जकात विभागाकडे करण्यात आली होती. परंतु याबाबत लेखी आदेश देण्यात आले नसल्याचे अनुपालनामध्ये मान्य केले आहे. जकात नाक्यावर लेखापरीक्षण कालावधी दि.01/03/2013 ते 12/3/2013 या कालावधीत वेळेत जमा न केलेल्या रक्कमेची गणना केली असता ती रु.3943777/- इतकी होत आहे. ही सर्व रक्कम या नाक्यावरील कर्मचाऱ्यांनी मुख्य कार्यालयाचे कॅशिअरकडे जमा केली नसताना जकात अधिक्षकांनी त्यांचेवर कोणतीही कारवाई केलेली नाही. तसेच सदर वित्तीय अनियमिततेचा अहवाल वरीष्ठाकडे सादर केलेला नाही. ही अत्यंत गंभीर बाब आहे.

4)नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्र.69 चे (1) अन्वये जकात संकलन निरीक्षक नसेल, तेथे प्रत्येक नाक्यावरील कारकुनाने दररोज महानगरपालिकेने नियत केलेल्या वेळी, जमा झालेली रोकड व जकात निरिक्षकाने प्रमाणित केलेली चलने त्यांचे मुळ पावत्याशी व संकलन पुस्तकाशी पडताळुन जकात कार्यालयात भरण्यासाठी नेणे आवश्यक आहे. त्या प्रमाणे कार्यवाही न करता जकात विभागाच्या मुख्य कार्यालयाचा कॅशिअर जकात नाक्यावर जावुन जकात रक्कम गोळा करीत असलेचे निदर्शनास आले आहे. परिशिष्ठ क्र. 7 मधील नमुद जकात नाके त्यांचेकडे जमा झालेली सर्व रक्कम मुख्य जकात कार्यालयातील कॅशिअरकडे जमा न करता शिल्लक ठेवलेल्या रक्कमेचा भरणा सकाळी 09 ते 11 वाजेपर्यंत त्यांचे जकात नाक्यावर जमा झालेल्या जकातीच्या रक्कमेतुनच करीत असलेचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे मुख्य जकात कार्यालयाच्या कॅशियरकडे दररोज जमा होत नसलेल्या रक्कमेचा तात्पुरता अपहार होत असलेचे निदर्शनास आलेले आहे. परिशिष्ठ क्र.7 मध्ये नमुद जकात नाक्यांच्या दि.01/03/13 ते 12/03/13 या 12 दिवसांची वेळेत जमा न केलेल्या रक्कमेची गणना केली असता ती रु.3943777/- इतकी होत आहे. अशाप्रकारे वर्षभर महानगरपालिकेच्या लेख्या मध्ये विहित वेळेत वरील जकात नाक्यांची रक्कम जमा होत नसलेचे स्पष्ट होते. त्यामुळे या तात्पुरत्या अपहाराची व्याप्ती मोठी असल्याचे निदर्शनास येत आहे.

5)नगरपरिषद लेखा संहिता 1971 चे नियम 69 (3) अन्वये प्रत्येक संकलन पुस्तकातील नोंदी व कारकुनाचे वा निरीक्षकाचे चलान ,जकात अधिक्षकाने तपशीलवार तपासले पाहिजे. प्रत्येक नाक्यावरच्या

| |
|---|
| भरण्याच्या बेरजा घेवुन निरिक्षकाने भरलेल्या रोख रकमेशी जुळविल्या पाहिजे. अशा जुळविण्याचे प्रमाणपत्र प्रत्येक चलनावर व संकलन पुस्तकावर अधिक्षकाचे स्वाक्षरीने देणे आवश्यक आहे. परंतु त्याप्रमाणे जकात अधिक्षकाने प्रमाणपत्र संकलन पुस्तकावर दिलेले नाही. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये सर्व जकात नाक्यांवर तीन पाळीत जमा होणारी दैनंदिन रक्कम कॅशिअर कडुन एकत्रित किर्दीमध्ये लिहिली जाते व त्याप्रमाणे होणारे चलनावर जकात अधिक्षकांची स्वाक्षरी घेवुन रक्कम बॅंकेमध्ये भरणा केली जाते. परंतु प्रत्येक संकलन पुस्तकातील नोंदी व कारकुनाचे वा निरीक्षकाचे चलान , जकात अधिक्षकाकडुन तपशीलवार तपासले जात नसल्याचे स्पष्ट होते.<br><br>6)नगरपरिषद लेखा संहिता 1971 चे नियम 70 (3) अन्वये जकात अधिक्षकाने नमुना क्र.13 ने विहित केलेल्या चलनासह जकातीची जमा रक्कम महानगरपालिकेच्या लेखा शाखेकडे भरणे आवश्यक असता जकात विभागाकडून दररोज परस्पर बॅंकेत जमा केली आहे. त्यामुळे सदर रक्कमेची नोंद लेखा विभागाच्या सर्वसाधारण रोकडवहीमध्ये दररोज केली गेली नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता , 1971 क्रं. 32 (1) अन्वये नगरपरिषदेच्यावतीने जमा झालेले अथवा संवितरीत केलेले शासकिय अनुदानासहित सर्व पैसे हातचे काहीही राखून न ठेवता नमुना क्रं.11 मधील रोकड वहीत नोंदले पाहिजे. तसेच 32 (2) अन्वये सर्व रोकड व धनादेश, रोकड वहीत नोंदणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही न करता परस्पर जकातीच्या जमा रकमांचा भरणा जकात विभागाकडुन बॅंकेमध्ये केला जातो. अशाप्रकारे 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये रु.96 कोटी 07 लाखाचा भरणा जकात विभागाने बॅंकेमध्ये केला आहे. अनुपालनामध्ये जकात विभागाचा भरणा युनियन बॅंक ऑफ इंडिया,शाखा सांगली खाते क्र.424202010502707 मध्ये परस्पर केला जात असल्याचे जकात विभागाने मान्य केले आहे.<br><br>**तात्पुरता अपहार रक्कम रु.3943777/-** |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 143 | 19/09/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |

| 121 | शासनाचे विशेष अर्थसहाय्य निधीमधुन करण्यात आलेल्या कामातील अनियमिततेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | शासनाचे विशेष अर्थसहाय्य | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | राज्य शासन | 9ब | 06 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 1297387 | | | |

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,जिल्हास्तरीय समिती सांगली यांचे आदेश क्र.नपा/ मुलभुत /आर.आर/622/2011,दि.08/08/2011च्या प्रशासकीय मान्यतेच्या पत्रामधील अट क्र.23 नुसार या निधीच्या विनियोजनाबाबतच्या प्रमाणपत्रासोबत शासनाच्या नगरविकास विभागाच्या शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2008/1338/प्र.क्र.171/नवि16 दि.02/03/2009 नुसार सर्व विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडुन तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेणे आवश्यक असता तांत्रिक लेखापरीक्षण करुन न घेताच देयके आदा केली आहेत.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी 2010-11 या आर्थिक वर्षासाठी सहसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.जीईएन/2010/प्रक्र68/नवि 16,दि.8/6/11 व शासन निर्णय क्र.पुनर्वि-2011/प्र.क्र.44/ नवि-4,दि.31/3/11 अन्वये 5.49 कोटी अनुदान मंजुर झाले असुन ते 11/12 या आर्थिक वर्षामध्ये वितरीत केले आहे. या रक्कमेतुन 102 कामांचे प्रस्ताव तयार करुन मा.विभागीय आयुक्त पुणे यांचेकडील त्रिसदस्य समितीकडे मान्यतेसाठी पाठविणेसाठी स्थायी समिती ठराव क्र.181/11-12 दि.12/07/11 अन्वये मान्यता घेवुन जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव सांगली यांचेकडे महानगरपालिकेमार्फत पत्र क्र.मनपा/सा/ बांधा/226/2011-12 दि.25/7/11 रोजी पाठविण्यात आला.त्यास विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष जिल्हास्तरीय समिती, पुणे यांचे कडील पत्र क्र.निशा/कार्या 02/ मनपा / विनि/प्रशामा/को/228/11, दि.06/8/11 अन्वये तसेच जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,जिल्हास्तरीय समिती सांगली यांचे आदेश क्र.नपा/मुलभुत/आर.आर/622/2011 ,दि.8/8/2011 अन्वये प्रशासकीय मान्यता दिली असून, त्यामधून कुपवाड वॉर्ड क्र.66 बसवेश्वर कॉलनीमधील रस्ते मुरुम खडीकरणे करणे / कुपवाड वॉर्ड क्र.6 खुले नाट्यगृहाकडे जाणारा रस्ता डांबरी करणे व कुपवाड वॉर्ड क्र.27 पडुळकर गल्ली येथे आर.सी.सी.गटर

करणे ही कामे करणेत आली आहेत.

कार्यालयीन टिपणी दि.10/08/11 मध्ये प्रस्तावामधील 102 कामापैकी तात्काळ करावयाची कामे जाहिर निविदा प्रक्रियेने विलंब लागणार असल्याने रु.5 लाख पर्यंतच्या रक्कमेची 49 कामे महानगरपालिकेकडील नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांचे कडुन करुन घेण्यास व त्याप्रमाणे स्थायी समितीची मान्यता घेणेची शिफारस करण्यात आली आहे व त्यास स्थायी समिती सभा क्रमांक 14 ठराव क्रमांक 292 दि.30/08/11 ने कामांना ठेकेदाराच्या नावनिहाय यादीस मान्यता झाली आहे.

**1.<u>कुपवाड वॉर्ड क्र.66 बसवेश्वर कॉलनीमधील रस्ते मुरुम खडीकरणे करणे कामातील अनियमितते बाबत.</u>**

प्रमाणक क्रमांक : 05 दि. : 21/06/12 रक्कम : 463088/-

**लेखाशिर्ष :- इतर योजना 4120 शासनाचे विशेष अर्थसहाय्य**

अंदाजपत्रकीय रक्कम : रु.499000/-

प्रशासकीय मान्यता :1.सहसचिव,नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.जीईएन/2010/प्रक्र68/नवि 16,दि.8/6/11

2.आयुक्त सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांचेकडील पत्र क्र.226/2011-12 दि.25/7/12

3.क्र.नपा/मुलभुत/आरआर/622/2011 जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली नगरपालिका प्रशासन शाखा यांचे कडील प्रशासकीय मान्यतेचे पत्र दि.08/8/2011

स्थायी समिती सभा क्रमांक 14 ठराव क्रमांक 292 दि.30/08/11

तांत्रिक मान्यता : 313 दि. 16.06.2011

ठेकेदाराचे नांव : अमोल पाटील ,सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग,शासन निर्णय क्र.सीएटी 01/05/प्र.क्र.26/इमारती 2,दि.31 मार्च 2005 व स्थायी समिती ठराव क्र.446/06/07,दि.14/11/2006 अन्वये 33 टक्के कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना मंजुर करण्याचा ठराव झालेला आहे. त्यानुसार काम मंजुर करण्यात आले आहे.

कार्यादेश क्रमांक / दिनांक : क्रमनपा/सा/बांधावि/482/2011-12 दि. 29.12.2011.

काम सुरु:-29/12/11

कामाची मुदत : 45 दिवस काम पुर्ण दिनांक : 11.01.2012

मोजमाप पुस्तक क्रमांक : 15 पृष्ठ क्रमांक : 19 ते 21

कामाची नस्ती, मोजमाप पुस्तक व देयक तपासून घेतलेल्या आक्षेपाबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.144 दि. 20/9/2014 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि. 18/10/2014 रोजी दिले आहे. अर्धसमास ज्ञापनाचे अनुपाल अवलोकनी येवुन खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नमुना क्र.133 प्रमाणे काम पुर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्रामध्ये नगर अभियंता यांनी काम पुर्ण दि.11/1/12 रोजी झाले असुन कामाची मोजमापे दि.01/5/12 रोजी घेतल्याचे नमुद आहे. काम पुर्ण झाल्यानंतर 5 महिने विलंबाने मोजमापे घेतली आहेत. मोजमापे घेण्यापूर्वी काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र दिले आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये मनपाच्या दैनंदिन कामकाजामुळे व मनुष्यबळ कमी असल्याने मोजमापे घेण्यास विलंब लागला असल्याचे नमुद आहे. काम 2011-12 या आर्थिक वर्षात पुर्ण झाले आहे. परंतु देयक 2012-13 या आर्थिक वर्षात दिल्याने महानगरपालिकेच्या दायित्वामध्ये वाढ झाल्याचे दिसुन येते.

2)कामाचे प्राकलन, मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणी केली असता कठीण मुरुम 240 घ.मी.,60 मि.मि.खडी 90 घ.मी., मऊ मुरुम 66 घ.मी. वापरला आहे. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे.व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. ठेकेदाराने देयकासोबत रॉयल्टी रक्कम भरलेबाबतचा पुरावा सोबत जोडला नसतानाही ठेकेदारास देयकामधुन 396 घ.मी.X रु.70.67 प्रती घ.मी.प्रमाणे रु. 27985/- रॉयल्टी रक्कम आदा केली आहे. तरी सदर रक्क्म ठेकेदाराकडुन वसुल करण्यात यावी. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये पावत्या जोडल्याचे नमुद आहे. परंतु पावत्या लेखापरीक्षणास दाखविण्यात आल्या नसल्याने रु. 27985/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

3)जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,जिल्हास्तरीय समिती सांगली यांचे आदेश क्र.नपा/मुलभुत/ आर.आर/ 622/2011,दि.08/08/2011च्या प्रशासकीय मान्यतेच्या पत्रामधील अट क्र.23 नुसार या निधीच्या विनियोजनाबाबतच्या प्रमाणपत्रासोबत शासनाच्या नगरविकास विभागाच्या शासन निर्णय क्रमांक संकीर्ण

2008/1338/प्र.क्र.171/नवि16 दि.02/03/2009 नुसार सर्व विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडुन तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे या कामाचे तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेतलेले नाही. अनुपालनामध्ये महानगरपालिकेने त्रयस्थ संस्थेची नेमणुक केली नसल्याचे मान्य केले आहे.

आक्षेपाधिन रक्कम :- रु. 463088/-

**<u>2.कुपवाड वॉर्ड क्र.6 खुले नाट्यगृहाकडे जाणारा रस्ता डांबरी करणे या कामातील अनियमितते बाबत.</u>**

प्रमाणक क्रमांक : 06 दि. : 21/06/12 रक्कम :341744/-

लेखाशिर्ष :- इतर योजना 4120 शासनाचे विशेष अर्थसहाय्य

अंदाजपत्रकीय रक्कम : रु.342100/-

स्थायी समिती सभा क्रमांक 14 ठराव क्रमांक 292 दि.30/08/11

तांत्रिक मान्यता : 253 दि. 16.06.2011

ठेकेदाराचे नांव : व्यास विजय गोरे ,सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग,शासन निर्णय क्र.सीएटी 01/05/प्र.क्र.26/इमारती 2,दि.31 मार्च 2005 व स्थायी समिती ठराव क्र.446/06/07,दि.14/11/2006 अन्वये 33 टक्के कामे मंजुर सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना करण्याचा ठराव झालेला आहे त्यानुसार मंजुर करण्यात आले आहे. आली आहे.

कार्यादेश क्रमांक/दिनांक:- क्रमनपा/सा/बांधावि/582/2011-12 दि. 04.02.2012.

काम सुरु :-04/02/2012

कामाची मुदत : 30 दिवस काम पुर्ण दिनांक : 03.03.2012

मोजमाप पुस्तक क्रमांक : 29 पृष्ठ क्रमांक : 19 ते 20

4)कामाचे प्राकलन, मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणी केली असता कठीण मुरुम 192 घ.मी. ,60 मि.मि.खडी 90 घ.मी. , मऊ मुरुम 42 घ.मी. वापरला आहे. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/ घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा

कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे. व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. परंतु ठेकेदाराने देयकासोबत रॉयल्टी भरल्याचा पुरावा जोडला नसताना ठेकेदारास देयकामधुन 324 घ.मी.X रु.70.67 प्रती घ.मी.प्रमाणे रु.22897/- रॉयल्टी रक्कम आदा केली आहे. सदर रक्कम ठेकेदाराकडुन वसुल करण्यात यावी. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये पावत्या जोडल्याचे नमुद आहे. परंतु पावत्या लेखापरीक्षणास दाखविण्यात आल्या नसल्याने रु.22897/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

**आक्षेपाधिन रक्कम :- रु.341744/-**

**3.कुपवाड वॉर्ड क्र.27 पडुळकर गल्ली येथे आर.सी.सी.गटर करणे कामातील अनियमितते बाबत.**

प्रमाणक क्रमांक : RA I 32 दि. : 02/09/12रक्कम : 167806/-

RA II 49 दि. : 07/12/12 रक्कम : 281159/-

RA III 53 दि. : 02/03/13 रक्कम : 32658/-

लेखाशिर्ष :- इतर योजना4120 शासनाचे विशेष अर्थसहाय्य.

अंदाजपत्रकीय रक्कम : रु. 499900/-

मोजमाप पुस्तक क्रमांक : I 30/ पृष्ठ क्रमांक : 23 ते 25

II 15/ पृष्ठ क्रमांक : 101 ते 102

III 10/ पृष्ठ क्रमांक : 24 व 25

स्थायी समिती सभा क्रमांक 14 ठराव क्रमांक 292 दि.30/08/11

तांत्रिक मान्यता : 295 दि. 16.06.2011

ठेकेदाराचे नांव : तुळशीराम सर्जे (सुबे अभियंता) , सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.सीएटी 01/05/प्र.क्र.26/इमारती 2,दि.31 मार्च 2005 व स्थायी समिती ठराव क्र. 446/06/07, दि.14/11/2006 अन्वये 33 टक्के कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना मंजुर करण्याचा ठराव झालेला आहे. त्यानुसार पडुळकर गल्ली येथे आर.सी.सी.गटर करणे हे काम मंजुर करण्यात आले आहे.

कार्यादेश क्रमांक / दिनांक : क्रमनपा/सा/बांधावि/528/2011-12 दि.10.01.2012.

काम सुरु :-04/02/2012

कामाची मुदत : 90 दिवस काम पुर्ण दिनांक : 09.05.2012

मोजमाप पुस्तक क्रमांक : 30 पृष्ठ क्रमांक : 23 ते 25

मोजमाप पुस्तक क्रमांक : 15 पृष्ठ क्रमांक : 101 ते 102

मोजमाप पुस्तक क्रमांक : 10 पृष्ठ क्रमांक : 24 ते 25

5)कामाचे प्राकलन, मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणी केली असता कठीण मुरुम 96 घ.मी. वापरला आहे. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे.व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. ठेकेदाराने देयकासोबत रॉयल्टी रक्कम भरलेबाबतचा पुरावा जोडलेला नसल्याने ठेकेदारास देयकामधुन आदा केलेली 97 घ.मी.X रु.70.67 प्रती घ.मी.प्रमाणे रु.6784/- रॉयल्टी रक्कम ठेकेदाराकडुन वसुल करण्यात यावी. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये पावत्या जोडल्याचे नमुद आहे. परंतु पावत्या लेखापरीक्षणास दाखविण्यात आल्या नसल्याने रु. 6784/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

6)प्राकलनामध्ये 1 टक्के कामगार कल्याण उपकराची तरतुद केली आहे.परंतु देयकामधुन कपात केला नसल्याने रु.497530/- च्या 1 टक्केप्रमाणे रु.4975/- ठेकेदाराकडुन वसुल करण्यात यावेत. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये उपकराची रक्कम रु.4975/- वसुल करण्याचे मान्य केले आहे. परंतु रक्कम वसुल केलेली नाही.

आक्षेपाधिन रक्कम :- रु.492555/-

**वसुलपात्र रक्कम :-** कामगार कल्याण उपकर रु. 4975/-

**तीन कामांची एकूण आक्षेपाधिन रक्कम :-** 463088+ 341744+492530 = रु.1297356/-

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 144 | 20/09/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |
|---|---|

| 122 | शासनाचे विशेष अर्थसहाय्य निधीमधुन करण्यात आलेल्या कामातील अनियमिततेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | शासनाचा विशेष अर्थसहाय्य निधी | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | राज्य शासन | 9ब | 06 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 2153260 | 22311 | | |

वॉर्ड क्र. 46 मध्ये 100 फूटी डी.पी. रस्ता मुरुमीकरण करणे या कामाची निविदा 28.77 टक्के कमी दराची आली आहे. सार्व. बाधकाम विभाग नियम पुस्तीकेमधील नियम 150 नुसार 10% पेक्षा कमी दराने निविदा स्विकृत केल्यास, कमी आलेल्या दराप्रमाणे नविन संक्षिप्त प्राकलन(abstract estimate) तयार करुन त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजूरी घेतल्यानंतर मुळ प्राकलन रद्द करून त्याऐवजी कमी दराच्या प्राकलनाचा समावेश करुन त्याप्रमाणे काम करणे आवश्यक असता पूर्वीचे  प्राकलन रद्द न करताच काम करण्यात आले आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी 2010-11 या आर्थिक वर्षासाठी सहसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.जीईएन/ 2010 /प्रक्र68 /नवि 16, दि. 8/6/11 व शासन निर्णय क्र.पुनर्वि- 2011/प्र.क्र.44/ नवि-4, दि. 31/3/11 अन्वये 5.49 कोटी अनुदान मंजुर झाले असुन ते 2011-12 या आर्थिक वर्षामध्ये वितरीत केले आहे. या रक्कमेतुन 102 कामांचे प्रस्ताव तयार करुन मा.विभागीय आयुक्त पुणे यांचेकडील त्रिसदस्य समितीकडे मान्यतेसाठी पाठविणेसाठी स्थायी समिती ठराव क्र.181/11-12 दि. 12/07/11 अन्वये मान्यता घेवुन जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव सांगली यांचेकडे महानगरपालिकेमार्फत पत्र क्र.मनपा/सा/बांधा/226/2011-12 दि.25/7/11 रोजी पाठविण्यात आला.त्यास विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष जिल्हास्तरीय समिती, पुणे यांचे कडील पत्र क्र.निशा/कार्या 02/मनपा/विनि/प्रशामा/को/228/11,

दि.06/8/11 अन्वये तसेच जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,जिल्हास्तरीय समिती सांगली यांचे आदेश क्र.नपा/मुलभुत/आर.आर/622/2011 , दि.8/8/2011 अन्वये प्रशासकीय मान्यता दिली असून, त्यामधून वॉर्ड क्र. 46 मध्ये 100 फूटी डी.पी. रस्ता मुरुमीकरण करणे व कुपवाड वॉर्ड क्र.4 अहिल्यानगर येथील अंतर्गत रस्त्यांना आर.सी.सी.गटर करणे ही कामे करणेत आले आहे.

1.वॉर्ड क्र. 46 मध्ये 100 फूटी डी.पी. रस्ता मुरुमीकरण करणे कामातील अनियमितते बाबत.

प्रमाणक क्रमांक : 45 दि. : 09/11/2012 रक्कम : 628619/-

**लेखाशिर्ष :- इतर योजना4120 शासनाचे विशेष अर्थसहाय्य**

अंदाजपत्रकीय रक्कम : रु.999400/-

प्रशासकीय मान्यता :1. सहसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.जीई एन/ 2010/प्रक्र 68 /नवि 16,दि.8/6/11

2.आयुक्त सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांचेकडील पत्र क्र.226/2011-12 दि.25/7/12

3.क्र.नपा/मुलभुत/आरआर/622/2011जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली नगरपालिका प्रशासन शाखा यांचे प्रशासकीय मंजुरीचे पत्र दि.08/8/2011

स्थायी समिती सभा क्रमांक 11 ठराव क्रमांक 241 दि.12/08/11 ने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2011चे कलम 5(2)(1) अन्वये रितसर जाहिर निविदा प्रसिध्द करुन निविदा मागविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

तांत्रिक मान्यता : 309 दि. 16.06.2011

निविदा दिनांक :- जाहिर प्रकटन क्रमांक 3/2011/12 दैनिक पुढारी दि.13/08/2011 मध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे.

निविदा प्राप्त:- 10

ठेकेदाराचे नांव : विक्रमसिंह रंगराव माहिते यांची सर्वात कमीची 28.77 टक्के कमी दराची निविदा मान्य करण्यात आली आहे.

कार्यादेश क्रमांक / दिनांक : क्रमनपा/सा/बांधावि/528/2011-12 दि. 19.03.2012.

काम सुरु :-19/03/12 काम पुर्ण दिनांक : 17.05.2012

कामाची मुदत : 60 दिवस

मोजमाप पुस्तक क्रमांक : 03 पृष्ठ क्रमांक : 80 ते 82

निविदा दिनांक :- 13/08/2011 (जा.प्र.क्र.3/11-12)

एकूण प्राप्त निविदा :- 10 निविदा उघडली दिनांक :- 31/10/11

कामाची नस्ती, मोजमाप पुस्तक व देयक तपासून घेतलेल्या आक्षेपाबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.145 दि. 20/9/2014 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि. 18/10/2014 रोजी दिले आहे. अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालन अवलोकनी येवुन खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)निविदा 28.77 टक्के कमी दराची मान्य करण्यात आल्याने सार्व. बाधकाम विभाग नियम पुस्तीकेमधील नियम 150 नुसार 10% पेक्षा कमी दराने निविदा स्विकृत केल्यास, कमी आलेल्या दराप्रमाणे नविन संक्षिप्त प्राकलन(abstract estimate) तयार करुन त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजूरी घेतल्यानंतर मुळ प्राकलन रद्द करून त्याऐवजी कमी दराच्या प्राकलनाचा समावेश नस्तीमध्ये करुन त्याप्रमाणे काम करणे आवश्यक असता पूर्वीचे प्राकलन रद्द न करताच काम करण्यात आले आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये ही बाब मान्य करण्यात आली आहे.

2)कामाचे प्राकलन, मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणी केली असता कठीण मुरुम 2406 घ.मी. वापरला आहे. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे.व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. ठेकेदाराने देयकासोबत रॉयल्टी रक्कम भरलेबाबतचा पुरावा जोडलेला नसतानाही ठेकेदारास देयकामधुन रॉयल्टीची रक्कम आदा केलेली आहे. रॉयल्टी भरलेचा पुरावा दाखविला नसल्याने 2406 घ.मी.X रु.70.67 प्रती घ.मी.प्रमाणे रु.170032/- रॉयल्टी रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये रॉयल्टी भरल्याचे पास लगत केल्याचे नमुद आहे. परंतु पावत्या लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेल्या नाहीत.

3)प्राकलनामध्ये उद्योग उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्र. बीसीए-2009

प्रक्र108/कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकराची तरतुद केली आहे.परंतु उपकर देयकामधुन कपात केला नसल्याने रु. 691150/- च्या 1 टक्केप्रमाणे रु.6911/- ठेकेदाराकडुन वसुल करण्यात यावेत. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये उपकर वसुल करण्याचे मान्य केले आहे. परंतु रक्कम वसुल केलेली नाही.

**आक्षेपाधिन रक्कम :- रु.621798/-**

**वसुलपात्र रक्कम :- कामगार कल्याण उपकर रु. 6911/-**

2.कुपवाड वॉर्ड क्र.4 अहिल्यानगर येथील अंतर्गत रस्त्यांना आर.सी.सी.गटर करणे कामातील अनियमिततेबाबत.

प्रमाणक क्रमांक : I 22 दि. : 13/08/12रक्कम : 873738/-

II 42 दि. : 09/11/12 रक्कम : 666303/-

लेखाशिर्ष :- इतर योजना 4120 शासनाचे विशेष अर्थसहाय्य

अंदाजपत्रकीय रक्कम : रु.2000000/-

प्रशासकीय मान्यता : 1.सह सचिव,नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.जीईएन/ 2010/प्रक्र68/नवि 16,दि.8/6/11

2.आयुक्त सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांचेकडील पत्र क्र.226/2011-12 दि.25/7/12

3.क्र.नपा/मुलभुत/आरआर/622/2011 जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली नगरपालिका प्रशासन शाखा दि.08/8/2011

स्थायी समिती सभा क्रमांक 11 ठराव क्रमांक 241 दि.12/08/11 ने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2011चे कलम 5(2)(1) अन्वये रितसर जाहिर निविदा प्रसिध्द करुन निविदा मागविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

आयुक्त निर्णय क्र.214/2011-12,दि.30/09/11ने आलेली निविदा मंजुर करण्यात आली आहे.

तांत्रिक मान्यता : 237 दि. 16.06.2011

निविदा दिनांक :-जाहिर प्रकटन क्रमांक 3/2011/12 दैनिक पुढारी दि.13/08/2011 मध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे.

निविदा प्राप्त :- 03 निविदा उघडली दिनांक :- 30/08/11

ठेकेदाराचे नांव : शरद पा.अंबी यांची सर्वात कमीची 0.51% कमी दराची निविदा मान्य करण्यात आली आहे.

कार्यादेश क्रमांक / दिनांक : क्रमनपा/सा/बांधावि/318/2011-12 दि. 17.11.2011.

काम सुरु :-17/11/11 काम पुर्ण दिनांक : 15.04.2013

कामाची मुदत : 180 दिवस

मोजमाप पुस्तक क्रमांक : 7 पृष्ठ क्रमांक : 11 ते 12/L व 7 पृष्ठ क्रमांक : 20 ते 23

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

4)कामाचे प्राकलन, मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणी केली असता कठीण मुरुम घ.मी. वापरला आहे. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे.व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. ठेकेदाराने देयकासोबत वाळुची रॉयल्टी रक्कम भरलेबाबतचा पुरावा म्हणुन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या 30 ब्रास वाळु गौण खनिज वाहतुक परवान्याच्या प्रती जोडल्या आहेत. तसेच कामासाठी एकुण 64 ब्रास मुरुम वापरला असुन त्याची रॉयल्टी भरल्याचा पुरावा म्हणुन खनिज वाहतुकीचे पास जोडण्यात आले आहेत.एकुण 94 ब्रास गौणखनिज भरल्याचे पुरावे नस्ती सोबत जोडले असुन कामासाठी एकुण 138 घ.मी. गौणखनिज वापरले असल्याने उर्वरित 44 घ.मी ची ठेकेदारास देयकामधुन आदा केलेली 44 घ.मी.X रु.70.67/घनमिटर प्रमाणे रु.3107/- रॉयल्टीची रक्कम ठेकेदाराकडुन वसुल करणे आवश्यक आहे. ज्ञापनास दिलेल्या अनुपालनाप्रमाणे पास लेखापरीक्षणास दाखविण्यात आले नसल्याने रु. 3107/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

5)प्राकलनामध्ये उद्योग उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्र. बीसीए-2009

| |
|---|
| प्रक्र108/कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकराची तरतुद केली आहे.परंतु उपकर देयकामधुन कपात केला नसल्याने रु.1540041/- च्या 1 टक्केप्रमाणे रु.15400/- ठेकेदाराकडुन वसुल करण्यात यावेत. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये उपकर वसुल करण्याचे मान्य केले आहे. परंतु रक्कम वसुल केलेली नाही.<br><br>6)जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,जिल्हास्तरीय समिती सांगली यांचे आदेश क्र.नपा/ मुलभुत /आर. आर / 622/2011,दि.8/8/2011च्या प्रशासकीय मान्यतेच्या पत्रामधील अट क्र.23 नुसार या निधीच्या विनियोजनाबाबतच्या प्रमाणपत्रासोबत शासनाच्या नगरविकास विभागाच्या शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2008/1338/प्र.क्र.171/नवि16 दि.2/3/2009 नुसार सर्व विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडुन तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेतले नाही. अनुपालनामध्ये महानगरपालिकेने या कामी त्रयस्थ संस्थेची नेमणुक करण्यात आली नसल्याने तांत्रिक लेखापरीक्षण करण्यात आले नसलेचे मान्य केले आहे.<br><br>आक्षेपाधिन रक्कम :- रु.1521534/-<br>वसुलपात्र रक्कम :- रु. 15400/-<br><br>**उपरोक्त दोन कामांची आक्षेपाधिन रक्कम :-** रु.628619/- + रु.1524641 = रु.2153260/-<br><br>**दोन कामांची वसूलपात्र रक्कम :-** कामगार कल्याण उपकर रु.6911 + रु.15400/- = रु.22311/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 145 | 20/09/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |

| | |
|---|---|
| 123 | कुपवाड वॉर्ड क्र.11शालीनीनगर परिसरात रस्तेस आर.सी.सी.गटर करणे कामातील अनियमितते बाबत. |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव |
| | इतर योजना4120 शासनाचे विशेष अर्थसहाय्य. |

| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 04 | सार्व.बांध | राज्य शासन | 9ब | 03 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 451608 | 7943 | | |

उद्योग उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य, शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र.108/कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकराची तरतुद प्राकलनामध्ये केली आहे. परंतु ठेकेदाराच्या देयकामधुन रु.497530/- च्या 1 टक्केप्रमाणे रु.4975/- वसुल केलेला नाही.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी 2010-11 या आर्थिक वर्षासाठी सहसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.जीईएन/2010/प्रक्र68/नवि 16, दि.8/6/11 व शासन निर्णय क्र.पुनर्वि-2011/प्र.क्र.44/ नवि-4,दि.31/3/11 अन्वये 5.49 कोटी अनुदान मंजुर झाले असुन ते 2011-12 या आर्थिक वर्षामध्ये वितरीत केले आहे. या रक्कमेतुन 102 कामांचे प्रस्ताव तयार करुन मा.विभागीय आयुक्त पुणे यांचेकडील त्रिसदस्य समितीकडे मान्यतेसाठी पाठविणेसाठी स्थायी समिती ठराव क्र.181/11-12 दि.12/07/11 अन्वये मान्यता घेवुन जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव सांगली यांचेकडे महानगरपालिकेमार्फत पत्र क्र.मनपा/सा/बांधा/226/2011-12 दि. 25/7/11 रोजी पाठविण्यात आला. त्यास विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष जिल्हास्तरीय समिती, पुणे यांचे कडील पत्र क्र.निशा/कार्या 02/मनपा/विनि/प्रशामा/को/228/11, दि.06/8/11 अन्वये तसेच जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,जिल्हास्तरीय समिती सांगली यांचे आदेश क्र.नपा/मुलभुत/आर.आर/622/2011, दि.8/8/2011 अन्वये प्रशासकीय मान्यता दिली असून, त्यामधून कुपवाड वॉर्ड क्र.11 शालीनीनगर परिसरात रस्तेस आर.सी.सी.गटर करणे हे काम करणेत आले आहे.

**प्रमाणक क्रमांक : 39 दि. : 25/10/12 रक्कम : 459551/-**

लेखाशिर्ष :- इतर योजना4120 शासनाचे विशेष अर्थसहाय्य

अंदाजपत्रकीय रक्कम : रु.1099800/-

प्रशासकीय मान्यता : 1.सहसचिव,नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.जीईएन/2010/प्रक्र68/नवि 16,दि.8/6/11

2.आयुक्त सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांचेकडील पत्र क्र.226/2011-12 दि.25/7/12

3.क्र.नपा/मुलभुत/आरआर/622/2011जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली नगरपालिका प्रशासन शाखा यांचे प्रशासकीय मान्यतेचे पत्र दि.08/8/2011

स्थायी समिती सभा क्रमांक 11 ठराव क्रमांक 241 दि.12/08/11 ने महाराष्ट्र महानगरपालिका

अधिनियम 2011चे कलम 5(2)(1) अन्वये रितसर जाहिर निविदा प्रसिध्द करुन निविदा मागविण्यास मान्यता देण्यात आली आहे.
आयुक्त निर्णय क्र.214/2011-12,दि.30/09/11ने आलेली निविदा मंजुर करण्यात आली आहे.
तांत्रिक मान्यता : 275 दि. 16.06.2011
निविदा दिनांक :- जाहिर प्रकटन क्रमांक 3/2011/12 दैनिक पुढारी दि.13/08/2011 मध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे.
निविदा प्राप्त :- 04 निविदा उघडली दिनांक :- 30/08/11
ठेकेदाराचे नांव : अभय रा. पाटील यांची सर्वात कमीची 0.36 टक्के कमी दराची निविदा मान्य करण्यात आली आहे.
कार्यादेश क्रमांक/दिनांक : क्रमनपा/सा/बांधावि/437/2011-12 दि. 17.11.2011.
काम सुरु :- 17/11/11 काम पुर्ण दिनांक : 15/03/12
कामाची मुदत : 120 दिवस
मोजमाप पुस्तक क्रमांक : 7 पृष्ठ क्रमांक : 17 ते 19

कामाची नस्ती, मोजमाप पुस्तक व देयक तपासून घेतलेल्या आक्षेपाबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.146 दि. 20/9/2014 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि. 18/10/2014 रोजी दिले आहे. अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालन तपासुन खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)कामाचे प्राकलन, मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणी केली असता कठीण मुरुम 42 घ.मी. वापरला आहे. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे. व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. ठेकेदाराने देयकासोबत रॉयल्टी रक्कम भरलेबाबतचा पुरावा जोडलेला नसताना ठेकेदारास देयकामधुन 42 घ.मी.X रु.70.67 प्रती घ.मी.प्रमाणे रु.2968/- रॉयल्टी रक्कम आदा केली आहे. सदर रक्कम वसुलपात्र आहे.

2)उद्योग उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकराची तरतुद प्राकलनामध्ये केली आहे.परंतु देयकामधुन उपकर कपात केला नसल्याने रु.497530/- च्या 1 टक्केप्रमाणे रु.4975/- ठेकेदाराकडुन वसुल करण्यात यावेत. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये उपकर वसुली ठेकेदाराकडुन करण्याचे मान्य केले आहे. परंतु वसुली करुन लेखापरीक्षणास अनुपालन सादर केलेले नाही.

| |
|---|
| 3)जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,जिल्हास्तरीय समिती सांगली यांचे आदेश क्र.नपा/मुलभुत/आर.आर/622 /2011,दि.8/8/2011च्या प्रशासकीय मान्यतेच्या पत्रामधील अट क्र.23 नुसार या निधीच्या विनियोजना बाबतच्या प्रमाणपत्रासोबत शासनाच्या नगरविकास विभागाच्या शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2008/1338/ प्र.क्र.171/नवि16 दि.2/3/2009 नुसार सर्व विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडुन तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कामाचे तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेतलेले नाही.<br><br>**आक्षेपाधिन रक्कम :-** रु.451608/-<br><br>**वसुलपात्र रक्कम :-** रॉयल्टी रक्कम रु.2968/- + कामगार कल्याण उपकर रु.4975/- = रु. 7943/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 146 | 20/09/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |
|---|---|

| 124 | वॉर्ड क्र.69 सांगली रत्नराज बंगला ते गारपीर चौक आर.सी.सी.गटर करणे या कामातील अनियमितते बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | दलित वस्ती सुधार योजना. | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | राज्य शासन | 9ब | 05 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 1303038 | | | |

| |
|---|
| प्राकलनामध्ये 5 टक्के कॉन्टीजन्सी रक्कम रु.49280/- चा समावेश केला आहे.व या रक्कमेतुन डि |

वॉटरींगचे काम एकुण 110 दिवस केले असुन रु.248 प्रती दिवस प्रमाणे रु.49280/- चे काम केल्याचे मोजमाप पुस्तक व देयकामध्ये नमुद आहे.सदर कामाचा समावेश प्राकलनामध्ये करण्यात आलेला नाही.निविदा अटी व शर्तीमधील अट क्र.17 नुसार बदल किंवा वाढ केलेली बाब प्राकलनमध्ये नसल्यास आयुक्त यांचे मान्यतेने दर ठरविले जातील असे नमुद असताना जादा केलेल्या कामास आयुक्त व विभागप्रमुखांची पुर्व मान्यता न घेताच नियमबाहयपणे काम करुन घेवून प्रदान केले असल्याने रु.49280/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

2010-11या आर्थिक वर्षात दलित वस्ती अंतर्गत 21 कामांचा रु.13332587/- रक्कमेचा प्रस्ताव महानगरपालिकेने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे दि.8/12/2010 रोजी पाठविण्यात आला होता त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन रु.12500000/- इतके अनुदान मंजुर झाले आहे व सदर रक्कमेचा धनादेश दि.19/04/11रोजी महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे. त्यामधुन एकुण 19 कामे प्रस्तावित करण्यात आली असून, त्यामधुन वॉर्ड क्रं.69 सांगली रत्नराज बंगला ते गारपीर चौक आर.सी.सी.गटर करणे हे काम करण्यात आलेले आहे.

**प्रमाणक क्र. 290 दि.09/07/12 रक्कम रु.311006/-**

**प्रमाणक क्र. 295 दि.12/09/12 रक्कम रु.534226/-**

**प्रमाणक क्र. 298 दि.09/11/12 रक्कम रु.470692/-**

निविदा रक्कम 1316200/-

प्रशासकीय मान्यता :- आरआर/क्रमांक/नपा/आरआर/195 जिल्हाधिकारी कार्यालय सांगली,यांचे प्रशासकीय मान्यतेचे पत्र , दि.31/03/2011

तांत्रिक मान्यता:-शहर अभियंता यांचे कडील क्र.र.न.364 दि.02/12/10

स्थायी समिती ठराव नं.175 दि.12/07/11 ने मंजुरी.

मा.आयुक्त निर्णय क्र.339 दि.9/12/2011 ने निविदा दरास व खर्चास मंजुरी देण्यात आली आहे.

ठेकेदाराचे नाव :-जय गणेश मजुर सोसायटी.

कार्यादेश:-मनपा/मागाससमिती/339/11-12 दि.16/03/12.

मुदत:- 120 दिवस. काम पुर्ण दि.07/07/2012.

मोजमाप पुस्तक क्र.02 व 106 पृष्ठ क्र.81 ते 94

कामाची नस्ती, मोजमाप पुस्तक व देयक तपासून घेतलेल्या आक्षेपाबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.147 दि.

20/9/2014 रोजी निर्गमित केला असुन  बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि. 18/10/2014 रोजी दिले आहे.  अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालन अवलोकनी येवुन खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1) नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक विघयो-102000/1592/प्र.क्र.189/नवि-4 दि.5 मार्च 2002 मधील परी.7 मधील अ नुसार बांधकाम विषयक कामा साठीचे रेखांकन/नकाशे  नगररचना विभागाने मंजुर केले आहेत परंतु प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 नुसार सुसंगत असलेबाबत तसेच विकास योजनेचा जमीन वापर व आरक्षणाबाबत सखोल छाननी करुन अहवाल महानगरपालिकेस देणे आवश्यक असता त्याप्रमाणे अहवाल दिलेची नोंद वा अनुषंगिक कागदपत्रे नस्ती मध्ये दिसून आलेले नाहीत. जिल्हाधिकारी कार्यालय सांगली,नगरपालिका प्रशासन शाखा यांचे पत्र क्रमांक /नपा /आर आर / 462 /2012 दि.27/07/2012 अन्वये देण्यात आलेल्या प्रशासकिय मान्यतेच्या आदेशामधील अट क्र. 3 नुसार प्रस्तावित केलेली कामे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या मालकीच्या /ताब्यात असलेल्या जमिनीवर घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असल्याबाबतचा कोणताही अनुषंगिक पुरावा सोबत जोडण्यात आलेला नाही. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 201 अन्वये महानगरपालिका अस्तित्वात आली त्यावेळी असणारी जागा महानगरपालिकेमध्ये निहित असल्यामुळे पुरावा जोडणेची आवश्यकता नसल्याचे नमुद आहे. परंतु वॉर्ड क्रं.69 सांगली रत्नराज बंगला ते गारपीर चौक आर.सी.सी.गटर करणे या कामासाठी वापारलेली जागा महानगरपालिकेमध्ये निहित असल्याची नोंदवही दाखविण्यात आली नाही.

2)पुर्वगणन पत्रकामध्ये अंतर्भुत असलेल्या बाबींच्या समोर सार्वजनिक बांधकाम विभागाची कोणत्या वर्षाची विभागीय दरसुची वापरली आहे ते वर्ष व पृष्ठ क्रमांक नमुद नसलेने कोणत्या वर्षाची विभागीय दरसुची वापरली आहे ते समजुन येत नाही. तसेच प्राकलनामध्ये नमुद बांधकामाच्या कामाचे दर दरपृथ:करणाने ठरविले आहेत. परंतु नस्तीमध्ये दरपृथ:करणाची दरपत्रके जोडलेली नाहीत. त्यामुळे दराबाबतची खात्री करता येत नाही. अनुपालनामध्ये दरपृथ:करण दाखविण्याची दक्षता घेण्यात येत असल्याचे नमुद आहे. परंतु दरपृथ्थकरण दाखविलेले नाही.

3)स्थायी समिती सभा क्र.7 ,ठराव क्र..175 दि.12/07/11 ने जिल्हा निबंधक मजुर सोसायटी यांची शिफारस घेवुन मजुर सहकारी सोसायटी यांचे कडुन काम करुन घेण्यास स्थायी समितीची मान्यता झाली आहे. त्याप्रमाणे जिल्हा निबंधक यांनी जाक्र.फेड/काम/2011/330 दि.12/8/11 ने जयगणेश मजूर सोसा.यांचे नावे मंजूर केले आहे. स्थायी समितीची मान्यता झालेला विषय मजुर सोसायटी यांचे नाव घालुन पुन्हा मंजुरीसाठी स्थायी समितीकडे पाठविल्यानंतर  स्थायी समिती सभा क्र.12, ठराव क्र.247,

दि.16/12/11 ने मान्यता दिली आहे. त्यामुळे काम चालु करणेस 4 महिन्याचा विलंब झाला आहे.

4)प्राकलनामध्ये मंजुर गटरचे काम 510 मिटर लांबीचे आहे. मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणी केली असता प्रत्यक्षात गटर 667 मिटर झाले आहे. बाब क्र.5 सिमेंट कॉंक्रीट टाकणे (M-15) या बाबीवर प्राकलनाप्रमाणे 153 घ.मी. X रु.3306 प्रती घ.मी. = रु.505818/- खर्च अंदाजित केला आहे. परंतु मोजमाप पुस्तकामध्ये 169.91 घ.मी. X रु.3306 प्रती घ.मी. = रु. 561722/- चे काम झाल्याचे नमुद आहे व त्याप्रमाणे ठेकेदारास देयक आदा केले आहे. सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम 227 (24) नुसार कामाच्या अतिरिक्त बाबी पार पाडणेसाठी कार्यकारी अभियंता यांना प्रत्येक अतिरिक्त बाबींसाठी रुपये 10,000/- या प्रमाणे वाढ करण्याचे अधिकार आहेत. सिमेंट कॉंक्रीट टाकणे (M-15) या बाबीवर रुपये 10,000/- पेक्षा जादा खर्च झालेने सुधारीत तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2011 चे प्रकरण सात संविदा कलम 73 (अ) अन्वये महानगरपालिकेच्या वतीने संविदा करणेचा अधिकार आयुक्त यांना असलेने त्यांची प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असता ती घेणेत आलेली नाही. निविदा अटी/शर्ती मधील अट क्र.15 नुसार मंजुर कामामध्ये बदल किंवा वाढ करण्यास विभागप्रमुख यांच्या अगावु लेखी मंजुरीची आवश्यकता आहे. विभागप्रमुख व आयुक्तांची लेखी पुर्वमंजुरी न घेताच काम केलेने रक्कम रु. 561722/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

5)प्राकलनामध्ये 5 टक्के कॉन्टीजन्सी रक्कम रु.49280/- चा समावेश केला आहे.व काम करताना या रक्कमेतुन डि वॉटरींगचे काम एकुण 110 दिवस केले असुन रु.248 प्रती दिवस प्रमाणे रु.49280/- चे काम केल्याचे मोजमाप पुस्तक व देयकामध्ये नमुद आहे. सदर कामाचा समावेश प्राकलनामध्ये करण्यात आलेला नाही. निविदा अटी व शर्तीमधील अट क्र.17 नुसार बदल किंवा वाढ केलेली बाब प्राकलनमध्ये नसल्यास आयुक्त यांचे मान्यतेने दर ठरविले जातील असे नमुद असताना आयुक्त व विभागप्रमुखांची पुर्व मान्यता न घेताच डि वॉटरींगचे अतिरिक्त काम केले असल्याने रु.49280/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

आक्षेपाधिन रक्कम :- रु. 1303038 /-

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 147 | 20/09/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |
|---|---|

| 125 | सांगली आहिल्यादेवी होळकर चौक ते कारखान्यापर्यंत दक्षिण + उत्तर 100 फुटी रस्त्यास आर.सी.सी. गटर करणे या कामातील अनियमिततेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | तेरावा वित्त आयोग. | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | केंद्र शासन | 9ब | 04 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 628873 | 10283 | | |

कामाची निविदा 24.50% कमी दराने मान्य करण्यात आल्याने सार्व. बाधकाम विभाग नियम पुस्तीकेमधील नियम क्र.150 नुसार 10% पेक्षा कमी दराने निविदा स्विकृत केल्यास, कमी आलेल्या दराप्रमाणे नविन संक्षिप्त प्राकलन(abstract estimate) तयार करुन त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजूरी घेतल्यानंतर मुळ प्राकलन रद्द करून कमी दराच्या संक्षिप्त प्राकलनाप्रमाणे काम करणे आवश्यक असता पूर्वीचे प्राकलन रद्द न करताच काम करण्यात आले आहे. रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसताना ठेकेदारास रु.10383/- रॉयल्टी रक्कम प्रदान केली आहे.

सांगली महानगरपालिकेस 13 व्या वित्त आयोगातील 5 वा टप्पा अंतर्गत शासन आदेश क्र.नपप्रस/तेविआ/सर्वसाधारण मुलभुत अनुदान दुसरा टप्पा/2011-12/कक्ष-11,दि.31/3/12 अन्वये रु.2,69,01,504/- अनुदान प्राप्त झाले आहे. त्यापैकी पाणी पुरवठा विभागास रु.50 लक्ष, आरोग्य विभाग 50 लक्ष, सार्व.बांधकाम विभाग रु.1.69 कोटी अनुदानाचे वाटप महासभेने केले आहे. उपरोक्त प्रमाणे बांधकाम विभागास वाटप केलेल्या रु.1,69,00,000/- अनुदानामधुन सन्मा.सदस्य यांचे मागणीनुसार प्रस्तावीत करणेत आलेल्या 17 कामांना मा.महासभा क्र.03 ठराव क्र.52 दि.12.06.2012 ने मान्यता दिली असून, त्यामधून सांगली आहिल्यादेवी होळकर चौक ते कारखान्यापर्यंत दक्षिण + उत्तर 100 फुटी रस्त्यास आर.सी.सी. गटर करणे हे काम करणेत आले आहे.

लेखाशिर्ष :- तेरावा वित्त आयोग.

**प्रमाणक क्रमांक :-36 दि. :-19/3/12 रक्कम :- 638873/-**

अंदाजपत्रकीय रक्कम : रु. 1255100/-

प्रशासकीय मान्यता : मा. आयुक्त निर्णय क्र.61 दि. 11.07.2012

मा.महासभा क्र.03 , ठराव क्र.52 दि.12.06.2012

तांत्रिक मान्यता : 49 दि. 28.05.2012

निविदा दिनांक : 13.07.2012 मुदत : 90 दिवस

एकूण प्राप्त निविदा : 06 निविदा उघडली दिनांक : 10.08.2012

ठेकेदाराचे नांव : मोहन एस. कुंभार यांची **(24.50 टक्के कमीने)** निविदा मंजुर करण्यात आली आहे.

कार्यादेश क्रमांक / दिनांक : दि. 04.03.2013

कामाची मुदत : 90 दिवस काम पुर्ण दिनांक : 24.05.2013

मोजमाप पुस्तक क्रमांक : 03 पृष्ठ क्रमांक : 24 ते 25

जाहीर प्रकटन क्र.4/12-13 मधील अ.क्र.6 ची निविदा दि.13.07.2012 रोजी दै.पुढारी या वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आली असून दि.06.08.2012 अखेर ई टेंडर ने निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरची निविदा दि.10.08.2012 रोजी निविदा समिती समोर उघडण्यात आली असून त्यामध्ये एकूण 06 निविदा प्राप्त झाल्या असून सर्वात कमी दराची निविदा श्री. मोहन शंकर कुंभार यांची 24.50% कमी दराची आहे.

कामाची नस्ती, मोजमाप पुस्तक व देयक तपासून घेतलेल्या आक्षेपाबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.148 दि. 20/9/2014 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि. 18/10/2014 रोजी दिले आहे. अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालन तपासुन खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)सार्व.बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.सी.ए.टी 09/05/प्र.क्र 381 इमारती - 2 मुंबई दि.15.05.2007 नुसार 15 लाखापर्यंत निविदा असलेस रु.500/- फॉर्म किंमत घेणे आवश्यक असलेने 06 निविदा संचाची रु.3,000/- रक्कम मनपा निधीत जमा झाल्याचे लेखापरीक्षणास दाखविणेत आलेले नसल्याने रु.3000/-

आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये संगणकीय प्रणाली पध्दतीने निविदा भरल्या जात असल्याने निविदा फॉर्म भरुन घेतला नसल्याचे नमुद आहे. परंतु निविदा फॉर्मची किंमत वसुल करुन कोणत्या लेखाशिर्षावर भरणा केली जाते या बाबत माहिती दिली नसल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.

2)निविदा 24.50% कमी दराने स्विकारण्यात आलेने सार्व. बाधकाम विभाग नियम पुस्तीकेमधील नियम क्र.150 नुसार 10% पेक्षा कमी दराने निविदा स्विकृत केल्यास, कमी आलेल्या दराप्रमाणे नविन संक्षिप्त प्राकलन(abstract estimate) तयार करुन त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजूरी घेतल्यानंतर मुळ प्राकलन रद्द करून कमी दराच्या संक्षिप्त प्राकलनाप्रमाणे काम करणे आवश्यक असता पूर्वीचे प्राकलन रद्द न करताच काम करण्यात आले आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये निविदा कमी दराने आल्याने त्यात महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होत असल्याने काम करुन घेतलेचे नमुद आहे. परंतु नियमाप्रमाणे घट अंदाजपत्रक तयार करून त्यास सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेतली नसल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.

3)महाराष्ट्र शासन ,महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज/1009/10-पी.के/309-.ख (3) दि 2010/02/11.नुसार रक्कम रु. 200 -/प्रती ब्रास किंवा रु/70.67.घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे.व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. देयकासोबत ठेकेदाराने रॉयल्टी रक्कम भरलेचा कोणताही पुरावा सोबत जोडला नसतानाही बांधकाम विभागाने देयकामधुन रॉयल्टीची रक्कम कपात न करता दिलेली आहे.त्यामुळे ठेकेदारास देयकामधुन आदा केलेली 145.52 घ.मी.X रु.70.67 प्रती घ.मी.प्रमाणे रु.10283/- रॉयल्टी रक्कम वसुलपात्र करण्यात येत आहे. अनुपालनामध्ये रॉयल्टी रक्कम वसुल करण्याचे मान्य केले आहे. परंतु रक्कम वसुल केली नसल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.

4)पुर्वगणनपत्रकामध्ये अंतर्भुत असलेल्या बाबींच्या समोर सार्वजनिक बांधकाम विभागाची कोणत्या वर्षाची विभागीय दरसुची वापरली आहे ते वर्ष व पृष्ठ क्रमांक नमुद नसलेने कोणत्या वर्षाची विभागीय दरसुची वापरली आहे ते समजुन येत नाही. तसेच प्राकलनामध्ये नमुद बांधकामाच्या कामाचे दर दरपृथ:करणाने ठरविले आहेत. परंतु नस्तीमध्ये दरपृथ:करणाची दरपत्रके जोडलेली नाहीत. त्यामुळे दराबाबतची खात्री करता येत नाही. अनुपालनामध्ये नमुद केल्याप्रमाणे दरपृथ:करण दाखविण्यात आलेले नाही.

**आक्षेपाधिन रक्कम :- रु.628873/-**

**वसुलपात्र रक्कम :- रॉयल्टी रु. 10283/-**

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 148 | 20/09/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 126 | सांगलवाडी भारती विद्यापीठ जवळील दक्षिण + उत्तर रस्ता हॉटमिक्स पध्दतीने डांबरी करणे कामातील अनियमिततेबाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | तेरावा वित्त आयोग. | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 04 | सार्व.बांधकाम | केंद्र शासन | 9ब | 05 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 1135240 | 15264 | | |

नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.तेविआ-2010/प्र.क्र.131/2010/ नवि-4, दि. 25 ऑक्टोबर 2010 नुसार 13 व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकरीता प्राप्त अनुदानाच्या वितरण व विनियोगाबाबतची कार्यपध्दती निश्चित केली आहे. सदर शासन निर्णयातील (II) नुसार प्राप्त होणाऱ्या निधीतून नागरी भागात मूलभूत सोयी सुविधाविषयीची कोणती कामे अनुज्ञेय आहेत या बाबतची यादी दिली आहे. या यादीमध्ये रस्त्याच्या कामाचा अंतर्भाव नसल्याने या निधीमधुन रस्त्याचे काम अनुज्ञेय नसतानाही करण्यात आले आहे. रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसताना ठेकेदारास रु.15264/- रॉयल्टी रक्कम प्रदान केली आहे. काम शासन निधीमधुन करण्यात आल्याने 15.48 टक्के जादा रक्कमेची तरतुद महानगरपालिका निधीमधुन करुन त्यामधुन जादा रक्कम रु.153404/- देणे आवश्यक असता ठेकेदारास ती शासन निधीमधुन प्रदान करण्यात आली आहे.

सांगली महानगरपालिकेस 13 व्या वित्त आयोगातील 5 वा टप्पा अंतर्गत शासन आदेश क्र.नपप्रस / तेविआ /सर्वसाधारण मुलभुत अनुदान दुसरा टप्पा/2011-12/कक्ष-11,दि.31/3/12 अन्वये रु.2,69,01,504/- अनुदान प्राप्त झाले आहे. त्यापैकी पाणी पुरवठा विभागास रु.50 लक्ष, आरोग्य विभागास 50 लक्ष, सार्व.बांधकाम विभागास रु.1.69 कोटी अनुदानाचे वाटप महासभेने केले आहे. उपरोक्त प्रमाणे बांधकाम विभागास वाटप केलेल्या रु.1,69,00,000/- अनुदानामधुन सन्मा.सदस्य यांचे मागणी नुसार प्रस्तावीत करणेत आलेल्या 17 कामांना मा.महासभा क्र.03 ठराव क्र.52 दि.12.06.2012 ने मान्यता दिली असून, त्यामधून सांगलवाडी भारती विद्यापीठ जवळील दक्षिण + उत्तर रस्ता हॉटमिक्स पध्दतीने डांबरी करणे हे काम करणेत आले आहे.

लेखा शिर्ष :- तेरावा वित्त आयोग.

**प्रमाणक क्रमांक :23 दि. :12/3/13 रक्कम :1150504/-**

अंदाजपत्रकीय रक्कम :रु. 997100/-

प्रशासकीय मान्यता : मा.आयुक्त निर्णय क्र.61 दि.11.7.12,मा.महासभा क्र.08,ठराव क्र.161 दि.09.11.2012

तांत्रिक मान्यता : 49 दि. 28.05.2012

निविदा दिनांक : 13.07.2012 मुदत : 90 दिवस

एकूण प्राप्त निविदा : 03 निविदा उघडली दिनांक : 20.08.2012

ठेकेदाराचे नांव : व्हि.ए.पाटील 15.48 टक्के जादाने मंजुर करण्यात आली आहे.

कार्यादेश क्रमांक / दिनांक : क्रमनपा/सा/बांधावि/1137/2012-13 दि. 06.02.2013.

कामाची मुदत : 60 दिवस काम पुर्ण दिनांक : 18.12.2013

मोजमाप पुस्तक क्रमांक : 05 पृष्ठ क्रमांक : 18 ते 20

जाहीर प्रकटन क्र.4/12-13 मधील अ.क्र.6 ची निविदा दि.13.07.2012 रोजी दै.पुढारी व दि. 14.07.2012 रोजी दै.सकाळ या वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आली असून दि.06.08.2012 अखेर ई टेंडर ने निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरची निविदा दि.20.08.2012 रोजी निविदा समिती समोर उघडण्यात आली असून त्यामध्ये एकूण 03 निविदा प्राप्त झाल्या आहेत व सर्वात कमी दराची श्री. व्हि.ए.पाटील यांची निविदा 15.48 टक्के जादाने मंजुर करण्यात आली आहे. उपायुक्त यांचे कार्यालयात दि.22/08/12 रोजी ठेकेदाराबरोबर दर कमी करणेसाठी वाटाघाटी करणेसाठी बैठक बोलाविण्यात आली होती. त्यामध्ये दि.01/08/2012 चे भारत पेट्रोलियम कार्पोरेशन यांचे वेबसाईटवर प्रसिध्द डांबराचे दराबरोबर दरपृथ:करण करुन त्याची तुलना अंदाजपत्रकीय दराशी केली असता निविदा 15.48 टक्के

जादाने म्हणजेच बाजारभावाने डांबराच्या दराशी पृथ:करणाने केलेल्या दराने मंजुर करण्यात आली आहे.

कामाची नस्ती, मोजमाप पुस्तक व देयक तपासून घेतलेल्या आक्षेपाबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.149 दि. 20/9/2014 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि. 18/10/2014 रोजी दिले आहे. अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालन तपासुन खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)एकूण 03 निविदा प्राप्त असून निविदा रु.997100/- ची असल्याने सार्व.बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.सी.ए.टी 09/05/प्र.क्र 381 इमारती - 2 मुंबई दि.15.05.2007 नुसार 15 लाखापर्यंत निविदा असलेस रु.500/- फॉर्म किंमत वसूल करणे आवश्यक असलेने 03 निविदा संचाची रु.3,000/- रक्कम मनपा निधीत जमा झाल्याचे लेखापरीक्षणास दाखविणेत आलेले नाही. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये संगणकीय प्रणालीमधुन ऑनलाईन पध्दतीने निविदा भरल्या जात असल्याने निविदा फॉर्म भरुन घेतला नसल्याचे नमुद आहे. परंतु निविदा फॉर्मची किंमत वसुल करुन कोणत्या लेखाशिर्षावर भरणा केली जाते या बाबत माहिती दिलेली नाही.

2)महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे. व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. देयकासोबत ठेकेदाराने रॉयल्टी रक्कम भरलेचा कोणताही पुरावा सोबत जोडला नसतानाही बांधकाम विभागाने देयकामधुन रॉयल्टीची रक्कम कपात न करता दिलेली आहे. त्यामुळे ठेकेदारास देयकामधुन आदा केलेली 216.58 घ.मी.X रु.70.67प्रती घ.मी.प्रमाणे रु.15264.72/- रॉयल्टीची रक्कम वसूलपात्र करण्यात येत आहेत. अनुपालनामध्ये रॉयल्टी रक्कम वसुल करण्याचे मान्य केले आहे. परंतु रक्कम वसुल केली नसल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.

3)पुर्वगणन पत्रकामध्ये अंतर्भुत असलेल्या बाबींच्या समोर सार्वजनिक बांधकाम विभागाची कोणत्या वर्षाची विभागीय दरसुची वापरली आहे ते वर्ष व पृष्ठ क्रमांक नमुद नसलेने कोणत्या वर्षाची विभागीय दरसुची वापरली आहे ते समजुन येत नाही. तसेच प्राकलनामध्ये नमुद बांधकामाच्या कामाचे दर दरपृथ्थकरणाने ठरविले आहेत. परंतु नस्तीमध्ये दरपृथ्थकरणाची दरपत्रके जोडलेली नाहीत. त्यामुळे दराबाबतची खात्री करता येत नाही. अनुपालनामध्ये दरपृथ:करण दाखविण्याची दक्षता घेत असल्याचे नमुद आहे. परंतु दरपृथ:करणदाखविण्यात आलेले नाही.

4)निविदा 15.48 टक्के जादाने मंजुर करण्यात आली आहे. काम शासन निधीमधुन करण्यात आल्याने जादा रक्कमेची तरतुद महानगरपालिका निधीमधुन करुन त्यामधुन जादा रक्कम रु.153404/- देणे

| |
|---|
| आवश्यक असता (अंदाजपत्रकीय रक्कम रु.997100/- वजा देयकामधुन दिलेली रक्कम रु. 1150504/- ) ती शासन निधीमधुन देण्यात आली आहे. अनुपालनामध्ये सदर बाब लेखा शाखेशी संबंधित असल्याचे नमुद आहे. परंतु लेखाशाखेने या आक्षेपाचे अनुपालन सादर केलेले नाही.<br><br>5)नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.तेविआ- 2010/प्र.क्र.131/2010/ नवि-4,दि. 25 ऑक्टोबर 2010 नुसार 13 व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकरीता प्राप्त अनुदानाच्या वितरण व विनियोगाबाबतची कार्यपध्दती निश्चित केली आहे. सदर शासन निर्णयातील (II) नुसार प्राप्त होणाऱ्या निधीतून नागरी भागात मूलभूत सोयी सुविधाविषयीची कोणती कामे अनुज्ञय आहेत या बाबतची यादी दिली आहे. या यादीमध्ये रस्त्याच्या कामाचा अंतर्भाव नसल्याने या निधीमधुन रस्त्याचे काम अनुज्ञेय नसतानाही करण्यात आले आहे.<br>**आक्षेपाधिन रक्कम :- रु.1135240/-**<br>**वसुलपात्र रक्कम :- रॉयल्टी रु. 15264/-** |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 149 | 20/09/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |

| 127 | मुख्य लेखापरीक्षकांनी महानगरपालिकेचे 2012-13 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करुन अहवाल सादर केला नसलेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 08 | मुख्य लेखापरीक्षण | मनपा | 9अ | 07 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनिमय 1949 चे अनुसूची ड प्रकरण 3 मधील दोन नुसार मुख्य लेखापरीक्षकाने 5 (1) प्रमाणे महानगरपालिकेची लेखापरीक्षा करणे व 5 (3) (4) प्रमाणे अहवाल तयार करुन सादर करणे आवश्यक आहे परंतु त्याप्रमाणे मुख्य लेखापरीक्षकांनी 2012-13 या आर्थिक वर्षाचा लेखा विषयक सदर अहवाल तयार करुन सादर केलेला नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण 4 मधील कलम 45 - अ नुसार महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील उपसंचालकाच्या दर्जाच्या अधिकाऱ्याची महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक म्हणुन प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्य लेखापरीक्षक कार्यालयाकडील उपलब्ध नस्ती व कागदपत्रांची वार्षिक लेखा अहवालाच्या अनुषंगाने तपासणी केली असता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 51(1) अन्वये स्थायी समितीने मुख्य लेखापरीक्षक यांचे अधिनस्त काम करणारे अधिकारी व कर्मचारी यांची संख्या, पदनाम, श्रेणी, वेतन, फी व भत्ते ,कलम 51 चे पोटकलम (4) च्या तरतुदीच्या अधिन ठरविणे आवश्यक आहे त्याप्रमाणे मंजूर पदसंख्या स्थायी समितीने ठरविलेली नाही. मुख्य लेखापरीक्षक कार्यालयाने अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये या कार्यलयास एकुण 16 कर्मचारी मंजुर असलेचे नमुद केले आहे. त्यामध्ये अंतर्गत लेखापरीक्षकाची 2 पदे, वरीष्ठ लिपिक 7 पदे, कनिष्ठ लिपिक 4 पदे, व शिपाई 3 पदे मंजुर आहेत. त्यापैकी 2012-13 या अर्थिक वर्षात एकुण 1 वरीष्ठ लिपिक व 4 कनिष्ठ लिपिक व 2 शिपाई कार्यरत असलेचे नमुद आहे . प्रशासनाकडुन मुख्य लेखापरीक्षकाकडे वित्तिय सल्ल्यासाठी खर्चाची प्रकरणे, कर्मचारी सेवापुस्तके व वेतनवाढ प्रकरणे, रोजंदारी कर्मचारी वेतन पत्रके ,कर्मचारी वेतन देयके, कंत्राटदाराची देयके यांचे पूर्वलेखापरीक्षण करणे, निविदा उघडणे त्यांची छाननी करणे ही कामे पाठविली जातात ज्याचा अधिनियमामध्ये कोठेही उल्लेख नाही. 2012-13 या अर्थिक वर्षात मुख्य लेखापरीक्षण विभागाकडे 1 वरीष्ठ लिपिक व 4 कनिष्ठ लिपिक व 2 शिपाई कार्यरत असलेचे अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये नमुद आहे. मंजूर पदाप्रमाणे कर्मचारी उपलब्ध नसल्याने त्याचा लेखापरीक्षणावर प्रतिकुल परिणाम झाला आहे. सदर अधिनियमाशी विसंगत अन्य कामामुळे व अपु-या कर्मचारी वर्गामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनिमय 1949 चे कलम 105 (1) व 106 मध्ये विहित केलेली कामे प्रभावीपणे करता येत नसल्याचे अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये मुख्यलेखापरीक्षक यांनी

नमुद केले आहे.

2)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53 (2) नुसार स्थायी समितीच्या मान्यतेने मुख्य लेखापरीक्षकांनी त्यांचे कार्यालयात नेमणुक केलेल्या अधिकारी व कर्मचारी यांची यादी लेखापरीक्षणास सादर केलेली नाही. तसेच सन 2011-12 या वर्षात कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांची नेमणुक कोणामार्फत करणेत आली तसेच सदर कर्मचारी कोणत्या विभागातून मुलेप कार्यालयात कोणत्या कालावधीसाठी बदलीने कार्यरत आहेत याबाबतची माहितीही लेखापरीक्षणास सादर केलेली नाही. त्यामुळे मुख्य लेखापरीक्षण कार्यालयामधील कर्मचा-यांची नियुक्ती स्थायी समितीने केली नसल्याचे स्पष्ट होते.

3)मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनिमय 1949 चे अनुसूची ड प्रकरण 3 मधील दोन नुसार मुख्यलेखापरीक्षकाने 5 (1) प्रमाणे महानगरपालिकेच्या महसुलातुन झालेला खर्च आणि विशेष निधीमधुन झालेला खर्च यांची लेखापरीक्षा केली पाहीजे.तसेच महानगरपालिकेचे कर्ज,ठेवी,कर्जनिवारण निधी,आगाउ रक्कमा,निलंबन लेखा,आणि वित्तप्रेषण व्यवहार यांची लेखापरीक्षा केली पाहिजे. आणि ते लेखे व त्यासंबंधी शिल्लक रक्कमांच्या पडताळणीचा निकाल याविषयी अहवाल सादर केला पाहिजे. व 5(4) नुसार महानगरपालिकेच्या मुख्यलेखापरीक्षकाने स्थायी समितीशी विचारविनिमय करुन आणि महानगरपालिकेने कोणत्याही निदेशाच्या अधीन राहुन महानगरपालिकेच्या लेख्यासंबंधी आपले अहवाल ज्या नमुन्यात व ज्या रीतीने तयार करावयाचे तो नमुना व रीत ठरवली पाहिजे, आणि असे अहवाल तयार करण्यासाठी आवश्यक असलेली कोणतीही माहिती पुरविण्याविषयी महानगरपालिकेच्या कोणत्याही अधिका-यास फर्माविण्याचा मुख्यलेखापरीक्षकांना अधिकार असेल. त्याप्रमाणे लेखापरीक्षण अहवाल तयार करुन महानगरपालिकेस सादर करणे आवश्यक आहे. परंतु अधिनियमानुसार नेमून दिलेले कामकाज मुख्य लेखापरीक्षकाकडून करुन घेतले जात नाही. मा. आयुक्त यांचे आदेश क्र.मनपा/स्थावि/1/400/2013-14 सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका दि.30/9/2013 चे अवलोकन केले असता सदर आदेशान्वये लेखापरीक्षण विभागाचे नियंत्रण अधिकारी म्हणुन उपायुक्त (सांगली) यांना जाहीर केले आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनिमय 1949 चे कलम 47 (1) नुसार मुख्य लेखापरीक्षकाने नगरपालिका निधीच्या लेखापरीक्षेसंबंधी महानगरपालिकेकडुन, स्थायी समितीकडुन जी अन्य कर्तव्य पार पाडण्याविषयी त्यास फर्माविण्यात येईल ती कर्तव्य पार पाडणे आवश्यक असताना,स्थायी समितीऐवजी त्यास उपायुक्त यांचे अधिनस्त कामकाज करणेचा आयुक्त यांनी दिलेला आदेश अधिनियमाशी विसंगत असल्याचे दिसून येते.

4)मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनिमय 1949 चे अनुसूची ड प्रकरण 3 मधील दोन नुसार मुख्य लेखापरीक्षक हे पद स्थायी समितीस जबाबदार असल्याने आयुक्तांनी मुख्य लेखापरीक्षक यांना उपायुक्त सांगली यांचे नियंत्रणाखाली काम करण्याचे काढलेले आदेश अधिनियमाशी पुर्णपणे विसंगत आहेत. कारण

ज्या अधिका-यांनी केलेल्या कामांचे मुख्य लेखापरीक्षक यांनी लेखापरीक्षण करावयाचे आहे त्यांचेच नियंत्रणाखाली मुख्य लेखापरीक्षक पद ठेवल्याने लेखापरीक्षणाचे काम प्रभावीपणे होणेमध्ये बाधा निर्माण झाली आहे.

5)मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 105 (1) नुसार नगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाने महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहीक तपासणी व लेखापरीक्षा करुन अहवाल स्थायी समितीकडे पाठविणे आवश्यक आहे. परंतु मुख्यलेखापरीक्षकास त्याऐवजी महानगरपालिकेच्या विविध विभाग प्रमुखाकडुन विकास कामांच्या खर्चाचे प्रस्ताव सक्षम प्राधिका-याचे अंतिम मान्यतेपुर्वी वित्तिय सल्ल्यासाठी पाठविण्यात येतात व त्याच्या शिफारशी नंतरच अन्य सक्षम प्राधिका-याची त्या प्रकरणास मान्यता होवुन ते काम करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यामुळे मुख्य लेखापरीक्षकांना निर्णय प्रक्रीयेचा भाग केल्याचे स्पष्ट होते. मुख्य लेखापरीक्षकांनी पुर्व मान्यता दिलेल्या प्रकरणांचे काम पुर्ण झाल्यानंतर पुन्हा लेखापरीक्षण करणे ही बाब त्यास अधिनियमाने नेमुन दिलेल्या कर्तव्यांचे विरुध्द आहे.

6)मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 106 (3) नुसार नगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाने प्रत्येक सरकारी वर्ष सुरू झालेनंतर शक्य तितक्या लवकर, मागील सरकारी वर्षाच्या संपूर्ण लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समितीकडे पाठविणे आवश्यक आहे..

7) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 106 (3) नुसार नगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाने प्रत्येक सरकारी वर्ष सुरू झालेनंतर शक्य तितक्या लवकर, मागील सरकारी वर्षाच्या संपूर्ण लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समितीकडे पाठविणे आवश्यक आहे. परंतु 2012-13 या आर्थिक वर्षाचे लेखे मुख्य लेखापरीक्षकाकडून तपासून स्थायी समितीच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आलेले नाहीत. अर्धसमास ज्ञापन क्र.28 दि.27/5/2014 रोजी निर्गमित केला असुन मुख्यलेखापरीक्षक यांनी त्याचे अनुपालन दि.09/09/2014 रोजी सादर केले आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये मुख्य लेखाधिकारी यांचे कडुन 2012-13 या आर्थिक वर्षाच्या लेख्यांचे अंतिमिकरण न झाल्याने लेख्यांची अंतिम तपासणी केली नसलेचे नमुद आहे.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 28 | 27/05/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |
|---|---|

| 128 | महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम 1975 च्या नियमाप्रमाणे वृक्ष प्राधिकरण समितीच्या बैठका होत नसल्याबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 34 | उद्यान | मनपा | 9ङ | 04 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम 1975 च्या नियम क्र.8(3) (ख) अन्वये झाड तोडण्यासाठी दिलेल्या परवानगीचा अहवाल वृक्ष प्राधिकरण समितीने महानगरपालिकेस 6 महिन्यातुन एकदा सादर करणे आवश्यक असता, उद्यान विभागाने याबाबतचा अहवाल महानगरपालिकेस सादर केलेला नाही.

सांगली,मिरज आणि कुपवाड महानगरपालिकेच्या उद्यान विभागाने महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम 1975 च्या नियम 3(1) अन्वये कमीत कमी 5 आणि जास्तीत जास्त 15 व्यक्तिंची एक वृक्ष प्राधिकरण समिती गठीत केली आहे. महानगरपालिकेच्या उद्यान विभागाच्या महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम 1975 च्या नियमाप्रमाणे ठेवलेल्या दप्तराची तपासणी करून अर्धसमास ज्ञापन क्र.58 दि.11/06/2014 निर्गमित करण्यात आला होता. त्याचे अनुपालन दि. 16/06/2014 रोजी उद्यान विभागाने सादर केले आहे. आलेले अनुपालन तपासून खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)नियम क्र.4(1) अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीची बैठक प्रत्येक महिन्यात मा. अध्यक्ष ठरवतील अशा ठिकाणी व वेळी घेण्यात येणे आवश्यक आहे. सदर वृक्ष प्राधिकरण समितीच्या बैठका दर महिन्याला होणे आवश्यक आहे. उद्यान विभागाने दिलेल्या अनुपालनामध्ये व नोंदवहीमध्ये वृक्ष प्राधिकरण समितीच्या बैठका वर्षातुन दोनच झाल्याचे नमुद आहे. महिन्यातुन एक बैठक घेण्याची कार्यवाही करण्यात आली नसल्याचे स्पष्ट होते.

2)वृक्षतोड परवाना नोंदवहीची तपासणी केली असता 2012-13 या आर्थिक वर्षात एकुण 13 अर्जदारांना 24 झाडे तोडण्यास परवानगी दिली असुन सदर प्रकरणी नियम क्र.8(5) अन्वये अर्जदाराने झाड

| |
|---|
| तोडल्याच्या जागी अथवा अन्य योग्य जागी त्याच जातीचे अथवा स्थानिक जातीचे झाड लावणे बंधनकारक आहे. अशा प्रकारे एकुण 155 नविन झाडे उद्यान विभागाने संबंधिताकडुन लावुन घेतली असुन झाडे जगविण्याचे हमी पोटी व येणाऱ्या खर्चापोटी महानगरपालिकेकडे रु.52200/- जमा करुन घेतले आहेत. परंतु सदर झाडे सुस्थितीत असल्याची खात्री उद्यान विभागाने करणे आवश्यक असता ती केलेली नाही.<br><br>3)नियम क्र.8(3) (ख) अन्वये झाड तोडण्यासाठी दिलेल्या परवानगीचा अहवाल वृक्ष प्राधिकरणाने महानगरपालिकेस 6 महिन्यातुन एकदा सादर करणे आवश्यक आहे. उद्यान विभागाने दिलेल्या अनुपालनामध्ये याबाबतचा अहवाल महानगरपालिकेस सादर केला नसल्याचे मान्य केले आहे.<br><br>4)नियम क्र.7(च) अन्वये फुले, फळे, भाज्या, झाडे किंवा रोपे यांची प्रदर्शने (वर्षातुन किमान एकदा) आयोजित करणे व अशी प्रदर्शने आयोजित करण्यासाठी खाजगी व सार्वजनिक संस्थाना सहाय्य करणे आवश्यक आहे. परंतु अशा प्रकारची प्रदर्शने उद्यान विभागाने आयोजित केलेली नाहीत. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 58 | 11/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 129 | वाहतुक भत्त्याच्या चुकीची आकारणी बाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 02 | सा.प्रशासन | मनपा | 9ब | 02 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | 9600 | | |

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिके कडील माहे फेब्रुवारी 2013 च्या वेतन देयकाची तपासणी केली असता प्रतिनियुक्तीवरील व इतर अधिका-यांना/कर्मचा-यांना कमी जास्त प्रमाणात वाहतुक भत्ता आदा केला आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिके कडील माहे फेब्रुवारी 2013 च्या वेतन देयकाची तपासणी केली असता प्रतिनियुक्तीवरील अधिकारी, पाणी पुरवठा कर्मचारी, कर विभाग व अग्निशमन इत्यादी विभागातील खालील कर्मचाऱ्यांना पुढीलप्रमाणे कमी-जादा दराने वाहन भत्ता देण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव पदनाम | ग्रेड वेतन | देय वाहन भत्ता | आदा वाहन भत्ता |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.स.का.साळवी नगररचनाकार | 5400/- | 800/- | 1600/- |
| 2 | श्री.आय.ए.यल्लाप्पा गौडर. शाखा अभि.पा.पु. MGP प्रति नियुक्ती. | 5400/- | 800/- | 200/- |
| 3 | श्री. बी.एस.महाजन | 5400/- | 800/- | 200/- |

निवासस्थानापासून कर्तव्य स्थानापर्यंतच्या प्रवासावरील खर्चाची त्यांना भरपाई म्हणून शासनाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना वाहतुक भत्ता मंजूर केला आहे. शासन निर्णय क्र.वाहभ / 2009 / प्र.क्र.78 / सेवा-5 दि.05.04.2010 अन्वये त्यात सुधारणा केली होती. त्याप्रमाणे अ-1, अ वर्ग शहरे सोडून इतर ठिकाणामध्ये, सांगली मिरज कुपवाड या शहरांचा समावेश होत असल्याने या शहरातील रु.5400/- व त्या पेक्षा अधिक ग्रेड वेतन असणाऱ्या पात्र अधिकाऱ्यांना रु.800/- वाहतुक भत्ता मंजुर करणे आवश्यक असता रु.1600 प्रमाणे वाहतुक भत्ता आदा केल्याने रु.9600/- चे अतिप्रदान झाले आहे सदर रु.9600/- वसूलपात्र आहे. कमी वाहतुक भत्ता आदा केल्या बद्दल समर्पक खुलासा विभागाने सादर केलेला नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र.113 दि.28/07/2014 चे अनुपालन आस्थापना विभागाने सादर केलेले नाही.

वसुलपात्र रक्कम रु. 9600/-

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 113 | 28/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| Auditor's ID | DATRNDM7201 |
|---|---|

| 130 | सेवाकर, घसारा निधी, रोकडवही व बँक ताळमेळ बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 07 | लेखा | मनपा | 9ब | 03 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 10478486 | | | |

वसंतदादा शेतकरी सहकारी बँक ही अवसायनात असल्यामुळे महानगरपालिकेच्या घसारा निधीची रक्कम रु.1,04,78,486/- बँकेमध्ये सन २००८ पासून अडकुन पडली आहे. सहकारी बँकेत रक्कम गुंतवल्यामुळे महानगरपालिकेचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. सदर बाब न्यायप्रविष्ठ आहे. महानगरपालिकेने दुसरा घसारा निधी निर्माण केला नाही.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेकडे वेतन राखीव निधी ठेवण्यात आला आहे. त्याच्या रोकडवहीची तपासणी केली व अर्धसमास पत्र क्र.114 दि.28/07/2014 अन्वये ज्ञापन दिले त्याचे अनुपालन लेखा विभागाने दि.01/10/2014 रोजी दोन महिने विलंबाने सादर केले आहे. याबबत लेखापरीक्षणाचे खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1)सेवा कर, घसारा निधीची रोकडवही महापालिकेने पेन्शन फंड कॅशबुक या नमुन्यात ठेवली आहे.

2)सदर नोंदवहृयामध्ये मार्च अखेर बँक ताळमेळ घेण्यात आला असता, खालील प्रमाणे उणिवा आढळुन आल्या आहेत.

**अ)** परंतु सेवाकराची चलने आली नाहीत म्हणून रु.4248/- रक्कम रोकडवहीस घेतली नाही असे बँक ताळमेळ मध्ये नमूद आहे. परंतु सदर बाबतीत लेखा संहिता 1971 चे नियम 32 (2) प्रमाणे जमा व वसुलीच्या नोंदी दररोज नोंदवहीत नोंदली पाहिजेत .

**ब) घसारा निधी**.

घसारा निधी नोंदवहीत खालील प्रमाणे मार्च 2013 अखेर बँक ताळमेळ नोंदवला आहे.

रोकडवही नुसार शिल्लक रु.1,04,78,486/-

गुंतवणुक (शेतकरी सह.बँक) रु.1,03,95,487/-

सेव्हींग खाते क्र.5707 (शेतकरी सह.बँक) रु.82,999/-

| |
|---|
| -------------------------- <br> पासबुक नुसार दि.07.01.2009 ची शिल्लक रु.82,999/- <br><br> वसंतदादा शेतकरी सहकारी बँक ही अवसायनात असल्यामुळे महानगरपालिकेच्या घसारा निधीची रक्कम रु.1,04,78,486/- बँकेमध्ये सन 2008 पासून व्याजाशिवाय अडकुन पडली आहे. सहकारी बँकेत रक्कम गुंतवल्यामुळे महानगरपालिकेचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. सदर बाब न्यायप्रविष्ठ आहे. महानगरपालिकेने दुसरा घसारा निधी निर्माण केलेला नाही. <br> 3)सेवाकराची चलने मालमत्ता विभागाकडून वेळेत न आल्याने रक्कम रु.4248/- दि.31/12/13 व दि.27/01/14 रोजी अनुक्रमे रु.2535/- व रु.1713/-उशिराने जमेस घेतली आहेत. यावरुन रक्कम नियमाप्रमाणे दररोज लेखा विभागाकडील रोकडवहीस जमा होत नसलेचे स्पष्ट होते. वसंतदादा सह. शेतकरी बँकेत घसारा निधीची रक्कम आडकल्यामुळे नविन घसारा निधी निर्माण करण्याची कार्यवाही सुरु असलेचे अनुपालनामध्ये नमुद आहे. परंतु घसारा निधी निर्माण केलेला नाही. <br> **वसूलपात्र रक्कम रु. 1,04,78,486/- + ( व्याज )** |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 114 | 28/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |
|---|---|

| 131 | वेतन राखीव निधी नियमाप्रमाणे ठेवला नसले बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 07 | लेखा | मनपा | 9ब | 04 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

| |
|---|
| लेखा संहिता 1971 चे नियम 101 (1) नुसार नमुना क्रमांक 74 प्रमाणे दर वर्षी 1 डिसेंबर, रोजी |

असलेल्या आस्थापना विवरण पत्राप्रमाणे वेतन राखीव निधी ठेवणे आवश्यक आहे. डिसेंबर 2012 च्या आस्थापना वेतन खर्चा प्रमाणे माहे डिसेंबर 2012 चे एकूण वेतन रु.4,05,73,343/- असल्याने सदरचा वेतन राखीव निधी तीन महिन्याचे वेतना एवढा ठेवणे आवश्यक असल्याने या निधीमध्ये रु.12,17,20,029/- एवढा असणे आवश्यक असता या निधीमध्ये रु.3,64,95,223/- शिल्लक असुन त्यापैकी रु.3,00,44,602/- हे आवसायनात असलेल्या वसंतदादा शेतकरी बँकेत असल्याने प्रत्यक्षात रु.64,50,621/- एवढीच रक्कम वापरण्या योग्य आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेकडे वेतन राखीव निधी ठेवण्यात आला आहे. त्याच्या रोकडवहीची तपासणी केली व अर्धसमास पत्र क्र.115 दि.28/07/2014 अन्वये ज्ञापन दिले असून त्याचे अनुपालन लेखा विभागाने दि.04/10/2014 रोजी दोन महिने विलंबाने सादर केले आहे. याबबत लेखापरीक्षणाचे खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता लेखा संहिता 1971 चे नियम 101 (1) नुसार वेतन राखीव निधी लेखा नमुना क्रमांक 73 नुसार ठेवला पाहिजे व या निधीस द्यावयाची अंशदाने अनुसूची व्दारे पुष्टी देण्यात आलेल्या व नमुना क्रमांक 04 प्रमाणे असलेल्या प्रमाणकाव्दारे काढली पाहिजे असे असताना सदरचा निधी पेन्शन फंड कॅशबुक या नमुन्यातील नोंदवहीत ठेवला आहे. अनुपालनामध्ये नियमानुसार विहित नमुन्यामध्ये निधी ठेवला नसल्याचे मान्य केले आहे. परंतु नमुना क्रमांक 73 मध्ये लेखा ठेवुन लेखापरिक्षणास दाखविण्यात आलेला नाही.

सदर नोंदवही व बँक पासबूकानुसार मार्च 13 अखेर रक्कम शिल्लक असून त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| 1) शेतकरी बँक सेव्हींग खाते (खाते क्रमांक 190) | रु.2602.05/- |
| 2) शेतकरी बँक गुंतवणुक | रु.3,00,42,000/- |
| 3) बँक ऑफ महाराष्ट्र सेव्हींग खाते (खाते क्रमांक 20050040830) | रु.61,44,846/- |
| 4) स्टेट बँक ऑफ इंडिया- गुंतवणुक | रु.3,05,775/- |
| एकूण | रु.3,64,95,223.05/- |

वेतन राखीव निधीतील रु.30042000/- शेतकरी बँकेत गुंतवणुक स्वरुपात व रु.2602.05/- सेव्हींग खातेवर शिल्लक आहे. परंतु बँक अवसायनात गेल्यामुळे सदर रक्कमेचा उपयोग महानगरपालिकेस आवश्यक त्या वेळी होत नाही.

1)शेतकरी बँकेतील गुंतवणुक रु.3,00,42,000/- च्या गुंतवणुक पावत्या पहावयास मिळाल्या सदर गुंतवणुका 2005 ते 2006 या कालावधीतील आहेत. परंतु त्याची गुंतवणुक नोंदवही लेखापरीक्षणास

| |
|---|
| उपलब्ध केली नाही. सदरची बँक अवसायनात असल्याने त्यावरील व्याज, पुनर्गुंतवणुकची नोंद रोकडवहीस नमुद नाही. अनुपालनामध्ये गुंतवणुक नोंदवही दाखविण्याची दक्षता घेत असल्याचे नमुद आहे. परंतु गुंतवणुक नोंदवही लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नाही.<br>2)स्टेट बँक ऑफ इंडिया मधील गुंतवणुक रु.3,05,775/- ची गुंतवणुक पावती व गुंतवणुक नोंदवही लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही. सदर गुंतवणुक तात्कालिन नगरपालिका असल्याचे कालावधीत करण्यात आल्याचे नमुद आहे. पावत्या ताब्यात घेण्याची कार्यवाही चालु असल्याचे नमुद आहे. गुंतवणुक पावत्या लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेल्या नाहीत.<br>3)बँक ऑफ महाराष्ट्र मधील सेव्हींग खाते क्रमांक 20050040830 मध्ये डिसेंबर 2012 अखेर रु.6144846/- शिल्लक होते. त्यापैकी दि.20.09.2012 रोजी 6000000/- या निधीमध्ये जमा झाले आहेत. परंतु लेखापरीक्षण सुरु असेपर्यंत सदरची रक्कम दीर्घ मुदत ठेवीच्या स्वरुपात गुंतवणुक केली नसल्याने सदर शिल्ल्क रक्कमेवर सेव्हींग खातेच्या दराने दर सहा महिन्यास रु.121000/- व्याज मिळत आहे. सदर रक्कम योग्य नियोजन करून एक वर्षाचे मुदत बंद ठेवीमध्ये गुंतवणुक केली नसलेने 9 टक्के व्याजदराने वार्षिक रु.6144846 X 9% प्रमाणे रु.5,53,036/- - रु.1,21,000/- = रु.4,32,036/- चे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते. अनुपालनामध्ये या पुढे गुंतवणुकीबाबत योग्य दक्षता घेण्याचे नमुद आहे. उत्तर संयुक्तिक वाटत नाही.<br>4)नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 101 (1) नुसार नमुना क्रमांक 74 प्रमाणे दर वर्षी 1 डिसेंबर, रोजी असलेल्या आस्थापना विवरणपत्राप्रमाणे वेतन राखीव निधी ठेवणे आवश्यक आहे व त्याची भरपाई / प्रतिपुर्ती काटेकोरपणाने केली पाहिजे. परंतु महानगरपालिकेने बऱ्याच वर्षापासून सदर निधीमध्ये आवश्यक ती रक्कम ठेवली नसल्याने सदर निधीकडे महानगरपालिकेचे पुर्णत: दुर्लक्ष झालेचे दिसुन येते. डिसेंबर 2012 च्या आस्थापना वेतन खर्चा प्रमाणे माहे डिसेंबर 2012 चे एकूण वेतन रु.4,05,73,343/- असल्याने त्यानुसार तीन महिन्याचे वेतना एवढा वेतन राखीव निधी ठेवणे आवश्यक असल्याने या निधीमध्ये रु.12,17,20,029/- एवढा निधी असणे आवश्यक आहे. परंतु 2013 अखेर रु.3,64,95,223/- शिल्लक असुन त्यापैकी रक्कम रु.3,00,44,602/- हे आवसायनात असलेल्या वसंतदादा शेतकरी बँकेत अडकून पडल्याने प्रत्यक्षात रु.64,50,621/- एवढीच रक्कम वापरण्या योग्य आहे. त्यामुळे वेतन राखीव निधी रु.11,52,69,408/- एवढ्या रक्कमेने कमी असल्याचे आढळुन आले. तरी, आता योग्य ती रक्कम सदर निधीकडे वर्ग करणे आवश्यक आहे . |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 115 | 28/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |
|---|---|

| 132 | निवृत्ती वेतन अंशदान निधी ठेवला नसले बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 07 | लेखा | मनपा | 9ब | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 नियम क्रमांक 136 नुसार निवृत्तीवेतन अंशदान निधी स्थापन केलेला नाही व स्वतंत्र बँक खातेही ठेवलेले नाही.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कर्मचारी अंशदान निधीचे लेखापरीक्षण केले असता, खालील उणिवा आढळुन आल्या.

1)महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 चे नियम क्रमांक 136 (1) नुसार महानगरपालिका कर्मचाऱ्यांना देय असणाऱ्या निवृत्ती वेतनासाठी, पदाच्या सरासरी खर्चाच्या एकनवमांश एवढे अंशदान निवृत्ती वेतन निधी मध्ये जमा करणे क्रमप्राप्त आहे. महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 नियम क्रमांक 136 नुसार निवृत्तीवेतन अंशदान निधी स्थापन केलेला नाही व स्वतंत्र बँक खातेही ठेवलेले नाही. सदर बाब गंभीर असून, त्वरीत निवृत्ती वेतन अंशदान निधी स्थापन करून प्रत्येक महिन्याला निवृत्ती अंशदान रक्कम बँकेमध्ये जमा करण्यात यावी. सध्या सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका निवृत्ती वेतन धारकांना देय असलेले निवृत्ती वेतन महानगरपालिकेच्या सर्वसाधारण जमा खात्यामधून प्रत्येक महिन्याला आदा करीत आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र.116 दि.28/07/2014 चे अनुपालन लेखा विभागाने दि.20/10/2014 रोजी सादर केले असुन निवृत्तीवेतन अंशदान निधी स्थापन केला नसल्याचे मान्य केले आहे.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 116 | 28/07/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRNDM7201 |
|---|---|

| 133 | सुधारित आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत दिलेल्या लाभामधील अनियमितते बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 02 | सामान्य प्रशासन | मनपा | 9ड | 03 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

आयुक्त महानगरपालिका यांचे आश्वासित प्रगती योजना आदेशातील अट क्रमांक 5 मध्ये महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील जात पडताळणी संदर्भातील शासन निर्णय क्र. बीसीसी /2011/प्र.क्र. 1064 /2011/16-ब मंत्रालय, मुंबई दि.12.12.2011 मधील अटी व शर्तीस अधिन राहून प्रस्तुतचा लाभ देण्यात आलेला आहे. त्यानुसार राखीव प्रवर्गातील कर्मचारी यांनी 6 महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील अन्यथा सदर लाभ अपोआप संपूष्टात येईल असे नमुद आहे. परंतु जात वैध्ता प्रमाणपत्र लेखापरीक्षणास दाखविली नसल्याने दिलेला लाभाची रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेने 2012-2013 या वित्तीय वर्षात महापालिकेच्या पुढील तपशिलात नमुद आदेशा प्रमाणे परिशिष्ठ क्र. (11) मधील नमुद कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वेतन 1169/प्र.क्र.44/सेवा-3/ दि.01.04.2010 नुसार सुधारित सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | आयुक्त यांचेकडील आदेश क्रमांक | कर्मचारी संख्या |
|---|---|---|
| 1 | मनपा आयुक्त आदेश क्र. 67 दि.09.08.2012 | 9 |
| 2 | मनपा आयुक्त आदेश क्र. 382 दि.09.08.2012 | 20 |
| 3 | मनपा आयुक्त आदेश क्र. 405 दि.21.08.2012 | 40 |
| 4 | मनपा आयुक्त आदेश क्र. 406 दि.21.08.2012 | 2 |

| | | |
|---|---|---|
| 5 | मनपा आयुक्त आदेश क्र. 771 दि.07.01.2013 | 3 |
| 6 | मनपा आयुक्त आदेश क्र. 901 दि. 19.03.2013 | 128 |
| 7 | मनपा आयुक्त आदेश क्र. 95 दि.26.03.2013 | 11 |
| | एकूण | 219 |

याबाबत लेखापरीक्षणात पुढील प्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येत आहेत.

14. वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांक वेतन 1109/प्र.क्र.41/सेवा-3 मंत्रालय मुंबई दि.05.07.2010 मधील 5 (4) नुसार उपरोक्त योजनेचा पहिला अथवा दुसरा लाभ मंजुर केल्यानंतर 6 वर्षानी कर्मचाऱ्याच्या गोपनिय अहवालाची तपासणी करण्यात यावी. या 6 वर्षातील त्यांच्या गोपनीय अहवालातील त्याचा अनुकुल असलेल्या कोणत्याही 3 गोपनीय अहवालांचे सरासरी पहिल्या लाभाच्या प्रकरणी 'ब' (चांगली) व दुसऱ्या लाभाच्या प्रकरणी 'ब+' (निश्चित चांगली) असणे आवश्यक राहिल. असे असता महानगरपालिकेने उपरोक्त योजनेचा लाभ देताना संबंधित लाभार्थीच्या प्रस्तावात उक्त शासन निर्णया नुसार गोपनीय अहवालाची प्रतवारी नमूद केलेली नाही.

15. आयुक्त मनपा यांचे उपरोक्त आदेशातील अट क्रमांक 5 मध्ये महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील जात पडताळणी संदर्भातील शासन निर्णय क्र.बीसीसी/2011/प्र.क्र. 1064/2011/16-ब मंत्रालय मुंबई दि.12.12.2011 मधील अटी व शर्तीस अधिन राहून प्रस्तुतचा लाभ देण्यात आलेला आहे. त्यानुसार राखीव प्रवर्गातील कर्मचारी यांनी 6 महिन्याचे आत जात वैद्यता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील अन्यथा सदर लाभ अपोआप संपूष्टात येईल असे नमुद केले आहे. तथापी आयुक्त यांचेकडील आदेश क्रमांक 67 दि.17.07.2012 मध्ये 2 कर्मचारी, आदेश क्रमांक 362 मधील 15 कर्मचारी , आदेश क्रमांक 405 मधील 40 कर्मचाऱ्यांनी जाने 2013 पर्यंत जात वैद्यता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक होते. तसेच आदेश क्र.406 मधील 1 कर्मचाऱ्याने माहे फेब्रुवारी, 2013 पर्यंत जात वैद्यता प्रमाणपत्र सादर सादर करणे आवश्यक होते. परंतु सदर कर्मचाऱ्यांची जात वैद्यता प्रमाणपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे उपरोक्त कर्मचाऱ्यांना योजनेचा लाभ दिले पासून झालेल्या जादा अदायगीची 31.03.2013 पर्यंतची रक्कम परिगणित करुन वसुल करण्यात यावी.

16. आयुक्त यांचेकडील उपरोक्त आदेशातील अट व शर्त क्रमांक 3 नुसार या योजने अंतर्गत वरिष्ठ वेतन श्रेणी अनुज्ञेय झालेल्या दिनांकापासूनच्या कर्मचाऱ्यास देय होणाऱ्या फरकाची रक्कम ही अंदाजपत्रकीय तरतूदीनुसार व महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीनुसार प्रशासनाने ठरवून

| |
|---|
| दिलेल्या मुदतीत टप्प्या टप्प्याने संबंधित कर्मचाऱ्यास देय राहील असे नमुद आहे. परंतु महानगरपालिकेने फरक आदाईस किती टप्पे ठरविले आहेत व कधीपासुन फरक रक्कम देण्यात आली याबाबतचे लेखे लेखापरीक्षणास देण्यात आलेले नाहीत.<br><br>अर्धसमास ज्ञापन क्र.63 दि.20/6/2014 चे अनुपालन आस्थापना विभागाने लेखापरीक्षणास सादर केलेले नाही. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 63 | 20/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRVVM5901 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 134 | बांधकाम परवानगी पासून एका वर्षालगतच्या वर्षा पासून कर आकारणी केली नसले बाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 11 | करनिर्धारण व संकलन | मनपा | 9ब | 01 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | 109776 | | |

| |
|---|
| बांधकाम विकास नियंत्रण नियमावली नियम 7 (2) तसेच बांधकाम परवानगी आदेश अट क्र. 2 नुसार एक वर्षामध्ये बांधकाम पुर्ण करणे आवश्यक आहे. अथवा परवानगीचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे. खालील प्रकरणी परवानगी दिलेनंतर पुढील वर्षापासून कर निर्धारण करणे आवश्यक असता तशी कर आकारणी न करता ज्या वर्षात करनिर्धारण प्रकरण आले त्याच वर्षापासून कर निर्धारण केल्याने |

| |
|---|
| रु.109776/- एवढा कमी प्रमाणात कर वसुल झाला आहे. |

| |
|---|
| 1)सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सन 2012-2013 या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणावेळी कुपवाड विभागाकडील कर निर्धारणाच्या निवडक प्रकरणांची पडताळणी करता विकास नियंत्रण नियमावली नियम 7 (2) तसेच बांधकाम परवानगी आदेश अट क्र.2 नुसार बांधकाम पुर्ण करणे आवश्यक आहे. अथवा परवानगीचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे. परंतु परिशिष्ठ क्र. (03) मध्ये नमुद केल्या प्रकरणी बांधकाम परवानगीचे नुतनीकरण केली नसल्याचे अढळुन आले आहे. अशा प्रकरणी परवानगी दिलेपासून एक वर्षानंतरच्या पुढील वर्षापासून कर निर्धारण करणे आवश्यक असता तशी कर आकारणी न करता ज्या वर्षात करनिर्धारण प्रकरण आले त्याच वर्षापासून कर निर्धारण केल्याने कमी प्रमाणात कर वसुल झाला आहे. कमी प्रमाणात वसुल केलेली कराची सदर रक्कम रुपये 109776/- वसुल होणे आवश्यक आहे. तसेच अशा प्रकरणाच्या अन्य प्रकरणांचा शोध घेवून कमी प्रमाणात कर वसुल झाला असल्यास त्याची वसुली करून अनुपालन दाखवावे.<br>अर्धसमास ज्ञापन क्र.63 ,दि.20/6/2014 चे अनुपालन घरपट्टी विभागाने दि.01/08/2014 रोजी लेखापरीक्षणास सादर केले आहे. सदर इमारतीस मिळकतधारकांनी बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र घेतलेनंतर व बांधकाम पुर्ण केलेनंतर कर आकरणी केलेचे नमुद आहे. बांधकाम परवानगीचे नुतनीकरण केलेले नाही. त्यामुळे अनुपालन संयुक्तिक नसल्याने अमान्य करण्यात येत आहे.<br>**वसुलपात्र रक्कम रु.109776/-** |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 64 | 19/06/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATRVVM5901 |

| | |
|---|---|
| 135 | आर. सी. सी. उंच टाक्यांचे डिझाईन करणे, बांधणे, अस्तित्वातील शीर्ष कामांचे बळकटीकरण करणे, क्षमता वाढविणे इत्यादी कामातील अनियमिततेबाबत. |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव |
| | सुजल निर्मल अभियान. |

| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 06 | पाणी पुरवठा | राज्य | 9ब | 09 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 2235461 | 7075 | | |

मंजुर डी.पी.आर व निविदेची तपासणी केली असता रु.2235461/- किंमतीच्या बाबींचा समावेश डी.पी.आर. मध्ये नाही. परंतू निविदेत समावेश केला आहे. निविदा सूचना निर्गमित करण्यापूर्वी निविदेतील कामाच्या बाबींचे वर्किंग एस्टिमेट तयार करून त्यास तांत्रिक मंजुरी घेतलेनंतर निविदा डॉक्युमेंट तयार न करताच निविदा बोलाविण्यात आलेल्या आहेत. निविदेची मुदत दि.22/02/2012 रोजी संपली असुन दि. 7/01/2013 अखेर 48.15% एवढेच काम झालेने मुदतीत काम पूर्ण झाले नसल्याबाबत कंत्राटदारावर बी-1 टेंडर नियमानुसार दंडनीय कार्यवाही करणेत आलेली नाही.

महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र. सुनिअ- 2010/प्र.क्र.460/ पापु-22, दिनांक 23 नोव्हेंबर, 2010 अन्वये महाराष्ट्र सुजल निर्मल अभियानांतर्गत सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या 24/7 पाणीपुरवठा योजनेच्या रुपये 29.85 कोटी ढोबळ किंमतीच्या भाग-अ मधील 13 कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रात सुजल निर्मल अभियान राबविण्याबाबत महासभा ठराव क्र. 102, दिनांक 18 डिसेंबर, 2008 अन्वये ठराव मंजूर करून मा. आयुक्तांना यासंदर्भात महाराष्ट्र शासनाबरोबर करार करण्याबाबत अनुमती देण्यात आली आहे.

सुजल निर्मल अभियान योजनेंतर्गत करावयाच्या कामांकरिता 6 पॅकेज मध्ये एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट व्दारे इच्छुक कंत्राटदारांकडून शॉर्टलिस्ट बनविण्याकरिता निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याकरिता दैनिक इंडियन एक्सप्रेस व दैनिक पुढारी या वृत्तपत्रांमध्ये दिनांक 27/03/2010 रोजी जाहिरात देण्यात आली होती. दिनांक 27/04/2010 पर्यंत इच्छुक कंत्राटदारांनी आपला एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट कळविल्यानंतर शॉर्टलिस्ट बनविण्यात आली. मूळ प्रस्तावानुसार 6 पॅकेज मध्ये निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतु शॉर्टलिस्टिंग, गुणवत्ता, तांत्रिक क्षमता विचारात घेऊन 6 पॅकेजच्या कामांचे 3 गट

तयार करण्यात आले.

प्रस्तुत कामाची लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करण्यात आलेली पत्रव्यवहार नस्ती, निविदा दस्तऐवज तपासणी करण्यात आली त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

कामाचे नाव : आर. सी. सी. उंच टाक्यांचे डिझाईन करणे, बांधणे, अस्तित्वातील शीर्ष कामांचे बळकटीकरण करणे, क्षमता वाढविणे, उंच टाक्यांची दुरुस्ती करणे, तसेच अस्तित्वातील फिडर-मेन व वितरण व्यवस्था यांची क्षमता वाढविणे व सुधारणा करणे.

कामाची अंदाजित किंमत : रुपये 1031.95 लक्ष [रुपये 10,31,95,932) (अंदाज पत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दर अनुसूची सन 2009-10 प्रमाणे तयार करण्यात आले आहे)

1) हिराबाग येथे मुख्य संतुलन पाण्याची टाकी बांधणे : रुपये-137.04 लक्ष

2) शामरावनगर येथे पाण्याची उंच टाकी बांधणे : रुपये- 99.46 लक्ष

3) हिराबाग झोनमधील उर्ध्ववाहिनी टाकणे : रुपये- 118.40 लक्ष

4) मुख्य संतुलन टाकीपासून गुरुत्ववाहिनी टाकणे : रुपये - 500.15 लक्ष

5) हिराबाग ते शामरावनगर पाईपलाईन टाकणे : रुपये- 176.90 लक्ष

एकूण : रुपये- 1031.95 लक्ष

सदर कामाबाबत दैनिक इंडियन एक्सप्रेस व दैनिक लोकमत या वृत्तपत्रांमध्ये दिनांक 27/03/2010 रोजी जाहिरात देण्यात आली होती. दिनांक 27/04/2010 पर्यंत इच्छुक कंत्राटदारानी आपला एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट कळविल्यानंतर शॉर्टलिस्ट बनविण्यात आली. त्यास स्थायी समिती ठराव क्र. 126, दिनांक 12/07/2010 अन्वये मंजुरी देण्यात आली आहे.

निविदा सूचनेस प्रतिसाद दिलेल्या पात्र ठेकेदारांमध्ये 1) मे. शशांक जाधव मिरज 2) मे. सुरिंद्र इंजिनिअरिंग कं. लि. मुंबई 3) मे. एस.एम.सी. इन्फ्रा. प्रा. लि. ठाणे 4) मे. लक्ष्मी सिव्हील इंजि. सर्व्हीसेस ,कोल्हापूर यांना पात्र ठरविण्यात आले असुन त्यांचेकडून महापालिका पत्र क्र.WWD/ 258/10-11, दिनांक 2/08/2010 अन्वये लेटर ऑफ इनव्हिटेशन देऊन निविदा किंमत देण्याबाबत कळविण्यात आले. निविदा भरून सादर करण्याचा अंतिम दिनांक 7/09/2010 होता. निविदा सादर करण्याच्या दिनांकापर्यंत चार ठेकेदारांनी निविदा दर सादर केले. प्राप्त निविदांमध्ये मे. सुरिंद्र इंजिनिअरिंग कं. लि. मुंबई आणि मे. एस.एम.सी. इन्फ्रा. प्रा. लि. ठाणे यांनी प्रत्येकी निविदा अंदाजित किंमतीच्या 45.50

टक्के जादा ह्या सर्वात कमी दराच्या निविदा सादर केल्या. त्यानुसार कामाची किंमत रुपये 15,01,50,081/- (पंधरा कोटी, एक लक्ष, पन्नास हजार, एक्याऐंशी) होते ती जादा असल्याने संबधित दोन्ही ठेकेदारांना दिनांक 6/10/2010 रोजी वाटाघाटीकरिता बोलाविण्यात आले. वाटाघाटी मध्ये दोन्ही ठेकेदारांनी दिनांक 6/10/2010 च्या पत्रान्वये निविदेत देऊ केलेले दर कमी करून 15% टक्के जादा दर देऊ केले. फेर वाटाघाटीत पूर्वीच्या 15 टक्के जादा दरांमध्ये 1 टक्का कमी करून 14 टक्के दर निश्चित करण्यात आले. 14 टक्के जादा दराने कामाची किंमत रुपये 11,76,43,362/- होते.

दोन्ही ठेकेदारांनी मूळ निविदेतील दर समसमान देऊ केल्याने तसेच अंतिम वाटाघाटी मध्ये समान 15 टक्के जादा दराने काम करण्याची संमती दर्शविली. त्याचप्रमाणे फेर वाटाघाटी मध्ये सुद्धा दोन्ही ठेकेदारांनी 14 टक्के जादा दराने काम करण्याची संमती दर्शविल्याने दोन्ही ठेकेदारांमध्ये कामाची समसमान विभागणी करून देण्याचे मान्य करण्यात आले.

**स्थायी समिती ठराव :** स्थायी समिती ठराव क्र. 358 दिनांक 23/11/2010 अन्वये पॅकेज 1.1 व 1.3 साठी अंदाजित रक्कम रुपये 10,31,95,932/- मात्रचे कामी ई.ओ.आय व्दारे एकूण चार ठेकेदारांना शॉर्ट लिस्ट करण्यात आले होते. सदर चार मक्तेदारांनी विहित मुदतीत निविदा सादर केल्या, प्राप्त चार निविदांपैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक मे. एस. एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. ठाणे आणि मे. सुरिन्द्रा इंजिनिअरिंग कं. लि. मुंबई या दोन्ही ठेकेदारांनी निविदा दर एस्टिमेटपेक्षा 45.50 टक्के जादा असा दर दिला आहे. सदर दोन्ही निविदाधारकानी अंदाजित रकमेपेक्षा खूपच जादाचा दर दिला असल्याने त्यांना वाटाघाटी करिता बोलावण्यात आले असता वाटाघाटीमध्ये देऊ केलेल्या 15 टक्के जादा दरावरून 14 टक्के जादा दराने सहमती दर्शविली आहे. प्राप्त निविदा दराची तुलना केली असता प्रस्तावित कामाचे अंदाजपत्रक नोव्हेंबर 2009 च्या दरअनुसुचीवर तयार करण्यात आले असल्याने राज्य व केंद्र शासनाच्या सुधारित धोरणानुसार व्हॅट कर, कामगार कल्याण निधी, रॉयल्टी, एक्साईज ड्युटी या धोरणानुसार चालू दरसूचीनुसार सदरचा दर 9.40 टक्के जादा या दराने मे. एस. एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. ठाणे आणि मे. सुरिन्द्रा इंजिनिअरिंग कं. लि. मुंबई यांचेकडून करून घेण्यास मंजुरी देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे नविन दरसूचीनुसार सुधारित योजना तयार करून मा. शासनास प्रस्ताव सादर करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**कामाचे आदेश :** मे. एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. ली. ठाणे यांना सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका जा. क्र.मनपा/ पापुवि/ सां-612/ 10-11, दिनांक 23/12/2010 व मे. सुरिन्द्र इंजिनिअरिंग कं. लि. मुंबई यांना जा. क्र.मनपा/ पापुवि/ सां-613/ 10-11, दिनांक 23/12/2010 अन्वये कामाचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार आपले संमतीने आपणास कामाच्या विभागणीनुसार अंदाजपत्रक किंमत रुपये 10,43,11,043/- च्या अर्ध्या कामाच्या किंमत रुपये 5,32,82,000/- बाबत

आपण सादर केलेल्या अंदाजपत्रकीय किंमतीवर 14 टक्के जादा दराने होणारी किंमत रु. 6,07,41,480/- मान्य करण्यात आली आहे. कामाचे आदेशामध्ये कामाची मुदत 14 महिने नमूद करण्यात आली आहे. म्हणजे दिनांक 22/2/2012 पर्यंत आहे.

**निविदा सूचना (Bid-document) :** नुसार कामाची मुदत 12 महिने नमूद आहे.

प्रस्तुत कामापैकी मे. सुरिंद्र इंजिनिअरिंग कं. मुंबई यांना देण्यात आलेल्या कामाची पत्रव्यवहार नस्ती, कामाचे प्रदान प्रमाणक क्र. 20 दिनांक 7/01/2013, (पृ.क्र. 24 ते 38) (धावते देयक क्र. 5), मोजमाप पुस्तक क्र. 20 इत्यादीचे लेखापरीक्षणात आढळून आलेल्या अनियमितता खालीलप्रमाणे.

1) सुजल निर्मल अभियान राबविण्याबाबत महासभा ठराव क्र. 102, दिनांक 18 डिसेंबर, 2008 अन्वये ठराव मंजूर करून मा. आयुक्तांना यासंदर्भात महाराष्ट्र शासनाबरोबर करार करण्याबाबत अनुमती देण्यात आली आहे त्यानुसार महाराष्ट्र शासनाबरोबर करण्यात आलेल्या कराराची प्रत लेखापरीक्षणावेळी उपलब्ध करण्यात आलेली नाही.

2) मंजूर डी.पी. आर व निविदा बीड डाक्युमेंट यामधील बी-1 मधील कामाच्या बाबीमध्ये तफावत आढळून येते. उदा.

**I) Schedule B-1/A :** Item no. 1- Designing & Constructing R.C.C. Intake chamber of 4.00 M. Lear dia- 1 job [at] Rs. 35,76,943/- या बाबीचा समावेश डी.पी.आर मध्ये आढळून येत नाही. परंतु निविदे मध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

**II) Schedule B-1/C :** Item no. 3 - Providing Double flanged butterfly Valve Electrically operated of dia (1) 500mm [at] Rs. 6,63,176/- (2) 400mm [at] Rs. 2,09,153/- (3) 200mm [at] Rs. 1,16,002/- (4) 100mm [at] Rs. 22,166/- Total Rs. 10,10,497/- या बाबीचा समावेश डी.पी.आर मध्ये आढळून येत नाही. परंतु निविदे मध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

**III) Schedule B-1/D :** Item NO.3 - Providing double flanged butterfly Valve Electrically Operator of dia

(1) 400mm -5nos [at] Rs. 2,09,153/- Rs. 10,45,765/-
(2) 600mm -2nos [at] Rs. 4,27,801/- Rs. 8,55,602/-
(3) 300mm -1no. [at] Rs. 1,0,3815/- Rs. 1,03,815/-
(4) 200mm - 10nos [at] Rs. 19333.66 Rs. 193336.60
(5) 10mm -5nos [at]Rs. 7388.51 Rs. 36942.55

**Total Rs. 2235461/-**

या बाबीचा समावेश डी.पी.आर मध्ये आढळून येत नाही. परंतु निविदे मध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

वरील प्रमाणे रुपये 68,22,901/- (35,76,943+10,10,497+ 2235461) किंमतीच्या बाबींसाठी तांत्रिक, प्रशासकीय मंजुरी घेण्यात आलेली नाही तरी सुद्धा या बाबींचा समावेश निविदेमध्ये करण्यात आलेला आहे. अशा प्रकारे तांत्रिक/प्रशासकीय/वित्तीय मंजुरी शिवाय निविदेमध्ये समावेश करून ठेकेदाराला काम देण्यात आल्याचे दिसून येते.

3) निविदा सूचना निर्गमित करण्यापूर्वी निविदेतील कामाच्या बाबींकरिता निविदेत समाविष्ट बाबींचे वर्किंग एस्टिमेट तयार करून त्यास तांत्रिक मंजुरी घेऊन त्यानंतर निविदा डॉक्युमेंट तयार करण्याची आवश्यकता होती परंतु त्यानुसार कार्यवाही करण्याऐवजी तांत्रिक मंजुरी न घेता निविदा बोलाविण्यात आलेल्या आहेत.

4) निविदा डॉक्युमेंट नुसार कामाची मुदत 12 महिने आहे. परंतु कामाचे आदेश व करारनाम्यानुसार कामाची मुदत 14 महिने देण्यात आलेली आहे. सदर काम दोन कंत्राटदारांना विभागून देण्यात आलेले आहे. त्यानुसार कामाची मुदत सर्वसामान्यपणे कमी करण्याऐवजी कामाच्या कालावधीत वाढ झालेली आहे.

5) मे. सुरिंद्र इंजिनिअरिंग कं. लि. मुंबई आणि मे. एस.एम.सी. इन्फ्रा. प्रा. लि. ठाणे यांनी निविदा/अंदाजित किंमतीच्या 45.50 टक्के जादा सर्वात कमी दाराची निविदा सादर केली होती. त्याबाबत वाटाघाटी/ फेरवाटाघाटी मध्ये अंतिम 14 टक्के जादा दराने काम करण्यास संमती दिल्यानुसार त्यांच्या निविदा मंजूर करून काम विभागून देण्यात आले आहे. निविदेतील दर 10 टक्के पेक्षा कमी किंवा जादा असल्यास त्याबाबत निविदादाराने निविदेत देऊ केलेल्या दरांच्या समर्थनार्थ दर पृथ:करण जोडणे आवश्यक आहे. परंतु प्रस्तुत निविदे मध्ये दरांच्या समर्थनार्थ दर पृथ:करण जोडण्यात आल्याचे आढळून आले नाही. मूळ निविदेमधील 45.50 टक्के जादा दराने करावयाचे काम फेर वाटाघाटी मध्ये 14 टक्के जादा दराने करण्यास संमती देण्यात आली आहे त्यानुसार मूळ निविदेतील देऊ केलेल्या दरांमध्ये 26.50 टक्के कमी करून देकार देण्यात आलेला आहे. याबाबतचे समर्थन करण्यात आलेले नाही. निविदादाराला देकार देताना निविदेतील बाबींचे आकलन झाले नसल्यामुळे एवढ्या जादा दराने देकार देण्यात आला होता किंवा कसे याबाबत नस्ती मध्ये खुलासा आढळून येते नाही. निविदा सादर करण्यापूर्वी कामाबाबत प्री-बीड मिटींगमध्ये कामाच्या गुणवत्तेबाबत चर्चा केल्याचे आढळून येत नाही. वाटाघाटीमध्ये निविदादारांनी मूळ देकारातील बाबी/काम/पुरवठ्या बाबत विचारात घेण्यात आलेल्या बाबींच्या गुणवत्तेमध्ये फेरफार/ बदल करून त्यानुसार वाटाघाटीमध्ये दर कमी करून दिले आहेत किंवा कसे याबाबतचा उहापोह उपलब्ध पत्रव्यवहार नस्ती मध्ये आढळून आला नाही. त्यामुळे निविदादारांच्या देकाराबाबत संदिग्धता असल्याचे

दिसून येते.

6) सदर कामाचे ठेकेदार मे. सुरेंद्र इंजिनिअरिंग कं. लि. मुंबई यांना प्रमाणक क्र. 20, दिनांक 7/01/2013 (धावते देयक क्र. 5) अन्वये स्थूल रक्कम रुपये 1,11,44,571/- चे प्रदान करण्यात आले आहे. सदर देयकाची पडताळणी करता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

अ) बाब क्र. 3 : Excavation in general soil material 4.5mtr to 6.00mtr lifting मोजमाप पुस्तक 19 पृ.क्र. 29(1) वर नोंदविण्यात आल्याचे गोषवाऱ्यात नमूद आहे परंतु सदर कामाची तपशीलवार नोंद मोजमाप पुस्तक 19 पृ.क्र. 29(1) वर आढळून येत नाहीत.

ब) बाब क्र. 8 : Refilling the trenches with available excavated stuff परिमाण [(3.142 x $1.14^2$ )÷4 x 45 = 45.94 $m^3$ एवढे होते त्याऐवजी 183.75 $m^3$ लिहिण्यात आलेले आहे. त्यामुळे 137.81 $m^3$ (183.75 - 45.94 = 137.81) परिमाण जादा लिहीण्यात आले आहे. सदर बाबीचा दर प्रती घन मी. रु. 41.36 प्रमाणे रुपये 5700/- (137.81 x 41.36=5700) जादा प्रदान झाल्याचे दिसून येते. (M.B.No. 19/33(1)

क) बाब क्र. 7 : Lowering, laying and jointing with S.B.R. Rubber gasket या बाबीच्या परिमाणाची बेरीज 386.75 मीटर ऐवजी 388.75 मीटर म्हणजे 2 मीटर जादा लिहण्यात आली आहे. दर रुपये 258.76 आहे. देयकात 90% प्रदान करण्यात आले आहे त्यानुसार 258.76 च्या 90% रुपये 232.88 प्रमाणे 2 मीटरचे 465.76 जादा प्रदान झाल्याचे दिसून येते. (M.B. 19/26(1)

ड) बाब क्र. 1 : Providing & Supplying D.I.pipe या बाबीचे परिमाण 388.75 मीटर म्हणजे 2 मीटर मोजमाप जादा लिहण्यात आल्याचे दिसून येते. या बाबीचा दर रुपये 4548.23 आहे. प्रदान 10% करण्यात आले आहे त्यामुळे यामध्ये रुपये 909.64 जादा प्रदान झाल्याचे दिसून येते

7) सदर प्रमाणक क्र.20, दिनांक 7/01/2013 नुसार प्रदान करण्यात आलेल्या स्थूल रकमेमध्ये किंमत/दर वाढ (escalation) रक्कम रुपये 33,46,018/- प्रदान करण्यात आलेले आहे.

सुजल निर्मल अभियान अंतर्गत कामांकरिता Expression of Interest व्दारे मागविण्यात आलेल्या अस्तित्वातील पाणीपुरवठा योजनेचे बळकटीकरण करणे, बल्क मीटर बसविणे व योजना 24/7 अंतर्गत चालविणे कामाच्या निविदा अटीमध्ये clause 5.4 escalation price for work : Price escalation clause shall be applicable on approved initial rates only after 24 months. No escalation will be provided within 24 months. No escalation price shall be allowed for the period of delay causes by operator reasons pertaining to operator. अशी अट आहे.

| |
|---|
| परंतु सदर निविदेमध्ये यानुसार अट नसल्यामुळे कंत्राटदाराला किंमत/दर वाढ देण्यात आलेली आहे. एकाच वेळी काढण्यात आलेल्या एकाच प्रकारच्या कामाच्या निविदा अटीमध्ये भिन्नता करण्याचे प्रयोजन स्पष्ट करण्यात आलेले नाही.<br><br>8) कामाची मुदत निविदेनुसार 12 महिने व कामाचे आदेश क्र. मनपा/ पापुवि/ सां/613, दिनांक 23/12/2010 नुसार 14 महिने निश्चित करण्यात आलेली आहे. त्यानुसार कामाची मुदत 14 महिन्यानंतर 22/02/2012 रोजी समाप्त होते. त्यामुदतीत काम पूर्ण होणे आवश्यक होते. परंतु प्रमाणक क्र.20, दिनांक 7/01/2013 नुसार पाचवे धावते देयका अखेर रुपये 2,92,47,312/- एवढेच काम झाल्यचे दिसून येते. कामाची मुदत संपून सुमारे 11 महिने पर्यंत मंजूर काम रुपये 5,32,82,000/- किंमतीवर 14 टक्के जादा दराने होणारी किंमत रु. 6,07,41,480/- पैकी रुपये 2,92,47,312/- एवढे काम पूर्ण झालेले आहे. म्हणजे एकूण कामाच्या 48.15% एवढेच काम झालेले आहे. त्यामुळे मुदतीत काम पूर्ण झाले नसल्याने कंत्राटदाराकडून बी-1 टेंडर नियमानुसार दंडनीय कार्यवाही करणे आवश्यक असताना दंडनीय कार्यवाही केली नाही.<br>9) कामाच्या बार-चार्ट नुसार कंत्राटदारास काम करणे बंधनकारक आहे. परंतु काम पूर्ण झालेले नसल्यामुळे सदर कामावर खर्च करण्याचा उद्देश साध्य झालेला नाही. प्रस्तुत काम बार-चार्ट नुसार करून घेण्याच्या अंमलबजावणीमध्ये योग्य नियोजनाचा अभाव असल्याचे दिसून येते. त्यामुळे शासनाचा निधी विनाकारण गुंतून राहिलेला आहे.<br>अर्धसमास ज्ञापन क्र.171 दि.31/10/2014 रोजी निर्गमित केला असुन पाणीपुरवठा विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले नाही.<br>वसूल पात्र रक्कम (909.64+465.76+5700) 7075.40 रुपये : |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 171 | 31/10/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATBDMM5701 |

| | |
|---|---|
| 136 | शुध्द व अशुध्द जल उपसा केंद्र येथील पंपिंग मशिनरी व त्याला लागणारी इलेक्ट्रिकल उपांगे बदलणे कामातील अनियमितता. |
| योजना | योजनेचे नाव |

| संकेतांक | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमितितांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 06 | पाणी पुरवठा | राज्य | 9ड | 05 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 42189577 | | | |

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणची सन 09/10 ची दर अनुसूची व शेड्युल बी-1A ते बी-1 जी मधील बाबींचे दरांची पडताळणी केली असता निविदेच्या बी-1 शेड्युल नुसार रुपये 5,79,79,549/- पैकी रुपये 4,21,89,577/- रकमेच्या बाबींचे दर दरअनुसुचीबरोबर जुळत नाहीत. सदर दर कोणत्या अनुसुचीप्रमाणे घेण्यात आले आहे. याचा तपशील नस्तीमध्ये आढळून आला नाही.

महाराष्ट्र शासन ,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र. सुनिअ- 2010/ प्र.क्र.460/ पापु-22, दिनांक 23 नोव्हेंबर, 2010 अन्वये महाराष्ट्र सुजल निर्मल अभियानांतर्गत सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या 24/7 पाणीपुरवठा योजनेच्या रुपये 29.85 कोटी ढोबळ किंमतीच्या भाग-अ मधील 13 कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रात सुजल निर्मल अभियान राबविण्याबाबत महासभा ठराव क्र. 102, दिनांक 18 डिसेंबर 2008 अन्वये ठराव मंजूर करून मा.आयुक्ताना यासंदर्भात महाराष्ट्र शासनाबरोबर करार करण्याबाबत अनुमती देण्यात आली आहे.
सुजल निर्मल अभियान योजनेंतर्गत करावयाच्या कामांकरिता 6 पॅकेज मध्ये एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट व्दारे इच्छुक कंत्राटदारांकडून शॉर्टलिस्ट बनविण्याकरिता निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याकरिता दैनिक इंडियन एक्सप्रेस व दैनिक पुढारी या वृत्तपत्रांमध्ये दिनांक 27/03/2010 रोजी जाहिरात देण्यात आली होती. दिनांक 27/04/2010 पर्यंत इच्छुक कंत्राटदारानी आपला एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट कळविल्यानंतर शॉर्टलिस्ट बनविण्यात आली. मूळ प्रस्तावानुसार 6 पॅकेज मध्ये निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतु शॉर्टलिस्टिंग, गुणवत्ता, तांत्रिक क्षमता विचारात घेऊन 6 पॅकेजच्या कामांचे 3 गट तयार करण्यात आले.
प्रस्तुत कामाची लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करण्यात आलेली पत्रव्यवहार नस्ती, निविदा दस्तऐवज तपासणी करण्यात आली तपशील खालीलप्रमाणे.
**कामाचे नाव :** महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान योजनेअंतर्गत पॅकेज क्र.1.2 मधील अस्तित्वातील

पाणीपुरवठा योजनेचे बळकटीकरण करणेसाठी शुध्द व अशुध्द जल उपसा केंद्र येथील पंपिंग मशिनरी व त्याला लागणारी इलेक्ट्रीकल उपांगे बदलणे इत्यादी अनुषंगिक कामे.

**कामाची अंदाजपत्रकीय रक्कम :** रुपये 5,77,98,243/- (अंदाज पत्रक म.जि.प्राधिकरण 2009-10 च्या दर अनुसुचीवर आधारित व कांही बाबी बाजारभावाप्रमाणे)

**कामाची प्रशासकीय मंजुरी :** सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेने महासभा ठराव क्र. 102, दिनांक 18 डिसेंबर, 2008 व महाराष्ट्र शासन ,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र. सुनिअ- 2010/ प्र.क्र.460/ पापु-22, दिनांक 23 नोव्हेंबर, 2010 अन्वये.

**स्थायी समिती मंजुरी :** मा.स्थायी समिती ठराव क्र. 126, दिनांक 12/07/2010

**निविदा सूचना प्रसिध्दी :** दैनिक इंडियन एक्सप्रेस व दैनिक पुढारी या वृत्तपत्रांमध्ये दिनांक 27/03/2010 रोजी जाहिरात प्रसिध्दी देण्यात आली आहे.

**निविदा प्रक्रिया :** निविदा एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट व्दारे इच्छुक ठेकेदारांकडून मागविण्यात आल्या. निविदा विकत घेण्याचा कालावधी दिनांक 8/11/2010 ते 22/11/2010. निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक 10/12/2010 (मुदत वाढीसह). निविदा उघडण्याचा दिनांक 10/12/2010. निविदा पूर्व बैठक दिनांक 19/11/2010. निविदा सूचनेस प्रतिसाद म्हणून एकूण 7 (सात) ठेकेदारांनी निविदा विकत घेतल्या. एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट व्दारे सादर केलेल्या ठेकेदारांमध्ये 7(सात) ठेकेदार पात्र ठरविण्यात आले. पात्र ठेकेदारांना महानगरपालिका पत्र क्र. WWD/ Sangli/ 562/ 10-11, दिनांक 1/12/2010 अन्वये निविदा दर देण्याबाबत कळविण्यात आले. त्यानुसार 10/12/2010 पर्यंत 6(सहा) ठेकेदारांनी निविदा सादर केल्या. प्राप्त निविदांमध्ये सर्वात कमी दराची निविदा मे. योगीराज इले. पॉवर प्रा.ली. नवी मुबई यांची निविदा किंमतीच्या 25.60% जादा दराने आहे.

सर्वात कमी दर देऊ करणारे निविदाकार यांना निविदा दरांबाबत वाटाघाटीसाठी पत्र क्र. WWD/ SNA/625/ 10-11, दिनांक 24/12/2010 अन्वये, दिनांक 31/12/2010 रोजी सकाळी 10 वाजता बोलावण्यात आले होते. दिनांक 31/12/2010 च्या वाटाघाटी बैठकीत ठेकेदाराचे प्रतिनिधींनी निविदेतील जादा दराच्या समर्थनार्थ कांही मुद्दे उपस्थित केले परंतु त्याबाबत ठोस पुरावे सादर केले नाहीत. त्यामुळे विस्तृत अंदाजपत्रक व दर पृथ:करणासह दिनांक 5/01/2011 रोजी सादर करण्याबाबत ठरविण्यात आले. त्यानुसार ठेकेदाराने त्यांचे दि.13/01/2011 च्या पत्रान्वये विस्तृत अंदाजपत्रकासह पूर्वीच्या 25.60 टक्के जादा दराच्या देकारामध्ये 4.40% कमी करून सुधारित देकार 21.20 टक्के जादा दराने देकार कळविला आहे. वाटाघाटीनंतर निविदेतील कामाची किंमत रुपये 7,00,51,470/- वर निश्चित करण्यात आले. त्यानुसार स्थायी समितीकडे ठराव मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला.

**स्थायी समिती ठराव :** मा. स्थायी समिती ठराव क्र.512 दिनांक 17/02/2011 अन्वये ठराव मंजूर करण्यात आला आहे.

प्रस्तुत कामाचे एस्टिमेट रु. 5,77,98,243/- मात्रचे कामी मे. योगीराज पॉवर टेक प्रा.ली. नवी मुंबई यांचा निविदादर सर्वात कमीचा म्हणजे एस्टिमेट पेक्षा 25.60 टक्के जादा आहे. ठेकेदारास वाटाघाटीसाठी बोलाविले असता ठेकेदाराचे प्रतिनिधी उपस्थित राहून त्यांनी जादा दराचे समर्थन देताना ठोस पुरावे उपलब्ध करू शकले नाहीत तथापि वाटाघाटीअंती त्यांनी पूर्वीच्या देकारामध्ये 4.40 टक्के कमी करून 21.20 टक्के जादा दराचा सुधारित देकार दिनांक 13/01/2011 च्या पत्रान्वये कळविला असल्याने विषयांकित कामगिरी याकामाचे सर्वात कमी दराचे निविदाधारक मे. योगीराज पॉवरटेक प्रा.ली. नवी मुंबई यांचेकडून करून घेणेस मान्यता देण्यात आली आहे.

प्रस्तुत स्थायी समिती ठरावामध्ये, प्रस्तावित कामाचे अंदाजपत्रक नोव्हेंबर 2009 च्या दरसुचीवर करणेत आले आहे. तदनंतर कांही बाबींच्या किंमतीमध्ये महाराष्ट्र शासन व केंद्र शासन धोरणानुसार बदल झालेले आहेत. सन 2010-11 ची नवीन दरसूची लागू झाली आहे. नवीन दरसूचीशी बाजारभावाशी तुलना केली असता निविदादाराने दिलेला दर 9.46 टक्के आहे. सदर दर 10% पेक्षा कमी असल्याने ठेकेदाराने दिलेला दर योग्य आहे त्यास हि सभा सहमती दर्शवित आहे. असे नमूद आहे.

**कामाचे आदेश :** प्रस्तुत कामाचे आदेश महापालिका पत्र क्र. मनपा/ पापुवि/ सां/900/ 2010-11, दिनांक 24/03/2011 अन्वये मे. योगीराज पॉवरटेक प्रा.ली. नवी मुंबई यांना देण्यात आले आहेत. कामाच्या आदेशानुसार सदर कामाची मुदत बारा (12) महिने पावसाळ्यासह आहे.

**कामाचा तपशील :**

**सविस्तर प्रकल्प आराखड्यानुसार मंजूर कामे खालीलप्रमाणे (रुपये- 5,66,55,122/-)**

| NAME OF WORK | Amt.(Rs |
|---|---|
| Estimate for Electrical Rehabilitation & Additional Ready To Use Standby Transformer with Change over Panel At Malbunglow | 8157150 |
| 2. Estimate for Electrical Rehabilitation & Additional Ready To Use Standby Transformer with Changeover Panel At Malbunglow | 11788398 |
| Estimate for electrical Rehabilitation & Additional Ready to Use Standby Transformer with change over Panel AT Hirabaug Raw Water Pumping Station | 2827039 |
| Estimate for Electrical Rehabilitation Hirabaug | 1394034 |
| Estimate for Electrical Rehabilitation &Additional Ready to Use Standby Transformer with Changeover Panel At Miraj Raw W.P.Stn. | 5659201 |

| | |
|---|---|
| 6. Estimate for Electrical Rehabilitation &Additional Ready to Use Standby Transformer with Changeover Panel At Miraj Raw WTP | 8949795 |
| 7. Estimate for Replacement of Raw Water Pumping MachneryAt Head Works Sangli | 9638779 |
| 8. Estimate for Replacement of Pure Water Pumping Machinery At Malabunglow | 8240727 |
| **Total Rs.** | **56655122** |

**निविदेतील शेड्यूल बी-1 नुसार कामाचा तपशील खालीलप्रमाणे (Rs. 57979549)**

| Sch | Name of work | Amt. (Rs.) |
|---|---|---|
| B-1A | Replacement of Existing Raw/Pure Water Pumping Machinery At Malbunglow | 9834555 |
| B-1B | Replacement of Existing Raw/Pure Water Pumping Machinery At Krishnaghat | 6269994 |
| B-1C | Replacement of Existing Pure Water L.T.panel At Malbunglow | 1888195 |
| B-1D | Replacement of Existing Pure Water L.T.panel At Hirabaug | 1622782 |
| B-1E | Replacement of Raw Water Pumping Machinery At Ext. Head Work SANGLI | 16120648 |
| B-1F | Replacement of Raw Water Pumping Machinery At K'ghat | 13036763 |
| B-1G | Replacement of Raw Water Pumping Machinery At Malbung | 9206612 |
| **Total Rs.** | | **57979549** |

सदर कामाचे लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध करण्यात आलेली पत्रव्यवहार नस्ती, निविदा नस्ती, निविदा अंदाजपत्रक, सविस्तर प्रकल्प आराखडा (D.P.R.) पडताळणी केली असता खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्या.

1. निविदा सूचना निर्गमित करण्यापूर्वी निविदेतील कामाच्या बाबींकरिता निविदेत समाविष्ट बाबींचे वर्किंग एस्टिमेट तयार करून त्यास तांत्रिक मंजुरी घेऊन त्यानंतर निविदा डॉक्युमेंट बी-1 तयार करण्याची आवश्यकता होती परंतु त्यानुसार कार्यवाही करण्याऐवजी तांत्रिक मंजुरी न घेता निविदा बोलाविण्यात आलेल्या आहेत.

2. लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध करण्यात आलेल्या प्रस्तुत कामाच्या सविस्तर प्रकल्प आराखाड्यानुसार (D.P.R.) प्रस्तुत कामाची किंमत रुपये 5,66,55,122/- असल्याचे दिसून येते. परंतु निविदा शेड्युल बी-1 नुसार 5,79,79,549/- आहे. सदर तफावती बाबत खुलासा करण्यात आलेला नाही.

3. निविदेतील शेड्युल बी-1 मध्ये समाविष्ट कामाच्या बाबी व सविस्तर प्रकल्प आराखाडा (D.P.R.) यातील बहुतांश बाबीमध्ये समानता दिसून येत नाही. डी.पी.आर. मधील कामाच्या बाबींकरिता प्रशासकीय, तांत्रिक मंजुरी घेण्यात आलेली आहे. डी.पी.आर. मध्ये नसताना निविदेत समाविष्ठ बाबींना मंजुरी घेण्यात आलेली नाही. वर्किंग एस्टिमेट तयार करून त्यास सुद्धा मंजुरी घेण्यात आलेली नाही. मंजुरी न घेता निविदा मागवून कामाचा ठेका दिला आहे.

4. कामाचे अंदाज पत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण 2009-10 च्या दर अनुसुचीवर आधारित व कांही बाबी बाजारभावाप्रमाणे तयार करण्यात आले आहे. निविदेतील शेड्युल बी-1 मधील बाबींचे दर 2009-10 च्या दर अनुसुचीप्रमाणे पडताळणी करता बी-1 मधील बाबी दर अनुसुचीमध्ये आढळून आले नाहीत तपशील खालीलप्रमाणे.

| REPLACMENT OF EXISTING RAW/PURE WATER PUMPING MACHIERY AT MALBUNGLOW | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| SCHEDULE B - 1 A | | | | | |
| ITEM | DESCRIPTION | UNIT | QTY | RATE | AMOUNT |
| 8 | Busbars, Disc & Pin Insulator | lump | 1 | 40000 | 40000 |
| 10 | Switch Yard Lightening | Nos | 4 | 16782 | 67128 |
| 11 | Relay Metering panel | Nos | 3 | 73899 | 221697 |
| 12 | 415 (V) L.T.Pannel-Wtih changeover facility | Nos | 1 | 601397 | 601397 |
| 13 | Automatic Power factor Control Pannel without | Nos | 1 | 235805 | 235805 |
| 14 | Motor Soft Starter 335 HP | Nos | 3 | 491764 | 1475292 |
| 16 | CABLE 3.5 X 400 sq mm | Mtr | 600 | 2938 | 1762800 |
| | CABLE 3 X 400 sq mm | mtr | 200 | 2500 | 500000 |
| 20 | Fire Fighting Equipments Accesories | Lum | 1 | 25000 | 25000 |
| 21 | Dismentalaing | Lum | 1 | 10000 | 10000 |
| 22 | SwitchYard Civil Works | Lum | 1 | 189014 | 189014 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **TOTAL Rs.** | | | | | **5128133** |
| REPLACMENT OF EXISTING RAW/PURE WATER PUMPING MACHIERY AT KRISHNA GHAAT JACKWELL MIRAJ | | | | | |
| **SCHEDULE B - 1 B** | | | | | |
| **ITEM** | **DESCRIPTION** | **UNIT** | **QTY** | **RATE RS** | **AMOUNT RS** |
| 1 | Pole structue for 11 KV | Lump | 1 | 200000 | 200000 |
| 8 | Busbars, Disc & Pin Insulator | lump | 1 | 40000 | 40000 |
| 10 | Switch Yard Lightening | Nos | 4 | 16782 | 67128 |
| 11 | Relay Metering panel | Nos | 3 | 73899 | 221697 |
| 12 | 415 (V) L.T.Pannel-Wtih changeover facility | Nos | 1 | 484219 | 484219 |
| 13 | Automatic Power factor Control Pannel | Nos | 2 | 189251 | 378502 |
| 14 | Motor Soft Starter 250 HP | Nos | 3 | 318720 | 956160 |
| 17 | Control Cable 4 x 1.5 | Mtr | 200 | 176 | 35200 |
| 20 | Fire Fighting Equipments Accesories | Lump | 1 | 25000 | 25000 |
| 21 | Dismentalaing | Lump | 1 | 25000 | 25000 |
| 22 | SwitchYard Civil Works | Lump | 1 | 189114 | 189114 |
| **TOTAL Rs.** | | | | | **2622020** |
| **REPLACMENT OF EXISTING PURE WATER L.T. PANNEL AT MALBUNGLOW WTP PUMPING** | | | | | |
| **SCHEDULE B - 1 C** | | | | | |
| **ITEM** | **DESCRIPTION** | **UNIT** | **QTY** | **RATE RS** | **AMOUNT RS** |
| 1 | 415 (V) L.T.Pannel-Wtih changeover facility | Nos | 1 | 434870 | 434870 |
| 2 | Automatic Power factor Control Pannel | Nos | 1 | 189251 | 189251 |
| 8 | Dismentaling | Lump | 1 | 25000 | 25000 |
| 9 | Dismentaling of Required pumps motor | Lump | 1 | 5000 | 5000 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | Transform | | | | |
| **TOTAL Rs.** | | | | | **654121** |
| **REPLACMENT OF EXISTING PURE WATER L.T. PANNEL AT HIRABAUG RAW WATER** | | | | | |
| **SCHEDULE B - 1 D** | | | | | |
| **ITEM** | **DESCRIPTION** | **UNIT** | **QTY** | **RATE** | **AMOUNT** |
| 1 | 415 (V) L.T.Pannel-Wtih changeover facility | Nos | 1 | 424003 | 424003 |
| **TOTAL Rs.** | | | | | **424003** |
| **REPLACMENT OF RAW WATER PUMPING MACINERY AT Ext. HEAD WORK SANGLI** | | | | | |
| **SCHEDULE B - 1 E** | | | | | |
| **ITEM** | **DESCRIPTION** | **UNIT** | **QTY** | **RATE** | **AMOUNT** |
| 1 | Providing and erecting commissioning of VT pump (15.00 lakh/ltr/hrs) | Nos | 3 | 1964364 | 5893092 |
| 2 | P/Erec. Comm.. test & trial of SPDP motor 1500 RPM (335 HP) | Nos | 3 | 926370 | 2779110 |
| 3 | P/Erec. Comm.. test & trial of Control /swotch gear pannel (415 volt) | Job | 1 | 600000 | 600000 |
| 7 | Providing CC foundation in 1:2:4 (lumpsum for support block) | Cum | 10 | 3521.92 | 35219.2 |
| 7 | Providing CC foundation in 1:2:4 (lumpsum for thrust block) | Cum | 25 | 3521.92 | 88048 |
| 8 | P/S ISI Standared M.S/C.I Double flanged pipes | | | | |
| | 500mm dia | Mtr | 30 | 12140.6 | 364218 |
| | 900 mm dia (M.S) 10mm thick | Mtr | 15 | 13116 | 196740 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 9 | Pro/Ere connecting double flanged short body pattern type Electrically Operated Butterfly Valve | | | | |
| | Butterfly valve PN 1.6 (With Acutator) 500 mm dai | Nos | 3 | 249733 | 749199.84 |
| | Butterfly valve PN 1.6 (With Acutator) 900 mm dai | Nos | 1 | 599437 | 599437.15 |
| 10 | Pro/ S ISI Mark CI D/F Reflux Valve | | | | |
| | 500mm dia | Nos | 3 | 269781 | 809344.74 |
| | 900 mm dia | Nos | 1 | 847538 | 847538.35 |
| 11 | Pro/ S ISI Mark CI D/F Angle type Spring loded pressure relif Valves 300 mm | Nos | 1 | 58951.6 | 58951.6 |
| 12 | Pro/Supl ISI Standared MS Specials | Qtl | 37 | 6827.6 | 252621.2 |
| 13 | Pro.Making flanged joints to CI MS pipes | | | | |
| | 300 mm dia | Nos | 2 | 779.47 | 1558.94 |
| | 500mm dia | Nos | 18 | 1614.08 | 29053.44 |
| | 900 mm dia | Nos | 7 | 3881.43 | 27170.01 |
| 14 | Lowering laying jointing in possition CI D/F Valves | | | | |
| | Sluice Valve 500 mm dia | Nos | 3 | 5904.86 | 17714.58 |
| | Sluice Valve 900 mm dia | Nos | 1 | 9579.5 | 9579.5 |
| | Reflux Valve 500 mm dai | Nos | 3 | 5904.86 | 17714.58 |
| | Reflux Valve 900 mm dai | Nos | 1 | 9579.5 | 9579.5 |
| | Pressure Relief Valve 300 mm dia | Nos | 1 | 762.5 | 762.5 |
| 15 | Pro. Low. Lay Jointg RCC NP-3 Class Pipe | | | | |
| | 300 mm dia | Mtr | 300 | 834.75 | 250425 |
| 21 | Desng Prov & fixng reqred surge | Nos | 1 | 75302.6 | 75302.66 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | protectn Devices | | | | |
| 22 | prov. suplng erection dismentaling joint in pumps | Nos | 3 | 98218.2 | 294654.6 |
| **TOTAL Rs.** | | | | | **14007035** |
| **REPLACMENT OF RAW WATER PUMPING MACINERY AT KRISHNAGHAT** | | | | | |
| **SCHEDULE B - 1F** | | | | | |
| **ITEM** | **DESCRIPTION** | **UNIT** | **QTY** | **RATE RS** | **AMOUNT RS** |
| 1 | Providing and erecting commissining of VT pump (15.00 lakh/ltr/hrs) | Nos | 3 | 1472856 | 4418568 |
| 2 | P/Erec. Comm.. test & trial of vertical Solid shaft mitor SPDP moter 1500 RPM (250 HP) | Nos | 3 | 910256 | 2730768 |
| 3 | P/Erec. Comm.. test & trial of Control /swotch gear pannel (415 volt) | Job | 1 | 600000 | 600000 |
| 7 | Providing CC foundation in 1:2:4 (lumpsum for support block) | Cum | 10 | 3521.92 | 35219.2 |
| | Providing CC foundation in 1:2:4 (lumpsum for thrust block) | Cum | 25 | 3521.92 | 88048 |
| 8 | P/S ISI Standared M.S/C.I Double flanged pipes | | | | |
| | 400mm dia | Mtr | 30 | 8292.03 | 248760.9 |
| | 700 mm dia (M.S) 10mm thick | Mtr | 15 | 10233 | 153495 |
| 9 | Pro/Ere connecting double flanged short body pattern type Electrically Operated Butterfly Valve | | | | |
| | Butterfly valve PN 1.6 (With Acutator) 400 mm dai | Nos | 3 | 208002 | 624006 |
| | Butterfly valve PN 1.6 (With Acutator) | Nos | 1 | 417020 | 417020 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 700 mm dai | | | | |
| 10 | Pro/ S ISI Mark CI D/F Reflux Valve | | | | |
| | 400mm dia | Nos | 3 | 173144 | 519434 |
| | 700 mm dia | Nos | 1 | 522216 | 522216 |
| 12 | Pro/Supl ISI Standared MS Specials | Qtl | 35 | 6827.6 | 238966 |
| 13 | Pro.Making flanged joints to CI MS pipes | | | | |
| | 300 mm dia | Nos | 2 | 779.47 | 1558.94 |
| | 400mm dia | Nos | 18 | 1275.78 | 22964.04 |
| | 700 mm dia | Nos | 7 | 2623.68 | 18365.76 |
| 14 | Lowering laying jointing in possition CI D/F Valves | | | | |
| | Sluice Valve 400 mm dia | Nos | 3 | 4745.74 | 14237.22 |
| | Sluice Valve 700 mm dia | Nos | 1 | 6779.78 | 6779.78 |
| | Reflux Valve 400 mm dai | Nos | 3 | 4745.74 | 14237.22 |
| | Reflux Valve 700 mm dai | Nos | 1 | 6779.78 | 6779.78 |
| | Pressure Relief Valve 300 mm dia | Nos | 1 | 762.5 | 762.5 |
| 15 | Pro. Low. Lay Jointg RCC NP-3 Class Pipe | | | | |
| | 300 mm dia | Mtr | 300 | 834.75 | 250425 |
| 16 | P/Erec. Comm..singla grited elect operated circular | | | | |
| | 5 ton Capacity (lift 6 to 8 mtr) | Nos | 1 | 752110 | 752110 |
| 17 | Square Bar rail 50 x 50 | Mtr | 30 | 1558 | 46740 |
| 21 | Desgn Prov. & fixng required surge protectn Devices | Nos | 1 | 75302 | 75302 |
| 22 | prov. suplng erection dismentaling joint in pumps | Nos | 3 | 73642.8 | 220928.4 |
| **TOTAL Rs.** | | | | | **12027693** |
| **REPLACMENT OF PURE WATER WATER PUMPING MACHINERY AT** | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **MALBUGLOW TO FEED MALBUNGLOW ESR** | | | | | |
| **SCHEDULE B - 1 G** | | | | | |
| **ITEM** | **DESCRIPTION** | **UNIT** | **QTY** | **RATE RS** | **AMOUNT RS** |
| 1 | Providing and erecting commissining of VT pump | Nos | 3 | 590722 | 1772166 |
| 2 | P/Erec. Comm.. test & trial of vertical Solid shaft mitor SPDP moter 1500 RPM (150 HP) | Nos | 3 | 514860 | 1544580 |
| 3 | P/Erec. Comm.. test & trial of Control /swotch gear pannel (415 volt) | Job | 3 | 200000 | 600000 |
| 7 | Providing CC foundation in 1:2:4 (lumpsum for support block) | Cum | 10 | 3521.92 | 35219.2 |
| | Prov. CC foundation in 1:2:4 (lump for thrust block) | Cum | 25 | 3521.92 | 88048 |
| 8 | P/S ISI Standared M.S/C.I Double flanged pipes | | | | |
| | 400mm dia | Mtr | 30 | 8292.05 | 248761.5 |
| | 700 mm dia (M.S) 10mm thick | Mtr | 15 | 10233 | 153495 |
| 9 | Pro/Ere connecting double flanged short body pattern type Manualy Operated Butterfly Valve | | | | |
| | Butterfly valve PN 1.6 (With Acutator) 400 mm dai | Nos | 3 | 208002 | 624006 |
| | Butterfly valve PN 1.6 (With Acutator) 700 mm dai | Nos | 1 | 417020 | 417020 |
| 10 | Pro/ S ISI Mark CI D/F Reflux Valve | | | | |
| | 400mm dia | Nos | 3 | 173145 | 519435 |
| | 700 mm dia | Nos | 1 | 522216.8 | 522216.8 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 11 | Pro/ S ISI Mark CI D/F Angle type Sprin loded pressure relif Valves 300 mm | Nos | 1 | 58951.6 | 58951.6 |
| 12 | Pro/Supl ISI Standared MS Specials | Qtl | 35 | 6827.6 | 238966 |
| 14 | Lowering laying jointing in possition CI D/F Valves | | | | |
| | Pressure Relief Valve 300 mm dia | Nos | 1 | 762.5 | 762.5 |
| 15 | Pro. Low. Lay Jointg RCC NP-3 Class Pipe | | | | |
| | 300 mm dia | Mtr | 300 | 834.75 | 250425 |
| 21 | Desng Prov & fixng reqred surge protectn Devices | Nos | 1 | 75302.66 | 75302.66 |
| 22 | prov. suplng erection dismentaling joint in pumps | Nos | 3 | 59072.2 | 177216.6 |
| **TOTAL Rs.** | | | | | 7326572 |

**ABSTRACT**

| Schedule | Name of Work | Schedue Amt | Amt of Rates not in DSR | Diff. Amt. **RS** |
|---|---|---|---|---|
| B-1A | Replacement Of Existing Raw/Pure Water Pumping Machinery at MALBUNGLOW | 9834555 | 5128133 | 4706422 |
| B-1B | Replacement Of Existing Raw/Pure Water Pumping Machinery at K'GHAAT J'WELL MIRAJ | 6269994 | 2622020 | 3647974 |
| B-1C | Replacement Of Existing Pure Water L.T. PANNEL AT MALBUNGLOW WTP PUMPING | 1888195 | 654121 | 1234074 |
| B-1D | Replacement Of Existing Pure Water L.T. PANNEL AT HIRABAUG RAW | 1622782 | 424003 | 1198779 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | WATER | | | |
| B-1E | Replacement Of Raw Water Pumping Machinery AT Ext. HEAD WORK SANGLI | 16120648 | 14007035 | 2113613 |
| B-1F | Replacement Of Raw Water Pumping Machinery AT KRISHNAGHAT | 13036763 | 12027693 | 1009070 |
| B-1G | Replacement Of pure Water Pumping Machinery AT MALBUGLOW to feed MALBUNGLOW ESR | 9206612 | 7326572 | 1880040 |
| | **TOTAL RS.** | 57979549 | 42189577 | 15789972 |

दर अनुसूची व शेड्युल बी-1A ते बी-1 जी मधील बाबींचे दरांची पडताळणी केली असता वर दर्शविल्याप्रमाणे निविदेच्या बी-1 शेड्युल नुसार रुपये 5,79,79,549/- पैकी रुपये 4,21,89,577/- रकमेच्या बाबींचे दर दरअनुसुची बरोबर जुळत नाहीत. तसेच सदर दर कोणत्या अनुसुचीप्रमाणे घेण्यात आले आहेत. याचा तपशील नस्तीमध्ये आढळून आला नाही.

5. डी.पी.आर मधील मंजूर बाबींमध्ये फेरबदल करून प्रशासकीय, तांत्रिक मंजुरी न घेता निविदा शेड्युल बी-1 मध्ये कांही बाबींचा समावेश करण्यात आल्याचे निदर्शनास आले. उदा.

**I) Schedule B-1E:** Repalacemnat of Raw Water Pumping Machinery At Ext. Head works Sangl. Item No. 9 **-** Pro/Ere connecting double flanged short body pattern type Electrically Operated Butterfly Valve 1) Butterfly valve PN 1.6 (With Acutator) 500 mm dai - 3 Nos. Rate Rs. 249733/- Rs. 7,49,199/- 2) Butterfly valve PN 1.6 (With Acutator) 900 mm dai - 1 no. Rs. 5,99,437/-

II) Schedule B1-F: Replacement of Raw Water Pumping Machinery At Krishnaghat. Item No. 9 **-** Pro/Ere connecting double flanged short body pattern type Electrically Operated Butterfly Valve 1) Butterfly valve PN 1.6 (With Actuator) 400 mm dai - 3 Nos. Rate Rs. 208002/- Rs. 6,24,006/- 2) Butterfly valve PN 1.6 (With Actuator) 700 mm dai - 1 no. Rs. 4,17,020/- शासनाने डी.पी.आर. मधील बाबींना रकमेसह मंजुरी दिलेली आहे. त्यामध्ये फेरफाराने बदल करून शासनाच्या मंजुरी शिवाय निविदेमध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र.172 दि.31/10/2014 रोजी निर्गमित केला असुन पाणीपुरवठा विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले नाही.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 172 | 31/10/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| Auditor's ID | DATBDMM5701 |
|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 137 | सुजल निर्मल अभियान अंतर्गत मिरज जलशुध्दीकरण केंद्राची 19.20 द.ल.ली.क्षमता 28.80 द.ल.ली. वाढविणे कामाबाबत | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | 13 वा वित्त आयोग. | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 06 | पाणी पुरवठा | राज्य शासन | 9ब | 04 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 68192 | | | |

या कामाच्या निविदेची प्रथम जाहीर सूचना दि.27/03/2010 ला प्रसिध्द झालेली असून निविदा अंतिम होऊन कामाचे आदेश दिनांक 13/09/2012 रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. म्हणजे सुमारे दोन वर्ष सहा महिने इतका कालावधी कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यास लागलेला आहे. कामास विलंब लागल्याने कामाच्या खर्चात रु.2117575/- इतकी वाढ झाली आहे.

महाराष्ट्र शासन ,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र. सुनिअ- 2010/ प्र.क्र.460/ पापु-22, दिनांक 23 नोव्हेंबर, 2010 अन्वये महाराष्ट्र सुजल निर्मल अभियानांतर्गत सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या 24/7 पाणीपुरवठा योजनेच्या रुपये 29.85 कोटी ढोबळ किंमतीच्या भाग-अ मधील 13 कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रात सुजल निर्मल अभियान राबविण्याबाबत महासभा

ठराव क्र. 102, दिनांक 18 डिसेंबर, 2008 अन्वये ठराव मंजूर करून मा. आयुक्ताना यासंदर्भात महाराष्ट्र शासनाबरोबर करार करण्याबाबत अनुमती देण्यात आली आहे.

सुजल निर्मल अभियान योजनेंतर्गत करावयाच्या कामांकरिता 6 पॅकेज मध्ये एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट व्दारे इच्छुक कंत्राटदारांकडून शॉर्टलिस्ट बनविण्याकरिता निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याकरिता दैनिक इंडियन एक्सप्रेस व दैनिक पुढारी या वृत्तपत्रांमध्ये दिनांक 27/03/2010 रोजी जाहिरात देण्यात आली होती. दिनांक 27/04/2010 पर्यंत इच्छुक कंत्राटदारानी आपला एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट कळविल्यानंतर शॉर्टलिस्ट बनविण्यात आली. मूळ प्रस्तावानुसार 6 पॅकेज मध्ये निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतु शॉर्टलिस्टिंग, गुणवत्ता, तांत्रिक क्षमता विचारात घेऊन 6 पॅकेजच्या कामांचे 3 गट तयार करण्यात आले. त्यास स्थायी समिती ठराव क्र. 126, दिनांक 12/05/2010 अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

गट क्र.3 अंतर्गत मिरज जलशुध्दीकरण केंद्राची क्षमता सध्याच्या 19.20 द.ल.ली. वरून 28.80 द.ल.ली. वाढविणे, सिव्हिल, मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल कामामध्ये सुधारणा करणे तसेच जलशुध्दीकरण केंद्र 5 वर्ष देखभाल दुरुस्तीसह चालविणे कामाकरिता रुपये 400 लक्ष अंदाजपत्रकीय कामाकरिता एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट व्दारे निविदा मागविण्यात आल्या आहेत. निविदा सूचनेस प्रतिसाद दिलेल्या कंत्राटदारांची शॉर्टलिस्ट तयार करण्यात येऊन पात्र कंत्राटदारांना दरनिविदा सादर करण्याबाबत कळविण्यात आले. त्यानुसार दोन कंत्राटदारांनी दर निविदा सादर केल्या. प्राप्त निविदेतील दर अवाजवी असल्यामुळे उपायुक्त पाणी पुरवठा विभाग यांचेकडून दिनांक 29/08/2011 च्या विषयपत्रान्वये स्थायी समितीकडे प्रस्ताव सादर करण्यात आला. स्थायी समिती सभा क्र. 14, दिनांक 30/08/2011 मध्ये सदर प्रस्तावावर चर्चा होवून स्थायी समिती ठराव क्र. 289, दिनांक 30/08/2011 अन्वये सदर निविदा प्रक्रिया रद्द करून खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत मान्यता दिली आहे.

1. ठेकेदार बाजारभावाप्रमाणे काम करण्यास तयार असल्यास रक्कम रुपये 4.55 कोटी प्रमाणे कार्यवाही करणेस.

2. 10 M.L.D. चा नव्याने अनकन्व्हेंशनल WTP तयार करणे व चालू WTP ची दुरुस्ती करणे ही कामे चालू दरसूचीनुसार रक्कम रुपये 400 लक्ष मध्ये होऊ शकतात. त्याकरिता आलेल्या निविदा रद्द करणेस व त्या ऐवजी 10 M.L.D. साठी नव्याने निविदा मागविण्यास तसेच सध्याच्या डी.एस.आर. प्रमाणे 1.70 कोटी खर्चास व या कामी उपलब्ध 4.00 कोटीतील शिल्लक रक्कम 2.30 कोटी मधून उर्वरित 19.2 क्षमतेच्या अस्तित्वातील जलशुध्दीकरण केंद्राची दुरुस्ती करण्यासाठी रितसर निविदा मागविण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदर निविदा प्रक्रिया रद्द करून नविन निविदाप्रक्रिया

करण्यात आली.

प्रस्तुत कामाची लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करण्यात आलेली पत्रव्यवहार नस्ती, निविदा दस्तऐवज तपासणी करण्यात आली तपशील खालीलप्रमाणे.

**कामाचे नाव :** सुजल निर्मल अभियान योजने अंतर्गत मिरज पाणीपुरवठा विभागातील अस्तित्वातील 19.20 दश लक्ष लिटर क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्राची क्षमता 28.80 द.ल.लि. वाढविणे व अस्तित्वातील जलशुध्दीकरण केंद्राची उपांगांची दुरुस्ती करणे.

**कामाची अंदाजपत्रक रक्कम :** 2,28,18,702/-

**कामाची प्रशासकीय मंजुरी :** सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेने महासभा ठराव क्र. 102, दिनांक 18 डिसेंबर, 2008 व महाराष्ट्र शासन ,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र. सुनिअ- 2010/ प्र.क्र.460/ पापु-22, दिनांक 23 नोव्हेंबर, 2010

**स्थायी समिती मंजुरी :** मा.स्थायी समिती ठराव क्र. 126, दिनांक 12/07/2010

**निविदा सूचना प्रसिध्दी :** जाहीर निविदा सूचना दैनिक केसरी या वृत्तपत्रात दिनांक 4/07/2012 रोजी प्रसिध्दी देण्यात आली.

**निविदा प्रक्रिया :** जाहीर निविदा सूचना दैनिक केसरी या वृत्तपत्रात दिनांक 4/07/2012 रोजी प्रसिध्दी देण्यात आली. निविदा ई-निविदा पध्दतीने ऑनलाईन निविदा मागविण्यात आल्या आहेत. निविदा फॉर्म विक्री व निविदा सादर करण्याचा दिनांक 4/07/2012 ते 19/07/2012. निविदा दिनांक 20/07/2012 रोजी सकाळी 11.00 वाजता उघडण्यात आल्या. जाहीर निविदा सूचनेस प्रतिसाद म्हणून एकूण तीन ठेकेदारांनी निविदा सादर केल्या. 1) श्री. एस.व्ही.जाधव मिरज रुपये-2,70,85,799/- (18.70% जादा) 2) श्री. पी.टी.माळी, सांगली रु.2,76,44,857/- (21.15 % जादा) 3) मे. लक्ष्मी सिव्हिल इंजिनिअर प्रा. ली. कोल्हापूर रु.2,85,23,379/- (25 % जादा). सर्वात कमी दराची निविदा श्री.एस.व्ही.जाधव, मिरज रुपये-2,70,85,799/- (18.70% जादा) असल्याने त्यांना महापालिका पत्र क्र. 365, दिनांक 27/07/2012 अन्वये वाटाघाटीकरिता बोलाविण्यात आले. वाटाघाटीनुसार श्री.एस.व्ही.जाधव, मिरज ठेकेदार यांनी दिनांक 03/08/2012 च्या पत्रान्वये प्रस्तुत काम अंदाजपत्रक दराचे 9.75 टक्के दराने करण्याची संमती कळविली आहे.

**स्थायी समिती ठराव :** मा. स्थायी समिती ठराव क्र.203, दिनांक 17/08/2012 अन्वये मंजुरी. प्राप्त तीन निविदा मध्ये श्री. एस.व्ही.जाधव, मिरज यांचा देकार अंदाजपत्रक किमतीच्या 18.70% जादा दर सर्वात कमीचा असल्याने त्यांना वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आले होते. वाटाघाटीअंती त्यांनी प्रस्तावित काम निविदा दराच्या 9.75 टक्के जादा दराने (रु.24936277/-) करण्यास संमती दिल्याने विषयपत्रातील शिफारशीनुसार मंजुरी देण्यात आली.

**कामाचे आदेश :** महानगरपालिका पत्र क्र. मनपा/ पापुवि/ 689/ 2012, दिनांक 13/09/2012 अन्वये कामाचे आदेश देण्यात आले आहेत. सांगली मिरज आणि कुपवाड अंतर्गत मिरज पाणी पुरवठा विभागातील अस्तित्वातील 19.20 द.ल.ली. क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्राची क्षमता 28.80 द.ल.ली. इतकी वाढविणे व अस्तित्वातील जलशुध्दीकरण केंद्राची उपांगांची दुरुस्ती करणे अंदाजपत्रकीय रक्कम

रुपये 2,28,18,702/- किंमतीच्या 9.75 टक्के जादा दराने कामाचे आदेश देण्यात आले आहे. सदर काम दिनांक 14/09/2012 पासून सुरु करावे. सदर कामाची मुदत वर्क ऑर्डर मिळाल्यापासून सहा महिने अशी आहे. प्रस्तुत कामाची पत्रव्यवहार नस्ती, अंदाज पत्रक, धावती देयके तपासणी करता आढळून आलेल्या अनियमितता खालीलप्रमाणे

1. निविदा प्रक्रिया दिनांक 27/03/2010 ला प्रथम जाहीर सूचना प्रसिध्द झालेली असून निविदा अंतिम होऊन कामाचे आदेश दिनांक 13/09/2012 रोजी निर्गमित करण्यात आले आहेत म्हणजे सुमारे दोन वर्ष सहा महिने सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यास लागलेला आहे. या कामाचा निधी शासनाकडून महानगरपालिकेला प्राप्त होऊन निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यास एवढा कालावधी लागलेला आहे. प्रस्तुत कामाची निविदा प्रकिया अंमलबजावणीमध्ये अवाजवी दिरंगाई झाल्याचे दिसून येते. सदर निविदा प्रक्रिया वेळीच म्हणजे सुमारे दोन वर्षांपूर्वी पूर्ण करण्यात आली नसल्याने निविदा अंदाजप्रत्रकीय दरापेक्षा 9.75 टक्के जादाने आली आहे. अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालनामध्ये निविदा प्रक्रिया राबविण्यामध्ये दिरंगाई झाल्याचे मान्य केले आहे.

2. निविदेतील शेड्युल बी-1 मध्ये एकूण 12 उप-कामांचा समावेश आहे. सदर उप-कामांच्या बाबींच्या दरांची दरअनुसूचीशी पडताळणी केली असता त्यातील कांही बाबींचे दर दरअनुसूची नुसार घेण्यात आले नसल्याचे दिसून आले. तपशील खालीलप्रमाणे

1) सब-वर्क 1 : ऐरिएशेन फौंडेशन आणि कनेक्टिंग चॅनेल, बाबी-13, रु. 2,57,032.69 या सब-वर्क मधील बाब क्र. 1 ते 11 & 13 याबाबींची रक्कम रु. 2,38,228/- दरअनुसूचीनुसार नाही.

1. सब-वर्क 2 : फ्लाश मिक्सर - बाबी-12, रु. 109857.05 या सब-वर्क मध्ये बाब क्र.1,2,व 4 ते 12 याबाबींची रक्कम रु.1,04,159/- दरअनुसूचीनुसार नाही.

2. सब-वर्क 3 : फ्लोक्युलेटर - बाबी-12, रु. 7,73,448/- या सब-वर्क मध्ये बाब क्र.1,2 व 4 ते 12 याबाबींची रक्कम रु.7,25,013/- दरअनुसूचीनुसार नाही.

3. सब-वर्क : क्लेरीफायर - बाबी-19, रु. 49,78,741.68 या सब-वर्क मध्ये बाब क्र. 1 ते 6, 8, 9, 10, 11, 13, 14, 15, 16, 17,18 आणि 19 याबाबींची रक्कम रु.46,02,650/- दरअनुसूचीनुसार नाही.

5) सब-वर्क 5 : फिल्टर बेड्स/होऊसेस - बाबी-45, रु. 79,35,598.61 या सब-वर्क मध्ये बाब क्र 1 ते 7,9 ते 21, 24, 25, 26, 28 याबाबींची रक्कम रु. 65,19,746/- दर अनुसूचीनुसार नाही.

6) सब-वर्क 6 : केमिकल हाउस :- बाबी -16, रु. 4,78,708.72 या सब-वर्क मध्ये बाब क्र. 1 ते 4,6,9,10,12,13,14,16 याबाबींची रक्कम रु. 3,80,050/- दरअनुसूचीनुसार नाही.

7) सब-वर्क 7 : रिपेअर टू प्युअर वॉटर सम्प :- बाबी-11, रु. 22,04,598.79 या सब-वर्क मध्ये बाब क्र. 1 ते 6 व 8 याबाबींची रक्कम रु. 14,22,171/- दरअनुसूचीनुसार नाही.

8) सब-वर्क 8 : स्लज सम्प :- बाब 1, रु. 9,91,725.00 या रकमेमध्ये 5% जादा रक्कम समावेश आहे.

9) सब-वर्क 9 : वॉश वाटर टँक (ESR) :- बाबी-4, रु. 22,99, 218.16 या सब-वर्क मध्ये बाब क्र. 1 ते 4 याबाबींची रक्कम रु. 22,99,218.16/- दरअनुसूचीनुसार नाही.

10) सब-वर्क 10 : सेंट्रीफ्युज शेड आणि मशिनरी, बाबी-23, रु. 18,43,808.75 या सब-वर्क मध्ये बाब क्र. 3 ते 7, 9, 10 व 12 ते 22 याबाबींची रक्कम रु. 17,22,090/- दरअनुसूचीनुसार नाही.

11) सब-वर्क 11 : पाईप लाईन, बाबी-7, रु. 2,30,830.76 या सब-वर्क मध्ये बाब क्र. 1 ते 7 याबाबींची रक्कम रु. 2,30,830/- दरअनुसूचीनुसार नाही.

12) सब-वर्क 12 : स्लज पंप, बाबी-Lump Rs. 7,15,133.49 या सब-वर्क मध्ये रक्कम रु. 7,15,133.49 दरअनुसूचीनुसार नाही.

सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये 2,28,18,702/- चे तयार करण्यात आलेले आहे. परंतु वर दर्शविल्यानुसार अंदाजपत्रकातील रुपये 1,99,51,013/- रकमेच्या बाबींच्या कामांबाबत दरअनुसूची (DSR) प्रमाणे दर घेण्यात आलेले नाहीत. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये वरील बाबींचे दर त्यावेळी असलेल्या मार्केट रेट प्रमाणे असल्याचे नमुद आहे. परंतु दरपृथःकरण दाखविण्यात आलेले नाही.

3) धावते देयक क्र. 1, प्रदान प्रमाणक क्र. 16 दिनांक 9/01/2012 स्थूल रक्कम रुपये 14,98,691/- (मोजमाप पुस्तक क्र. 8/1-9) देयकाची पडताळणी केली त्यामध्ये खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्या.

2. सब-वर्क 4 बाब क्र.29 Providing and Casting in situ C.C. 300 etc. परिमाण 11.31 घन मीटर दर रु. 6029.38 प्रमाणे रुपये 68,192.28 अदा केलेले आहेत. परंतु बी-1 शेड्युल सदर बाबीचा तपशील Providing and Supplying 20mm thick Cement Plaster दर रुपये 261.46 आहे. त्यानुसार रक्कम रुपये 2957.11 (11.31 $M^3$ x 261.46 = 2957.11) होते. अर्धसमास ज्ञापनास दिलेले उत्तर संयुक्तिक नाही.

3. निविदा सूचना व कामाच्या आदेशानुसार कामाची मुदत सहा महिने निश्चित करण्यात आलेली आहे. त्यानुसार 13 मार्च, 2013 रोजी सहा महिने कालावधी पुंर्ण होत आहे. परंतु ठेकेदाराचे मार्च 2013 अखेरचे प्रदानाचा तपशील पहाता दिनांक 19/03/2013 च्या चौथे धावते देयेकासह एकूण रुपये 1,31,49,338/- एवढे प्रदान झालेले आहे. कंत्राटा नुसार प्रस्तुत कामाची किंमत अंदाजपत्रक रक्कम रुपये

| |
|---|
| 2,28,18,702/- च्या 9.75 टक्के जादा प्रमाणे रुपये 2,50,43,525/- होते. तथापि कंत्राट दाराच्या कामाच्या प्रदानाचा विचार करता कंत्राटदाराने मुदतीत पूर्ण केलेले काम 52 टक्के एवढे आहे. कामाच्या बार-चार्ट नुसार काम विहित मुदतीत पूर्ण करणे कंत्राटदाराला बंधनकारक आहे त्यानुसार कंत्राटदाराकडून विहित मुदतीत काम करून घेण्यामध्ये व्यवस्थापकीय नियोजनातील अभाव दिसून येतो. सदर प्रकरणी कामातील विलंबाबाबत कंत्राटदाराकडून बी-1 निविदा अटीनुसार दंडाची रक्कम निश्चित करून वसूल करणे आवश्यक आहे त्यानुसार कंत्राट दाराकडून वसूल करण्यात आलेल्या दंडनीय रकमेचा तपशील उपलब्ध करण्यात यावा. अर्धसमास ज्ञापनास दिलेले उत्तर संयुक्तिक नाही.<br><br>अर्धसमास ज्ञापन क्र.173, दि.15/11/14 रोजी निर्गमित केला असुन पाणीपुरवठा विभागाने त्याचे अनुपालन दि.18/11/2014 रोजी सादर केले आहे.<br>अक्षेपाधीन रक्कम रुपये- 68192/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 173 | 15/11/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATBDMM5701 |

| 138 | गुंठेवारी विकासांचे नियमितीकरण व श्रेणीवाढ करणे या मधील अनियमितते बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 09 | नगररचना | मनपा | 9ड | 03 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

| |
|---|
| सन 2001 च्या गुंठेवारी अधिनियमातील कलम 3 मधील पोट कलम 3 अन्वये राज्य शासनाने वेळोवेळी निर्धारीत केलेली प्रशमन फी व विकास आकार यापोटी देय असलेल्या रकमेचा अंतर्भाव असलेला |

कोणत्याही बँकेवर काढलेला दर्शनी धनाकर्ष (डी.डी.) अर्जासोबत घेण्यात आलेला आहे. परंतु त्याची चलने विलंबाने लेखा विभागाकडे सादर केल्याने धनाकर्षाच्या रक्कम विलंबाने लेख्यामध्ये आलेल्या आहेत.

सन 2001 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 27 विवाक्षित गुंठेवारी विकासांचे नियमितीकरण व श्रेणीवाढ करणे यासाठी आणि गुंठेवारी विकासाचे नियंत्रण करणे आणि त्याच्याशी संबंधित व तदनुषांगिक बाबींकरीता अधिनियम दिनांक 13.08.2001 रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. सदर अधिनियमातील कलम 3 मधील पोट कलम 3 अन्वये गुंठेवारी विकास नियमाधीन करणे नुसार राज्य शासनाने वेळोवेळी निर्धारीत केलेली प्रशमन फी व विकास आकार यांचा पूर्व भरणा करण्याच्या आधीन राहुन त्यासाठी संबंधित व्यक्तीकडून अर्जासोबत प्रशमन फी व विकास आकार यापोटी देय असलेल्या रकमेचा अंतर्भाव असलेला कोणत्याही बँकेवर काढलेला दर्शनी धनाकर्ष (डी.डी.) घेण्यात येवून त्या व्यक्तीस अर्ज पोहच पावती देण्यात येते. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 यातील नियम क्रमांक 9,70 (2), 73 (5), 78 (3), 97(5) आणि 107 अन्वये कार्यालयातील माहे मार्च,2013 मधील दाखल प्रकरण क्रमांक 18197 ते 18377 धनाकर्ष नोंदवही, चलन नोंदवही यांची पडताळणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.124 दि.15/9/14 रोजी निर्गमित केला असून नगररचना विभागाने त्याचे अनुपालन दि.19/9/14 रोजी दिले आहे. अनुपालनामध्ये 2012-13 या आर्थिक वर्षात नियमाप्रमाणे नोंदवह्या ठेवण्यात आल्या नसल्याचे मान्य केले आहे. यापुढे सर्व नोंदवह्या नियमाप्रमाणे विहित नमुन्यामध्ये ठेवण्याचे व यापुढे जमा झालेले धनाकर्ष तात्काळ बँकेत जमा करण्याचे मान्य केले आहे. याबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)संकलन नोंदवही, धनाकर्ष नोंदवही व पावती पुस्तके विहित नमुन्यात तयार करण्यात आलेल्या नाहीत. (नियम क्रमांक 9)

2)नमुना क्रमांक 13 च्या चलनावर रक्कम घेणारे लिपीक व रोखपाल यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. (नियम क्रमांक 9)

3)उपरोक्त नियमान्वये रोजची जमा विहित केलेल्या संकलन पुस्तकात नोंदवून दिवस अखेर ह्या पुस्तकांतील रकमांची बेरीज करून नमुना क्रमांक 13 प्रमाणे चलन तयार करून त्याच दिवशी महानगरपालिका कार्यालयात भरणा करणे आवश्यक असतांना प्रकरण क्रमांक 18197 ते 18377 च्या संदर्भात खालील प्रमाणे विलंब झाल्याचे दिसून आले. त्यामुळे बँकेमध्ये धनाकर्षाची रक्कम जमा झाले आहे. परंतू चलने लेखाशाखेकडे विलंबाने सादर केल्याने महानगरपालिकेच्या सर्वसाधारण रोकडवहीमध्ये या रक्कमांची नोंद त्वरीत झालेली नाही.

| अ.क्र. | प्रकरण क्रमांक पासून - पर्यंत पावती | दाखल दिनांक | चलन | विलंबाचे |
|---|---|---|---|---|

| | पुस्तकानुसार | | भरलेला दिनांक | दिवस |
|---|---|---|---|---|
| 1 | 18197 ते 18199 | 1.3.2013 | 30.3.2013 | 29 |
| 2 | 18200 ते 18203 | 4.3.2013 | 30.3.2013 | 26 |
| 3 | 18204 | 5.3.2013 | 30.3.2013 | 25 |
| 4 | 18205 | 6.3.2013 | 30.3.2013 | 24 |
| 5 | 18206 ते 18207 | 7.3.2013 | 30.3.2013 | 23 |
| 6 | 18208 ते 18211 | 8.3.2013 | 30.3.2013 | 22 |
| 7 | 18212 ते 18214 | 12.3.2013 | 30.3.2013 | 18 |
| 8 | 18215 ते 18216 | 13.3.2013 | 30.3.2013 | 17 |
| 9 | 18217 | 13.3.2013 | 4.5.2013 | 47 |
| 10 | 18218 ते 18226 | 14.3.2013 | 4.5.2013 | 46 |
| 11 | 18227 धनाकर्ष क्रमांक नाही व दिनांक नाही. | दिनांक नाही | 4.5.2013 | |
| 12 | 18228 ते 18229 | 15.3.2013 | 4.5.2013 | 45 |
| 13 | 18230 | 16.3.2013 | 4.5.2013 | 44 |
| 14 | 18231 | 18.3.2013 | 4.5.2013 | 41 |
| 15 | 18232 ते 18233 | 19.3.2013 | 4.5.2013 | 40 |
| 16 | 18234 | 19.3.2013 | 4.5.2013 | 40 |
| 17 | 18235 ते 18238 | 21.3.2013 | 4.5.2013 | 39 |
| 18 | 18239 ते 18248 | 22.3.2013 | 4.5.2013 | 38 |
| 19 | 18249 ते 18252 | 25.3.2013 | 13.5.2013 | 37 |
| 20 | 18253 ते 18259 | 27.3.2013 | 13.5.2013 | 34 |
| 21 | 18260 ते 18284 | 283.2013 | 13.5.2013 | 32 |
| 22 | 18285 ते 18329 | 30.3.2013 | 22.7.2013 | 31 |
| 23 | 18330 ते 18363 | 30.3.2013 | 22.7.2013 | 30 |
| 24 | 18364 ते 18377 | 31.3.2013 | 22.7.2013 | 30 |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 124 | 15/09/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATPLKM7501 |

| 139 | आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पदोन्नतीमधील अनियमितते बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 02 | सामान्य प्रशासन | स्वनिधी | 9अ | 03 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्रमांक वेतन -1109 प्र.क्र.44/ सेवा 3 दि.1 एप्रिल 2010 अन्वये अश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ देताना, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एस आर व्ही-1095/प्र.क्र.1/95/बारा, मंत्रालय, मुंबई 400032 दि.08.06.1995 मधील परिच्छेद 2 (ब) अन्वये या योजने अंतर्गत वरीष्ठ वेतनश्रेणी मिळण्यासाठी पदोन्नतीसाठी विहित कार्यपध्दती , जेष्ठता, पात्रता, अर्हता,विभागीय परीक्षा या बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त कर्मचा-यांना या योजनेचा लाभ देतांना त्यांची वरिष्ठ लिपिक पदासाठीची 10 वी पास, LSSGD परीक्षा पास ही शैक्षणिक अर्हता धारण केलेली दिसून येत नाही. तरीही खालील आठ कर्मचा-यांना नियमबाहयरित्या आश्वासित प्रगती योजनेचा लाभ दिला आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका आयुक्त यांचे आदेश क्रमांक 67 दि.17.07.2012 व आदेश क्र.निरंग/2012-13 दि.13.08.2012 अन्वये खालील कर्मचा-यांना त्यांचे नावासमोर नमुद तारखेपासून आश्वासित प्रगती योजने अंतर्गत लाभ देण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

| अ.क्र. | कर्मचा-यांचे नांव | पद | योजनेचा लाभ दिनांक पासून - पर्यंत | | पात्रता | वेतन निश्चिती आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | | |
| 1 | श्री.पाटील जलगोंडा सिदगोंडा | क.लिपिक | 19.12.1983 | 19.12.1995 | s.s.c. नापास | 17.07.2012 |
| 2 | श्री.पाटील शितल आदगोंडा | क.लिपिक | 16.09.1985 | 16.09.1997 | s.s.c. नापास | 17.07.2012 |
| 3 | श्री.सुर्यवंशी जगदीश दत्तात्रय | क.लिपिक | 19.09.1985 | 16.09.1997 | s.s.c. नापास | 17.07.2012 |
| 4 | श्री.जगताप श्रीकृष्ण बंडू | क.लिपिक | 19.09.1985 | 16.09.1987 | s.s.c. नापास | उपलब्ध नाही |
| 5 | श्री.चिंचणे बाळू खंडू | क.लिपिक | 11.09.1986 | 11.09.1998 | s.s.c. नापास | 17.07.2012 |
| 6 | श्री.पवार जयवंत शंकर | क.लिपिक | 11.09.1986 | 11.09.1998 | s.s.c. नापास | 17.07.2012 |
| 7 | श्री.मुनीर इब्राहिम झारी | क.लिपिक | 18.12.1990 | 18.12.2002 | s.s.c. नापास | 13.08.2012 |
| 8 | श्री.घुडूलाल इमा मुश्रीफ | क.लिपिक | 19.09.1985 | 19.09.1997 | s.s.c. नापास | 17.07.2012 |

1) महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्रमांक वेतन -1109 प्र.क्र.44/ सेवा 3 दि.1 एप्रिल 2010 अन्वये अश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ देताना, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एस आर व्ही-1095/प्र.क्र.1/95/बारा, मंत्रालय, मुंबई 400032 दि.08.06.1995 मधील परिच्छेद 2 (ब) अन्वये या योजने अंतर्गत वरीष्ठ वेतनश्रेणी मिळण्यासाठी पदोन्नतीसाठी विहित कार्यपध्दती , जेष्ठता, पात्रता, अर्हता,विभागीय परीक्षा या बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त कर्मचा-यांना या योजनेचा लाभ देतांना त्यांची वरिष्ठ लिपिक पदासाठीची 10 वी पास,LSSGD परीक्षा पास ही शैक्षणिक अर्हता धारण केलेली दिसून येत नाही. त्यामुळे शासन निर्णयाचे उल्लंघन करून अश्वासित प्रगती योजनेचा लाभ दिलेला आहे.

2)वेतन निश्चिती आदेशानुसार सदर कर्मचा-यांना दि.17.07.2012 व 21.08.2012 रोजी वेतन निश्चिती करण्यात आली असून त्यांना माहे सप्टेंबर, 2013 पासूनच्या वेतन देयकान्वये सुधारीत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देऊन वेतन अदा करण्यात आले आहे. परंतु वरीष्ठ वेतनश्रेणी मंजुर केलेबाबतची व

| |
|---|
| त्यानुसार वेतन निश्चिती केलेबाबतची कोणत्याही प्रकारची नोंद सेवापुस्तकात घेतल्याचे आढळून येत नाही.<br>**अर्धसमास ज्ञापन क्र.126 दि.15/9/14 चे अनुपालन** आस्थापना विभागाने दि.23/9/14 रोजी दिले आहे. अनुपालनामध्ये दि.18/4/12 रोजी विभागीय पदोन्नती समिती बैठकीमध्ये ज्या कर्मचा-यांनी पदोन्नतीची शैक्षणिक अहर्तता प्राप्त केली नाही. मात्र कनिष्ठ लिपिक या पदावर तीन वर्षाचा अनुभव आहे. तो विचारात घेवून पदोन्नती देण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार सदर कर्मचा-यांना पदोन्नती दिली असल्याचे नमूद केले आहे. तथापि पदोन्नती समितीने शासन निर्णयाच्या विरुध्द शिफारस केली आहे. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 126 | 15/09/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATPLKM7501 |

| 140 | न्यायालयीन कामकाजासाठी केलेल्या वकील नेमणुकी मधील अनियमिततेबाबत . | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 18 | विधी विभाग | स्वनिधी | 9ड | 03 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 62147 | | | |

| |
|---|
| मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 481 (1) ज प्रमाणे कायदेविषयक सल्ला व साह्य मिळविण्यासाठी वकीलांची नेमणुक व त्यांच्या फी चा दर आयुक्तांनी महानगरपालिकेची मान्यता घेवुन ठरविणे आवश्यक आहे. परंतु आयुक्तांनी मान्यता न घेताच वकीलांची नेमणुक करुन त्यांना फी ची रक्कमही आदा केली आहे. त्यामुळे सदर प्रकरणांची वकीलांना आदा केलेली फी रु. 62147/- आक्षेपाधिन |

ठेवण्यात येत आहे.

सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिकेच्या अधिनस्त विधी विभागाचे वित्तीय वर्ष 2012-13 चे लेखापरीक्षणामध्ये, दावा रजिस्टरची तपासणी केली असता खालीलप्रमाणे एकूण 855 दावे खालील कोर्टात प्रलंबित असल्याचे दिसुन येते.

4. सांगली व मिरज कोर्टात एकूण दिवाणी दावे :- 749
5. सांगली व मिरज कोर्टात एकूण फौजदारी दावे :- 13
6. उच्च न्यायालयातील दावे :- 93
7. सर्वोच्च न्यायालयातील दावे :- निरंक

2012-13 या वित्तीय वर्षात सांगली,मिरज व उच्च न्यायालयामध्ये सांगली कडील 132 व मिरजकडील 29 अशा एकूण 161 दाव्यांचा निकाल लागला आहे.

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)नगरपालिका लेखा संहिता 1971 मधील नियम क्र.121 व नमुना क्रमांक 90 नुसार दावा रजि.नं. 20 ठेवण्यात आले आहे. 2012-13 मध्ये या रजिस्टरच्या पृष्ठ क्र. 19 मध्ये वादी - मा.आयुक्त, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका, प्रतिवादी - श्री. गणपती पंचायत संस्थान, सांगली. दाव्यांचे स्वरुप - जुने रेल्वे स्टेशन सिटी सर्व्हे नं.341 सांगली, जवळील unnumbered जागे बाबत आहे. सदरहू जागेबाबत ॲड.शाम जाधव चौकशी करण्यासाठी नगर भूमापन अधिकारी कार्यालय, सांगली येथे गेले होते. मा.आयुक्त मनपा यांचे दि.08.10.2012 रोजीच्या मंजुरीने चौकशी करणेबाबत ॲड. शाम जाधव यांना वकील फी रु.27,147/- आदा करण्यात आली आहे. महासभा ठराव क्र. 34 दि.10.10.2008 नुसार महानगरपालिकेने न्यायालयीन कामकाजासाठी वकीलांचे पॅनेल नियुक्त केले आहे. या पॅनेलमध्ये ॲड. शाम जाधव यांचा समावेश नसतानाही त्यांना काम देण्यात आले आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 481 (1) ज प्रमाणे असा कायदेविषयक सल्ला व साहय मिळविण्यासाठी वकीलांची नेमणुक आयुक्तांनी महानगरपालिकेची मान्यता घेवुन करणे आवश्यक आहे. तसेच वकीलास द्यावयाच्या फी ची मान्यता सर्वसाधारण सभेकडुन घेणे आवश्यक असता आयुक्तांनी महानगरपालिकेची मान्यता न घेताच ॲड.शाम जाधव यांची नेमणुक करुन त्यास फी ची रक्कम दिली आहे. अर्धसमास ज्ञापन क्र.127 दि.15/9/14 चे अनुपालन विधी विभागाने दि.17/9/14 रोजी दिले असुन स्थायी समिती ठराव क्र.140 दि.27/11/1998 नुसार व आयुक्त यांचे दि.1/12/98 चे आदेशानुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 481 (1) ज प्रमाणे असा कायदेविषयक सल्ला व साहय मिळविण्यासाठी मनपा पॅनेलवरील वकीलांची दाव्याच्या कामी नेमणुक करण्याचे अधिकार उपायुक्तांना दिल्याचे नमुद आहे. परंतु पॅनेलवर नसलेल्या वकीलाची नेमणुक महासभेच्या मान्यतेशिवाय केली आहे.

2)नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम क्र. 121 प्रमाणे नमुना क्र. 90 मधील नोंदवहीतील पृष्ठ क्र.32 मध्ये उच्च न्यायालय मुंबई यांनी सांगली मिरज कुपवाड मनपा व इतरां विरुध्द कोर्टाचा अवमान केल्या बद्दल क्रिमिनल अवमान याचिका दाखल केल्याची नोंद आहे. या कामी ॲड. कुलदीप पाटील, उच्च न्यायालय, मुंबई यांची नियुक्ती केली होती. सदर कामी वकीलांना फी पोटी रु.35000/- आदा केले आहेत.

| |
|---|
| महासभा ठराव क्र.34 दि.10.10.2008 नुसार मान्य केलेल्या मनपाच्या वकील पॅनेलवर या वकीलांची नियुक्ती करण्यात आलेली नसतानाही वकील फी आदा करण्यात आल्याचे निदर्शनास येते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 481 (1) ज प्रमाणे वकीलांच्या नेमणुकीस महानगरपालिकेच्या ठरावाने मान्यता घेण्यात आलेली नाही. अनुपालनामध्ये सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात आली नसल्याचे मान्य केले आहे.<br>3)सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वकील पॅनलची मुदत दि.10.10.2012 रोजी संपल्यानंतर मा.आयुक्त यांच्या दि.21.06.2012 चे मंजुरीने 1 वर्षाची दि.10.10.2013 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. परंतु दि.10.10.2013 रोजीच्या वकील पॅनल बाबतची अंतिम मंजुरी दि.20.08.2014 रोजी झाल्याचे दिसून येते. नवीन वकील पॅनल नेमणुकी दरम्यान न्यायालयीन प्रकरणात कोणत्या वकीलांनी महानगरपालिकेच्या वतीने वकीलपत्र दाखल केले व ते कशाच्या आधारे केले हे समजुन येत नाही. अनुपालनामध्ये स्थायी समिती ठराव क्र.140 दि.27/11/1998 नुसार व आयुक्त यांचे दि.1/12/98 चे आदेशानुसार उपायुक्त यांची मान्यता घेवुन मनपा दाव्यामध्ये वकीलपत्र देण्यात आली असल्याचे नमुद आहे. परंतु मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 481 (1) ज प्रमाणे वकीलांच्या नेमणुकीस महानगरपालिकेच्या ठरावाने मान्यता घेण्यात आलेली नाही.<br>अर्धसमास ज्ञापन क्र.127 दि.15/9/14 रोजी निर्गमित केला असुन विधी विभागाने त्याचे अनुपालन दि.17/9/14 रोजी सादर केले आहे.<br>**आक्षेपाधिन रक्कम रु. 62147/-** |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 127 | 15/09/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATPKCM7101 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 141 | अंदाजपत्रक : अर्थसंकल्पावरील भाष्य. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| | | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 07 | लेखा | महानगरपालिका | 9अ | 16 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

महानगरपालिकेने अंदाजपत्रक तयार करताना प्रथम खर्चाच्या बाबींचा विचार करुन त्यानुसार जमेच्या रकमा अवास्तव वाढविल्या आहेत. अंदाजपत्रकीय जमा अंदाजाच्या 56.25% महसुल जमा झाला असुन खर्च अंदाजाच्या 39.35% खर्च वर्षअखेरीस करण्यात आला आहे. सुधारित अर्थसंकल्पात महसुली जमेचे अंदाज वर्तविताना 1. महानगरपालिका कर व दर, 2.अनुदाने व अंशदाने, 3. एकत्रित पाणीपुरवठा व मलनि:सारण इ. जमा बाबींवर सरासरीपेक्षा 50 ते 95% वाढ दर्शविण्यात आली आहे व त्यानुसार खर्चाच्या बाबींवरही अतिरिक्त वाढ दर्शविण्यात आली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971चे नियम 26(8) नुसार जर जमा व खर्च यांचे आकारामध्ये असामान्य चढ-उतार होत असतील तर अशा चढ-उतारांच्या कारणांसह संक्षिप्त स्पष्टीकरण अर्थसंकल्पात देणे आवश्यक असताना ते देण्यात आलेले नाही.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे 2012-13 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 95 नुसार दि. 17/01/2012 रोजी स्थायी समितीकडे सादर केले असुन, स्थायी समितीने सभा क्र.29 ठराव क्र.567 दि. 30/01/2012 ने त्यामध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करुन सर्वसाधारण सभेस सादर केले आहे. सर्वसाधारण विशेष सभा विषय क्र.01 ठराव क्र. 239 दि.31/3/2012 अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 100 नुसार अंदाजपत्रकास मान्यता दिली आहे. सुधारित अर्थसंकल्पात महसुली जमेचे अंदाज वर्तविताना 1. महानगरपालिका कर व दर 2.अनुदाने व अंशदाने 3. एकत्रित पाणीपुरवठा व मलनि:सारण इ. जमा बाबींवर मागील वर्षाच्या जमेच्या सरासरीपेक्षा 50 ते 95 टक्के वाढ दर्शविण्यात आली आहे व त्यानुसार खर्चाच्या बाबींवरही अतिरिक्त वाढ दर्शविण्यात आली आहे.

आयुक्त यांनी 2012-13 या आर्थिक वर्षासाठी रु.290 कोटी 57 लाख जमेचे (महसुली जमा 196 कोटी 99 लाख व भांडवली जमा रु.79 कोटी 59 लाख ) व रु.289 कोटी 96 लाख खर्चाचे (महसुली खर्च रु. 121 कोटी 31 लाख व भांडवली खर्च रु.168 कोटी 64 लाख ) अंदाजपत्रक तयार केले आहे.

| **जमा** | खर्च |
|---|---|

| लेखा शिर्ष | रक्कम रुपये | लेखा शिर्ष | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| सु(ब भांडवली सह) .शि.स. | 139808400 | | |
| भाग महसुली जमा अ 1 | | भाग महसुली खर्च अ 1 | |
| अ - महानगरपालिका दर व कर | 255650000 | अ - सामान्य प्रशासन | 307988000 |
| ब - कराव्यतिरिक्त खास कायद्यावये उत्पन्न | 882100000 | ब - सार्वसुरक्षितता . | 68358000 |
| क - मालमत्ता व उपयोगिता सेवा यांचेपासुन पत्पन्न | 35050000 | क - सार्वआरोग्य व सोयी . सुविधा | 408199000 |
| ड - अनुदाने व अंशदाने | 76373000 | ड - सार्वशिक्षण . | 108550000 |
| इ - संकिर्ण | 170698000 | इ - संकिर्ण | 112434000 |
| महसुली जमा अ अंदाजपत्रक एकूण | 1419871000 | महसुलीचा खर्च अ अंदाजपत्रक एकूण | 1005529000 |
| भाग महसुली जमा क 1 अंदाजपत्रक | | भाग महसुली खर्च क 1 अंदाजपत्रक | |
| अ - जलनिसारण विभाग: | 202011000 | अ - जलनिसारण विभाग: | 45656000 |
| ब - पाणी पुरवठा विभाग | 348100000 | ब - पाणी पुरवठा विभाग | 161980000 |
| भाग महसुली जमा क 1 अंदाजपत्रक एकूण | 550111000 | महसुली खर्च क अंदाजपत्रक एकूण | 207636000 |
| महसुली जमा अ व क अंदाजपत्रक एकूण | 1969982000 | महसुली खर्च अ व क अंदाजपत्रक एकूण | 1213165000 |
| भाग भांडवली जमा अ 2 अंदाजपत्रक | 25610000 | भाग भांडवली खर्च अ 2 अंदाजपत्रक | 856181300 |

| | | | |
|---|---|---|---|
| भाग भांडवली 2जमा क अंदाजपत्रक | | भांडवली खर्च क अंदाजपत्रक | |
| भांडवली जमा अ व क अंदाजपत्रक एकूण | 25610000 | भांडवली खर्च अ क अंदाजपत्रक एकूण | 856181300 |
| भाग दुबेरजी जमा 3 | 269255000 | भाग दुबेरजी खर्च 3 | 269255000 |
| भांडवली जमा ब | 501100000 | भांडवली खर्च ब | 561000000 |
| एकूण जमा | 2765947000 | एकूण खर्च | 2899601300 |
| सुरूवातीचे शिलकेसह एकूण जमा | 2905755400 | अखेर शिल्लक + एकूण खर्च | 2899601300 |
| | | संभाव्य शिल्लक | 6154100 |
| | | एकूण खर्च | 2905755400 |

1. अर्थसंकल्पात महसुली व भांडवली जमेचा अंदाज एकुण रु. 290 कोटी 57 लाख इतका वर्तविण्यात आला होता परंतु प्रत्यक्षात रु. 254.18 कोटी महसुल जमा झाला आहे. तसेच खर्च बाजुस रु. 289 कोटी 96 लाख महसुली व भांडवली खर्चाचा अंदाज वर्तविण्यात आला होता. परंतु प्रत्यक्षात महसुली व भांडवली खर्च रु.175.94 कोटी करण्यात आला आहे. अंदाजपत्रकाच्या तपासणी अंती असे दिसते की, अंदाजपत्रक तयार करताना प्रथम खर्चाच्या बाबींचा विचार करुन त्यानंतर त्यानुसार जमेच्या रक्कमा अवास्तव वाढविण्यात आल्या आहेत. वरील विवरणपत्राचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की अंदाजपत्रकीय जमा अंदाजाच्या 56.25% महसुल प्रत्यक्ष जमा झाला आहे व खर्च अंदाजाच्या 39.35% खर्च वर्ष अखेरीस करण्यात आला आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 च्या नियम 26 (3) व 26 (4) नुसार अर्थसंकल्प तयार करताना मागील तीन वर्षाच्या जमा व खर्चाच्या प्रत्यक्ष रकमा, दर व करात करण्यात आलेली वाढ, महानगरपालिकेच्या मालमत्तेत झालेली वाढ वा घट, पालिका हद्दीत जमीन व इमारतीत झालेली वाढ वा घट या अनुषंगाने जमेशी निगडीत खर्चाचे अंदाज वर्तविणेत आलेले नाहीत.

2.महानगरपालिकेचा मागील तीन वर्षाचा महसुली प्रत्यक्ष जमा व खर्च पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | प्रत्यक्ष जमा रु. | प्रत्यक्ष खर्च रु. |
|---|---|---|---|
| 1 | 2010-11 | 1159260965 | 1023639455 |
| 2 | 2011-12 | 1481445712 | 1033480135 |
| 3 | 2012-13 | 1573459540 | 1110309441 |
| | एकुण | 4214166217 | 3167429031 |
| | सरासरी | 1404722072 | 1055809677 |

नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम 26(3) नुसार उत्पन्नाचे अंदाज हे मागील तीन वर्षाच्या जमेच्या तुलनेवर अधारलेले असले पाहिजेत, तसेच नियम 26(4) नुसार एकुण खर्चाचे अंदाज हे मागील तीन वर्षाच्या प्रत्यक्ष खर्चाची सरासरी अथवा अर्थसंकल्पीय वर्षाची अंदाजीत जमा या दोहोपैकी जी कमी असेल त्यापेक्षा अधिक असू नयेत. परंतू महानगरपालिकेच्या 2010-11 ते 2012-13 या तीन आर्थिक वर्षातील प्रत्यक्ष महसुली जमेची सरासरी रु.140 कोटी 47 लाख व महसुली खर्चाची सरासरी रु. 105 कोटी 58 लाख आहे. महानगरपालिकेच्या 2012-13 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकाची तपासणी केली असता महानगरपालिकेच्या महसुली जमेचा अंदाज प्रशासनाने रु.196 कोटी 99 लाख तयार केला असुन स्थायीने तो रु. 208 कोटी 99 हजार व महासभेने रु.222 कोटी 09 लाख इतका वाढवला आहे. प्रशासनाने मागील तीन वर्षाची प्रत्यक्ष जमेची सरासरी रु.140 कोटी 47 लाख या रक्कमे इतके अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असता रु.196 कोटी 99 लाखाचे तयार केले असुन रु.56.52 कोटीची वाढ केली आहे व महासभेने त्यामध्ये रु.81.62 कोटीची वाढ केली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम 26(3) नुसार करापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे व ज्यासाठी ठराविक मागणी असते अशा मार्गाने येणाऱ्या उत्पन्नाचे अंदाज मागील तीन वर्षाच्या प्रत्यक्ष जमेच्या सरासरीपर्यंत मर्यादित असावेत अथवा त्या वर्षाची मागणी अधिक वसुलीयोग्य वाजवी टक्केवारी यापैकी जी कमी असेल तेवढे असणे आवश्यक असता प्रशासनाने त्याप्रमाणे कार्यवाही न करता त्यामध्ये नियमबाह्यरित्या वाढ केल्याचे दिसुन येते.

1. मागील तीन वर्षाचे करापासून मिळणारे उत्पन्न 2010-11 चे रु.115 कोटी 92 लाख, 2011-12 चे रू.148 कोटी 14 लाख व 2012-13 चे रू.157 कोटी 34 लाख असुन त्याची एकूण सरासरी रु.140 कोटी 47 लाख येते. परंतु आयुक्त यांनी रु.196 कोटी 99 लाखाचा अंदाज

सुचविला आहे. तो वरील नियमाशी पूर्णपणे विसंगत आहे. 2011-12 या आर्थिक वर्षात एकुण महसुली व भांडवली जमा रु.252.72 लाख व खर्च रु.200 कोटी 43 लाख झाला आहे. आयुक्त यांनी 2012-13 या आर्थिक वर्षाचे जमा व खर्चाचे अंदाजपत्रक रू.290 कोटी 57 लाखाचे केले आहे. म्हणजेच मागील वर्षाच्या प्रत्यक्ष जमेपेक्षा रु.37.85 कोटी वाढ करण्यात आली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1949 नियम 26(8) नुसार जर जमा व खर्च यांचे आकारामध्ये असामान्य चढ-उतार होत असतील तर येथे अशा चढ-उतारांच्या कारणांसह संक्षिप्त स्पष्टीकरण देणे आवश्यक असताना ते देणेत आलेले नाही.

| आयुक्त जमा अंदाज | | जमा अंदाज | | जमा |
|---|---|---|---|---|
| लेखा शिर्ष | रक्कम रुपये | स्थायी | सर्वसाधारण | प्रत्यक्ष |
| भाग 1 महसुली जमा अ | | | | |
| अ - मनपा दर व कर | 255650000 | 224550000 | 224550000 | 173236232 |
| ब - कराव्यतिरिक्त खास कायद्यान्वये उत्पन्न | 882100000 | 962100000 | 1106100000 | 960720650 |
| क - मालमत्ता,फि व उपयोगिता सेवांचे उत्पन्न | 35050000 | 155981000 | 155981000 | 106026912 |
| ड अनुदाने व अंशदाने | 76373000 | 76373000 | 76373000 | 37803047 |
| इ - संकिर्ण | 170698000 | 69567000 | 69567000 | 117594965 |
| महसुली जमा अ अंदाजपत्रक एकूण | 1419871000 | 2089982000 | 2220919000 | 1573459540 |
| महसुली जमा क अंदाजपत्रक | | | | |
| जलनि:सारण | 202011000 | 232011000 | 223948000 | 21176435 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पाणीपुरवठा | 348100000 | 368100000 | 368100000 | 156610747 |
| भाग 1 महसुली जमा क अंदाजपत्रक एकूण | 550111000 | 600111000 | 592048000 | 177787182 |
| महसुली जमा अ व क अंदाजपत्रक एकूण | 1969982000 | 2690093000 | 2812967000 | 1751246722 |
| भांडवली जमा अ अनुदान | 25610000 | 55610000 | 55610000 | 106579216 |
| दुबेरजी | 269255000 | 269255000 | 269255000 | 272788886 |
| भांडवली जमा ब अनुदान | 501100000 | 5011100000 | 5011100000 | 730994685 |
| एकुण | 2765947000 | 2915947000 | 3051884000 | 2683822330 |
| सुरूवातीचे शिल्लकेसह एकूण जमा | 2905755400 | | | |

4. महानगरपालिकेच्या 2012-13 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकाची व प्रत्यक्ष जमेची तपासणी केली असता महानगरपालिकेच्या महसुली जमेचा अंदाज प्रशासनाने रु.196 कोटी 99 हजारचा तयार केला असुन स्थायीने तो रु.208 कोटी 99 हजार व महासभेने रु.222 कोटी 09 लाख इतका वाढवला आहे. प्रशासनाने केलेल्या अंदाजपत्रकामध्ये महानगरपालिकेने 112.74 टक्के वाढ केली आहे. महानगरपालिकेने 14-15 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक स्थायी समितीस पाठविले असुन त्यामध्ये 12-13 या आर्थिक वर्षात प्रत्यक्ष महसुली जमा रु.157 कोटी 34 लाख इतकी झाल्याचे नमुद आहे. त्यामुळे महानगर पालिकेस अंदाजित केलेल्या रक्कमेपेक्षा रु.64.75 कोटी कमी उत्पन्न प्राप्त झालेचे स्पष्ट होते. महानगरपालिकेस अंदाजित रक्कमेच्या 70 टक्के महसुली उत्पन्न प्राप्त झाल्याचे दिसुन येते.

5. मनपा दर व कर या लेखाशिर्षांतर्गत घरपट्टी विभागाच्या जमा रक्कमांचा समावेश आहे. 12-13 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकामधील पृष्ठ क्र.14 वर घरपट्टी विभागाकडील जमा महानगरपालिकेने रु. 29 कोटी 91 लाख इतकी अंदाजित केली आहे. परंतु प्रत्यक्षात रु. 19 कोटी 03 लाखांचे उत्पन्न महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे. म्हणजेच महानगरपालिकेस सरासरी 63.62 टक्के उत्पन्न प्राप्त झाले आहे. घरपट्टी विभागाकडुन अपेक्षित उत्पन्न प्राप्त होणेसाठी विशेष प्रयत्न होणे गरजेचे आहे.

6. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड प्रकरण 8 नियम क्र.41 नुसार अधिनियम 2009 च्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी या अधिनियमान्वये ज्यासाठी बिल देण्यात आले आहे. असा कोणताही मालमत्ता कर पूर्णपणे किंवा अंशतः अदत्त राहीला असेल, ज्या व्यक्तीने असा कर भरलेला नाही ती व्यक्ती उक्त 2009 च्या सूधारणा अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास व दिनांकापासून, या कलमान्वये तरतूद केल्या प्रमाणे, अशा करावरील शास्ती भरण्यास जबाबदार असेल.त्याप्रमाणे उपरोक्त थकबाकीवर 2% प्रमाणे 9 महीन्याचे 18% व्याज घेणे आवश्यक आहे. 12-13 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये कर निर्धारण व संकलन विभागाचे 11-12 चा दुरुस्त व 2012-13 च्या अर्थसंकल्पाच परिशिष्ठ पृष्ठ क्र.15 वर जोडले आहे. त्यामध्ये 11-12 या वर्षाची थकबाकी रु.14 कोटी 67 लाख दाखविली आहे. त्यामुळे नियमाप्रमाणे या रक्कमेवर 18 टक्के प्रमाणे व्याज आकारुन रु. 2 कोटी 64 लाख या रकमेचा समावेश अंदाजपत्रकामध्ये करणे आवश्यक असता तो करण्यात आलेला नाही. 12-13 या आर्थिक वर्षाची घरपट्टी विभागाची चालु मागणी रु. 25 कोटी 14 लाख दर्शविली आहे. चालु मागणीशी थकबाकीशी तुलना केली असता थकबाकीचे प्रमाण 58.35 टक्के इतके आहे.

ब - कराव्यतिरिक्त खास कायद्यान्वये उत्पन्न या लेखा शिर्षांतर्गत जकातीपासुन मिळणारे उत्पन्न रु.110.61 लाख अंदाजित केले आहे. परंतु प्रत्यक्षात रु. 96 कोटी 07 लाख प्राप्त झाले असल्याने सरासरी जमा 86.85 टक्के इतकी आहे.

7.मालमत्ता विभागाकडुन 12-13 या आर्थिक वर्षामध्ये रु. 3 कोटी 37 लाख उत्पन्न अंदाजित केले होते परंतु प्रत्यक्षात रु.1 कोटी 24 लाख इतकेच उत्पन्न प्राप्त झाले आहे. महानगरपालिकेस या विभागाकडुन 36.80 टक्के इतके उत्पन्न प्राप्त झाले आहे. मालमत्ता विभागाने मागील तीन वर्षामधील अंदाजपत्रकामध्ये रॉकेल डेपोपासुन मिळणारे उत्पन्न रु.50 लाख अंदाजित केले आहे. परंतु सदर रक्कम वसुल करणेबाबत कोणतीही कार्यवाही मालमत्ता विभागाकडुन झालेली नसल्याने अंदाजपत्रकामधील अंदाज फुगविण्यात आलेचे स्पष्ट होते.

8.पाणीपुरवठा व जलनि:सारण शिर्षांतर्गत एकुण रु.59 कोटी 20 लाख मिळणार असलेचे अंदाजित केले आहे. जलनि:सारण शिर्षांतर्गत मिळणारे उत्पन्न रु.22.39 कोटी अंदाजित केले आहे. यामध्ये नगरोत्थान योजनेच्या मनपा हिश्श्यापोटी कर्ज रु.20 कोटी उभारण्याच्या रक्कमेचा समावेश आहे. परंतु प्रत्यक्ष जमा बाजूची तपासणी केली असता महानगरपालिकेस रु.17 कोटी 77 लाख प्राप्त झाले आहेत. नगरोत्थान योजनेअंतर्गत रु.20 कोटी कर्ज उभारणीचे प्रयत्न न केलेने जलनि:सारण विभागाकडुन रु. 2 कोटी 11 लाख इतकेच उत्पन्न प्राप्त झाले आहे. तसेच नगरोत्थान योजनेसाठी काढण्यात येणा-या कर्जाची परत फेड कशाप्रकारे करण्यात येणार आहे याबाबतची तरतुद अंदाजपत्रकामध्ये करण्यात आलेली नाही. नगरोत्थान योजनेसाठी शासनाकडुन 12-13 या आर्थिक वर्षात रु. 20 कोटी अनुदान प्राप्त होणार असलेचे

अंदाजपत्रकामध्ये अंदाजित केले आहे. व प्रत्यक्षात रु. 7 कोटी अनुदान शासनाकडुन प्राप्त झाले आहेत. परंतु महानगरपालिकेने या योजनेच्या खर्चासाठी स्वनिधी हिस्सा म्हणुन कर्ज उभारणीसाठी कोणतेही प्रयत्न केलेले नाहीत. यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजने अंतर्गत शासनाकडुन 12-13 या आर्थिक वर्षात रु. 35 कोटी 36 लाख व सुजल निर्मल योजनेसाठी रु.11 कोटी 33 लाख प्राप्त झालेचे आयुक्त यांनी स्थायी समितीस सादर केलेल्या 2013-14 चे सुधारित व 2014-15 चे मूळ अंदाजपत्रकामध्ये नमुद आहे.

9.पाणीपुरवठा विभागाच्या 2012-13 या आर्थिक वर्षाच्या जमा बाजुस अंदाजपत्रकामध्ये मिटरने पाणीपुरवठा करणे या लेखाशिर्षांतर्गत रु. 22 कोटीची जमा अंदाजित केली आहे. परंतु प्रत्यक्षात रु.15 कोटी 13 लाख इतकेच उत्पन्न प्राप्त झाले आहे. जमेची एकुण टक्केवारी 68.77 टक्के इतकीच आहे.

यु.आय.डी.एस.एस.एम.टी. व सुजल निर्मल योजनेच्या मनपा हिस्सापोटी कर्ज अनुक्रमे रु. 10 कोटी व रु. 4 कोटी काढणेचे प्रस्तावित केले आहे. प्रत्यक्षात कर्ज काढले नसल्यामुळे तसेच महानगरपालिकेचे जमेचे मुख्य स्त्रोत असलेल्या मिटरने पाणीपुरवठा करणे या लेखाशिर्षांतर्गत अपेक्षित जमा झालेली नाही. त्यामुळे शासन निधीतुन चालु असलेल्या वरील योजनासाठी महानगरपालिकेने स्वनिधीची रक्कम उभी केली नसल्याने निधी अभावी या योजनांची प्रगती रेंगाळणार असल्याचे स्पष्ट होते.

10. 2012-13 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रामध्ये दुबेरजी जमा बाजू पृष्ठ क्र.11 वर द्विनोंद कोड 35085 ने कामगार कल्याण निधी नगररचना विभाग या लेखाशिर्षाखाली रु. 1 कोटी जमेचा अंदाज केला आहे. महानगरपालिकेने 2014-15 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक स्थायी समितीस पाठविले असुन त्यामध्ये 2012-13 या आर्थिक वर्षात ड किरकोळ या प्रधान जमा लेखाशिर्षांतर्गत द्विनोंद कोड C024 इतर जमा कामगार कल्याण निधी नगररचना विभाग या शिर्षांतर्गत रु.6 कोटी 06 लाख जमा झालेचे दिसुन येते. सदर रक्कम शासनास भरणे आवश्यक असलेने ती दुबेरजी जमा या लेखाशिर्षांतर्गत घेणे आवश्यक होते. परंतु ती न घेतल्याने महानगरपालिकेची जमा चुकीच्या पध्दतीने वाढलेची दिसते. एकुण महसुली जमा रु.157 कोटी 34 लाख मधुन रु.6 कोटी 06 लाख वजा जाता रु.151 कोटी 28 लाख इतकेच महसूली उत्पन्न प्राप्त झाले आहे.

11.नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 26(2) प्रमाणे अंदाजपत्रकीय वर्षारंभापूर्वी जी विदयमान देणी फेडता येणे अशक्य असतील अशांची खत्री करुन घेवुन त्यांची तरतुद त्या वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये आवश्यक आहे. त्याप्रमाणे अंदाजपत्रकातील पान न.64 वर द्विनोंद कोड 41254 नुसार 12-13 मध्ये लेखाशिर्ष व तरतूद असलेल्या व परंतु 13-14 वर्षात लेखाशिर्ष व तरतूद नसलेली तसेच लेखाशिर्षावर तरतूद शुन्य असलेली आदा करावयाची देयके या लेखाशिर्षांतर्गत रु.13 कोटी 24 लाखाची तरतूद केली आहे. अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे मागील वर्षामध्ये खर्च केल्याने व त्यावर्षी प्रत्यक्षात महसुल जमा न

झाल्याने इतक्या मोठ्या प्रमाणात देयके प्रलंबित राहिलेचे स्पष्ट होते. बजेट तरतुद आहे परंतु प्रत्यक्ष निधीची तरतुद असलेबाबत लेखाविभागाचे अभिप्राय घेणे आवश्यक असता ते घेण्यात आलेले नाहीत. महानगरपालिकेने अंदाजपत्रकाप्रमाणे जमा महसूल वाढविणेसाठी मोठया प्रमाणात करांची वसूली करणे आवश्यक आहे.

12. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 102 नुसार संपूर्ण अर्थसंकल्पीय अनुदान किंवा त्याचा कोणताही भाग, ज्या वर्षासाठी ते अनुदान अर्थसंकल्पीय अंदाजात समाविष्ट करणेत आले असेल त्या वर्षाचे अखेरीस खर्च न होता तसेच राहिले असेल व ते पुढील दोन वर्षापैकी कोणत्याही वर्षाचे अर्थसंकल्पात नमुद केलेल्या यथास्थिती नगरपालिका निधीच्या प्रारंभिक शिल्लकेत हिशेबात घेतले नसेल तर स्थायी समिती किंवा परिवहन समितीस यथास्थिती असे अर्थसंकल्पीय अनुदान किंवा त्याची खर्च न झालेली रक्कम पुढील दोन वर्षाचे मुदतीत कोणत्याही अन्य प्रयोजनासाठी किंवा उदिष्टासाठी नव्हे तर ज्यासाठी ते अर्थसंकल्पीय अनुदान मंजुर करणेत आले होते ते प्रयोजन किंवा उद्दिष्ट हे, मुळ उद्देशा प्रमाणे किंवा मंजुरीप्रमाणे साध्य करणेसाठी खर्च करणेस मंजुरी देता येईल. या अधिनियमातील तरतुदी प्रमाणे महानगरपालिकेने मागील दोन वर्षातील न केलेल्या कामांची यादी अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार तयार करुन त्या यादीतील प्रलंबित कामे प्राधान्याने करणे आवश्यक आहे. परंतु महानगरपालिकेने त्याप्रमाणे कामांची यादी तयार केली नसल्याने मागील प्रलंबित असलेल्या कोणत्या कामावर किती खर्च केला आहे ते समजून येत नाही.

13. आर्थिक वर्ष 2012-13 मध्ये एकुण महसुली जमा रु.157 कोटी 34 लाख पैकी रु.49.67 कोटी इतकी रक्कम कर्मचा-यांच्या वेतन व भत्त्यापोटी खर्च करण्यात आली आहे. तसेच निवृत्तीवेतन व कुटूंब निवृत्ती वेतनावर रु.15 कोटी 66 लाख, प्राथ.शिक्षण मंडळास वेतनासाठी वर्ग रक्कम रु.10.30 कोटी , प्रशासकीय खर्च रु. 7.56 कोटी/- असा एकुण खर्च रु.83.19 कोटी करण्यात आला आहे. एकुण महसुली जमेच्या 52.87% इतकी रक्कम अस्थापनेवर खर्ची पडली आहे.

14.शासनाकडुन 2012 -13 या वित्तिय वर्षामध्ये खालील प्रमाणे अनुदान प्राप्त व खर्च झाले आहे.

| अ.क्र. | योजनेचे नाव | प्राप्त निधी | खर्च निधी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1 | UIDSSMT | 35 कोटी 56 लाख | 07 कोटी 92 लाख | 22.27 |
| 2 | नगरोत्थान जलनि:सारण | 07 कोटी 07 लाख | 20 लाख | 02.82 |
| 3 | सुजल निर्मल | 11 कोटी 33 लाख | 07 कोटी 71 लाख | 68 |
| 4 | गुंठेवारी विशेष अनुदान | 10 कोटी | 0 | 0 |
| 5 | वैय.शौचालय योजना | 03 कोटी 09 लाख | 02 कोटी 99 लाख | 76.66 |

| |
|---|
| उपरोक्त माहितीचे अवलोकन केले असता शासनाकडुन मिळालेल्या निधीपैकी सर्वात जास्त खर्च (76.66 टक्के) वैय.शौचालय योजनेचा झाला असुन सर्वात कमी खर्च (02.82 टक्के) नगरोत्थान योजने अंतर्गत जलनि:सारण विभागाने केला आहे. यावरुन शासनाकडुन मिळालेल्या निधीचा विनियोग महानगरपालिकेकडुन विहित वेळेत योग्य प्रमाणात होत नसल्याने योजना पुर्ण होण्यास विलंब लागत असल्याचे दिसुन येते. योजनास होणाऱ्या विलंबामुळे योजनांचा खर्च वाढुन योजनेची प्रगती रखडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.<br><br>15.मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 कलम 106 (3) अन्वये प्रत्येक आर्थिक वर्ष सुरु झालेनंतर शक्य तितक्या लवकर महानगरपालिका लेखापरीक्षकाने महानगरपालिकेच्या मागील आर्थिक वर्षाच्या संपुर्ण लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समितीसमोर सादर करुन वार्षिक लेखे मंजुर करुन घेणे आवश्यक आहे. तथापि महानगरपालिकेकडे वार्षिक लेखे ठेवण्यात आलेले नाहीत. त्यामुळे महानगरपालिकेच्या प्रत्यक्ष आर्थिक स्थितीवर भाष्य करता येत नाही.<br><br>16.मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण चार-अ विनिर्दिष्ट माहिती प्रकट करणे यामधील कलम 60 अ विनिर्दिष्ट माहिती प्रकट करणे (1) (3) (पाच) नुसार प्रत्येक तिमाही नंतर दोन महिन्यांच्या आत त्या तिमाहीचा लेखा परिक्षीत ताळेबंद , जमा व खर्च आणि पैशाचा ओघ (CASH FLOW) दर्शविणारे वित्तीय विवरणपत्र इंटरनेटवर प्रसिध्द करणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही केली जात नसलेने महानगरपालिकेच्या वित्तिय स्थितीची माहिती नागरिकांना समजून येत नाही. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 02 | 25/02/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |

| | |
|---|---|
| 142 | वाढीव व सुधारित सांगली व कुपवाड नळ पाणी पुरवठा योजना पॅकेज 3.1, 3.3 व 3.4 मधील अनियमितते बाबत. |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव |
| | UIDSSMT योजना |

| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 06 | पाणी पुरवठा | केंद्र, राज्य व मनपा | 9ड | 05 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 3468918 | | | |

बी-1 टेंडरमधील भाववाढ निर्देशांक अटी/शर्ती 62 प्रमाणे, भाववाढ निर्देशांक (प्राईस एस्कलेशन) डी.आय.पाईप्स, सिमेंट व लोखंड यावर देणे आवश्यक असलेचे नमुद आहे. निविदा 2010-1 1चे चालु दरसूचीशी तुलना करुन ठेकेदारास 9.97% जादा दराने दिली असलेने पुन्हा भाववाढ निर्देशांकाप्रमाणे फरक दिला आहे. देयकामधुन भाववाढ निर्देशांकानुसार )price escalation.रु (3197666ठेकेदारास आदा केले -/ .आहेत त्यामुळे ठेकेदारास भाव वाढ निर्देशांकानुसार वाढीव किंमत व जादा दराने दिलेली निविदा असा दुहेरी दराचा लाभ मिळाल्याचे स्पष्ट होत असल्याने रु.3197666.आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत -/

प्रशासकीय मान्यता :-No. DMA/UIDSSMT - Letters 2006/C R- 264/4, Director of Municipal Administratinon Dt. 28/09/2006 (2nd meeting of the state level sanctioning committee)

तांत्रिक मान्यता :- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे विभाग पत्र CE PUNE/TB-3/Sangli WSS/Technical Deviation/3577 Dt.12/10/10.

स्थायी समिती सभा क्र.09 ठराव क्र.127 दि.22/07/2010 अन्वये निविदा मागविणेस मान्यता दिली आहे.

स्थायी समिती सभा क्र.20 ठराव क्र.359 दि.23/11/2010 अन्वये मे.लक्ष्मी सिव्हील इंजिनियरींग सर्व्हीसेस प्रा.लि.यांची निविदा प्राकलन रक्कम रु.149051271/- च्या 111.85 टक्के जादा दराने व चालु दरसूची (2010-11) चे 9.97 टक्के जादा दराने मंजुर केली असून कामाची किंमत रु.315767118/- होत आहे.

कामाचा कार्यादेश :- क्र.मनपा/पापुवि/सांगली/611/10-11 दि.23/12/2010

कामाची मुदत :- 18 महिने (दि.22/06/2012) कामास मुदतवाढ : दि.31/03/2013 अखेर मुदतवाढ

दिलेली आहे.

सदर निविदेमध्ये माळबंगला जलशुध्दीकरण केंद्र ते हिराबाग पाणी पुरवठा केंद्रापर्यंत 800 मी.मी. डी.आय. के-9 दाबनलिका टाकणे, शालीनीनगर व वानलेसवाडी येथे उंच टाक्यांसाठी शुध्द पाण्याची गरुत्व नलिका टाकणे व कुपवाड वानलेसवाडी व अन्य 5 ठिकाणी विविध लिटर क्षमतेच्या पिण्याच्या पाण्याच्या उंच टाक्या उभारणे या कामाचा अंतर्भाव आहे. 2011-12 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणामध्ये या कामाची निविदा प्रक्रिया व या वर्षात आदा केलेली रु.27,70,86,318/- ची धावती देयके तपासली आहेत. व त्याबाबतचे आक्षेप अहवालामध्ये परिच्छेद क्र.24 वर नोंदविले आहेत. 2012-13 या आर्थिक वर्षात या कामाची खालील देयके आदा करण्यात आली आहेत.

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | मोजमाप पुस्तक क्र | पान क्र. |
|---|---|---|---|---|
| 06 | 15/10/2012 | 30827654/- | 24 | 100 ते 52 |
| | | | 25 | 61 ते 01 |
| 13 | 06/0222013 | 15424090/- | 25 | 100 ते 61 |
| | | | 29 | 15 ते 01 |
| 18 | 30/03/2013 | 9382906/- | 29 | 19 ते 16 |

कामाची नस्ती, बी -1 टेंडर, मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.130 दि.16/9/2014 रोजी निर्गमित करण्यात आला होता. अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालन पाणीपुरवठा विभागाने दि.16/10/2014 रोजी सादर केले आहे. अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालन अवलोकनी घेवून खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)निविदा अटी,शर्ती व नस्तीमधील पृष्ठ क्र.169 वरील दि.11/ 08/2010 रोजी महानगरपालिका व ठेकेदार यांच्यामध्ये प्री-बीड मिटींग मध्ये झालेल्या चर्चेनुसार कामासाठी वापरण्यात येणार असलेले व्हॉल्व हे व्ही.ए.जी.,आय.व्ही.सी.,किर्लोस्कर व गव्हाणे पाटील या कंपनीचे असणे आवश्यक आहे. प्रमाणक क्र. 6 ची तपासणी केली असता अ.क्र. 3 ने ISI mark CIDF 800mm sluice valve 2 पुरविण्यात आले असून रु.292218.10 प्रती नग प्रमाणे रु.584436/-, अ.क्र. 11 ने 3 sluice valve 300mmdiam. रु.43806/-, अ.क्र. 34 ने 1 sluice valve 350mm diam. रु.25871/-,अ.क्र.51 ते 57 ने वेगवेगळ्या

मापाचे sluice valve पुरविले असुन त्याची किंमत रु.994433/- होत आहे. कामासाठी पुरविण्यात आलेले साहित्य उपरोक्त कंपनीचे असल्याबाबतचे पुरावे देयकासोबत जोडण्यात आले नसल्याने साहित्याच्या दर्जाबाबतची खात्री पटत नाही.त्यामुळे रु.1648546/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये ठेकेदाराने किर्लोस्कर कंपनीचे साहित्य पुरविल्याचे व त्याचे तांत्रिक लेखापरीक्षण SGS India Pvt Ltd Mumbai यांनी केल्याचे नमुद आहे. परंतु याबाबतची कागदपत्रे अनुपालनासोबत जोडलेली नाहीत.

2.बी-1 टेंडरमधील भाववाढ निर्देशांक अटी/शर्ती 62 प्रमाणे, भाववाढ निर्देशांक (प्राईस एस्कलेशन) डी.आय.पाईप्स, सिमेंट व लोखंड यावर देणे आवश्यक असलेचे नमुद आहे. निविदा 2010-11 चे चालु दरसूचीशी तुलना करुन ठेकेदारास 9.97% जादा दराने दिले असलेने पुन्हा भाववाढ निर्देशांकाप्रमाणे फरक दिला आहे. देयकामधुन भाववाढ निर्देशांकानुसार (price escalation) रु.3197666/- ठेकेदारास आदा केले आहेत. त्यामुळे ठेकेदारास भाव वाढ निर्देशांकानुसार वाढीव किंमत व जादा दराने दिलेली निविदा असा दुहेरी दराचा लाभ मिळाल्याचे स्पष्ट होत असल्याने रु.3197666/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये अटी/शर्ती 62 प्रमाणे, भाववाढ निर्देशांक दिल्याचे नमुद आहे. परंतु ठेकेदारास 9.97% जादा दराने दिले असलेने पुन्हा भाववाढ निर्देशांकाप्रमाणे फरक दिल्याने ठेकेदारास दुहेरी लाभ मिळाल्याचे आक्षेपास उत्तर दिलेले नाही.

3.स्थायी समिती सभा क्र.20 ठराव क्र.359 दि.23/11/2010 ने व्हॅट,कामगार कल्याण उपकर,रॉयल्टी ठेकेदाराने भरण्याच्या अटीवर चालु दरसुचीच्या 9.97 टक्के जादा दराने काम करुन घेण्यास मान्यता झाली आहे. प्रमाणक क्र.18 दि.30 मार्च 2013 ने ठेकेदारास रु.9382906/- आदा केले आहेत. मोजमाप पुस्तिका व  पाणीपुरवठा विभागाने तयार केलेल्या देयकामधुन रॉयल्टी पोटी ठेव म्हणुन रु.1500000/- कपात केलेची नोंद आहे व लेखा विभागाने रु.1500000/- ठेव म्हणुन कपात करुन उर्वरित रक्कम ठेकेदारास आदा केली आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये ठेकेदाराने रॉयल्टी भरुन पावती सादर केली नसल्याने पाणीपुरवठा विभागाने रक्कम कपात केली आहे व लेखा शाखेस शासनाकडे भरणा करण्याबाबत कळविले आहे. परंतु लेखा शाखेने रक्कम शासनाकडे भरणा केली नसल्याने रु.1500000/- आक्षेपाधिन करण्यात येत आहे.

4.8 व्या धावत्या देयका अखेर कामावर एकुण रु.301893334/- इतका खर्च झाला आहे. कामाची निविदा रु.149051271/- असुन शासन निर्णय क्र.UID-2010 / प्र.क्र. 86/नवि 33 मुंबई दि.31/3/2010 नुसार महानगरपालिकेने मुळ निविदा रक्कमेच्या 10 टक्के हिस्सा रु.14905127/- स्वनिधी म्हणुन घालणे आवश्यक आहे. तसेच निविदा 111.85 टक्के जादाने आल्याने  रु.152842063/- ची तरतुद महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये करणे आवश्यक आहे. स्वनिधी हिस्सा रु. 14905127/- व जादा

निविदेची रक्कम रु.152842063/- असे एकुण रु.167747190/- महानगरपालिका निधीमधुन खर्च करणे आवश्यक असता रु.48863764/- महानगरपालिका निधी मधुन खर्च करण्यात आले आहेत.
महानगरपालिकेने अंदाजपत्रकामध्ये स्वनिधीची तरतुद करुन त्याप्रमाणे प्रत्येक देयक, हिश्याप्रमाणे आदा करणे आवश्यक असता रु.253029570/- रक्कमेची देयके शासन निधीमधुन खर्ची टाकण्यात आली असल्याने शासन निधीमधुन चालु असलेली उर्वरित कामे निधी अभावी बंद पडणेची शक्यता आहे.
अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये सदर योजना पुर्ण करण्यासाठी डीएसआरमधील वाढीमुळे फरकाचे रक्कमेपाटी अनुदान मिळणार असल्याचे नमुद आहे. परंतु अद्यापही अनुदान मिळाले नसल्याने महानगरपालिका फंडातुन जादा निविदेची रक्कम खर्च करणे आवश्यक असता ती केली नसल्याचे दिसुन आले आहे.

5.लेखा विभागाने 2011-12 व 2012-13 या आर्थिक वर्षात या योजनेसाठी किती रक्कमेची तरतुद स्वनिधीमधुन केली होती व किती रक्कम स्वनिधीमधुन खर्ची टाकली याची माहिती लेखापरीक्षणास सादर केलेली नाही.

6.मुळ नस्तीमधील पान क्र.1159 वरील आयुक्त निर्णयामध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73(क) नुसार कार्यकारी अभियंता यांचे दि.25/09/12 चे कार्यालयीन टिपणी अवलोकनी घेता सदर ठेकेदारास दरवाढ न देण्याच्या अटीस अधिन राहुन दि.31/3/13 पर्यंत दि.22/06/12 रोजी अथवा आज रोजी असलेले निर्देशांक यापैकी जे कमी असतील ते निर्देशांक गोठवुन भाववाढ फायद्यासह मुदतवाढ मंजुर करण्यात येत आहे असा निर्णय झाला आहे. आयुक्त यांनी दिलेल्या कार्यालयीन आदेशावर तारीख नमुद नाही. तसेच दिलेल्या आदेशामध्ये नेमकी काय कार्यवाही करावी याचा अर्थबोध होत नाही. 7 व्या धावत्या देयकामध्ये जुन 12 मधील भाववाढ निर्देशांकानुसार रु.15424090 च्या देयकामधुन सिमेंट स्टील व पाईपची किंमत रु.11500316/-इतक्या रक्कमेवर RBI Wholesale Price Index नुसार रु.1799610/- इतकी भाववाढ देण्यात आली आहे. पुनश्च 8 व्या देयकात पुन्हा रु.11500316/- या रक्कमेवर पुन्हा रु.1910477/- इतकी भाववाढ दिलेचे दिसुन येते. त्यामुळे या रक्कमेची जादा आदायगी झालेचे दिसुन येते. अर्धसमास ज्ञापनामध्ये या आक्षेपाचे अनुपालन पाणीपुरवठा विभागाने दिले नसल्याने रु.1910477/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

7.8 व्या धावत्या देयकामध्ये मे 13 मधील भाववाढ निर्देशांकानुसार रु.7005906/- च्या देयकामधुन सिमेंट स्टील व पाईपची किंमत रु.5955020/- इतक्या रक्कमेवर RBI Wholesale Price Index नुसार रु.1123534/- इतकी भाववाढ देण्यात आली आहे. परंतु निर्देशांक दि.23/6/12 पासुन गोठवुन भाववाढ देणे आवश्यक असताना मे 13 मधील भाववाढ निर्देशांकानुसार देयक आदा केले आहे. दि.23/6/12 रोजीच्या सरासरी भाववाढ निर्देशांका नुसार कामावर वापरलेल्या साहित्याची किंमत रु.909935/- होत

| |
|---|
| असल्याने जादा दिलेली रक्कम रु.213599/- ची वसुली ठेकेदाराकडुन करण्यात यावी. अर्धसमास ज्ञापन क्र.131 दि.16/9/14 रोजी निर्गमित केला असुन पाणीपुरवठा विभागाने त्याचे अनुपालन दि.16/10/2014 रोजी सादर केले आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये ठेकेदाराचे पुढील देयकामधुन रक्कम वसुल करण्याचे मान्य केले आहे. परंतु रक्कम वसुल केली नसल्याने रु. 213599/- वसुलपात्र करण्यात येत आहे.<br><br>8.2012-13 अखेर काम पुर्ण झालेचे दिसुन येत नाही. देयकामध्ये व मोजमाप पुस्तक व नस्तीमध्ये काम किती टक्के पुर्ण झाले ते समजुन येत नाही. अनुपालनामध्ये कापसे वसाहत येथील एमबीआर ते शालिनीनगर उंच टाकीचे काम तसेच माळबंगला ते हिराबाग 800 एम.एम.व्यासाचे गुरुत्व नलिका टाकणे हे काम अपुर्ण असल्याचे नमुद आहे. त्यामुळे काम पुर्ण झाले नसल्याचे दिसुन येते.<br><br>9.सुरक्षा अनामत रक्कम कर्नाटक बँकेची बँक गॅरेंटी क्र. BG/123/2010/dated 04/12/10 रु. 3948000/- Extension w.e.f.04/04/13 to 03/10/13 , व BG/124/2010/dated 04/12/10 3948000 Extension w.e.f.04/04/13 to 03/10/13 स्वरुपात घेण्यात आली आहे. सदर रक्कम सुरक्षा अनामत म्हणुन घेतली असल्याने लेखा शाखेने सुरक्षा अनामत नोंदवहीमध्ये नोंदविणे आवश्यक आहे. या बँक गॅरेंटीची नोंद नोंदवहीमध्ये घेण्यात आली किंवा नाही याचा खुलासा केलेला नसल्याने अनामत लेखाशिर्षाखाली या बँक गॅरेंटीची नोंद होवुन रक्कम लेख्यामध्ये समाविष्ठ आहे किंवा नाही याची पडताळणी करता आली नाही.<br><br>आक्षेपाधिन रक्कम :- रु. 57134650/-<br><br>वसुलपात्र रक्कम :- भाववाढ निर्देशांकापेक्षा सिमेंट व स्टीलची जादा दिलेली रक्कम रु. 213599/- |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 130 | 16/09/2014 | 2012-2013 | 2012-2013 | 00043979 |

| | |
|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATSBKM7201 |